९८२८

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.

558



REFBK-0003558

# हिंदुपदपादशाही


ग्रंथकार

बॅरि० विनायक दामोदर सांवरकर

अनुवादक

श्री० डॉ० नारायण दामोदर सांवरकर



विजय साहित्य



REFBK-0003558

[ प्रथमावृत्तीचे सर्व अधिकार प्रकाशकांचे स्वाधीन ]



प्रथमावृत्ति ] [ फेब्रुवारी १९२८

मूल्य दोन रुपये

प्रकाशक
अनंत सखाराम गोखले
१७ नारायण, पुणें.

'साहित्या'चें सातवें पुस्तक

संगीत 'पटवर्धन', 'वरवंचना'
इ० नाटकांचे कर्ते

श्री० गोविंद सदाशिव टेंबेकृत

# संगीत तुलसीदास नाटक

[ यशवंत मंडळींचे फोटोंसह ]

किंमत एक रुपया

मुद्रक
अनंत सखाराम गोखले
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें.

# अनुक्रमणिका

## प्रथम खण्ड


| | | विषय | पृष्ठ |
|---|---|---|---|
| प्रकरण | १ लें | नवीन युग ... ... ... ... | १ |
| ,, | २ रें | हिंदवी स्वराज्य ... ... ... ... | ५ |
| ,, | ३ रें | शिवाजीमहाराजांची जागा सर्व राष्ट्र भरून काढतें ! | १० |
| ,, | ४ थें | हुतात्मा छत्रपति ! ... ... ... ... | १२ |
| ,, | ५ वें | राजहुतात्म्याचा प्रतिशोध ... ... ... | १४ |
| ,, | ६ वें | महाराष्ट्र-मंडळ ... ... ... ... | १८ |
| ,, | ७ वें | थोरले बाजीराव रंगभूमीवर येतात ... ... | २० |
| ,, | ८ वें | दिल्लीवर चाल ! ... ... ... ... | २६ |
| ,, | ९ वें | हिंदूंचे समुद्र स्वतंत्र करण्यासाठीं ! ... ... | ३६ |
| ,, | १० वें | नादीरशहा आणि बाजीराव ... ... | ५१ |
| ,, | ११ वें | नाना आणि भाऊ ... ... ... ... | ५७ |
| ,, | १२ वें | सिंधुनदाचें तीर गांठलें ! ... ... ... | ६९ |
| ,, | १३ वें | हिंदुपदपादशाही ... ... ... ... | ७८ |
| ,, | १४ वें | पानिपत ... ... ... ... ... | ९१ |
| ,, | १५ वें | जेत्यांना जिंकणारा पराभव ... ... ... | १०६ |
| ,, | १६ वें | सद्गुणी माधवराव ... ... ... ... | ११४ |
| ,, | १७ वें | पानिपतचा प्रतिशोध ... ... ... | ११८ |
| ,, | १८ वें | आपसांतील यादवी आणि लोकमताची राज्यक्रांति | १२७ |
| ,, | १९ वें | इंग्रजांना नमवलें ! ... ... ... ... | १४३ |
| ,, | २० वें | सवाई माधवराव—जनतेच्या आवडीचे पंतप्रधान | १४८ |

## द्वितीय खण्ड


| | | विषय | पृष्ठ |
|---|---|---|---|
| प्रकरण | १ लें | ध्येय ... ... ... ... ... | १८५ |
| ,, | २ रें | त्या परिस्थितींतील सर्वोत्कृष्ट उपाय ... ... | १९५ |
| ,, | ३ रें | प्राचीन आणि अर्वाचीन इतिहासाच्या माहितीच्या अनुरोधानें निरीक्षण ... ... ... | २०७ |
| ,, | ४ थें | साधनें : मराठ्यांची युद्धपद्धति ... ... | २१५ |
| ,, | ५ वें | साम्राज्याकडून सर्वांगीण हिंदु-पुनरुज्जीवनाचें संवर्धन | २२३ |
| ,, | ६ वें | प्रेमाचें आणि कृतज्ञतेचें ऋण ... ... | २३१ |
| ,, | ७ वें | पडदा पडतो ... ... ... ... | २३९ |




# प्रस्तावना

बॅरि० विनायकराव सावरकर यांचा 'हिंदुपदपादशाही' हा प्रबंध प्रथम इंग्रजींत प्रसिद्ध झाला. मराठ्यांच्या इतिहासासंबंधीं महाराष्ट्राबाहेर अनेक प्रकारचे गैरसमज, केवळ साधारण जनसमाजांतच नव्हेत तर सुशिक्षित व विद्वान् पुढाऱ्यांतही प्रचलित असलेले आढळून येतात. ते दूर करण्याच्या कामीं बॅरि० सावरकर यांचें हें आटोपशीर पण आकर्षक आणि ओजस्वी भाषेंत लिहिलेलें पुस्तक किती उपयोगी पडलें व पडत आहे हें त्यावर पंडित मालवीय यांनीं दिलेल्या अभिप्रायावरून दिसून येईल. मराठ्यां-संबंधीं बाहेर गैरसमज पसरण्याचीं अनेक कारणें आहेत. मुसलमान व इंग्रज या परकी व पक्षपाती इतिहास-लेखकांचे विपर्यस्त व अज्ञानमूलक असे इतिहासप्रबंध हें या गैरसमजांचें एक मोठें व सकृद्दर्शनीं दिसून येणारें कारण आहे. पण दुसरींही एकदोन कारणें सांगतां येतील. मुसलमानी सत्तेच्या वावटळीनें काबूल-सिंधपासून प्रारंभ करून विजयानगरपर्यंतचीं हिंदु राज्यें उध्वस्त केल्यानंतर हिंदूंच्या पुनरुत्थापनाचे प्रयत्न तिघां-कडूनच झाले. रजपूत, शीख व मराठे या तिघांनींही मुसलमानी सत्तेची लाट परतविण्याइतका जिवंतपणा दाखविला. आणि या तिघांचाही इतिहास शौर्य व आत्मयज्ञ यांच्या अनेक रोमांचकारी प्रसंगांमुळें उदात्त व अभिमाना-स्पद असाच आहे. पण रजपूत व शीख यांचे प्रयत्न वैयक्तिक व स्वसंरक्षणा-पुरतेच होते. ते राज्यस्थापनेचे व राज्यरक्षणाचे प्रयत्न म्हणून म्हटले तर मराठ्यांचा प्रयत्न साम्राज्यस्थापनेचा होता, हा त्यांच्यांतील मोठा फरक होय. यामुळें मराठ्यांना केवळ स्वसंरक्षणापुरता प्रतिरोधच नव्हे, तर चढाई किंवा आक्रमणही करावें लागलें. त्यांच्या हिंदुपदपादशाहीच्या ध्येयाला जें आडवें येईल तें स्वकीय असो वा परकीय असो, त्यावर सारख्याच कडक-पणानें त्यांना प्रहार करणें प्राप्त होतें. मराठ्यांच्या या आक्रमणांत परप्रांतीय हिंदुलोकांनाही मराठ्यांच्या स्वारीनें उत्पन्न होणाऱ्या आपत्ति सोसाव्या लागल्या. या आपत्तींचीं वर्णनें पिढ्यान्‌पिढ्या दंतकथेचे रूपानें अजून वावरत असून तेंही परप्रांतीय गैरसमजाचें एक कारण मानतां येईल.

पण स्वतः महाराष्ट्रांतल्या लोकांत इंग्रजी शिकलेल्यांच्या पहिल्या पिढींत मराठी इतिहासासंबंधीं अज्ञान व कोत्या कल्पना हीं काय कमी होतीं ? अजूनही कित्येक निःपक्षमन्य व अलिप्तमन्य लोक मराठ्यांच्या उत्थापनांत

# प्रस्तावना

बॅरि० विनायकराव सावरकर यांचा 'हिंदुपदपादशाही' हा प्रबंध प्रथम इंग्रजींत प्रसिद्ध झाला. मराठ्यांच्या इतिहाससंबंधीं महाराष्ट्राबाहेर अनेक प्रकारचे गैरसमज, केवळ साधारण जनसमाजांतच नव्हेत तर सुशिक्षित व विद्वान् पुढाऱ्यांतही प्रचलित असलेले आढळून येतात. ते दूर करण्याच्या कामीं बॅरि० सावरकर यांचें हें आटोपशीर पण आकर्षक आणि ओजस्वी भाषेंत लिहिलेलें पुस्तक किती उपयोगी पडलें व पडत आहे हें त्यावर पंडित मालवीय यांनीं दिलेल्या अभिप्रायावरून दिसून येईल. मराठ्यां-संबंधीं बाहेर गैरसमज पसरण्याचीं अनेक कारणें आहेत. मुसलमान व इंग्रज या परकी व पक्षपाती इतिहास-लेखकांचे विपर्यस्त व अज्ञानमूलक असे इतिहासप्रबंध हें या गैरसमजांचें एक मोठें व सकृद्दर्शनीं दिसून येणारें कारण आहे. पण दुसरींही एकदोन कारणें सांगतां येतील. मुसलमानी सत्तेच्या वावटळीनें काबूल-सिंधपासून प्रारंभ करून विजयानगरपर्यंतचीं हिंदु राज्यें उध्वस्त केल्यानंतर हिंदूंच्या पुनरुत्थापनाचे प्रयत्न तिघां-कडूनच झाले. रजपूत, शीख व मराठे या तिघांनींही मुसलमानी सत्तेची लाट परतविण्याइतका जिवंतपणा दाखविला. आणि या तिघांचाही इतिहास शौर्य व आत्मयश यांच्या अनेक रोमांचकारी प्रसंगांमुळें उदात्त व अभिमाना-स्पद असाच आहे. पण रजपूत व शीख यांचे प्रयत्न वैयक्तिक व स्वसंरक्षणा-पुरतेच होते. ते राज्यस्थापनेचे व राज्यरक्षणाचे प्रयत्न म्हणून म्हटले तर मराठ्यांचा प्रयत्न साम्राज्यस्थापनेचा होता, हा त्यांच्यांतील मोठा फरक होय. यामुळें मराठ्यांना केवळ स्वसंरक्षणापुरता प्रतिरोधच नव्हे, तर चढाई किंवा आक्रमणही करावें लागलें. त्यांच्या हिंदुपदपादशाहीच्या ध्येयाला जें आडवें येईल तें स्वकीय असो वा परकीय असो, त्यावर सारख्याच कडक-पणानें त्यांना प्रहार करणें प्राप्त होतें. मराठ्यांच्या या आक्रमणांत परप्रांतीय हिंदुलोकांनाही मराठ्यांच्या स्वारीनें उत्पन्न होणाऱ्या आपत्ति सोसाव्या लागल्या. या आपत्तींचीं वर्णनें पिढ्यान्‌पिढ्या दंतकथेचे रूपानें अजून वावरत असून तेंही परप्रांतीय गैरसमजाचें एक कारण मानतां येईल.

पण स्वतः महाराष्ट्रांतल्या लोकांत इंग्रजी शिकलेल्यांच्या पहिल्या पिढींत मराठी इतिहाससंबंधीं अज्ञान व कोत्या कल्पना हीं काय कमी होतीं ? अजूनही कित्येक निःपक्षमन्य व अलिप्तमन्य लोक मराठ्यांच्या उत्थापनांत

राष्ट्रीय अगर धार्मिक उच्च ध्येय अखंड अनुस्यूत होतें ही गोष्ट मानावयास तयार नाहींत ! याचेंही एक कारण परकी इतिहासकारांचा पगडा हें तर आहेच; पण त्याबरोबर मराठ्यांमध्यें इतिहास लिहून ठेवण्याची प्रवृत्ति बरीच कमी होती हेंही एक मूलकारण सांगतां येईल. गोविंदराव काळे आपल्या पत्रांत म्हणतात त्याप्रमाणें " यवनांच्या जातींत इतकी गोष्ट चांगली झाल्यास गगनाबरोबर करून शोभवावी. आमचे हिंदूंत गगनाइतकी झाली असतां उच्चार न करावा हे चाल आहे " हें एक मराठ्यांच्या इतिहास लिहून न ठेवण्याच्या प्रवृत्तीचें कारण असावें. ज्या काळांतला मराठ्यांचा इतिहास इतिहाससंशोधकांनीं जुने कागदपत्र धुंडाळून कष्टानें धागेदोरे जुळवीत आणला त्या काळचा इंग्रज व मुसलमान यांचा इतिहास खडानूखडा लिहिलेला आढळतो. इंग्रज इतिहासकारांनाही मराठ्यांच्या इतिहासाचे धागे प्रथम मुसलमानांच्या इतिहासग्रंथांवरूनच जुळवावे लागले. पण इतिहाससंशोधकांच्या प्रयत्नानें आज इतके कागदपत्र पुढें आले आहेत कीं, ते पाहूनही जर कोणी मराठ्यांच्या उच्च ध्येयाबद्दल शंका घेईल तर तो प्रतिनिविष्ट व दुराग्रहीच मानला पाहिजे. बॅरि० सावरकरांनीं आपल्या त्वरमाण समालोचनांत हें ध्येयाचें अखंड सूत्र स्पष्ट दाखविणारे असे निवडक प्रसंग, घटना व लेख गोंवले आहेत. पण यासंबंधीं सर्व पुराव्याची समग्र जंत्री कोणास पहावयाची असल्यास ती धुळ्याचे श्री० भट वकील यांनीं नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या " महाराष्ट्र-धर्म " या पुस्तकांत आढळेल. बॅरि० सावरकरांनीं आपल्या प्रबंधांतील प्रत्येक वाक्यांत जी भावना ओतली आहे ती अनाठायीं आहे असें कोणासही म्हणतां येणार नाहीं. मराठ्यांच्या उत्थापनाच्या व्यापक प्रयत्नाला केवळ महाराष्ट्रापुरतेंच नव्हे तर अखिल हिंदुजातीच्या दृष्टीनेंही नितांत महत्त्व आहे हें आतां कोणासही कबूल करावें लागेल. आणि परिस्थितीचा विचार केला तर हिंदुसाम्राज्याच्या पुनरुत्थापनाचा मराठ्यांचा प्रयत्न अपूर्व, अद्भुत व आश्चर्यकारक असा आहे. हा प्रयत्न ध्येयाच्या अगदीं शिगेला पोंचतो न पोचतो तोंच ढांसळला. असें होण्यांत मानवी कारणांइतकींच प्रबळ अशीं दैवी कारणेंही घडलीं. जो चढेल तो पडेल; पण आपण कोणत्या शिगेपर्यंत जाऊं शकतों याची जाणीव देण्याचे कामीं सर्व हिंदूंना मराठ्यांच्या इतिहासाइतका उपयुक्त असा दुसरा कोणताही इतिहास नाहीं. मराठ्यांचें उत्थापन हें मराठ्यांपुरतेंच नव्हतें, तें अखिल हिंदुजातीसाठींच

उघडपणें होतें हें परप्रांतीयांच्या नजरेस आणण्याचा बॅरि० सावरकरांच्या इंग्रजी प्रबंधांतील मुख्य हेतु आहे आणि तो साध्य झाल्याशिवाय राहणार नाहीं.

महाराष्ट्रांतील तरुणांनीं आपल्या इतिहासाचें यापेक्षां पुष्कळच अधिक ज्ञान संपादन करावयास हवें; पण आज अशी स्थिति आहे कीं, शाळा-कॉलेजांतून शिकविल्या जाणाऱ्या निर्जीव, ध्येयशून्य व परकी इतिहासाचे संस्कार मनावर घेऊन बाहेर पडलेले हजारों तरुण पुढें इतिहासाची अधिक माहिती करून न घेतां त्याच अर्ध्याकच्च्या ज्ञानावर राहतात आणि आपला इतिहास फारसा अभिमानास्पद नाहीं अशीच त्यांची समजूत झालेली असते. अशा बऱ्याच मोठ्या सामान्य वाचकवर्गाचे हातीं बॅरि० सावरकर यांचें पुस्तक प्रथम दिलें पाहिजे. त्यायोगें कित्येक खडबडून जागे होतील व कित्येकांना आपल्या इतिहाससंशोधकांनीं लिहिलेले इतिहासप्रबंध वाचण्याची स्फूर्ति होईल. शाळेंतल्या किंवा कॉलेजांतल्या अभ्यासापुरता ज्यांनीं इतिहास वाचला त्यांना जिवंत इतिहासलेखन म्हणजे काय याची कल्पनाही नसते. ती कल्पना या पुस्तकानें मूर्तिमंत प्रत्येकाच्या डोळ्यापुढें उभी राहील. अशा तऱ्हेच्या राष्ट्रीय इतिहासाचे सामान्य जनतेस सुलभ, चटकदार व स्फूर्तिकारक असे प्रबंध लिहिण्याचा प्रयत्न लहानशा प्रमाणावर प्रथम महाराष्ट्रांतील 'धनुर्धारी' या लेखकानें केला होता. पण त्यापेक्षां वरच्या प्रतीचा व अधिक सुबुद्ध असा बॅरि० सावरकर यांचा प्रयत्न आहे. कादंबरीपेक्षां अधिक जड असें वाङ्मय ज्यांच्या डोक्याला सोसत नाहीं असे वाचक खरे, पारसनीस यांचे चरित्रात्मक इतिहासग्रंथही हातीं घेत नाहींत, मग राजवाडे यांचे ग्रंथ अगर बखरी दूरच राहिल्या! पण बॅरि० सावरकर यांचें मराठ्यांच्या इतिहासाचें हें समालोचन वाचावयास घेतलें म्हणजे एकाद्या कादंबरीप्रमाणें तें कोणाचेंही मन आकर्षून घेईल व तें संपूर्ण वाचल्याशिवाय त्याला खालीं ठेववणार नाहीं. सावरकरांचा हा येवढा ग्रंथ महाराष्ट्रांतील नव्या पिढीपैकीं प्रत्येक व्यक्तीच्या वाचनांत आला तर तें एक मोठेंच राष्ट्रकार्य होईल. यासाठींच बॅरि० सावरकरांनीं आपल्या इंग्रजी ग्रंथाचें मराठींत रूपांतर केलें व श्री० गोखले यांनीं तें प्रकाशित केलें याबद्दल दोघांचेंही महाराष्ट्रावर उपकारच झाले आहेत.

आजचा आपला स्वराज्यसंस्थापनेचा प्रयत्न आणि मराठ्यांचा "हिंदवी स्वराज्य" स्थापनेचा प्रयत्न यांचें स्वरूप भिन्न आहे. आपल्याला

सर्वस्वीं नव्या धर्तींचें स्वराज्य हवें आहे; पण मराठ्यांनीं ज्या स्वराज्याची स्थापना केली किंवा पुनरुज्जीवन केलें त्याची कल्पना रूढ होती. हिंदूंच्या सर्व धार्मिक व सामाजिक व्यवस्थेचा मेरुमणि पुरातन काळापासून क्षत्रिय राजा हा होय. तो नसेल तर कमानीचा दगड पडल्यावर जशी सर्व कमान ढासळते, त्याप्रमाणेंच मुसलमानी आक्रमणामुळें हिंदूंची धार्मिक व सामाजिक स्थिति झाली होती. आजचें इंग्रजी राज्याचें आक्रमण मुख्यतः धार्मिक नाहीं तर व्यापारी आहे. मुसलमानांचें आक्रमण हें मुख्यतः धार्मिक स्वरूपाचें होतें. नामदेवांनीं वर्णन केल्याप्रमाणें "राजे भ्रष्ट यवन झाले ठायीं ठायीं दोष घडले ॥ मग यींहिं अवतार घेतले । कलिदोष हरावया ॥ नामा म्हणे पुढें हे जन । यवनसंसर्गें कठीण ॥ होता गातां हरीचे गुण । ते उद्धरती सर्वथा ॥" अशी स्थिति झाली. शिवपूर्वकालीन महाराष्ट्रीय संत याला 'कलियुग' असें म्हणत. प्राप्त परिस्थितीला 'कलियुग' व 'कलंकी अवतार' या दोन पौराणिक कल्पना त्यांनीं जुळवून घेतल्या होत्या. म्लेंच्छ राजे आले व धर्मरक्षक क्षत्रिय राजे गेले यामुळें झालेल्या कलियुगांत वैयक्तिक धर्मरक्षण व्हावें, येवढ्यासाठीं नामस्मरणाचा व आबालवृद्धांस सोप्या अशा भक्तिमार्गाचा प्रसार त्यांनीं जारीनें केला व भावी हिंदवी उत्थापनेचा मूळ धार्मिक पाया बळकट केला. पुढें केव्हां तरी परमेश्वरी अवतार होऊन म्लेंच्छांचा संहार होईल व क्षत्रिय राजे राज्य करूं लागतील त्यावेळीं सामुदायिक वर्णधर्माची घडी बसेल, ही गूढ आशा ते बाळगून होते.

**कलीचीये अंतीं। होणार कलंकी ॥ मारील म्लेंछ कीं। घोड्यावरी ॥**
**फिरून धर्माची। उभारील गुढी ॥ कृतयुगप्रौढी। करी तोचि ॥**
**तोंवरी साधन। हरिनामकीर्ती ॥ संतांची संगति। नामा म्हणे ॥ १ ॥**

या नामदेवांच्या अभंगांत हीच आशा दिसून येते. म्लेंछसंहारक कलंकी-अवतार उत्पन्न होईपर्यंत धर्माच्या वैयक्तिक भागाचें रक्षण करण्याकरितां हरिनामात्मक संतांची चळवळ अत्यावश्यक होती. हा कलंकी अवतार शिवाजीमहाराजांच्या रूपानें अवतरला. त्यानें हिंदूंचा सामुदायिकधर्म जिवंत केला म्हणूनच—

**रायांनीं करावे राजधर्म। क्षत्रीं करावें क्षात्रकर्म ॥**
**ब्राह्मणीं करावे स्वधर्म। नानाप्रकारें ॥**

ही हिंदूंची सामुदायिक धर्माची घडी बसली. त्यापूर्वी " या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाहीं " अशी स्थिति होती. म्हणूनच आपलीं कृत-युगाचीं,परमेश्वरी अवतारकृत्याचीं, आनंदवनभुवनाचीं आशापूर्ण स्वप्नें शिवाजी-महाराजांनीं सत्यसृष्टींत आणलीं, असें संतांना वाटलें व त्यांनीं महाराजांना " ईश्वराचें देणें " म्हणून मानलें. 'कलिदोष हरावया' पुढें आलेला व्यक्ति-धर्म व कृतयुगप्रौढी उत्पन्न करणारा राष्ट्रधर्म मिळून 'महाराष्ट्र-धर्म' परिपूर्ण झाला म्हणूनच त्याचें लक्षण " पाहिलें तें हरिकथानिरूपण । दुसरें तें राज-कारण । तिसरें तें सावधपण । सर्व विषयीं ॥" असें मानतात. यांत " पहिलें तें हरिकथानिरूपण " हें ज्ञानेश्वरांपासून संतांनीं केलेलें कार्य जमेस धरून, हिंदूंच्या सामुदायिक धर्माच्या पुनरुज्जीवनाची वेळ शिवाजीमहाराजांनीं कृतीनें आणून दिली, हें ओळखून, रामदासांनीं हिंदुधर्माचें जें संपूर्ण स्वरूप मांडलें तोच महाराष्ट्र-धर्म होय. रामदासांच्या कार्याची जशी पूर्वतयारी भागवतधर्मीय संतांनीं केली होती. तशीच शिवाजीच्या राजकारणाची तयारी शहाजीनें केली होती. अत्यंत बिकट अशा परिस्थितींत 'स्वतंत्र राज्यस्थापने'चें ध्येय डोळ्यांपुढें ठेवून शहाजीनें तें बरेंचसें सिद्धीस नेलें. शिवाजीमहाराजांची महत्त्वाकांक्षा चक्रवर्तित्वापर्यंत जाऊन पोंचली पण तिला शहाजीच्या कार्याचें अधिष्ठान होतें हें लक्षांत ठेवलें पाहिजे. हिंदु-धर्माच्या व हिंदुधर्मांतर्गत राज्याच्या पुनरुज्जीवनाची ही लाट महाराष्ट्रांत उत्पन्न झाल्यामुळें प्रारंभीं त्यास " महाराष्ट्र-धर्म व महाराष्ट्र राज्य " अशा संज्ञा होत्या. पुढें मराठ्यांची महत्त्वाकांक्षा महाराष्ट्रीय मर्यादा ओलांडून भारतीय बनली. तेव्हां याऐवजीं " हिंदुधर्माची कायमी " व " हिंदवी स्वराज्य " अगर " हिंदुपदपादशाही " हे शब्द अधिक प्रचारांत आले. प्रथम मराठी राज्यस्थापनेच्या वेळीं " मराठा तितुका मेळवावा " ही चळवळ जशी जोरानें झाली तशी पुढच्या हिंदवी साम्राज्यस्थापनेचे वेळीं " हिंदु तितुका मेळवावा " अशी चळवळ झाली नाहीं. रामदासांनीं केलेली मठसंघटना त्यांचेमागें जिवंत व कार्यक्षम राहिली असती तर ही चळवळ झाली असती. पुढें मराठेशाहींत योद्धे व राजकारणी पुरुष व संतही अनेक झाले. त्यांच्या थोरपणाची कल्पना बॅरि०सावरकर यांच्या पुस्तकावरून येईल; पण शिवाजी व रामदास यांच्या तोडीचे अद्वितीय पुरुष पुढें राष्ट्राला लाभले नाहींत असेंच म्हणावें लागतें.

अनुदार व विश्वासघातकी अशा प्रतिपक्षीयांबद्दल हिंदूंनीं जागोजाग फाजील उदारपणा व विश्वास दाखविला. ही खोड हिंदूंच्या हाडींमांसीं खिळलेली दिसते व अजूनही ती गेलेली नाहीं. " घटासि आणावा घट " किंवा " देवद्रोही तितके कुत्ते । मारूनि घालावे परते । " ही जयिष्णु व प्रभविष्णु रामदासी विचारसरणी प्रसृत व रूढ करण्याचा प्रयत्न त्यांचे पश्चात् जितका व्हावा तितका झाला नसावा असें वाटतें. शिवाजी व रामदास यांनीं राष्ट्रधर्माच्या ध्येयाची बांधून दिलेली शिधोरी मराठयांनीं शंभरसवाशें वर्षे पुरवून खाल्ली; पण त्यांत नवी भर फारशी घातली असें दिसत नाहीं. शिवाजीमहाराज परिस्थितीला तोडीस तोड होते. पुढील योद्धे व राजकारणी पुरुष कितीही मोठे व त्यांचीं चरित्रें कितीही अभिमानास्पद व स्फूर्तिदायक असलीं तरी ते प्रतिपक्षाला तोडीस तोड देण्याचे बाबतींत कांहीं अंशीं अपुरे पडले. साम्राज्यसत्ता ही दिल्लीच्या बादशाहांचीच असली पाहिजे ही रूढ कल्पना अखेरपर्यंत मराठयांना समूळ उखडून टाकतां आली नाहीं. अंतस्थ कलह व कर्तृत्ववान् पुरुषांचीं अकालीं निधनें अशा अनेक आपत्ति मराठ्यांच्या मार्गांत आल्या. मराठयांच्या ध्येयाची इतर हिंदूंना व्हावी तशी जाणीव नव्हती. रामदासांनीं " मराठा तितुका मेळवावा " ही घोषणा जशी केली तशीच पुढील संतांनीं " हिंदु तितका मेळवावा " ही घोषणा जोरानें करावयास हवी होती. त्यासाठीं रामदासांसारखी मठस्थापना व्हावयास पाहिजे होती. राजकारणी पुरुषांप्रमाणें संतही परिस्थितीला अपुरे पडले. पण मराठयांच्या अंतिम पराजयाची ज्यानें त्यानें आपापल्या मतीप्रमाणें संगति कशीही लावली तरी त्यांच्या आंदोलनाचा इतिहास तेजस्वी आहे. उच्च राष्ट्रीय ध्येयासाठीं सामुदायिक व प्रचंडप्रमाण प्रयत्न आणि त्यासाठीं पराक्रम, आक्रमण, स्वार्थत्याग व आत्मयज्ञ हिंदु अत्यंत विपरीत स्थितींतही करूं शकतो या इतिहासावरून त्याला त्याच्या चिवट संस्कृतीबद्दल खात्रीनें अभिमान उत्पन्न होईल. आणि आजच्या त्याहूनही बिकट अशा परिस्थितींत, संस्कृति-पुनरुज्जीवनाचे, पुनर्घटनेचे, संघटनेचे व आक्रमणाचेही मार्ग चोखाळण्यास स्फूर्ति मिळेल.

दासनवमी<br>
ता. १९–२–२८

ग. वि. केतकर

# भूमिका

जरी भूतकाल द्रुतगतीनें दूरदूर निघून चालला असला तरी इतिहासाचार्य कै० राजवाडे आणि त्यांच्यासारख्या इतर थोर इतिहाससंशोधकांच्या पुरःसरत्वाखालील मराठी विद्वानांचे मंडळाच्या अविश्रांत परिश्रमामुळें महाराष्ट्राच्या हिंदु साम्राज्याच्या इतिहासावर इतका नवीन प्रकाश पडला आहे कीं, पूर्वीं अधिक चांगलीं साधनें उपलब्ध नसल्यामुळें केवळ परकीय लेखकांच्या विपर्यस्त आणि अस्पष्ट स्वरूप दाखविणाऱ्या आवृत्तींतूनच ज्यांना त्या इतिहासाचें निरीक्षण करावें लागत होतें त्या लेखकांपेक्षां आपल्याला त्या महदभ्युत्थानाचे महान् महत्त्वाचे विशेष कितीतरी अधिक स्पष्ट झाले आहेत; पण ह्या मराठी विद्वानांनीं शोधून काढलेले आणि लोकांपुढें ठेवलेले, निरनिराळ्या राजवटींचे लेखसंग्रह, अधिकारपत्रें, मूळ पत्रव्यवहार आणि तत्कालीन बखरी व वर्णनग्रंथ इत्यादि स्वरूपांत असलेलें प्रचंड साहित्य बव्हंशीं मराठी भाषेंत असल्यामुळें आणि कै० न्यायमूर्ति रानडे ह्यांनीं केलेल्या एका प्रयत्नाव्यतिरिक्त महाराष्ट्राचा समग्र इतिहास हा नवीन संस्थेनें त्यावर पाडलेल्या प्रकाशाच्या दृष्टीनें त्रोटक-पणानें देखील महाराष्ट्राबाहेरील अभ्यासकांच्या आणि वाचकांच्यापुढें मराठी इतिहाससंशोधकांच्या परिश्रमांचें स्वरूप त्यांना समजेल अशा रीतीनें ठेवतां येईल अशा भाषेंत पुनः लिहिण्याचा दुसरा प्रयत्न न झाल्यामुळें दुसऱ्या देशांतील लोकांची गोष्ट तर दूरच राहिली पण हिंदुस्थानांतील जनसमाजाच्याही मराठी उठावणीला स्फूर्ति पुरविणाऱ्या ओजस्वी तत्त्वांविषयीं आणि त्याचप्रमाणें समग्र हिंदुस्थानांतील लोकांच्या बृहत् इतिहासाच्या युगावर तिच्या योगानें झालेल्या दूरगामी परिणामांविषयीं अद्यापि अत्यंत अस्पष्ट, चमत्कारिक आणि विपर्यस्त देखील कल्पना आहेत. ह्या नवीन पडलेल्या प्रघाताच्या साहाय्यानें ह्या इतिहासाच्या सर्व अंगोपांगांचें अर्थकारानें परीक्षण करून विशद करणाऱ्या सर्व-ग्राही ग्रंथाच्या अभावीं, तशा मोठ्या ग्रंथाचा मार्ग मोकळा करणारा एक संक्षिप्त इतिहास, लघुपुस्तिका, आपण लिहावी आणि आपल्या महाराष्ट्रेतर वाचकांना जो महत्संदेश देण्यासाठीं मराठी अभ्युत्थानाचा जन्म झाला, त्या संदेशाचा आणि त्यानें ज्याची पूर्तता करण्यासाठीं एवढी धडपड केली त्या महत्त्वाच्या ईश्वरी कार्याच्या रूपरेखेचा परिचय करून द्यावा असा आमचा पुष्कळ दिवसां-

पासून हेतु होता. शके १८३२ (इ. सन १९१०मध्यें) शिखांच्या इतिहासावर आम्हीं लिहिलेला आणि त्याच्या जन्माच्याच क्षणीं राज्यक्रांतीच्या झगड्याच्या निष्ठुर आघातांनीं गळा दाबून मारलेला आमचा ग्रंथ समाप्त केल्याबरोबर मराठ्यांच्या इतिहासावरील असलें संक्षिप्त पुस्तक इंग्रजीमध्यें लिहावयाला आम्हीं आरंभसुद्धां केला होता.

इतक्यांत अधिक निकडीच्या आणि कसून काम घेणाऱ्या कर्तव्यांनीं मृत्यूच्या आणि अंधकाराच्या सैन्याशीं आमरणांत संगर करण्यासाठीं अंदमानच्या एकांत कोठडींत आम्हाला अडकवून टाकलें आणि आमचें हें आवडीचें काम पुन्हा हातीं घेण्यासाठीं जिवंत राहण्याची केवळ आशासुद्धां पार लयाला नेली.

पण अंतीं परमेश्वरकृपेनें आम्हाला आपली लेखणी पुन्हा हातांत घ्यावयाला पुरे इतकें स्वातंत्र्य आणि सामर्थ्य मिळालें आहे आणि अशा रीतीनें आज आम्हांला आपल्या हिंदुजातीचें स्वातंत्र्य परत जिंकण्यासाठीं व गौरव प्रस्थापित करण्यासाठीं जे इसवी सनाच्या १७ व्या व १८ व्या शतकांत इतक्या शौर्यानें लढले आणि इतकें यश संपादितें झाले त्या आपल्या प्रतापी पूर्वजांच्या जीवितकार्याला हा आमचा नम्र पण प्रेमाचा नमनाञ्जलि अर्पण करतां येत आहे.

हिंदुस्थानांतील केवळ प्रांतीय स्वरूपाची चळवळदेखील—मग ती रजपुतांनीं प्रारंभिलेली असो, शिखांनीं चालविलेली असो, मद्राश्यांनीं केलेली असो किंवा मराठ्यांनीं शेवटास नेलेली असो; तिच्या महानतेचें प्रतिबिंब समग्र हिंदुजातीच्या इतिहासावर पडणें अपरिहार्य आहे. एका विभागानें करून दाखविलेल्या पराक्रमावरून सबंध जातीच्या सुप्त पण संभाव्य सामर्थ्याचें स्वरूप अवश्यमेव समजून येतें. तेव्हां मराठी उत्थापनाचें स्वरूप केवळ प्रांतीय असलें तरी त्याला अखिल भारतीय महत्त्व होतें. पण आपण ज्याचें निरीक्षण करणार आहों तें मराठी आंदोलन प्रांतीय चळवळीच्या मर्यादा ओलांडून इतक्या निश्चितपणें आणि इतक्या हेतुपूर्वक पुढें जातें कीं, त्याला अखिल भारतीय महत्त्व देऊन त्याची तत्त्वचिकित्सा करणें प्रामुख्यानें प्राप्त आहे. किंबहुना अखिल भारतीय दृष्टिकोनांतून त्याचें निरीक्षण केलें नाहीं तर त्याचें महत्त्व आपल्याला मुळींच अजमावतां यावयाचें नाहीं. तेव्हां मुख्यतः महाराष्ट्राबाहेरील हिंदु जनतेपुढें मांडलेला हा चिकित्सात्मक

निबंध लिहिण्यांत आमचा प्रमुख उद्देश अखिल हिंदु इतिहासाच्या दृष्टीनें मराठी उत्थापनाचें महत्त्व दाखवून निश्चित करावयाचें हा आहे आणि म्हणून महाराष्ट्राच्या हिंदु साम्राज्याचा क्रमवार साग्र वृत्तांत सांगण्यासाठीं मूलतः ह्या पुस्तकाची योजना नसून ज्या प्रधान तत्त्वांनीं आणि ध्येयांनीं त्याला चेतना दिली ती स्पष्टपणें पुढें आणण्यासाठीं आहे. तरीही पहिला संपूर्ण खंड मराठी इतिहासाचा थोडक्यांत धावता वृत्तांत देण्यांत घालविला आहे. द्वितीय खंडांत काढलेल्या सिद्धान्तांच्या समर्थनासाठीं आम्हाला अगदीं अवश्य वाटल्या तेवढयाच घटना आणि प्रसंग कमीअधिक प्रमाणांत सुसंगत स्वरूपांत पहिल्या खंडांत दिले आहेत. महाराष्ट्राच्या बाहेरच्या जनसमाजाचा शिवाजीमहाराजांच्या चरित्राशीं त्यांतल्यात्यांत चांगला परिचय आहे; आणि 'मराठ्यांच्या सत्तेच्या उदया'चे गुणाढ्य ग्रंथकार न्यायमूर्ति रानडे ह्यांनीं छत्रपति राजारामाच्या मरणापर्यंत व शाहूमहाराज परत येईपर्यंतच्या मराठ्यांच्या सर्व उलाढालींतील आणि जीवनकार्यांतील अंतस्थ नैतिक ऐश्वर्य लोकांपुढें विशद केलें आहे. तेव्हां त्या कालाचा आम्हीं नुसता जातां जातां उल्लेख केला आहे आणि त्यानंतरच्या काळांतील उलाढालींचा विशेष परामर्ष घेतला आहे.

ह्या आपल्या हिंदु सम्राज्याच्या उदयाच्या आणि अस्ताच्या कथानकास आपल्या हिंदु जातीला जो भव्य संदेश द्यावयाचा आहे तो इतिहासाच्या प्रत्येक पानावर ठळक लिहिलेला आहे. तेव्हां आमच्या हिंदु बांधवांसाठीं विशेष कांहींच सांगावयाची किंवा प्रस्तावनाही लिहावयाची आम्हाला मुळींच आवश्यकता वाटत नाहीं.

पण आमच्या मुसलमान वाचकांसाठीं स्पष्टीकरणाचे दोन शब्द लिहिणें अवश्य आहे. ज्या कार्यकर्त्यांच्या कृतींचें वर्णन करण्याच्या उद्देशानें इतिहासकार इतिहास लिहावयाला घेतो, त्याच्या स्वतःच्याच भावनांचें, हेतूंचें, विकारांचें आणि कृतींचें शक्यतोंपर्यंत चित्र रंगाविणें हें त्याचें मुख्य कर्तव्य आहे. आणि त्यावेळेपुरता तो नुसत्या आपल्या आवडीनिवडीचाच नाहीं तर त्या भूतकालच्या वृत्तान्ताचें वर्तमानकालांतील उद्दिष्टावर व परिस्थितीवर होणाऱ्या संभवनीय परिणामाविषयींच्या भीति-आशंकांचा देखील त्यानें पूर्णपणें त्याग केल्यावांचून त्याला हें कर्तव्य उत्तम रीतीनें आणि यथातथ्य पाळतां येणें शक्य नाहीं. वर्तमानकाळांत हितसंबंधाच्या दृष्टीनें त्याला

कांहीं हातभार लावावयाचा असेल तर त्यानें तो इतर मार्गानें लावण्याचा प्रयत्न करावा, भूतकालांतील व्यक्तींच्या कृत्यांच्या आणि हेतूंच्याविषयीं अतिशयोक्ति, अन्योक्ति किंवा विपर्यास करून लावतां कामा नये. उदाहरणार्थ, महंमदाचें चरित्र लिहावयाला ज्यानें घेतलें आहे अशा ग्रंथकारानें केवळ महंमदी मताचे अनुयायी नसलेल्या आपल्या वाचकांच्या किंवा देशबांधवांच्या मनोवृत्ति दुखूं नयेत आणि त्यांचा आपल्यावर रोष होऊं नये ह्या हेतूनें त्या आरब वीरानें मूर्तिपूजेवर जे खंडनात्मक भयंकर आघात चढविले किंवा इस्लामी धर्मावर विश्वास न ठेवणाऱ्यांना ज्या प्राणघातक धमक्या दिल्या त्या गुळमुळीत करून सांगण्याचा प्रयत्न केला तर त्यानें आपलें कर्तव्य केलें नाहीं असें होईल. त्याला तसल्या वाचकांचें मन प्रसन्न राखावयाचें असेल तर तें त्यानें स्वतः अधिक परमतसहिष्णु बनून किंवा पहिल्यानें त्याच्या चरित्रांतील सर्व घटना देऊन त्याचा यथातथ्य जीवनवृत्तान्त कथन केल्यावर जर त्याला प्रामाणिकपणानें त्या चरित्रावरून विचाराच्या आणि धर्ममताच्या स्वातंत्र्याला व सयुक्तिकतेला अनुकूल असें नैतिक तात्पर्य काढतां येत असेल तर तसें काढूनसुद्धां साधण्याचा प्रयत्न करावा. जर त्याला अशी वृत्ति ठेवतां येत नसेल तर त्यानें महंमदाचें चरित्र लिहावयाचा विचार मुळांतच सोडून दिलेला चांगला. महंमदाच्या प्रामाणिक चरित्रलेखकाच्या शिरावंर ज्याप्रमाणें हें उत्तरदायित्व आहे त्याप्रमाणें त्याच्या वाचकांपैकीं जे महंमदाच्या धर्मोपदेशाशीं पूर्णपणें किंवा मुळींच सहमत नाहींत त्यांच्यावरही त्या लेखकाच्या संबंधांत प्रतिकर्तव्य आहे. एकादा ग्रंथकार भूतकाळचा, एकाद्या महंमदाचा, बाबरचा किंवा औरंगझेबाचा इतिहासकार म्हणून आपलें कर्तव्य करीत असतां त्यांच्या क्रूर किंवा इतर सर्व मनोवृत्तींतील आकांक्षांचें आणि कृत्यांचें प्रामाणिकपणें व कदाचित् स्फूर्तिदायक रीतीनें किंवा गुणग्राहकतेनें सुद्धां वर्णन करील तर त्याच्या ह्या वाचकांनीं सुद्धां ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, ह्या त्याच्या लिहिण्यावरून आजचा नागरिक ह्या नात्यानें आपलें कर्तव्य पालन करण्यांत तो अवश्यमेव कमी पडला पाहिजे असें नाहीं; इतकेंच नाहीं तर आपल्याहून भिन्न अशीं धार्मिक मतें मानणाऱ्या आणि भिन्न मानववंशांत उत्पन्न झालेल्या आपल्या देशबांधवांविषयीं किंवा इतर मनुष्यांविषयीं त्याच्या मनांत अत्यंत कनवाळुपणाच्या भावना असणेंही संभवनीय आहे. एवढ्यासाठीं परकी मुसलमानसत्तेशीं ज्या काळांत जीवनमरणाचा

झगडा झगडण्यांत हिंदु गुंतले होते त्या हिंदु-इतिहासांतील कालखंडाचा वृत्तान्त सांगत असतांना त्या वेळच्या प्रचंड घटनांचें आणि त्यांच्या कारणांचें त्या परिस्थितीच्या दृष्टीनें वर्णन करण्याच्या आणि त्या घडविणाऱ्या व्यक्तींच्या मनोभावना बव्हंशीं त्यांच्याच प्रत्यक्ष संबंधांत व्यक्त करण्याच्या आणि अशा रीतीनें ग्रंथकार म्हणून आमच्यावरील उत्तरदायित्व शक्य तितकें प्रामाणिकपणें पार पाडण्याच्या आमच्या कर्तव्यापासून आम्ही पराङ्मुख झालों नाहीं. तेव्हां आपण परीक्षण करणार असलेला इतिहास हा ज्यांच्या पूर्वजांच्या कृत्यांविरुद्ध एक प्रचंड आणि समर्थ प्रतिरोध होता–आणि तो तसा होता हें योग्यच होतें असें आम्ही समजतों–त्या आमच्या मुसलमान देशबांधवांनीं विशेषतः तेवढ्यामुळेंच केवळ ह्या पिढींतीलही आमच्या मुसलमानी देशबांधवांविषयीं किंवा सामान्य मुसलमानसमाजाविषयीं आमच्या मनांत विरुद्ध भावना आहेत असा समज करून न घेतां वाचण्याचा प्रयत्न करावा. एखाद्या हिंदूनें आणि मुसलमानानें एकमेकांना आलिंगन देतांना शेंकडों वर्षांपूर्वी शिवाजीमहाराजांनीं व अफझुलखानानें अशा प्रसंगीं प्राणांतींची मगरमिठी मारली म्हणून एकदम तसें करावयास प्रवृत्त होणें हें जितकें मूर्खपणाचें आणि आत्मघातकीपणाचें आहे तितकेंच पूर्वकालांतील भांडणें आणि द्वंद्वें ह्या कालांत भांडण्यासाठीं उकरून काढणें आहे.

आपण जें इतिहासाचें वाचन करावयाचें तें आपल्या पवित्र मातृभूमीच्या नांवानें म्हणा किंवा ज्यानें मनुष्यामनुष्यांत आणि जातिजातींत भेद उत्पन्न केला त्या आपल्या भगवान् परमेश्वराच्या नांवानें म्हणा, जुनीं भांडणें आणि कलह, द्वेष व रक्तपात चिरंतन चालविण्यासाठीं सर्वोत्कृष्ट कारण काढण्याच्या उद्देशानें करावयाचें नसून त्याच्या अगदीं उलट कारणासाठीं म्हणजे कोणीही मनुष्य केवळ तो मनुष्य आहे-सर्वांचा सामान्य पिता जो परमेश्वर त्याचें संतान आहे–सर्वांची सामान्य माता जी धरणी तिच्याच दुधावर वाढलेला आहे–म्हणून दुसऱ्या मनुष्याकडे ओढला जावा एवढ्यासाठीं ज्या मूलभूत कारणांनीं तो द्वेष आणि रक्तपात, तीं भांडणें आणि कलह उत्पन्न झाले तीं कारणें शोधून काढण्यासाठीं व ह्या प्रकारांचें निर्मूलन करणारीं उत्कृष्ट साधनें निश्चित करण्यासाठीं करावयाला पाहिजे.

पण उलटपक्षीं ह्या अंतिम आशेच्या लकाकीनें आपले डोळे दिपवून टाकून आणि त्यामुळें मनुष्यांना, मनुष्यसमूहांना आणि मनुष्य-

वंशांना अधिकाधिक मोठे सामाजिक घटक बनण्याच्या प्रक्रियेमध्यें निसर्गाच्या कडक निर्बंधान्वयें स्वार्थत्यागाच्या व झगड्याच्या घणाच्या योगानें रणभूमीच्या ऐरणीवर त्या विस्तृततर जीवनांत रूपांतर करवून घ्यावें लागतें. ह्या जितका अवश्यकीय तितकाच प्रबल सिद्धान्त आपल्या दृष्टिआड करतां कामा नये. ह्या भयंकर दिव्यांतून ज्यांना पार पडतां येईल त्यांनींच केवळ ज्या योग्यतेमुळें मनुष्यांतील निरनिराळ्या जातींना आणि वंशांना जगांत जिवंत उरावयाचा अधिकार प्राप्त होतो ती योग्यता—केवळ नैतिकच नाहीं तर शारीरिक योग्यतासुद्धां—सिद्ध करून दाखविली असें म्हणतां येईल. म्हणून एकीची आवश्यकता सिद्ध करून दाखविण्यापूर्वीं तुम्हांला आपण अखिल मनुष्यजातीचा सामाजिक किंवा राष्ट्रीय घटक म्हणून जिवंत रहावयाला योग्य आहों हें सिद्ध करून दाखविलें पाहिजे. मुसलमानसत्तेशीं हिंदूंनीं चालविलेल्या ह्या प्राणांतिक झगड्यांत ही कठीण परीक्षा उत्तीर्ण होऊन दाखवावयाचा भार हिंदूंवर येऊन पडला होता. क्रीतदास आणि त्याचा धनी ह्यांच्यामध्ये सन्मानाचें ऐक्य शक्य नाहीं. समुत्थान करण्यांत आणि राष्ट्र व जाति ह्या दृष्टीनें त्यांचा जो अपराध करण्यांत आला होता त्याचा प्रतिशोध घेण्याची आपली शक्ति सिद्ध करून दाखविण्यांत जर हिंदूंना यश आलें नसतें तर ऐक्यासाठीं मुसलमानांनीं आपला हात पुढें केला असता तरीही त्यांचें तें कृत्य अनुग्रहाचें झालें असतें; मित्रत्वाचें झालें नसतें आणि तुल्यतेच्या भावनेनेंच केवळ उत्पन्न होणाऱ्या त्या विश्वासानें, मनःपूर्वकतेनें आणि उत्साहानें हिंदूंना तो सन्मानपूर्वक आपल्या हातांत धरतां आला नसता. पण त्या काळीं त्यांचे वैरी असलेल्या लोकांशीं देवाच्या आणि देशाच्या नांवानें हिंदूंनीं जो प्रचंड झगडा केला त्यामुळें खरोखर द्वंद्वार्थ सिद्ध झालेल्या त्या दोन महायोद्ध्यांत सन्मान्य ऐक्याचा मार्ग मोकळा झाला आणि ह्याच दृष्टीनें आम्ही आमच्या इसवी सन १८५७ च्या राष्ट्रीय अभ्युत्थानाच्या इतिहासावरील आमच्या ग्रंथांत म्हटलें आहे कीं, ‘ज्या दिवशीं हरिभक्तांच्या—हिंदुजातींच्या—सैन्याला दिल्लीच्या वेशींत विजयभरानें प्रवेश करितां आला आणि मुसलमानी सिंहासन, राजकीरिट आणि राष्ट्रध्वजा श.१६८२ (इ. सन १७६१ मध्यें) भाऊंच्या आणि विश्वासरावांच्या पायाशीं धुळींत तुडविलीं जाऊन लोळत पडलीं आहेत हें दृश्य दिसलें त्याच दिवशीं हिंदूंमध्यें आणि मुसलमानांमध्यें मानाची एकी थोड्याबहुत प्रमाणांत शक्य

झाली. कारण त्या दिवशीं हिंदूंनीं आपली स्वतंत्रता जिंकून परत घेतली होती आणि जगामध्यें दुसऱ्याशीं मानाच्या आणि बरोबरीच्या नात्यानें जिवंत रहावयाची आपली योग्यताही सिद्ध केली होती. त्यांनीं आपल्या जेत्यांस जिंकलें होतें आणि आतां त्यांनीं जर तशी इच्छा प्रदर्शित केली असती तर आपला देशबांधव आणि मित्र म्हणून त्यांना त्याला मानानें जवळ धरतां आलें असतें'. ह्या दृष्टीनें पाहिलें असतां मराठ्यांचा इतिहास हा हिंदु आणि मुसलमान देशबांधवांच्या खऱ्या आणि मानाच्या ऐक्याच्या आड मुळींच येत नाहीं इतकेंच नाहीं तर त्याचें मर्म नीट ओळखतां आल्यास या प्रसंगाच्या अभावीं ह्या दोन धर्मानुयायी जातींत टिकाऊ आणि मनमोकळी एकी होण्याची जी संभवनीयता होती त्यापेक्षां ह्या इतिहासानें तशी एकी किती तरी अधिक संभवनीय झाली आहे. आणि एवढ्यासाठीं हिंदुस्थानांतील सर्व देशभक्तांनीं—हिंदूंनीं त्याचप्रमाणें मुसलमानांनीं—त्याचा अधिक अभ्यास करावा म्हणून विशेष अनुरोध करण्यासारखा आहे. एका बाजूनें बढाईखोर वाचाळतेला बंद घालण्याचें आणि दुसऱ्या बाजूनें सर्वनाशक आत्मकातरतेला उच्चाटन देण्याचें कार्य त्याच्याकडून झाल्यावांचून राहणार नाहीं.

सर्वसामान्य वाचकांनाही एक सबंधच्या सबंध राष्ट्र आपल्या न्याय्य आणि जन्मसिद्ध अधिकारांच्या बचावासाठीं जें शस्त्र घेऊन उठलें आहे, स्वातंत्र्याच्या आणि राष्ट्रीय स्वराज्याच्या कार्याच्या व तदर्थ झगडणाऱ्या पक्षाच्या वतीनें साहाय्यार्थ पुढें झालें आहे आणि शिवाजी व बाजीराव, भाऊसाहेब व जनकोजी, नाना व महादजी, रामदास व मोरोपंत असल्या संतांच्या आणि राज्यसंस्थापकांच्या, योद्धयांच्या आणि राजकारणधुरंधरांच्या पिढ्यांच्या पिढ्या कार्यक्षेत्रांत उतरवीत आहे; हें हृदय हालवून सोडणारें दृश्य ज्यांच्यांत पहावयास मिळतें त्या अभ्युत्थानाचा हा इतिहास मनुष्यहिताच्या दृष्टीनें चित्ताला चटका लावणारा वाटल्यावांचून राहणार नाहीं.

# प्रकाशकाचें निवेदन

'विजय-साहित्या'चें ६ वें पुस्तक म्हणून सदरहू पुस्तक साहित्याच्या आश्रयदात्यांच्या हातीं देत असतां झालेल्या विलंबाविषयीं "अपराधी नामाहं" असें सांगण्याची आम्ही अनुज्ञा घेतों. पुढील पुस्तकास असा विलंब लागणार नाहीं, अशाबद्दल आम्ही योग्य ती सावधता घेत आहोंत.

सदरहू पुस्तक महाराष्ट्राच्या तरुणपिढीचे कंठमणि व स्वार्थ-त्याग-मूर्ति बॅरि० सांवरकर यांच्या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद आहे. बॅरिस्टरसाहेबांचें एकादें पुस्तक तरी साहित्यास प्रकाशनार्थ मिळावें अशी आमची बरेच दिवसांची इच्छा होती. त्या इच्छेला मूर्त-स्वरूप देण्याचें काम, बॅरिस्टरसाहेबांचे कनिष्ठ बंधु डॉ० नारायणराव सांवरकर यांनीं आपलेपणानें केल्यामुळेंच, सदरहू पुस्तक आम्हांस वाचकांस देतां येत आहे. मूळ इंग्रजी ग्रंथाचा अनुवाद प्रत्यक्ष डॉक्टर-साहेबांनींच केला आहे. उभयतां सांवरकरबंधूंचे त्यांनीं आपले-पणानें केलेल्या साहाय्याविषयीं आम्ही आभारी आहोंत.

सदर ग्रंथास प्रस्तावना लिहिण्याबद्दलची आमची विनंति केसरीकार श्रीयुत ग. वि. केतकर, बी. ए., एल्‌एल्. बी., यांनीं मान्य केल्याबद्दल त्यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोंत.

अंतीं भारत-इतिहास-संशोधक मंडळाचे दुय्यम चिटणीस रा० शंकरराव जोशी यांच्या निरपेक्ष साहाय्याचा उल्लेख करून, व पुढील पुस्तक प्रिय आश्रयदात्यांच्या हातीं लवकरच देण्यांत येईल असें आश्वासन देऊन हें निवेदन पुरें करितों.

—प्रकाशक



ग्रंथकार—बॅरि० विनायकराव सावरकर

[ सदर फोटो १९०९ साली बॅरिस्टरीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावेळचा आहे ]

३५५८

# हिंदुपदपादशाही

## प्रकरण पहिलें

## नवीन युग

"स्वधर्म राज्य–वृद्धिकारणें तुम्ही सुपुत्र निर्माण आहां."

—शहाजीमहाराजांचें शिवाजीमहाराजांना पत्र.

शालिवाहनशकाच्या १५५१ व्या वर्षीं ( इ. स. १६३० ) शिवाजीमहाराजांचा जन्म झाला. ह्या जन्मामुळें त्या दिवसाला नवीन युगाचा प्रारंभदिन व्हावयाचें भाग्य लाभावयाचें होतें ! शिवाजीमहाराजांचा जन्म होण्याच्या पूर्वींही हिंदुवंशाच्या सन्मानसंरक्षणाच्या कार्यार्थ आणि महमदी शत्रूंची धाड थोपवून धरतां धरतां शेंकडों हिंदु वीरांनीं झुंज करून आत्महवन केलें होतें. आपल्यापूर्वीं यश न मिळतां पडलेल्या ह्या वीरांच्या आणि हुतात्म्याच्या इतक्याच शौर्यानें लढत असतां त्या युद्धांत यशस्वी व्हावयाचें भाग्य शिवाजीमहाराजांना लाधलें. त्यांनीं विजयाची एक लाटच उत्पन्न केली. ती जसजशी पुढें जाऊं लागली तसतशी अधिक प्रचंड होऊं लागली. तिनें आणखी एक शतक किंवा कांहीं अधिकच काल हिंदुध्वजा आपल्या मस्तकावर धारण करून तिला वैभवांतून अधिक वैभवाकडे आणि महत्कृत्यांतून महत्तर कृत्याकडे नेऊन पोंचविलें. गजनीच्या महमदाच्या आक्रमणाबरोबर प्रारंभ झालेली मुसलमानांच्या भारतविजयाच्या भरतीची लाट वेगानें पुढें पसरून अखिल भारतवर्ष तिच्या खालीं बुडून गेलें होतें. तिच्यामधून ज्यांनीं आपलें मस्तक वर काढलें आणि आपल्या खड्या मराठी स्वरांत तिला आज्ञा केली, "बस्स ! ह्याच्यापुढें एक पाऊल येशील तर ध्यानांत धर " असे पहिले राष्ट्रवीर शिवाजीमहाराज ! साधारणपणें असें म्हणतां येईल कीं, शके १५५१ पूर्वी हिंदु आणि मुसलमान सैन्यांची गांठ कोठें का पडेना, केव्हां हिंदूंचा नायक मृत किंवा नाहींसा झाल्यामुळें तर केव्हां एकाद्या कारभाऱ्यानें किंवा सेनानायकानें विश्वासघात केल्यामुळें, पण हिंदूंचा पराभव हा व्हावयाचाच. शिवाजीमहाराज राजकीय क्षेत्रांत अवतीर्ण

होईतों हिमालयापासून दक्षिणसमुद्रापर्यंत प्रत्येक युद्धाचा निर्णय कोणच्या ना कोणच्या कारणानें हिंदुध्वजाला विपरीत व्हावा असा क्रमच पडला. दाहिराची दुर्दशा, जयपाळाचीं युद्धें, अनंगपाळाचा प्रतिरोध, पृथ्वीराजाचें शराशयन, कालिंजर–शिक्री–देवगिरी–तालिकोट येथले अशुभ दिवस, ह्या प्रसंगांचा नुसता उल्लेख वरील विधानांतील खेदजनक सत्य पटवावयाला पुरेसा आहे. पण शिवाजीमहाराजांच्या समर्थ हातांनीं ह्या आपल्या लोकांच्या दुर्दैवाच्या अवदसेला जणुं काय प्रत्यक्षच धरून तिचें तोंड अगदीं विरुद्ध दिशेला वळविलें; आणि आजपर्यंत आपल्या मागें होती त्याप्रमाणें त्यांच्या मागें तितक्या तीव्रतेनें ही कृत्या लावून दिली. पुन्हा केव्हांही हिंदुध्वजाला महमदी अर्धचंद्रापुढें वांकावयाची पाळी आली नाहीं.

शके १५५१ नंतर तें चक्र उलटलें. हिमालयापासून दक्षिण समुद्रापर्यंत ह्यानंतर हिंदु आणि मुसलमान सैन्यांची कोठेंही गांठ पडो हिंदूंचा विजय हा व्हावयाचाच आणि मुसलमानांना धूळ ही खावी लागावयाचीच. मग त्यांची संख्या कितीही असो, आणि त्यांनीं 'अल्लाहो अकबर'ची गर्जना कितीही उच्च स्वरानें केलेली असो ! 'अल्लाहो अकबर!' ( अल्लाचा विजय असो ! )–ईश्वर खरोखरीच विजयी झाला; पण तो हिंदूंचा ईश्वर झाला ! शके १५५१ नंतर ईश्वरानें निःसंदेह आपलें नांव हिंदूंच्या पक्षांत समाविष्ट केलें ! मूर्तिपूजकांच्या पक्षाला तो मिळाला आणि मूर्तिभंजकांची त्यानें निकरानें पाठ पुरविली. सिंहगडाचा पाडाव, पावनखिंडीची झुंज, गुरु गोविंदसिंग बंदा बहादुर, छत्रसाल, बाजीराव, नाना, भाऊ, मल्हारराव, परशरामपंत, रणजितसिंग ह्यांचे पराक्रम इत्यादि गोष्टींकडे नुसता दृष्टिक्षेप केल्याबरोबर ह्या विधानाची सत्यता पटेल. ह्यांनीं आणि इतर रजपुत, मराठे आणि शीख सेनानायकांनीं जेथें जेथें आणि जितक्या वेळां मुसलमानांशीं गांठ पडली तेथें तेथें आणि तितक्या वेळां मुसलमानांना चोपून काढलें. हिंदूंच्या राजकीय भाग्याला जी ही महत्त्वाची आणि विजयप्रवर्तक कलाटणी मिळाली तिचें श्रेय शिवाजीमहाराज आणि त्यांचे अध्यात्मगुरु श्रीरामदासस्वामी ह्यांनीं आपल्या हिंदुजातीपुढें जें थोर अध्यात्मिक आणि राष्ट्रीय ध्येय ठेविलें त्या ध्येयाला जितकें आहे तितकेंच त्यांनीं समरक्षेत्रांत उपयोगांत आणलेल्या नवीन डावपेंचांच्या युद्धपद्धतीला व शस्त्रसाधनांना आहे. महाराष्ट्रधर्म ही हिंदुजातीच्या राष्ट्रीय जीवनाची मृतप्राय



मलिकंबर.

झालेली ज्योत प्रज्वलित करणारी एक नवीन शक्ति होती हें जितकें सत्य आहे तितकेंच महाराष्ट्र-युद्धपद्धति त्या काळीं हिंदु लोकांत प्रचलित असलेल्या युद्धशास्त्रामध्यें क्रांति घडवणारी नवीन युद्धपद्धति होती हें खरें आहे.

ज्या ध्येयानें ह्या हिंदुस्वातंत्र्याच्या युद्धांतील नेत्यांमध्यें आणि सेनापतींमध्यें इतकी दृढ निष्ठा उत्पन्न केली आणि त्यांच्यांत इतका आवेश आणला तें ध्येय म्हणजे हिंदुपदपादशाही–स्वतंत्र हिंदुसाम्राज्याची प्रस्थापना करणें–हें होतें. आणि ज्या युद्धपद्धतीनें मुसलमानी सत्तेला मराठ्यांच्यापुढें तग धरणें अशक्य केलें आणि अंतीं जिनें हिंदुशीर्षावर विजयकिरीट चढविला ती युद्धपद्धति म्हणजे शत्रूला चकवावयाची–गनिमी काव्याची–युद्धपद्धति होती.

ह्या उदात्त ध्येयाच्या जाणिवेमुळें मराठ्यांनीं पिढ्यान्‌पिढ्या केलेल्या प्रयत्नांना कशी स्फूर्ति मिळाली, भिन्नभिन्न कालांत आणि दूरदूर पसरलेल्या प्रांतांत त्यांनीं केलेल्या कृत्यांमध्यें तिजमुळें समानहितसंबंध आणि एकसूत्रीपणा कसा प्राप्त झाला, आपण हातीं घेतलेलें कार्य म्हणजे आपल्या धर्माचें आणि देशाचें कार्य आहे–आपल्यांतील वीरांनीं आणि महापुरुषांनीं ज्याला हातभार लावला पाहिजे असें कार्य आहे–अशी दृढभावना त्यांच्या मनांत कशी उत्पन्न केली, मराठ्यांना त्या जाणिवेनें पायरीपायरीनें पण विजयभरानें दिल्लीच्या महाद्वारापर्यंत–उत्तरेला सिंधुनदाच्या तीरापर्यंत आणि दक्षिणेस दक्षिण समुद्राच्या तटापर्यंत–कसें नेलें आणि तिच्या योगानें त्यांच्या कृत्यांच्या ह्या कथेला अशा एका दिव्य राष्ट्रीय महाकाव्याचें–जें प्रत्येक हिंदु माता, आपला पराभव कसा झाला, आपला ध्वज कसा छिन्नविच्छिन्न केला गेला आणि अंतीं आपल्या शत्रूंचा कसा विजय झाला ह्या गोष्टींचें वर्णन करणाऱ्या, तोंपर्यंत प्रचलित असलेल्या, गाण्यांच्यापेक्षां कितीतरी पटीनें जयसूचक आणि उदात्त सुरांत आपल्या मुलांना अत्यंत अभिमानानें गाऊन दाखवील अशा महाकाव्याचें–विश्वरूप कसें प्राप्त झालें हें आतां आपण क्रमाक्रमानें पाहूं.

शके १५५१ मध्यें शिवाजीमहाराजांचा जन्म झाला. त्यांचें चरित्र लिहिणारे जुने बखरकार आपल्याला सांगतात कीं, जसजसे ते मोठे होऊं लागले तसतशी हिंदुजातीला प्राप्त झालेली राजकीय पारतंत्र्याची अवस्था त्यांना फार बोंचूं लागली. परक्यांच्या पायांखालीं आपल्या देवांचीं देवळें कशीं तुडविलीं जात होतीं आणि आपल्या पूर्ववैभवाचे अवशेष कसे कलंकित आणि

अपमानित होत होते हें त्यांनीं डोळ्यांनीं पाहिलें आणि त्यांचें हृदय विद्ध होऊन गेलें. त्यांची शूर माता जिजाबाई हिनें हिंदु जातीच्या पूर्ववैभवाच्या वर्णनानें श्रीराम आणि श्रीकृष्ण, अर्जुन आणि भीम, अभिमन्यु आणि हरिश्चंद्र ह्यांच्या कथांनीं त्यांच्या वीरवृत्तीचें पोषण केलें. किंबहुना ज्या वातावरणांत ते श्वासोच्छ्वास करीत होते तें वातावरणच नवीन आशांनीं आणि आकांक्षांनीं भारून गेलें होतें ! ज्यांच्या पूर्वजांनीं देवांशीं आणि देव-दूतांशीं समोरासमोर भाषण केलें होतें आणि प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्णांनीं ज्यांना मी कधींही सोडणार नाहीं म्हणून अभिवचन दिलें होतें, त्या हिंदूंच्या राष्ट्राची पारतंत्र्यांतून मुक्तता करणारा अवतार उत्पन्न होणार हीच एक गोष्ट ज्याच्या त्याच्या तोंडीं झाली होती. त्यांच्या घराण्यांत चालत आलेल्या आख्यायिकांमुळें ह्या राष्ट्रीय अवताराचा जन्म आपल्याच घरीं होणार हा महाराजांचा विश्वास होता. आपल्याचविषयीं तर ह्या सर्व आख्यायिका नसतील ? हें महत्कार्य साधण्यासाठीं जें हत्यार परमेश्वरानें निश्चित केलें तें हत्यार–आपल्या जातीचा तो ईश्वरनियोजित विमोचक–आपणच असूं काय ?

तें तसें असो किंवा नसो; एक गोष्ट निश्चित होती.–त्यांचें त्या परिस्थितींतील कर्तव्य स्पष्ट होतें. असलेल्या स्थितींत समाधान मानणाऱ्या दासाच्या सुखासीन जीवनाच्या क्षुद्र आशांना आपण तरी बळी पडावयाचें नाहीं आणि ज्यानें आपल्या राष्ट्राचें सिंहासन फोडून टाकलें व आपल्या देवतांच्या वेदींचा भंग केला, त्या परकीय राज्यकर्त्यांकडून पाठ थोपटून घेणारा आणि हांजी हांजी करणारा त्यांचा सेवक व्हावयाचें नाहीं हें निश्चित. इतर साह्याला येवोत न येवोत; आपण तरी सर्वस्वावर पाणी सोडून आपल्या पूर्वजांच्या अस्थींचें आणि देवतांच्या देवळांचें संरक्षण करण्यासाठीं प्रयत्न करावयाचा, युद्धें भांडावयाचीं आणि प्रसंगीं आपल्यापेक्षां बलिष्ठ शत्रूंशीं झगडतां झगडतां मरावयाचें ! त्यांत यश मिळविण्याचें आपल्या दैवीं असलें आणि मरण न येतां समरभूमीवर विजयश्री आपल्याला माळ घालणार असली तर विक्रमादित्य किंवा शालिवाहनाप्रमाणेंच आपल्यालाही आज कित्येक पिढ्यांना पडलेलीं स्वप्नें ज्यांत संस्मरणीय रीतीनें पूर्ण झालेलीं दिसतील अशा आणि जें मिळण्यासाठीं आपल्या धर्माच्या साधूंनीं आणि संतांनीं आजपर्यंत आशायुक्त अंतःकरणांनीं देवाला आळविलें अशा, हिंदूंच्या एका श्रेष्ठ आणि वैभवशाली साम्राज्याचा पाया घालण्याचें श्रेय लाभेल !

---



श्रीछत्रपति शिवाजीमहाराज.

## प्रकरण दुसरें

# हिंदवी-स्वराज्य

'हिंदवी स्वराज्य व्हावें हें श्रींच्या मनांत फार आहे'.

—शिवाजीचें पत्र.

त्या तरुण वीरानें क्रांतियुद्धाची उठावणी केली. शके१५६७ (इ. सन १६४५ )मध्यें शिवाजीमहाराजांनीं आपल्या एका सवंगड्याला पाठविलेल्या पत्रांत विजापूरच्या शहाशीं विरोध करण्यांत त्यांनीं राजद्रोहाचें पातक केलें असा जो त्यांच्यावर आरोप करण्यांत आला होता त्याचा निषेध केला आहे, आणि जर कोणाशीं एकनिष्ठ रहावयाला आपण बांधले गेलों असलों तर ते कोणा शहा-बादशहांशीं नसून केवळ परमेश्वराशीं आहों ह्या गोष्टीची आठवण करून देऊन उच्च नीतिमत्तेची भावना जागृत केली आहे. गुरुवर्य दादाजी कोंडदेव आणि आपले इतर सवंगडी ह्यांच्यासह सह्याद्रीच्या शिखरांवर परमेश्वराला साक्ष ठेवून इष्टसिद्धि होईपर्यंत सतत युद्ध चालवावयाचें आणि हिंदुस्थानांत 'हिंदवी स्वराज्या'ची–हिंदुपदपादशाहीची–प्रस्थापना करावयाची अशी त्यांनीं शपथ नव्हती का घेतली ? " आदिकुलदेव स्वयंभू. त्यांणीं आम्हांस यश दिलें व पुढें तो मनोरथ 'हिंदवी-स्वराज्य' करून पुरविणार आहे...हें राज्य व्हावें हें श्रींच्या मनांत फार आहे." प्रत्यक्ष शिवाजीमहाराजांच्या लेखणींतून उतरलेल्या ह्या एका 'हिंदवी-स्वराज्य' शब्दानें एक शतकापेक्षां अधिक कालपर्यंत ज्या महा खळबळीनें महाराष्ट्राचें जीवन आणि कर्तृत्व संचलित झालें होतें तिचें आत्मस्वरूप जसें उघड करून दाखविलें गेलें तसें दुसऱ्या कशानेंही दाखविलें गेलें नसतें. मराठ्यांनीं केलेली उठावणी ही अगदीं प्रारंभींसुद्धां केवळ वैय्यक्तिक किंवा विशिष्ट वर्गाची संकुचित चळवळ नव्हती. हिंदुधर्माच्या संरक्षणासाठीं, परकी मुसलमानी सत्ता उलथून पाडण्यासाठीं, स्वतंत्र आणि समर्थ असें हिंदवी-साम्राज्य स्थापन करण्यासाठीं केलेली ती आमूलाग्र हिंदु चळवळ होती.

ह्या देशभक्तीच्या उत्साहानें केवळ मराठ्यांचे पुढारीच प्रेरित झालेले नव्हते तर न्यूनाधिक प्रमाणांत त्यांच्या देशांतील आणि सैन्यांतील सर्वच लोक त्या उत्साहानें भरले होते. ज्या देशभक्तीच्या भावनेनें शिवाजीमहाराजांचे सर्व प्रयत्न प्रेरित झाले होते तिची जाणीव शिवाजीमहाराजां-

इतकीच सर्व जनतेलाही झाली होती. प्रत्येक स्थलीं अखिल हिंदु-जातीचे परित्राणकर्ते म्हणून त्यांचें स्वागत होत होतें !

अजूनही जे मुसलमानांच्या पक्षाला चिकटून राहिले होते ते दोन प्रकारचे लोक होते. इतक्या शतकांच्या दासवृत्तीमुळें त्यांच्यापैकीं कांहींच्या दुबळ्या मनाला हिंदु मुसलमानांच्या विरुद्ध बंड करून यशस्वी होऊं शकतात अशी कल्पनाच करितां येईना ! दुसरा प्रकार म्हणजे विशेष निगरगट्ट झालेल्या किंवा लाभहानींचें गणित करून पाऊल टाकणाऱ्या किंवा मुसलमानी राज्याच्या चिरस्थायित्वामध्यें ज्यांचे हितसंबंध निगडित झाले आहेत अशा लोकांचा. ह्या मंडळींना शिवाजी म्हणजे एक नवशिकें हुरळलेलें पोर आहे असें वाटे. आणि त्यामुळें त्याचें पुढारीपण मान्य करावयास त्यांचें मन साहजिकच कचरे !

पण अखिल हिंदुजनतेला—केवळ महाराष्ट्रांतील नाहीं तर संपूर्ण दक्षिणेंतील किंबहुना उत्तरेंतीलही हिंदूंना—शिवाजीमहाराज म्हणजे आपल्या पक्षाचे एक सर्वश्रेष्ठ पुरस्कर्ते वाटत होते. आपल्या देशाला आणि जातीला राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करून देण्याचें भाग्य ज्यांच्या दैवीं लिहिलें आहे असे ईश्वरनियुक्त जातिवीर वाटत होते. शिवाजीमहाराज, श्रीरामदास आणि त्या वेळची मराठ्यांची पिढी ह्यांनीं जें काम केलें आणि जो संदेश दिला त्याविषयीं सर्व प्रांतांतील हिंदूंना वाटलेल्या कौतुकाच्या आणि आदराच्या उदात्त वर्णनांनीं त्या वेळचा इतिहास, आख्यायिका आणि वाङ्मय हीं ओतप्रोत भरलेलीं आहेत. सर्वत्र नगरेंच्या नगरें आणि प्रांतच्या प्रांत शिवाजीमहाराजांच्या मराठ्यांनीं आपल्या सुटकेला यावें म्हणून निकडीचीं बोलावणीं पाठवून आशेनें प्रतीक्षा करीत बसत आणि मराठ्यांनीं मुसलमानांचें हिरवें फडकें फाडून फेंकून दिलें आणि त्याच्या जागीं मराठ्यांचा भगवाझेंडा वर मान करून डोलूं लागला असें पाहिलें म्हणजे आनंदानें नाचूं लागत. आम्हीं केलेल्या विधानाच्या पुष्टिकरणार्थ केवळ एकच उदाहरण म्हणून, सावनूर प्रांतांतील हिंदूंना मुसलमानी राज्याखालीं इतःपर राहणें असह्य झालें तेव्हां तेथील लोकांनीं शिवाजीमहाराजांना जें पत्र पाठविलें त्याचा आम्ही उल्लेख करतों.

> "हा युसुफ फार खस्त आहे. बायकापोरांस उपद्रव देणें, जुलूम गोवधादि निंद्य कर्में करतो ! आम्ही त्याच्या हाताखालीं वागण्यास कंटाळलों. **तुम्ही हिंदुधर्माचे संस्थापक, म्लेंच्छांचे नाशक म्हणून**

इतकीच सर्व जनतेलाही झाली होती. प्रत्येक स्थलीं अखिल हिंदु-जातीचे परित्राणकर्ते म्हणून त्यांचें स्वागत होत होतें !

अजूनही जे मुसलमानांच्या पक्षाला चिकटून राहिले होते ते दोन प्रकारचे लोक होते. इतक्या शतकांच्या दासवृत्तीमुळें त्यांच्यापैकीं कांहींच्या दुबळ्या मनाला हिंदु मुसलमानांच्या विरुद्ध बंड करून यशस्वी होऊं शकतात अशी कल्पनाच करितां येईना ! दुसरा प्रकार म्हणजे विशेष निगरगट्ट झालेल्या किंवा लाभहानीचें गणित करून पाऊल टाकणाऱ्या किंवा मुसलमानी राज्याच्या चिरस्थायित्वामध्यें ज्यांचे हितसंबंध निगडित झाले आहेत अशा लोकांचा. ह्या मंडळींना शिवाजी म्हणजे एक नवशिकें हुरळलेलें पोर आहे असें वाटे. आणि त्यामुळें त्याचें पुढारीपण मान्य करावयास त्यांचें मन साहजिकच कचरे !

पण अखिल हिंदुजनतेला—केवळ महाराष्ट्रांतील नाहीं तर संपूर्ण दक्षिणेंतील किंबहुना उत्तरेंतीलही हिंदूंना—शिवाजीमहाराज म्हणजे आपल्या पक्षाचे एक सर्वश्रेष्ठ पुरस्कर्ते वाटत होते. आपल्या देशाला आणि जातीला राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करून देण्याचें भाग्य ज्यांच्या दैवीं लिहिलें आहे असे ईश्वरनियुक्त जातिवीर वाटत होते. शिवाजीमहाराज, श्रीरामदास आणि त्या वेळची मराठ्यांची पिढी ह्यांनीं जें काम केलें आणि जो संदेश दिला त्याविषयीं सर्व प्रांतांतील हिंदूंना वाटलेल्या कौतुकाच्या आणि आदराच्या उदात्त वर्णनांनीं त्या वेळचा इतिहास, आख्यायिका आणि वाङ्मय हीं ओतप्रोत भरलेलीं आहेत. सर्वत्र नगरेंच्या नगरें आणि प्रांतच्या प्रांत शिवाजीमहाराजांच्या मराठ्यांनीं आपल्या सुटकेला यावें म्हणून निकडीचीं बोलावणीं पाठवून आशेनें प्रतीक्षा करीत बसत आणि मराठ्यांनीं मुसलमानांचें हिरवें फडकें फाडून फेंकून दिलें आणि त्याच्या जागीं मराठ्यांचा भगवाझेंडा वर मान करून डोलूं लागला असें पाहिलें म्हणजे आनंदानें नाचूं लागत. आम्हीं केलेल्या विधानाच्या पुष्टिकरणार्थ केवळ एकच उदाहरण म्हणून, सावनूर प्रांतांतील हिंदूंना मुसलमानी राज्याखालीं इतःपर राहणें असह्य झालें तेव्हां तेथील लोकांनीं शिवाजीमहाराजांना जें पत्र पाठविलें त्याचा आम्ही उल्लेख करतों.

> “ हा युसुफ फार खस्त आहे. बायकापोरांस उपद्रव देणें, जुलूम गोवधादि निंद्य कर्म करतो ! आम्ही त्याच्या हाताखालीं वागण्यास कंटाळलों. **तुम्ही हिंदुधर्माचे संस्थापक, म्लेंच्छांचे नाशक म्हणून**



जसवंतसिंग.

तुम्हांकडे आलों. तुम्हांकडे आम्ही आलों म्हणून आमचे द्वारीं चौकी बसली आहे ! अन्नपाण्यावांचून जीव घेण्यास उद्युक्त झाले आहेत ! तरी रात्रीचा दिवस करून येणें."

महाराष्ट्राच्या बाहेरच्या आपल्या सहधर्मीयांनीं केलेल्या ह्या हृदयद्रावक विनंतीचा महाराजांनीं अव्हेर केला नाहीं हें सांगावयाला नकोच. प्रसिद्ध मराठी सेनासारंग हंबीरराव हे लागलीच तेथें धावून गेले. आणि त्यांनीं विजापूरच्या सैन्याचा अनेक स्थलीं पूर्ण पराभव करून मुसलमानांच्या मगर-मिठींतून हिंदूंची मुक्तता केली व त्या प्रांतांतून त्यांची सत्ता उठवून लावली.

आपल्या पुणें आणि सुपें येथील लहानशा संस्थानाची उत्तम व्यवस्था लावल्यावर बारा मावळें संघटित करून शिवाजीमहाराजांनीं वयाच्या केवळ १५।१६ व्या वर्षीं आपल्या निवडक मंडळींच्या साहाय्यानें शत्रूला एकदम चाकित करून आणि मारे चढवून तोरणा व इतर महत्त्वाचे गड हस्तगत केले. अफझुलखानाच्या हाताखालच्या विजापूरच्या सैन्यावर बिनतोड आणि पूर्ण विजय मिळविल्यावर त्यांनीं प्रत्यक्ष मोगलांशीं उघड युद्ध आरंभिलें. कधीं शरण गेल्यासारखें दाखवून तर कधीं अकस्मात् घाले घालून, पण केव्हांही त्यांना चकवून, जेव्हां महाराजांनीं मुसलमानांच्या अनेक सरदारांचा आणि सेनापतींचा धुव्वा उडवून दिला तेव्हां त्यांच्या शत्रूंच्या हृदयांत इतकी धडकी भरली कीं, औरंगजेबाला सुद्धां कांहीं वेळ-पर्यंत वैमनस्य मिटवून त्यांना जाळ्यांत फसवावयाचा प्रयत्न करणें अधिक शहाणपणाचें वाटलें. पण महाराज ह्या छल्युद्धांतही औरंगजेबाचे गुरु ठरले! आग्र्याचा त्याचा कपटी डाव त्यांनीं फसविला आणि बंदिवासांतून अनाहत निसटून ते रायगडला सुरक्षित जाऊन पोंचले. त्यांनीं लागलीच मोगलांशीं पुन्हा युद्ध मांडलें आणि पहिल्यानें सिंहगड परत घेतला. त्यांच्या इतर सेनानायकांनीं जेथें जेथें मुसलमान सांपडले, तेथें तेथें त्यांना पुरा चोप देऊन नांव गाजविलें. अशा रीतीनें सामर्थ्य वाढवितां वाढवितां शेवटीं शिवाजी-महाराजांनीं आतां आपल्याला हिंदु-छत्रपति—हिंदुधर्म आणि हिंदुसंस्कृति यांचा पुरस्कर्ता—म्हणून विधिपूर्वक अभिषेक करून घेणें शहाणपणाचें आणि सुरक्षित आहे असें ठरविलें. विजयानगरच्या पतनानंतर तोंपर्यंत कोणाही हिंदु राजाचें स्वतंत्र राजा—छत्रपति—म्हणून अभिषेक करून घेण्याचें धैर्य झालें नव्हतें ! ह्या राज्याभिषेकानें मुसलमानी सैन्याच्या अजिंक्यतेच्या भ्रमाचा

भोपळा नित्याचा फोडला. ह्यानंतर रणक्षेत्रांत मुसलमानांना हिंदूंची बरोबरी केव्हांही करतां आली नाहीं.

हा झालेला परिणाम ज्यांनीं तो घडवून आणला त्यांना देखील अद्भुत चमत्कारासारखा वाटला. हिंदुस्वातंत्र्याच्या युद्धाचे प्रत्यक्ष द्रष्टे आणि होते श्रीरामदासस्वामी ह्यांनीं आपल्याला दिसलेल्या दिव्य स्वप्नाचें गूढ उद्गारांनीं भरलेलें काव्य गाइलें आहे. त्यांत त्यांनीं आपल्याला पूर्वीं स्वप्नांत ज्या गोष्टी दिसल्या होत्या त्यांपैकीं आतां बहुतेक प्रत्यक्ष घडून आल्या असे साश्चर्य उद्गार काढले आहेत !

स्वप्नीं जें देखिलें रात्रीं, तें तें तसेंचि होतसे
हिंडतां फिरतां गेलों आनंदवनभूवनीं १
बुडाले सर्वही पापी हिंदुस्थान बळावलें.
अभक्तांचा क्षयो झाला आनंदवनभूवनीं २
कल्पांत मांडिला मोठा म्लेंच्छ दैत्य बुडावया
कैंपक्ष घेतला देवीं आनंदवनभूवनीं ३
येथून वाढला धर्म राजधर्मासमागमें
संतोष मांडिला मोठा आनंदवनभूवनीं ४
बुडाला औरंग्या पापी म्लेंच्छसंहार जाहला
मोडिलीं मांडिलीं छत्रें आनंदवनभूवनीं ५
बोलणें वाउगें होतें चालणें पाहिजे बरें
पुढें घडेल तें तें खरें आनंदवनभूवनीं ६
उदंड जाहलें पाणी स्नानसंध्या करावया
जपतप अनुष्ठानें आनंदवनभूवनीं ७
स्मरलें लिहिलें आहे बोलता चालता हरी
राम कर्ता राम भोक्ता आनंदवनभूवनीं ८

आपण चालविलेलें युद्ध हें ईश्वराच्या ध्वजेखालीं चालविलेलें धर्मयुद्ध आहे ह्या दृढ-भावनेमुळेंच शिवाजीमहाराजांनीं स्वतंत्र हिंदुराज्याची स्थापना करण्यांत यश आल्याबरोबर तें सर्व आपल्या धर्म आणि राजकारणांतील गुरूंच्या—स्वामी रामदासांच्या—चरणीं अर्पण केलें आणि हें ईश्वरी कार्य आहे ह्या भावनेमुळेंच उलट श्रीरामदासांनींही तें पुन्हा आपल्या विख्यात शिष्याला

जनतेच्या कल्याणासाठीं व ईश्वराच्या कीर्तीसाठीं ठेवलेला विश्वासनिधि म्हणून परत दिलें आणि सांगितलें,

" राज्य शिवाजीचें नव्हे–राज्य धर्माचें आहे."

राजा छत्रसालाच्या पराक्रमाचें वर्णन ज्या ऐतिहासिक काव्यांत केलें आहे त्या 'छत्रप्रकाश'काव्याचा कर्ता स्वतः बुंदेला हिंदु असूनही मराठ्यांच्या ह्या उठावणीचें त्यानें केलेलें वर्णन किती प्राञ्जल स्तुतीनें भरलें आहे! तीच गोष्ट प्रख्यात राष्ट्रीय कवि भूषणाची! मराठ्यांच्या ह्या कृत्यांकडे हे दोघे कोणत्या दृष्टीनें पाहातात हें पाहण्यासारखें आहे. स्वतः जन्मानें मराठे नसूनही श्रीशिवाजीमहाराजांपासून बाजीरावांपर्यंत मराठी वीरांनीं सर्वभर केलेल्या जयशाली आक्रमणाचा त्यांना जातिवंत मराठ्यांइतकाच अभिमान वाटतो! भूषण कवीनें तर स्वतः उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत सर्व हिंदुस्थानभर हिंडून शिवाजी महाराजांच्या आणि त्यांच्या सवंगड्यांच्या महत्कृत्यांचीं विजयगीतें गाइलीं आणि सर्व हिंदूंना ह्या हिंदु स्वातंत्र्याच्या युद्धांत भाग घेऊन पराक्रम करावयाला प्रवृत्त केलें. विस्तारभयामुळें आम्हांला त्याच्या ओजस्वी कवितांपैकीं कांहीं ओळीच येथें उद्धृत करणें शक्य आहे.

**काशीजीकी कला जाती, मथुरा मशीद होती**
**शिवाजी न होते सुनत होती सबकी** २
**राखी हिंदुवानी हिंदुवानके तिलक राख्यो**
**स्मृति और पुराण राख्यो वेद विधि सुनि मै** ४
**राखी रजपूती, राजधानी राखी राजनकी**
**धरामें धर्म राख्यो राख्यो गुण गुणि मै** ६
**भूषण सुकविजीती हय मरहट्टनकी**
**देस देस किरत बखानी तव सुनि मैं** ८
**साहिके सुपूत सिवराज समशेर तेरी**
**दिल्लीदल दाबीके दिवाल (देवालय) राखी दुनिमे** १०

अशा रीतीनें सह्याद्रीच्या शिखरावरून हिंदुधर्म आणि हिंदुपदपादशाहीच्या नांवानें मराठी तुतारींतून निघालेल्या प्रक्षोभक आव्हानानें आणि रणगीतानें महाराष्ट्राच्या सीमेच्या पलीकडे दूरपर्यंत सर्व हिंदुजनतेचीं मनें

हालवून जागृत केली; आणि त्यांची निश्चिति करून दिली कीं, मराठ्यांनीं आरंभिलेल्या ह्या क्रांतियुद्धाचा उद्देश संकुचित नसून संपूर्ण हिंदुजातीला आणि हिंदुभूमीला परक्यांच्या नष्ट दास्यत्वांतून मुक्त करावयाचें इतका विशाल आहे.

---

## प्रकरण तिसरें

# शिवाजीमहाराजांची जागा सर्व राष्ट्र भरून काढतें !

" God, we enter our last fight
Thou dost know our cause is right
Make us march now in thy light
On to Victory !
Let us not thy wrath deserve
In the sacred cause we serve
Let us not from danger swerve
Teach us how to die ! "

शाके १६०२ ( इ० स० १६८० ) मध्यें शिवाजीमहाराज वारले आणि थोड्या महिन्यांतच श्रीरामदासांनीं आपला देह ठेवला. त्यांनीं केलेलें कार्य मोठें होतें; पण त्याहूनही कितीतरी अधिक कार्य संपादावयाचें शेष राहिलें होतें. त्या दोघां राष्ट्र-पुरुषांचा अंत झाला; पण त्यांच्या मृत्यूलाही त्यांनीं प्रारंभिलेल्या महदांदोलनाला मारतां आलें नाहीं. वैयक्तिक जीवनाच्या संकुचित आणि अस्थिर पायावर त्याची उभारणीच झालेली नव्हती. राष्ट्राच्या जीवनांत त्याचीं मुळें खोल रुजलीं गेलीं होतीं. मराठ्यांच्या इतिहासांतील अत्यंत महत्त्वाचें हें वैशिष्ट्य आमच्या मराठेतर वाचकांच्या दृष्टीस आणून देऊन त्यांच्या मनावर ठसवावयाची आमची इच्छा आहे. महाराष्ट्राच्या बाहेर शिवाजीमहाराज व श्रीरामदास ह्यांच्याच चरित्राची, थोडीफार कां होईना, पण माहिती आहे. नंतरचा मराठ्यांचा इतिहास त्यांना जवळ जवळ अज्ञात किंवा अस्पष्ट व विकृत स्वरूपांत ज्ञात आहे. त्यामुळें हिंदुस्थानच्या किंवा हिंदूंच्या इतिहासाच्या सामान्य वाचकवर्गाला ज्यांनीं हिंदुजातींच्या कार्याचा पुरस्कार केला आणि हिंदुपदपादशाहीच्या

स्थापनेचा उद्योग केला असे प्रथम आणि अंतिम देशवीर म्हणजे श्रीरामदास व शिवाजीमहाराज हेच होत असें वाटतें. इतकेंच नाहीं तर सर्वसाधारण महाराष्ट्रीयांचा समजही मराठ्यांच्या खऱ्या इतिहासाचा प्रारंभच नव्हे तर इतिश्रीसुद्धां शिवाजीमहाराजांबरोबरच झाली असा आहे. त्यांच्या पश्चात् नुसती बजबजपुरी असून तीही लुटारूंच्या किंवा भिन्न साहसी टोळ्यांच्या स्वार्थी व अधोगामी झगड्यांनीं अधिकच विकृत झाली आहे असें त्यांनाही वाटतें. हे दोन्हीही समज पूर्णपणें चुकीचे आहेत. वास्तविक शिवाजी-महाराज आणि श्रीरामदास ह्यांचें खरें मोठेंपण हेंच आहे कीं, त्यांनीं चालू केलेली चळवळ त्यांच्या पश्चात् दीर्घकाल टिकली, इतकेंच नव्हे तर त्यांच्याच-सारख्या समर्थ आणि देशभक्त विभूतींची, शतावधि संघटनापटूंची आणि रणधुरंधरांची, वीरांची आणि हुतात्म्यांची एकामागून एक अखंड परंपरा निर्माण झाली आणि तिनें त्याच पवित्र कार्याप्रीत्यर्थ घनघोर युद्धें केलीं, राष्ट्राला हिंदुपदपादशाहीच्या ध्येयाकडे नेलें आणि जें वैभव पाहून प्रत्यक्ष शिवाजीमहाराजांची गरुडदृष्टिही दिपून जाईल असलें वैभव प्रत्यक्ष संपादून दाखविलें. शिवाजीमहाराजांनीं आपल्याला राज्याभिषेक करविला तेव्हां त्यांच्या हातांत एक पुरा प्रांत सुद्धां नव्हता; आणि तरी त्यांच्या कार्याला कोणीही महत्कृत्यच म्हणेल ! तर मग जेव्हां त्यांच्या अनुयायांनीं राघोबा-दादाच्या आधिपत्याखालीं थेट लाहोरांत प्रवेश केला आणि मराठी घोडा सिंधु-नदाच्या तीरावर विजयभरानें वावरूं लागला, जेव्हां एक संपूर्ण खंड त्यांच्या चरणांशीं लोळूं लागलें, तेव्हां तें कार्य अधिक महत् आणि अधिक पूर्ण नव्हतें का ? शिवाजीमहाराजांना मृत्यूनें गांठलें पण इकडे औरंगजेब जिवंतच होता. औरंगजेबाला आणि त्याच्या अहिंदु महत्त्वाकांक्षांना अहमद-नगरच्या एका सामान्य थडग्यांत अंतीं मूठमाती दिली ती शिवाजी-महाराजांनीं नाहीं तर त्यांनीं निर्माण केलेल्या महाराष्ट्रानें दिली. रायगडावर पेरल्या गेलेल्या बीजाला, त्याचा मराठी साम्राज्याचा जो प्रचंड वृक्ष झाला त्याच्या योगानें इतकी प्रसिद्धि मिळाली. नाहीं तर तोंपर्यंतच्या इतर बीजांचे जसे फलदायी वृक्ष केव्हांच झाले नाहींत त्याप्रमाणें हें बीजही फोल ठरून विस्मृतीच्या धुळींत नष्टप्राय होऊन गेलें असतें ! शिवाजी-महाराजांनीं रायगडावर राज्य चालविलें; पण त्यांच्या सर्व लोकांचें प्रत्यक्ष दिल्लीवर राज्य चालेल असा दिवस अद्यापि यावयाचा होता ! इतकेंच

नाहीं तर धनाजी आणि संताजी, बाळाजी आणि बाजी, नाना आणि भाऊ, मल्हारराव आणि दत्ताजी, माधवराव आणि परशुरामपंत, नाना आणि बापू हे पुढें आले नसते, त्यांनीं राजकारण केलें नसतें, रणभूमि जागघली नसती आणि शिवाजीमहाराजांचें कार्य यशस्वी केलें नसतें तर प्रत्यक्ष महाराजांनीं संपादलेलें राज्य पटवर्धन किंवा बुंदेले ह्यांच्या संस्थानाप्रमाणें सामान्य आणि साधें दिसलें असतें आणि त्याला जें आपल्या हिंदुजातीच्या इतिहासांत अतुलनीय असें सर्वजातीय महत्त्व आलें आहे तें कधींही प्राप्त झालें नसतें. शिवाजीमहाराज मोठे आहेत, कारण त्यांनीं निर्माण केलेलें राष्ट्र त्यांच्या मोठेपणाला साजेसें उतरलें, त्याला त्यांच्या अवतारकार्याचें आकलन आणि संपादन करतां आलें ! महाराजांच्या जें कल्पनेंत होतें तें त्यांनीं प्रत्यक्षांत आणलें ! महाराजांना जें व्हावें असें वाटत होतें तें त्यांनीं घडवून दाखविलें ! शिवाजीमहाराजांचा मृत्यु म्हणजे मराठ्यांच्या इतिहासाचा नुसता विष्कंभक आहे. त्यांनीं एक हिंदु संस्थान स्थापन केलें;—अद्याप त्याचें हिंदु साम्राज्यांत परिवर्धन व्हावयाचें होतें; तें सारें शिवाजीमहाराजांच्या मृत्यूनंतर घडून आलें. ज्या भिन्न भिन्न शक्तींकडून हें प्रत्यक्ष घडून यावयाचें होतें त्या शक्ति निर्माण करून महाराज जवनिकेंत अंतर्धान पावल्यानंतर प्रत्यक्ष महाकाव्याचा प्रारंभ होतो.

---

## प्रकरण चवथें

## हुतात्मा छत्रपति !

धर्मासाठीं मरावें. —रामदास.

महाराष्ट्रधर्म किती खोल गेला आहे आणि महाराष्ट्रांतील हिंदुपुनरुज्जीवनाच्या चळवळींत त्यानें घातलेलें चैतन्य किती प्रदीप्त आहे याचा ठाव प्रत्यक्ष औरंगजेबासच लागला नाहीं ! इतर व्यक्तिनिष्ठ किंवा समाजांतील विशिष्ट वर्गानें चालविलेल्या संकुचित चळवळींप्रमाणें मराठ्यांच्या स्वातंत्र्याच्या चळवळीची, शिवाजीमहाराजांसारखा कर्ता पुढारी कालवश झाल्यानें आणि त्यांच्या जागीं संभाजीप्रमाणें शूर पण नाकर्ता पुत्र आल्यानें, इतिश्री झाली असली पाहिजे असें त्याला वाटलें. तेव्हां

अर्थातच आपल्याला पाहिजे ती साधि आली आहे असें तो समजला. काबूलपासून बंगालपर्यंत पसरलेल्या विस्तीर्ण साम्राज्याचीं सर्व साधनें, अगणित मनुष्यबल आणि द्रव्यबल त्याच्या हातांत होतीं; एकदम सर्व प्रकारचें मिळून तीन लाख सैन्य घेऊन तो दक्षिणेंत उतरला. शिवाजीमहाराजांना-देखील एकाच वेळीं एवढ्या प्रचंड सैन्याशीं तोंड द्यावयाचा प्रसंग कधीं आला नव्हता. औरंगजेबाचा तर्क कांहीं चुकीचा होता असें नाहीं. अशा रीतीनें एकत्रित केलेल्या मोगली साम्राज्याच्या सर्व बलाचा भार अंगावर पडल्याबरोबर मराठ्यांच्या नवीन आणि विस्कळित राज्याच्या दसपट मोठें राज्यही पार चुरडून गेलें असतें. तशांत एका श्रेष्ठ राष्ट्राची धुरा धारण करण्यास अगदीं अयोग्य अशा माणसाच्या हातांत मराठ्यांचें पुढारीपण गेल्यामुळें ह्या वेळीं मोगलांच्या विरोधाचा कोणचाही प्रयत्न करणें अधिकच अशक्य झालें होतें. नेतृत्व चालविण्याच्या अयोग्यतेच्या जोडीला संभाजी-महाराजांमध्यें रागीट स्वभाव व मदिरा आणि मदिराक्षी ह्यांच्याविषयीं अत्यंत आसक्ति ह्या दुर्गुणांची भर पडली होती !

पण हे सर्व दोष असूनही आणि आयुष्यांतील ह्या निर्वाणीच्या प्रसंगाला तोंड देण्यांत अपेश आल्यावरही शिवाजीमहाराजांचा पुत्र अंतीं आपल्या पित्याला आणि ज्या क्रांतियुद्धाच्या राष्ट्रीय चळवळीचें प्रतिनिधित्व त्याच्या-कडे आलें होतें त्या चळवळीलाही भूषणभूत झाला; आणि निधनाच्या क्षणांत परिस्थितीचा प्रतिमल्लच नाहीं तर विजेता ठरला ! आपल्या रानटी शत्रूच्या समोर हताश राजबंदी करून त्याला आणलें असतांही तो ताठ उभा राहिला आणि जीवनाचें मोल घेऊनही आपला धर्म विकावयाचें त्यानें स्पष्ट नाकारलें ! मरण टाळण्यासाठीं धर्मांतर करावयाची कल्पना त्यानें त्वेषानें धिक्कारली आणि आपल्या पूर्वजांच्या धर्माविषयींच्या निष्ठेचा पुनर्घोष करून त्यानें आपल्या मुसलमानी छलकांवर, त्यांच्या धर्मशास्त्रावर आणि विचारसरणीवर अपमानांचा आणि शिव्याशापांचा वर्षाव केला. मराठी सिंहाला ह्याप्रमाणें आपला पाळीव कुत्रा करणें अशक्य आहे असें पाहून औरंगजेबानें ह्या 'काफरा'चा वध करण्याविषयीं आज्ञा दिली. पण या धमकावणीचा शिवाजीमहाराजांच्या पुत्रावर थोडाच परिणाम होणार होता ! तापवून रक्त केलेल्या सळयांनीं आणि सांडसांनीं त्यांचे डोळे भोसकून बाहेर काढण्यांत आले; त्यांच्या जिभेचे क्रमशः तुकडे तुकडे तोडण्यांत आले ! पण

या राक्षसी छळानेंही त्या राजहुतात्म्याच्या धैर्याचा भंग झाला नाहीं! अंतीं त्यांचा शिरच्छेद करण्यांत आला ! मुसलमानांच्या धर्मवेडाला ते बळी पडले पण त्यांनीं हिंदुजातीला अक्षय्य उज्ज्वलता आणून दिली! ह्या एका आत्यंतिक आत्मयज्ञाच्या कृत्यानें संभाजीमहाराजांनीं महाराष्ट्रधर्माचें–हिंदु पुनरुज्जविनाच्या पवित्र चळवळीचें–आत्मस्वरूप जसें विशद करून दाखविलें तसें दुसरें कशानेंही दाखविणें शक्य नव्हतें ! लुटारूंचा पुढारी अगदीं निराळ्या रीतीनें वागला असता. शिवाजीमहाराजांनीं संपादिलेली सर्व भौतिक संपत्ति समूळ नष्ट झाली होती; त्यांचा द्रव्यकोश रिता पडला होता; त्यांचे गड उध्वस्त झाले होते; त्यांची प्रत्यक्ष राजधानीसुद्धां परकीय शत्रूंच्या हातांत गेली होती ! संभाजीला शिवाजीमहाराजांची भौतिक संपत्ति राखतां आली नाहीं; पण संभाजीनें आपल्या अतुलनीय हौतात्म्यानें शिवाजीमहाराजांची नैतिक आणि आध्यात्मिक संपत्ति नुसती राखलीच नाहीं तर ती अनेक पटींनीं उज्ज्वलतर आणि बलशाली केली! हिंदु-धर्मासाठीं आत्मबलिदान केलेल्या राजहुतात्म्याच्या रक्ताचें ह्याप्रमाणें पोषण मिळाल्यावर हिंदु-स्वातंत्र्याच्या समराला विलक्षण दिव्यत्व आणि नैतिक सामर्थ्याचें अधिष्ठान प्राप्त झालें.

---

## प्रकरण पांचवें

# राजहुतात्म्याचा प्रतिशोध

**धर्मासाठीं मरावें । मरोनि अवघ्यांसि मारावें ।**
**मारितां मारितां घ्यावें । राज्य आपुलें ।।** —रामदास.

आपल्या राजाच्या मरणाचा प्रतिशोध घेण्यासाठीं सर्व मराठी राष्ट्र सशस्त्र होऊन उठलें ! संभाजीमहाराजांच्या ह्या आत्मसमर्पणाच्या अंतिम महत्कृत्यामुळें त्यांच्या सर्व चुका आणि दुष्कृत्यें लोक विसरले; त्यांनीं त्यांना पूर्ण क्षमा केली. कोशागारांत कपर्दिक नसतांना आणि साधनांचा पूर्ण अभाव असतांना त्यांनीं आपलें राष्ट्रीय स्वातंत्र्य परत मिळविण्याचा निश्चय केला आणि त्यांचे पुढारी–शिवाजीमहाराजांचे द्वितीय पुत्र राजाराममहाराज–यांच्या आधिपत्याखालीं एकत्र होऊन हिंदुराज्याच्या आणि हिंदुधर्माच्या रक्षणासाठीं समर करून प्राण द्यावयाची पवित्र शपथ घेतली.

**धर्मासाठीं मरावें । मरोनि अवघ्यांसि मारावें ।**
**मारितां मारितां घ्यावें । राज्य आपुलें ॥ १**
**मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र-धर्म वाढवावा ॥**
**येविशीं न करितां तकवा । पूर्वज हांसती ! ॥ २**

ही श्रीरामदासस्वामींची शिकवण त्यांच्या निधनानंतरही विसरली गेली नाहीं, इतकेंच नाहीं तर उलट ती सर्व जनतेचा जागता धर्म होऊन बसली. राजाराम, निळो मोरेश्वर, प्रल्हाद निराजी, रामचंद्रपंत, संक्राजी मल्हार, परशुराम त्रिंबक, संताजी घोरपडे, धनाजी जाधव, खंडेराव दाभाडे, निंबाळकर, नेमाजी, परसोजी-ब्राह्मण, मराठे, प्रभु-राजे आणि शेतकरी-संपूर्ण राष्ट्रच-मुसलमानी शत्रूच्या विरुद्ध युद्धार्थ उभें ठाकलें !

ह्या वेळीं दख्खन पुन्हा औरंगजेबाच्या हातांत गेली होती. यच्चयावत् गडदुर्गांसमवेत आणि महाराजांच्या प्रत्यक्ष राजधानीसहित संपूर्ण महाराष्ट्र मुसलमान सेनापतीच्या सैनिकनियंत्रणाखालीं विवळत होतें ! जणुं काय शिवाजीमहाराज आणि त्यांची पिढी एवढें युद्ध भांडूनही अगदीं व्यर्थ मृत्युशय्येवर निजली असें दिसूं लागलें ! पण राजधान्या आणि गड यांचें महत्त्व किती ! आपलें स्वातंत्र्य परत जिंकावयाला बद्धपरिकर झालेल्या राष्ट्राचा सर्वांत बळकट कोट म्हणजे त्याच्या छातीचा कोट ! त्याचें ध्येय हीच त्यांची राष्ट्रीय ध्वजा, आणि जेथें ती फडकत राहील तेथेंच त्यांची राजधानी ! " सर्व महाराष्ट्र हातचें गेलें तर मद्रासेंत हें युद्ध आपण भांडूं. रायगड पडला तर हिंदुपदपातशाहीची ध्वजा जिंजीवर रोवूं; पण हा झगडा थांबणें शक्य नाहीं ! " असा अटीतटीचा विरोध करून मराठ्यांनीं वीस वर्षेंपर्यंत औरंगजेबाच्या बलिष्ठ सैन्याला तोंड दिलें आणि शेवटीं त्याला भग्न, उपहसित आणि निराश अशा स्थितींत शके १६२८ ( इ. सन १७०७ ) मध्यें परत अहमदनगरला यातना भोगीत मरण्यासाठीं पाठवून दिलें !

ह्या दीर्घकालपर्यंत चाललेल्या युद्धांत मराठ्यांनीं अवलंबिलेल्या आणि इतिहासांत त्यांच्या नांवानें मराठी-गनिमी-कावा (कूटयुद्ध) म्हणून प्रसिद्ध असलेल्या विशिष्ट युद्धपद्धतीचा त्यांना फार उपयोग झाला. मराठी सैन्य इतक्या कल्पनातीत विद्युद्वेगानें, अतुलनीय युद्धकौशल्यानें आणि दुर्दमनीय शौर्यानें एकत्र होई आणि पसार होई, तुटून पडे आणि निसटून निघे, चाल करी आणि हुलकावणी देई, तोंड देई आणि पळून जाई; कीं प्रत्येक स्थळीं मराठ्यांनीं मोगलांना जर्जर

केलेलें आणि चोप दिलेला दिसे; पण त्यांचें आश्रयस्थान कोठें आहे, हें निश्चित समजेना! त्यांच्यापुढें प्रसिद्धीस आलेल्या प्रत्येक मुसलमानी सेनापतीला हार खावी लागली. कोणाचा पराभव झाला तर कोणाची विटंबना झाली; कोणाला बंदिवास पत्करावा लागला तर इतरांना प्राणास मुकावें लागलें. झुल्फिकारखान, अलीमर्दानखान, हिम्मतखान, कासम, प्रत्येकाचा धनाजी, संताजी आणि इतर मराठे वीरांनीं पूर्ण पराभव केला. त्यांनीं जिंजी, कावेरीपाक, दुधारी इत्यादि स्थलीं मोठालीं—अगदीं समोरासमोरचीं—युद्धें करून त्यांत मुसलमानी सैन्याचे तुकडे उडविले, आणि पुन्हा महाराष्ट्र परत जिंकावयाची औरंगजेबाची महत्त्वाकांक्षा शेवटीं पार लयाला नेली. अगदीं थेट बादशहाच्या शिबिरावर मराठे चालून गेले आणि त्यांनीं अक्षरशः सिंहाच्या गुहेंत जाऊन त्याची दाढी ओढली! प्रत्यक्ष बादशहाच जिवंत हातांत सांपडला असता; पण त्याच्या सुदैवानें त्या वेळीं तो आपल्या सुवर्णकलश असलेल्या वस्त्रागारांत नव्हता! सुवर्णकलश कापून मराठे तो विजयभरानें घेऊन गेले. ह्या वेळच्या प्रमुख कार्यकर्त्यांचीं मनें देशभक्तीच्या कोणच्या उत्कट भावनांनीं भरलेलीं होतीं हें दाखविण्यासाठीं खंडो बल्लाळचें एक उदाहरण दिलें म्हणजे पुरें आहे. अद्यापिही जे मराठे मानकरी मोगलांच्या पक्षाला मिळून होते आणि शत्रूंचा जिंजीचा वेढा अधिक घट्ट करावयाला जे साह्य करीत होते त्यांना आपल्या पक्षाकडे वळविण्यासाठीं त्यानें वाटेल ते प्रयत्न केले! नागोजीराजांना मराठ्यांच्या पक्षाला ओढण्यासाठीं गुप्त बोलाचालींना प्रारंभ झाला. ते राजाराम महाराजांना येऊन मिळाले. जिंजीच्या मुसलमानी सैन्याचा धुव्वा उडविणें कसें सहज शक्य आहे आणि आपल्या वाडवडिलांच्या देशाचें आणि धर्माचें संरक्षण करण्यासाठीं चाललेल्या ह्या प्रयत्नांत मराठ्यांना साह्य करणें हें त्यांचें कसें कर्तव्य आहे, हें त्यांना पटवून साह्यासाठीं त्यांची प्रार्थना करण्यांत आली. ह्या प्रार्थनेनें नागोजीराजे वळले. आपल्या पांच हजार अनुयायांच्या पथकासह त्यांनीं मोगलांचा पक्ष संधि येतांच सोडला आणि ते मराठ्यांना येऊन मिळाले. नागोजीराजांना वळविण्यांत यश आल्याबरोबर खंडो बल्लाळांनीं प्रत्यक्ष शिर्क्यांना वळवावयाचा निश्चय केला. ते अद्यापिही मोगलांच्या सेवेंतच चूर होते! राजाराम महाराजांवरच्या प्रसंगाचा उच्चार नघाल्याबरोबर शिर्क्यांचा संताप झाला आणि त्यांनीं उत्तर दिलें, "राजारामच काय सगळें भोंसल्यांचें कुळ पृथ्वीवरून नामशेष झालें तरी मला त्याचें काय

करावयाचें आहे! जेथें जेथें शिर्का सांपडला तेथें तेथें त्याचा शिरच्छेद संभाजीनें केला नाहीं काय? शिरकाण हा शब्द मनुष्यवधाशीं समानार्थक होऊन बसला नाहीं का?" त्यावर हृदयस्पर्शी शब्दांत खंडो बल्लाळ म्हणाले, "हें पहा, तुम्ही म्हणतां तें सर्व कांहीं खरें आहे! पण संभाजीनें माझ्याही कुटुंबांतल्या तीन पुरुषांना हत्तीच्या पायाशीं दिलें नाहीं का? सध्यांचा प्रश्न हा वैय्यक्तिक भांडणें भांडण्याचा नाहीं! आतां जें युद्ध चाललें आहे तें भोंसल्यांचें किंवा दुसऱ्या कोणाचें घराणें पुढें आणण्यासाठीं नाहीं; तर हिंदूंच्या स्वराज्याच्या संरक्षणासाठीं आहे! हिंदूंच्या साम्राज्यासाठीं आम्ही लढत आहों." शिर्क्यांच्या राष्ट्रीय भावना ह्याप्रमाणें जागृत केल्यावर त्यांच्याकडून खंडो बल्लाळचें म्हणणें मोडवलें नाहीं. आपले वैय्यक्तिक उपकार आणि कौटुंबिक भांडणें ते विसरले आणि राजाराम महाराजांना जिंजींतून मोगलांच्या वेढ्यांतून निसटून जावयाला साह्य करावयाचें त्यांनीं वचन दिलें! आणि राजाराम महाराज मोगलांच्या प्रदेशांतून त्यांच्या हातावर तुरी देऊन निघून गेले आणि त्यांनीं पुन्हा महाराष्ट्रांत प्रवेश केला तेव्हां त्यांचें खरोखरच बहुमोल साहाय्य झालें.

अशा रीतीनें शिवाजीमहाराजांच्या पिढींतच नाहीं तर त्यांच्यानंतरच्याही पिढ्यांत तीच देशभक्तीची उदात्त ज्योत तेवत होती आणि आपण हिंदुजातीचें राजकीय स्वातंत्र्य परत मिळविण्याचें व परक्या रानटी शत्रूपासून हिंदुधर्माचें संरक्षण करण्याचें तेंच ईश्वरीकार्य पुढें चालवीत आहों अशीच जाणीव होती. एवढ्या बलिष्ठ शत्रूच्या विरुद्ध असल्या संग्रामांत यशस्वी होणें नुसत्या लुटारूंना आणि दरवडेखोरांना शक्य नव्हतें! हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याही जातींना ज्याला तोंड देतां आलें नाहीं अशा महासंकटापासून आपल्या मातृभूमीची मुक्तता करण्याच्या कार्यांत त्या पिढींतल्या देशभक्तांना धैर्य आणि सामर्थ्य यावयाला त्याच्या मुळाशीं एक प्रचंड नैतिक आणि राष्ट्रीय शक्ति होती हेंच कारण होतें.

---

## प्रकरण सहावें

# महाराष्ट्र-मंडळ

आहे तितुकें जतन करावें । पुढें आणखी मिळवावें ॥
महाराष्ट्रराज्यची करावें । जिकडे तिकडे ॥ —रामदास

हिंदूंच्या विरुद्ध धरलेल्या सर्व महत्त्वाकांक्षा आणि केलेल्या सर्व आशा भग्न होऊन त्यांच्या भारानें वांकलेल्या औरंगजेबानें इकडे उदास थडग्याची वाट धरली तों तिकडे मराठ्यांनीं आपलें स्वातंत्र्ययुद्ध खानदेश, गोंडवण, वऱ्हाड आणि गुजराथ इत्यादि मोगलांच्या सत्तेखालील प्रदेशांत दूरवर नेऊन पोंचविलें. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर लागलीच शाहूची प्रतिबंधांतून झालेली मुक्तता आणि मूळ महाराष्ट्रावरील स्वराज्याच्या व राहिलेल्या दक्षिणेंतील मोगलांच्या सहा सुभ्यांवरील-तसेंच म्हैसूर आणि त्रावणकोर ह्या मांडलिक संस्थानांवरील—चौथाई आणि सरदेशमुखीच्या अधिकाराला मोगलबादशहानें दिलेली मान्यता ह्या दोन गोष्टींमुळें तोंपर्यंत दुसऱ्या कशानेंही झाले नव्हतें इतकें मराठ्यांच्या बलवर्धनाला साहाय्य झालें. त्यामुळें आपल्या घरची व्यवस्था नीट लावावयाला, कोणी कांहीं उपक्रम करतांच उत्पन्न होणाऱ्या पक्षभेदाच्या आणि फुटून निघावयाच्या प्रवृत्तींच्या रोगावर उपाययोजना करावयाला आणि तसेंच मराठ्यांचें संघटित एकराष्ट्र निर्माण करावयाला त्यांना अवसर मिळाला. या संघटित मराठमंडळानें त्यांत अंगभूत आणि कदाचित् अपरिहार्य असे दोष असूनही आपलें कार्य इतक्या उत्कृष्ट रीतीनें पार पाडलें कीं, हें महाराष्ट्र-मंडळच प्रत्यक्ष हिंदुपदपातशाही झालें आणि त्यानें नांवानेंच नाहीं तर वस्तुतः अखिल भारतवर्षावर साम्राज्य चालविलें.

वर उल्लेखिलेले दोष आणि उणीवा इतर सर्व हिंदु जातींप्रमाणेंच मराठ्यांच्याही समाजरचनेंत आणि स्वभाववैशिष्ट्यांत जे दोष किंवा व्यंगें आहेत, त्यांमुळें मराठमंडळांत आलेल्या आहेत; म्हणून आम्हीं त्यांना मराठमंडळींतील अंगभूत दोष असें म्हटलें आहे. ह्या दोषांची चर्चा आम्ही पुढें करणारच आहों; पण तोंपर्यंत कोणाच्या चुकीच्या ग्रहाला स्थल राहूं नये एतदर्थ ह्या दोषांची आम्हांला जितकी जाणीव आहे तितकी दुसऱ्यांना क्वचितच असेल असें येथेंच आम्ही सांगून टाकतों. ज्या राष्ट्रीय आणि नैतिक श्रेष्ठ तत्त्वांनीं मराठ्यांना पुढें जावयाला प्रेरणा केली आणि हिंदुस्वातंत्र्याचें



शाहू महाराज.

Lakshmi Art, Bombay, 8.

युद्ध यशस्वी करण्याच्या त्यांच्या भीम प्रयत्नांत त्यांना धैर्य दिलें तीं निश्चित करून लोकांपुढें मांडतांना कधीं कधीं वैय्यक्तिक उदाहरणांत मराठ्यांमध्येंही स्वार्थपर आणि नीच हेतु, आपसांतील चुरस व पराकाष्ठेचा लोभ ह्यांनीं राष्ट्रीय वृत्तीवर आणि कर्तव्यबुद्धीवर विजय मिळविलेला आढळतो ही गोष्ट आम्ही विसरत नाहीं किंवा तिचें महत्त्वही कमी करीत नाहीं. तसें नसतें तर मराठे म्हणजे माणसें नसून देव आहेत असें म्हणावें लागलें असतें; पण व्यक्तिशः कोठें कोठें घडलेल्या गोष्टींचा विचार आपल्याला कर्तव्य नसून त्या प्रचंड हिंदु आंदोलनाच्या संबंधांत सर्वसामान्य सत्य काय आहे हें आपल्याला काढावयाचें आहे. त्यांनीं हातीं घेतलेल्या महत्कार्यांतील एकदम दिसून येणारें श्रेष्ठत्व, त्यांनीं कलेल्या प्रयत्नांतील आणि स्वार्थत्यागांतील भव्य राष्ट्रीयत्व आणि त्यांना मिळालेलें असीम यश ह्यांची उपपत्ति आपणांला बसवावयाची आहे. आणि वैय्यक्तिक एकटदुकट दुष्कृत्यें विचारांत घेतल्यावरही, ह्या गोष्टीसाठीं त्यांचें प्रत्येक देशभक्त हिंदूकडून सादर कौतुक व कृतज्ञतापूर्वक गौरव झाल्यावांचून राहणार नाहीं; आणि हा उद्देशही ह्या संक्षिप्त पुस्तकांत जितका देणें शक्य आहे तितका भरभक्कम पुरावा देऊन, केव्हां प्रत्यक्ष त्या वेळच्या उद्गारांचीं अवतरणेंच देऊन तर केव्हां हें राष्ट्रीय आंदोलन ज्यांनीं चालविलें त्यांपैकीं प्रमुख पुढाऱ्यांचीं आणि कार्यकर्त्यांचीं प्रत्यक्ष कृत्येंच पुढें मांडून, साधावयाचा आम्हीं प्रयत्न केला आहे.

बाळाजी विश्वनाथांनीं अशा रीतीनें आपल्या घरची व्यवस्था लावल्यावर प्रत्यक्ष दिल्लीच्या सार्वभौम राजकारणांत भाग घेऊन आपण तें हलवून सोडूं इतकें सामर्थ्य आपल्यांत आलें आहे असें त्यांना दिसून आलें. ह्यापुढें मुसलमान मराठ्यांवर मोठासा चढाव करतील ही धास्ती राहिली नव्हती. उलट स्वतः मोगल बादशहा आपल्या प्रबल आणि बंडखोर सरदारांपासून आणि वजिरांपासून आपलें संरक्षण करण्यासाठीं त्यांच्या साहय्याची याचना करूं लागला! मराठ्यांच्या स्वातंत्र्यसमरानें इतक्या पूर्णपणें मुसलमानी सत्तेची कंबर मोडून टाकली होती! सय्यदबंधूंनीं सर्व दक्षिणच्या सुभ्यांतून चौथाई आणि सरदेशमुखी वसूल करण्याचा मराठ्यांचा अधिकार मान्य केल्याबरोबर त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांना घालवून देऊन त्यांचें आसन स्थिर करण्यासाठीं शके १६४० (इ. स. १७१८) मध्यें बाळाजी विश्वनाथ आणि दाभाडे पन्नास सहस्र सैन्य घेऊन दिल्लीवर चाल करून गेले. आजपर्यंत ज्यांना तुच्छतेनें लेखलें त्या मराठ्यां-

चा पन्नास सहस्र सैन्यासह राजधानींतील हा प्रवेश पाहून मुसलमानांचा संताप झाला आणि त्यांनीं मराठयांच्या स्वराज्याचीं आणि चौथाईचीं अधिकारपत्रें ( सनदा ) पंतप्रधानांना मिळाल्याबरोबर त्यांना वाटेंत गांठून त्यांचा घात करावयाचा कट केला. मराठयांना ही वार्ता कळली. लागलीच आपल्या स्वामीचा जीव वांचविण्यासाठीं आणि अवश्य तर त्याप्रीत्यर्थ आपला प्राण देण्यासाठीं भानु पुढें आले ! बाळाजी विश्वनाथांनीं अधिकारपत्रें मिळाल्याबरोबर राजसभेंतून निघून निराळ्या मार्गानें मराठी शिबिरांत पोंचावें आणि इकडे भानूंनीं त्यांचा वेश घेऊन त्यांच्या पालखींतून नेहमींच्या राजरस्त्यानें समारंभानें मिरवीत जावें, अशी योजना ठरली. धर्मवेडानें भरलेला मुसलमानी जनसमूह नेहमींप्रमाणें पंतप्रधानांची पालखी चाललेली पाहून सर्वच्या सर्व तिच्यावर जाऊन पडला आणि त्यानें भानूंनाच बाळाजी समजून बरोबरच्या थोड्या मराठ्यांसह कापून काढलें ! इकडे बाळाजी अधिकारपत्रें काखेंत मारून मराठी शिबिरांत सुरक्षित जाऊन पोहोंचले. आपल्या राष्ट्राप्रीत्यर्थ केलेल्या आपल्या प्राणांच्या असल्या यज्ञानेंच त्या राष्ट्राच्या इतिहासाला एकाद्या महाकाव्याचें वैभव आणि महत्त्व प्राप्त होतें. ह्या संक्षिप्त पुस्तकांत असलें एकटेंदुकटें उदाहरण देऊन आम्हांला काम भागविलें पाहिजे; पण आमचा विश्वास आहे कीं, शुष्क आणि लांबलचक टीकेच्या ग्रंथसंभारापेक्षां असल्या एकाद्या उदाहरणानेंच कोणत्याही आंदोलनाचें राष्ट्रीय आणि नैतिक स्वरूप अधिक परिणामकारक रीतीनें स्पष्ट होतें.

---

प्रकरण सातवें

## थोरले बाजीराव रंगभूमीवर येतात

**महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याचें पर्यवसान हिंदुस्थानच्या स्वतंत्र्यांत झालेंच पाहिजे.**

" Who for Scotland's king and law
Freedom's swords will stro ugly ward
Free man stand or freeman fall
Let him on with me !

By oppression's woes and pains,
By your sons in servile chains,
We will drain our dearst veins
But they shall be free ! !
Lay the proud userpers low,
Tyrants fall in every foe
Liberty's in every blow,
Let us do or die ! ! !

[ स्काटलंडच्या राजाकरितां आणि धर्माकरितां स्वातंत्र्याची तरवार निष्कोषित करावयाला कोण सिद्ध आहे ?— स्वतंत्र म्हणून राहावयाचा किंवा मरावयाचा कोणाचा निश्चय आहे ? त्यानें माझ्याबरोबर पुढें चलावें ! अत्याचारानें दिलेलें प्रत्येक दुःख आणि पीडा आठवून— दास्यत्वाच्या शृंखलांनीं बद्ध होणाऱ्या वंशजांना स्मरून- आपण आपल्या शिराशिरांतून रक्त सांडूं; पण त्यांना स्वतंत्र करूं ! ! ताठर अरेरावांना खालीं पाडा. प्रत्येक शत्रूबरोबर एकेका प्रजापीडकाची आहुति द्या. ह्या युद्धांतील प्रत्येक घावांत स्वातंत्र्य सांठविलें आहे. तें आपण मिळवूं, नाहींतर प्राण देऊं ! ! ]

दिल्लीहून परत आल्यावर शके १६४२ मध्यें बाळाजी विश्वनाथ मरण पावले आणि श्रीमंत थोरले बाजीराव हे शाहूमहाराजांच्या आधिराज्याखालील संपूर्ण मराठमंडळाचे चालक झाले. शिवाजीमहाराजांच्या निधनानंतर मराठ्यांच्या इतिहासांतील पुढचा पल्ला गांठणारी वैय्यक्तिक घटना म्हणजे बाजीरावांचा राजकीय रंगभूमीवर प्रवेश ही आहे. पुढील धोरणाच्या महत्त्वाच्या प्रश्नांचा नीट निश्चय होत नव्हता. महाराष्ट्राचें राजकीय स्वातंत्र्य जिंकून परत मिळविलें होतें. मराठ्यांनीं आपली सत्ता इतकी बळकट आणि संघटित केली होती कीं, तिजमुळें ते आपल्या पायावर उभे राहून आपल्या धर्माचें आणि देशाचें संरक्षण करण्यासाठीं कोणाशीं दोन हात करण्याला समर्थ झाले होते. आतां आपल्या महत्त्वाकांक्षा महाराष्ट्राच्या मर्यादेंतच कोंडून ठेवल्या आणि दिल्लीच्या सार्वभौम राजकारणांत हात न घालतां आपण अलग राहिलों तरच पूर्वार्जित वित्ताचा आपल्याला शांतपणानें बसून उपभोग घेतां येणें शक्य होईल असे विचार साहजिकच कांहीं मराठी

पुढाऱ्यांच्या मनांत आले आणि त्यांनीं शाहूमहाराजांच्या मनांत ते बिंबवा-बयाचा प्रयत्न चालविला. त्यांच्या विचाराप्रमाणें त्यांना सबंध राष्ट्राची समजूत करून देतां आली असती आणि हिंदु-स्वातंत्र्याचें युद्ध महाराष्ट्राच्या मर्यादेच्या बाहेर जाऊं न देण्याला त्यांनीं लोकांचीं मनें वळविलीं असतीं तरीही मिळविलेलें पद शांतपणानें त्यांना उपभोगितां आलें असतें किंवा नाहीं याची शंकाच आहे ! पण बाहेरून येणाऱ्या सर्व शत्रूंच्या विरुद्ध त्यांना टिकाव धरतां आला असता आणि आपलें राजकीय स्वातंत्र्य स्वतः-पुरतेंच उपभोगितां आलें असतें तरी सुद्धां त्यांनीं तसें करणें योग्य होतें काय हा प्रश्न होता ! गेल्या दोनतीन पिढ्या त्यांनीं इतक्या निकरानें आणि उधळे-पणानें रक्त सांडलें व युद्ध केलें तें कशासाठीं ? नुसतें स्वस्थ बसून उपभोग घेण्यासाठीं निःसंशय नव्हतें ! आणि महाराष्ट्राबाहेरच्या गांजलेल्या हिंदु बांधवांच्या किंकाळ्या कांहीं विकार होऊं न देतां स्वतःलाच खाणाऱ्या चित्तानें ऐकत उपभोगिलेली ती शांति कधीं तरी मानाची ठरली असती काय ? शिवाजीमहाराजांचा आणि त्यांच्या संवगड्यांचा हेतु मराठी राज्य स्थापण्याचा नसून हिंदवी स्वराज्य स्थापण्याचा होता.

परक्यांच्या जुंवाखालून महाराष्ट्रांतील हिंदूंची मान मोकळी केली गेली होती; पण हिंदुस्थानाच्या इतर प्रांतांत लक्षावधि हिंदु बांधव त्या जड जुंवाच्या भारानें अद्यापि विवळत होते ! श्रीरामदासांना तीर्थक्षेत्रें भ्रष्ट झालीं म्हणून खेद वाटला आणि त्यांनीं 'धर्मासाठीं मरावें' म्हणून आज्ञा केली ! पण काशीविश्वेश्वराच्या मंदिरावर मुसलमानी चांद आढ्यतेनें विराजत असतां धर्माच्या रक्षणासाठीं युद्ध करावयाचें व प्राण द्यावयाचे हें हातीं घेतलेलें कार्य आपण पार पाडलें असें मराठ्यांनीं मानणें कसें शक्य होतें ? आणि दिल्लीच्या धर्मराजांच्या सिंहासनावर परका अधिष्ठित झाला असतां शिवाजी-महाराजांची हिंदवी स्वराज्याची -'हिंदुपदपादशाहीची'—प्रतिज्ञा सिद्धीस गेली असें कसें म्हणतां आलें असतें ? मराठ्यांनीं पंढरीच्या पुण्यभूमींत मुसलमानी चंद्रकोरीला अर्धचंद्र दिला होता. आणि मुसलमानी धर्म-वेड्यांच्या छळापासून नाशिक क्षेत्राची मुक्तता झाली होती; पण काशीची अजून काय अवस्था होती ? कुरुक्षेत्र आणि हरिद्वार कोणाच्या सत्तेखालीं होतें ? रामेश्वरावर कोण अधिकार चालवीत होते ? हीं क्षेत्रें नाशिक आणि पंढरपुरांइतकींच प्रत्येक मराठ्यास पवित्र नव्हतीं काय ! त्यांच्या पूर्वजांची

रक्षा नुसत्या गोदावरींतच पडलेली नसून भागीरथीमध्येंही पडली होती ! त्यांच्या देवतांचीं मंदिरें हिमगिरीपासून रामेश्वरापर्यंत, द्वारकेपासून जगन्नाथापर्यंत पसरलेलीं होतीं. पण श्रीरामदासांनीं म्हटल्याप्रमाणें अद्यापि गंगेचीं आणि यमुनेचीं जलें त्यांत मुसलमानी विजेत्यांच्या विजयी अर्धचंद्राचें प्रतिबिंब पडल्यामुळें अद्यापिही धर्मनिष्ठांच्या स्नानसंध्येला अयोग्य आणि कलंकित अशींच होतीं. 'प्रस्तुत यवनांचें बंड । हिंदु उरला नाहीं चंड' म्हणून प्रस्ताव करून रामदासांनीं मराठ्यांना भाक दिली, 'धर्मासाठीं मरावें । मरोनि अवघ्यासि मारावें । मारितां मारितां घ्यावें । राज्य आपलें'. पण अद्यापि हिंदूंना पिळून काढणारा मुसलमानी राजदंड मोडून विच्छिन्न केला होता काय ? आणि सर्व हिंदुस्थाननें राजकीय आणि धार्मिक दास्याच्या शृंखला तोडून टाकल्या होत्या काय ? जोंपर्यंत केवळ महाराष्ट्रांतीलच नाहीं तर अखिल भरतवर्षांतील मुसलमानी सत्ता आणि सामर्थ्य ह्यांचें उन्मूलन झालें नाहीं तोंपर्यंत हिंदुधर्म विजयानें नांदणें शक्य नव्हतें; आणि हिंदवी राज्य वाढीस लागणें व ऊर्जितावस्थेला येणें शक्य नव्हतें. हिंदुस्थानची एक अंगुळभर भूमिही जोंपर्यंत मुसलमानी स्वामित्वाखालीं होती तोंपर्यंत शिवाजीमहाराज आणि श्रीरामदास यांचें कार्य संपादित आणि पूर्ण होणें शक्य नव्हतें ! गेलीं ५० वर्षें युद्धांत लढून दिवंगत झालेल्या सर्व पिढ्यांचा स्वार्थत्याग निष्फळ होता ! तर मग तुम्हांला—आपल्या हिंदुभूमीला आणि हिंदु जातीला ज्या शृंखलांनीं जखडून दास करून टाकलें आहे त्या शृंखला तोडून टाकीपर्यंत, हिंदुमात्राला आपापल्या पंथांचीं धर्मकृत्यें निर्विघ्न करतां येण्याइतका देश सुरक्षित होईपर्यंत आणि सर्व हिंदूंचें एक महान् आणि समर्थ हिंदुराष्ट्र बनवीपर्यंत, एकदां उपसलेली तरवार कोश करणार नाहीं अशी गर्जना करीत ज्यांनीं उठावणी केली त्या तुम्हांला—काशीविश्वेश्वराच्या भग्न मंदिरावर मशीद उभारली जात असतां, परक्यांचे घोडे सिंधुनदाचें पवित्र जल मुक्तपणें आणि निर्भयपणें तुडवून जात असतां आणि हिंदी महासागराच्या लाटांवर परक्यांच्या नौका जयभरानें मिरवत असतां, आपली असिलता कोशबद्ध करणें आणि लांछनास्पद शांततेचें सुख भोगीत पडणें कसें शक्य आहे ? हीच परीक्षेची वेळ आहे. तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें जर संकुचित किंवा प्रांतिक स्वार्थासाठींसुद्धां—मग वैय्यक्तिक स्वार्थाची गोष्टच बोलावयाला नको—ह्या महनीय चळवळीचा उपक्रम झालेला नाहीं, उलट

हिंदुधर्मासाठीं, हिंदवी स्वराज्यासाठीं, हिंदुपदपादशाहीसाठीं ती अस्तित्वांत आली, तर मग मराठयांनो ! शेंकडयांनीं आणि सहस्रांनीं तुम्ही बाहेर पडा आणि नर्मदेच्या पलीकडे चंबळा उतरून जाऊन, यमुना ओलांडून, गंगा आणि ब्रह्मपुत्रा पार होऊन, समुद्राच्या आणि पर्वतांच्या सीमाप्रांतापर्यंत ह्या पवित्र भगव्या झेंड्याला नेऊन पोंचवा ! आणि श्रीरामदासांनीं तुम्हांला आज्ञा केल्याप्रमाणें उठा व प्रयत्न करा.

**देव मस्तकीं धरावा । अवघा हल्लकल्लोळ करावा ॥**
**मुलुख बडवा बुडवावा । धर्मसंस्थापनेसाठीं ॥**

महाराष्ट्राच्या साधूंची आणि संतांची, योध्यांची आणि राजकारण्यांची, कल्पना आणि कृति यांना चालना देणाऱ्या पुढाऱ्यांची विचारसरणी ही अशी होती. थोरले बाजीराव, चिमाजीअप्पा, ब्रह्मेंद्रस्वामि, दीक्षित, मथुराबाई आंग्रे आणि दुसरे त्या वेळचे पुढारी ह्या भावनेनें उद्दीपित झाले होते आणि मराठ्यांनीं आपला उपक्रम महाराष्ट्राच्या बाहेर वाढवावा असा त्यांचा आग्रह होता. मराठ्यांनीं काय करणें युक्त आहे एवढाच हा प्रश्न नसून काय करणें मराठयांचें कर्तव्य आहे असा हा प्रश्न होता. महाराष्ट्रानें तसें मनांत आणलें तरीही त्याला दुसऱ्याशीं राजकीय संबंध न येतां सुटें रहाणें शक्य नव्हतें. महाराष्ट्रांतील हिंदूंचें भाग्य उत्तरेस सिंधुनदाच्या तीरावरील आणि दक्षिणेस समुद्राच्या तीरावरील त्यांच्या धर्मबांधवांशीं आणि देश-बांधवांशीं पक्कें निगडित झालें होतें. आपापल्यापुरतें पहाण्याच्या संकुचित प्रांतीय दृष्टीमुळेंच पूर्वीं हिंदुजातीचा राजकीय आणि त्यामुळेंच जातीय व धार्मिक विनाश झाला हें महाराष्ट्रांतील चतुर राजकारण्यांच्या तीक्ष्ण राजकीय दृष्टीला दिसल्याविना राहिलें नाहीं. शक्य तर आतां अखिलभारतीय प्रतिरोध केला पाहिजे, असा त्यांनीं विचार केला. नादिरशहानें हिंदुस्थानावर आक्रमण केलें त्या वेळीं बाजीरावानें हीच गोष्ट इतर हिंदु राजांना कळविली. तशांत स्वतःच्या राष्ट्रीय जीवनाच्या आध्यात्मिक व मानसिक उन्नतीसाठींच नव्हे, तर प्रत्यक्ष वैय्यक्तिक आणि ऐहिक हितासाठींसुद्धां त्यांनीं आपल्या राजकीय स्वातंत्र्याच्या आकांक्षा न्याय्य मर्यादेला नेऊन पोंचवीपर्यंत आणि अखिल हिंदुजातीला एकत्र संघटित आणि निगडित करणारे थोर आणि समर्थ साम्राज्य प्रस्थापीपर्यंत त्यांनीं विसांवा न घेणें आणि रणांगणांतून

निघून न जाणें अवश्य होतें. सबंध जात परक्यांच्या सत्तेखालीं वांकली गेली असतां कोणाही हिंदूला पुष्कळ काळपर्यंत शांतिसुख भोगणें आणि आपलें ध्येय गांठणें अशक्य होतें. आणि स्वतःच्या जातीची वाढ परकीय उपप्लवाच्या प्रचंड वृक्षाखालीं खुरटून जात असतां कोणाही हिंदूला आपली पूर्ण वाढ करून घेणें शक्य नव्हतें. ह्या सर्व कारणांसाठीं लोकनायकांनाच केवळ नाहीं तर मराठी सेनेंतील लहान पाईकांनाही पूर्ण जाणीव झाली होती कीं, प्रत्यक्ष दिल्लीचें राज्य हातीं येईपर्यंत आपल्याला साताऱ्याला राज्य चालविणें शक्य नाहीं. आणि म्हणून शाहूमहाराजांच्या अध्यक्षतेखालीं जेव्हां संपूर्ण मराठमंडळाचे पुढारी ह्या महत्त्वाच्या प्रश्नाचा निर्णय करण्यासाठीं एकत्र झाले त्या संस्मरणीय प्रसंगीं बाजीराव उठले आणि त्यांनीं आपल्या लोकांची हीच दृढमूल झालेली भावना आणि आकांक्षा बोलून दाखविली. स्वतःचा उत्साह आणि अंगीकृत कार्याचें दिव्यत्व ह्यांच्या प्रत्ययानें त्यांनीं उद्गार काढले, " दिल्लीवर—थेट दिल्लीवर-आपण चाल करून जाऊं आणि मुसलमानी सत्तेच्या मुळावरच सरळ घाव घालूं. येथेंच अनमान करीत आणि अडखळत कां बसतां ? हिंदु वीरांनो, पुढें चाल करून निघा. हिंदु-पदपादशाहीची वेळ येऊन ठेपली आहे ! काय म्हणतां अशक्य ? होय. मीं माझ्या तरवारीनें त्यांच्याशीं सामना दिला आहे आणि त्यांच्या बळाची मला माहिती झाली आहे. छत्रपतिमहाराज ! मला आपल्यापासून पैसा किंवा माणसें कांहीं नको. केवळ अनुज्ञा द्या आणि आशीर्वाद असूं द्या; म्हणजे महाराज ! हा मी जातों आणि ह्या जीर्ण विषारी वृक्षाला शाखा आणि मुळें ह्यांच्या सुद्धां एकदम खालीं आणतों ! "

ह्या जगांत वीराच्या वक्तृत्वाइतकें अनिवार्य वक्तृत्व नाहीं. शाहु छत्रपति उत्साहानें थरारून गेले. शिवाजीमहाराजांचें रक्त त्यांच्या धमन्यांतून सळसळूं लागलें. ते म्हणाले, " जा ! तुम्ही माझ्या लोकांचे खरे पुढारी आहां. तुम्हांला वाटेल त्या दिशेनें जा आणि माझ्या सैन्याकडून विजयावर विजय संपादन करवा. दिल्लीची कथा काय ? हा आपला पवित्र भगवा झेंडा घ्या आणि तो प्रत्यक्ष हिमालयाच्या मस्तकावर आणि त्याच्याही पलीकडे थेट किन्नर खंडांत नेऊन रोवा." आणि शाहुमहाराजांनीं उल्लेखिलेला हा भगवा झेंडा म्हणजे कसा होता ! तो सोन्यानें किंवा रुप्यानें शृंगारलेला नव्हता; तर आत्मत्यागाचें, देवभक्तीचें, मनुष्यसेवेचें मूर्त चिह्नच अशा रंगांत—

संन्याश्याच्या भगव्या रंगांत-रंगविलेला होता ! हा भगवा झेंडा पुढें करून मराठी सैन्य त्याच्या मागें चालून जाई. जें ध्येय दृष्टीसमोर ठेवून परकीय जुंवाखालीं वांकलेल्या हिंदुजातीचे विमोचक आणि हिंदुधर्माचे संरक्षक ह्या नात्यानें त्यांना पुढला मार्ग क्रमावयाचा होता. त्या थोर ध्येयाची-त्यांच्या अंगीकृत कार्याची-त्यांना निरंतर आठवण व्हावी म्हणून, त्यांना तो देण्यांत आला होता. त्यांची तरवार भवानी होती; त्यांचा ध्वज भगवा होता. श्रीरामदासांनीं तो दिला; शिवाजीमहाराजांनीं त्याच्याखालीं युद्ध करून त्याची सह्याद्रीच्या शिखरावर स्थापना केली; आणि शाहुमहाराजांनीं आणि त्यांच्या मराठ्यांनीं त्याला थेट किन्नर खंडाच्या सीमाप्रांतावर नेऊन रोंवावयाचा निश्चय केला !

मंडळाची ती बैठक संपली आणि तेव्हांपासून मराठमंडळाचा इतिहास म्हणजे संपूर्ण भारतवर्षाचा इतिहास झाला !

---

## प्रकरण आठवें

# दिल्लीवर चाल !

'अरे, बघतां काय ! चला जोरानें चाल करून.
हिंदुपदपादशाहीस आतां उशीर काय ?' —बाजीराव.

ज्या वेळीं बाजीरावांच्या पिढींतील इतर मंडळी अधिक धाडसी कृत्यें करण्यासाठीं कंबर बांधून ह्यापुढें युद्धक्षेत्र प्रत्यक्ष उत्तर हिंदुस्थानांत नेऊन टाकण्याच्या प्रयत्नाला न लागतां विचार करीत आणि शंका काढीत बसली होती, त्या वेळीं बाजीरावांनीं राजसभेत शाहूमहाराजांच्या समोर, शिवाजीमहाराजांनीं प्रयत्नांची पराकाष्ठा करून दक्षिणेंत हिंदु-स्वातंत्र्याचें युद्ध चालविलें त्या वेळच्या प्रतिकूल परिस्थितीपेक्षां आतां तुलनेनें सर्व दृष्टींनीं किती अनुकूल परिस्थिति आहे हें, सर्वांना पटवून देऊन मराठी पुढाऱ्यांना कार्यार्थ वक्तृत्वपूर्ण आव्हान दिलें आणि पुढें निजाम, बंगष व इतर मोगल सेनापति ह्यांच्या विरुद्ध विजयी लढाया दिल्या. ह्यावरून बाजीराव आणि त्याचे इतर साहाय्यकर्ते हे शिवाजीमहाराजांच्याच परंपरेंत कसे

वाढले होते आणि त्या अद्वितीय लोकनायकांच्या राष्ट्रीय धोरणाचा आणि विशिष्ट युद्धपद्धतीचा त्यांनीं किती अभ्यास केला होता हें उत्कृष्ट रीतीनें दृष्टोत्पत्तीस येतें. त्या वेळच्या सर्व मुसलमानी सेनापतींत आणि राजकारणपटूंत निजाम हा अधिक कर्तृत्ववान् होता. तेव्हां त्याला नमवून त्याचा विरोध नाहींसा करावयाचा हें बाजीरावांच्यापुढें पहिलें काम होतें.

मंत्रिमंडळांत आपल्या वक्तृत्वानें आणि आकांक्षांच्या भराऱ्यांनीं आपण शिवाजीमहाराजांचे खरे शिष्य आहोंत असें बाजीरावांनीं दाखविलें. त्याचप्रमाणें प्रत्यक्ष युद्धभूमीवरही शिवाजीमहाराजांचे शिष्य आपण शोभतों हेंही त्यांनीं सिद्ध करून दिलें.

शके १६४९ (७ ऑगस्ट १७२७) मध्यें मुसळधार पाऊस पडत असतां बाजीरावांनीं युद्धासाठीं आपलें सैन्य हालविलें. औरंगाबाद प्रांतांत एकदम प्रवेश करून निजामाच्या अधिकाराखालील जालना आणि भोंवतालच्या इतर विभागांतूनच त्यांनीं युद्धाची खंडणी उकळली. इवाजखानाच्या हाताखालचें निजामचें सैन्य त्यांच्याशीं दोन हात करण्यासाठीं पुढें येतांच बाजीरावांनीं आपण त्यांच्याशीं युद्ध देणार अशी थोडा वेळ अर्धवट हूल दाखवून अकस्मात् द्रुतगतीनें शत्रूला मागें टाकलें. माहूरच्या मार्गानें जाऊन औरंगाबाद गांठलें आणि त्या नगरींतून आपण भारी खंडणी उकळणार असें प्रसिद्ध करून दिलें. ह्या धनाढ्य नगराचें संरक्षण करण्यासाठीं स्वतः निजाम इवाजखानाला मिळण्याकरितां तांतडीनें निघाला. आपला डाव पूर्णपणें साधला आणि निजाम फसला हें पाहिल्याबरोबर बाजीरावांनीं खानाला सोडला आणि एकदम गुजराथेंत शिरून तेथील मोगल सुभेदाराला आपण निजामाच्या सांगण्यावरून या प्रांतावर चाल करून आलों आहों असा खोंचदार निरोप पाठविला. इकडे निजाम घाईघाईनें औरंगाबादला जाऊन पोंचतो तों त्याला कळलें कीं, ज्या शत्रूपासून आपण या नगरीचें संरक्षण करणार होतों तो तर केव्हांच गुजराथेंत निघून गेला आहे. त्यामुळें चिडून जाऊन बाजीरावाचाच डाव उपयोगांत आणावयाचें त्यानें ठरविलें आणि शत्रूला कल्पना नसतां अकस्मात् चालून जाऊन त्याला चकित करावयाचें ह्या मराठी-युद्धपद्धतीचेंच अनुकरण करून बाजीराव नाहींत अशा वेळीं पुण्यावर जाऊन त्यांचाच प्रांत लुटावयाचा असा त्यानें विचार केला; पण मराठी काव्याचें हें शिक्षण आत्मसात् करावयाला त्याला जरा उशीर लागला!

हें सर्व आधींच ओळखून बाजीरावांनीं गुजराथ केव्हांच सोडली आणि विजेच्या वेगानें निजामच्या राज्यांत पुन्हा प्रवेश केला.

अशा रीतीनें इकडे निजाम पुण्यावर चाल करून जात होता आणि आपण शत्रूवर केवढा सांग्रामिक डाव केला असे मांडे मनांत खात होता तोंच त्याला वार्ता येऊन पोहोंचली कीं, बाजीरावांचा देश आपण लुटावयाच्या आधींच बाजीरावांनीं मात्र आपला प्रांत केव्हांच लुटून टाकला आणि आपली पूर्ण फजीती केली ! तेव्हां पुण्यावर चाल करून जाण्याचा बेत त्याला सोडावा लागला आणि तो घाईघाईनें परतला, तों गोदावरीच्या कांठीं बाजीरावांची व त्याची गांठ पडली. मधल्या निरर्थक येरजारेनें आतां निजामचें सैन्य अगदीं थकून गेलें होतें आणि त्यामुळें निजामची लढाई टाळण्याची इच्छा असली तरी बाजिरावांना युद्धासाठीं हीच संधि हवी होती. तेव्हां पूर्वींप्रमाणें शत्रूशीं तोंड न देतां निसटून जावयाच्या जागीं आतां त्यांनीं अत्यंत चातुर्याच्या हालचालींनें मोगलांना हलावयाला लावून आपल्या इच्छेप्रमाणें मालखेडजवळ ठाणें द्यावयाला भाग पाडलें. लागलीच आतांपर्यंत जितक्या कौशल्यानें युद्धाला तोंड देण्याचें त्यांनीं टाळलें तितक्याच कौशल्यानें त्यांनीं आक्रामक युद्धास आरंभ केला. लांब अंतराच्या बंदुका आणि जड तोफा असूनही आतां निजाम पुरा कोंडला गेला आणि पाठीशीं लागलेले मराठे सुटणें अशक्य आहे असा उद्वेगकारक अनुभव त्याला आला. आपल्या सैन्याचा पूर्ण नाश तरी करून घ्यावा नाहींतर बाजीराव आज्ञा करतील ती ती गोष्ट मुकाट्यानें मान्य करावी असा प्रसंग येऊन ठेपला ! निजामानें साहजिकच दुसरा मार्ग पत्करला ! त्यानें शाहूमहाराजांना महाराष्ट्राचे छत्रपति म्हणून मान्यता दिली; चौथाई आणि सरदेशमुखीचें सर्व येणें चुकतें करून द्यावयाचा करार केला; आणि आपल्या प्रांतांतील कर गोळा करणाऱ्या सर्व मराठी अधिकाऱ्यांना पुन्हा कामावर घ्यावयाचें वचन दिलें.

निजामवरच्या या स्वारीचें जरा विशद रीतीनें वर्णन केलें आहे. कारण ही स्वारी म्हणजे मराठी युद्धपद्धतीचें एक आदर्शभूत उदाहरण आहे. आणि त्यावरून शिवाजीमहाराजांनीं शिकवलेले धडे त्यांच्या नंतरचे मराठी सेनानायक विसरले तर नाहींतच; पण उलट त्यांनीं त्यांत सुधारणा करून त्यांचा रणांगणावर अनेक पटींनीं विस्तारपूर्वक आणि उत्कटतेनें उपयोग केला आणि यश संपादन केलें.

दख्खनच्या मोगली सुभेदारापेक्षां माळव्याच्या मोगलांच्या सुभेदारालाहीं कांहीं अधिक मानपूर्वक सुटका करून घेतां आली नाहीं ! शके १६२० (इ.सन १६९८) मध्यें उदाजी पवारांनीं माळव्यावर स्वारी केली आणि मांडव्याला ठाणें देऊन ते बसले. तेव्हांपासून मराठ्यांनीं सर्व दिशांनीं माळव्यांतील मोगल सैन्यावर आघात करावयाला प्रारंभ केला होता. मुसलमानांच्या प्रजापीडक राज्यकारभारानें आणि धार्मिक अत्याचारांनीं त्या प्रांतांतले हिंदु इतके असंतुष्ट आणि रुष्ट होऊन गेले होते कीं, हिंदुस्वातंत्र्याच्या युद्धाच्या पूर्वी पसरलेल्या हिंदु राष्ट्रीय पुनरुज्जीवनाच्या लाटेबरोबर हिंदुपदपादशाही-या कल्पनेच्या पुरस्कर्त्यांची माळव्यांत वाण पडली नाहीं. ह्या वेळीं परकीय राजसत्तेपासून आपल्या देशाची मुक्तता करण्याचें सामर्थ्य मराठ्यांच्या वाढत्या सत्तेंत आणि हिंदु साम्राज्याच्या भव्य कल्पनेंत मात्र आहे ही गोष्ट माळव्यांतील सर्व-साधारण हिंदुसमाजाला आणि त्यांच्या ठाकूर, उपाध्ये, संस्थानिक इत्यादि स्वाभाविक पुढाऱ्यांना दिसून आली होती.

तशांत हिंदूंच्या सुदैवानें ह्या वेळीं माळव्यांतील सर्वांत थोर संस्थानिक हिंदुस्वातंत्र्याच्या अत्यंत उत्साही पुरस्कर्त्यांपैकीं एक होते. ते म्हणजे जयपूरचे नरेश सवाई जयसिंग महाराज होत. राजा छत्रसालांना परकी शत्रूपासून आपल्या चिमुकल्या राज्याच्या स्वातंत्र्याचें संरक्षण करणें अशक्य झालें आणि एक तर कोणा हिंदु सम्राटाचें मांडलिक होऊन रहावें किंवा मुसलमान अगर इतर हिंद्वेतर परकीयांच्या अधिराज्याखालीं भरभराटीला यावें असा प्रश्न त्यांच्यापुढें येऊन पडला. तेव्हां त्यांनीं अत्यंत शहाणपणानें दिल्लीच्या मुसलमानी सिंहासनापुढें गुडघे टेंकून जगण्यापेक्षां आपल्या प्रांतीय स्वार्थावर तिलांजली देऊन अखिल हिंदुसमाजाच्या चळवळीशीं मग तिचें पुढारीपण मराठ्यांकडे असो, शिखांकडे असो, रजपुतांकडे असो किंवा इतर कोणाही हिंदु पोटजातीकडे असो—एकरूप होऊन जाण्याचा मार्ग पत्करला ! छत्रसालाच्या ह्याच अत्यंत दूरदर्शी व समंजस धोरणाला अनुसरून जयसिंगाचें वर्तन असे.

विशेष करभाराच्या भाराखालीं वांकलेल्या शेतकऱ्यांचा आणि क्षेत्रपालांचा, मुसलमानी राजसत्तेच्या अस्तित्वापर्यंत न ढळणारा आपल्या धर्माचा आणि आपल्या जातीचा उर्मटपणानें होणारा तेजोभंग, मानभंग आणि शक्तिभंग ह्यापुढें सहन करणें ज्यांस अशक्य झालें होतें अशा ठाकुरांचा आणि

पुरोहितांचा—माळव्यांतल्या राजसत्तेच्या उपप्लवानें पीडित झालेल्या सर्व हिंदूंचा—कैवार जयसिंगानें घेतला आणि त्यांना स्वतःची मुक्तता करण्यासाठीं आणि हिंदु राज्याची प्रस्थापना करण्यासाठीं मराठ्यांना बोलावण्याचा उपदेश दिला. त्या वेळीं राज्य करीत असलेल्या सर्व हिंदु राजांमध्यें मोगलांशीं दोन हात करून त्यांना चिरडून टाकील आणि सर्व हिंदूंची संघटना करील असें सामर्थ्य एका मराठमंडळांतच आहे हें ओळखण्याइतकी देशभक्ति आणि शहाणपण ह्या रजपूत राजामध्यें होतें. स्वतः पुढाकार घेऊन मोगली राजसत्तेपासून हिंदूंची मुक्तता करण्याचें महत्कार्य आपल्याला करतां येत नाहीं तेव्हां निदान आपल्या वैय्यक्तिक महत्त्वाकांक्षांचा त्याग करून आणि नीच, देशहितविघातक आणि संकुचित परोत्कर्षासहिष्णुतेचे सर्व विचार एकीकडे सारून हें महत्कार्य करण्याची ज्यांची इच्छा आहे आणि शक्ति आहे अशांना साह्य करणें हें आपलें काम आहे, असें तो समजे.

त्याच्या ह्या विचारांना माळव्यांतील प्रतिष्ठित ठाकूर नंदलाल मंडलोई ह्यांनीं अत्यंत उत्साहानें पाठिंबा दिला. माळव्यांतील हिंदूंच्या वतीनें त्या उभयतांनीं मराठ्यांशीं बोलणें आरंभिलें आणि हिंदुधर्माच्या मानाचें रक्षण करण्यासाठीं आणि म्लेंच्छांना घालवून लावण्यासाठीं माळव्यांत निघून येण्याचें त्यांना आमंत्रण दिलें. माळव्यांतील आपल्या सहधर्मीयांच्या ह्या हांकेला मराठ्यांनीं लागलीच ओ दिली आणि अल्पावधींत बाजीरावांचे शूर बंधु चिमाजीअप्पा ह्यांच्या नेतृत्वाखालीं मराठी सेनानायकांनीं सर्व दिशांनीं त्या प्रांतावर चाल केली. तेथील मोगलांच्या सुभेदारानें करतां आलें तितकें सर्व सैन्य एकत्र केलें; पण परत जाण्याचा मराठ्यांचा विचार मुळींच दिसेना! योग्य संधि सांपडतांच त्या सर्वांनीं मुसलमानांवर एकदम मारा चढविला आणि देवासच्या लढाईंत त्यांच्या सुभेदारालाच मारलें!

पण इतक्या सहजासहजीं आपल्या सत्तेखालील अत्यंत धनसंपन्न प्रांत सोडून द्यावयाला बादशहा सिद्ध नव्हता! त्यानें मराठ्यांशीं लढण्यासाठीं दुसऱ्या सुभेदाराची नेमणूक केली आणि तिकडे मराठ्यांशीं सहानुभूति असलेले माळव्यांतले हिंदु मराठ्यांना जाऊन मिळाले. मोगल सुभेदारानें भयंकर डाव रचला आणि आपल्या प्रचंड सैन्याच्या साहाय्यानें मांडवगड आणि इतर ठिकाणच्या घाटांत मराठ्यांना नाहींसें करून टाकण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण माळव्यांतील हिंदूंच्या साह्यानें मराठ्यांनीं त्यांना पूर्णपणें

चकवलें. मल्हारराव, पिलाजी व चिमणाजीअप्पा ह्यांनीं आजपर्यंत कोणाला सतावलें नसेल इतकें त्याला सतावून सोडलें. मराठ्यांनीं शेवटीं तिरला येथें त्याच्याशीं रोमहर्षण अशी लढाई केली आणि मुसलमानांचा पूर्ण नायनाट करून त्यांच्या सुभेदाराला जिवें मारलें.

ह्या दुसऱ्या विजयाची वार्ता ऐकल्याबरोबर माळव्यांतील हिंदूंचा हर्ष गगनांत मावेना ! मराठे जेथें जेथें गेले तेथें तेथें त्यांचें स्वागत झालें आणि शतकानुशतकांच्या पराभवानंतर आणि मानभंगानंतर घडलेल्या विजयी हिंदु ध्वजेच्या दर्शनानें हिंदुमात्राचीं अंतःकरणें पुलकित झालीं. जिकडेतिकडे उन्नत देशभक्तीची आणि जातीय आनंदोत्सवाची भावना दिसूं लागली.

जयसिंग स्वतः आपल्या एका सुंदर पत्रांत पहिल्यानें त्या पवित्र कार्याच्या सिद्ध्यर्थ झगडणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे त्यासाठीं आभार मानून आणि मराठ्यांचें त्यांनीं संपादन केलेल्या विजयानिमित्त अभिनंदन करून लिहितात, " आपले अनंत उपकार झाले ! खरोखरच आपला विजय अद्वितीय आहे ! तुम्ही परकी शत्रूला बाहेर घालवून दिलें; माळव्याच्या हिंदूंची मुक्तता केली आणि हिंदुधर्माचा आणि हिंदु जातीचा सन्मान प्रतिष्ठापन्न केला ! "

प्रांत जिंकल्यानंतर मराठ्यांनीं तेथें त्वरित सुव्यवस्था स्थापित केली, सर्व मोगल अधिकारी कामावरून काढून टाकले आणि मराठी साम्राज्याचा एक प्रत्यक्ष भाग अशा नात्यानें प्रांताचा राज्यकारभार ते चालवूं लागले.

पण दिल्लीच्या मोगल बादशहाचा इतक्या निराशेनंतरही आशावाद संपला नव्हता ! त्यानें महंमदखान बंगष नांवाच्या नवीन सुभेदाराची नेमणूक करून त्याला माळव्यांत पाठविलें. बंगष हा एक शूर रोहिला पठाण असून मुसलमानी मंडळींत त्याची युद्धविषयक कौशल्याविषयीं इतकी ख्याति होती कीं, त्यामुळें त्याला 'रणशार्दूल' अशी पदवी प्राप्त झाली होती. त्यानें पहिल्यानें बुंदेलखंडांत ह्या दृष्टीनें गडबड करणाऱ्या तेजस्वी छत्रसालमहाराजांना पूर्णपणें मोडून टाकावें आणि नंतर त्या विजयाचा लाभ घेऊन मराठ्यांना माळव्यांतून घालवून लावावें अशी त्याला बादशाही राजसभेंतून विशेष आज्ञा मिळाली होती.

महंमदखान बंगषानें बुंदेलखंडावर स्वारी केली. शूर बुंदेल्यांनीं त्यांचा विख्यात राजा छत्रसाल ह्याच्या नेतृत्वाखालीं संघटित होऊन मुसलमानी सत्तेच्या शृंखला झुगारून दिल्या होत्या आणि आतां ते आपल्या प्रांतांत

राजकीय स्वातंत्र्याचा उपभोग घेत होते. छत्रसालाला शिवाजीमहाराजांविषयीं अत्यंत अभिमान वाटत असे. शिवाजीमहाराजांमुळेंच त्याला ह्या महत्कार्याची स्फूर्ति मिळाली आणि त्यानें त्यांना आपले गुरु आणि मार्गदर्शी मानलें होतें. तेव्हांपासून हिंदु स्वातंत्र्याच्या ईश्वरी कार्याचा प्रचार बुंदेलखंडांत करण्याविषयींचा आपल्या गुरूचा उपदेश त्यानें निष्ठेनें पाळला. परकी राजसत्तेपासून आपल्या प्रांताची मुक्तता करण्यासाठीं आणि हिंदुधर्म व हिंदुदेश यांचें संरक्षण करण्यासाठीं त्यानें इतके प्रचंड आणि यशस्वी प्रयत्न केले कीं, त्याला त्याच्या देशबांधवांनीं 'हिंदुधर्माची ढाल' अशी गौरवपूर्वक पदवी दिली.

पण आतां त्याचा वृद्धापकाळ झाला होता; आणि अशा स्थितींत त्यांचें चिमुकलें हिंदु राज्य धुळीस मिळवून टाकूं अशा निश्चयानें प्रेरित झालेल्या शतपट दांडग्या रोहिले पठाणांची टोळधाड त्याच्यावर येऊन पडली होती. तेव्हां अशा वेळीं शिवाजीमहाराज, श्रीसमर्थ रामदासस्वामी आणि प्राणनाथप्रभु ह्यांच्या हिंदुसंघटनाच्या शिक्षेंत वाढलेल्या वृद्धवीर छत्रसालाची दृष्टि एकदम बाजीरावांकडे वळावी हें साहजिकच होतें. कारण आज मराठमंडळाचे प्रमुख ह्या नात्यानें शिवाजीमहाराजांचे सामर्थ्याचाच नाहीं तर अवतारकार्याचाही भार त्यांच्यावर पडला होता. छत्रसालनें बाजीरावांना एक हृदयस्पर्शी पत्र पाठविलें. त्यांत हिंदूंच्या कोमल भावनांना हालवून सोडणाऱ्या इतिहासपुराणांतील कथानकाचा उल्लेख केला होता. सर्व हिंदु एकमेकांचे बंधु आहेत आणि सर्व हिंदु जाति एकराष्ट्र आहे अशी हिंदुमात्राच्या अंतःकरणांत प्रगाढ भावना उत्पन्न करण्याचें ह्या दंतकथांच्याइतकें दुसऱ्या कोणच्याही गोष्टींत सामर्थ्य नाहीं.

**" जो गति ग्राह गजेंद्रकी सो गत भयि है आज**
**बाजी जात बुंदेलनकी राखो बाजी लाज "**

'बाजीरावसाहेब, या आणि पुराणकालीं जसें विष्णूंनीं गजेंद्राला वांचविलें त्याप्रमाणें दुष्ट शत्रूच्या मगरमिठींतून मला मुक्त करा' !

शिवाजीमहाराजांचा एकवेळचा मित्र आणि शिष्य अशा छत्रसालानें मुसलमानांनीं गांजल्यामुळें मराठ्यांकडे 'मी हिंदु—तुम्ही हिंदु; म्हणून मला साह्य करा' असें म्हणत धाव घेतल्याबरोबर साहजिकच ह्या देशभक्तीच्या

कार्यासाठीं प्रचंड साहस करावयास मराठे सिद्ध झाले. लागलीच बाजीराव मल्हारराव आणि पिलाजी जाधव ह्यांना बरोबर घेऊन ७०,००० सैन्यासह विजेच्या वेगानें विश्रांति न घेतां निघाले. वृद्ध हिंदु वीर छत्रसालाची आणि त्यांची धामोरा येथें भेट झाली. तेथें तोंपर्यंतच्या संग्रामांतून वांचलेले बुंदेल्यांचें सैन्य त्यानें बरोबर घेतलें आणि पावसाळ्याला प्रारंभ होऊन गेला होता तरी आपलें आक्रमण तसेंच पुढें चालविलें.

छत्रसालाला आपल्या राजधानीचा त्याग करावा लागला आणि त्याच्या चिमुकल्या हिंदु राज्यावर सहज विजय संपादन करतां आल्यामुळें महमदखान बंगष अगदीं चढून गेला होता. पावसाळा संपेपर्यंत विजयी वीराच्या सत्तेची विश्रांति उपभोगण्याच्या विचारांत तो होता, तो इकडे असे मनांत मांडे खात असतां, तिकडे हिंदु सैन्यें मुसळधार पाऊस, घनदाट अरण्यें आणि दुर्लंघ्य पर्वत ह्यांपैकीं कशाचीही क्षिति न करतां एकाएकीं महंमदखान बंगषावर येऊन पडलीं आणि त्यांनीं जैतपुरला शके १६४१ मध्यें त्याला कोंडून पूर्णपणें वेढून टाकलें ! ह्या मुसलमानी रणशार्दुलांची, वेढून टाकून, चोप देऊन आणि पराभव करून मराठ्यांनीं अशी गत करून टाकली, कीं त्याला आपला प्राण वांचविण्यासाठीं त्या विजयशाली हिंदु वीरांच्या हातांत संपूर्ण माळवा आणि बुंदेलखंड सोडून देऊन रणांगणांतून तोंड लपवून पळून जावें लागलें. आणि पुन्हा आपल्या प्रजेच्या स्वागतपर आनंदगर्जनेमध्यें आणि विजयी मराठी तोफांच्या कानठाळ्या बसविणाऱ्या गडगडाटामध्यें वृद्ध बुंदेला नरेशानें सर्व राजैश्वर्यासह राजधानींत प्रवेश केला.

त्या वृद्ध वीराला मराठ्यांच्या ह्या साहाय्याविषयीं इतकी कृतज्ञता वाटली कीं, त्यानें बाजीरावाला आपला तृतीय पुत्र म्हणून मानलें. आणि मरणसमयीं हें नातें लक्ष्यांत ठेवून राज्याचा तिसरा भाग खरोखरच बाजीरावाच्या स्वाधीन करण्यांत आला ! बाजीरावाच्या पिढींतील हिंदूंच्या हातून जीं कृत्यें घडत त्यांना प्रेरक भावनांच्या मुळाशीं किती उदात्त तत्त्वें होतीं आणि त्यामुळें वैयक्तिक किंवा संकुचितत्वाच्या ते कसे वर गेले होते, आपण सर्व हिंदूंशीं जाति, धर्म आणि रक्त ह्या त्रिविध बंधनांनीं निगडित झालों आहों, असें त्यांना कसें वाटूं लागलें होतें आणि कसेंही करून राजकीय स्वातंत्र्य संपादन करून एक प्रबळ हिंदु-साम्राज्य स्थापण्यासाठीं प्रचंड प्रयत्न करण्याची

स्फूर्ति त्यांना कशी झाली होती हें सिद्ध करावयाला हें एकच हृदयस्पर्शी उदाहरण पुरें आहे.

मुसलमानांच्या ह्या तिसऱ्या सुभेदारानें माळवा प्रांतांतून आणि बुंदेल-खंडांतून केलेल्या पलायनानें मराठे त्या प्रांतांचे पूर्ण सत्ताधीश झाले, आणि त्यांना जेथून हिंदु स्वातंत्र्याच युद्ध प्रत्यक्ष मोगली साम्राज्याच्या काळजाशीं नेऊन पोंचवितां येईल असें, सामरिक दृष्ट्या सोइस्कर स्थान मिळालें.

अशा रीतीनें हीं युद्धें माळव्यांत आणि बुंदेलखंडांत लढलीं जात असतां तिकडे गुजराथेंतही मराठी वीरांच्या शस्त्रांना आणि मुत्सद्द्यांच्या डावपेंचांना तितकेच महत्त्वाचे आणि चिरस्थायी विजय मिळत होते. पिलाजी गायकवाड, कंठाजी बांडे आणि शेवटीं प्रत्यक्ष चिमाजीआप्पा ह्यांनीं गुजराथेंतील मोगल सैन्यास सतत मारे करून इतके त्रासवून सोडलें कीं, तेथल्या मोगल सुभेदाराला त्यांच्याशीं साम करणें भाग पडलें आणि मराठ्यांना चौथाई व सरदेशमुखी देण्याचा करार करावा लागला. ह्या मानहानिकारक अटींमुळें मोगल बादशहा अत्यंत चिडला आणि त्यानें मराठ्यांना गुजराथेंतून हांकून लावण्याची कामगिरी देऊन अभयसिंगाची पाठवणी केली. हा अभयसिंग धर्माभिमानी जयसिंगाच्या अगदीं उलट होता. स्वतःचा स्वार्थ साधावा आणि मान वाढवावा एवढाच त्याचा उद्देश. त्याच्या ह्या वृत्तीमुळें राजकीय स्वातंत्र्यासाठीं प्रारंभ केलेल्या झगड्यांत हिंदूंचें पुढारीपण चालवावयाला आपण दुसऱ्या कोणाही हिंदु राजापेक्षां अधिक अयोग्य आहोंत हें पाहण्याची दृष्टि त्याला राहिली नव्हती. हें उदात्त कार्य पार पाडण्याची आपली योग्यता जर कोणा हिंदु राजसत्तेनें आतांपर्यंत दाखविली असेल तर मराठमंडळानेंच होती. पण आत्मप्रतिष्ठेच्या लोभानें अंध झालेल्या अभयसिंगाला ही साधी गोष्ट दिसली नाहीं; आणि त्यामुळें मराठ्यांना गुजराथेंत विरोध करण्याच्या भरांत बोलणीं-चालणीं करण्याच्या मिषानें त्यानें पिलाजी गायकवाडाला, सर्व हिंदूंना पूज्य आणि म्हणून घातपाताच्या संशयाच्याही पलीकडे असलेल्या श्रीडाकोरजीचे क्षेत्रस्थानीं, बोलावून नेलें आणि तेथें रजपुतांच्या वचनाचा भंग करून व त्या स्थळाचें पावित्र्य कलंकित करून त्याचा वध विश्वासघातानें करवला ! पण लवकरच त्याच्या अनुभवाला आलें कीं, असें करण्यांत नुसतें एक हिडिस पातक केल्याचाच दोष आपणांकडून घडला नसून एक आत्म-घातकी चूकही आपल्या हातून होऊन गेली आहे !

कारण, मराठे कांहीं एकाद्या स्थळीं त्यांच्या पुढाऱ्याचा विश्वासघातानें वध केल्यानें भिऊन जाणारे नव्हते. युद्ध, मारामारी व मरण हें त्यांचे बाल्यापासूनचे संवगडी होते आणि पिढ्यानपिढ्या संरक्षित गृहांत नाहीं, तर उघड्या रणमैदानांत, त्यांचें संगोपन आणि वर्धन होत होतें !

बुंदेलखंडांत आणि माळव्यांत आपण पाहिलें त्याचप्रमाणें गुजराथेतही तेथील हिंदु जनतेनें मराठ्यांना आपण होऊन वारंवार बोलावलें. त्यांची त्यांच्याविषयीं नेहमीं सहानुभूति असे आणि कधीं कधीं तर त्यांनीं मराठ्यांच्या ध्वजेखालीं प्रत्यक्ष युद्ध केलें; ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. त्यामुळें अगदीं कोळी, भिल्ल, वाघेरे इत्यादि गुजराथेंतील रणशूर हिंदुजातीही त्यांच्या आदराला पात्र झालेल्या पिलाजीच्या ह्या वधानें अगदीं संतापून गेल्या आणि त्याच्या रक्ताचा प्रतिशोध घेण्यासाठीं मोगल सैन्याशीं लढावयाला सिद्ध झाल्या. सर्व दिशांनीं मराठ्यांच्या टोळ्या येऊं लागल्या. त्यांनीं मारा चढवून शके १६५६ (इ. सन १७३४) मध्यें बडोदा जिंकलें, आणि अभयसिंगाला आपली जागा राखणें अशक्य करून टाकलें. तेव्हांपासून बडोदा ही जी मराठ्यांची राजधानी झाली ती अद्यापिही तशीच आहे! तिकडे दमाजी गायकवाडानें प्रत्यक्ष जोधपुरावर स्वारी केली आणि अभयसिंगाला आपल्या वडिलोपार्जित राज्याच्या बचावासाठीं त्वरेनें निघून जावयाला भाग पाडलें. तो तिकडे आलेला पाहतांच दमाजीनें एकदम तोंड फिरविलें आणि लवकरच प्रत्यक्ष अहमदाबाद जिंकून घेतलें. अशा रीतीनें शके १६५७ (इ. सन १७३५) मध्यें मराठ्यांनीं मोगल सुभेदाराला पुढें गुजराथेंत येणें अशक्यच नव्हे तर अनवश्यक करून टाकलें. कारण आतां त्या प्रांताचा कोणताही भाग मोगली साम्राज्यांत राहिला नव्हता !

## प्रकरण ९ वें

# हिंदूंचे समुद्र स्वतंत्र करण्यासाठीं !

**'आरमार एक स्वतंत्र राज्यांगच आहे. ज्याचे जवळ आरमार त्याचा समुद्र. ...जलदुर्ग सहित होते, त्यास नूतनच जलदुर्ग करून पराभविलें !'** —रामचंद्रपंत आमात्य.

ह्या प्रमाणें इकडे हिंदूंची भूमि स्वतंत्र करण्यासाठीं हिंदूंचें स्वातंत्र्ययुद्ध मोगलसाम्राज्याच्या प्रत्यक्ष काळजाशीं नेऊन भिडवीत असतांना तिकडे पश्चिमेकडून चालून आलेल्या परकी शत्रूंच्या प्रभुत्वापासून हिंदूंचे समुद्र निर्मुक्त करण्यासाठींही मराठ्यांचे तितकेच आटोकाट प्रयत्न चालले होते. मराठ्यांच्या राष्ट्रीय उत्थानानंतर थोड्याच दिवसांत मराठ्यांना कळून चुकलें होतें कीं, आपली भूमि जिंकून तिच्यावर स्वामित्व गाजविणाऱ्या मुसलमानांइतकीच आपल्या समुद्रांना पाहुणभेट देणारीं युरोपांतलीं व्यापारी राष्ट्रेंही हिंदु साम्राज्याच्या सुरक्षिततेला विघातक आहेत. शिवाजीमहाराज आणि त्यांच्या पिढींतील इतर मराठे पश्चिम समुद्रतटप्रांतावरील युरोपियनांच्या महत्त्वाकांक्षेला आणि लोभाला आळा घालून निष्फल करण्यासाठीं किती निश्चयानें प्रयत्न करीत होते हें 'आज्ञापत्रा'मध्यें ह्याविषयीं घालून दिलेले स्पष्ट नियम आणि धोरणाची दिशा हीं वाचलीं म्हणजे उत्तम प्रकारानें दृष्टोत्पत्तीस येतें. हें आज्ञापत्र म्हणजे राजनीतिवरील प्रसिद्ध निबंध आहे; तो विख्यात मराठी पुढारी आणि मुत्सद्दी रामचंद्रपंत ह्यांनीं रचला असून मराठी प्रधानमंडळाच्या ठरावानुसार राजाज्ञापत्र म्हणून सर्वांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत आला होता. त्या परिस्थितींत शक्य होतें तितक्या निकरानें शिवाजीमहाराजांनीं समुद्रतीरावरून सर्व परकीय सत्ता उठवून लावण्यासाठीं प्रयत्न केला. त्यांनीं समर्थ अशा मराठी आरमाराचा पाया घातला आणि त्याला दुजोरा देण्यासाठीं नवीन बांधलेल्या आणि सर्व युद्धसामुग्रीनें सज्ज केलेल्या बळकट समुद्रदुर्गांची रांग उभारिली. ह्या समुद्रदुर्गांनीं हिंदु समुद्राचें स्वातंत्र्य संपूर्ण एक शतकपर्यंत संगोपावयाची आणि संरक्षावयाची अमूल्य कामगिरी केली !

राजाराम महाराजांच्या राजवटींत औरंगजेबानें सर्व दक्षिण हिंदुस्थान पादाक्रांत केलें. आणि त्यामुळें मराठ्यांना संघटित व केंद्रीभूत अशी राजसत्ता चालविणें अशक्य होऊन प्रत्येक मराठी सेनानायक स्वतंत्रपणें सांपडेल

तेथें आणि शक्य असेल त्या रीतीनें त्या सर्व सामान्य शत्रूशीं दोन हात करूं लागला. त्या वेळीं मोगलांना समुद्रतटावरील प्रांतांतून हांकून द्यावयाची कामगिरी कान्होजी आंग्रे, गुजर आणि इतर प्रख्यात मराठी समुद्रसेनानायकांच्या अंगावर येऊन पडली. त्यांनीं आपल्यावरचा कार्यभार इतक्या उत्कृष्ट रीतीनें पार पाडला कीं, इंग्रजांना, फिरंग्यांना, वलंदाजांना, शिद्यांना किंवा मोगलांना एकएकटें किंवा कधीं कधीं घडून आलें त्याप्रमाणे सर्व एकत्र होऊनही मराठ्यांच्या वाढत्या समुद्रदलाचा पूर्ण नाश करणें तर दूरच, पण त्याला नियंत्रण देखील घालतां आलें नाहीं. इंग्रजांच्या मुंबई बंदरापासून केवळ तीन कोस असलेलें खंदेरी बेट मराठी नाविकबलाचे सेनापति कान्होजी आंग्रे ह्यांच्या स्वाधीन होतें, त्यामुळें इंग्रज अगदीं वचकून असत. मराठी सत्तेच्या उदयापूर्वीं बऱ्याच वर्षांपासून पश्चिम तीरावर पुर्तुगीजांनीं लांबवर आपलें बस्तान बसविलें होतें; जंजिऱ्याच्या शिद्यांचें मुसलमानी राज्यही चांगलें प्रबळ होतें. ह्या दोन भुंग्यापासून मराठी दर्यासारंगाला जरा मोकळीक मिळाल्याबरोबर तो तेव्हांच आपला निकाल लावील हें इंग्रज ओळखून होते.

ह्या सर्व शत्रूंपासून आपल्या प्रांताचा बचाव करण्यासाठीं कान्होजी आंग्र्याला पुष्कळ सैन्य ठेवणें भाग पडे. ह्या सैन्याचें वेतन देण्यासाठीं त्याला आरबी समुद्रावर व्यापार करणाऱ्या सर्व जहाजांवर चौथाईचा कर बसवावा लागला. हिंदूंच्या समुद्राचे आपण स्वामी आहों असें मराठयांनीं समजणें अगदीं न्याय्य होतें आणि त्या समुद्रावर त्यांच्या अनुज्ञेनें किंवा अनुज्ञेविना जे परकीय लोक संचार करीत, त्यांच्यावर आपल्या मर्यादेंत त्यांनीं चौथाई बसविणें अगदीं स्वाभाविक होतें. पण त्यांचा हा अधिकार इंग्रज आणि युरोपांतलीं इतर राष्ट्रें मानावयाला राजी नसत; तेव्हां कान्होजीनें त्यांना शासन लावण्यासाठीं आंतील द्रव्यासकट व माणसांसकट त्यांचीं जहाजें धरून आणलीं आणि खंडणी मिळाल्याविना त्यांची मुक्तता करण्याचें नाकारलें. शके १६३७त चार्लस बून ह्याची मुंबईच्या गव्हर्नरच्या जागीं नेमणूक झाल्यावर त्यानें आंग्र्याचे समुद्रदुर्ग नाहींसे करून टाकण्याचा निश्चय केला. त्यासाठीं त्यानें पुष्कळ श्रम घेतले आणि त्यापेक्षांही अधिक बढाया मारल्या. एका बलिष्ठ नाविकदलाची सिद्धता केली गेली आणि त्यानें लागलीच मराठयांच्या विजयदुर्गावर चाल केली. ह्या वेळीं इंग्रजांच्या अंगांत क्रोधाचें

वारें पूर्णपणें संचारलें होतें. मराठ्यांच्याविषयीं अधिक्षेपाची भावना ज्यांच्यामुळें प्रकट होईल अशींच नांवें त्यांच्या रणनौकांना देण्यांत आलीं होतीं. एकीचें नांव (हंटर) 'व्याध' होतें, तर दुसरीचें नांव (हॉक) 'ससाणा' होतें. तिसरी (रिव्हेन्ज्) 'प्रतिशोध' असून चवथी युद्धाला प्रारंभ होण्यापूर्वींच (व्हिक्टरी) 'विजयिनी' होती! ह्या बलाढ्य नाविकदलाच्या रक्षणासाठीं सहस्रावधि निवडक इंग्रज सैनिकांनीं बनलेली भौमिक दलाची एक तुकडी सज्ज ठेवली असून तिनें गडावर भूमीवरून चाल करून जावें अशी योजना होती. (शके १६३९ वै० व. ३) इ. सन १७१७च्या एप्रिल महिन्याच्या १७ व्या मितीला ह्या संतप्त झालेल्या रणनौकांनीं विजयदुर्गाच्या कोटावर तोफांचा मारा करावयाला प्रारंभ केला. पण त्यांत त्यांना मराठी कोट म्हणजे मेणाचे केलेले नसतात असा अनुभव आला. त्या कोटावर आणि त्यांच्या पाठीशीं उभ्याच असलेल्या गडरक्षकांवर रणनौकांवरील तोफांच्या माऱ्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं. तटाच्या भिंती तशाच अढळ राहिल्या आणि त्यांच्या आसऱ्यानें सुरक्षित असलेल्या मराठी सैनिकांच्या मुद्रेवर इंग्रजांचे विफल प्रयत्न पाहून उपहासाच्या लहरी दिसूं लागल्या. त्यामुळें चिडून जाऊन इंग्रजांनीं शिड्या लावून कोटावर चढण्याचा प्रयत्न केला; पण मराठ्यांनीं लागलीच त्यांना मनगटें चोळीत परत जावयाला लाविलें. आपलें कांहींच चालत नाहीं हें पाहून शेवटीं अगदीं निराशेनें इंग्रज माघार घेऊं लागले. मराठ्यांनीं तें पाहतांक्षणींच आपल्या तोफांचा असा घेमार उडवून दिला कीं, इंग्रज आले होते यापेक्षांही द्रुतगतीनें निजधामाला निघून गेले!

पुढच्या वर्षीं बूननें खंदेरीवर मारा केला; पण त्याला पूर्वींप्रमाणेंच चोप खाऊन परतावें लागलें. त्यानंतर मराठ्यांचें समुद्रावरील प्राबल्य दिवसेंदिवस हिंदुस्थानांतील इंग्रजी सत्तेला इतकें भयप्रद होऊं लागलें कीं, तेवढ्यासाठीं इंग्लंडच्या राजाला चार प्रचंड युद्धनौकांचें स्वतंत्र पथक निर्माण करावें लागलें. ह्या समुद्रदलावर रॉयल नेव्हींतील प्रसिद्धीस आलेला वरिष्ठ अधिकारी कमांडर मॅथ्यू ह्याची नेमणूक झाली. आणि अपयशाचा संभवही राहूं नये म्हणून आपल्याबरोबर मराठ्यांवर चालून जाण्यासाठीं साहाय्यार्थ पुर्तुगीजांना पाचारण झालें आणि त्यांनीं तें मोठ्या आनंदानें स्वीकारलें. या दोन समर्थ युरोपियन राष्ट्रांचा मराठ्यांवरील संयुक्त मारा (शके १६४३) इ. सन १७२१ मध्यें झाला आणि त्या सामन्यांत मराठे भूमीवरून व समुद्रावरून इतक्या

शौर्यानें आणि कौशल्यानें लढले कीं, युरोपियनांच्या सैनिकांना त्यांच्या कोटाच्या भिंती चढून जाणें अशक्य झालें. ह्या निरुपायाच्या स्थितीनें चिडून जाऊन कमॅण्डर मॅथ्यू युद्धाच्या भरांत स्वतः पुढें झाला तों एक मराठी भालाईत त्यांच्या स्वागतासाठीं सिद्धच होता. त्यानें आपला भाला त्यांच्या मांडींतच खुपसला. पण इंग्रजी नाविकदलाचा सेनापति भाल्याच्या एका घावानें भिऊन जाण्याइतका कच्चा निश्चित नव्हता. त्यानें त्या भालाइतावर आपला घोडा घातला आणि त्याच्यावर एकाच्या जागीं आपलीं दोनही पिस्तुलें रोखलीं. पण त्यांच्या दुर्दैवानें पाहातात तों त्यांतून गोळीच बाहेर पडेना ! संयुक्त दलांतल्या सैनिकांचेंही दैव आपल्या सेनापतीपेक्षां अधिक चांगलें नव्हतें. मारूं किंवा मरूं अशा निश्चयानें त्यांनीं मराठ्यांवर शेवटची चाल केली, आणि ते तटाच्या भिंतीपर्यंत जाऊन शिड्यांनीं वर चढण्याचा प्रयत्न करूं लागले. इतक्यांत मराठ्यांनीं इतक्या निकरानें आणि चातुर्यानें विरोध केला कीं, त्यांना किंकाळ्या मारीत परत फिरावें लागलें; इतक्यांत मराठ्यांच्या दुसऱ्या तुकडीनें पुर्तुगीजांच्या बगलेवर भूमीवरून मारा केला. त्याबरोबर पुर्तुगीज सैन्यानें हायच खाल्ली आणि तें जीव घेऊन पळूं लागलें. लवकरच इंग्रजांनींही त्यांचाच मार्ग स्वीकारला व आपल्या अनेक तोफा आणि सगळा दारुगोळा विजयी मराठ्यांच्या हातीं देऊन पलायन केलें. दोघेही रणविन्मुख होऊन एकत्र येतांच संयुक्त सैन्यांतलें उरलेंसुरलें अवसान ह्या दोन लज्जास्पद अपयशांच्या दोषांचें खापर एकमेकांवर टाकण्याच्या वाग्युद्धांत उपयोगांत आल्यावर पुर्तुगीज चौलला निघून गेले आणि इंग्रजांनीं मुंबई गांठली. ह्यानंतर बरेच दिवस इंग्रजांना आपल्या व्यापारी नौका मराठी दर्यासारंग आंग्रे चौथाईच्या वसुलीसाठीं घेऊन जाईल ह्या भीतीनें समुद्रसैन्याच्या देखरेखीखालीं न्याव्या लागत. लवकरच इंग्रजांना 'विजयिनी' रणतरीला मारा करावयाला लागल्यावर आपल्या सैन्याप्रमाणेंच आपल्याही गोळ्या भरावयाच्या राहून गेल्या असा अनुभव आला आणि इंग्रजी प्रतिशोधाला शत्रूचा निःपात करण्याच्या स्थलीं स्वतःच चौथाईच्या वसुलीसाठीं शत्रूंच्या स्वाधीन व्हावें लागलें. ज्यांना ही आपल्या मनाची भ्रांत फेडावयाची संधि मिळाली, त्यांनीं तर विजयदुर्गावर ७ मोठ्या रणनौका, दोन स्फोटकांनीं भरलेल्या नावा आणि प्रत्यक्ष सैनिकांचें एक पथक घेऊन चाल केली. पण मराठ्यांच्या धैर्याच्या खडकाचा एक कपराही त्यांना

उडवतां आला नाहीं ! आतां मराठ्यांचे वृद्ध समुद्रसेनानी हिंदु समुद्रावर स्वामित्व ठेवून अप्रतिहत संचार करूं लागले. आणि हे सर्व समुद्रावरील पराक्रम त्यांना व त्यांच्या राष्ट्राला तिकडे भूमीवर कोंकणांत शिद्दीशीं, दक्षिणेंत निजामाशीं, गुजराथेंत, माळव्यांत आणि बुंदेलखंडांत मोगलाशीं एकसारख्या लढाया चालू असतांना गाजवावे लागले.

शके १६५१ च्या जवळपास कान्होजी आंग्रे मरण पावले. ह्याच वेळीं दुसऱ्या एका ऐतिहासिक व्यक्तीनें कोंकणांतील राजकीय क्षेत्रांत प्रवेश केला आणि लवकर तिचा मराठ-मंडळाच्या पुढाऱ्यांच्या मनावर इतका विलक्षण प्रभाव पडूं लागला कीं, उलटसुलट सर्व अंगांनीं चिकित्सापूर्वक विचार केल्यावरही, त्यांच्या क्षुद्र मनोविकारांच्या तडाख्यांतून महाराष्ट्रांतील जनतेच्या मनांतील आपल्या ईश्वरी कार्याची ज्योत सदैव जागती ठेवण्यांत महत्त्वाचें अंग होतें ह्यांत शंका वाटत नाहीं. ही ऐतिहासिक व्यक्ति म्हणजे आंग्र्याचे, बाजीरावांचे आणि चिमाजी आप्पांचे, प्रत्यक्ष शाहूमहाराजांचे व इतर सहस्रावधि लहानथोर व्यक्तींचे गुरु ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर हे होत. ते निःसंशय देशभक्तीच्या उदात्त महनीय अशा भावनेनें आणि तत्त्वानें प्रेरित झाले होते आणि माजलेल्या मतमतांतराच्या गलबल्यांतून संपूर्ण जनतेच्या दृष्टीपुढें स्वधर्माचें आणि स्वराज्याचें ध्येय सतत धरून त्याचें नैतिक आणि आत्मिक महत्त्व त्यांच्या मनावर बिंबविण्यांत त्यांचा अतिशय उपयोग झाला. पूर्व वयामध्यें स्वामींनीं जपतपाचीं कष्टमय साधनें करून विलक्षण यौगिक शक्ति संपादन केल्या होत्या. प्रतिवर्षी ते एक एक महिना समाधिस्थ रहात आणि त्या कालांत आपल्याला भूमीखालीं पुरून घेत ! श्रीरामदासस्वामीप्रमाणें अखिल हिंदुस्थानभर त्यांनीं दूरवर प्रवास केला होता आणि सर्वभर दृग्गोचर होणाऱ्या हिंदूंच्या परावलंबित्वाच्या आणि राजकीय दास्याच्या हल्ल्यानें त्यांचीं आंतडीं पिळवटून गेलीं होतीं. त्यांच्या हृदयांत धगधगणाऱ्या देशभक्तीच्या निखाऱ्याचें एका प्रचंड आणि स्थायी वणव्यामध्यें रूपांतर होण्याला वाऱ्याच्या एका झुळकेचीच आवश्यकता होती. जंजिऱ्याच्या मुसलमानी राजसत्तेनें तिचा पुरवठा केला. शिद्दी म्हणजे मराठी राज्याचे कट्टे शत्रु. मराठ्यांची सत्ता अशीच प्रतिदिनीं वाढूं लागली तर आपण अन्यायानें बळकावलेलें कोंकणांतलें राज्य लवकरच आपल्याला सोडून द्यावें लागेल हें त्यांना समजून चुकलें होतें. म्हणून ह्या कोंकणपट्टीवरील भांडणांत ते नेहमीं

मराठ्यांच्या विरुद्ध इंग्रजांच्या, डचांच्या किंवा पुर्तुगीजांच्या पक्षाला मिळत व मराठी प्रांतावर धाड घालीत. आणि इतकेंच करून ते थांबत नसत. धर्मवेडानें भारलेल्या मुसलमानांतच आढळून येणाऱ्या रानटी क्रूरपणाचा अवलंब करून ते शतावधि हिंदु मुलांना आणि मुलींना पळवून नेत, त्यांचें बलपूर्वक धर्मांतर करून त्यांना मुसलमान बनवीत; हिंदूंचीं देवळें दिसतील तेथें तीं उध्वस्त करीत आणि त्यांच्या हातांत सांपडलेल्या हिंदूंवर वाटतील तसे अत्याचार करीत. अशाच एका धर्मवेडानें प्रेरित झालेल्या अत्याचाराला परशुरामाचें प्रसिद्ध मंदिर—स्वामींनीं ज्या पवित्र स्थळीं ध्यान-धारणा आणि तपस्या केली तें स्थान-बळी पडलें ! शिद्दयानें त्या देवळाचा एक एक दगड काढून टाकून देऊळ पाडलें. तेथल्या कोशागारांतील सर्व संपत्ति लुटून नेली आणि तेथील हातांत सांपडतील त्या ब्राह्मणांचा अत्यंत छळ केला. ह्या अत्याचारानें ब्रह्मेंद्रस्वामींच्या मनांतील सात्त्विक क्रोध कधींही शमन होणार नाहीं इतक्या प्रखरतेनें जागृत झाला; वाईट, चांगलें किंवा उभयविध अशा सर्वांविषयींच समान भावना ठेवावयाची ही जणुं काय हिंदु साधुसंतांना संवयच जडलेली आहे. वरील अत्याचारामुळें ही नेभळी आणि पोकळ वृत्ति स्वामींच्या मनांतून पार नाहींशी झाली. त्यांनीं आपलें सर्व आयुष्य हिंदु स्वातंत्र्याच्या युद्धाला साहाय्य करण्यांत आणि हिंदु संस्कृति प्रस्थापण्याच्या कार्यार्थ वाहून घ्यावयाचा निश्चय केला. स्वामींची त्या प्रांतांत इतकी प्रतिष्ठा होती कीं, प्रत्यक्ष शिद्दयाला सुद्धां त्यांना आपला नित्याचा शत्रु बनवावयाचें धैर्य होईना; त्यानें ह्यापुढें स्वामींना यत्किंचितही त्रास पोहोंच-णार नाहीं; त्यांनीं परशुरामक्षेत्रीं पूर्वींप्रमाणेंच वास्तव्य करावें अशी विनंति केली. पण स्वामींनीं उत्तर दिलें, "तूं देवा-ब्राह्मणांचा छळ केला आहेस, तुझ्या पापाचें योग्य प्रायश्चित्त तुला मिळाल्याविना राहावयाचें नाहीं !" प्रत्यक्ष आंग्र्यांनादेखील स्वामींचा राग शांत करून त्यांचे कोंकणांत राहाण्या-विषयीं मन वळवतां आलें नाहीं ! "ज्या भूमींत पाखंडी परकीयांचें राज्य आहे त्या भूमींत इतःपर मी पाण्याचा थेंबही प्राशन करणार नाहीं; मग राहाणें दूरच राहिलें, मी पुन्हा कोंकणांत परत येईन; पण तो ह्या अत्याचाराचा प्रतिशोध घेण्यासाठीं सज्ज झालेल्या हिंदुसैन्याच्या अग्रभागीं येईन." असें म्हणून स्वामी साताऱ्याला गेले; आणि तिकडे एकसारखा हिंदूंच्या अन्यधर्मी शत्रूंविरुद्ध—विशेषतः जंजिऱ्याच्या शिद्दीविरुद्ध आणि गोव्याच्या पुर्तुगीजां-

विरुद्ध—धर्मयुद्धाचा उपदेश करणें चालू केलें. त्यांचा पत्रव्यवहार आतां सामान्य वाचकांनाही उपलब्ध झाला आहे. त्यावरून मराठी राज्य स्वतंत्र करावयाचें, हिंदु धर्माच्या संरक्षणार्थ रणदेवींची आराधना करावयाची आणि काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेल्या अखिल हिंदूंचें गेलेलें राजकीय स्वातंत्र्य परत जिंकावयाचें ह्या त्रिविध निश्चयाच्या मराठ्यांचा चित्तांतील पवित्र अग्नि एकसारखा स्वामींनीं कसा निकरानें प्रज्वलित ठेवला हें चांगलें दिसून येतें.

छत्रपति शाहूमहाराज आणि श्रीमंत बाजीराव पंतप्रधान दोघेही स्वामींचे शिष्य होते. त्यांनीं शिद्यानें कोंकणपट्टींत केलेल्या अत्याचारांचा प्रतिशोध घ्यावयाचें ठरविलें आणि मराठयांचे दूत कोंकणांत शिद्दीविरुद्ध आणि पुर्तुगीजांविरुद्ध सर्वंभर युद्धाच्या उठावणीची भूमिका सिद्ध करण्यांत आणि कारस्थानें रचण्यांत निमग्न झाले. सांप्रत मराठयांना एकाच वेळीं दिल्लीपासून अर्काटपर्यंत पसरलेल्या सर्व विरोधी सत्तांशीं सामना द्यावा लागत होता, तेव्हां कोंकणांतल्या ह्या युद्धासाठीं योग्य संधीची वाट पाहात ते टपून बसले. इतक्यांत त्यांच्या दैवानें शिद्दीच्या मुलांत राज्याधिकाराविषयीं तंट्यांना प्रारंभ झाला आणि त्यांच्यापैकीं एकानें साहाय्यासाठीं मराठयांकडे धाव घेतली. मराठयांच्या तेथील पोतनिसानें साह्याच्या याचनेसाठीं पुढें केलेला हात हातांत धरला आणि मराठी राजकारस्थानानें आपलें कार्य पूर्णपणें पार पाडलें म्हणून शाहूमहाराजांना कळविलें. ही बरेच दिवस उत्सुकतेनें जिची प्रतीक्षा केली, अशी ती वार्ता कळतांच महाराज इतके उल्हसित झाले कीं, त्यांनीं एकदम बाजीरावांना पत्र लिहून आज्ञा केली, "पत्र देखील वाचूं नका! आधी घोड्यावर आरोहण करा आणि मग पत्र वाचा!" मराठयांच्या ह्या आक्रमणाला प्रारंभ(शके १६५५)इ.सन१७३३मध्यें झाला. मराठी सैन्यानें सह्याद्रि उतरून तळेंघोसाळयाचा गड हस्तगत केला आणि मुसलमानी सैन्याचा पराजयावर पराजय करीत शिद्दीचें सर्व राज्य आक्रमून टाकलें. लवकरच बाजीरावांनीं मारा चढवून रायगड परत घेतला. ह्या प्रसिद्ध गडावर शिवाजीमहाराजांची राजधानी होती; तेथेंच त्यांना राज्याभिषेक झाला होता. मराठी स्वातंत्र्ययुद्धाच्या प्रारंभाला इतके दिवस होऊनही अद्यापि तो यवनांच्याच हातांत होता. शिवाजीमहाराजांच्या राजधानीचें हें पुण्यक्षेत्र पुन्हा आपल्या हातांत आल्याची वार्ता ऐकून सर्व महाराष्ट्रभर आनंद झाला. तिकडे समुद्रावरही मराठी

भाल्यांना मिळालेला विजय अणुमात्र हीन नव्हता. मानाजी आंग्र्यांनीं शिद्द्यांच्या समुद्रयानांचा जलयुद्धांत पूर्ण मोड केला. मराठ्यांच्या ह्या वर्चस्वानें इंग्रजांनाही धास्ती वाटूं लागली आणि त्यांनीं प्रथम गुप्तपणानें पण पुढें पुढें उघडच शिद्द्याला शस्त्रें आणि दारूगोळा पुरवून साहाय्य केलें व शेवटीं कप्तान हाल्डेन ह्याच्या हाताखालीं मराठ्यांविरुद्ध लढण्यासाठीं बरेंच सैन्य पाठविलें. परंतु खंडाजी नरहर, खर्डे, मोडे, मोहिते आणि मथुराबाई आंग्र्यासारख्या स्त्रियांनींही एकसारखें व निकरानें युद्ध चालविलें. ब्रह्मेंद्रस्वामींशीं झालेला मथुराबाई आंग्र्यांचा पत्रव्यवहार वाचला म्हणजे ह्या विख्यात देशाभिमानी बाईंना परक्यांच्या सत्तेखालून हिंदुस्थानची भूमि सुटावी म्हणून किती तळमळ लागली होती आणि शत्रूंपासून परत जिंकून घेतलेल्या गडावर आणि नगरावर हिंदुध्वजा विजयभरानें फडफडतांना पाहून तिचें हृदय किती अभिमानानें भरून येई ह्याची कल्पना होते. ह्याप्रमाणें वर्षामागून वर्षें हें युद्ध चाललें. शेवटीं (चैत्र शु. ५ शके १६५८) इ.सन १७३६मध्यें चिमणाजीआप्पा स्वतः कोंकणांत आले आणि त्यांनीं रेवास येथें सर्व हबसाण सैन्यावर मोठा विजय मिळवून त्यांना निरस्त केलें; ज्यानें परशुरामाचें पवित्र मंदिर पाडून धुळीला मिळविलें होतें त्या हिंदूंच्या आरबी शत्रूचा, जंजिऱ्याच्या शिद्द्याचा, शिरच्छेद करण्यांत आला आणि अशा रीतीनें त्याला आपल्या पापाचें प्रायश्चित्त स्वतःचे प्राण देऊन भोगावें लागलें! त्या दिवशीं त्याच्या समवेत उंदेरीचा मुसलमानांचा सरदार आणि मुसलमानांच्या पक्षानें लढणारे अकरा सहस्र सैनिक लढतां लढतां मृत्युशय्येवर पडले!

सर्व कोंकण प्रांतानें, अखिल महाराष्ट्र देशानें, ज्यांनीं आपल्या धर्माच्या शत्रूंचा अशा रीतीनें त्याच्या अत्याचारासाठीं प्रतिशोध घेतला आणि हिंदुजातीच्या सन्मानाची प्रतिष्ठा केली त्या विजयी सेनापतीवर कृतज्ञ धन्यवादांचा वर्षाव केला. शाहूमहाराजांना अत्यंत आनंद झाला; त्यांनीं लिहिलें, "सादा सिद्दी हा दैत्य होता, केवळ रावणाचीच प्रतिमा. त्याला मारून आपण शिद्द्यांचें उच्चाटणच केलें आहे. तुमचा कीर्तिपरिमल सर्वत्र पसरो." तरुण चिमणाजीआप्पांना छत्रपतींनीं राजसभेंत बोलाविलें आणि त्यांच्यावर मानाच्या वस्त्रांचा आणि देणग्यांचा वर्षाव केला. ब्रह्मेंद्रस्वामींची झालेली स्थिति सांगावयालाच नको. ह्या युद्धाचे मुख्य चालक ब्रह्मेंद्रस्वामी! झगडा चालू असतांना जेव्हां जेव्हां आपसांतील चढाओढीमुळें किंवा मूर्खपणाच्या कलहामुळें

मराठ्यांच्या प्रयत्नांत शिथिलता आलेली दिसे तेव्हां तेव्हां आपल्या देशाविषयींच्या आणि धर्माविषयींच्या कर्तव्याची भावना त्यांच्या हृदयांत जागृत करून आणि त्यांनीं चालविलेल्या हिंदुस्वातंत्र्याच्या महनीय युद्धांतील नैतिक व आत्मिक स्वरूप नेहमीं त्यांच्या चित्तावर बिंबवून त्यांना आपल्या जागेवर स्थिर राखण्याचें कार्य ब्रह्मेंद्रस्वामींनीं केलें. त्या अपूर्व विजयास्तव परमेश्वराप्रत कृतज्ञता कशी दाखवावी किंवा उचंबळून गेलेल्या आपल्या वृत्ति ज्यांत पूर्णपणें प्रदर्शित झाल्या आहेत अशा कोणत्या शब्दांनीं आपल्या विख्यात शिष्याचे आभार मानावे हेंच त्यांना समजेना! परशुरामाची पवित्र भूमि परकीयांच्या पापस्पर्शापासून मुक्त करण्यांत, हिंदुधर्माचें कार्य सुरक्षित राखण्यांत, त्यांनीं शेवटीं यश मिळविलें!

## "शामलांची क्षिति केली. कोंकणांत धर्म राखिला!"

अशा रीतीनें शिद्दीची मस्ती जिरविली गेली आणि कोंकणपट्टींतलें मुसलमानी राज्याचें महत्त्व नाहींसें होऊन तें मराठी साम्राज्याच्या अंकित झालें. त्यामुळें ह्यापुढें पुर्तुगीजांना मराठ्यांशीं एकट्यानेंच झगडा करावा लागला. हिंदुस्थानांतील त्यांच्या हातांतील हिंदुस्थानचा प्रांत विशेष सायास न करतां त्यांना बळकावतां आला होता आणि खंबायतपासून सिंहलद्वीपापर्यंत संपूर्ण पश्चिमतीरावर त्यांना अप्रतिहत वर्चस्व प्राप्त झालें होतें. पण मराठे जागृत होऊन त्यांच्या सत्तेचा उत्कर्ष होऊं लागल्यापासून पुर्तुगीजांचें हें वर्चस्व संपुष्टांत यावयाला प्रारंभ झाला. त्यांनीं हिंदुस्थानांत केलेल्या धार्मिक छळाचें आणि धार्मिक अपराधाच्या नांवाखालीं केलेल्या अत्याचारांचें स्वरूप मुसलमानांच्या अत्याचारांपेक्षां कमी हिडीस नव्हते. युरोपांत ह्यासंबंधांत स्पेननें मिळविलेल्या यशाचीच पुर्तुगीजांच्या ह्या पराक्रमाशीं तुलना करतां येईल! ह्या धार्मिक छळानें आणि राजकीय परवशतेनें एक शतकपर्यंत अगदीं गांजून गेलेल्या हिंदुजनतेनें जेव्हां शिद्द्याच्या राज्यांतील आपल्या देशबांधवांनीं आणि धर्मबांधवांनीं आपल्या श्रृंखला तोडून टाकून ते स्वतंत्र नागरिकाच्या ताठपणानें संचार करूं लागलेले पाहिले तेव्हां स्वाभाविकच आपल्यालाही मुक्त करण्यासाठीं मराठी सैन्य केव्हां येईल इकडे त्यांची दृष्टि लागली. देशभक्तीच्या उत्साहाच्या आणि मराठ्यांच्या आगमनाविषयींच्या उत्कट उत्कंठेच्या लाटेनें अखिल हिंदूंचीं मनें हालून गेलीं आणि आपल्या हाताखालील कोंकण

प्रांतांतील सर्व हिंदूंना चिरडून टाकण्याचें पुर्तुगीज धर्मशिक्षालयाचे माथेफिरू प्रयत्न चालले होते. त्यांना गोमांतकांतील हिंदूंकडून नेटाचा प्रतिकार होऊं लागला. बाजीरावांना एकावर एक मिळत चाललेल्या विजयांनीं आणि अगदीं आपल्या राज्यमर्यादेशीं येऊन भिडलेला मराठी शस्त्रांचा खणखणाट ऐकून त्याच्या भीतीमुळें पुर्तुगीज अधिकच पिसाळून गेले. निराशेच्या योगानें उत्पन्न झालेल्या बुद्धिभ्रंशामुळें वज्रमुष्टीच्या बळानें हिंदुसंघटणाची चळवळ दडपून टाकावयाला आणि तिनें जागृत केलेल्या नवीन आशा व नवीन प्रतिकाराच्या वृत्ति चिरडून टाकावयाला पुर्तुगीजांनीं प्रारंभ केला. जुन्या लेखांत पुढील वर्णन आहे. "त्यांनीं हिंदु क्षेत्रपतींचीं विस्तीर्ण क्षेत्रें त्यांच्याकडून बलपूर्वक काढून घेतलीं, त्यांनीं संपूर्ण गांवेंच्या गांवें उरावर सुऱ्या रोखून बाटविलीं, त्यांनीं हिंदूंचीं पोरें पळवून नेलीं आणि आपला हिंदु धर्म सोडून द्यावयाचें ज्यांनीं नाकारलें त्यांना कारागृहात कोंडण्यांत आलें, जिवें मारण्यांत आलें किंवा त्यांस बाटविण्यांत आलें! त्यांच्या क्रोधाला बळी पडलेल्यांमध्यें ब्राह्मणांस साहजिकच पहिलें स्थान मिळालें. त्यांना त्यांनीं स्वतःच्याच घरांत बंदिवान् करून टाकलें. हिंदूंनीं आपला कोणचाही विधि सार्वजनिकरीत्या करणें अपराधकृत्य म्हणून गणलें जाऊं लागलें. एकाद्या हिंदूनें असा धार्मिक विधि करावयाचा धीटपणा दाखविलाच तर लागलाच त्याच्या घराला वेढा पडे, कुटुंबांतल्या सर्व माणसांस पकडण्यांत येई व त्यांना ख्रिस्ती करण्यासाठीं नाहीं तर त्यांचा वध करण्यासाठीं किंवा त्याहूनही वाईट म्हणजे त्यांना दास म्हणून विकण्यासाठीं धर्माच्या न्याय-लयांत पाठविण्यांत येई!" इतक्या अनिर्बंधतेनें हा छळ चालला असतांही पुर्तुगीज राज्यकर्त्यांच्या ह्या राक्षसी आज्ञा निश्चयानें मोडण्याचा हिंदूंनीं आपला क्रम चालविला. त्रयस्थ पुर्तुगीजांच्या क्रोधाला सहस्रावधि हिंदु बळी पडले. शेवटीं हिंदु जनसमाजाच्या पुढाऱ्यांनीं वसई व इतर गांवच्या देसाई-देशमुखांनीं-बाजीराव आणि शाहूमहाराज ह्यांच्याशीं गुप्त कारस्थानें करावयाला प्रारंभ केला आणि त्यांनीं आपल्याला मुक्त करण्यासाठीं युद्ध करावें, हिंदूंच्या स्वातंत्र्याची, धर्माची आणि देशाची प्रतिष्ठा प्रस्थापित करावी असा आग्रह चालविला. मालाडचे सरदेसाई अंताजी रघुनाथ कावळे हे शूर, लोकप्रिय आणि हिंदूंतले हिंदु होते. त्यांनीं हिंदूंनीं धार्मिक विधि करूं नये म्हणून पुर्तुगीजांची सुटलेली आज्ञा उघडपणें पायांखालीं तुडवली आणि आपल्या आश्रयाखालील मंडळींना तसें करण्याविषयीं प्रोत्साहन दिलें.

तेव्हां साहजिकच त्यांना पुर्तुगीजांच्या अत्याचाराला बळी पडावें लागलें. ते धरले गेले त्यांची जहागीर हिसकावून घेण्यांत आली आणि गोव्याच्या धर्मालयात प्राणान्तिक छळ सोसण्यासाठीं त्यांची पाठवणी झाली; पण अखिल हिंदुसमाजाच्या सुदैवानें त्यांना कारागृहांतून पळून जाण्यास यश आलें आणि ते पुण्याला सुरक्षित जाऊन पोहोंचले. त्यानंतर त्यांनीं तेथें एका गुप्त कटाची संघटना केली. मराठयांनीं पुर्तुगीजांच्या प्रांतांत प्रवेश केला कीं, लागलीच त्यांना तेथल्या मंडळीसह मिळावयाचें, मार्गदर्शकाचें काम करावयाचें व इतर सर्व रीतींनीं साहाय्य द्यावयाचें बाजीरावांना वचन दिलें आणि त्यांना सांगितलें कीं, पुर्तुगीजांच्या कोंकणांतील सर्व हिंदुप्रजा आपल्याला ह्या परधर्मीय शत्रूंचें दंडन करण्यासाठीं आपण अवतार घेतला आहे असें समजते आणि अधर्माच्या भारानें गांजलेली अवनी ज्याप्रमाणें आपल्या मुक्ततेसाठीं परमेश्वराची करुणा भाकते त्याप्रमाणें ती आपल्या आगमनाकडे आशापूर्ण दृष्टि लावून बसली आहे.

ह्या वेळीं उत्तरेकडे मोठमोठाले प्रश्न सोडविण्यासाठीं झगडे चालू झाले होते आणि दीर्घकाल चालणाऱ्या दिग्विजयांच्या थयथयाटानें बाजीराव त्रस्त होऊन गेले होते; तरीही कोंकणांतील परकीयांनीं पायांखालीं तुडवलेल्या देशबांधवांची आणि धर्मबांधवाची असली हृदयद्रावक विनवणी ऐकून स्वस्थ असणारे ते नव्हते. त्यांनीं ह्या वर्षीं पुण्याला पर्वतीं देवीचा उत्सव प्रतिवर्षापेक्षां विशेष मोठया प्रमाणांत करण्यांत येणार आहे असें प्रसिद्ध केलें; आणि त्या मिषानें अत्यंत त्वरेनें, गुप्ततेनें आणि उत्साहानें पुण्याला पुष्कळ मराठी सैनिक बोलावले. सेनानायक जमा होतांच प्रत्येकाला त्याचें त्याचें काम नेमून दिलें आणि पुर्तुगीजांविरुद्ध कोंकणावर करावयाच्या आक्रमणाची रूपरेखा आंखली. मुख्य सेनापतीच्या जागीं चिमाजीआप्पांची योजना झाली. अंताजी रामचंद्र, रघुनाथ रामचंद्र जोशी इत्यादि सेनानायकांची आणि कार्यकर्त्यांची त्यांच्या त्यांच्या जागीं सहवर्गी करण्यांत आली. शके १६५९ त मराठी सैन्यानें ठाण्याच्या दुर्गावर मारा चढविला. पुर्तुगीजांनीं शक्य तोंपर्यंत गड लढविला; पण शेवटीं त्यांना शरण जावें लागलें. ह्या प्रथम विजयाच्या शकुनानें आनंदित झालेल्या मराठी सैनिकांनीं साष्टी भरून गेली. शंकराजी केशवानीं अर्नाळ्याचा गड घेतला, जोश्यांनीं धारवि आणि पारसिक जिंकिले. या पिछेहाटीनें गोव्याच्या मुख्य अधिकाऱ्याला अत्यंत काळजी वाटूं लागली. त्यानें हा झगडा सारखा चालविण्यासाठीं अँटोनिओ नांवाच्या शूर सेनापतीची

नेमणूक केली. अगदीं पुर्‍या दमाच्या पुर्तुगीज सैन्याचें नवीन पथक युरोपमधून सुद्धां बोलावण्यांत आलें. तें साहाय्यला येऊन पोंचतांच अँटोनिओनें निकराच्या उठावणीला आरंभ केला आणि पुनः प्रत्यक्ष ठाणेंच जिंकून घ्यावयाचा व्यूह रचला. शूर मेड्रोमेलो ह्याच्या हाताखालीं ४००० पुर्तुगीज सैनिक ठाण्यावरून चालून जाऊन तें जिंकून घेण्यासाठीं निघाले पण ठाण्याच्या रक्षणार्थ राहि-लेल्या मराठी सैन्याचें आधिपत्यही कांहीं अप्रसिद्ध लोकांकडे नव्हतें. तेथें प्रत्यक्ष मल्हारराव होळकर होते. तेव्हां पुर्तुगीजांचा मारा आणि मराठ्यांचा प्रतिकार दोन्हीही दिगंतकीर्ति पसरविणारीं झालीं. अंतीं मराठ्यांनीं आपल्या तोफांच्या साहाय्यानें पुर्तुगीजांची अशी धुळधाण उडवून दिली कीं त्यांचें बल हळुहळू शिथिल होऊं लागलें. तें पाहतांच त्यांचा शूर पुढारी त्यांच्यात पुन्हां वीरश्री उत्पन्न करण्याचा प्रयत्न करूं लागला; इतक्यांत गडावरून मराठ्यानीं अचुक नेम धरून मारलेला तोफेचा गोळा तथें येऊन त्याला इहलोक सोडावा लागला. पुढारी मरतांच पुर्तुगीजांची दाणादाण झाली आणि पळून जाऊन त्यांनीं आपल्या नौकांचा आश्रय केला. आणखी एक निकराचें युद्ध करून मराठ्यां-नीं माहीमही घेतलें. आणि व्यंकटराव घोरपडे तर गोंव्याजवळील राखोड-पर्यंत चालून गेले. पुर्तुगीजांची सत्ता आतां शेष राहात नाहीं असें स्पष्ट दिसूं लागलें.

इतक्यांत नादीरशहाच्या आक्रमणाची वार्ता येऊन थडकली. भरतवर्षाला किंवा अगदीं बरोबर म्हणावयाचें म्हणजे ह्या वेळीं परकी टोळधाडीचा प्रति-कार करावयाला समर्थ असलेल्या मराठे ह्या नांवानें निर्देशिल्या जाणार्‍या एकमेव हिंदु सत्तेला ज्या भयंकर सकटांशीं तोंड द्यावें लागलें त्यांत हें सर्वांत मोठें संकट होतें. त्यामुळें पुर्तुगीजांना आयुर्मर्यादेचा साहजिकच नवीन हप्ता मिळाला. बाजीरावांनीं आपल्या गरुडासारख्या सर्वकंष दृष्टीपुढें सर्व परिस्थिति आणली आणि लिहिलें, "पुर्तुगीजांचें युद्ध आतां महत्त्वाचें नाहीं. ह्या वेळीं सर्व भारताला एकच शत्रु. हिंदुस्थानची सर्व शक्ति त्या शत्रूच्या विरुद्ध एकवटली पाहिजे. मी तरी माझे मराठे वीर नर्मदेपासून चंबळेपर्यंत सारखे पसरून देणार. मग पाहतों नादिरशहा कसा दक्षिणेकडे येतो तो !" त्यांनीं दिल्ली, जयपूर आणि उत्तर हिंदुस्थानांतील इतर संस्थानिकांच्या राज-सभेंत असलेल्या आपल्या प्रतिनिधींना नुसत्या मराठ-मंडळाचेंच नाहीं तर रजपूत, बुंदेले, मराठे आदिकरून अखिल हिंदु समाजाचें संयुक्त संघटण करण्या-

साठीं संदेश पाठविले. त्या वेळच्या मराठी मुत्सद्याचे पत्र आतां प्रसिद्ध झालें आहे. त्यांत दिल्लीची मुसलमानी पादशाही नित्याची काढून टाकावयाची आणि अखिल भारताच्या सिंहासनावर उदेपुरच्या महाराण्याची स्थापना करावयाची अशा प्रचंड हिंदुमय योजनेचा स्पष्ट उल्लेख आहे.

पण अशा रीतीनें मराठ्यांच्या प्रमुखाचें महत्त्वाकांक्षी मन इतरत्र असल्या हिंदु विजयाच्या मोठमोठाल्या योजनांचा विचार करीत होतें तरी बाजीरावाची साधनानुकूलता निर्माण करण्याची शक्ति इतकी मोठी होती कीं, इकडे दक्षिणेंत वसईला वेढा घालून पुर्तुगीजांशीं युद्ध करण्यासाठीं सैन्य पुरवावयाचें आणि तिकडे उत्तरेंत जाऊन नादिरशहाला दिल्लीहून घालवून लावतां येईल इतकें सैन्य पाठवावयाचें; ह्या दोन्ही गोष्टी त्यांनीं एकसमयावच्छेदेंकरून करून दाखविल्या. पुर्तुगीजांच्या लवकरच असें अनुभवाला आलें कीं, एवढ्या नादिरशहाच्या आक्रमणालासुद्धां त्यांचा गळा आंवळून टाकणारा मराठी हाताचा दाब यत्किंचितही शिथिल करतां आला नाहीं. आपल्या प्रांतांत पसरलेले सर्व बळकट गड एका मागून एक शत्रूच्या हातांत पडल्याच्या वार्ता—गोव्याच्या राजप्रतिनिधींच्या कानावर येऊं लागल्या. श्रीगांव, तारापुर, डहाणू हीं गांवें मराठ्यांनीं तोफांचा मारा करून घेतलीं आणि तेथल्या रक्षकसैन्याला आपल्या शस्त्रांचें पाणी दाखविलें. शेवटीं मराठ्यांनीं वसईला वेढा घातला. ह्या बळकट कोटावर ज्यांनीं मारा चढविला आणि ज्यांनीं तो लढविला, त्या उभयतांच्या पराक्रमाची वीररसोत्पादक कथा इतकी सर्वविश्रुत आहे कीं, ह्या त्रोटक निरीक्षणांत तिचें वर्णन करण्याची काहीं आवश्यकता नाहीं. ह्या सबंध प्रांतविजयांत मराठे अत्यंत निकरानें लढले. तो प्रसंग डोळ्यांनीं ज्यांनीं पाहिला त्यांनीं पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे. मोठमोठाल्या अधिकाऱ्यांनीही आपलें स्थान यत्किंचितही न सोडतां युद्धांत मरण स्वीकारलें. बाजीरावांवर सर्वांची प्राणापलीकडे निष्ठा. त्यांनीं दोष दिलेला सहन करणें कोणालाही शक्य नव्हतें. त्यांनीं आपले प्राण उधळून टाकले आणि लढतां लढतां समरभूमीवर शयन केलें. पुर्तुगीजांच्या बाजूलाही सेनापतीमागून सेनापतींनीं देहत्याग केला; पण शस्त्रत्याग केला नाहीं. मराठ्यांनीं मारा चढविला, पण चांगलीच हार खाऊन त्यांना परतावें लागलें. त्यांनीं पुनःपुन्हा मारे चढवले आणि दोन्हीही पक्षांचा भयंकर नाश होऊन त्यांना पुन्हा परत फिरावें लागलें. त्यांनीं स्वतः लावलेलेच सुरुंग केव्हां केव्हां

अकस्मात् उडून त्याच्या माऱ्यानें सैन्यांतील शतावधि लोक छिन्नविच्छिन्न झाले; पण राष्ट्रीय मानभंगाचा वचपा काढण्यासाठीं बद्धपरिकर झालेल्या आणि पुऱ्या चिकाटीच्या मराठ्यांनीं प्रयत्न सोडला नाहीं. त्यांनीं एकंदर अठरा मारे चढविले; पुर्तुगीजांनींही त्यांना अठरा वेळां मागें परतविलें. पण प्रत्येक माऱ्याला ते अधिकाधिक क्षीण होत चालले. दिवसामागून दिवस हा वेढा असाच चालू राहिला. नादीरशहा आला आणि परतही गेला; पण वेढा चालूच होता आणि वसई अजून शत्रूंच्याच हातांत होती! शेवटीं निराशेच्या त्वेषानें चिमाजीआप्पांनीं गर्जना केलीः “ पहा, मला वसईमध्यें प्रवेश हा केलाच पाहिजे. आज मी जिवंत असतांना जर तुमच्याकडून गडांत प्रवेश झाला नाहीं तर उद्यां माझें डोकें तोफेच्या तोंडांत देऊन तें कोटावरून आंत उडवा ! म्हणजे निदान मेल्यावर तरी गडांत माझा प्रवेश होईल.” हे अदम्य शौर्याचे उद्गार ऐकून त्यांच्या हाताखालील सैन्याचा उत्साह शतपट वाढला आणि त्यानें प्रयत्नांची पराकाष्ठा केली. आतां वसईचें दैव ठरून गेलें. कोटाच्या भिंती चढून जाण्यासाठीं मानाजी आंग्रे, मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे एकमेकांशीं स्पर्धा करूं लागले. इतक्यांत भिंतींत लावलेला मराठ्यांचा एक सुरुंग उडाला आणि त्याच्या योगानें पुर्तुगीजांच्या तटबंदीचा एक महत्त्वाच्या भाग कोसळून खालीं पडला. अतुल धैर्यानें त्या स्फोटाच्या जागीं मराठ्यांनीं उडी घेतली आणि तें भगदाड त्यांनीं ठाम धरून ठेवलें. पुर्तुगीजांच्या सिंहपराक्रमाची दोन्ही गोलार्धांत कीर्ति झाली होती. पण त्या पराक्रमाची सीमा करूनही मराठ्यांनीं धरून ठेवलेल्या जागेवरून पुर्तुगीजांना त्यांना ढळवतां आलें नाहीं. ह्यापुढें मराठ्यांचा प्रतिरोध करणें पुर्तुगीजांना अशक्य झालें. मराठ्यांनीं शत्रुसैन्यांतील दुर्गरक्षकांवर तोफांचा मारा इतका निकराचा आणि अचुक चालू ठेवला कीं, दीर्घ कालापासून अपेक्षिलेलें पर्यवसान घडावयाची वेळ लवकरच आली. पुर्तुगीज शरण आले आणि आजपर्यंत झालेल्या हिंदुधर्माच्या आणि जातीच्या छळाच्या छातीवर मराठी विजयध्वजा नाचवीत वसईवर नेऊन रोवण्यांत आली; आणि सर्व महाराष्ट्राच्या आनंद-गर्जनांनीं विश्व दुमदुमून गेलें.

आतां बहुतेक कोंकण स्वतंत्र झालें होतें. ह्या आघातामुळें पुनः पुर्तुगीज-सत्तेनें डोकें वर काढलें नाहीं. मराठ्यांना ह्यानंतर इतर स्थळीं महत्त्वाच्या कामांत पूर्ण गुंतून राहावें लागल्यामुळें गोव्याला ती सत्ता कशी तरी जीव धरून

राहिली, इतकेंच, एके काळीं गुडहोपच्या भूशिरापासून पूर्वेस पीतसमुद्रापर्यंतच्या जलसंचयावर स्वामित्व चालवीत असलेल्या पुर्तुगीज सत्तेला भूमीवर आणि समुद्रांत असा मार दिला कीं, पुनः हिंदु जातीविरुद्ध डोकें उचलणें तिला नित्याचें अशक्यच झालें.

ह्याप्रमाणें ज्यांच्याविषयीं शतकानुशतकें हे जणुं काय आपल्यावर राज्य चालविण्यासाठींच जन्मास आले आहेत आणि त्यांच्या दास्याखालींच जीवन वाहणें आपल्या ललाटीं लिहिलें आहे अशी कल्पना होऊन बसली होती ते हिंदूंच्या धर्माचे आणि देशाचे छलक आणि शत्रु, मराठ्यांच्या पुढें नतशीर्ष झाले. आपल्या ह्या वीरांच्या पराक्रमाचीं महत्कृत्यें पाहिल्याबरोबर सर्व हिंदूंना किती उसंत वाटला असेल व राष्ट्रीय श्रेष्ठत्वाच्या भावनेनें, बलानें आणि विजयी अभिमानानें त्यांचीं अंतःकरणें कशीं भरून गेलीं असतील ह्याची कोणालाही कल्पना करतां येईल. आज कित्येक शतकें पुर्तुगीजांच्या सत्ते-खालील कोंकणांतील हिंदूंनीं अप्रतिहत उभी राहिलेली हिंदुध्वजा बघितली नव्हती आणि स्वतः न मोडतां जिनें परकी अत्याचारांचें आणि उद्धटपणाचें डोकें फोडून टाकलें आणि त्यांच्या धर्मावर आणि त्यांच्या राष्ट्रावर केलेल्या अन्याया-चा प्रतिशोध घेतला अशी हिंदूंच्या कार्याच्या बचावासाठीं उपयोगांत आणली असतांही अनाहत राहिली अशी हिंदु असिलता बघितली नव्हती! तेव्हां ब्रह्मेंद्रस्वामींना ह्या दैदीप्यमान विजयाची वार्ता कळविणाऱ्या लेखकानें म्हटलें तें योग्यच होतें. “असला पराक्रम, इतकी चिकाटी आणि हा विजय ज्या काळीं आपल्या पृथ्वीवर प्रत्यक्ष देव येऊन वास करीत असत त्या काळांतलीं हीं कृत्यें आहेत! हा विजयी दिवस डोळ्यांनीं पाहाण्यासाठीं जे जिवंत राहिले त्यांचें भाग्य श्रेष्ठ. आणि हा विजय घडवून आणण्यासाठीं धारातीर्थीं ज्यांनीं देहदान केलें त्यांचें भाग्य त्याहून श्रेष्ठ!”

---

3५५(

## प्रकरण १० वें

# नादीरशहा आणि बाजीराव

" बघूं नादीरशहा कसा पुढें येतो तो ! " —बाजीराव.

कोंकणांतले हे विजय तर उज्ज्वल होतेच; पण मराठी भाला इतक्याच उज्ज्वलतेनें इतरत्रही यशस्वी होत होता. गुजराथ, माळवा व बुंदेलखंड हे प्रांत जिंकून त्यांची सुव्यवस्था लावल्यानंतर आणि अशा रीतीनें हिंदु साम्राज्याची सत्ता चंबळेपर्यंत नेऊन भिडविल्यानंतर तेथेंच नित्याचा विश्राम घेणें बाजीरावांना शक्य नव्हतें. आपल्या विस्तारामध्यें संपूर्ण भरतखंडाचा समावेश करील असें सुसंघटित हिंदु साम्राज्य निर्माण करणें हें त्यांचें ध्येय होतें. हिंदु धर्माच्या शत्रूंच्या धर्मबाह्य आणि परकीय स्पर्शानें हिंदूंच्या सर्व धर्मक्षेत्रांना लागलेला कलंक धुऊन टाकून तीं स्वतंत्र झालेलीं पाहाणें ही त्यांना तळमळ लागली होती.

तेव्हां केवळ कोंकणप्रांतांतील पवित्र परशुराम क्षेत्राची मुक्तता केल्यामुळें त्यांच्या कार्याची परिसमाप्ति होणें शक्य नव्हतें. अद्यापि काशी, गया, मथुरा, हीं सर्व तीर्थस्थानें मुसलमानी धर्मवेडानें आणि वर्चस्वानें पिडून गेलीं होतीं; म्हणून स्वत: बाजीराव आणि त्यांचे मराठी सेनानायक यांनीं नाशिक आणि पंढरपूर ह्यांच्या संबंधांत जितक्या अविश्रांत चिंतेनें आणि कळकळीनें प्रयत्न केला तितक्याच कळकळीनें आणि चिंतेनें हीं पवित्र क्षेत्रें मुक्त करण्यासाठीं पुनःपुन्हा युद्ध करतांना आपल्याला आढळतात. कोंकणांत मराठ्यांना समुद्रावर आणि भूमीवर बलिष्ठ बहुसंख्य शत्रूंशीं युद्ध करावें लागत होतें, तरी त्यांनीं घाबरून न जातां बाजीरावांनीं दिल्लीच्या बादशहाला धमकी दिली, कीं काशी, गया, मथुरा आणि इतर हिंदूंचीं पवित्र क्षेत्रें मुक्त करण्यासुद्धां आमच्या सर्व मागण्या मान्य केल्या नाहींत, तर आम्ही प्रत्यक्ष दिल्लीवर चाल करून येणार. त्याबरोबर दिल्लीचे सर्व पुढारी भीतीनें घाबरून गेले. आणि त्यांनीं आपलें सर्व बळ एकत्र करण्याची पराकाष्ठा केली. मुसलमानांचे बावीस सेनापति ह्या एकट्या हिंदु बंडखोरावर चालून गेले आणि त्यांना तरीही जेव्हां मराठ्यांच्या विरुद्ध प्रत्यक्ष जय मिळवून दाखवितां येईना तेव्हां त्यांनीं आपल्या मनाचें समाधान करून घेण्यासाठीं काल्पनिक विजय निर्माण

केले आणि बादशहाला त्यांचीं अतिशयोक्तिपूर्ण वर्णनें लिहून पाठवून एका कधीं न झालेल्या मोठ्या युद्धांत बाजीरावांना पूर्णपणें चुरडून टाकलें आहे आणि मराठ्यांचा इतका धुव्वा उडविला आहे कीं, उत्तरेंत मराठी सैन्याचें नांवही ऐकूं येत नाहीं, अशी वार्ता पाठवून दिली! तें पत्र वाचून बादशहा आनंदानें भान विसरून गेला आणि त्यानें दरबारच्या मराठी प्रतिनिधीला उर्मटपणानें घालवून देऊन सर्व नगरभर ह्या अद्वितीय विजयाप्रीत्यर्थ उत्सव करण्याची आज्ञा केली.

दिल्लींतील ह्या घडामोडींचा वृत्तान्त जेव्हां बाजीरावांच्या कानीं आला तेव्हां त्यांच्या चर्येवर निष्ठुर हास्य चमकलें आणि त्यांच्या तोंडांतून उद्गार निघाले, " बरें तर! मी माझे मराठे वीर प्रत्यक्ष दिल्लीच्या वेशीपर्यंत घेऊन जाईन आणि मुसलमानी बादशहाला त्याच्या जळत्या राजधानीच्या हाहाःकारपूर्ण उजेडांत आमचें उत्तरेकडलें अस्तित्व प्रत्यक्षच दाखवून देईन!" आणि त्यांनीं हें आपलें वचन पाळलें! संताजी जाधव, तुकोजी होळकर, शिवाजी आणि यशवंतराव पवार, ह्यांना घेऊन लवकरच ते दिल्लीच्या वेशीवर धक्के देऊं लागले! बादशहाचा सर्व भ्रम फिटून त्यानें बाजीरावांवर स्वतःच्या बादशाही सैनिकाच्या तुकड्यांवर तुकड्या पाठविल्या; पण त्या सर्व मराठ्यांचा मार खाऊन परत आल्या. शेवटीं आतां आपला जीव वांचत नाहीं हें पाहून त्या मूर्खाला मराठ्यांचा पूर्ण नाश झाला ह्या वार्तेवर विश्वास ठेवणाऱ्या भोळसरपणाचें मूल्य द्यावें लागलें. मराठ्यांच्या पराक्रमाच्या भरतीची लाट थेट दिल्लीच्या द्वारावर जाऊन आदळली आणि उघड सामन्यांत तिनें ती हादरून सोडली, असा हा पहिला प्रसंग. मराठी सैन्याला उत्तरेकडे आलेलें हें यश निजामाला सहन झालें नाहीं. तो बरोबर ३४००० सैन्य आणि हिंदुस्थानांतील त्या वेळचा सर्वोत्कृष्ट तोफखाना घेऊन त्वरेनें निघाला आणि सिरोंजपर्यंत चालून आला. तेथें रजपुतांनाही मराठ्यांच्या विरुद्ध त्याला मिळणें योग्य वाटलें! पण बाजीराव तितक्यांतच त्यांचा पाठलाग करीत तेथें येऊन पोंचले आणि आपल्या उत्कृष्ट युद्धकौशल्यानें आणि शौर्यानें त्यांनीं पुन्हा एकदां आपण ह्या दुष्ट मराठ्यांच्या हातांत पूर्णपणें सांपडलों आहों असें निजामाच्या अनुभवाला आणून दिलें. मराठ्यांच्या सतत आणि निकराच्या माऱ्यामुळें निजामाला पुन्हा भोपाळच्या भिंतीच्या मागें आपल्याला कोंडून घ्यावें लागलें. त्यानें आपल्या थकून गेलेल्या सैन्यांत उत्साह भरण्याचा



नादीरशहा.

Lakshmi Art, Bombay, 8.

आणि कोटाच्या बाहेर पडून फळी फोडून जाण्याचा पुनःपुन्हा प्रयत्न केला पण प्रत्येक डावांत बाजीरावांनीं आपल्या वरचढ युद्धकौशल्यानें आणि चपळाईनें त्याला इतक्या पूर्णपणें हटाविलें आणि त्याच्या रजपूत व मुसलमानी दोन्ही सैन्यांना इतक्या पूर्णपणें वेढून टाकून चोप दिला आणि उपासमार करून वठणीवर आणलें कीं, त्या धुरंधर मुसलमानी सेनानायकाला बाजीराव सांगतील तशा संधिपत्रावर स्वाक्षर करून द्यावें लागलें.

पण ह्याच वेळीं मुसलमानांनीं केलेला एक मोठया कटाचा प्रयत्न यशस्वी झाला आणि नादीरशहा सिंधूनद ओलांडून हिंदुस्थानांत आला. आपल्या मरणोन्मुख झालेल्या पातशाहीमध्यें पुन्हा चैतन्य घालण्याची मुसलमानांची आशा भरारूं लागली. निजाम आणि इतर औरंगजेबाच्या परंपरेंत वाढलेले मुसलमानी सरदार यांनीं ह्या परक्या शत्रूचें बंधुभावानें स्वागत केलें. त्यांच्या मनांतली आशा कीं, दुर्बल बनलेल्या मोगलांना जें साधतां आलें नाहीं तें ह्याला तरी साधतां येईल. त्यांना वाटत होतें कीं, नादीरशहा हातांत समर्थ राजदंड धारण करून मराठ-मंडळाच्या वाढत्या हिंदु सत्तेवर बलपूर्वक घाव घालील आणि पुन्हा एकदां मुसलमानी साम्राज्याला आपल्या पूर्वीच्या शक्तीच्या आणि वैभवाच्या शिखरावर नेऊन बसवील; आणि हें सर्व असेंच घडून आलें असतें. पण बाजीरावांच्या नेतृत्वाखालीं एकत्रित झालेल्या हिंदूंनीं ह्या अमानुष परकीयाच्या पुढारीपणाखालीं एकत्र झालेल्या संयुक्त मुसलमानी बळाला इतक्या निर्भयतेनें प्रतिरोध केला आणि तोंड दिलें कीं, तें सर्व कल्पनेंतच राहिलें.

राष्ट्राच्या प्राणाशीं आलेल्या ह्या आणीबाणीच्या प्रसंगानें भयभीत किंवा निरुत्साह न होतां बाजीरावांची आकाशसंचारी प्रतिभा अधिकच उंच आकांक्षांचीं उड्डाणें घेऊं लागली. नादीरशहाचें हें आक्रमण म्हणजे मराठयांना शतकांचा इतिहास तितक्या वर्षांत निर्माण करावयाची आलेली अमूल्य संधि आहे असें त्यांना वाटलें. उत्तर हिंदुस्थानांतील निरनिराळ्या राजसभेंत असलेले त्यांचे हस्तक हेही सर्व कर्तृत्ववान् होते. मराठयांच्या प्रसिद्ध सेनापतींनीं जितक्या उत्साहानें चोहोंकडे दृष्टि ठेवली आणि जितक्या कौशल्यानें, साम्राज्यभावनेनें व परिणामकरतेनें रणांगणावर मराठी सेनांची हालचाल केली तितक्याच तत्परतेनें मराठ्यांच्या वकिलांनीं सर्व घडामोडींवर दृष्टि ठेविली आणि तितक्याच कौशल्यानें व कर्तव्यानें मुत्सद्द्यांचीं मंडळें हालवलीं.

पवार, शिंदे, गुजर, आंग्रे इत्यादि मराठी सेनानायकांनीं जितके महत्त्वाचे विजय रणांगणावर संपादन केले तितकेच महत्त्वाचे विजय व्यंकोजीराव, विश्वासराव, दादाजी, गोविंद नारायण, सदाशिव बाळाजी, बाबुराव मल्हार, महादेव भट, हिंगणे इत्यादि मुत्सद्द्यांनीं मंत्रगृहांत मिळविले !

वस्तुतः ह्या मराठी मुत्सद्द्यांनींच हिंदु स्वातंत्र्याच्या महनीय प्रयत्नाच्या ध्येयांची आणि राजधोरणाची परंपरा अत्रुटित राखली आणि कौतुकास्पद कौशल्यानें मराठी सेनापतींना यशस्वी आक्रमणासाठीं भूमिका निष्पन्न करून ठेवली. ह्या प्रसिद्ध आणि बुद्धिवान् मुत्सद्द्यांचीं पत्रें आणि राजधानीस पाठविलेले राजलेख आतां मुद्रित झाल्यानें सर्वांना ते सुसाध्य झाले आहेत. त्यांचा अभ्यास करणाऱ्या वाचकांच्या मनावर, अखिल हिंदु जातीच्या राजकीय स्वातंत्र्याच्या अक्षय संरक्षणार्थ प्रचंड कोटाप्रमाणें उपयोगी पडेल असें सुसंघटित हिंदु-साम्राज्य प्रस्थापित करण्याच्या एकमेव आणि जगड्व्याळ हेतूनें मराठ्यांच्या वकिलांनीं, मुत्सद्द्यांनीं, सैनिकांनीं आणि नाविक वीरांनीं कल्पिलेल्या आणि करून दाखविलेल्या योजनांचें, आशांचें आणि प्रचंड प्रयत्नांचें भव्य स्वरूप विंबल्याविना राहणार नाहीं. हिंदूंचा हा बेत मोडून टाकण्याच्या उद्देशानें, औरंगजेबाच्या हाताखालीं शिक्षण संपादलेल्या आणि ज्यांच्या डोळ्यांत हिंदूंची ही वाढती सत्ता सलत होती अशा मुसलमानी पुढाऱ्यांनीं नादिरशहाला हें आमंत्रण दिलें होतें आणि त्यांचें ह्या परकी आक्रमणाला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष साहाय्य होतें.

पण लवकरच नादिरशहाला आढळून आलें कीं, शके १६६० माघ व शके १६६१ चैत्र (इ. सन १७३९ फेब्रुवारी एप्रिल) मध्यें आपल्याला ज्या हिंदुसत्तेशीं तोंड द्यावें लागणार आहे तिचें स्वरूप (इ.सन ११२०-११२४) शके १०४२–१०४६ मध्यें गझनीच्या महमुदाला ज्या हिंदु राजांशीं लढावें लागलें त्याच्यापेक्षां अतिशय भिन्न आहे. परकीय राजकारणांत, मुत्सद्दीपणांत, देशभक्तीच्या उत्कटतेंत आणि सर्वांहून विशेष म्हणजे सामरिक सामर्थ्यांत व संघटनेंत–केवळ स्वार्थत्याग करण्याच्या तत्परतेंतच नाहीं तर ज्या रीतीनें आणि ज्यावेळीं तो स्वार्थत्याग शत्रूवर प्रचंड आघातानें उलटून पडेल आणि पीडितांपेक्षां छलकांनाच अधिक हानिकारक होईल अशा रीतीनें आणि अशा वेळींच तो स्वार्थत्याग करण्याच्या कौशल्यांत–ह्या सर्व गुणांत ज्या वेळेपासून मराठ्यांनीं आपल्या धर्माच्या आणि देशाच्या नांवानें एकराष्ट्र म्हणून उठावणी केली

आणि ती करतांना आपण श्रीरामाची आणि श्रीकृष्णाची इच्छा पूर्ण करीत आहों अशा दृढ भावनेनें ते लढूं लागले, त्या वेळेपासून तरी महाराष्ट्रांतले हिंदु मुसलमानांच्यापेक्षां वरचढ आहेत हें सिद्ध झालें होतें. कोणाही नादीरशहाचें त्यांना भय वाटणें शक्य नव्हतें. "तहमास्पकुलीखान (नादीरशहा) कांहीं देव नाहीं, जें पृथ्वी कापून काढील ! जबरदस्ताशीं सुलुख करील, म्हणून मातबर फौजेनिशीं यावें. आधी जबरदस्ती व मग सुलुख. आतां सारे रजपूत व स्वामी ( बाजीराव ) एक जागा झालीया निकाल पडेल. समस्तांस बुंदेले वगैरे एक जागा करून मोठा भाव दाखविला पाहिजे. नादीरशहा माघारा जात नाहीं. हिंदुराज्यावरी निघेल. रायाचे ( सवाई जयसिंग ) मनीं राणाजींस ( उदेपुरचा महाराणा ) तख्तावर बसवावें असें आहे हिंदु राजे सवाई आदिकरून स्वामींचे स्वारीची मार्गप्रतीक्षा करतात. स्वामींचें पुष्टिबल होतांच जाट वगैरे फौज दिल्लीवरी पाठवून सवाईजी आपण दिल्लीस जाणार—"

अशाच भावनांनीं भरलेलीं पत्रें मराठी हस्तकांनीं आणि राजकारणधुरंधरांनीं बाजीरावांना पाठविलीं. वसईचा गड अद्याप लढतच होता. मराठ्यांच्या सेनेची कर्नाटकापासून कटक आणि अलाहाबादपर्यंत स्थलीं स्थलीं मोठमोठालीं युद्धें चाललीं होतीं. पण तरीही बाजीरावांनीं क्षणमात्र मागेंपुढें केलें नाहीं किंवा आपल्या हस्तकांनीं उत्तर हिंदुस्थानांतल्या हिंदूंच्या मनांत ज्या प्रबळ आशा उत्पन्न केल्या होत्या आणि जो मोठा भार त्यांनीं शिरावर घेतला होता त्यांत त्यांना यत्किंचितही निरुत्साह केलें नाहीं. इतर मंत्रिमंडळांचे आणि सहकाऱ्यांचे, प्रसंग कसा निभावेल, असे अविश्वासाचे उद्गार कानावर येतांना ते म्हणाले, "वीरहो, विचार करीत आणि शंका घेत काय बसलांत ! एकीनें चाल करून निघा, हिंदुपदपादशाहीचा दिवस उगवलाच म्हणून समजा ! मी तर नर्मदा उतरून सर्व मराठी सैन्य चंबळेपर्यंत पसरून देणार. मग पाहूं या नादिरशहा कसा खालीं येतो तो !"

मराठ्यांच्या ह्या प्रतिशोधाच्या दृढ निश्चयामुळेंच भारतविजयार्थ निघालेल्या इराणी शहाची हिंदूंच्या विरुद्ध असलेली महत्त्वाकांक्षा गारठून मरून गेली. नादिरशहानें बाजीरावांना 'महंमदी धर्माचे अभिमानी' संबोधून, त्यांनीं दिल्लीच्या मोगल बादशहाच्या आज्ञेंत राहावें नाहींतर जे ही आज्ञा मोडतील त्यांना भयंकर शासन करण्यांत येईल' अशा आशयाचें लांबलचक

आणि मूर्खपणाचें पत्र लिहिलें आणि शहाणपणानें आपला पाय मागें काढला! नादीरशहानें मराठ्यांना लिहिलेल्या ह्या आज्ञापत्राला केराच्या टोपलींत स्थान मिळालें आणि मराठ्यांच्या शाहू छत्रपतींनीं शके १६६१ मध्यें भरविलेल्या राजसभेंत 'मराठ्यांच्या भीतीनें नादिरशहा हिंदुस्थानांतून पळून गेला' अशी घोषणा केली!

नादिरशहानें एकाएकीं केलेल्या ह्या परागमनानें निजामाची 'अतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः' अशी स्थिति झाली. नादिरशहाच्या हिंदुस्थानाविरुद्ध केलेल्या बेतांत त्यानें भाग घेतला आणि भोपाळला केलेल्या संधीच्या अटी बरोबर पाळल्या नाहींत म्हणून त्याला पुरी शिक्षा लावण्यासाठीं मराठे दिल्लीकडे चाल करून गेले. पण इतक्यांत शके १६६२ वैशाख शु. १२ ला (ता. २७-४-१७४०) मराठ्यांच्याही सर्व रणधुरंधरांत प्रमुख अशा बाजीरावांचा अंत झाला!!

हिंदु-स्वातंत्र्याच्या महत्कार्याच्या पुरस्काराकरितां कोणाही पुरुषानें बाजीरावापेक्षां अधिक मनोभावानें आणि अधिक यशस्वितेनें प्रयत्न केलेले नाहीत! बालवयांतच आपल्या जातीच्या आणि धर्माच्या शत्रूंच्या विरुद्ध त्यांनीं आपली तरवार बाहेर काढली, ती पुन्हा मरणाच्या घटकेलाही कोशबद्ध केली नाहीं! त्यांनीं हिंदु जातीच्या शत्रूवर आपलें सैन्य घेऊन जावयाचें कार्य प्रत्यक्ष करीत असतां शिबिरांत देह ठेविला! शिद्दीवर किंवा रोहिल्यांवर, मोगलांवर किंवा पुर्तुगीजांवर केलेल्या निरनिराळ्या दीर्घकालीन आणि दुःसाध्य आक्रमणांत पराजयानें त्यांना केव्हांही स्पर्श केला नाहीं! हिंदुपदपादशाहीचें महदुद्देश शक्य तितक्या त्वरेनें साध्य करण्यासाठीं त्यांना जे जिवापाड अतिमानवी प्रयत्न करावे लागले त्यांच्यामुळें त्यांना अकालीं मरण आलें. नादिरशहाच्या दहा आक्रमणांनीं देखील कधींही बसला नसता इतका मोठा धक्का बाजरीावांच्या अकालीं निधनानें हिंदूंच्या कार्याला बसला!

---

# प्रकरण ११ वें

## नाना आणि भाऊ

दशरथ देउनि राज्यश्रीसी रामलक्ष्मणांचिया करीं
प्रभात तारा देउनि जाई कांति आपुली सूर्यकरीं।
तशीच बाजीरायें हिंदु-स्वातंत्र्याची ध्वजा दिली
या नरवीरा नानांच्या या भाऊंच्या दुर्दांत करीं ॥

—महाराष्ट्रभाट.

बाजीराव मरण पावले; पण त्यांनीं आपल्या देशबांधवांच्या ठिकाणीं उत्पन्न केलेली स्फूर्ति मरणें शक्य नव्हतें. तिनें त्यांना त्यांच्या नवीन पुढाऱ्यांच्या—बाजीरावांचे पुत्र बाळाजी म्हणजे नानासाहेब आणि वसईचे विजेते चिमाजीआप्पांचे पुत्र भाऊसाहेब ह्यांच्या नेतृत्वाखालीं अधिक कठीण प्रयत्न करण्यासाठीं आणि अधिक महत्कार्य संपादण्यासाठीं उत्साहित केलें. बाळाजीपंतांचें वय ह्या वेळीं केवळ १९ वर्षांचें होतें. पण एवढ्या वयांतही त्यांनीं आपल्या बापाच्या हाताखालीं काम केलें होतें आणि मराठ्यांसारख्या पराक्रमी लोकांचें पुढारीपण चालविण्याची आपली योग्यता सिद्ध करून दाखविली होती. तेव्हां गुणांचा परामर्ष करावयाला नेहमीं तत्पर असलेल्या शाहूमहाराजांनीं यत्किंचितही अनमान न करतां ह्या तेजस्वी तरुणाची मराठी साम्राज्याचे पंतप्रधान मुख्य पेशवे म्हणून त्यांच्या वडिलांच्या जागीं नेमणूक केली. वस्त्रदानाचा समारंभ अतिशय ऐश्वर्यपूर्ण आणि गंभीर झाला. तो आटोपल्यावर महाराजांनीं आपल्या तरुण प्रधानांना एक आज्ञापत्र दिलें. त्यांत जें प्रत्यक्ष स्वरूपांत आणण्यासाठीं महाराष्ट्रांतल्या ह्या वेळच्या प्रचंड प्रयत्नांची पराकाष्ठा चालली होती त्या महाध्येयाचें जणुं हृदयच कांहीं स्फूर्तिदायक वाक्यांत ग्रथित केलें आहे. आज्ञापत्रांत शाहुमहाराज लिहितात: "तुमचे पूज्य तीर्थरूप बाजीराव स्वामी ह्यांनीं अत्यंत निष्ठेनें गादीची सेवा केली आणि अघटित गोष्टी घडवून आणल्या. हिंदु राज्याची मर्यादा हिंदुस्थानच्या शेवटच्या सीमा प्रांतापर्यंत वाढविण्याचा त्यांचा हेतु होता. तुम्ही त्यांचे सुपुत्र आहां. त्यांचे हेतु तुम्ही सिद्धीस न्या, त्यांचें ध्येय गांठा आणि मराठयांच्या घोडयांना अटकेच्या पैलतीराचें पाणी पाजा!"

ही राजाज्ञा शिरोधार्य समजून भाऊंनीं आणि नानांनीं मरणापर्यंत आणि मरण पत्करूनही शिवाजीमहाराजांनीं आरंभिलेल्या ह्या कार्यावर यशाचा कळस चढविण्यासाठीं प्रयत्न केला. हिंदुपदपादशाही म्हणजे त्यांच्या बाल्यांतलें स्वप्न—त्यांच्या तारुण्यांतली महत्त्वाकांक्षा होती. तिच्यासाठीं प्रयत्न करणें, समर चालविणें आणि मरण पत्करणें म्हणजे त्यांच्या आवडीचें कार्य होतें. शाहूमहाराजांनीं आपल्या बालपणांतील बंदिवासांतला सर्व काळ मधून मधून लाभणाऱ्या बादशाही कृपाकटाक्षांनीं सुसह्य करीत काढला होता. त्यामुळें त्यांना अद्यापिही दिल्लीच्या मोगल बादशहाविषयीं कधीं कधीं जे निष्ठेचे आणि आदराचे उमाळे येत ते देखील नानांना आणि भाऊंना सहन होत नसत!

वस्त्रदानाचा समारंभ संपल्याबरोबर शाहूमहाराजांनीं बाळाजीपंतांना पुण्याला जावयाची आज्ञा केली आणि रघूजी भोसल्याची दक्षिणच्या (कर्नाटक) आक्रमणावर योजना केली.

मोगलांच्या बंदिवासांतून शाहूमहाराज सुटून आल्यावर मराठ्यांमध्यें जें आपसांतलें युद्ध प्रारंभ झालें त्याची संधि साधून, सादतअली नांवाच्या कर्तृत्ववान् सेनापतीच्या पुढारीपणाखालीं मुसलमानांनीं ह्या द्वीपकल्पाच्या दक्षिणेकडील सर्व भाग पुन्हा हस्तगत केला आणि तंजावरच्या मराठ्यांच्या वसाहतीला पूर्णपणें घेरून टाकलें. तंजावरचे राजे प्रतापसिंग ह्यांची दृष्टि ह्या प्रसंगीं साहजिकच साहाय्यार्थ शाहूमहाराजांकडे वळली. सादतअली शके १६५४ मध्यें मरण पावला आणि त्याचा पुतण्या दोस्तअली हा 'अर्काटचा नबाब' ही पदवी धारण करून त्याच्या गादीवर बसला. त्याचें सामर्थ्य दांडगें होतें आणि मराठ्यांचें शत्रुत्व करावयाचा त्यानें विडा उचलला होता! शके १६६२ च्या वैशाखांत मराठ्यांनीं दोस्तअलीच्या सैन्याला अवघड स्थलीं दक्षिणेच्या अंगानें दाबून धरलें आणि त्यावर मागून व पुढून आणि कुशीनें मारा चढवला. थोड्याच घंटयांत मुसलमानी सेनेचा पूर्ण मोड झाला आणि दोस्तअली रणांगणांत मारला गेला. मुसलमानांच्या पीडेनें दीर्घ कालपर्यंत गांजून गेलेली तेथली हिंदु जनता आपल्या सहधर्मीयांच्या ह्या विजयानें आनंदित झाली आणि तिनें मराठ्यांशीं एकमत केलें. रघूजी वाटेंतील सर्व गांवांतून आणि नगरांतून मोठमोठाल्या खंडण्या उकळीत अर्काटवर चाल करून गेले. दोस्तअलीचा मुलगा सफदरअली

आणि जांवई चंदासाहेब हे वेलोर आणि त्रिचनापल्ली येथें हाताखालीं मोठालीं सैन्यें घेऊन युद्धाच्या सिद्धतेनें उभे होते. तेव्हां रघूजींनीं, मराठ्यांची आर्थिक हानि अतिशय झाल्यामुळें आपण ह्या आक्रमणाचा बेत सोडून द्यावयाचें ठरविलें आहे, अशी वार्ता उठविली. ते त्रिचनापल्लीपासून ४० कोस खरोखरच मागें निघून गेले. चंदासाहेबासारखा चाणाक्ष आणि जागरुक मनुष्यसुद्धां ह्या युक्तीनें आणि वागण्यानें पूर्णपणें चकला आणि त्यानें आपल्या सैन्यापैकीं १०००० लोक वेगळे काढून त्यांना हिंदूंच्या अत्यंत धनाढ्य अशा मदुरा क्षेत्रावर मारा करण्यासाठीं पाठविलें. आपल्या युक्तीनें मुसलमान इतका पूर्णपणें आपल्या तावडींत सांपडलेला पाहिल्याबरोबर मराठी सेनापतीनें एकदम तोंड उलट पालटलें आणि लांब लांब क्रमणांनीं त्रिचनापल्लीच्या समोर तो दत्त म्हणून उभा राहिला. मदुरेवर प्रतिशोध उगवून तें पवित्र शहर लुटून मोकळें करण्यासाठीं बंदासाहेबाला पाठविण्यांत आलें होतें; त्यांला ही वार्ता समजतांच आपल्या बांधवांच्या साहाय्यार्थ धावून यावयाची त्यानें धडपड केली. पण त्याला वाटेंत अडविण्यासाठीं रघूजींनीं आपली एक तुकडी पाठविली; तिनें त्याच्याशीं तुमुल युद्ध करून त्याला गुंतवून ठेविलें आणि त्याच्या हत्तीवरून त्याला पाडून त्याचा वध केला. मुसलमानांचा पूर्णपणें सत्यानाश झाला. त्यांच्या सेनापतीचें शव रघूजीच्या शिबिरामध्यें नेण्यांत आलें. मराठी सेनापतीनें त्याच्याभोंवतीं उंची वस्त्रें गुंडाळविलीं आणि तें मृताच्या भावाकडे—चंदासाहेबाकडे पाठवून दिलें. त्रिचनापल्लीचा वेढा पुष्कळ महिने चालला होता; पण इतक्या शौर्यानें नगर लढवूनही शेवटीं तेथल्या मुसलमान सेनानायकाला शरण जाऊन तें नगर दुर्दम मराठ्यांच्या स्वाधीन करावें लागलें. रघूजींनीं चंदासाहेबाला युद्ध बंद करून सातार्‍याला पाठवून दिलें आणि मुरारराव घोरपड्यांच्या हाताखालीं १४००० सैन्य देऊन त्यांना त्रिचनापल्लीच्या संरक्षणार्थ ठेविलें. सफदरअल्ली ह्याच्यापूर्वींच मराठ्यांना शरण गेला होता. त्यानें १० लाख रुपये खंडणी द्यावी आणि विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे शके १६५८ पासून ज्या ज्या हिंदु राजांचीं आणि संस्थानिकांचीं त्याच्या बापानें राज्यें बळकाविलीं होतीं त्या सर्वांना पुन्हा त्यांचीं राज्यें त्यांस परत देऊन त्यांची संस्थानीं स्थापना करावी अशा करारावर मराठ्यांनीं त्याला अर्काटचा नबाब म्हणून मानण्याचें वचन दिलें.

पण दक्षिणेकडे रघूजी हे महत्त्वाचे विजय मिळवीत असतां तिकडे बंगाल, बहार आणि ओढया येथील मुसलमानी नबाब अलिवर्दीखान ह्याच्याशीं त्यांच्या संस्थानाचा विरोध आला. अलिवर्दीखान ह्याच्या विरुद्ध असलेल्या बंगाल्यांतील पक्षाचा पुढारी मीर हबीब ह्यानें साह्यासाठीं मराठ्यांना बोलाविलें. रघूजीचे प्रधान भास्करपंत कोल्हटकर हे बंगाल्यातील मुसलमानी सत्तेला मऊ करण्याची संधि आपल्याला केव्हां मिळते आणि हिंदु साम्राज्याचा विस्तार हिंदुस्थानच्या पूर्वसीमेपर्यंत आपण केव्हां वाढवितों ह्याची उत्सुकतेनें वाट पाहात बसले होते. त्यांनीं तें आमंत्रण स्वीकारलें आणि दहा सहस्र मराठी घोडा मुसलमानी सत्तेच्या वर्चस्वाला जणुं आपल्या टापांखालीं तुडवीत बहार प्रांतांतून चाल करीत पुढें घुसला. अलिवर्दीखान कांहीं क्षुद्र प्रतीचा सेनापति नव्हता. तो त्यांच्यावर चालून येतांच मराठ्यांनीं त्याला अब-चणींत घेरलें आणि त्याची युद्धसामग्री मारून त्याच्या सैन्याचा चुराडा केला आणि त्याला कटककडे मार्ग पत्करण्याला भाग पाडलें. भास्कर-पंतांनीं आपला बेत सोडून सगळा पावसाळा निघून जाईपर्यंत बंगाल्यांत निवास करावा आणि शत्रूंच्या प्रदेशांतून खंडणी उकळून तिच्यावर आपला व्यवहार चालवावा म्हणून त्यांचें मन वळविण्यासाठीं मीर हबीबनें पुष्कळ गळ घातली. मग मराठ्यांनीं मुर्शिदाबादेवर चाल केली आणि हुगळी, मिदनापूर, राजमहाल आणि मुर्शिदाबाद सोडून गंगेच्या पश्चिमेकडील बंगालचा सर्व भाग जिंकून घेतला. कालीमातेनें हिंदूंचा पक्ष धरला आणि बंगालमधील मुसलमानी धर्मवेड्यांचा धर्ममद जिरवला म्हणून कालीचा धार्मिक उत्सव विशेष थाटमाटानें साजरा करावयाचें मराठ्यांनीं ठरविलें. इतक्यांत अलिवर्दीखान एकदम हुगळी उतरून आला आणि मराठ्यांच्या-वर अकस्मात् घाला घालून त्यानें त्यांना बंगालच्या सीमेपर्यंत मागें रेटलें. पण हा त्यांचा विजय क्षणिक ठरावयाचा होता. कारण रघूजी लवकरच परत आले आणि बाळाजीपंतांनींही दुसरें मराठी सैन्य घेऊन बाह्यात्कारें मोगल बादशहाच्या सहाय्याकरितां म्हणून पण वास्तविक मराठ-मंडळासाठीं बहारवर चौथाई बसविण्यासाठीं आणि रघूजी भोसल्याशीं बरेच दिवस तंट्यांत पडलेल्या आपल्या येण्याचा निर्णय करण्यासाठीं बहार प्रांतांत प्रवेश केला. मराठ्यांचा आपसांतील प्रकरणाच्या संबंधांत एकविचार होता. बाळाजीपंत निघून गेले आणि भास्करपंतांनीं अलिवर्दीखानापासून मोठी खंडणी आणि

नेहमीची न सुटणारी चौथाई ह्यांची मागणी केली. युद्धांत भास्करपंतांशीं तोंड देणें अशक्य आहे हें पाहून अलिवर्दीखानानें स्वभावानुसार विश्वासघाताचा अवलंब केला. त्यानें खंडणीच्या प्रश्नाची चर्चा करण्याच्या मिषानें भास्करपंतांना आपले पाहुणे व मराठ्यांचे प्रतिनिधि म्हणून आपल्या तंबूंत येण्याविषयीं नम्रतापूर्वक पाचारण केलें आणि ठरल्याप्रमाणें 'काफिराला कापून काढा' अशी खुणेची ओरड होतांच मारेकऱ्यांचा त्यांच्यावर मारा करवून त्यांचा वध केला. त्या भयंकर दिवशीं वीस मराठी अधिकाऱ्यांना त्या जागीं कंठस्नान मिळालें! त्यांच्यापैकीं एकटे रघूजी गायकवाड वांचले आणि त्यांनींच ह्या अकस्मात् आलेल्या प्रसंगानें चकित झालेल्या आणि गोंधळून गेलेल्या मराठी सेनेला परक्यांच्या प्रांतांतून आणि आपला डाव साधल्यामुळें चढून गेलेल्या शत्रूंच्या—त्यांना कोंडून त्यांचे तुकडे तुकडे उडविण्यासाठीं एकसारख्या चाललेल्या—प्रयत्नांना तोंड देऊन वांचवून पार नेलें!

पण असल्या एकाद्या वधानें किंवा आकस्मिक घाल्यानें, जिला औरंगजेबाला आपल्या साम्राज्यांतील सर्व साधनें एकवटून देखील थोपवून धरतां आली नाहीं त्या मराठ्यांच्या उठावणीची लाट परतणें शक्य नव्हतें. पण मूर्ख अलिवर्दीखानाला तें समजलें नाहीं. त्यानें उर्मटपणानें रघूजीला पुढील आशयाचें हास्यास्पद पत्र लिहिलें. "अल्ला हो अकबर! त्याच्या कृपेनें सद्धर्मनिष्ठांच्या घोड्यांना काफरांच्या शस्त्रांची भीति उरली नाहीं. जेव्हां इस्लामाचे सिंहाचे छापे अशा रीतीनें मूर्तिपूजक राक्षसांची खोडकी मोडतील आणि त्यांना दातीं तृण धरून आश्रयासाठीं शरण यावें लागेल तेव्हांच संधि होणें शक्य आहे." रघूजींनीं ह्या उर्मटपणाच्या पत्राला "मराठे अलिवर्दीखानाशीं गांठ घेण्याकरितां ५०० कोस चालून गेले पण ह्या इस्लामाच्या सिंहाला मराठ्यांशीं दोन हात करण्याकरितां ५० कोसही पुढें यावयाचें धैर्य झालें नाहीं" असें उत्तर देऊन हें केवळ मूर्खपणाच्या बडबडीचें युद्ध थांबविलें आणि मराठी चपळ बारगिरांना चाल करून जाऊन संपूर्ण ओढ्या आणि वर्धमान ह्या प्रांतांतून चौथाई उकळण्याची आज्ञा केली. मराठ्यांनीं अशा रीतीनें अलिवर्दीखानाला प्रतिवर्षीं त्रासवून सोडलें. शक्य असेल तेथें चौथाईचा नेहमींचा कर बसविला आणि इतर स्थानांवर युद्धाच्या व्यवसायासाठीं मोठमोठ्या खंडण्या बसवून त्या गोळा केल्या. त्यांनीं विभागचे विभाग ओस पाडले; घटकेंत ते लुटून परतत तर घटकेंत नाहींसे होत; त्यांना

सोयीला येईल त्याप्रमाणें युद्ध करीत, नाहीं तर निघून जात. ह्याप्रमाणें मुसलमानी सुभेदाराला बंगाल, बहार आणि ओढया ह्या तीनही प्रांतांचा राज्यकारभार चालविणें अशक्य करून टाकलें. पराभवानें त्यांचा क्रम थांबविणें शक्य नव्हतें संकटांनीं त्यांचा उत्साह भंग करणें शक्य नव्हतें. त्यांना त्यांची चौथाई मिळालीच पाहिजे.

शेवटीं शके १६७२ मध्यें हा इस्लामाचा सिंह अलिवर्दीखान 'काफरांना' अगदीं कंटाळून गेला; ते केव्हां कोठें भेटतील ह्या भीतीनें त्याला 'त्राहि भगवन्' झालें आणि तो भोंसल्यांना शरण आला. त्यानें भास्करपंतांच्या केलेल्या भ्याडपणाच्या वधाप्रीत्यर्थ दंड म्हणून मुंडकटाईसाठीं ओढ्या प्रांत मराठयांना तोडून दिला आणि बंगालच्या व बहारच्या चौथाईच्या भागाबद्दल म्हणून प्रतिवर्षीं दहा लाख रुपये द्यावयाचा करार केला. अशा रीतीनें 'सद्धर्माच्या वीरांना' अंतीं 'मूर्तिपूजक सैतानांजवळ' दयेची याचना करावी लागली.

त्या दिवशीं त्यांनीं 'अल्ला हो अकबर'चा घोष केला किंवा नाहीं हे सांगतां येत नाहीं!

इकडे बंगाल्यांत ह्याप्रमाणें मुसलमानी सत्तेचें उच्चाटण करण्याचे रघूजी भोसल्याचे प्रयत्न यशस्वी होत होते त्याच वेळीं इतर मराठी सेनापतिही उत्तरेकडील मुसलमानी सत्तेच्या दुसऱ्या गडकोटांना धडका भरून तितक्याच तेजानें पराक्रम करून दाखवीत होते. यमुनेपासून नेपाळच्या सीमेपर्यंतचा सर्व प्रांत धर्मवेड्या रोहिल्यांच्या आणि पठाणांच्या मगरमिठींत सांपडला होता. त्यांची जूट जमलेली पाहून दिल्लीच्या मोगल बादशहाचा वजीर इतका घाबरून गेला कीं, त्यानें पठाणांचे, मोगल साम्राज्याचा नाश करून त्याच्या जागीं अफगाणी साम्राज्य पुन्हा स्थापन करावयाचे महत्त्वाकांक्षी बेत मोडून हाणून पाडण्याच्या प्रयत्नांत साह्य करण्यासाठीं मराठ्यांची याचना केली. मुसलमानी सत्तेचें निर्मूलन करण्यासाठीं तर मराठ्यांचे सारे प्रयत्न व त्यांच्याच परिश्रमानें मोगल साम्राज्याची स्थिति इतकी मोडकळीला आली होती. तेव्हां दुसऱ्या मुसलमानांची किंवा अहिंदु लोकांची तें श्रेय उपटण्याची महत्त्वाकांक्षा व प्रयत्न त्यांना साहजिकच सहन झाले नाहींत. तेव्हां मराठ्यांनीं वजिराचें हें आमंत्रण मोठ्या आनंदानें स्वीकारलें. मराठी मानकरी मल्हारराव होळकर आणि जयाजीराव शिंदे ह्यांनीं लागलीच यमुनानदी

ओलांडली आणि पठाण कादरगंज येथें तळ देऊन बसले होते त्यांच्यावर चाल करून गेले. पठाणांनीं अत्यंत चिकाटीनें ठाव धरला; पण शेवटीं मराठ्यांनीं त्यांच्यावर मोठा जय मिळविला आणि त्यांच्या सैन्याची धूळधाण उडविली. ते इतकेंच करून थांबले नाहींत. पठाणांचा सर्वांत मोठा पुढारी आपल्या कादरगंज येथील सोबत्यांना साहाय्य करण्यासाठीं मोठें सैन्य घेऊन येत होता; मराठे त्याच्यावर तसेच चाल करून गेले आणि त्यांनीं त्याला वेढून टाकलें. अहंमदखानानें फरुकाबादेचा आश्रय केला, तों मराठ्यांनीं त्याही नगराला वेढा दिला. हा निकराचा लढा कित्येक आठवडे चालला; पण पठाण कांहीं वठणीवर येईना. रोहिल्यांचें एक मोठें सैन्य गंगेच्या दुसऱ्या तीरावर होतें. त्यांच्याकडून पठाणांना सर्व प्रकारचें साहाय्य मिळत असे. हें लक्ष्यांत आल्याबरोबर मराठ्यांनीं गंगेवर नावांचा पूल मोठ्या युक्तीनें उभा केला आणि ते योग्य वेळीं गंगानदी उतरून गेले. त्यांच्या सैन्याचा कांहीं भाग फरुकाबादेच्या वेढ्याचें काम इकडे नेटानें चालवीत असतांच गंगापार झालेलें त्यांचें मुख्य सैन्य रोहिले आणि पठाणांच्या एकत्र झालेल्या तीस सहस्र सेनेवर तुटून पडलें आणि घनघोर संग्रामांत त्यानें त्यांचा पूर्ण पराभव केला. अहंमदखानानें फरुकाबादेहून पळून जावयाचा बेत करून मराठ्यांच्या उरलेल्या लहान सैन्याला गुंतवून ठेवण्याचा प्रयत्न केला; पण त्यांत त्याला यश न येतां मराठ्यांनींच त्याचा अविश्रांत पाठलाग केला. शेवटीं मराठ्यांनीं मुसलमानांचें पूर्ण निर्मूलन केलें; त्यांचा सेनानिवास लुटला आणि अगणित हत्ती, घोडे, उंट, ध्वजा आणि इतर सर्व सामग्री हस्तगत केली.

ह्या युद्धांतलें रणकौशल्य जितकें उच्च प्रतीचें होतें तितकाच महत्त्वाचा त्याचा नैतिक परिणामही झाला. कारण पठाणांनीं केवळ आपल्या चळवळीला धार्मिक स्वरूप देण्यासाठीं आणि मराठ्यांना चिडविण्यासाठीं काशीक्षेत्रावर उगाच चाल केली आणि काफीरांची पठाणाशीं गांठ घ्यायची कधींच छाती व्हावयाची नाहीं अशी बढाई मारीत हिंदूंच्या देवळांवर आणि देवांच्या पुजाऱ्यांवर अनन्वित अत्याचार केले ! कारण अल्ला त्यांच्या पक्षाला होता. आणि मराठ्यांची त्यांची गांठ पडणार नाहीं ही त्यांची बढाई एका दृष्टीनें खरीही ठरली ! मराठ्यांनाही त्यांच्याशीं तोंड देणें अत्यंत कठिण गेलें ! कारण इतकेंच कीं, पठाणांशीं समोरासमोर युद्ध करावयाचा प्रसंग आणतांच ते

लागलीच प्रत्येक युद्धांत मराठ्यांकडे पाठ फिरवीत! जागोजागीं मुसलमानांच्या केलेल्या पराभवांनीं आणि त्यांना उसंत घेऊं न देतां लगोलग केलेल्या पाठलागांनीं हिंदूंची मनोवृत्ति कांहींशी शांत झाली व आपल्या देवस्थानांच्या आणि गृह्याग्नींच्या निष्कारण केलेल्या अपमानांचा आपण प्रतिशोध घेतला असें त्यांना वाटलें. ह्या काळांत लिहिलेल्या सर्व पत्रांतून ही आत्मगौरवाची दृष्टि स्पष्ट दिसते. "पठाणांनीं श्रीकाशीजीचा आणि प्रयागचा अपमान केला होता; पण हरिभक्तांना अंतीं यश प्राप्त झालें—शत्रूंनीं काशीला बावटळीचें बीं पेरलें! पण देवानें त्यांना फरुकाबादेला झंझावाताचें पीक दिलें!" राजकीय परिणामही नैतिक परिणामाइतकेच महत्त्वाचे झाले. मोगल बादशहाचा ताठा पूर्णपणें जिरून त्यानें मराठ्यांना साम्राज्यांतील राहिलेल्या सर्व प्रांतांतून चौथाई गोळा करण्याचा अधिकार दिला. मराठ्यांची ही चौथाई म्हणजे मुसलप्रवेशाच्या आधींचा चंचुप्रवेशच असे! अशा रीतीनें मुलतान (सिंध), पंजाब, राजपुताना, रोहिलखंड हे सर्व प्रांत मराठ्यांच्या अधिकारक्षेत्रांत समाविष्ट झाले आणि 'हरिभक्तांना मराठी भाला दिल्लीच्या बादशाहीच्या थेट काळजांत खुपसल्याच्या यशा'चा उच्चार योग्य अभिमानानें करतां आला. ह्या महत्त्वाच्या विजयांची वार्ता कळल्याबरोबर मराठमंडळाचे प्रमुख पंतप्रधान बाळाजीपंत ह्यांनीं आपल्या सैन्याला पुढील उत्साहवर्धक पत्र पाठविलें, " तुमचें धैर्य विलक्षण आहे! तुमचें शौर्य दुर्दांत आहे! दख्खनच्या मराठी सैन्यानें नर्मदा ओलांडून, यमुनेच्या पार होऊन, गंगानदी उतरून जाऊन रोहिल्यांसारख्या आणि पठाणांसारख्या महत्त्वाच्या आणि प्रमत्त शत्रूला आव्हान दिलें, त्यांच्याशीं युद्ध केलें आणि त्यांचा नायनाट केला! सैनिकांनो आणि अधिकाऱ्यांनो! तुम्हीं मिळविलेला विजय खरोखरीच अलौकिक आहे! तुम्ही हिंदु साम्राज्याचे आधारस्तंभ आहां. स्वराज्यस्थापनकर्ते म्हणून तुमची कीर्ति इराणापर्यंत आणि तुराणापर्यंत जाऊन पोहोंचली आहे!" (शके १६७३).

इतकें साधल्यावर मराठ-मंडळाच्या पुढाऱ्यांनीं अयोध्येचा नबाब आणि दिल्लीचा वजीर ह्यांच्याकडून पुन्हा एकदां काशी व प्रयाग हीं क्षेत्रें परत मिळविण्याचा प्रयत्न केला. हिंदुस्वातंत्र्याच्या महाप्रयत्नाचें प्रतिनिधित्व त्यांच्याकडे आलें होतें, तेव्हां हिंदूंचीं हीं सर्वांत पवित्र धर्मक्षेत्रें अद्याप मुसलमानांच्या हातांत असावीं हें शल्य साहजिकच त्यांना फार बोंचत होतें.

त्या वेळच्या पत्रव्यवहाराचें निरीक्षण केलें म्हणजे मराठयांची ह्या प्रश्नाच्या संबंधांत पुनःपुन्हा वाटणारी अस्वस्थता स्पष्टपणें प्रतीत होते. ह्या मागणीच्या बोलाचालींत होत असलेला विलंब सहन न होऊन मल्हारराव होळकरांनीं तर एकदां काशीवर चालून जाऊन मारा चढवावयाचा, ज्ञानवापीच्या पवित्र भूमीवर उभारलेली मशीद धुळीला मिळवायची आणि अशा रीतीनें हिंदुजनतेचा आणि धर्मांचा हा नित्याचा अपमान पूर्ण धुऊन काढावयाचा असा बेतच ठरविला; कारण तेथें उभी असलेली ती मशीद, ज्या निराशामय काळीं हिंदु धर्मांच्या प्रसिद्ध देवस्थानांचा नाश करून उभारली आणि त्यावर मुसलमानांचा अर्धचंद्र हिंदूंना हिणवीत फडकूं लागला, त्या काळाची स्मृति हिंदूंच्या मनांत नित्य जागृत करी. पण काशीच्या भोंवतालच्या प्रदेशांत अद्यापि मुसलमानांचें अतिशय वर्चस्व होतें. तेव्हां मराठे निघून गेल्यावर चिडलेले मुसलमान पुनः आपल्यावर आणि काशीक्षेत्रावर भयंकर अत्याचार केल्याविना राहणार नाहींत, ह्या भीतीनें काशीच्या ब्राह्मणांनीं मल्हारराव होळकरांना अधिक अनुकूल संधि येईपर्यंत काशीवर मारा करावयाचा आपला बेत आपण सोडून द्यावा, अशी विनवणी केली. केवळ आपले प्राण आणि आपल्या नगराचा नाश वांचविण्यासाठीं मल्हाररावांना राष्ट्रीय अपमानाचा प्रतिशोध घेण्याच्या कार्यापासून ह्या उपदेशानें परावृत्त करण्यांत आपण पाप करतों आहों असें मात्र त्यांच्याधर्मभीरु मनाला वाटल्यावांचून राहिलें नाहीं. त्या पत्रांतच त्यांनीं प्रत्यक्ष त्याचा उल्लेख करून खेद प्रदर्शित केला आहे. (१८जून१७५१). आषाढ शुद्ध ६ शके १६७३.

शके १६६१ मध्यें शाहुमहाराजांचें निधन झालें. त्याच्या आधीं त्यांनीं बाळाजीपंताला आज्ञापत्रानें सर्वाधिकार दिले होते. त्यामुळें शाहू छत्रपतींच्या निधनापासून पंतप्रधान हें मराठमंडळाचे अध्यक्ष आणि मराठयांच्या राष्ट्रीय आकांक्षांचे आणि ध्येयाचे प्राण बनले. त्यांच्या राजवटींत मधून मधून घरगुती भांडणांना आणि राजवाड्यांतील क्षुद्र कारस्थानांना चिंताजनक स्वरूप आलें. पण तशा परिस्थितींतही ह्या कर्तृत्ववान् पुरुषानें त्याच्या पूर्वीं कोणींही केला नसेल इतक्या निश्चयानें आणि मनःपूर्वक मराठयांच्या नेतृत्वाखालीं मोगली साम्राज्याच्या नाशभूमीवर विशाल आणि स्वतंत्र हिंदुसाम्राज्य संवर्धित करण्याचा प्रयत्न केला आणि त्यासाठीं मुसलमान किंवा ख्रिस्ती, आशियांतील किंवा युरोपांतील जे जे परकीय शत्रु रणांगणावर उतरले त्या सर्वांशीं राष्ट्रव्यापी झगडा चालवला.

ह्या परकीय शत्रूंपैकीं फरासीसांनीं (फ्रेंच) दक्षिण हिंदुस्थानाच्या खालच्या भागांत पूर्वीच विशेष वर्चस्व आणि सत्ता प्रस्थापित केली होती. बाळाजींचे त्यांच्याकडे पूर्ण लक्ष होतें, पण प्रारंभीं त्यांना एकाच वेळीं हिंदुस्थानांतील दूरदूरच्या भागांत मोठमोठालीं युद्धें चालवावीं लागलीं आणि महाराष्ट्रांतील ह्या एकमेव बलशाली हिंदु सत्तेला चिरडून टाकण्यासाठीं बद्धपरिकर होऊन सर्व दिशांनीं उठलेल्या अनेक शत्रूंशीं तोंड द्यावें लागलें, त्यामुळें बाळाजींना पुष्कळ वेळपर्यंत फ्रेंचांना एकट्यांनाच गांठून त्यांच्या कृत्यांचें त्यांना प्रायश्चित्त देतां आलें नाहीं. पण तिकडून जरा मोकळीक मिळतांच बाळाजीपंतांनीं त्यांना रणांगणावर पूर्णपणें त्रस्त करून आणि राजकारणाचे कुशल डाव टाकून, अंतीं फ्रेंचांना इतकें गोंधळवून सोडलें कीं, त्यांना आणि त्यांच्या आश्रयाखालीं गेलेल्या निजामाला भालकी येथें मराठयांशीं संधि करणें भाग पडलें. ह्या संधीनें मराठयांना गोदावरी आणि तापी ह्या दोन नद्यांच्या मधील सर्व प्रांत मिळाला आणि दक्षिणेच्या निरनिराळ्या संस्थानिकांच्या राजसभेत फरासिसांनीं जें वर्चस्व संपादन केलें होतें तें पुष्कळच नाहींसें झालें.

कर्नाटकांतील आणि त्याच्याही दक्षिण भागांकडील सर्व विद्रोही नबाबांना शासन देऊन ताळ्यावर आणावयाच्या उपक्रमाला पंतप्रधानांनीं पूर्वीच प्रारंभ केला होता. मराठी सैन्यानें सावनूरच्या नबाबाचा युद्धांत पूर्ण पराजय केला आणि त्याला आपल्या राज्यापैकीं बराच मोठा प्रांत आणि शेष राहिलेल्या प्रदेशाकरितां एक लक्ष रुपये खंडणी मराठयांस द्यावयाला भाग पडलें. हें झाल्यावर बाळाजीच्या आणि भाऊरावांच्या नेतृत्वाखालीं साठसहस्र मराठ्यांचें प्रचंड सैन्य श्रीरंगपट्टणच्या समोर उभें झालें; त्यांनीं तेथून थकलेल्या चौथाईच्या कराप्रीत्यर्थ ३५ लक्ष रुपये काढले, शिवरी परत जिंकून घेतली आणि इतर लहानसहान मुसलमानी पुंडांना शासन केलें. मग बळवंतराव मेहेंदळे कडाप्याच्या मुसलमान नबाबावर चालून गेले. मराठ्यांचे नांव कानावर पडतांच आपल्या राज्याचें काय होईल, ह्या भीतीनें दक्षिण हिंदुस्थानांतील खालच्या भागांमधील सर्व मुसलमानी नबाबांना कांपरें भरूं लागलें होतें. ते सर्व एक होऊन कडाप्याच्या नबाबाला साहाय्य करावयासाठीं आले होते. इंग्रजदेखील त्यांच्या पक्षाला येऊन मिळाले होते, त्यांत पावसाळ्यालाही भर आला, पण तरीही बळवंतराव मेहेंदळ्यांनीं मुसलमानी सैन्यावर मारा चढवला आणि समोरासमोरच्या तुमुल युद्धांत सहस्रावधि पठाणांना तरवारीचें पाणी

पाजून प्रत्यक्ष नबाबाला स्वर्गाला पाठविलें. त्याच्या राज्याचा अर्धा भाग आपल्या राज्याला जोडून घेऊन मराठे तेथून अर्काटच्या नबाबावर चालून गेले. इंग्रजाचा ह्याला पहिल्यापासून पूर्ण पाठिंबा होता. पण स्वतः नबाबाला किंवा त्याच्या पुरस्कर्त्यांना मराठ्यांची मागणी धिक्कारून टाकतां आली नाहीं. त्यांना शांत करण्यासाठीं ४ लक्ष रुपयांची खंडणी द्यावी लागली. शके १६७१ मध्यें (इ. सन १७४९ ) मध्यें बेंगरूळला वेढा घातला, चीनापट्टण जिंकून घेतलें त्याच वेळेला म्हैसूरच्या राज्याचें राजपद मिळविण्याच्या प्रयत्नांत असलेल्या हैदरला, त्यांचा पूर्वीं करार झाल्याप्रमाणें ३४ लक्ष रुपयांची खंडणी त्यांच्या स्वाधीन करावी लागली. ह्याच वेळेला हैदरचा पुरा शेवट करावा असा बाळाजीपंतांचा विचार होता, पण ह्या वेळीं हिंदुस्थानांत इतरत्र मराठयांना ज्या मोठमोठाल्या स्वाऱ्या कराव्या लागल्या त्यांच्या योगानें त्यांना तळ-हिंदुस्थानांत पराक्रम गाजवीत असलेली आपली मराठी सेना परत बोलवावी लागली आणि तिकडलें काम अर्धवट सोडणें भाग पडलें.

मध्यंतरीं शके १६७५ (इ. सन १७५३ ) मध्यें राघोबादादांनीं अहमदाबाद जिंकलें आणि मराठयांच्या दिल्ली येथील वर्चस्वाला विरोध करणाऱ्या जाटांना, तीस लक्ष रुपयांची खंडणी द्यावयाला लावलें. ह्याच वेळीं जोधपुरच्या गादीसाठीं रजपुतांमध्यें आपसांत यादवी माजली. रामसिंगानें आपला प्रतिस्पर्धी जो विजयसिंग त्याच्याविरुद्ध मराठयांचें साहाय्य मागितलें. मराठयांनीं तें देण्याचें तात्काळ मान्य केलें आणि दत्ताजी आणि जयाजी शिंद्यांनीं स्वतः त्या स्वारीचें पुढारीपण स्वीकारलें. रजपुतांचें सैन्य पन्नास सहस्र होतें. पण त्याच्याशीं घनघोर युद्ध करून मराठयांनीं विजयसिंगाचा पुरा मोड केला. तेव्हां तो नागोरला पळून गेला. जयाप्पांनीं नागोरला वेढा दिला पण तो चालवीत असतां त्याच्या मनाला कांहीं बरें वाटत नव्हतें. रजपुतांनीं मराठयांशीं युद्ध करावयाचें, हिंदूंनीं हिंदूंशीं भांडावयाचें असें तें दृश्य. तेव्हां रजपुतांशीं कसा तरी करून समेट घडवून आणावा आणि तेथून निघून प्रत्येक मराठयांच्या अंतःकरणाला प्रिय असलेलीं काशी आणि प्रयाग हीं हिंदूंचीं पवित्र क्षेत्रें परत घेण्याचें कार्य अंगावर घ्यावें अशी बाळाजीचीं शिंद्यांना आग्रहाचीं पत्रें येऊं लागलीं.

पण इतक्यांत विजयसिंगानें असें एक नीच कृत्य केलें कीं, त्याच्या

भीषणपणानें उभ्या महाराष्ट्राचीं मनें शहारून गेलीं आणि समेटाची भाषाही अशक्य झाली ! ह्याच विजयसिंगाच्या चुलत्यानें पूर्वी पिलाजी गायकवाड ह्यांच्या निवासावर ते पाहुणे म्हणून आले असतां मारेकरी घालून हत्या करवली; ह्या गोष्टीचा उल्लेख पूर्वीच केला आहे. पिलाजीच्या हत्येनें मराठ्याच्या प्रतिशोधवृत्तीची धार तीक्ष्ण झाली आणि तिच्यासाठीं दुर्धर मूल्य द्यावें लागलें हें स्मरण जागृत असतांनाही विजयसिंगानें आपल्या चुलत्याचें अनुकरण करावयाचा बेत केला. विजयसिंगाच्या सैन्यांतून तीन रजपूत सैनिक भिकाऱ्यांच्या वेषानें मराठ्यांच्या सेनानिवासांत आले आणि मराठ्यांचे सेनापति जयाप्पा ह्यांच्या शिबिरा पुढील अश्वशाळेतील भूमीवर पडलेले हरबऱ्याचे दाणे वेंचूं लागले. जयाप्पांना संकटाची कल्पनाही नव्हती. त्यांनीं तेथें स्नान केलें आणि अंग पुसण्यासाठीं वस्त्र डोक्यावर घेतलें तोंच, ह्या मारेकऱ्यांनीं त्यांच्यावर मारा केला आणि आपल्या सुऱ्या त्यांच्या कुशींत खुपसल्या ! जयाप्पा जागच्या जागींच मरणोन्मुख होऊन पडले. दोन मारेकऱ्यांना लागलीच धरण्यांत आलें, पण तिसरा पळून गेला. इतक्यांत रजपूत सैन्य बाहेर पडलें आणि मराठे गोंधळलेले आहेत, त्यांना कोणी पुढारी नाहीं तोंच त्यांना चुरडून टाकावें ह्या हेतूनें त्यांनीं मराठ्याच्या सेनेवर मारा केला. त्यांचा हेतु शेवटालाही गेला असता, पण प्राणनाशक व्रणांनीं विव्हल होऊन मरणशय्येवर पडला असतांनाही, या महावीरानें जें अदम्य तेज दाखविलें त्यानें तो निष्फळ झाला. जयाप्पांनीं शोकाक्रांत झालेल्या आपल्या सैनिकांना आधीं अंगावर चालून आलेल्या शत्रूशीं तोंड द्यावयासाठीं तुटून पडा आणि मग पाहिजे तर त्यांना झालेल्या व्रणासाठीं बायकांप्रमाणें रडत बसा, अशी आपल्या शेवटच्या शब्दांनीं आज्ञा केली आणि प्राण सोडला. आपल्या मरणोन्मुख पुढाऱ्याच्या ह्या शब्दांनीं मराठ्यांचीं मनें पेटून गेलीं आणि त्यांनीं जोरानें मारा करून विजयसिंगाचा पुन्हा पुरा पराभव केला. मराठ्यांचे इतर सेनानायकही शिंद्यांच्या साह्याला धावून आले. दहा सहस्र सैन्यासह अंताजी माणकेश्वर राजपुतान्यांत शिरले आणि ज्यांनीं ज्यांनीं म्हणून हत्याकारी विजयसिंगाला साह्य केलें त्या सर्व रजपूत संस्थानिकांना त्यांनीं शासन दिलें. अशा रीतीनें पूर्णपणें हतबल झाल्यावर विजयसिंगानें संधीकरितां याचना केली त्यानें ज्याला काढून टाकलें होतें त्या रामसिंगाचा नामोर, मादत आणि इतर विभागां-

वरील अधिकार मान्य केला आणि मराठ्यांना अजमीर देऊन, त्या व्यतिरिक्त स्वारीप्रीत्यर्थ त्यांना लागलेल्या सर्व व्ययाची भरपाई केली.

हें प्रकरण आटोपतें न आटोपतें तोंच बुंदीच्या बाल राजाच्या विधवा मातेकडून त्याच्याविरुद्ध गादीसाठीं कट करणाऱ्या लोकांविरुद्ध साहाय्य करण्यासाठीं शिंद्यांना बोलावणें आलें. दत्ताजी शिंद्यांनीं राणीच्या इच्छेप्रमाणें राणीचें कार्य करून दिलें आणि त्यासाठीं अल्प भेट म्हणून तिनें त्यांना ७५ लक्ष रुपये दिले.

---

## प्रकरण १२ वें

# सिंधुनदाचें तीर गांठलें !

'फेडून नवस माहोरास गेले लाहोरास जिंकित शेंडे
अरे त्यांनीं अटकेंत पाव घटकेंत लाविले झेंडे
सरदार पदरचे कसे, कुणि सिंह जसे कुणि शार्दुल गेंडे'

—प्रभाकर.

हें चालू असतांना इकडे राघोबादादा दिल्लीस मोठाले डाव रचून घडवून आणीत होते. त्यांनीं गाझीउद्दीनाला दिल्लीची वजिरी हस्तगत करण्यांत साहाय्य केलें; व मोगल बादशहाला गया आणि कुरुक्षेत्र हीं पवित्र स्थानें मराठ्यांच्या स्वाधीन करावयाला भाग पाडलें आणि स्वतः चालून जाऊन मथुरा, वृंदावन, गडमुक्तेश्वर, पुष्पवटी, पुष्कर आदिकरून हिंदूंचीं अनेक क्षेत्रें परत घेतलीं. सरतेशेवटीं पावन काशी नगरींतही मराठ्यांच्या एका तुकडीनें प्रवेश केला आणि ती जिंकून घेऊन तेथें मराठ्यांची सत्ता बसवली. अशा रीतीनें हिंदु जनतेच्या मनांतील अनेक वर्षांची अत्यंत आवडती इच्छा अंतीं पूर्ण झाली आणि राघोबादादानें अभिमानानें आम्ही यवनांच्या हातून हिंदु राज्यांतील सर्व महत्त्वाचीं नगरें आणि पवित्र क्षेत्रें सोडवलीं आणि परत मिळविलीं असें पेशव्यांना लिहून कळवलें. सहस्रावधि पवित्र स्मृतींच्या साहचर्यानें प्रत्येक हिंदु अंतःकरणांत आवडतें स्थान मिळवलेल्या आर्यावर्तांतील ह्या क्षेत्रांवर आणि पुरीवर विजयभरानें डुलणाऱ्या हिंदु ध्वजांच्या योगानें

हिंदुपदपादशाहीच्या आणि हिंदुविमोचनाच्या महत्कार्याचें पण अखिल हिंदु जनतेचे प्रतिनिधि म्हणून, पुढारीपण चालविण्याच्या मराठयांच्या हव्यासाला आणखी एक नैतिक समर्थन मिळतें. मराठयांच्या ह्या जयजयकारानें बादशहाला पुनः मराठयांची भीति वाटूं लागली आणि तो विरोध करूं लागला. बादशहाचे वजीर गाझीउद्दीनाच्या आणि ज्यांनीं त्याला त्याचें तें पद मिळवून दिलें त्या मराठयांच्या विरुद्ध चाललेले गुप्त बेत त्याला कळतांच, त्यानें होळकरांना पन्नास सहस्र सैनिक घेऊन येण्यासाठीं पाचारण केलें. मराठयांनीं येऊन बादशाही सेनेचा इतका धुव्वा उडवून दिला कीं, बादशहाच्या जनानखान्याच्या सुद्धां संरक्षणाला कोणी उरलें नाहीं आणि बादशहाच्या राण्या मराठ्यांच्या हातांत सांपडल्या. मराठ्यांनीं गाझीउद्दीनासह दिल्ली नगरींत प्रवेश केला. आपल्या शस्त्रांनीं वाटेंतील सर्व अडथळे दूर करीत ते राजवाड्यांत शिरले. जुन्या बादशहाला गादीवरून काढून टाकून त्याच्या जागीं नवीन बादशहा गादीवर बसविला आणि भवितव्यतेच्या प्रतिशोधाचें चक्र जणुं अगदीं पूर्ण करण्याकरितांच त्याला दुसरा अलमगीर असें नांव दिलें.

अलमगीर म्हणजे सर्व पृथ्वीचा विजेता. पहिला अलमगीर आणि दुसरा अलमगीरी. पहिल्या अलमगिराला—औरंगझेबाला वाटलें कीं, त्या वेळीं देवगृहांत मिणमिण करीत जळणारा हिंदु जीवनाचा दिवा, आपल्या बादशाही कोपाच्या एका फुंकरानें आपण सहज विझवून टाकूं ! त्यानें अल्लाची गर्जना केली आणि फुंक मारली. पण त्याला आढळून आलें, कीं त्या फुंकारानें मिणमिण करणारी ती ज्योती त्याच्या दाढीला आग लावून एकाएकीं प्रचंड वणव्यामध्यें परिवर्धित झाली आणि तो विस्मयानें अगदीं गोंधळून गेला. सह्याद्रीच्या डोंगरा-डोंगरावर तो वणवा पसरला आणि भूमीवरून आणि समुद्रांतून लक्षावधि हृदयांना आणि गडकोटांना, शिखरांना आणि दऱ्याखोऱ्यांना पेटवीत, त्याचें एका महान यज्ञीय अग्नींत रूपांतर झालें ! डोंगरांतले उंदीर म्हणून पहिला अलमगीर मराठ्यांना तुच्छ लेखीत होता. तेव्हांपासून ह्या हिंदु उंदरांनीं इतकीं भयंकर, तीक्ष्ण आणि बळकट नखें वाढविलीं, कीं त्यांनीं शीर्ण आणि रक्तबंबाळ होऊन कित्येक ईस्लामा'चे सिंह त्यांच्या पायापाशीं दुसऱ्या अलमगिराच्या राजधानींत लोळत पडले. पहिला अलमगीर प्रसादचिन्ह म्हणून शिवाजीमहाराजांना नुसतें राजा असें

संबोधावयाला देखील सिद्ध नव्हता. पण त्याचा वंशज, दुसरा अलमगीर ह्याला, केवळ शिवाजीच्या वंशजांना त्याला तें नुसतें भोगचिन्ह धारण करूं देण्यांत विशेष महत्त्व वाटलें नाहीं, म्हणूनच स्वतःला बादशहा असें म्हणवून घेतां आलें.

हिंदूंच्या सत्तेची आणि वर्चस्वाची ही वाढ पाहून हिंदुस्थानांतील यच्चयावत् मुसलमान भिऊन गेले आणि निरुपायानें मनांतल्या मनांत दांतओंठ खाऊं लागले. फरुकाबादेला आणि इतरत्र चांगला मार मिळालेले पठाण आणि रोहिले, आपल्या उच्च पदव्यावरून पदच्युत केले गेलेले वजीर आणि नवाब, काफिरांच्या विजयभराच्या आणि एक एकसारखी उतरतीकळा लागलेल्या अर्धचंद्राच्या प्रतिदिनीं क्षीण होणाऱ्या तेजाच्या दृश्यानें चिडून गेलेले मौलवी आणि मौलाना, मराठी भाल्याच्या टोंकावर प्रतिष्ठित केलेल्या आपल्या आसनाचा तोल संभाळण्याची कसरत करतां करतां, त्रस्त होऊन गेलेला प्रत्यक्ष बादशहा-थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, पदच्युत झालेल्या, निराश बनलेल्या आणि महत्त्वाकांक्षा असलेल्या सर्व मुसलमानांनीं मराठ्यांचा प्रतिशोध घ्यावयाची प्रतिज्ञा केली आणि त्यांचीं मराठ्यांना पूर्णपणें नाहींसे करण्याचीं निदान घालवून देण्याचीं कृष्ण कारस्थानें होऊं लागलीं. सांगावयाला आश्चर्य वाटतें—पण तसें त्यांत आश्चर्यही कांहीं नाहीं—कीं उत्तर हिंदुस्थानांत मराठ्यांच्या सत्तेचा हा उत्कर्ष पाहून कांहीं हिंदु राजपुत्रांच्या मनांत देखील त्यांच्याविषयीं विषम वैर उत्पन्न झालें होतें. जयपुरचा माधवसिंग, जोधपुरचा विजयसिंग, भरतपुरचे जाट आणि रजपुतान्यांत इतर कांहीं लहान हिंदु संस्थानिक ह्यांनीं मराठ्यांच्या विरुद्ध आपल्या आणि आपल्या राष्ट्राच्या शत्रूंशीं बेधडक संगनमत केलें आणि हिंदुविमोचनाच्या आणि हिंदुधर्माच्या नाशार्थ सिद्ध झालेल्या सर्व शत्रूंशीं सामना द्यावयाला समर्थ असलेल्या एकमेव हिंदु सत्तेचा विध्वंस करण्यासाठीं, सर्व असंतुष्ट मुसलमानांना एक प्रचंड कट रचावयाला उत्तेजन दिलें. हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या पुढाऱ्यांपैकीं कोणालाही मराठ्यांशीं उघड युद्धांत सामना घेतां आला नाहीं किंवा औरंगझेबी विश्वासघातानें अथवा कपटनीतीनें जाळ्यांत पकडून चकित करतां आलें नाहीं. तेव्हां ह्या काफिरांच्या आणि मूर्तिपूजकांच्या नष्ट राष्ट्राच्या समाचाराकरितां हिंदुस्थानच्या सीमेपलीकडील आपल्या परकीय धर्मबांधवांना बोलावण्याच्या त्यांच्या नेहमींच्या डावाकडे त्यांची स्वाभाविकपणें दृष्टि गेली !

ह्या दूरवर पसरलेल्या कटाचें पुढारीपण घ्यावयाला नजीबखान आणि मलकाजमानी ह्यांची योग्य जोडी मिळाली. नजीबखान हा एक रोहिला सरदार असून मराठयांच्या पराभवानें त्याचा सर्वतोपरी लाभच होणार होता. मलकाजमानी ही पहिल्यापासूनच बादशाही जनानखान्यांतील अत्यंत उलाढाली बाई असून, आपल्याला आपल्या रोजच्या भाकरीसाठीं ह्या काफर हिंदूंच्या कृपेवर अवलंबून राहावें लागावें, ही परिस्थिति तिला सलत होती. पूर्वी अशाच वेळीं पूर्वीच्या पुढाऱ्यांनीं नादिरशहाला बोलावलें होतें. त्याचेंच अनुकरण ह्या वेळीं करावयाचें त्या दोघांनीं ठरवलें. त्यांनीं अहमदशहा अबदालीशीं गुप्त पत्रव्यवहार चालू केला आणि त्यानें हिंदुस्थानावर स्वारी करावी आणि ह्या गनिमांच्या माऱ्यापासून मुसलमानी साम्राज्याला वांचवावें अशी त्याला आग्रहाचीं निमंत्रणें पाठविलीं. हीं निमंत्रणें स्वीकारावयाला अहंमदशहालाही स्वतःचें कारण होतें. विश्वविजयाच्या पापी महत्त्वाकांक्षेचें त्याला पहिल्यापासून वेडच लागलें होतें. पण त्याहूनही महत्त्वाचें कारण म्हणजे मराठयांच्या सत्तेचें आणि वर्चस्वाचें क्षेत्र मुलतानाजवळ त्याच्या राज्याच्या सीमेशीं येऊन भिडलें होतें आणि प्रतिदिवस तें अधिकच वाढत जाणार ह्या निश्चितीमुळें त्याला मराठयांशीं युद्ध करणें आतां आवश्यक होऊन बसलें होतें.

अहंमदशहानें ह्याच्या पूर्वीच मुलतान आणि पंजाब हे प्रांत आपल्या राज्याला जोडले होते. पण शके १६७२ (इ. सन १७५०) मध्यें कोणाही आंतील किंवा बाहेरील शत्रूपासून ठठ्ठा, मुलतान आणि पंजाब ह्या प्रांतांचें संरक्षण करून तेथें सुव्यवस्था ठेवण्याचा भार मराठयांनीं आपल्या शिरावर घेतला होता; आणि त्या प्रांतांत चौथाई गोळा करण्याचा अधिकार संपादन केला होता. ह्या कराराप्रमाणें शके १६७६ (इ. सन १७५४) मध्यें त्यांनींच अधिकारावर बसविलेला दिल्लीचा वजीर गाझीउद्दीन ह्याला अहंमदशहा अबदालीपासून पंजाब आणि मुलतान हे प्रांत परत घेण्याच्या कार्यांत सहाय्य केलें. अबदालीला हें उघड आव्हानच होतें. ह्याच संधीला नजीबखानानें चालविलेल्या कारस्थानाच्या योगानें हिंदुस्थानांतील दूरवर पसरलेल्या आणि सामर्थ्यवान् अशा मुसलमानांच्या संघाकडून त्याला पाठिंबा देण्याविषयीं अभिवचन मिळालें. ह्यामुळें ह्या विजयेच्छु पठाणाची महत्त्वाकांक्षा इतक्या थरापर्यंत प्रज्वलित झाली कीं, हिंदुस्थानच्या सार्वभौमत्वाचा किरीट आपण स्वतःच मिळवण्याची आणि नादिरशहाला जें करतां आलें नाहीं तें

घडवून आणण्याचीं स्वप्नें त्याला पडूं लागलीं. शके १६७८ (इ. सन १७५६) मध्यें मराठ्यांचे सर्व थोर सेनाधीश दक्षिणेच्या उलाढालींत गुंतून गेले आहेत असें कळतांच त्यानें बरोबर ८०००० सैन्य घेऊन सिंधुनद ओलांडला. पंजाब आक्रमून टाकला आणि जवळ जवळ विरोधाविना दिल्ली हस्तगत करून घेऊन सार्वभौम पदवी धारण केली! इतकेंच नाहीं तर पठाण विजेत्यांच्या परंपरेप्रमाणें त्याला क्रोधदेखील चढला. आणि सार्वभौमत्वाचीं चिन्हें धारण करण्याचा समारंभ, कांहीं घटका आपल्या सैन्याला दिल्लीच्या नागरिकांचा सरसकट भीषण संहार करण्याची आज्ञा देऊन, साजरा केला! त्या थोड्या घटिकांच्या अवधींत अठरा सहस्र मनुष्यें निष्कारण तरवारीला बळी पडलीं! तेथून मग त्यानें मुसलमानी धर्माचे संरक्षक ह्या आपल्या पदवीचें समर्थन करण्यासाठीं मराठ्यांनीं नुकतीच मुसलमानांच्या मगरमिठींतून सोडवलेलीं हिंदूंचीं पवित्र नगरें आणि पावनक्षेत्रें उध्वस्त करावयाला प्रारंभ केला! पहिल्यानें मथुरा नगर बळी गेलें! पण तें हुतात्म्यासारखें बळी गेलें. पांच सहस्र जाटांनीं प्राण जाईपर्यंत शत्रूच्या अगणित सैन्याशीं शौर्यानें समर केलें. मथुरेवर आपला राग काढल्यानंतर केवळ मराठ्यांच्याविषयीं तुच्छता दाखविण्यासाठीं हा मुसलमानी विजेता, गोकुळवृंदावनाला आला; पण तेथें आपल्या गोकुळनाथाचें संरक्षण करतांना लढूं किंवा मरूं अशा निश्चयानें गोळा झालेल्या चार सहस्र नग्न साधूंच्या शस्त्रधारी समूहानें प्राणांची पर्वा न करतां त्याला विरोध केला. दोन सहस्र बैराग्यांनीं रणक्षेत्रावर धारातीर्थीं शयन केलें, पण त्यांनीं शत्रूला पळवून आपल्या धर्माचें व पवित्र मंदिरांचें रक्षण करण्यांत यश मिळविलें. कारण अबदाली लवकरच आग्र्याकडे निघून गेला आणि तें नगर हस्तगत करून त्यानें तेथील गडावर मारा चढविला. उत्तर हिंदुस्थानच्या मुसलमानांपैकीं जो भाग पठाणांचा द्वेष करीत असे आणि पठाण किंवा इराणी घराण्याची स्थापना दिल्लीच्या सिंहासनावर होऊं नये, म्हणून मराठ्यांइतकाच विरोध करीत असे त्या भागाचा पुढारी वजीर गाझीउद्दीन ह्यानें त्या दुर्गाचा आश्रय केला होता आणि मराठे आपल्या सुटकेसाठीं धांवत निघाले आहेत, अशा वार्तेची प्रतिघटकेला प्रतीक्षा करीत होता.

पण ह्या वेळीं जयपुर, जोधपुर व उदेपुर येथील रजपूत आणि इतर हिंदु राजे आणि राजपुत्र तेथें काय करीत बसले होते? ते मराठ्यांचा अतिशय द्वेष

ह्या दूरवर पसरलेल्या कटाचें पुढारीपण घ्यावयाला नजीबखान आणि मलकाजमानी ह्यांची योग्य जोडी मिळाली. नजीबखान हा एक रोहिला सरदार [illegible] मक्का-
ाई
वर
ळीं
ळीं
हार
च्या
त्रें
तें.
तें.
क्षित्र
ति-
शुद्ध

ल्या
ाही
ांचें
ला
ला
धि-
ली-
लें.
ल-
णि
र्यी

पुस्तक हिंदुपद-पादशाही
लेखक
विभाग निबंध क्रमांक ८
नोंद क्र. ९९६३ मूल्य २-००
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
संदर्भ ग्रंथालय

अभिवचन मिळालें. ह्यामुळें ह्या विजयेच्छु पठाणाची महत्त्वाकांक्षा इतक्या थरापर्यंत प्रज्वलित झाली कीं, हिंदुस्थानच्या सार्वभौमत्वाचा किरीट आपण स्वतःच मिळवण्याची आणि नादिरशहाला जें करतां आलें नाहीं तें

चढवून आणण्याचीं स्वप्नें त्याला पडूं लागलीं. शके १६७८ (इ. सन १७५६) मध्यें मराठयांचे सर्व थोर सेनाधीश दक्षिणेच्या उलाढालींत गुंतून गेले आहेत असें कळतांच त्यानें बरोबर ८०००० सैन्य घेऊन सिंधुनद ओलांडला. पंजाब आक्रमून टाकला आणि जवळ जवळ विरोधाविना दिल्ली हस्तगत करून घेऊन सार्वभौम पदवी धारण केली! इतकेंच नाहीं तर पठाण विजेत्यांच्या परंपरेप्रमाणें त्याला क्रोधदेखील चढला. आणि सार्वभौमत्वाचीं चिन्हें धारण करण्याचा समारंभ, कांहीं घटका आपल्या सैन्याला दिल्लीच्या नागरिकांचा सरसकट भीषण संहार करण्याची आज्ञा देऊन, साजरा केला! त्या थोड्या घटिकांच्या अवधींत अठरा सहस्र मनुष्यें निष्कारण तरवारीला बळी पडलीं! तेथून मग त्यानें मुसलमानी धर्माचे संरक्षक ह्या आपल्या पदवीचें समर्थन करण्यासाठीं मराठ्यांनीं नुकतीच मुसलमानांच्या मगरमिठींतून सोडवलेलीं हिंदूंचीं पवित्र नगरें आणि पावनक्षेत्रें उध्वस्त करावयाला प्रारंभ केला! पहिल्यानें मथुरा नगर बळी गेलें! पण तें हुतात्म्यासारखें बळी गेलें. पांच सहस्र जाटांनीं प्राण जाईपर्यंत शत्रूच्या अगणित सैन्याशीं शौर्यानें समर केलें. मथुरेवर आपला राग काढल्यानंतर केवळ मराठ्यांच्याविषयीं तुच्छता दाखविण्यासाठीं हा मुसलमानी विजेता, गोकुळवृंदावनाला आला; पण तेथें आपल्या गोकुळनाथाचें संरक्षण करतांना लढूं किंवा मरूं अशा निश्चयानें गोळा झालेल्या चार सहस्र नग्न साधूंच्या शस्त्रधारी समूहानें प्राणांची पर्वा न करतां त्याला विरोध केला. दोन सहस्र बैराग्यांनीं रणक्षेत्रावर धारातीर्थीं शयन केलें, पण त्यांनीं शत्रूला पळवून आपल्या धर्माचें व पवित्र मंदिरांचें रक्षण करण्यांत यश मिळविलें. कारण अबदाली लवकरच आग्र्याकडे निघून गेला आणि तें नगर हस्तगत करून त्यानें तेथील गडावर मारा चढविला. उत्तर हिंदुस्थानच्या मुसलमानांपैकीं जो भाग पठाणांचा द्वेष करीत असे आणि पठाण किंवा इराणी घराण्यांची स्थापना दिल्लीच्या सिंहासनावर होऊं नये, म्हणून मराठ्यांइतकाच विरोध करीत असे त्या भागाचा पुढारी वजीर गाझीउद्दीन ह्यानें त्या दुर्गाचा आश्रय केला होता आणि मराठे आपल्या सुटकेसाठीं धांवत निघाले आहेत, अशा वार्तेची प्रतिघटकेला प्रतीक्षा करीत होता.

पण ह्या वेळीं जयपुर, जोधपुर व उदेपुर येथील रजपूत आणि इतर हिंदु राजे आणि राजपुत्र तेथें काय करीत बसले होते? ते मराठ्यांचा अतिशय द्वेष

करीत आणि हिंदुपदपादशाहीच्या महत्कार्याचें नेतृत्व धारण करण्याचा मराठ्यांचा अधिकार त्यांना मान्य नव्हता ! तर मग निश्चयानें त्यांनीं हिंदुस्थानांतील हिंदु हितसंबंधाचें संरक्षण करून आणि हिंदुधर्माच्या आणि हिंदुपदपादशाहीच्या संरक्षणार्थ एकेकट्यानें किंवा सर्वांनीं मिळून युद्ध करून, आपण मराठ्यांपेक्षां तें नेतृत्व घ्यावयाला अधिक योग्य आहोंत हें सिद्ध करण्याची हीच वेळ होती. पण त्यांच्यांपैकीं एकही जागेवरून हालला नाहीं ! लक्षावधि हिंदु लोकांनीं गजबजलेल्या त्या प्रांतांतून, अहमदशहा अबदाली नुसता चालत दिल्लीला गेला, आग्र्याला गेला आणि त्यानें उच्चस्वरानें घोषणा केल्याप्रमाणें थेट दक्षिणेपर्यंतही तो गेला असता ! मुसलमानांचा लोंढा अप्रतिहततेनें धांवत आला आणि रजपूत, जाट आणि इतर अनेक हिंदु राजपुत्र आणि संस्थानिक पहात असतांना, त्यांच्या समक्ष काफिरांचा प्रतिशोध घेण्याची मोठ्यानें गर्जना करीत हिंदूंच्या चुली, घरें, देवळें, आणि तीर्थें पायांखालीं तुडवीत गेला; पण मराठे येईपर्यंत कोणाचीही त्याच्याविरुद्ध बोट वर उचलण्याची प्राज्ञा झाली नाहीं !

पूर्वीं नादिरशहाच्या स्वारीची वार्ता आली होती, त्या वेळेप्रमाणेंच आतांच्या अबदालीच्या स्वारीच्या वार्तेनें, पुण्यांतील मराठमंडळाचे प्रमुख निराश किंवा निरुत्साह झाले नाहींत. रघुनाथरावाच्या हाताखालीं मराठ्यांचें एक बलिष्ठ सैन्य लागलीच उत्तर हिंदुस्थानांत पाठवून देण्यांत आलें. अबदालीला आग्र्याच्या जवळ असतांना ही वार्ता समजली. तो अनुभवी आणि कुशल सेनापति होता आणि आपल्या आयुष्यांत कांहीं वेळेला अपजयाचाही त्यानें अनुभव घेतला होता. असल्या शत्रूकडून विरोधाची एवढी सिद्धता झाल्यावर, पुढें पाऊल टाकण्यांत घात आहे हें त्यानें त्वरित ओळखलें आणि त्याचा गुरु जो नादिरशहा त्याच्याप्रमाणेंच, नसत्या पराजयाला आव्हान देऊन हातांत आलें होतें तेवढें फळ न घालविण्याचें त्यानें ठरविलें आणि म्हणून लागलीच तो परत फिरला. दिल्लीला गेला, मोगलांच्या सिंहासनावरील आपला अधिकार बळकट करण्यासाठीं मलकाजमानीच्या मुलीशीं लग्न केलें; सरहिंदच्या बचावाकरितां दहा सहस्र रक्षकांची तुकडी ठेवली आणि त्याचा मुलगा तैमूरशहा ह्याला लाहोरचा सुभेदार नेमून ज्या त्वरेनें तो हिंदुस्थानांत उतरून आला होता त्याच त्वरेनें परत निजदेशाला चालता झाला.

दक्षिणेकडील कारभारांत मराठ्यांना गुंतून रहावें लागलें असतांही, ते

त्वरेनें अबदालीनें जें जें केलें, तें तें मोडीत शक्य तितक्या त्वरेनें आक्रमण करूं लागले. सखाराम भगवंत, गंगाधर यशवंत आणि इतर मराठी सेनानायक ह्यांनीं दुआबांत प्रवेश केला; आणि मध्यंतरीं मराठ्यांविरुद्ध उठलेल्या पठाणांच आणि रोहिल्यांचा त्यांनीं मोड केला. वजीर गाझीउद्दीनाची सुटका करण्यांत आली. विठ्ठल शिवदेव दिल्लीवर चालून गेले आणि पंधरा एक दिवस निकराचा संग्राम करून राजधानी त्यांनीं जिंकली आणि मराठ्यांचा सर्वांत मोठा वैरी आणि पठाणी कटाचा मुख्य प्रोत्साहक नजीबखानाला जिवंत धरलें. तेथून मराठे अबदुलसय्यद ह्याच्या हाताखालीं सरहिंद येथें ठेवलेल्या दहा सहस्र सैनिकांशीं लढण्याकरितां पुढें गेले आणि त्यांचा पूर्ण मोड करून त्यांच्या नायकालाही बंदिवान् केलें. इतकें झाल्यावर आतां थेट लाहोरपर्यंत चालून जावयाचा त्यांनीं निश्चय केला. मराठ्यांच्या ह्या एकामागून एक मिळालेल्या विजयांनीं, अबदालीच्या वतीनें पंजाब आणि मुलतान येथें अधिकार चालवणारा अबदालीचा सुभेदार आणि पुत्र तैमुरशहा हा इतका भिऊन गेला कीं, त्याच्याच्यानें त्यांच्याशीं रणांगणावर दोन हात करावयाचें धैर्यच झालें नाहीं. तो निघून गेला आणि रघुनाथरावानें विजयानें लाहोरमध्यें प्रवेश केला. जहानखान आणि तैमुर ह्यांनीं कौशल्यानें आणि सुव्यवस्थित रीतीनें माघार घ्यावयाचा प्रयत्न केला. पण मराठे इतक्या त्वरेनें त्यांचा पाठलाग करीत येऊन पोहोंचले कीं, त्या माघारीचें रूपांतर एकदम पलायनांत झालें. मराठ्यांना चिरडून टाकण्याच्या आणि हिंदुस्थानचें साम्राज्य जिंकून मिळविण्याच्या उद्देशानें जो आला होता त्याच्या सैन्याला आणि मुलाला प्राणाहून अल्पमोल असें जें जें होतें तें सारें टाकून देऊन मराठ्यांच्या पुढें अपमानास्पद पलायनाचा आश्रय करून जीव वांचवतां आला. त्यांचा सेनानिवास लुटला गेला आणि अमूप द्रव्य आणि युद्धसामुग्री मराठयांच्या हातांत पडली. आणि श्रीरामदासस्वामींनीं शिवाजीमहाराजांच्या स्वाधीन केलेला भगवा झेंडा, सरते शेवटीं हिंदुस्थानच्या प्रत्यक्ष उत्तर सीमाप्रांतावर रोवला गेला.

हिंदु अटकेपर्यंत जाऊन पोहोंचले. पृथ्वीराज पडले त्या करंट्या दिवसानंतर पहिल्यानेंच विजयी हिंदुध्वजा वेदांतील पवित्र सरतेवर गर्वभरानें फडकूं लागली. हिंदु विजयशाली घोड्यांनीं सिंधुनदाच्या स्फटिकाप्रमाणें स्वच्छ जलांतील आपल्या प्रतिबिंबाचें धीटपणानें निरीक्षण करीत त्या जलाचें प्राशन केलें !

आपल्या सैन्याच्या ह्या उज्ज्वल पराक्रमाची वार्ता महाराष्ट्रांत कळतांच सर्व

राष्ट्रांत विद्युत्संचार झाला. अंताजी माणकेश्वरानें राघोबादादांना लिहिलें, "लाहोर घेतलें; शत्रूचा पाठलाग करून त्याला सीमापार घालवून दिलें; आपलें सैन्य सिंधुनदापर्यंत जाऊन पोहोंचलें. अत्यंत आनंदाची गोष्ट. त्यामुळें उत्तरेकडील सर्व असंतुष्ट लोकांची राजांची आणि रावांची; सुभेदारांची आणि नबाबांची मान खालीं झाली आहे. राष्ट्राच्या केलेल्या अपराधांचें प्रायश्चित्त केवळ मराठ्यांनाच देतां आलें. त्यांनीं एकट्यांनींच संपूर्ण हिंदुस्थानचा प्रतिशोध अबदालीवर उगवला. अंतःकरणांतील भरलेल्या वृत्ति शब्दीं लिहून दाखवतां येत नाहींत. अगदीं शौर्याचींच, अवतारकृत्याइतक्या शौर्याचीं कृत्यें हातून झालीं!"

आपण संपादिलेल्या यशानें मराठे स्वतःच चकित होऊन गेले. यांत कांहीं आश्चर्य नाहीं. द्वारकेपासून जगन्नाथपर्यंत व रामेश्वरापासून मुलतानपर्यंत त्यांची तरवार विजयी ठरली होती, त्यांचा शब्द म्हणजे राजाज्ञा झाली होती. त्यांनीं उघडपणें हिंदुस्थानी साम्राज्याचें आपण संरक्षक आणि उत्तराधिकारी आहोंत असें प्रसिद्ध केलें आणि इराण, तुराण किंवा अफगाणिस्थानांतून, इंग्लंड, फ्रान्स किंवा पुर्तुगालांतून जे जे झगडण्यासाठीं पुढें आले त्यांच्या त्यांच्या विरुद्ध आपल्या अधिकाराचें समर्थन केलें. शिवाजीमहाराजांचें हिंदुपदपादशाहीचें स्वीकृत कार्य जवळ जवळ शेवटाला गेलें. श्रीरामदासांच्या शिकवणीचें प्रत्यक्ष कार्यामध्यें रूपांतर झालें. मराठ्यांनीं थेट सिंधुनदाच्या तटापर्यंत विजयभरानें हिंदुध्वजा नेऊन पोंचवली आणि शाहूनें बाजीरावांना आज्ञा केली होती त्याप्रमाणें त्याच्याही पलीकडे ते ती घेऊन जाण्याचा संभव दिसूं लागला.

कारण, अटक मराठ्यांच्या हातांत आल्याबरोबर एकदम त्यांच्या वर्चस्वक्षेत्राच्या मर्यादा विस्तारित झाल्या आणि त्यांच्या राजकीय उलाढालीचें क्षितिज अधिक दीर्घ झालें. आतां त्याला दिल्लीच्या चार भिंतींच्या आंत आपल्याला कोंडून घेणें शक्य राहिलें नाहीं. मराठ्यांच्या सेनानिवासांत काश्मिराहून, कंदाहारहून आणि काबूलहून हस्तकांचा, वकिलांचा आणि प्रतिनिधींचा पूर लोटला. आपल्या अधिकाराच्या गादीवरून आपल्याला काढून टाकल्याबरोबर हिंदु राजांनीं काबूलहून आणि इराणांतून मुसलमानांचें साह्य मागावें असा एक काळ होता. आतां ती परिस्थिति अगदीं उलटी झाली. आतां काबूल आणि कंदाहार येथील असंतुष्ट आणि अन्यायपीडित मंडळींकडून राघोबादादांच्या राजसभेंत प्रतिदिनीं विनंतिपत्रें आणि

अर्ज येऊं लागले! शके १६८० चैत्र व १२ (ता. ४ मे १७५८) मध्यें नानासाहेबांचे सेनापति त्यांना लिहितात, "सुलतान तैमुर आणि जहानखान ह्यांच्या सैन्याचें निर्मूलन झालें आणि त्यांच्या सर्व सामानासह त्यांचा सेनानिवास आपल्या हातांत पडला. अगदीं थोड्या लोकांनाच अटक ओलांडून आपला जीव वांचवितां आला. इराणच्या शहानें अब्दालीचा पराभव केला आहे आणि आपण पुढें कंदाहारला चाल करून यावें असें मला स्वतः आग्रहाचें पत्र पाठविलें आहे. आणि त्यानें तिकडून व आपण इकडून अशा रीतीनें दोन्ही सैन्यांच्या मध्यें अब्दालीची दामटी वळली, म्हणजे अटक ही मराठी राज्याची सीमा म्हणून तो मान्य करावयाला सिद्ध आहे, असें त्यानें कळविलें आहे. पण आपण अटकेची सीमारेषा कां मानावी हेंच मला समजत नाहीं. अकबराच्या आणि औरंगजेबाच्या वेळेपासून काबूल आणि कंदाहार हे दोन्ही प्रांत हिंदुस्थानच्या साम्राज्यांत मोडतात, मग आपण आतां ते परकीयांच्या हातीं जाऊं द्यावयाचें काय कारण? इराणचा शहा आपली दृष्टि आपल्या पुरतीच ठेवील आणि काबूल आणि कंदाहारवरील आपल्या स्वामित्वाच्या आड तो येणार नाहीं असा माझा तर्क आहे! पण त्याची संमति असो किंवा नसो, ह्या दोन्ही प्रांतांना आपल्या साम्राज्याचेच भाग म्हणून समजून चालावयाचें आणि त्यांवर आपला अधिकार चालवावयाचा असें ठरविलें आहे. अबदालीच्या राज्यावर अब्दालीचा पुतण्या अधिकार सांगतो. तो अबदालीच्या विरुद्ध आपल्याला साह्य करावें अशी आग्रहाची विनवणी करण्यासाठीं आपल्याकडे आला आहे. सिंधुनदाच्या पैलतीरावर जे आपल्या साम्राज्याचे प्रांत आहेत त्यांवर आपला सुभेदार म्हणून त्याचीच नेमणूक करावी आणि त्याच्या साहाय्यासाठीं कांहीं सैन्य धाडावें असा माझा विचार आहे. सध्यां मला तांतडीनें दक्षिणेकडे यावें लागतें आहे. तरी माझ्या जागीं येणाऱ्या सेनापतीनें हीं मोठालीं कारस्थानें फलद्रूप होतील आणि काबूल आणि कंदाहारच्या प्रांतांत आपला प्रत्यक्ष अधिकार चालू होईल अशी काळजी घ्यावी."

## प्रकरण १२ वें

# हिंदुपदपादशाही

इराणपासुनि फिरंगाणपर्यंत शत्रुची उठे फळी
सिंधुपासुनी सेतुबंधपर्यंत रणांगण भू झाली।
तनि खंडिच्या पुंडाची ती परंतु सेना बुडवीली
सिंधुपासुनी सेतुबंधपर्यंत समरभू लढविली ! ॥

—महाराष्ट्रभाट.

वरील पत्र लिहिल्यावर लवकरच पावसाळ्याला प्रारंभ व्हावयाची वेळ आल्यामुळें आपलें सैन्य घेऊन राघोबादादा त्वरेनें दक्षिणेकडे परत गेले. पण ह्याप्रमाणें नवीन जिंकलेल्या प्रांतांच्या रक्षणार्थ अपुरें सैन्य ठेवून त्यांना निघून यावें लागावें; ही दुर्दैवाची गोष्ट होती; आणि ह्यापेक्षांही हिंदुपद-पादशाहीला अधिक विघातक अशा एका प्रकरणाचा उलगडा समाधान-कारक रीतीनें केला गेला नव्हता. पठाणी कटाचा अत्यंत उलाढाली पुढारी नजीबखान रोहिला ह्याला त्यानें मराठी सत्तेच्या विरुद्ध अबदालीला उठवि-ण्यांत त्यांच्याशीं जो विश्वासघाताचा कट केला, त्यासाठीं प्राण देऊन त्याला प्रायश्चित करावयाला लावावें अशी सर्व मराठ्यांची इच्छा असतांनाही आणि तो बंदिवान् म्हणून मराठ्यांच्या हातांत सांपडल्यावर देखील त्याला सोडून देण्यांत आलें ! पण हा लबाड पठाण म्हणजे कसलेला नट होता. त्यानें सहस्रवार क्षमायाचना केली, मल्हाररावांना आपला बाप म्हणून संबोधूं लागला आणि पश्चात्तापानें होरपळून गेलेल्या आपल्याला स्वतःचा पुत्र समजून जीवदान द्यावें, म्हणून त्यांची करुणा भाकली. मराठ्यांच्या कार्याचें शत्रुत्व केल्यामुळें जे वधाच्या शिक्षेला पात्र झाले असतील, अशा कोणा-लाही आपला पुत्र मानून घ्यावयाला मल्हारराव नेहमींच तत्पर असत ! त्यानें नजीबखानाला सोडण्याकरितां इतका आग्रह धरला कीं, त्यासाठीं राघोबादादांना आपल्या मनाच्या अगदीं विरुद्ध संमति द्यावी लागली. नजिबानें आपलें पश्चात्तापानें पोळलेलें आयुष्य ज्यांनीं त्याला इतक्या मूर्खपणानें जीव-दान दिलें त्यांच्याच विरुद्ध भयंकर कारस्थानांची चिथावणी करण्यांत कसें घालविलें हें लवकरच दृष्टोत्पत्तीला येणार आहे !

हा वेळपर्यंत मराठे सर्व उलाढाली राजनीतीचा डाव ह्या दृष्टीनें अल्प किंवा अधिक प्रमाणांत दिल्लीच्या बादशहाच्या नांवानें करीत होते. तो अल्पतम विरोध उत्पन्न करणारा मार्ग होता आणि तो त्यांच्या चांगलाच उपयोगीं पडला. त्या वेळचें मराठयांचें स्थान म्हणजे शके १७३९ (इ. सन १८१८) मध्यें मराठ्यांचा पराजय होण्याच्या आधीं, हिंदुस्थानांत इंग्रजांचें जें स्थान होतें त्याप्रमाणें होतें. ज्या राजकीय आणि डावपेंचाच्या कारणासाठीं अगदीं शके १७७९ (इ. सन १८५७) पर्यंत म्हणजे ते स्वतःच हिंदुस्थानचे वास्तविक सम्राट् बनले असतांना, इंग्रज आपण दिल्लीच्या बादशहाचे हस्तक आहोंत असें सोंग घेऊन, कारभार करीत त्याच कारणाकरितां मराठयांनीं राजकीय आक्रमणाच्या मार्गांत धिम्मेपणा धरला. कारण ,मराठयांनीं इतक्यांतच स्वतःला सार्वभौम म्हणून घेतलें असतें तर केवळ हिंदुस्थानच्या मुसलमानांकडूनच नव्हे तर इंग्रज, फ्रेंच, पठाण आणि प्रत्यक्ष हिंदु राजे ह्यांच्याकडूनसुद्धां विरोधाचें वादळ उठलें असतें. कारण, ह्यांपैकीं प्रत्येकाची, मरणोन्मुख झालेल्या बादशाहीच्या मुकुटावर आणि वारशावर वक्र दृष्टि होती. पण तिनें बाकीचे उत्तराधिकारासाठीं टपून बसलेले प्रतिस्पर्धी, आपोआप नाहींसे होईपर्यंत आणि त्यायोगानें अनायासें ती आपल्या भक्ष्यस्थानीं पडेपर्यंत तिनें आपल्या मृत शय्येवर रेंगाळत पडावें अशी प्रत्येकजण इच्छा करीत होता.

पण उत्तरेकडील हे मोठमोठाले विजय आणि ह्यांच्या जोडीला प्रत्यक्ष पंतप्रधानांनीं दक्षिणेकडे संपादिलेलें यश, ह्यांच्या योगानें मराठी सत्तेची प्रतिष्ठा इतकी वाढली कीं, बाळाजीपंत आणि सदाशिवराव भाऊंनाच नाहीं, तर महाराष्ट्रांतील रस्त्यानें फिरणाऱ्या एकाद्या सामान्य माणसालाही आपण स्वीकारलेल्या महत्कार्यावर तो शेवटचा कळस चढविण्याला आपण समर्थ आहों असा आत्मविश्वास वाटूं लागला. मराठमंडळाच्या मंत्रिसभेंत चर्चेसाठीं मोठमोठाल्या योजना येऊं लागल्या. आपल्या शक्तीची रग त्यांना वाटत होती. हिंदुस्थानांतील मुसलमानी बादशाहीवर आपण अंतकारक घाव घातला ही त्यांना जाणीव होती. मराठी राज्याचें नांव हिंदुस्थानांत कोंडून न राहतां आशियाखंडभर गाजलें आहे आणि पुणें हें हिंदुस्थानच्याच नाहीं, तर समग्र आशियाखंडाच्या राजकारणाचें केंद्र होऊं लागलें आहे, हें त्यांना दिसत होतें. मोगल बादशाही छिन्नविच्छिन होऊन त्यांच्या

पायापाशीं पडली होती; आतां त्यांनीं उघडपणें सार्वभौमत्वाचा किरीट स्वतःच्या शिरावर धारण करण्याचें अंतिम कार्य करण्याच्या आड अद्यापिही जें जें कांहीं येण्याचा संभव होता, तें सर्व काढून टाकावयाचा निश्चय केला. सदाशिवरावभाऊंची मराठमंडळांतील दुसऱ्या कोणाही पुढाऱ्यापेक्षां हें महत्कार्य करण्यासाठीं ईश्वराकडून आपली योजना झाली आहे अशी भावना होती आणि तें घडवून तरी आणावयाचें, नाहीं तर त्यासाठीं लढत असतां प्राण समर्पण करावयाचे हा त्यांचा निर्धार झाला होता. मराठ्यांनीं मोगल बादशाहीचें पतन घडवून आणलें होतें. हिंदूंनीं आपल्या जेत्यांवर जय मिळविला होता. आणि भाऊंच्या प्रभावशाली वक्तृत्वानें प्रज्वलित होऊन, त्यांनीं अशा रीतीनें उद्योग करावयाचें ठरवलें कीं, त्यानें पुढील थोड्या वर्षांच्या अवधींतच सर्व हिंदुस्थान स्वतंत्र व्हावें आणि तें उघडपणें आणि प्रत्यक्ष हिंदु सत्तेच्या हातांत राहावें.

हा हेतु दृष्टीपुढें ठेवून तीन स्वाऱ्यांचे बेत ठरविण्यांत आले. पहिल्यानें दत्ताजी शिंद्यांनीं पंजाब व मुलतान प्रांतांत निघून जावें आणि त्या नवीन जिंकलेल्या प्रदेशांत सुव्यवस्था स्थापावयाची आणि पद्धतशीर राज्यकारभार चालू करावयाचा अशी त्यांना आज्ञा झाली. हें कार्य झाल्यावर त्यांनीं खालीं काशी आणि प्रयागाकडे उतरून यावयाचें आणि तेथें राघोबांनीं दुसरें एक मोठें सैन्य घेऊन त्यांना मिळावयाचें; नंतर मराठ्यांच्या ह्या संयुक्तदलांनीं बंगालवर चालून जावयाचें आणि थेट समुद्रापर्यंत तो संपूर्ण प्रांत, ज्यांनीं नुकतीच ( इ. सन १७५७ ) प्लासीची लढाई जिंकली होती आणि त्या विजयानें आपणच हा प्रांत बळकावून बसलों अशा उड्या ज्यांचें मन मारूं लागलें होतें, त्या इंग्रजांना आणि मुसलमानांना तेथून घालवून स्वतंत्र करावयाचा. ह्याप्रमाणें सिंध आणि मुलतानपासून पूर्वसमुद्रापर्यंत संपूर्ण उत्तर हिंदुस्थान निःशत्रु करावयाचा कार्यभार दत्ताजी, जनकोजी आणि राघोबा ह्यांच्यावर सोंपवला होता; तसाच आपला पुत्र विश्वासराव आणि भाऊ सदाशिवराव ह्यांच्या समवेत संपूर्ण दक्षिण हिंदुस्थान स्वतंत्र करावयाचा भार स्वतः बाळाजीपंतांनीं आपल्या शिरावर घेतला होता.

ह्या बेताप्रमाणें आपलें सैन्य घेऊन दत्ताजी शिंदे उत्तरेकडे निघाले. बाळाजींनीं आणि भाऊंनीं दक्षिणेंत निजामाचा समाचार घेऊन त्याला केवळ नामधारी बनवून ठेवावयाचें कार्य पहिल्यानें हातीं घेतलें. अगदीं नवीन

सुधारणांनीं सज्ज असा तोफखाना आणि बलिष्ठ सैन्य हाताखालीं घेऊन ते निजामावर चालून गेले आणि निरनिराळ्या हालचाली आणि युद्ध करून शेवटीं शके १६८२ (इ. सन १७६०) मध्यें उदगीरचा बिनतोड विजय संपादन केला. मुसलमानी सैन्याचें पूर्णपणें निर्मूलन झालें आणि निजाम इतका नम्र झाला कीं, त्यानें आपली राजमुद्रा भाऊंकडे पाठवून दिली आणि विजयी मराठ्यांनीं घालून दिलेल्या वाटेल त्या करारावर आपण संमतिचिन्ह करावयाला सिद्ध आहों असें त्यांना कळविलें ! तेव्हां निजामाशीं संधि करण्यांत आला आणि ह्या संधीनें नगर, ब्र्हाणपुर, साल्हेर, मुल्हेर, अशीरगड आणि दौलताबाद हे प्रसिद्ध दुर्ग आणि नांदेड, फुलंब्री, आंबेड आणि विजापुरचे चार प्रांत मराठ्यांच्या स्वाधीन करण्यांत आले. आलेल्या यशानें भाऊंचें सुद्धां समाधान झालें. " निजामाची राजसत्ता म्हणून आतां गणना करावयाचें कारण राहिलें नाहीं. मग उत्तर हिंदुस्थानचाच प्रश्न राहिला. हें वर्ष संपण्याच्या आंत सर्व दक्षिण हिंदुस्थान स्वतंत्र होईल!" शेवटीं एकदां शिवाजी महाराजांनीं तोरणा घेतला आणि हिंदु अभ्युत्थानाची ध्वजा उघडपणें उभारली त्या वेळीं जेथले सुलतान क्षुद्र बंडखोर म्हणून त्यांना तुच्छतेनें हासले त्या नगर आणि विजापुरच्या जिंकून घेतलेल्या मुसलमानी राजधान्यांवर मराठ्यांच्या ध्वजा फडकूं लागल्या.

एवढें सांग्रामिक आणि राजनैतिक महत्कृत्य संपादन केल्यावर उदगीरच्या विजेत्याचा हैदरअल्लीवर चालून जाऊन त्याचा मोड करावयाचा विचार होता. हैदरअल्लीनें म्हैसूरला वेढा घातला आणि तेथील पुरातन हिंदु राज्य संपुष्टांत आणावयाच्या हेतूनें तो आपल्याला तेथला राजा म्हणवूं लागला. तेव्हां तेथील हिंदु राजानें आणि त्याच्या प्रधानानें ह्या नवीन साहसी मुसलमानी उपटसुंभापासून आपलें संरक्षण करावें म्हणून मराठ्यांना व्यक्तिगत आणि आग्रहाची विनवणी केली. ही संधि साधून हैदरअल्लीला मोडून टाकावें आणि दक्षिण हिंदुस्थान स्वतंत्र करण्याचें आपलें कार्य शेवटास न्यावें म्हणून अत्यंत उत्सुक असलेल्या भाऊसाहेबांनीं एकदम हैदरवर चाल करून जावयाचा विचार केला. पण इतक्यांत उत्तरेकडून पंतप्रधानांना अत्यंत चिंतादायक वृत्तान्ताचें पत्र आलें. भाऊ ह्या वेळेला लिहितात, " यशाचा पेला मी अगदीं ओंठाला लावीत असतांना माझ्या हातांतून काढून घेतला गेला !"

दत्ताजीच्या हाताखालील मराठ्यांचें उत्तरेकडचें सैन्य शके १६७० (इ. सन १७५८) मध्यें दिल्लीला जाऊन पोंचलें. तेथून ठरल्याप्रमाणें लाहोर आणि मुलतानच्या नवीन जिंकलेल्या प्रांतांची व्यवस्था लावण्यासाठीं दत्ताजी तिकडे गेले. त्यानीं थेट अटकपर्यंत त्या प्रांतांचा कारभार करण्यासाठीं साबाजी शिंदे आणि त्रिंबक बापूजी ह्यांची नेमणूक केली आणि सरहिंद, लाहोर आणि इतर महत्त्वाचीं स्थानें सैन्य ठेवून बळकट केलीं. आणि मग गंगानदी उतरावयाची, पाटण्यावर चालून जावयाचे, तेथें इंग्रजांचा समाचार घ्यावयाचा आणि हिंदूंचें राज्य समुद्रापर्यंत वाढवावयाचें हें त्याला नेमून दिलेलें दुसरें कार्य हातांत घेण्यासाठीं तें सैन्य पंजाब सोडून खालीं उतरलें.

पण एथें नजीबखानासंबंधाचा पंतप्रधानांचा स्पष्ट निर्देश न पाळण्यांत त्यांनीं फार भयंकर चूक केली. शिंद्यांनीं त्याचें कडक पारिपत्य करावयाच्या स्थलीं त्यानें बंगालवरील आपल्या बेतांना साह्य करावयाच्या व निष्ठापूर्वक सेवा करावयाच्या दिलेल्या पोकळ व ढोंगी वचनांवर विश्वसून त्याला आपली सत्ता आणि वर्चस्व अधिक वाढवावयाची प्रत्यक्ष मोकळीक दिली. पंतप्रधानांनीं अगदीं रागावून लिहिलें "आपण त्याला बक्षीगिरी मिळवून दिली तर नजीब ३० लक्ष रुपये द्यावयाचे वचन देतो आहे असें आपण लिहितां; ऐशास त्याच्या कपर्दिकेला स्पर्श करूं नये. नजीब म्हणजे अर्धा अबदाली, त्यावर अगदीं विश्वास ठेवूं नये. हलकट आणि विश्वासघाती सर्पाला दूध पाजणें उपयोगाचें नाहीं!" पण त्या कसलेल्या वंचकानें दत्ताजींला अगदीं मोहनी घालून टाकली होती त्यामुळें ते गंगा उतरून जाण्यासाठीं नावांचा पूल करून द्यावयाच्या त्याच्या वचनावर विश्वसून वाट पहात बसले! अशा रीतीनें नजीबानें दोन उद्देश साधले. एकीकडे मराठ्यांची बंगालवरील स्वारी थोपवून धरली आणि दुसरीकडे मराठ्यांच्या विरुद्ध गुप्तपणानें पहिल्यापेक्षां अतिशय बलिष्ठ असें कट संघटित करावयाला लागेल तितकी संधि मिळवली आणि अबदालीनें पुनः यत्न करावा आणि हिंदुस्थानावर आणखी एक स्वारी करावी अशा आशयाचीं स्वतःच्या हातचीं पत्रें पाठवावयाला प्रत्यक्ष मोगल बादशहाचें मन वळविण्यांत यश मिळविलें. धर्माच्या, अल्लाच्या आणि मुसलमानांना जें जें कांहीं पवित्र वाटतें त्याच्या त्याच्या नांवावर पठाणांचें धर्मवेड जागृत करण्यासाठीं क्षोभदायक विनंतिपत्रें जाऊं लागलीं! धर्मसंरक्षकाची पदवी प्राप्त करून घेण्यासाठीं, गाझी बनण्यासाठीं आणि मूर्तिपूजक काफिरांच्या मगरमिठींतून

हिंदुस्थानांतील मुसलमानी बादशहाची मुक्तता करण्यासाठीं अबदाली येणार नाहीं का ? अबदालीसुद्धां त्याच्या मुलाच्या केलेल्या पराभवांनीं आंतल्या आंत चडफडत होता. मराठयांनीं हिंदुस्थानचा बादशाही किरीट त्याच्यापासून हिरावून नेला. इतकेंच नाहीं तर त्यांनीं त्याला पंजाब आणि मुलतानमधून घालवून दिलें आणि आपल्या हिंदी साम्राज्याचे विभाग म्हणून ते प्रत्यक्ष काबूल आणि कंदाहार हे प्रांतही मागूं लागले. तरीही त्यांचें उट्टें काढण्यासाठीं त्याला कांहींही करतां आलें नाहीं. पण आतां पुनः आणि तीही, पूर्वींच्या कोणच्याही वेळेपेक्षां अधिक आशादायक प्रसंगीं आपल्याला अमूप संधि प्राप्त झाली आहे हें त्यानें ओळखलें. हिंदुस्थानचा सार्वभौम मुकुट मिळविण्याकरितां पुढें व्हावयाला आणि जवळ जवळ सिद्धीस येऊन पोहोंचलेली हिंदुस्थानांत हिंदुपदपादशाही स्थापन करावयाचा मराठयांचा महत्त्वाकांक्षी बेत हाणून पाडावयाला तो पुनः एकदां सिद्ध झाला. अबदालीनें अत्यंत आनंदानें मुसलमानी कूटाचें पुढारीपण स्वीकारावयाचें मान्य केलें आणि प्रबळ सैन्य बरोबर घेऊन सिंधुनद उतरून विद्युद्वेगानें लाहोरला पोहोंचून त्यानें तें नगर हस्तगत केलें !

अबदालीच्या स्वारीची वार्ता दिल्लीला पोंचतांच नजीबखानानें घेतलेलें सोंग पार झुगारून दिलें आणि तो आपल्याला उघडपणें अबदालीचा शपथबद्ध पक्षपाती म्हणून म्हणवून घेऊं लागला. आतां आपण पंतप्रधानांच्या उपदेशाप्रमाणें न चालण्यांत भयंकर चूक केली हें दत्ताजीच्या लक्ष्यांत आलें. त्याबरोबरच नजीबखान आणि सुजाउद्दवला ह्यांनीं आपल्याला कसें पूर्णपणें चकवलें आणि आपण शत्रूच्या दोन बलिष्ठ सैन्यांच्या मध्यें कसे सांपडलों गेलों आहों हेंही त्याला समजून आलें. त्याच्या एका बाजूला सुजा होता, दुसऱ्या बाजूला नजीबखान, रोहिले आणि पठाण होते आणि पाठीमागून मोठें सैन्य घेऊन अबदाली स्वतः चाल करून येत होता. अबदालीच्या प्रचंड सेनेपुढें अटक आणि लाहोर येथें ठेवलेल्या मराठयांच्या अल्प सैन्याला साहजिकच माघार घ्यावी लागली. मराठयांच्या व्यतिरिक्त कोणा हिंदुसत्तेनें उत्तर हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या अधिकाराला एकसारखा विरोध केला असेल तर तो नवीनच उदयाला येणाऱ्या शिखांनीं होय. ह्या शूर लोकांनीं आपल्या देशावर चालून आलेल्या परकी शत्रूवर आघात करण्याच्या आणि त्याला विरोध करण्याच्या दृष्टीनें शक्य तितका

प्रयत्न केला. पण अद्याप एका सुसंघटित सत्तेमध्यें त्यांचें पुरतें परिवर्धन देखील व्हावयाचें होतें आणि अजून त्यांना स्वतःचा सर्व प्रांत परकीयांच्या पासून स्वतंत्र करतां आला नव्हता. तो दिवस अद्याप यावयाचा होता. तेव्हां वाटेंत विशेष अडथळा न होतांच अबदाली आपलें सैन्य घेऊन त्वरेनें सरहिंदला येऊन पोंचला. उत्तरेकडील राजपुतान्यांतील आणि इतर प्रांतांतील हिंदु राजांपैकीं बहुतेकांची तर मथुरेचा नाश करणाऱ्या, हिंदु मात्राचा उभा द्वेष करणाऱ्या अबदालीविषयीं प्रत्यक्ष सहानुभूति होती! अबदालीमध्यें आणि दिल्लीच्या बादशाही सिंहासनामध्यें जर कोणचा एकादा अडथळा असेल तर तो दत्ताजीच्या हाताखालील मराठ्यांच्या एका तुकडीचा होता. दत्ताजीनें होळकरांना पत्रदर्शनीं आपल्या साहाय्यार्थ चाल करून येण्याविषयीं लिहिलें. पण त्या वीराला, नजीबाच्या त्या मानलेल्या पित्याला त्यापेक्षां इकडच्या तिकडच्या लहान लहान संस्थानिकांशीं झगडा करण्यांत वेळ घालवणें अधिक इष्ट वाटलें! अशा रीतीनें शत्रूच्या मोठ-मोठ्या सेनेनें चोहों बाजूंनीं कोंडलें गेल्यावर त्या मराठ्यांच्या तुकडीला स्वतःला वांचवावयाचा एकच मार्ग शक्य होतो आणि तो म्हणजे दिल्ली सोडावयाची आणि माघार घ्यावयाची. दत्ताजीजवळच्या अनुभवी आणि निधड्या छातीच्याही प्रत्येक व्यक्तीनें दत्ताजीला माघार घेऊन होळकर येऊन मिळेपर्यंत वाट पहावयाचा उपदेश केला. तो तरुणगडी जनकोजी ह्यानेंही आपल्या चुलत्याची त्यांनीं माघार घ्यावी म्हणून विनवणी केली! पण दत्ताजी कोणाचेंही ऐकेना. ह्या भयंकर संकटांत आपल्या सैन्याला टाकावयाला आपण आपल्या मूर्खपणानें कारण झालों ही जाणीव त्याच्या मनाला फार खाऊं लागली. •मराठ्यांचा मुख्य शत्रु जो नजीब त्याच्यावर विश्वास टाकून त्याला हातांतून सोडण्यांत हातून घडलेल्या मूर्खपणाला आणखी भित्रेपणाची तरी जोड द्यावयाची नाहीं असा त्यानें निश्चय केला. ज्यानें ज्यानें परत फिरण्याविषयीं त्यांना मंत्र दिला त्याला त्याला त्यानीं एकच उत्तर दिलें " ज्याला जावयाचें असेल त्यानें निघून जावें, मी कोणालाही आग्रह करीत नाहीं. पण मी मात्र माझ्या जागेला चिकटूनच राहणार. आतां ह्या जन्मांत मी माझें हें तोंड नानांना आणि भाऊंना कसें दाखवूं? मी अबदालीशीं सामना देणार आणि ईश्वराच्या कृपेनें त्याचा रणांगणांत पराभव तरी करणार किंवा तो प्रयत्न करतांना लढत मरणार!"

मध्यंतरीं आपल्याला वाजिरविरून काढून टाकावयाच्या आणि साधल्यास मारावयाच्या पठाणी कटांत बादशहाचेंही अंग होतें असा गाझिउद्दीनाला शोध लागला. त्यानें लागलींच बादशहाला बाहेर नेलें, त्याची हत्या केली, दुसरें एक बाहुलें दिल्लीच्या सिंहासनावर बसवलें आणि तो मराठ्यांना येऊन मिळाला

अबदालीशीं कुरुक्षेत्राच्या रणभूमीवर गांठ घेऊन दत्ताजीनें आपला शब्द खरा केला. त्याचें अलौकिक शौर्य पाहून मराठी सैन्यांत इतका उत्साह संचरला कीं, त्यानें अबदालीला मागें हटावयाला लावलें. त्याच्याच्यानें एकट्यानें शिंद्याच्या विरुद्ध अधिक वेळ टिकाव धरणें अशक्य आहे ह्याची त्याला जाणीव करून दिली. तेव्हां त्यानें यमुना उतरून जावयाचा प्रयत्न केला आणि त्यांत यशस्वी होऊन तो शुक्रताळाजवळ नजीबखानाच्या सैन्याला येऊन मिळाला. तेथेंच त्याची आणि सुजाचीही गांठ पडली आणि तितक्यांत अहंमदखान बंगष आणि कुतुबशहा हेही आले. अशा रीतीनें आजपर्यंत केव्हांही जमलें नाहीं एवढें मुसलमानांचें कूट एकत्र जमा झालें. दत्ताजीच्या हाताखालच्या लहान तुकडीला हा लोंढा थोपवून धरणें शक्य नाहीं हें आतां अगदीं स्पष्ट होतें. पुनः दत्ताजीच्या हितचिंतकांनीं त्यानें मागें परतावें म्हणून त्याची मनधरणी केली. "ज्याला पाहिजे त्यानें निघून जावें. दत्ताजीला सैनिकाचें कर्तव्य बजावलेंच पाहिजे" अशा सेनापतीच्या तोंडांतून असले शब्द निघाल्यावर त्यांचा इष्ट तो परिणाम झाल्याविना कसा राहणार ? त्याला सोडून कोणीही गेलें नाहीं. शके १६८१ फाल्गुन (इ. सन १७६० मार्च) ला यमुनेचा घाट लढविण्यासाठीं आणि यमुना उतरून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या अबदालीच्या सैन्याला अडवण्यासाठीं मराठे बाहेर पडले. युद्धाला प्रारंभ झाला. बयाजी, मालोजी, मराठ्यांकडील एकामागून एक पुढारी असंख्य सैन्याशीं तोंड देऊन शूरपणानें लढला आणि रणशय्येवर पडला ! दोन्ही बाजूंचीं सैन्यें एकांत एक मिळून गेलीं आणि एकमेकांला प्रहार करूं लागलीं. योगायोगानें मराठ्यांचा भगवा झेंडा रोहिल्यांच्या आणि पठाणांच्या एकत्र झालेल्या सैन्याच्यामध्यें सांपडला. तो सोडवण्यासाठीं मराठे तुटून पडले. युद्ध भराला आलें. आपल्या राष्ट्राची ध्वजा अशा रीतीनें संकटांत सांपडली आहे हें दृश्य दत्ताजी आणि जनकोजी ह्यांच्याच्यानें पाहवलें नाहीं. दोघांनीं उडी घातली आणि भारतीयुद्ध सुरू केलें. इतक्यांत

सूं सूं करीत येऊन एक गोळी जनकोजीला लागली आणि तो शूर वीरवर विद्ध होऊन आपल्या घोडयावरून खालीं पडला ! दत्ताजीनें तें पाहिलें आणि युद्ध करून अधिक सुरक्षित स्थान गांठावयाच्या जागीं तो एकसारखा पुढेंच घुसला आणि जणुं कांहीं अंगांत संचार झाल्याप्रमाणें शत्रूंना कापीत थोड्याच वेळांत शत्रूंच्या सैन्यांत पूर्णपणें वेढला गेला. त्याचा एक विश्वासू सेवक मांग त्याच्या पाठीशीं होता. शेवटीं जें व्हावयाचें ठरलें होतें तें व्हावयाची वेळ आली. दत्ताजीला एक गोळी मर्मीं लागली आणि तो प्राणहारक घावानें विद्ध होऊन भूमीवर पडला.

नजीबखानाचा धर्मगुरु आणि पठाणी कटाच्या धर्मवेडानें भारलेला एक पुढारी कुतुबशहा ह्यानें तें पाहिलें. तो त्या पडलेल्या मराठ्यांच्या सेनापती-जवळ गेला आणि त्यानें उपरोधिक स्वरांत त्याला प्रश्न केला, "क्यंव पटेल अभी मुसलमानोंके साथ फेर लढेंगे ?" मरणोन्मुख पण निर्भय दत्ताजीनें उत्तर दिलें, "हां ! बचें गे तो ओर भी लढेंगे !" ह्या उत्तरानें तो पाखंड अधिकच चिडून गेला आणि रागानें त्यानें त्या पडलेल्या वीर पुरुषाला लाथ मारली, आपली तरवार काढली आणि काफीर म्हणून दत्ताजीचें शीर कापून तें विजयोन्मादानें घेऊन गेला.

अशा रीतीनें दत्ताजीचा अंत झाला. जगांतल्या दुसऱ्या कोणाही सैनिकान त्याच्यापेक्षां अधिक निष्ठापूर्वक आपल्या राष्ट्रीय ध्वजेच्या रक्षणार्थ युद्ध केलें नाहीं आणि तिचें रक्षण करीत असतांना अधिक शौर्यानें प्राणदान दिलें नाहीं. दत्ताजीच्या निधनाची आणि तो वीर मरणोन्मुख पडला असतांना नीचपणानें आणि लज्जास्पद रीतीनें त्याच्या केलेल्या विटंबनेची वार्ता महाराष्ट्रांत पोंचली आणि तिनें सर्वांचीं मनें प्रक्षुब्ध केलीं. सर्व मराठे एक पुरुष बनून उभे झाले आणि तोंडानें प्रतिशोध गुणगुणूं लागले !

त्यांनीं याच आठवड्यांत उदगीरचा प्रचंड विजय मिळवला होता आणि हैदरला चिरडून टाकून दक्षिण हिंदुस्थानचें स्वातंत्र्य परत मिळवावयाचें कार्य पुरें करावयाचा त्यांनीं बेत केला होता. इतक्यांत दत्ताजीच्या पराभवाची आणि निधनाची वार्ता त्यांना कळली. ह्या आणीबाणीच्या प्रसंगाला तोंड देण्याची सिद्धता करण्यासाठीं बाळाजींनीं आणि भाऊंनीं एक क्षणाचाही विलंब लावला नाहीं. त्याच आठवड्यांत त्यांनीं दक्षिणेकडे अत्यंत परिश्रमानें आणि शौर्यानें एका प्रचंड युद्धाची समाप्ति केली होती, तरी त्यांनीं स्वतःला

आणि आपल्या सैन्याला सदुपार्जित अशी एक दिवसाची देखील विश्रांति न देतां सर्व सेनानायकांना आणि मंत्र्यांना पटदूर येथें एकदम मिळावयाची आज्ञा केली. तेथें आलेल्या महत्त्वाच्या प्रसंगाची सर्व दृष्टींनीं चर्चा झाली, आणि अबदाली माळव्याला येऊन पोहोंचावयाच्या आधींच त्याला गांठून त्याच्याशीं युद्ध करण्यासाठीं एक मोठें सैन्य पाठवावयाचा निश्चय ठरला. महाराष्ट्रांतील सर्वोत्कृष्ट तरुण आणि वीर त्या सैन्यांत भरती झाले. समशेर बहाद्दर, विठ्ठल शिवदेव, मानाजी धायगुडे, अंताजी माणकेश्वर, माने, निंबाळकर आणि इतर अनेक युद्धनिपुण सेनानायक येऊन त्यांनीं आपापल्या दळाचें आधिपत्य स्वीकारलें. उदगीरचे विजेते सदाशिवरावभाऊ ह्यांची मुख्य सेनापतीच्या स्थानीं योजना झाली आणि बाळाजीपंतांचे ज्येष्ठ पुत्र, ज्यांनीं नुकताच उदगीरच्या लढाईंत पराक्रम करून नांव गाजविलें होतें आणि सर्व मराठी राष्ट्राची ज्यांच्याकडे आपली भावी आशा म्हणून दृष्टि होती ते तरुण राजपुत्र विश्वासराव ह्यांना भाऊंच्या बरोबर देण्यांत आलें होतें त्या काळांतील अत्यंत सज्ज असा तोफखाना इब्राहिमखान गारदी ह्याच्या हाताखालीं दिला होता. सैन्य जसजसें पुढें जाऊं लागलें तसतसें दमाजी गायकवाड, संतोजी वाघ आणि इतर मराठी सेनानायक एकामागून एक येऊन मिळूं लागले. उत्तर हिंदुस्थानांतील अनेक रजपूत राजांकडे त्यांना हिंदूंच्या पक्षाला मिळवून घेण्यासाठीं आणि त्यांनीं सरते पर्दी मथुरागोकुळांचा विध्वंसकर्ता आणि अखिल हिंदु जातीचा शत्रु जो अबदाली ह्याच्याशीं संग्राम करण्याच्या मराठयांच्या एवढ्या प्रयत्नांत तरी साहाय्य करावें ह्या हेतूनें दूत आणि पत्रें प्रेषिलीं गेलीं. नर्मदा उतरून जाऊन आणि विंध्याद्रि ओलांडून मराठी सेना चंबळेपर्यंत जाऊन पोंचली. तिचें वैभवाचें आणि सामर्थ्याचें तें दृश्य पाहून सर्व उत्तर हिंदुस्थान सादर आणि साश्चर्य झालें. सर्व असंतुष्ट व्यक्ति, राजे आणि राव, नबाब आणि खान नुसत्या दर्शनानें भिऊन गेले आणि विरुद्ध बोट ही वर करावयाचें धैर्य त्यांना झालें नाहीं. लवकरच जनकोजी शिंदे देखील आपलें उरलेलें सैन्य घेऊन आले आणि भाऊंना मिळाले. जितके सुंदर तितकेच शूर अशा त्या तरुण राजपुत्रांचें, सबंध मराठी सेनेनें उत्साहानें आणि प्रेमानें स्वागत केलें आणि त्यांच्या द्वारें बदाऊच्या युद्धांत ज्यांनीं धारातीर्थीं शयन केलें त्या त्यांच्या चुलत्याच्या-दत्ताजी शिंद्यांच्या पवित्र स्मृतीला नमन केलें. शूर जनकोजीच्या व ज्यांनीं अद्यापि विशीच्या आंत असतांनाही आपल्या लोकांच्या आणि धर्माच्या रक्षणार्थ युद्धें

केलीं होतीं, जय मिळविले होते, आणि कित्येक भयंकर घाव धारण केले होते त्यांच्या सन्मानार्थ भाऊंनीं सर्व सेनेची एक सभा भरविली आणि त्यांच्यावर मानाच्या वस्त्रांचा आणि बहुमूल्य देणग्यांचा प्रसिद्धपणें वर्षाव केला. बाळाजी नसतांना त्यांच्या जागीं असलेले मराठ्यांच्या राष्ट्राचे आवडते अधिपति शूर आणि उदार राजपुत्र विश्वासराव पराक्रमशाली तरुण जनकोजींना भेटण्यासाठीं पुढें झाले तेव्हां तें प्रचंड राष्ट्रीय प्रत्येक मराठी अंतःकरण गहिंवरून गेलें. हे दोन्ही तेजस्वी तरुण-दोघेही इतके सुंदर, इतके शूर आणि आपल्या जनतेच्या ध्येयाशीं आणि महत्त्वाकांक्षांशीं इतके निष्ठावंत-हिंदुराष्ट्राच्या भविष्यकाळची उदयोन्मुख आशास्थानें होते.

मल्हारराव होळकरही येऊन मिळाले. नजीबखानाला आपला पुत्र मानण्यांत आणि वेळ निघून जाण्यापूर्वी दत्ताजीच्या साहाय्यार्थ येण्याविषयीं बुद्धिपुरस्सर केलेल्या निष्काळजीपणांत त्यांनीं केलेल्या आत्मघातकी मूर्खपणाचें प्रायश्चित्त त्यांना आधींच मिळून गेलें होतें. दत्ताजी पडल्यावर अबदालीनें त्यांना एकट्याला गांठून चांगलाच मार दिला होता. आतां आपल्याशीं युद्ध करण्यासाठीं यमुनेच्या अलिकडील तीरावर अबदालीला चालून यावयाला अवसर मिळावयाच्या पूर्वीच आपण यमुना उतरून त्याचा समाचार घ्यावयाचा असा सदाशिवराव भाऊंनीं बेत ठरवला. त्यांनीं गोविंदपंत बुंदेल्यांची शक्य असेल त्या वेळीं अबदालीच्या सैन्याच्या पृष्ठभागावर मारे चढवावयाचे आणि त्यांचें दाणापाणी तोडावयाचें ह्या कार्यावर योजना केली होती. पण नदी पुरामुळें दुथडी भरून गेली होती, आणि शत्रूचें मोठें सैन्य दुसऱ्या तीरावर फिरत होतें; अशा स्थितींत नदी उतरून जाणें अतिशय कठीण झालें. तेव्हां भाऊंनीं दिल्लीवरच पुढें चालून जावयाचें आणि अबदालीपासून ती राजधानी पुरी जिंकून घ्यावयाचें ठरविलें. उत्तरेकडील इतक्या हिंदु राजांपैकीं एक जाट तेवढेच मराठ्यांच्या साह्याला आले. भाऊंनीं स्वतः सामोरे जाऊन सुरजमल जाटाचें थाटानें स्वागत केलें आणि दोघांनींही यमुनेचें पवित्र उदक हातांत घेऊन अबदालीशीं युद्ध करावयाचें आणि तेंही त्याची शेवट लावीपर्यंत युद्ध करावयाचें अशा शपथा घेतल्या.

आतां सर्व जनतेचे नेत्र दिल्लीकडे लागले. हिंदूंना आणि मुसलमानांना, दोघांनाही दिल्ली–भारताची इतिहासप्रसिद्ध राजधानी–हस्तगत करण्यापासून केवढा नैतिक परिणाम होईल ह्याची जाणीव दिसत होती. भाऊंनीं शिंदे,

होळकर आणि बळवंराव मेहेंदळे ह्यांचीं पथकें दिल्लीवर आक्रमण करण्या-साठीं पाठविलीं. तिच्या संरक्षणार्थ ठेवलेल्या पठाणांनीं प्राणपणानें नगर झुंजवलें. पण मराठ्यांच्या पुढें टिकाव धरणें अशक्य होऊन त्यांनीं शेवटीं राजधानी मराठ्यांच्या स्वाधीन केली ! दिल्लीच्या कोटानेंही पराकाष्ठेचा विरोध केला, पण मराठ्यांच्या समर्थ तोफखान्यांतील गोळ्यांच्या अचुक मारानें तो लवकरच उध्वस्त झाला आणि तेथल्या मुसलमानी सेनेनें माघार घेतली. भारताच्या राजधानीच्या आणि तेथील कोटाच्या पतनाच्या वार्तेनें हिंदुधर्माच्या प्रत्येक अभिमान्याच्या हृदयांत आनंदाचें भरतें आलें. मराठी सैन्यानें अभिमानानें दिल्ली नगरांत विजयप्रवेश केला आणि पांडवांच्या राजधानीच्या–इंद्रप्रस्थाच्या–गडावर भाऊंनीं मराठ्यांची-हिंदूंची–भगवी ध्वजा रोंवली. पृथ्वीराजाच्या काळानंतर हिंदूंच्या सेनेनें किंवा ते आपल्याला अभिमानानें म्हणून घेत त्याप्रमाणें हरिभक्तांच्या सेनेनें स्वतंत्र हिंदु ध्वजेखालीं दिल्ली नगरांत हा पहिल्यानेंच विजयप्रवेश केला ! मुसलमानी चंद्रकोरीला अर्ध-चंद्र मिळाला आणि हिंदुपदपादशाहीच्या ध्वजा, पठाण आणि रोहिले, मोगल आणि तुर्क, शेख आणि सय्यद, सर्वांनीं आपली विरुद्ध पराकाष्ठा केली असतांही हिंदवी साम्राज्याच्या राजधानीवर शेवटीं पुनः फडकूं लागली ! अबदाली मुसलमानांचें सर्व संयुक्त सैन्य घेऊन यमुनेच्या अगदीं दुसऱ्या तीरावर उभा होता, पण तिच्या संरक्षणाकरितां त्याला कांहीं करतां आलें नाहीं !

एक दिवस कां होईना, पण आपलें हिंदुपदपादशाहीचें स्वप्न आपल्या डोळ्यांदेखत सत्य झालेलें सदाशिवरावभाऊंनीं अनुभवलें. आपल्या प्रयत्ना-नें अशा एका दिवसाचाही उदय घडवून आणण्यानें राष्ट्राच्या संपूर्ण जीवनाचें सार्थक होतें. असा एकच दिवस आपल्या आयुष्याच्या अल्प-कालांत देखील आपल्या वाढत्या प्रकाशांत राष्ट्रीय जीवनाच्या अनेक शतकां-तील प्रयत्न आणि पराक्रम, सुख आणि कष्ट, आशा आणि परीक्षा केंद्रित करीत असतो ! कारण त्या एका दिवसानें, मुसलमानी अत्याचारांच्या आणि पारतंत्र्याच्या संपूर्ण सात शतकांनाही हिंदूंचें तेज किंवा त्यांचा पुनरुज्जी-वित होण्याचा चेतनधर्म नष्ट करून टाकतां आला नाहीं ही गोष्ट निर्वि-वाद आणि निरुत्तर सिद्ध करून दिली ! आपण आपल्या शत्रूला तुल्यच नाहीं तर शेवटीं वरचढ ठरलों हें त्यांनीं दाखवून दिलें !

भाऊ स्वतःच्या मनाप्रमाणें चालले असते तर त्यांनीं लागलींच सर्व

हिंदुस्थानचे सम्राट म्हणून विश्वासरावांना त्या भारताच्या राजधानींत राज्याभिषेक केला असता आणि अशा रीतीनें हिंदुपदपादशाहीची विधिपूर्वक स्थापना केली असती. पण राजकारणाच्या दृष्टीनें इतक्यांतच हा अवश्य उपक्रम करणें युक्त होणार नाहीं असें त्यांनीं ठरवलें. कारण, त्यांना जाणिव होती कीं, हा उपक्रम केल्याबरोबर मराठ्यांच्या भीतीमुळें अद्याप कोणच्याही पक्षाला येऊन मिळाले नव्हते असे मुसलमानच नाहीं तर उत्तर हिंदुस्थानांतील हिंदु राजेसुद्धां मराठ्यांच्या विरुद्ध होऊन जातील. तरीही, जनतेच्या मनोवृत्तींची चांचणी पहावी आणि तसेंच असला अद्वितीय प्रसंग हिंदुस्थानांतील अखिल जनतेच्या, मित्रांच्या आणि शत्रूंच्या मनावर त्याचें अत्यंत महत्त्व बिंबविल्याविना जाऊं देऊं नये असें त्यांनीं ठरवलें; आणि त्या उद्देशानें तें पाहण्याचा प्रसंग साजरा करण्यासाठीं सार्वभौम राजसभेची बैठक भरविण्याची आज्ञा केली आणि शूर आणि थोर विश्वासरावांची अध्यक्षस्थानीं योजना केली. सर्व महाराष्ट्र प्रतिनिधिद्वारा तेथें उपस्थित होता. केवळ महाराष्ट्रच नव्हे तर अखिल हिंदूंच्या शौर्याचा, वैभवाचा, सद्बुद्धीचा आणि विद्वत्तेचा निष्कर्षच तेथें तेजानें चमकत होता. राष्ट्रीय महोत्सवाला प्रारंभ झाला. घोडदळ आणि तोफखाना, सहस्रावधि घोडे आणि हत्ती लक्षावधि सैनिक आणि योद्धे; ज्यांनीं ज्यांनीं गोदावरीपासून उत्तरेस सिंधुनदापर्यंत आणि दक्षिणेस हिंदी महासागरापर्यंत हिंदु ध्वजा घेऊन जाण्यांत भाग घेतला त्यांनीं त्यांनीं अनंत कंठांतून, तुताऱ्यांतून, शृंगांतून, तोफांतून आणि प्रचंड रणदुंदुभींतून विजयी गर्जना करून सैनिक प्रणाम केला. त्यानंतर एकामागून एक सेनानायक, राजकारणधुरंधर सरदार, प्रांताधिकारी, सुभेदार नम्र मस्तकानें पुढें आले आणि जसें आपल्या राष्ट्रावर राज्य चालविणाऱ्या सार्वभौम राजाला त्यांनीं अभिवादन केलें असतें तसें आपल्या आवडत्या राजपुत्राचें अन्तस्फूर्तीनें अभिवादन केलें आणि विजयी वीरांचीं सर्व मानचिन्हें त्यांच्या चरणीं समर्पण केलीं. ज्यांनीं ज्यांनीं तो देदीप्यमान प्रसंग अवलोकन केला त्यांना त्यांना त्याचा अर्थ कळला त्यांत ज्यांनीं ज्यांनीं भाग घेतला त्यांना त्यांना हा समारंभ म्हणजे ईश्वरानें यश दिल्यास ह्या तरुण हिंदु राजपुत्राला अखिल भरतखंडाचा सर्वश्रेष्ठ हिंदु चक्रवर्ती म्हणून जो प्रचंड राज्याभिषेक व्हावयाचा होता त्याचा हा केवळ रंगाभिनय आहे ही जाणीव झाली !

## प्रकरण १४ वें

# पानिपत

'From the field of his fame fresh and glory
We carved not a line, we raised not a stone,
But we left him alone with his glory;

—C. *Wolfe.*

अभिनव आणि रक्तांकित अशा त्याच्या यशःक्षेत्रांतून आम्हीं एकही दगड दूर सारला नाहीं, कीं त्यांत एकही रेघ ओढली नाहीं. त्याच्या यशाबरोबर त्याला आम्हीं एकांतांत सोडलें.—वुल्फ.

दिल्लीला चाललेल्या ह्या प्रकाराचा मुख्यार्थ मुसलमानांच्याही लक्ष्यांत आल्याविना राहिला नाहीं. मराठ्यांनीं आपल्या युवराजाला हिंदुस्थानच्या सम्राटपदाचा अभिषेक केला अशी वार्ता वणव्याप्रमाणें सर्वभर पसरली. ह्या घटनेकडे बोट दाखवून नजीबखान आणि इतर मुसलमान पुढारी आपल्याला वाटत असलेल्या काळजीचें आणि परिस्थितीचा भयंकरपणा मुसलमानांच्या मनांत बिंबविण्यासाठीं आपण केलेल्या प्रयत्नांचें समर्थन करूं लागलें. आपण जिला भीत होतों ती हिंदुपदपादशाही—किंबहुना नजीब आणि इतर मुसलमानी धर्मवेड्यांच्या म्हणण्याप्रमाणें ब्राह्मणपदपादशाही—प्रत्यक्ष होऊन गेली असा त्यांनीं मोठ्यानें डांगोरा पिटला. आतां पैगंबराशीं निष्ठावंत असलेल्या प्रत्येक खऱ्या मुसलमानानें काफिरांच्या सैन्यावर शस्त्रप्रहार केलाच पाहिजे!

पण उच्छृंखळ भावनांच्या ह्या पुरांतही सुजाउद्दवला आणि इतर मुसलमान ह्यांच्यावर नजीबखानाच्या आणि मौलवींच्या महंमदी धर्माच्या नांवानें केलेल्या आव्हानापेक्षां स्वार्थाचाच पगडा अधिक बसला. भोंसल्या-सारख्या धर्मवेड्यांचेही डोळे उघडूं लागले. अबदालीचें सर्व सैन्य उघड्या डोळ्यांनीं पहात असतांना मराठ्यांनीं जे विजय मिळविले आणि ज्या हताश-पणानें त्याला ते होऊं द्यावे लागले त्यांचा त्यांच्या मनावर परिणाम होऊन मराठ्यांना पायबंद देण्यासंबधींच्या अबदालीच्या सामर्थ्याविषयीं त्यांना अविश्वास वाटूं लागला. सुजानें तर भाऊंना प्रत्यक्षच पत्र लिहून अबदालीला मिळण्याविषयीं पश्चात्ताप व्यक्त केला. भाऊंनींही त्याला बोलाचालीवर ठेवणें

दूरदर्शीपणाचें आहे असें ठरवून आपल्या हस्तकांच्या द्वारा मराठ्यांच्या मनांत मोगल बादशाही नष्ट करावयाचें केव्हांच नव्हतें; इतकेंच नाहीं तर सुजा जर अबदालीचा पक्ष सोडीत असेल तर शहाअल्माला दिल्लीचा बादशहा मानावयाला आणि त्याच्या वजीराच्या जागीं स्वतः सुजालाच नेमावयाला ते आनंदानें सम्मत आहेत असें त्याला कळविलें. रोहिलेही मागेंपुढें करूं लागले आणि अबदालीला सोडून जाण्याची भाषा त्यांच्या तोंडांतूनही निघूं लागली ! सर्वत्र परिस्थिति आपल्या उलट चालली आहे हें पाहून अबदालीनें मराठ्यांशीं संधीसाठीं बोलाचाली करावयाचें ठरविलें आणि करारांविषयीं चर्चा करण्यासाठीं आपले हस्तक पाठविले; पण अबदालीच्या मागणीप्रमाणें पंजाबचा प्रांत त्याला परत द्यावयाला भाऊसाहेब सिद्ध होणें शक्य नव्हते. तसेंच ह्या पोकळ बोलाचालीनें चुकून जाऊन लोखंड तापलें असतांना घणाचा घाव घालण्याची आलेली सुवर्णसंधि घालविण्याची चूकही त्यांच्या हातून होणें शक्य नव्हतें. आणि म्हणून संधीविषयीं हीं अर्धवट बोलणीं चालली असतांनाच त्यांनीं उत्तरेकडे चाल करून जावयाचें आणि अबदालीच्या हातांतील अत्यंत बळकट अशा कुंजपुऱ्याच्या स्थानांतून त्याला घालवून लावावयाचें असा त्यांनीं बेत केला. समंदखानाला बऱ्याच सैन्यासह कुंजपुऱ्याचें रक्षण करण्यासाठीं ठेवलें होतें. नजीबचा धर्मगुरु कुतुबशाहाहि तेथेंच होता. मराठे कुंजपुऱ्यावर चाल करून येत आहेत ही वार्ता त्यांना कळल्याबरोबर कोणाही शत्रूच्या माऱ्यापासून त्याचा बचाव करण्याची त्यांनीं पूर्ण व्यवस्था केली. अबदालीनेंही यमुनेच्या दुसऱ्या तीरावरून समंदखानाला आणि कुतुबशहाला वाटेल ती हानि सोसून गड लढविण्याची आज्ञा केली आणि त्यांच्या साहाय्यार्थ आपण आणखी पुष्कळ सैन्य पाठवीत आहों असें त्यांना आश्वासन दिलें.

दिल्ली सोडतांना आपला कोश पूर्ण भरती करणें भाऊंना अवश्य झालें. गोविंदपंत बुंदेल्यांकडून अबदालीचा दाणापाणी तोडावयाचें, त्याच्या पिच्छाडीला त्रासून सोडावयाचें आणि सुजाउद्दवल्याच्या आणि रोहिल्यांच्या प्रांतांत नेहमीं स्वाऱ्या करून गोंधळ उडवून द्यावयाचा हें कार्य तडीस जाईल अशी त्यांची अटकळ होती. पण गोविंदपंतांना ह्या कामांपैकीं एकही काम करतां आलें नाहीं. बुंदेल्यांकडून कोणत्याही रीतीनें द्रव्याचा विशेष पुरवठा होणें अशक्य झाल्याबर आपला कोश भरून काढण्यासाठीं दुसऱ्या कोणच्या तरी



सुरजमल जाट.

मार्गांचा भाऊ विचार करूं लागले. कारण द्रव्य म्हणजे युद्धाचें बळ. बादशाही सिंहासनावरील लक्षावधि रुपये मूल्याचें भरगच्च चांदीचें छत त्यांच्या दृष्टीला आणण्यांत आलें. लागलींच तें घणांनीं फोडून टाकावें आणि त्याचें नाणें पाडण्यासाठीं तें टांकसाळेंत पाठवावें अशी आज्ञा त्यांनीं सोडली. त्याबरोबर दासमनोवृत्तीच्या आणि शकुनवंती करणाऱ्या लोकांनीं काव काव सुरू केली. ज्यांना हिंदुस्थानचे बादशहा करावयाची प्रत्यक्ष परमेश्वराची इच्छा त्या सर्व शक्तिमान् मोगलांच्या बादशाही राजसभेचा अशा रीतीनें अपमान करण्यांत मराठ्यांनीं धर्मबाह्य कृत्य केलें असें मानून जाटसुद्धां मराठ्यांच्यावर रुसला असें म्हणतात. हें खरें असेल तर जाटाच्या हेंही लक्षांत यावयाला पाहिजे होतें कीं, दुसऱ्याचें राज्य कांहीं संबंध नसतां बळकावण्यासकट सर्व घडलेल्या गोष्टी जर परमेश्वराच्या इच्छेनें घडल्या असें समजावयाचें तर मग निश्चयानें शिवाजीनें रायगडावर ज्या सिंहासनाची स्थापना केली आणि ज्यांची उभारणी बलात्कार आणि धार्मिक अत्याचार ह्यांच्यावर झालेली नव्हती तर आत्मसंरक्षण, स्वातंत्र्य आणि आपला कारभार आपण चालवावयाची राष्ट्राची इच्छा ह्या पवित्र तत्त्वावर झाली होती ही गोष्ट आतां सिद्ध झालेली होती आणि म्हणून परमेश्वराला तेंही संमत होतें. पण आग आणि खड्ग आणि धर्मवेडाचीं आणि अत्याचारांचीं सर्व भूतें बरोबर घेऊन हिंदूंचें राष्ट्रीय जीवन नष्ट करण्यासाठीं आणि अशा रीतीनें नूतनच प्रस्थापित झालेल्या हिंदुराज्याचा गळा दाबण्यासाठीं औरंगजेब जेव्हां दक्षिणेंत आला तेव्हां त्यानें शिवाजीच्या सिंहासनाचे घणानें तुकडे करून टाकण्यापूर्वीं मागेंपुढें पाहिलें का ? तर मग जें मोगलांचें बादशाही सिंहासन ज्यांच्या दृष्टीनें आणि स्वतः जाटासुद्धां सर्व हिंदूंच्या दृष्टीनें सुद्धां केवळ सैतानीसत्तेचें निदर्शक चिन्ह आणि उगमस्थान होतें; जें सहस्रावधि हिंदु हुतात्म्यांच्या रक्तानें न्हाऊन निघालें होतें, त्यांच्या देवस्थानांच्या, गृहांच्या आणि गृहाग्नींच्या भग्नावशेषावर ज्याची उभारणी केली होती; आणि ज्याचें नुसतें अस्तित्व म्हणजेच त्यांचें राष्ट्रीय आणि राजकीय दृष्ट्या प्रत्यक्ष निधनच होतें त्यांची त्यांनीं तरी अणुभरही क्षिति कां करावी ? औरंगजेबानें आपला लोहदंड हिंदूंच्या राज्याचें सिंहासन फोडून मोडून टाकण्यासाठीं उचलला; काळ, भवितव्यता आणि हिंदुस्थानच्या संरक्षक देवता ह्यांनीं तो घण त्याच्या हातांतून ओढून घेतला आणि असा चमत्कार घडून आला कीं, आज त्याचें स्वतःचें बादशाही सिंहासनावरील छतच त्याच्याखालीं चूर्ण होऊन पडलें.

आपल्या सैनिकांचीं थकलेलीं वेतनें त्यांना देऊन सदाशिवराव कुंजपुऱ्यावर चाल करून गेले. शिंदे, होळकर आणि विठ्ठल शिवदेव ह्यांनीं मारा चढविला. तेथले पठाण सैनिक शूराप्रमाणें लढले, गांव आणि गड दोन्हीही त्यांच्या स्वाभाविक बळकटपणाविषयीं प्रसिद्ध होतीं. पण जेव्हां त्यांच्यावर मारा करण्यासाठीं मराठ्यांनीं आपल्या उत्कृष्ट तोफा पुढें केल्या त्यांच्या पाठीशीं शिंद्याचें आणि इतर सेनानायकाचें सैन्य उभें झालें तेव्हां मुसलमानांना पुष्कळ वेळ गड लढविणें अशक्य झालें. मुसलमानांच्या कोटाच्या भिंतींत कांहीं भगदाडें पडतांच दत्ताजी गायकवाडनें आपल्या हाताखालील तुकडीला त्यांच्यांतून आंत घुसण्याची आज्ञा केली आणि 'हर हर महादेव' अशी प्रचंड गर्जना करीत त्यांच्या सैनिकांनीं घोड्यांसकट त्या भगदाडांतून आंत उडी घेतली. युद्ध हातघाईवर आलें. सहस्रावधि पठाणांना तरवारीनें कंठस्नान घातलें. गड जिंकून घेतला. मुसलमानांचा निवास लुटला आणि त्यांच्या शतावधि सैनिकांना बंदिवान् करण्यांत आलें. त्यांचा सेनापतिच स्वतः मराठ्यांच्या ताब्यांत सांपडला. पूर्वींही एकदां रघुनाथरावानें आपल्या शेचटच्या स्वारीच्या वेळीं, त्याला बंदिवान् धरलें होतें, पण खंडणी घेऊन सोडून दिलें. त्यानें मराठ्यांचा एकसारखा विरोध करण्याचें व्रत तसेंच चालू ठेवलें आणि आतां तो पुनः त्यांच्या हातांत सांपडला !

युद्ध संपण्याच्या बेतांत आलें होतें अशा वेळीं सदाशिवराव शिंद्यांना आणि होळकरांना कांहीं सूचना पाठवीत आणि हिंदु सैनिकांच्या पराक्रमाचें त्यांनीं जें काम करावयाला त्यांना तीन महिने नाहीं लागले तर सरते पर्दीं तीन आठवडे तरी लागतील असा शत्रूचा समज होता तें काम त्यांनीं तितक्याच दिवसांत केलें ह्याकरितां कौतुक करीत उभे होते. इतक्यांत दोन महत्त्वाचे युद्धबंदी हत्तीवर बसवून यांच्यासमोर आणले. त्यांपैकीं एक कुंजपुऱ्याचा मुख्याधिकार ज्याच्याकडे होता तो पठाण सेनानायक समंदखान होता. आणि दुसरा !—नजीबाचा धर्मगुरु, अबदालीला आणवण्याच्या पठाणी कटांतील एक अत्यंत चळवळ्या पुढारी आणि ज्यानें शूर दत्ताजीला मरणोन्मुख स्थितींत लाथ मारली होती आणि त्याला काफीर म्हणून भ्याडाप्रमाणें त्याच्यावर अपमानांचा वर्षाव केला होता तो-कुतुबशहा हा दुसरा बंदी होता !

कुतुबशहाला पाहिल्याबरोबर मराठी रक्त प्रज्वलित झालें. प्रतिशोध

घ्यावयाला सांगणारी दत्ताजीच्या हत्येची स्मृति त्या जागेभोंवतीं घिरट्या घालूं लागली. " आमच्या मरणोन्मुख दत्ताजींना काफर म्हणून ज्यानें लाथ मारली तो मनुष्य तूंच का ? " कुतुबशहानें उत्तर दिलें, " होय, आमच्या धर्माप्रमाणें, मूर्तिपूजकाचा वध करणें आणि त्याला तुच्छतेनें काफीर लेखणें हें सत्कृत्य समजलें जातें." " तर मग तूंही कुत्र्याच्या मरणानें मर " भाऊंचें प्रत्युत्तर मिळालें ! सैनिक अपराध्याला थोडे दूर घेऊन गेले आणि त्यांनीं त्याचा शिरच्छेद केला. दत्ताजीचा प्रतिशोध घेतला गेला. समंदखानाला तीच शिक्षा भोगावी लागली.

नजीबखानाचा जांवई आणि इतर नातलग ह्यांच्यासह त्याचें सर्व कुटुंब-ही बंदिवान् होऊन मराठ्यांच्या हातांत सांपडलें. पण कुतुबशहाला जितकें कडक शासन मिळालें तितकें कडक शासन त्यांना देण्यांत आलें नाहीं. युद्ध करीत असतां ज्यांना धरण्यांत आलें होतें त्या सर्वांनाच तें शासन दिलें असतें तरी सरते पर्दी अब्दालीला तरी त्या शिक्षेच्या माणुसकीचा प्रश्न उपस्थित करण्याचा मुळींच अधिकार नव्हता ! कारण त्याच्याकडून आणि त्याच्या साहाय्यार्थ आलेल्या इतर मुसलमानी सरदारांकडून बंगाल्यांत, बदन येथें आणि इतर ठिकाणीं झालेल्या युद्धांत धरल्या गेलेल्या सर्व मराठ्यांचीं पहिल्यानें नाकें कापावीं आणि नंतर मस्तकें उडवून आपल्या शिबिकेपुढें युद्धाचें जयचिन्ह म्हणून त्यांचा विद्रूप ढीग रचावा अशा प्रकारचीं रानटी अत्याचाराचीं कृत्यें झालीं होतीं ! ह्याच रानटी प्रकारांचें मराठ्यांनाही अनुकरण करतां आलें असतें पण त्यांनीं केव्हांही तसें केलें नाहीं. तसेंच मुसलमानांच्या अब्दालींनीं, औरंगजेबांनीं आणि नादिरांनीं धर्माची आज्ञा म्हणून ज्याप्रमाणें केलें त्या-प्रमाणें मशिदी पाडण्यांत, कुराणें जाळण्यांत किंवा पवित्र क्षेत्रांच्या जागीं इतर भ्रष्टाचार करण्यांत मराठयांनीं प्रसिद्धिही मिळविली नाहीं.

कुंजपुऱ्याचें पतन हा अबदालीच्या प्रतिष्ठेवर बसलेला दुसरा भयंकर आघात. ह्या वेळीं मराठयांनीं ज्याच्या जवळजवळ दहा सहस्र सैन्याचा पुरा मोड केला आणि त्याच्या अगदीं दृष्टीसमोर त्यांनीं विजयादशमीचा महो-त्सव सैनिकसमारंभानें आणि अत्यंत उत्साहाने साजरा केला ! अबदाली हा कसलेला सेनापति होता. आपण लवकरच वाटेल ती हानि सहन करून आणि एकादें विलक्षण धाडसाचें कृत्य करून नांव मिळविलें नाहीं तर आपलें कार्य बुडालें हें त्यानें ओळखलें. त्यानें लागलींच वाटेल तें करून

यमुना उतरून जावयाचें आणि मराठयांच्या कुंजपुऱ्यांतील सैन्याचा त्यांच्या दिल्लीच्या आधारस्थानापासून संबंध तोडावयाचा असा बेत केला.

त्याला त्यांत यश आलें आणि त्यानें बागपतला यमुना उतरून आपलें एक लक्ष सैनिकांचें प्रचंड दळ कुंजपुरचें मराठी सैन्य आणि दिल्ली येथील मराठयांचें सैन्य ह्यांच्यामध्यें पाचरीप्रमाणें बसवलें. त्याचा आणखी एक डाव अनायासेंच साधला आणि त्यामुळेंच एकंदरींत त्याच्या सर्व सैनिकबळा-पेक्षां त्याला अधिक लाभ झाला. बागपतला यमुना उतरल्यानें इकडे मरा-ठयांचा दक्षिणेशीं संबंध तुटला आणि त्याचा मात्र सुजाउद्दवल्याच्या आणि रोहिल्यांच्या प्रदेशांशीं संबंध सुरक्षित राहिला ! पण हें सुद्धां त्याच्या स्वतः-च्या हालचालीनें इतकें साधतां आलें नाहीं, तर सदाशिवरावभाऊंनीं सांगि-तल्याप्रमाणें गोविंदपंताला अब्दालीचें दाणापाणी मारतां आलें नाहीं त्या-मुळें अनायासें साधलें.

मराठेही आपल्याशीं तोंड द्यावयाला पूर्णपणें सिद्ध आहेत असें अब्दाली-ला आढळून आलें; त्यानें बागपतला यमुना उतरून येण्यांत यश मिळविलें नाहीं तोंच भाऊसाहेब कुरुक्षेत्राच्या प्रसिद्ध रणभूमीवर त्याला गांठावें ह्या उद्देशानें पुढें चालून आले आणि त्यांनीं पानपतला तळ दिला. गोविंदपंत बुंदेले आणि गोपाळ गणेश ह्यांनीं आपल्यावर सोंपवलेला कार्यभार बरोबर पार पाडला आणि अब्दालीचें दाणापाणी तोडून त्याच्या पिच्छाडीला ते नेहमीं त्रास देत राहिले म्हणजे झालें; मग आपण अब्दालीच्या निवडीच्या रणभूमीवरसुद्धां त्याला पार चुरडून टाकूं असा मराठयांचा विश्वास होता. पण गोविंदपंताला आपल्यावर सोंपवलेलें काम मुळींच करून दाखव-तां आलें नाहीं. निकराच्या आज्ञा, धाक इत्यादि सर्व मार्गांचा भाऊंनीं अवलंब केला. पण गोविंदपंतानें आपल्याला करतां येईल तितकी देखील धडपड केली नाहीं. जाट मराठयांना ह्याच्या आधींच सोडून गेला होता आणि आपल्या भरतपुर राजधानींतून सुरक्षित स्थलाहून तो चाललेल्या प्रकाराचें अवलोकन करीत होता. तरीही त्याच्या वर्तनें हें लक्षांत ठेवणें अवश्य आहे कीं त्यानें मधून मधून मराठयांना सामुग्रीचा पुरवठा केला. पण रजपुतांची तितकेंही करावयाची सिद्धता नव्हती ! मराठयांशीं उघड दोन हात करावयाचें त्यांच्यांपैकीं एकाचेंही धैर्य नव्हतें. मात्र त्यांच्यापैकीं पुष्कळांची मराठयांचा पुरा मोड व्हावा अशी इच्छा होती. ह्या हिंदु राजांची ही आत्मघातकी इच्छा

कोठपर्यंत परिपूर्ण झाली हें पुढच्या इतिहासावरून दृष्टोत्पत्तीस येईलच. अशा रीतीनें दोघेही प्रतिपक्षी एकमेकांचा मुळाशीं संबंध तोडून टाकावयाचा आणि शत्रूला उपासमारीनें जर्जर करून मग त्याच्याशीं युद्ध करावयाचें अशासाठीं अतिशय प्रयत्न करीत होते; तरी जसजसे दिवस जाऊं लागले तसतशी अबदालीपेक्षां उपासमारीची पाळी मराठ्यांवरच अधिक आलेली दिसूं लागली.

सरतेशेवटीं शके १६८२ कार्तिक शुद्ध १५ (ता.२२।११।१७६०) रोजीं जनकोजी शिंद्यांनीं बाहेर पडून मुसलमानांच्या सैन्यावर मारा चढविला. सर्व रणक्षेत्रभर घनघोर युद्ध चालू झालें. त्या तरुण मराठी सेनापतीच्या आणि त्याच्या कसलेल्या सैनिकांच्या पराक्रमापुढें अधिक वेळ तग न धरवल्यामुळें मुसलमान संध्याकाळच्या वेळीं मागें हटले आणि मराठ्यांनीं त्यांना मार देत त्यांचा त्यांच्या शिबिरापर्यंत पाठलाग केला. त्या दिवशीं काळोख त्यांच्या साहाय्याला आल्यानें पूर्ण अपेशाच्या प्रसंगांतून ते वांचले. मराठ्यांनीं आपले विजयी वीर परत आल्याबरोबर सैनिकसन्मानानें त्यांचें स्वागत केलें. ह्या पराभवाच्या योगानें आपल्या सैनिकांच्या आणि लोकांच्या मनावर झालेला भीतीचा परिणाम दूर करण्यासाठीं अबदालीनें ह्यानंतर एक पंधरवड्यानें संध्याकाळच्या प्रसंगीं बाहेर पडावयाचें आणि रात्र झाल्याबरोबर काळोखाचें साहाय्य घेऊन मराठ्यांच्या मध्यावर मारा करावयाचा अशी आपल्या निवडक तुकड्यांना आज्ञा दिली. पण ते ह्या बेतानें पुढें जातात तों बळवंतराव मेहेंदळ्यांनीं आधींच आपल्यावर मात केली आहे आणि ते वीस सहस्र निवडक सैन्य घेऊन आपल्याशीं युद्ध करावयाला सिद्ध होऊन आलेले आहेत असें आढळून येऊन ते चकित होऊन गेले. लागलींच पठाणांनीं मराठ्यांवर तोफा डागावयाला प्रारंभ केला. मराठ्यांनीं आपला तोफखाना बरोबर आणला नव्हता त्यामुळें त्यांचा अतिशय नाश होऊं लागला. लवकरच मराठे कच खाणार असें दिसूं लागलें. त्यासरशीं विजेप्रमाणें त्यांचा सेनापति घोडा फेंकीत आला. आपल्या भगव्या झेंड्याच्या कीर्तीला कलंक लावूं नका म्हणून त्यानें त्यांना बजावलें, त्यांच्यांत उत्साह भरून पुन्हा त्यांना सांवरलें आणि आपली नग्न तरवार वर करून मुसलमानांवर एकदम तुटून पडावयाला त्यांना आज्ञा केली. मराठी घोडेस्वार घोडे चौखुर उडवीत शत्रूवर जाऊन पडले. त्यांच्या तोफा त्यांनीं बंद पाडल्या आणि शत्रूंशीं हातघाई करायला प्रारंभ केला. त्यांचा शूर सेनापति बळवंतराव मेहेंदळे हा सर्वांच्या अग्रभागीं होता.

त्या वेळीं झालेल्या घनचक्कर संग्रामांत एक गोळी बळवंतरावांना लागली आणि मृत होऊन ते रणांगणावर पडले. हें पाहतांच त्यांचें मस्तक कापून विजयानें निवासांत घेऊन जाण्यासाठीं मुसलमानांनीं त्यांच्या शवावर उडी घेतली; पण त्यांच्या उगारलेल्या तरवारी आणि आपल्या प्रिय सेनापतीचें शव ह्यांच्यामध्यें निंबाळकरानें धावून आपला देह दिला आणि स्वतःला प्राणघातक व्रण होत असतांनाही मराठ्यांनीं येऊन शत्रूपासून शवाची सुटका करीपर्यंत त्यावर आपल्या देहाचें आवरण घातलें. इतक्या वेळांत सहस्रावधि पठाण मारले गेले होते आणि अधिक टिकाव धरणें कठीण आहे, हें मुसलमानांच्या अनुभवाला येऊन गेलें होतें. त्यांनीं कच खाल्ली आणि मराठ्यांचा चांगला मार बसतांच पाठ फिरवून तळाची वाट धरली. मराठ्यांच्या मध्य भागासमोर रणभूमीवर मुसलमानांच्या सहस्रावधि प्रेतांचा ढीग पडला होता. मराठ्यांनीं मिळवलेला विजय मोठा होता; पण त्यांनीं तो मिळविण्यासाठीं दिलेला सेनापतिही तितकाच मोठा होता! त्यांनीं अत्यंत प्रेमभावानें बळवंतरावांचें प्रेत आपल्या शिबिरांत नेलें आणि तेथें त्या मृत देहाला सर्व सैनिकांनीं सामरिक अभिवादन केलें. ह्या हानीमुळें भाऊंना सर्वांत अधिक वाईट वाटलें, आणि प्रेतयात्रेबरोबर ते जातीनें उपस्थित राहिले. तशांत वीरश्रेष्ठ बळवंतरावांच्या इतक्याच श्रेष्ठ वीर पत्नीनें चितारोहण करून नवऱ्याच्या शवाबरोबर सती जावयाचा निश्चय केला. स्वतः भाऊसाहेबांनीं पुष्कळ परींनीं समजावून पाहिलें पण तिचा निश्चय ढळला नाहीं. आपल्या मृत सेनापतीला शेवटचें प्रेमाचें अभिवादन करण्यासाठीं सर्व सैनिक बाहेर आले. त्या विख्यात मृत वीराला आणि आपल्या मृत पतीचें मस्तक आपल्या मांडीवर घेऊन त्याला कवटाळीत अग्निज्वालांचें पांघरूण घेऊन बसलेल्या त्या महाराष्ट्रकन्यकेच्या सतीत्वाला शतशः प्रणाम करीत सहस्रावधि लोक त्या चितेच्या भोंवतीं आदरपूर्वक उभे राहिले.

येणेंप्रमाणें अबदालीनें दोन समरप्रसंग केले आणि दोहोंतही त्याला मार खावा लागला. पण त्यांचा मराठ्यांच्या पुढच्या उपासमारीचा प्रश्न सोडविण्यांत कांहीं उपयोग झाला नाहीं. गोविंदपंतांनीं, इतक्या टोंचणीनतर आतां हालचाल करण्याला आणि अबदालीचें दाणापाणी वाटेंत मारावयाला प्रारंभ केला होता हें खरें; पण आतां ह्या वरातीमागून घोड्याचा विशेष उपयोग होण्यासारखा नव्हता. आणि हा उपक्रमही पुष्कळ दिवस चालला नाहीं. आताई-

खानानें कपटानें मराठ्यांचीच ध्वजा उभी करून दहा सहस्र पठाणांसह गोविंद-पंतावर मारा केला. होळकरांची युद्धध्वजा पाहून मराठ्यांना हे मराठेच आहेत असें, शत्रूंनीं प्रत्यक्ष तरवार चालवावयाला प्रारंभ करीपर्यंत वाटलें. शेवटीं गोविंदपंतसुद्धां मारले गेले आणि त्यांनीं चार महिन्यांपूर्वीं, भाऊंच्या जेव्हां एवढ्या काकुळतीनें आज्ञांवर आज्ञा येत होत्या त्या वेळीं प्राणांची क्षिति बाळगली नसती तर जवळ जवळ निश्चयानें त्यांचा आणि त्यांच्या बरोबरच त्यांच्या राष्ट्राचाही विनाश टळला असता. पण आतां ते प्राण घालवून बसले! पठाणांनीं गोविंदपंतांचें शीर कापून नेलें आणि तें शीर व त्याबरोबर लढाईच्या वाक्यांनीं भरलेलें एक पत्र असें सदाशिवरावांकडे पाठवून देऊन अब्दालीनें आपली माणुसकी दाखवून दिली! पण सामरिक दृष्टीनें पाहतां अद्यापिही अब्दालीचा पुरा पराभव करणें अगदीं शक्य होतें. कारण त्यानें एवढी कडेकोट व्यवस्था ठेवली असतांही पानपतावर मराठे अशा अडचणींत सांपडले आहेत ही वार्ता दक्षिणेंत जाऊन पोचली होती आणि बाळाजी जवळपास पन्नास हजार सैनिकांचें दुसरें प्रचंड सैन्य समवेत घेऊन आपल्या लोकांच्या साहाय्यासाठीं निघाले होते. मराठ्यांना पानपतावर जर असाच एक महिना आणखी तग धरता आला असता तर ह्या दोन्ही सैन्यांमध्यें अब्दालीची नुसती दामटी वळली गेली असती; पण उपासमारीचा प्रश्न कसा सोडवा-वयाचा! चारा न मिळाल्यामुळे शतावधि ओझ्यांचे पशु आणि बैठकीचे घोडेसुद्धां पटापट मरूं लागले. त्यांच्या सडलेल्या प्रेतांच्या घाणीनें सबध सैन्यांत उपास-मारीइतकीच प्राणघातक रोगाची सांथ पसरते कीं काय अशी धास्ती वाटूं लागली. हें टाळावयाला अवेळीं होत असलें तरी एकदम युद्धाला निघावयाचें हा एकच दुसरा मार्ग होता. मराठ्यांचे शूर सैनिक भाऊंच्या शिबिराच्या समोर प्रतिदिनीं गोळा होऊन अत्यंत काकुळतीनें आमची अशा रीतीनें येथें कुचंबणा आणि उपासमार करण्यापेक्षां आम्हांला समरभूमींत लढून मृत्यूला तोंड द्यावयाची संधि द्या असें विनवूं लागले. पण ह्या उपासमारींतून सुटावयाला आणखीही एक मार्ग नव्हता काय? आपल्या पूर्वजांच्या कितीक पिढ्या ज्या हिंदु कार्यासाठीं जगल्या, काम करत्या झाल्या आणि मरण पावल्या ते कार्य नेहमींकरितां सोडून द्यावयाचें! तसें करावयाला आणि अब्दालीला हिंदुस्थानचा सम्राट् मान्य करून आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचा बळी द्यावयाला मराठे सिद्ध आहेत काय? नाहींत!

कधींच नाहींत !! एकही मराठा तसें करावयाला संमति देणार नाहीं; त्यापेक्षां उपासमारीनें आणि आपत्तींनें ते इतके पीडिले असले तरी शत्रूंच्या सेनासमुद्राशीं धडक देतील आणि शत्रूंला सन्मुख गांठून अशा रीतीनें रणांगण झुंजवितील, कीं त्यायोगानें स्वतः यश मिळविणें जरी त्यांना शक्य झालें नाहीं तरी शत्रूला मिळालेल्या यशाचा त्याला यत्किंचितही लाभ होणार नाहीं. अशा दृढनिश्चयाच्या मराठ्यांच्या शिरोभागीं कांहींही होवो शरण जावयाचें नाहीं, आपल्या लोकांच्या राष्ट्रीय प्रतिष्ठेला यत्किंचितही उणेपणा येईल असें कांहींही करावयाचें नाहीं, तर वाईटाहून वाईट प्रसंग आल्यास–यश नाहीं तर नाहीं–असा पराभवच मिळवावयाचा कीं, जो कित्येक यशांपेक्षांही भावी पिढ्यांना राष्ट्रगौरव, स्वाभिमान आणि स्फूर्ति ह्यांच्या अक्षय्य उगम-स्थानाप्रमाणें उपयोगी पडेल, अशा निर्भय दृढनिश्चयानें स्वतः भाऊ उभे होते.

घाईघाईनें सेनानायकांची मंत्रसभा बोलावण्यांत आली. तेथें असें ठरलें कीं, युद्धाच्या पूर्ण सिद्धतेनें बाहेर पडावयाचें आणि दिल्लीस निघून जावयाचें. जर अबदालीनें विरोध केलाच तर त्यावर मारा चढवावयाचा, त्याची फळी फोडावयाची आणि युद्ध करीत आपला मार्ग काढावयाचा. हा 'जर' निश्चितच होता. त्यांना जाऊं देऊन ही संधि घालवणारा मनुष्य अबदाली नव्हता.

सहस्रावधि वीर–हरिभक्तांचें तें सैन्य–प्रसिद्ध जरीपटक्याच्या, आपल्या राष्ट्राच्या भगव्या झेंड्याच्या भोंवतीं गोळा झालें. लवकरच पुढें काय करावयाचें ह्या संबंधांत पुढाऱ्यांच्या बैठकींत झालेला निर्णय सर्वांना कळविण्यासाठीं त्यांचे मुख्य सेनापति सदाशिवरावभाऊ उभे राहिले. शत्रूशीं निर्णायक युद्ध करावयाचा आपल्या पुढाऱ्यांनीं निश्चय केला आहे; असें ऐकल्याबरोबर त्या सशस्त्र सैन्याच्या विस्तीर्ण समूहानें प्रचंड गर्जना करून आपली संमति दाखविली. कशा रीतीनें वागावयाचें हें सर्वांना सांगण्यांत आलें. त्यानंतर त्या अत्यंत श्रेष्ठ सेनापतींनीं आपल्या सैनिकांच्या भावना उचंबळवून सोड-णारें भाषण केलें. ते ज्या थोर राष्ट्रीय ध्वजेखालीं उभे होते तिच्याकडे बोट दाखवून मूक वक्तृत्वानें त्याच्या अत्यंत यशःपूर्ण इतिहासाचें आरंभा-पासून वर्णन केलें. श्रीरामदासांनीं तो भगवा झेंडा 'स्वधर्म राज्याच्या'–हिंदुपदपादशाहीच्या–महत्कार्याचें नेहमीं स्मरण रहावें म्हणून शिवाजीमहा-राजांच्या कसा स्वाधीन केला; त्यांच्या वाडवडिलांनीं, रणशय्येवर देह ठेवून चिरंजीव झालेल्या त्यांच्या स्वर्गस्थ पूर्वजांनीं त्याला विजयावर विजय कसे

३५४ (. १०१

मिळवून दिले आणि अटकपासून कटकपर्यंत आणि पूर्वसमुद्रापासून पश्चिमसमुद्रापर्यंत सर्व हिंदुस्थान त्यांच्या पताकेखालीं कसें आणलें; विजय-भरानें जसजसा तो पुढें आणि पुढेंचे मार्ग क्रमूं लागला त्याबरोबर हिंदु राज्याच्या शत्रूंनीं त्यापुढें मस्तकें तरी कशीं वांकाविलीं किंवा मार तरी कसा खाल्ला; हा सर्व वृत्तान्त त्यांनीं निवेदन केला ! तेव्हां आतां ती राष्ट्रीय ध्वजा ते शत्रूच्या स्वाधीन करणार किंवा शत्रूपुढें नम्र करणार, का ती ज्या महत्कार्याचं एक निदर्शन आहे त्या कार्याच्या रक्षणासाठीं लढत मरणार ? शंभर सहस्र सैनिकांच्या कंठांतून 'हर हर महादेव' अशी गर्जना उठली आणि आपल्या तरवारी उपसून त्यांनीं त्या राष्ट्रीय ध्वजेशीं, त्या ध्वजेनें निदर्शित केलेल्या महात्कार्याशीं आणि ज्यानें त्यांना आतांपर्यंत विजयावर विजय मिळवून दिले होते त्या आपल्या सेनापतीशीं, एकनिष्ठ राहूं अशी शपथ घेतली !

पौष शुद्ध ८ शके १६८२ (ता. १४ जानेवारी १७६१)ला सूर्योदय होतांच युद्धाच्या पूर्ण सज्जतेनें मराठे आपल्या शिबिरांतून बाहेर पडले. मध्यभागीं स्वतः भाऊ आणि **विश्वासराव** होते. त्यांच्या उजव्या हाताला आपापलें सैन्य घेऊन मल्हारराव होळकर आणि जनकोजी शिंदे उभे होते आणि डाव्या बाजूचें आधिपत्य दमाजी गायकवाड, यशवंतराव पवार, अंताजी माणकेश्वर, विठ्ठल शिवदेव आणि समशेरबहाद्दर ह्यांच्याकडे होतें. मराठ्यांनीं आपला उत्कृष्ट तोफखाना सर्व सैन्याच्या अग्रभागीं ठेवला होता. इब्राहीमखान गारदी ह्याच्याकडे त्याची व्यवस्था होती आणि हा मराठ्यांचा शूर अधिकारी मरेपर्यंत मराठ्यांशीं स्वामिनिष्ठ राहिला. अशा रीतीनें बळ-कट व्यूह करून मराठ्यांनीं आपला सेनानिवास सोडला. लागलीच शतावधि रणदुंदुभींनीं, रणकर्कश तुताऱ्यांनीं आणि युद्धश्रृंगांनीं उच्च स्वरानें मराठ्यांचें प्रस्थान निनादित केलें.

मराठे तळ सोडून चालून येत आहेत हें अबदालीला कळतांच तोही त्यांच्याशीं सामना देण्यासाठीं बाहेर आला. त्याच्या सैन्याच्या मध्यभागीं त्याचा वजीर शहानवाझखान होता. उजव्या अंगाला रोहिले होते आणि डाव्या अंगाला नजीबखान व सुजाउद्दवला हे होते. अबदालीनेंही आपला तोफखाना आपल्या सैन्याच्या पुढें ठेविला होता.

लवकरच दोन्ही दळांची गांठ पडली. तोफांनीं आपल्या नृशंस कृत्याला

प्रारंभ केला. दोन्ही सैन्यांच्या हालचालींनीं धुळीचे प्रचंड लोट उठले आणि त्यांत तोफांच्या धुराची भर पडून आकाश कृष्णवर्ण दिसूं लागलें. सूर्योदय होऊन बराच वेळ झाला तरी सूर्याचें दर्शनही होईना ! कांहीं वेळानें एकमेकांना विरुद्ध सैन्य स्पष्ट दिसूं लागतांच यशवंतराव पवार आणि विठ्ठल शिवदेव ह्यांनीं पहिला मारा चढविला. रणधुमाळीला प्रारंभ झाला. मराठ्यांच्या घोडेस्वारांनीं आपल्या एका मान्यानें रोहिल्यांना परतावयाला भाग पाडलें आणि त्यांचे ८००० हून अधिक सैनिक मारून काढले. ह्या त्वेषाच्या मान्यापुढें शत्रूच्या उजवीकडील सैन्यानें कच खाल्ली आणि तें मागें परतलें. स्वतः भाऊराव आणि शूर विश्वासराव ह्यांनीं तर शत्रूच्या मध्यावर इतक्या बळानें मारा केला कीं, तिथें दोन्ही सैन्यें हातघाईवर येऊन एकमेकांना कापून काढूं लागलीं. पठाण कांहीं तुच्छ प्रतिस्पर्धी नव्हते ! इकडे भाऊंसारख्या रणधुरंधराच्या आणि विश्वासरावांसारख्या प्रिय युवराजांच्या हाताखालील मराठे एक रेसभरही मागें होणें शक्य नव्हतें. एक घंटाभर भयंकर युद्ध झाल्यावर भाऊंनीं आणि विश्वासरावांनीं स्वतः वजिराच्या हाताखालील पठाणी सैन्याची लोखंडी फळी फोडली. सहस्रावधि पठाण रणभूमीवर मृत होऊन पडले. वजिराचा मुलगा कापला गेला आणि स्वतः वजीर घोडा मेल्यामुळें पायउतार झाला. मुसलमानांच्या मध्यभागानें माघार घेतली ! शत्रूला त्याच्या एक एक स्थानावरून घालवून लावीत भाऊ आणि विश्वासराव पुढें चालले हें पाहून नजीबखान वजिराच्या बचावाला धावला. पण त्याचा पाठलाग करीतच शूर जनकोजीही आपल्या कसलेल्या सैनिकांना घेऊन भाऊंची बाजू बळकट करण्यासाठीं आले. त्या वेळच्या युद्धाचा भयंकरपणा काय पहावयाचा ? सर्व आघाडीभर वीरांशीं वीर भिडून भारतीय द्वंद्वें होऊं लागलीं. आपल्या मध्यभागांतील उजवीकडील आणि डावीकडील पथकांनीं—म्हणजे सर्वच सैन्यानें—माघार घेतली आणि तीं प्रतिरोध सोडून देऊन पलायन करण्याच्या बेतांत आलीं आहेत हें अब्दालीच्या स्पष्ट निदर्शनाला आलें. इतक्यांत त्याच्या सैन्याचा कांहीं भाग पळूंसुद्धां लागला. पण तरीही तो न कचरतां तसाच उभा होता. आपली जागा सोडून जो पळून जावयाचा प्रयत्न करील त्याला कापून काढावयाची त्यानें आपल्या सैनिकांना आज्ञा दिली ! सूर्योदयानंतर दोन अडीच घटकांच्या आंतच युद्धाला प्रारंभ झाला होता. तेव्हांपासून तो घनघोर संग्राम सारखा चालला होता. तिसरा

प्रहर संपत आला. दोन वाजून गेले. पण मराठी सैनिकांना क्षणाची विश्रांति कशी ती अद्यापि मिळाली नव्हती! रणभूमि रक्ताच्या नद्यांनीं अक्षरशः धुऊन निघाली असून सैनिकांच्या कण्हण्याचे आणि आरोळ्यांचे ध्वनि उठून रणदुंदुभींच्या, तुतार्‍यांच्या, तोफांच्या आणि वीरांच्या युद्धगर्जनांच्या ध्वनींमध्यें एकरूप होऊन मिसळून गेले!

तिसर्‍या प्रहरचे दोन वाजून गेले. मराठ्यांच्या अटीतटीच्या विरोधानें आणि पराक्रमानें शेवटीं मुसलमानी सैन्य पूर्ण जर्जर झालें. अब्दाली इतका कसलेला सेनानायक, पण त्यालाही काळजी वाटावयाला लागून तो रणांगण सोडावें आणि यमुना उतरून परतीराचा आश्रय घ्यावा असा विचार करूं लागला. पण अत्यंत शहाणपणा करून त्यानें आपल्या सेनेपैकीं दहा सहस्र सैनिक आपल्या जवळ राखून ठेवले होते. त्यांचा उपयोग करावयाची असली तर हीच वेळ आहे असें ओळखून त्यानें त्यांना भाऊसाहेबांवर तुटून पडावयाची आज्ञा केली. हें नवीन दमाचें सैन्य विजेच्या वेगानें दिवसभर युद्ध करून श्रमलेल्या मराठी सैन्यावर जाऊन पडलें!

पण सकाळपासून थकून गेले असतांही भाऊ आणि त्यांचे शूर मराठे गडी क्षणमात्रही कचरले नाहींत. त्यांची पहिली धडक आणि नव्या दमाचा मारा मराठ्यांनीं तरीही सहन केला. मराठ्यांनीं युद्ध जिंकल्यासारखेंच आहे असें पुन्हा एकदां स्पष्ट दिसूं लागलें. अब्दालीकडून आपला शेवटचा डावही टाकून झाला होता.

पण इतक्यांतच जणुं मृत्यूची दूतिका होऊन एक गोळी सूं सूं करीत आली. ती मराठ्यांच्या वीर्यशाली राजपुत्राला मर्मी लागली आणि विद्ध होऊन विश्वासराव अंबारींत पडले! अतिशय शूर आणि तितकाच सुंदर मराठ्यांचा युवराज—महाराष्ट्राची आशा—प्राणघातक व्रण लागून मृत्युशय्येवर पहुडला! भाऊ आपल्या सैनिकांना प्रोत्साहन देत, आज्ञा सोडीत, शस्त्रप्रहार करीत आणि जगानें तोंपर्यंत क्वचितच अवलोकन केलें असेल असें रोमहर्षण युद्ध चालवीत जेथें होते तेथें ही वार्ता त्यांच्या कानांवर येऊन आदळली. वार्ता ऐकल्याबरोबर आकाशांतून वज्रपात झाला असें भाऊंना वाटलें! मराठ्यांचे सेनापति तसेच आपल्या लाडक्या पुतण्याकडे धांवले आणि प्राण-घातक व्रणांनीं विद्ध होऊन सोन्याच्या अंबारींत आपल्या रक्तांत लोळत

पडलेल्या मराठ्यांच्या युवराजांना त्यांनीं पाहिलें. तें दृश्य पाहून उदगीरच्या विजेत्यांचें वज्रहृदयही क्षणमात्र फाटून गेलें आणि त्यांच्या गालांवरून अश्रूंचा प्रवाह वाहूं लागला. त्यांचा कंठ दाटून येऊन स्वर गद्गद झाला. " **विश्वास ! विश्वास !** " म्हणून त्यांनीं हांका मारल्या. मरणोन्मुख युवराजांनीं आपले नेत्र उघडले आणि वीरवाणीनें शब्द उच्चारले, " काका, आतां माझ्यापाशीं कां घुटमळतां ? सेनापति सन्निध नसला तर युद्ध आपल्याविरुद्ध जाईल ! " महाराष्ट्राच्या त्या शूर आणि तरुण राजपुत्राला मरणाच्या वेदनाही आपल्या कर्तव्याचा विसर पाडूं शकल्या नाहींत. अद्यापिही त्यांच्या मनांत युद्धाचाच विचार प्रामुख्यानें होता आणि आपण मेलों तरी आपल्या सैन्यानें तें जिंकलेंच पाहिजे हीच त्यांना तळमळ होती ! त्यांच्या शब्दांनीं पुनः वीरवृत्ति जागृत झाली आणि भाऊसाहेब भानावर आले. त्यांनीं उद्गार काढले " प्रभूची इच्छा ! आतां शत्रूचा समाचार आमचा आम्हीच घेणार ! " असें म्हणून त्यांनीं आपला घोडा उडवला आणि आपल्या वीर सैनिकांना पुनः एकदां धीर देऊन एकत्र केलें. अद्यापिही निष्ठावंत आणि जिवावर उदार झालेले सैनिक युद्ध करीतच होते आणि विजयलक्ष्मीची अजूनही मराठ्यांवरच कृपादृष्टि होती.

पण तितक्यांत **विश्वास**रावांच्या निधनाची वार्ता वणव्यासारखी मराठी सैनिकांत पसरली. आधींच ते थकून गेले होते. साहजिकच ह्या वार्तेचा त्यांच्यावर भयंकर परिणाम झाला. इतक्यांत आणखी एक आपत्ति कोसळली ! एक दोन महिन्यांपूर्वींच दोन हजार पठाण अबदालीला सोडून आले होते आणि विठ्ठल शिवदेवांच्या सैन्यांत त्यांना भरती करण्यांत आलें होतें. शत्रूंकडील पठाणांशीं त्यांचा घोटाळा होऊं नये आणि ते वेगळे दिसावे म्हणून त्यांना डोक्याभोंवतीं गुंडाळावयाला भगवीं फडकीं दिलीं होतीं. बहुधा आधींच ठरलेल्या कराराप्रमाणें त्यांनीं एकाएकीं आपले भगवे पट्टे फेंकून दिले आणि **विश्वास**रावाच्या मृत्यूची वार्ता पसरवीत व पराजयाच्या खोट्या कंड्या उठवीत सैन्याच्या पिच्छाडीला जेथें बाजारबुणगे उभे होते तेथें धांवत जाऊन त्यांनीं मारामारी आणि लुटालूट करावयाला प्रारंभ केला. आपल्या पिछाडीवर आलेली ही पठाणांची टोळी पाहून मराठ्यांचें मन गोंधळून गेलें. आणि आघाडीवर संग्राम करीत असलेल्या सैन्याला शत्रूचा आपल्या बाजूवरील मारा यशस्वी होऊन शत्रुसैन्य आपल्या पिछाडीला येऊन

पोंचलें असें वाटलें आणि आपला पराभव झाला अशा कल्पनेनें जागा सोडून तें पळूं लागलें.

अबदालीचा ह्या दृश्यावर विश्वासदेखील बसेना. आपला आतां पूर्ण पराभव झाल्यावांचून रहात नाहीं अशा कल्पनेंत तो होता. मराठ्यांनीं उजव्या अंगाला, डाव्या अंगाला आणि मध्यभागीं—तिन्ही ठिकाणीं—यश मिळविलें होतें. आपल्या सैन्यानें पळून जाऊं नये म्हणून अत्यंत कडक उपाय योजीत, पळणाऱ्या सैनिकांना कापून काढीत आणि अशा रीतीनें आपल्या सैनिकांच्या सर्वसामान्य पलायनाचा प्रसंग कसा तरी कष्टानें थोपवून धरीत तो जवळ उभा होता. इतक्यांत, का कोणास ठाऊक, पण मराठ्यांचें पिछाडीचें सैन्य भिऊन जाऊन पळूं लागलेलें त्याच्या एकदम दृष्टीला पडलें आणि त्याच्या आनंदाला सीमा राहिली नाहीं. झालेल्या घोंटाळ्याचा उलगडा झाला नाहीं तोंच अबदालीच्या सैन्यानें गोंधळलेल्या मराठी सैनिकांवर मारा चढविला. झालें. इतका वेळ तग धरून असलेला मराठ्यांच्या विरोधाचा बांध फुटून गेला. त्यांच्या उजव्या बाजूला आतां युद्धाचें स्वरूप राहिलें नव्हतें; त्याचें पलायनांत परिवर्तन झालें !

पण अद्यापिही मध्यभागीं जेथें भाऊ आणि त्यांचे निवडक अनुयायी जिवावर उदार होऊन आपल्या राष्ट्रीय ध्वजेचें—जरीपटक्याचें—रक्षण करीत होते तेथें घनघोर संग्राम चालू होता. आपल्या तरवारीच्या प्रत्येक आघाताबरोबर आपल्या दोन्ही अंगांच्या शत्रुसैनिकांना कापून काढतां काढतां आणि आपल्या सैनिकांना " लढा ! मारा ! कापा ! " म्हणून प्रोत्साहन देतां देतां भाऊंचा घसा बसून गेला शेवटीं तोंडांतून जेव्हां शब्द निघेना तेव्हां मानेनें खुणावून प्रोत्साहन देत त्यांनीं मृत्यूच्या दाढेंत आपला घोडा घातला ! ते प्रत्यक्ष मरणाला कवटाळावयालाच चालले आहेत, हें पाहून मुकुंद शिंद्यांनीं एक क्षणभर त्यांच्या घोड्याचा लगाम धरावयाचें धारिष्ट केलें आणि पदर पसरला, "महाराज आपण देवांचा पराक्रम गाजविला. वीरांना जें जें करणें शक्य आहे तें तें आपल्या सैन्यानें केलें आहे. तेव्हां आतां परत निघून जाणें शहाणपणाचें नाहीं का होणार ?" भाऊंनीं उत्तर केलें, "काय परत ! सरदार ! आपल्या सैन्यांतले सर्व उत्कृष्ट वीर धारातीर्थी पडले आणि प्रिय विश्वास आपल्याला सोडून गेला हें आपल्या लक्ष्यांत नाहीं वाटतें ? मीं एकेका सेनानायकाला नांवानें आज्ञा केली आणि प्रत्येक-

जण माझ्या आज्ञेवरून शत्रूशीं युद्ध करतां करतां मृत्युमुखीं पडला! रणांगणावरून निघून जाऊन हें कृष्णमुख नानासाहेबांना आणि महाराष्ट्राला दाखवावयालाही मी जिवंत राहणें कसें शक्य आहे? हाणा! मारा! शत्रूला जीव जाईपर्यंत कापून काढा! "हीच माझी शेवटची आज्ञा!"

मुकुंद शिंद्यांनीं आपल्या आवडत्या सेनापतींना प्रणाम केला आणि ते त्यांनीं केलेल्या शेवटच्या आज्ञेप्रमाणें घोड्यावरून खालीं उतरले. 'हरहर महादेव'ची गर्जना करीत त्यांनीं आपली तरवार बाहेर काढली आणि शत्रुसैन्याच्या गर्दीत उडी घेतली. तरुण जनकोजी, विश्वासू यशवंतराव पवार वीरापाठीमागून वीरांनीं त्यांचें अनुकरण केलें! आणि भाऊ?—त्यांच्या अंगांत जणुं युद्धदेवतेचा संचार झाला होता! ते तसे आंत घुसले, युद्धाच्या घनचक्रांत मिसळून गेले आणि आपल्या शब्दाप्रमाणें मरते वेळींही आपल्या राष्ट्राच्या मानरक्षणार्थ शत्रूंचीं शिरें कापून काढीत सुटले!

पानिपतच्या समरभूमीवरील हिंदूंच्या सैन्याच्या वीरोत्तम मुख्य सेनापतींविषयीं हीच गोष्ट जगाला कळली.—त्यांनीं आपल्या पराक्रमाच्या दिव्य तेजानें आणि स्वतःच्या कर्तव्यपूर्ण निधनानें पानिपताला त्यांच्या राष्ट्राच्या ऐहिक नाशाची भरपाई केली.

---

## प्रकरण १९ वें

# जेत्यांना जिंकणारा पराभव

"दंतच्छेदो हि नागानां श्लाघ्यो गिरिविदारेण"

[ पर्वत फोडीत असतां तुटलेला दांतच हत्तींना अधिक शोभतो. ]

झालेली हानि भयंकर होती. कारण भाऊ आणि त्यांच्या पाठीशीं असलेले वीरांतले वीर मराठे गडी आपल्या राष्ट्रध्वजेच्या रक्षणासाठीं असंख्य सैनिकांशीं इकडे झगडत असतां इतर सर्वत्र मराठी सैन्यांत पळापळीला प्रारंभ झाला होता आणि शत्रूचे सैनिक त्यांचा पाठलाग करीत होते. सहस्रावधि सैनिक शत्रूंच्या हातांत पडले आणि दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं त्यांच्या रांगांच्या रांगा एकामागून एक उभ्या करून त्यांचा

अमानुषपणानें शिरच्छेद करण्यांत आला ! अफगाणांना सांपडलेली लूटही प्रचंड होती.

पण मराठ्यांच्या पराक्रमानें त्यासाठीं शत्रूला द्यावयाला लावलेलें मूल्यही तितकेंच प्रचंड होतें. पठाणांनीं युद्ध जिंकलें पण तो जय जेत्यांना अधिक हानिकारक ठरला ! नुसत्या शेवटच्या दिवशीं मुसलमानांचे चाळीस सहस्र सैनिक रणभूमीवर मारले गेले ! ज्यानें गोविंदपंत बुंदेल्यांचें मस्तक कापून नेलें तो अताईखान उस्मान आणि त्याच्या सैन्यांतील इतर शेंकडों सेना-नायक युद्धांत मरण पावले. नजीबाला भयंकर मार लागला. विशेष म्हणजे आपल्याला विजय मिळावयाला आपलें प्रशंसनीय शौर्य आणि उत्तम युद्ध-कौशल्य हीं जितकीं कारणीभूत झालीं तितकाच दैवाचा योगायोगही कारणीभूत झाला ही गोष्ट त्यांना विसरतां येत नव्हती.

मराठे युद्धांत हरले; **पण पुनः केव्हांही जय मिळवावयाला शत्रु असमर्थ व्हावा अशा व्रणांनीं त्याला विद्ध केल्यावर मग हरले !**

कारण. पानपतला पराभव झाला म्हणून काय झालें ? पानपतच्या समर-भूमीवर एकत्रित झालेले मराठे नाहींसे झाले, पण महाराष्ट्रांतले मराठे अद्यापि जिवंत होते ! पानिपतच्या दारुण दिवशीं ज्याच्या नात्याचें कोणी मेलें नव्हतें असें घरच महाराष्ट्रांत राहिलें नव्हतें असें म्हणतात ! पण त्या दिवशीं महाराष्ट्रांत असेंही घर नव्हतें कीं, जेथें आपल्या राष्ट्रीय अपमानाचा वचपा काढण्याची आणि आपल्या सैनिकांनीं आणि सेनानायकांनीं ज्या कार्यासाठीं मरण स्वीकारलें तें कार्य यशस्वी करून त्यांचें हौतात्म्य फलशाली करण्याची प्रतिज्ञा केली गेली नाहीं ! अब्दालीच्या पुढच्या बेतांना विरोध करण्यासाठीं पन्नास सहस्र सैनिक घेऊन स्वतः पंतप्रधान यापूर्वींच नर्मदापार झाले होते. पानपतला आपल्या लोकांवर आणि आपल्या कुटुंबावर बेतलेल्या प्रसंगाची वार्ता कळतांच एवढ्या पराजयानंतरही पुढें चालून जावयाचें आणि ह्या पराजयाचा आणि त्यामुळें उत्तरेला मराठी सैन्यांत उत्पन्न झालेल्या भीतीचा अब्दालीनें लाभ घेण्याच्या पूर्वींच त्याचा नाश करावयाचा असें त्यांनीं ठरविलें. त्यांच्यावर स्वतःवर दुःखाचा डोंगर कोसळला होता आणि त्यांची प्रकृतीही अलीकडे अगदीं खंगली होती. पण त्यायोगानें आपल्या सैनिकांच्या मरणासाठीं प्रतिशोध घ्यावयाचा आणि अब्दालीला चोप देऊन परत घालवावयाचा ही त्यांची उत्कंठा उलटी द्विगुणित झाली. त्यांनीं उत्तरेच्या

सर्व हिंदु राजांना आश्वासनाचीं पत्रें लिहिलीं आणि त्यांत आपल्या धर्माचे आणि संपूर्ण हिंदु जातीचे शत्रू हिंदुस्वातंत्र्याच्या कार्याचा समूळ नाश करण्यासाठीं एकजुटीनें प्रयत्न करीत होते अशा वेळीं अलग राहून स्वतःला वांचवावयाचें धोरण स्वीकारणें ज्यांना शहाणपणाचें वाटलें त्याविषयीं त्यांची त्यांनीं कानउघाडणी केली ! त्या सर्वांना त्यांनीं आतां तरी हिंदु-स्वातंत्र्याच्या युद्धांत आपल्याला येऊन मिळावें अशीं निमंत्रणें पाठविलीं आणि पानपतचा पराभव झाला असतांनाही मोगल साम्राज्याच्या विनाशावर दुसरें अधिक बलशाली महंमदी साम्राज्य उभारावयाची अब्दालीची महत्त्वाकांक्षा आपण अजून व्यर्थ करून टाकूं असें त्यांना आश्वासन दिलें. त्यांनीं लिहिलें, "माझा तरुण पुत्र विश्वासराव अभिमन्यू जसा पराक्रम करून स्वर्गाला गेला त्याप्रमाणें शत्रूंशीं झगडतांना धारातीर्थीं पडला हें खरें आहे; पण म्हणून काय झालें ? माझा भाऊ सदाशिवराव आणि शिंद्याचा छावा जनकोजी— त्यांचें काय झालें हेंच कोणाला माहिती नाहीं. आणखीही इतर कित्येक सेनाधुरंधर आणि सैनिक युद्धांत कामाला आले. पण हें युद्ध आहे. ह्यांत यशापयश येणें हें नेहमीं परमेश्वराच्या इच्छेवर अवलंबून असणार ! तेव्हां त्याचा खेद किती ! इतकें झाल्यावरही आपण त्याचा परत वचपा काढूं."

असल्या कधींही शिथिल न होणाऱ्या चिकाटीमुळें राष्ट्रावर केवढीही आपत्ति कोसळो तिच्याखालीं चिरडून न जातां धैर्यानें तिला तोंड द्यावयाच्या मराठ्यांच्या ह्या गुणामुळें ते संपूर्ण हिंदुस्थानचे अधिराज झाले. आपल्या शत्रूंचा हा स्वभावधर्म न ओळखण्याइतका किंवा त्यांची योग्यता न जाणण्या-इतका अब्दाली मूर्ख नव्हता. पानिपतचा विजय मिळतांच आपण जर त्वरित आपल्या देशाची वाट धरली नाहीं तर जो कांहीं अल्प लाभ आपण मिळ-विला आहे तोही आपल्याला ओकून टाकावा लागेल हें त्याच्या लक्ष्यांत आलें. पानिपतच्या युद्धांतून जे बचावले ते सर्व सैनिक आणि अधिकारी नानासाहेबांनीं पुनः आपल्याजवळ एकत्र केले. मल्हारराव होळकर, विठ्ठल शिवदेव, नारो शंकर, जानोजी भोसले आणि इतर अनेक सेनानायक ग्वाल्हेरला एका मागून एक गोळा होऊं लागले आणि त्यांना बरोबर घेऊन दिल्लीवर चालून जाण्याची नानासाहेबांनीं सिद्धता केली. मराठ्यांच्या ह्या वागण्यानें सुजाउद्दवला आणि नजीबखान सुद्धां गडबडून गेले. पानपतला विजय मिळविणें म्हणजे मराठ्यांच्या विरुद्ध सर्व युद्ध जिंकणें नाहीं अशी त्यांना प्रतीति आली.

तेव्हां ग्वाल्हेरला येऊन पोंचलेल्या नानासाहेबांशीं त्यांनीं स्वतंत्रपणें बोलण्याला प्रारंभ केला आणि त्यांना पसंत पडतील अशा अटी सुचविल्या! अबदालीला एकट्यानें किंवा त्यांचें सर्वांचें साहाय्य घेऊनही हिंदूंचा नित्याचा मोड करणें किंवा मुसलमानी पादशाहीचा डळमळणारा डोलारा तोलून धरणें शक्य नाहीं ही गोष्ट सुजाउद्दवल्यानें ओळखली. हळुहळू मुसलमानांचा संघ फुटला. प्रत्येकजण आपापल्या सुरक्षिततेकडे लक्ष देऊ लागला. सुजानें अबदालीला सोडलें. अबदाली दिल्लीला आला आणि कांहीं आठवडे तेथें राहिला, तों दक्षिणेकडून आपल्या पन्नास सहस्र सैनिकांसह बाळाजीपंतांनीं त्याच्या निकट येऊन लगट केली, तिकडे इराणच्या शहांनीं त्याच्या राज्यावर चाल केल्याची वार्ता आली! ह्या वार्तेनें तो प्रसिद्ध वीरही अस्वस्थ झाला. त्याला दिल्ली व तेथील पातशाहीराजकारण तसेंच सोडून देऊन शके १६८२ फाल्गुन (मार्च १७६१)च्या शेवटीं ज्या महत्त्वाकांक्षी उद्देशानें उद्युक्त होऊन त्यानें सिंधुनद ओलांडून हिंदुस्थानावर आक्रमण केलें त्यांपैकीं एकही उद्देश शेवटास न जातां घाईघाईनें सिंधुनद परत ओलांडावा लागला!

हिंदुस्थानांतल्या मुसलमानांनीं भरतवर्षाच्या सीमेच्या पलीकडील आपल्या क्रूर सहधर्मीयांशीं संगनमत करून आपली पातशाही वांचविण्याचे जे अनेक प्रयत्न केले त्यांपैकीं हा शेवटचा प्रयत्न होता! त्यांनीं पानपतचें युद्ध जिंकलें आणि तें जिंकतांना मराठ-मंडळाची प्रबळ हिंदुसत्ता नामशेष करण्याची किंवा ज्या प्राणांतक मगरमिठीनें तिनें मोगली साम्राज्याचा गळा दाबून धरला होता तिच्यापासून त्याचा बचाव करण्याची, शेवटची संधिही गमावून बसले!

पठाण पुनः केव्हांही दिल्लीला येणें शक्य झालें नाहीं. लवकरच त्यांचें सिंधुनद उतरणेंही बंद होणार होतें!

कारण पानपतच्या विनाशामधून पंजाबमध्यें दुसरी हिंदु सत्ता उत्थापित झाली. ती हिंदु सत्ता म्हणजे शीखसंघाचें उदयोन्मुख राष्ट्र. ह्या शूर लोकांनीं हळुहळू अशा धर्मसंघाची प्रस्थापना केली कीं, ज्याला वारंवार हुतात्म्यांच्या रक्ताचें पोषण मिळून त्याचें लवकरच प्रबळ राष्ट्र बनणार असें दिसूं लागलें. त्यांचे दहावे गुरु सिंहपराक्रम गोविंदसिंग आणि वीर हुतात्मा बंदा बैरागी—ह्या दोघांचीही अखिल हिंदूंच्या सर्वश्रेष्ठ राष्ट्रवीरांच्या मालिकेंत नेहमीं पूजा होत राहील—ह्यांच्या नेतृत्वाखालीं पंजाबमध्यें शिखांनीं हिंदु स्वातंत्र्याच्या कार्याप्रीत्यर्थ झुंज केली. बंदाच्या आधिपत्याखालीं

असतांना अल्पकालपर्यंत आपल्या प्रांताचा कांहीं भाग स्वतंत्र करण्याचें यश त्यांना मिळालें. पण मुसलमानी सत्तेवर पंजाबमध्यें शेवटचा प्राणांतिक घाव घालण्याचें आणि पंचनदाचा पवित्र प्रदेश हिंदु राज्याखालीं आणण्याचें कार्य मराठ्यांच्याच वांट्याला राखून ठेवलें होतें. त्यांनीं तें पार पाडलें आणि त्यांना आपल्या घरादारापासून आणि प्रांतापासून दूर अतिशय अंतरावर युद्ध करावें लागलें व सिंहाच्या प्रत्यक्ष गुहेंत जाऊन त्याच्या दाढीला (ती उपटण्यासाठीं) हात घालावा लागला तरी त्यांनीं तेंही केलें! त्यांनीं पृथ्वीराजांच्या मृत्यूनंतर पहिल्यानें पुन्हा हिंदूंचा ध्वज थेट अटकेवर नेऊन रोविला. अशा रीतीनें हिंदुस्थानांतील मुसलमानी सत्तेचें पुनरुज्जीवन करण्यासाठीं येथील मुसलमानांचे आणि त्यांनीं नादिरशहा व अबदाली ह्यांशीं केलेल्या विस्तृत संघाचे सतत चाललेले प्रयत्न मराठे आपल्या चिकाटीच्या प्रतिरोधानें हाणून पाडीत असतां शिखांना आपल्या लोकांचें सुसंघटित असें एक प्रबळ राष्ट्र बनवावयाला अवसर मिळाला. पानिपतची सबंध स्वारी चालू असतां एकसारखें भयंकर मूल्य देऊन नुसता पंजाब प्रांत परत आपल्या राज्याला जोडण्याचें जें अल्पस्वल्प समाधान अबदालीच्या वांट्याला आलें, तेंही त्याला ह्या नवीन उदयाला आलेल्या सत्तेनें त्याच्या पदरांत पडूं दिलें नाहीं. पंजाब जरी अशा रीतीनें महाराष्ट्रांतील हिंदु सत्तेच्या हातांतून गळून पडला, तरी तो मुसलमानांच्या हातांत दीर्घ काळ राहूं शकला नाहीं. कारण, अबदालीनें पाठ फिरविली नाहीं तोंच पंजाबमधल्या ह्या हिंदूंनीं त्यानें व्यवस्थेसाठीं मागें ठेवलेल्या सैन्याला त्रास द्यावयाला प्रारंभ केला आणि त्यांना साहाय्य करण्यासाठीं त्यानंतर स्वतः अबदाली दोनदां हिंदुस्थानांत आला तरीही आपली मातृभूमि त्याच्या हातांतून त्यांनीं सोडविली. मराठ्यांनीं सुद्धां दिल्लींत लवकरच पुन्हा विजयप्रवेश केला—पुन्हा एकदां ते अखिल हिंदुस्थानाचे सार्वभौम झाले! शिखांनाही जरी आपली प्रत्यक्ष सत्ता आपल्या प्रदेशाच्या पलीकडे पूर्वेला जवळ दिल्लीपर्यंतदेखील वाढवितां आली नाहीं तरी भारताच्या सीमेच्या पलीकडील कोणाही शत्रूंशीं दोन हात करून केव्हांही आपल्या स्वातंत्र्याचें संरक्षण करण्याचें सामर्थ्य त्यांनीं मिळविलें. पठाणांच्या किंवा तुर्कांच्या भूमींतील कधींही तृप्त न होणाऱ्या धनतृष्णेला किंवा अत्याचारी धर्मबंडाला पुनः केव्हांही पठाणांना किंवा तुर्कांना सिंधुनद ओलांडावयाचें धैर्य करावयाला लावतां आलें

नाहीं. उलट शिखांनीं सिंधुनद ओलांडला आणि विजयानें हिंदुध्वज काबूल नदीपर्यंत नेऊन अबदालीचें उसनें फेडलें. वायव्य सीमेवरील मुसलमानी टोळ्यांचें उच्छृंखल धर्मवेड त्यांनीं इतक्या पूर्णपणें चिरडून टाकलें कीं, शिखांच्या नांवाचा उच्चार केल्याबरोबर पठाणांचीं मुलें भीतीनें आपलें रडें थांबवीत !

तेव्हां अखिल हिंदुसमाजाच्या दृष्टीनें पाहिलें असतां मुसलमानांना आपला हेतु शेवटास नेतां आला नाहीं. त्यांनीं पानपतचें युद्ध जिंकलें पण तें जिंकतांनाच हिंदुपदपादशाही प्रस्थापित करावयाला निघालेल्या मराठ्यांशीं त्यांनीं चालविलेला झगडा मात्र ते पूर्णपणें हारलें ! पानिपत जिंकल्यावरही पूर्वसमुद्रापासून अटकेपर्यंत सर्व हिंदुस्थानचें स्वामित्व हिंदूंकडेच राहिलेलें त्यांना आपल्या डोळ्यांनीं पहावें लागलें !

पण अशा रीतीनें हिंदु उत्तरेकडे आपल्या मुसलमानी शत्रूंशीं प्रचंड राष्ट्रीय युद्ध चालविण्यांत गुंतले असतां आणखी एक प्रतिस्पर्धी हळूच पटावर आला आणि ह्या तुमुल प्रसंगाच्या पर्यवसानाकडे दृष्टि लावून टपत बसला. पानिपतला मराठ्यांचा पराभव झाल्यामुळें हर्ष मानावयाला जर कांहीं कोणाला कारण झालें असेल तर तें सर्वांहून अधिक त्याला झालें. पानिपतला दोन्हीही पक्ष झुंजून इतके निकामी झाले कीं, त्यामुळें मराठ्यांना बंगालवर स्वारी करावयाचा आणि तींत प्लासीच्या रणभूमीवर नवीन जन्म घेतलेल्या इंग्रजांच्या बालसत्तेला मूठमाती द्यावयाचा बेत पुढें ढकलावा लागला. जर पानपतला खरोखर कोणी विजयी झाला असेल तर तो तेथें इतक्या निकरानें झुंजणाऱ्या प्रतिस्पर्ध्यांपैकीं कोणीही नसून हा ह्या युद्धाचें तटस्थपणानें निरीक्षण करणारा आणि दोन्हीही प्रतिस्पर्धी हीनबल झाल्यावर त्याचा लाभ घ्यावयाचें शहाणपण अंगीं असलेला धूर्त आगांतुकच होय.

पण पानिपतच्या योगानें ईस्ट इंडिया कंपनीला आणखी कांहीं काळ जिवंत राहण्याचा नवीन पट्टा मिळाला असला आणि इंग्रजांचा समाचार घ्यावयाचा विचार सध्यांपुरता तरी मराठ्यांना सोडून देणें भाग पडलें असलें तरी मराठ्यांच्या तेथल्या एका पराभवानेंच इंग्रजांना चिरकाल टिकणारा कांहीं लाभ झाला असें कोणींही समजूं नये. कारण मराठे पानपतला बसलेल्या आघातांतून लवकरच सांवरले आणि त्यांच्या घरांतच तितक्यांत जी यादवी चालू झाली ती जर झाली नसती व त्यांच्या कर्तृत्ववान् पुढाऱ्यांना

अगदीं अकालीं मृत्यूनें हिरावून नेलें नसतें तर त्यांनीं पानपतच्या पराभवानंतरही इंग्रजांच्या विरुद्ध यश मिळविलें असतें. आपण पुढें जाऊं तसें हें सर्व क्रमाक्रमानें आपल्या निदर्शनाला येईलच. इंग्रजांच्या पुढील यशाचें श्रेय मराठयांचा जो पानपतला पराभव झाला त्याला इतकें नसून त्यानंतर लवकरच त्यांच्यामध्यें जो आपसांत अंतःकलह झाला त्याला तें वास्तविक आहे !

मेजर इव्हान बॉल लिहितोः " पानपतचा पराभवसुद्धां मराठयांना कीर्तिदायक आणि अभिमानास्पदच होता. ते हिंदूंच्या कार्यासाठीं अखिल हिंदूंच्या वतीनें लढले आणि जरी त्यांचा पराभव झाला तरी त्यानंतर जय मिळविणाऱ्या अफगाणांनाही हिंदुस्थानांतून निघून जावें लागलें आणि पुनः त्यांना हिंदुस्थानच्या कारभारांत केव्हांही ढवळाढवळ करतां आली नाहीं."

अबदालीच्या एकाएकी परत निघून जाण्याची वार्ता आणि सुजाउद्दवला व नजीबखान ह्यांनीं संधीसाठीं पाठविलेले नम्र निरोप मराठ्यांच्या सैन्यांत येऊन पोंचतांच परिस्थितींत इतक्यांत आपल्याला उपयुक्त असें इतकें अंतर पडलेलें पाहून त्यांना साहजिक आनंद झाला. पानपतच्या युद्धानंतर दोन महिन्यांच्या आंतच नारो शंकरांनीं लिहिलें: " ईश्वराच्या कृपेनें मराठयांकडे-किंवा हिंगण्यांनीं संबोधिल्याप्रमाणें हरिभक्तांच्या सेनेकडे- हिंदुस्थानचें आधिपत्य अजून तसेंच चालू आहे !" महाराष्ट्राच्या सर्वश्रेष्ठ पुढाऱ्यानें काढलेलीं वाक्यें महाराष्ट्रांत प्रत्येक ओंठावर नाचूं लागलीं आणि प्रत्येक मराठ्याच्या तोंडून उद्गार निघूं लागले: " त्यांत एवढें काय आहे? किती झालें तरी हें युद्ध आहे–आपण त्याचा वचपा पुनः काढू !"

मध्यंतरीं नानासाहेबांची प्रकृति दिवसेंदिवस अधिकाधिक बिघडूं लागली. गेल्या दोन वर्षांपासून त्यांची प्रकृति ढांसळल्यासारखी दिसत होती. इतक्यांत पानपतच्या प्रकाराची भयंकर वार्ता समजली. हा प्रचंड आघात मानवी शक्तीला शक्य आहे तोंपर्यंत धैर्यानें त्यांनीं सहन केला. त्यांनीं आपलें व्यक्तिगत दुःख बाजूला सारून राष्ट्रांत चैतन्य उत्पन्न केलें व त्याच्यांत ह्या पराभवामुळें प्राप्त झालेली भीतीची मनोवृत्ति दाबून टाकावयाचें आणि सर्वांशीं धैर्यानें आणि यशस्वितेनें तोंड देण्याला सिद्ध व्हावयाचें सामर्थ्य उत्पन्न केलें. पण विश्वासराव आणि सदाशिवराव व इतर शूर सेनानायक आणि सैनिक ह्यांच्या निधनामुळें त्यांच्या हृदयाच्या आंत दुःखाची एवढी ज्वाला पेटली होती कीं, ती कशानेंही विझणें शक्य नव्हतें !

त्यांची आधींच क्षीण होत चाललेली प्रकृति पूर्ण बिघडली आणि लवकरच शके १६८३ ज्येष्ठ व० ६ (ता.२३ जून १७६१) ह्या तिथीला ज्यानें महाराष्ट्राला सर्व हिंदुस्थानचें सार्वभौमत्व मिळवून दिलें असा हा सर्वश्रेष्ठ पुढारी दिवंगत झाला ! मरणसमयीं त्यांचें वय पुरें ४० वर्षांचेंही नव्हतें ! बाळाजींच्या योग्यतेसंबंधीं व स्वभावासंबंधीं येथें कांहीं सांगावयाची आवश्यकता नाहीं. शब्दांना करतां येईल त्यापेक्षां त्यांच्या कृत्यांनीं अनेक पटींनीं उच्चस्वरांत त्यांची ओळख करून दिली आहे. त्यांचा इतर राज्यकारभारही इतका न्यायपूर्ण आणि लोकप्रिय होता कीं, अद्यापिही मराठे त्यांच्या राजवटीची कृतज्ञतापूर्वक आठवण काढतात ! शिवाजीमहाराजांची महत्त्वाकांक्षा अर्थतः सिद्धीला नेण्याचें आणि हिंदुपदपादशाही प्रस्थापित करण्याचें कार्य त्यांच्यासाठीं राखून ठेवलें गेलें होतें. त्यांनीं हिंदुस्थानचा जवळ जवळ सगळा भाग मुसलमानांच्या हातांतून वस्तुतः सोडविला. त्यांच्या आधिपत्याखालींच गेल्या सातशें वर्षांत—पृथ्वीराजाचा पराभव झाल्या वेळेपासून कधींही प्राप्त न झालेलें वैभवाचें अत्युच्च शिखर हिंदूंनीं गांठलें. ते सर्वश्रेष्ठ नसले तरी त्यांच्या वेळच्या जगांतील अत्यंत थोर व्यक्तींपैकीं एक होत ह्यांत शंका नाहीं.

मराठ्यांना पानिपताला जेवढी हानि सोसावी लागली तिच्यापेक्षां अधिक नसेल तर निदान तेवढी तरी हानि बाळाजीपंतांच्या ह्या अकालीं निधनानें मराठ्यांची झाली. हे दोन्हीही घाव एकामागून एक इतक्या त्वरेनें बसले कीं त्यांच्या धक्कयांतून सावरावयाला राष्ट्राला साहजिकच थोडा विलंब लागला.

---

## प्रकरण १६ वें

# सद्गुणी माधवराव

"भुवमधिपतिर्बालावस्थोप्यलं परिरक्षितुम्
न खलु वयसा जात्येवायं स्वकार्यसहो भरः"

नानासाहेबांच्या मृत्यूमुळें महाराष्ट्र वस्तुतः पोरकें झालेलें पाहून आणि पानिपतला महाराष्ट्रमंडळाला सहन कराव्या लागलेल्या मोठ्या आघातानें तें कोलमडून पडेल अशा आशेवर महाराष्ट्राच्या शत्रूंनीं सर्व दिशांनीं उठावणी केली आणि त्याच्यावर मारा चढवावयाला प्रारंभ केला! आपला स्वामी जो म्हैसूरचा हिंदुराजा त्याच्यापासून म्हैसूरचें राज्य बळकावून घ्यावयाला आणि दक्षिणेच्या बाजूनें महाराष्ट्रावर चालून जावयाला ही संधि चांगली आहे असें हैदरानें ठरविलें! उदगीरला मिळालेल्या अपयशाचा प्रतिशोध घेण्यासाठीं निजामानें शस्त्रसामुग्री घडवणारांना विश्रांति घेऊं न देतां सिद्धता चालविली! जें जें स्थळ हातात येईल तें तें गिळंकृत करावयाच्या उद्योगाला इंग्रज लागले! उत्तरेकडे केवळ मुसलमानच नाहीं तर रजपूत, जाट आणि इतर लहानमोठे हिंदु संस्थानिकही मराठ्यांच्या विरुद्ध बंड करून उठले आणि प्रत्येकजण आपल्याला सांपडेल तितके हातपाय पसरूं लागला! आणि सर्वांत दुर्दैवाची गोष्ट ही कीं, अशा प्रकारें ज्या वेळीं मराठ्यांचें राज्य अनेक बाह्य शत्रूंच्या उठावणीनें चुरडून जावयाची, आणि त्याच्या वैभवाबरोबरच तें राज्य ज्या हिंदुस्वातंत्र्याच्या कल्पनेचें निदर्शक होतें त्या हिंदुस्वातंत्र्याचेंही वैभव नष्ट व्हावयाची पाळी आली होती, अगदीं त्याच वेळीं रघुनाथरावाच्या राष्ट्रघातकी महत्त्वाकांक्षेला ऊत येऊन तिच्या योगानें आपसांतील यादवीला आणि मराठी सैन्यांतच दोन तट पडावयाला प्रारंभ झाला!!

असल्या असामान्य अडचणींच्या प्रसंगीं महाराष्ट्राची धुरा धारण करून त्याला संभाळून न्यावयाचा भार **बाळाजी बाजीरावांचे** द्वितीय पुत्र **माधवराव** ह्यांच्यावर पडला! त्या वेळीं त्यांचें वय केवळ १७ वर्षांचें होतें! पण महाराष्ट्राच्या सुदैवानें त्यांच्या अंगीं इतकें लोकोत्तर सामर्थ्य व वैय्यक्तिक आकर्षण वसत होतें, आणि त्यांच्या वाडवडिलांनी ज्या हिंदुपदपादशाहीच्या



थोरले माधवराव पेशवे.

कार्यासाठीं आपलें रक्त सांडलें तें कार्य सिद्धीला नेण्याची त्यांना इतकी तळमळ लागली होती कीं, त्यांच्या नेतृत्वाखालीं महाराष्ट्रानें ह्या सर्व अडचणींतूनही मार्ग काढला आणि विरोध करावयाला पुढें आलेल्या सर्व राजसत्तांना नमवून, हिंदुस्थानच्या राजमंडळांतील आपलें अग्रस्थान स्थिर राखलें!

पहिल्यानें निजामानें आपल्या दैवाची परीक्षा पाहिली. सामर्थ्याच्या दृष्टीनें मराठी राज्य आतां मृतप्राय झालें आहे अशी कल्पना करून तो सरळ पुण्यावर चाल करून आला. हिंदुधर्माचे संरक्षक म्हणून मराठ्यांनीं मिळविलेली कीर्ति पायाखालीं तुडविण्यासाठीं येतांना वाटेंत त्यानें टोकें येथील हिंदु देवालय भ्रष्ट करून पाडून टाकलें! पण त्याची स्वारी होतांच सर्व दिशांनीं मराठ्यांचे ऐंशी सहस्र सैनिक आपल्या राजधानीचें रक्षण करण्यासाठीं धांवून आलेले आणि त्याच्याविरुद्ध युद्धार्थ उभे राहिलेले पाहिल्याबरोबर तो पूर्णपणें हताश होऊन गेला. उंदेरीला त्याचा पराभव होऊन त्याला मागें परतावें लागलें. पण इतक्यांत राघोबानें आपल्या नीच प्रवृत्तीचें प्रदर्शन करून त्याच्याशीं कारस्थानें चालू केलीं आणि आपल्या प्रत्यक्ष पुतण्याच्या—तरुण माधवरावांच्या—विरुद्ध मराठ्यांचा एक पक्ष फोडला. तेव्हां त्यांच्यांत असे तट पडले आहेत तोंच मराठ्यांना चिरडून टाकावें ह्या हेतूनें निजाम पुनः एकदां प्रचंड सैन्य घेऊन बाहेर पडला. नागपूरचे भोसले आणि दुसरे कांहीं मराठे सरदार त्याच्या पक्षाला जाऊन मिळाले. पण मराठ्यांच्या इतिहासांत नेहमींच असें घडून आलेलें दृष्टोत्पत्तीस येतें कीं, मराठ्यांचें राजकीय ऐक्य मोडून टाकणाऱ्या स्वार्थी आणि अराष्ट्रीय शक्ति ज्या ज्या वेळीं प्रबळ होत, त्या त्या वेळीं लागलींच किंवा लवकरच त्यांच्यांतील उपजत राष्ट्रीय भावनाही जागृत होऊन त्यांना तोंड देत आणि प्रसंगीं शिक्षाही लावीत. मधून मधून आत्मप्रौढीमुळें किंवा स्वार्थप्रवृत्तीमुळें कांहींच्या हातून राष्ट्रविघातक आचरण घडत असलें तरी एकंदर महाराष्ट्रांत उपजत राष्ट्रीय भावनेचें हें वैशिष्ट्य एकसारखें आढळून येतें. ह्या वेळींही तसेंच झालें. आपसांतील यादवीनें उत्पन्न झालेल्या द्वेषाच्या भरांत पंतप्रधानांच्या विरुद्ध निजामाला जाऊन मिळालेल्या मराठे सरदारांनीं आपल्या अस्वाभाविक मित्राला सोडलें आणि अगदीं आणीबाणीच्या वेळीं ते मराठी सैन्याला येऊन मिळाले. निजाम चांगला तोंडघशीं पडला. शके १६८५ (इ. सन १७६३) मध्यें राक्षसभुवन येथें घनघोर युद्ध झालें आणि पुनः

एकदां मराठयांच्या संयुक्त सैन्यानें मुसलमानांवर मोठा विजय मिळविला. निजामाचा दिवाण मारला गेला. इतर बावीस मोठे सरदार विद्ध किंवा कारावद्ध झाले आणि त्याच्या तोफा व सर्व युद्धसामुग्री मराठयांच्या हातांत पडली. आपण उद्गीरच्या युद्धांत जें जें गमावलें तें तें सर्व पुनः परत घेण्यासाठीं निजाम आला होता आणि पुण्याचा कारभारी आपल्या मान्यतेवांचून नेमतां कामा नये अशी मराठयांना आज्ञा करण्याचें धाष्टर्य त्यानें केलें होतें ! पण उद्गीरची हार झाली ती झालीच, त्या व्यतिरिक्त आणखी ८२ लक्ष उत्पन्नाचा प्रदेश मराठयांच्या स्वाधीन करून त्याला आपली सुटका करून घ्यावी लागली. नवीन पंतप्रधान किशोरवयस्क **माधवराव** ह्यांनीं केलेलें हें पहिलें युद्ध; पण त्यांत त्यांनीं आपलें कौशल्य आणि कर्तृत्व इतकें दाखविलें कीं, लागलींच ते आपल्या राष्ट्राचा मार्गदर्शक होऊन त्याच्या सर्व शत्रूंच्या विरुद्ध कोणच्याही प्रसंगांतून निभावून न्यावयास समर्थ असे हेच योग्य पुढारी आहेत असा सर्व महाराष्ट्राला एकदम विश्वास आला.

ह्याप्रमाणें पानिपत झाल्यानंतरही हिंदूंचें बळ पूर्वींप्रमाणेंच निःसंशय वरचढ आहे असा प्रत्यय निजामाला आणून दिल्यावर मराठे पानिपतकडे गुंतले आहेत ह्या संधीचा लाभ घेऊन म्हैसूरच्या जुन्या हिंदु राज्याचा नाश करून त्याच्या भग्नावशेषावर नवीन मुसलमानी सत्ता ज्या साहसी मुसलमान सैनिकानें स्थापन केली आणि जो प्रत्यक्ष मराठयांच्या प्रदेशावर कृष्णा नदीपर्यंत चालून आला होता त्याला तोच धडा शिकविण्यासाठीं **माधवराव** निघाले. शके १६८५ ( इ. सन १७६४ ) मध्यें माधवरावांनीं हैदरवरच्या स्वारीला प्रारंभ केला. पुनः मराठी सैनिकांनीं धारवाड हस्तगत केलें; आणि घोरपडे, विंचूरकर, पटवर्धन इत्यादि सेनानायकांनीं हैदरावर सर्व बाजूंनीं आक्रमण करीत त्याला कोंडींत धरलें. हैदर मोठा कुशल सेनापति आणि चिवट योद्धा होता. पण रट्टेहळ्ळीला केलेल्या निकराच्या युद्धानें मराठयांच्या पुढें टिकाव धरणें अशक्य आहे हें हैदरच्या अनुभवाला आलें. सरतेशेवटीं मोठया कौशल्याचा डाव करून निसटून जावयाचा त्यानें प्रयत्न केला, पण मार्गांत बेदनूरला त्याला आडवून **माधवरावांनीं** तो निष्फळ केला. म्हणजे त्याला युद्ध देणें भाग पडलें आणि त्यांत मुसलमानी सैन्याची अपरिमित हानि झाली. सैन्याचें पुढारीपण स्वतः आपण स्वीकारून माधवरावांनीं इतक्या थाटानें मारा चढवला कीं, हैदरच्या सैन्याचा पुरा मोड झाला. फ्रेंचांच्या विशेष

शिक्षणाखालीं शिक्षित झालेलें अत्यंत पराक्रमी सैन्य हैदरजवळ होतें ! पण त्यालाही चांगला मार बसून सहस्रावधि घोडे, उंट आणि तोफखाना हीं विजयी मराठ्यांच्या हातांत पडलीं. आतां आणखी प्रतिरोध करणें अशक्य होतें. हैदरनें संधीची याचना केली आणि मराठ्यांनीं जिंकलेल्या सर्व प्रदेशावरचें त्यांचें स्वामित्व मान्य करून, देणें राहिलेली खंडणी आणि चौथाई मिळून २२ लक्ष रुपये त्याला मराठ्यांना द्यावे लागले.

माधवरावांना आपल्या मनाप्रमाणें वागतां आलें असतें तर त्यांनीं हैदरला एवढ्यावरही सोडलें नसतें. पण एकाद्या हैदरपेक्षां किंवा नजीबखानापेक्षां राघोबादादांची दुष्ट राज्यतृष्णा हीच मराठ्यांवर आलेली अधिक मोठी आपत्ति होती. ह्या तरुण पंतप्रधानांनी हिंदु राज्याच्या शत्रूच्या विरुद्ध युद्धें आरंभून त्यांत विजयी व्हावयाची वेळ आली म्हणजे राघोबांनीं नेमकें बंड करून उठावें; असें अनेक वेळां झालें. राघोबाची अनिवार अधिकारतृष्णा कशानेंही शमतां दिसेना; आणि अशी सत्ता चालविण्याची योग्यता तर त्याच्या अंगीं अगदीं नव्हती. पण त्याला मोकळा ठेवला, कीं लागलींच स्वतःच्या पुतण्याविरुद्ध अहिंदु शत्रूंशीं सख्य करावयाच्या त्याच्या कारस्थानांना प्रारंभ होई. बरें, त्याचा पराभव झाला आणि त्याला धरून नियंत्रणांत ठेवलें, कीं दुर्बळ आणि हट्टी बायांबापड्यांप्रमाणें त्याच्या उपोषणांना प्रारंभ होई आणि तो अन्नत्याग करून जीव देण्याचा धाक घाली ! मोगलांच्या राज्यपदासाठीं असा अधिकार सांगणारा जर कोणी उभा झाला असता तर त्याचा निकाल एकाद्या विषाच्या लहान थेंबानें किंवा सिंहासनाधिष्ठित पुरुषाच्या हास्याखालीं वा दुःखोद्गाराखालीं लपवलेल्या एकाद्या सुरीनें तेव्हांच लावला असता ! पण पुण्याच्या गादीवर अधिष्ठित झालेले तरुण पंतप्रधान म्हणजे औदार्याची आणि धार्मिकतेची मूर्ति होती. चुलत्यानें राज्याची वांटणी करण्याविषयीं बोली घालतांच त्यांनीं त्याला अत्यंत निरपेक्षतेचे पत्र पाठविलें. माधवराव लिहितात, " राज्य कोणाचें ? आम्ही वांटणार कोण ? ही दौलत मोठी. या दौलतींत सर्व लहानमोठ्यांनीं अनुकूल असून जेणेंकरून दौलत नीट होय तेंच सर्वांनीं करावें. तें एकीकडे राहून दौलत दो जागीं करावी हेंच तीर्थस्वरूपांचें मानस ! त्यास आम्हांस कांहीं करणें नाहीं. कारण कीं, ही दौलत पहिल्यापासून एकांनींच करावी, वरकडांचा भार करणारावर असावा. आतां वडिलांचें मानस वांटणी करावी, त्यास आम्हांस कांहीं करणें नाहीं.

कां कीं, अशानें दौलत चालणार नाहीं; व दोहों जागीं दौलतीचे वांटे केल्यानें लौकिकासही वाईट, यास्तव सर्व वडिलांनींच करावें. आम्ही स्वस्थ भलते जागीं राहूं. आपल्याआपल्यांत भांडून दौलत बुडवली हा लौकिक कशाला पाहिजे ? सर्व त्यांनींच करावें हें फार चांगलें. आम्ही स्वस्थ राहूं. वडिलांनीं नीट केल्यावर आम्हास सांगतील तेव्हां आम्ही जवळच आहों ! 'सर्व तुमचेंच आहे. आम्ही चार बारगीर तसे तुमच्याजवळ राहूं." ह्यानें आपल्या स्वार्थाच्या लोभानें मराठी राज्याचा बळी दिला असें पुढील पिढ्यांचे शाप घेण्यापेक्षां आम्ही तुम्ही जे तुकडे घालाल त्यांत संतोष मानूं."

पण अत्यंत न्यायी आणि अत्यंत सद्गुणी असे हे पंतप्रधान विद्यमान असतां राघोबांनीं महाराष्ट्राच्या सर्वाधिकाराचें ते स्थान स्वीकारलें असतें तरी त्याच्यासारख्या क्षणिक विचाराच्या आणि अयोग्य अशा पुरुषाला मराठ्यांच्या राष्ट्रानें त्या पदावर कधींही राहूं दिलें नसतें !

---

## प्रकरण १७ वें

# पानिपतचा प्रतिशोध

"मराठे आपल्या उपकारकर्त्यांशीं कृतज्ञ पण शत्रूंशीं तितकेच निष्ठुर आहेत. त्यांचा कोणी मानभंग केला तर त्याचा प्रतिशोध घेण्यासाठीं प्राणही संकटांत घालावयाला ते सिद्ध होतील." —ह्युएन्त्संग.

घरांतलीं मन व्यग्र करणारीं भांडणें, आपसांत चाललेलीं देशविघातक युद्धें आणि शेजारी होत असलेला हैदर आणि टिपूसारख्या भयंकर आणि नवीन शत्रूंचा उदय, इतक्या अडचणींतही पानिपतच्या दिवसाचा प्रतिशोध घ्यावयाचा आणि त्या प्रसंगीं ज्यांनीं ज्यांनीं त्यांच्या विरुद्ध जावयाचें धाष्टर्य केलें त्यांना कडक शासन द्यावयाचें हें आपलें कर्तव्य मराठे विसरूं शकले नाहींत. श्रीमंत नानासाहेबांच्या निधनानंतर कांहीं दिवसपर्यंत शिंदे आणि होळकर हे दोन प्रमुख मराठे सरदार त्या स्थितींत जपतां येईल तितके मराठ्यांच्या उत्तरेकडील राष्ट्रीय हितसंबंधांना जपत राहिले. आपसांतलि युद्धें आणि राघोबाच्या उलाढाल्या ह्यांची साधारणपणें व्यवस्था लावून होतांच शके

१६९१ ( इ. सन १७६९ ) मध्यें विसाजी कृष्ण बिनीवाले ह्यांच्या आधिपत्याखालीं उत्तरेकडे पानिपतच्या युद्धांत विरोध करणाऱ्या मंडळींना शासन करण्यासाठीं सैन्य पाठवावयाचें ठरविलें. उत्तरेकडील सर्व मराठी सेनानायकांना ह्या सैन्याला येऊन मिळण्याविषयीं आज्ञा गेल्या. पुनः हिंदुसाम्राज्याचें धोरण आणि नियंत्रण आपल्या हातांत घ्यावयाचें आणि शके१६८२(इ. सन १७६१ ) मध्यें ज्या ज्या हिंदी संस्थानिकांनीं मराठी सत्तेचा विनाश व्हावा म्हणून देव आळवले आणि प्रयत्न केले त्यांना चांगली शिक्षा लावावयाची अशा ठाम निश्चयानें नर्मदापार होऊन मराठ्यांची प्रचंड सेना बुंदेलखंडांत जाऊन पोहोंचली. त्यांनीं तेथला लहानसहान विरोध मोडून टाकला आणि वाटेवरील सर्व अपराधी संस्थानिकांना आणि सरदारांना शासन करून विशेष प्रतिरोध न होतां ते चंबळेपर्यंत जाऊन पोहोंचले. जाट भांडावयाला सिद्ध झाला आणि पानिपतच्या प्रसंगानंतर बळकावलेले आग्रा व इतर दुर्ग स्वाधीन करावयाचें त्यानें नाकारलें. भरतपुराजवळ दोन्ही दळांचें तोंड लागून मोठें युद्ध झालें. जाटांनीं अत्यंत शौर्यानें संग्राम केला. पण मराठी सैन्याविरुद्ध त्यांना शेवटपर्यंत तग धरतां आला नाहीं; त्यांनीं धीर सोडला आणि आपल्या सहस्रावधि सहचाऱ्यांचे मृत देह रणांगणावर टाकून ते पळून गेले. हत्ती, घोडे आणि युद्धसामुग्रीसह त्यांचा सर्व सेनानिवासच मराठ्यांच्या हातांत पडला. लवकरच त्यांचा सरदार नवलसिंग यानें संधीसाठीं याचना केली आणि त्यानें बळकावलेला मराठ्यांचा सर्व प्रदेश सोडून देऊन इतक्या दिवसांची राहिलेली खंडणी म्हणून ६५ लक्ष रुपये दिले. नंतर विजयी मराठी सैन्य दिल्लीच्या महाद्वाराच्या रोखानें चाल करून निघालें. तेथें तो हिंदूंचा जन्माचा हाडवैरी कांहीं तरी प्रतिरोध करील असें त्यांना वाटत होतें. पण त्या वृद्ध जंबुकानें—कपटपटु नजीबखानानें आपल्याला पश्चात्ताप झाल्याचें आणि अगदीं गोगलगाईचें सोंग आणलें आणि मराठ्यांच्या विजयाक्रमणाच्या वार्तेबरोबर जीवदान देण्याविषयीं याचना करीत त्यांच्या शिबिरांत तो खान उपस्थित झाला. त्यानें दुआबांतील हरण केलेली सर्व लूट आणि प्रदेश परत केला; मराठ्यांचा दिल्लीवर जावयाचा मार्ग सुखरूप करून दिला आणि पुनः योग्य संधि येतांच मराठ्यांच्या विरुद्ध कारस्थान करण्यासाठीं एक वेळ क्षमा करून मराठ्यांनीं त्याला जीवदान दिलें तर ते म्हणतील तें करण्याची सिद्धता दाखविली; पण ह्या वेळीं मराठ्यांच्या प्रतिशोधापासून त्याची सुटका

करणें कोणालाही शक्य झालें नसतें. इतक्यांत प्रत्यक्ष मृत्युच मध्यें आला आणि त्यानें ह्या पानिपतच्या योजकाला तेथें ज्यांनीं आत्मदान केलें त्यांच्या जातभाईंच्या क्रोधापासून वांचविलें !

मराठ्यांनीं दिल्लींत प्रवेश केला. अकबराच्या आणि औरंगजेबाच्या राजधानींत त्यांना प्रतिरोध करील असा कोणी नव्हता ! अगदीं शेवटीं ज्या अहमदशहा अब्दालीनें तिच्यासाठीं युद्ध केले पण तोही आतां वठणीवर आला होता आणि त्यानें पेशव्यांशीं बोलणें करण्यासाठीं आपले प्रतिनिधि पुण्यास पाठवून दिले होते ! तेथें बराच खल होऊन दोन्ही पक्षांत संधि ठरला आणि त्यायोगें अहमदशहा अब्दालीनें हिंदुस्थानच्या सार्वभौम राजकारणांत यापुढें आपण ढवळाढवळ करणार नाहीं असा करार केला व हिंदी साम्राज्याचे संरक्षणकर्ते ही मराठ्यांची पदवी मान्य केली ! अशा रीतीनें पानिपतच्या विजेत्यानें स्वतः ज्या महत्त्वाकांक्षेमुळें त्या युद्धाला तो प्रवृत्त झाला त्या महत्त्वाकांक्षेचें आणि तेथें मिळविलेल्या विजयाचें राजकीय दृष्ट्या निष्फलत्व मान्य केलें आणि हिंदुस्थानांत आतां सार्वभौम सत्ता हिंदूकडेच आहे ही गोष्ट सिद्ध केली. ह्याप्रमाणें हिंदुस्थानच्या सार्वभौम राजकारणांतून अफगाण पक्ष नित्याचा नाहींसा करून आणि दिल्ली हातांत घेऊन मराठ्यांनीं पठाणांना आणि रोहिल्यांना अगदीं अलग करून सोडलें. कारण त्या वेळीं हिंदूंशीं सार्वभौम सत्तेसाठीं दोन हात करता आले तर करावयाला सिद्ध असलेली तींच दोन समर्थ अशीं मुसलमानी केंद्रस्थानें होतीं. पण त्यांच्याही शिक्षेचा दिवस येऊन ठेपला होता ! पानिपतला रोहिल्यांनीं आणि पठाणांनीं मराठ्यांचा जो मानभंग आणि छळ केला त्याच्या स्मृतीनें मराठ्यांच्या वैरनिर्यातनाच्या खड्गाची धार अत्यंत तीक्ष्ण झाली आणि प्रतिशोधाच्या मनोवृत्तींना इतका भर आला कीं, त्या कदाचित् तितक्याच प्रबळ शक्तीनें चिरडल्या गेल्या असत्या; पण त्यांना चुचकारून ठेवणें शक्य नव्हतें; हें रोहिल्यांना आणि पठाणांना, दोघांनाही समजून चुकलें. तेव्हां ते पानपतची समरभूमि ज्यांनीं पाहिली होती अशा आपल्या रहिमतखान आणि अहमदखान बंगष ह्या जुन्या सेनापतींच्या आधिपत्याखालीं एकत्र होऊन त्यांनीं मराठी सैन्य आल्याबरोबर त्याच्याशीं धीटपणानें सामना द्यावयाचा निश्चय केला.

दिल्लीस कांहीं दिवस राहून मराठे दुआबांत शिरले. तेथें त्यांना आपल्या

जुन्या शत्रूंच्या सैन्याची संख्या हळुहळू भयंकर प्रमाणांत वाढली असल्याचें दिसून आलें. जवळपास ७०,००० मुसलमान शस्त्रें घेऊन युद्धाला सज्ज झाले ! पण त्यांचें मोजमाप करावयाला मराठ्यांना वेळ कोठें होता ! एकावर एक निकराचे संग्राम होऊं लागले ! आणि प्रत्येक रणांगणावर पठाणांचा आणि रोहिल्यांचा खरपूस समाचार घेतला गेला. शत्रूंच्या हातां-तून नगरामागून नगरें व दुर्गामागून दुर्ग हस्तगत करीत आणि संपूर्ण दुआबांतून पठाण तेवढा झाडून काढीत मराठ्यांचें विजयी सैन्य रोहिल-खंडावर चाल करून गेलें व पठाणांची ज्याप्रमाणें त्यांनीं चांदी उडवली होती त्याचप्रमाणें तेथल्या रोहिल्यांचीही चांदी उडवली. मराठ्यांच्या भयंकर प्रति-शोधापासून नजीबखानाची मृत्यूनें मध्यें पडून सोडवणूक केली; पण त्याचा मुलगा झबेताखान हा आपल्या आणि आपल्या बापाच्या पापाचें फळ भोगा-वयाला अद्यापि जिवंत होता ! त्यानें शुक्रतालच्या कोटाच्या अभेद्य भिंतीचा आश्रय केला ! मराठे थेट कोटावर चाल करून गेले ! त्यांनीं आपल्या तोफांच्या भडिमाराला प्रारंभ केला आणि आंतल्या सैन्याचा इतका भयंकर संहार केला कीं, झबेताखानाला गड लढवणें अशक्य झालें. एका रात्रीं तो गडांतून पळून गेला आणि गंगा नदी उतरून बिजनूरला पोंचला. त्याच्या प्रतिशोधाकरितां निघालेलें मराठी सैन्य लागलींच गंगा नदी उतरलें आणि नगराच्या संरक्षणासाठीं झबेताखानानें ठेवलेल्या मुसलमानी तोफांचा भयंकर मारा चालू असतांही तें तसेंच बिजनूरवर चाल करून गेलें. त्यांनीं तोफा हस्तगत केल्या, त्यांना वाटेंत अडवावयाला आलेल्या दोन्ही मोठ्या सैन्यांची धूळधाण उडवली. सहस्रावधि रोहिल्यांना तरवारीचें पाणी पाजलें आणि बिजनूरांत प्रवेश केला ! बिजनूरचा सर्व जिल्हा मराठ्यांच्या घोड्यांच्या टापांनीं तुडवला गेला ! झबेताखान नजीबगडला पळाला. मराठ्यांनीं तेथेंही त्याचा पाठलाग केला आणि फत्तेगड घेतलें. नजीबखानानें आणि त्याच्या रोहिल्यांनीं पानिपतांत मराठ्यांचें शिबिर लुटून जी असंख्य संपत्ति लांबविली होती ती सर्व फत्तेगडला ठेवली होती. विजयी मराठ्यांच्या ती पुनः हातांत पडली आणि त्यामुळें त्यांना अमर्याद हर्ष झाला. त्यांचा विजय आतां परि-पूर्ण झाला. झबेताखानाची बायको आणि पोरें हीदेखील त्यांच्या हातांत सांपडलीं. पानिपतच्या युद्धानंतर तेथें असलेल्या मराठ्यांच्या बायकांमुलांची आणि शतावधि मराठे तरुणांची ह्याच क्रूर रोहिल्यांनीं पशूप्रमाणें निष्ठुर-

पणानें जी गत केली ती लक्षांत घेतां तितक्याच क्रूरपणानें नजीबाच्या आणि झबेताच्या कुटुंबावर मराठ्यांनीं अत्याचार केले असते, तरी त्यांना दोष देतां आला नसता पण हिंदूंच्या विजयाची परंपरा अगदीं निराळी आहे. तिला अनुसरून मराठ्यांनीं त्यांना बलपूर्वक धर्मांतर करावयाला लावावयाची किंवा त्यांना आपल्या बाजारबुणग्यांच्या प्रबळ विकारांना बळी द्यावयाची कल्पनाही मनांत आणली नाहीं. असल्या पाशवी आणि रानटी कृत्यांचा अवलंब न करतांच मराठी शस्त्रास्त्रांनीं सर्व प्रांतभर रोहिल्यांच्या आणि पठाणांच्या हृदयांत इतकी धडकी भरवली होती कीं, मराठ्यांचा नुसता एक स्वार दिसला पुरे, कीं रोहिले मुसलमानांचे सबंध गांवच्या गांव वाट मिळेल तिकडे पळत सुटे. त्यांचे जे जे पुढारी वांचले त्यांनीं त्यांनीं तराईच्या अरण्याचा आश्रय केला ! तेथेंसुद्धां तितक्यांत पावसाळ्याला आरंभ झाल्यामुळेंच मराठ्यांच्या प्रतिशोधाच्या खड्गापासून त्यांचा बचाव झाला ! पानिपतसाठीं इतकें भयंकर मूल्य त्यांना द्यावें लागलें !

अशा रीतीनें आपली ध्वजा तराईच्या अरण्याच्या अगदीं सीमाप्रांतापर्यंत फडकवल्यावर आणि आपल्या सर्व शत्रूंना शरण आणल्यानंतर प्रत्यागमनाचा निर्देश दिला गेला आणि महाराष्ट्राची सेना शके १६९३ ( इ. सन १७७१ ) मध्यें दिल्लीकडे परत निघाली. तेथे मराठ्यांच्या राजकारणी पुरुषांनीं व त्यांच्या सेनाधुरंधरांनीं मिळवलेल्या विजयांचा आपल्या कारस्थानांनीं पुरा लाभ पदरांत पाडला. शहाअलम ह्या वेळीं मोगल साम्राज्याचा नामधारी बादशहा होता. त्याला आपल्या अटकेंत ठेवावयाचा आणि अशा रीतीनें हिंदुस्थानची सार्वभौम सत्ता आपल्या हातांत घ्यावयाची असा इंग्रजांचा आणि सुजाउद्दवल्याचा डाव चालला होता. पण मराठ्यांच्या कुशल मंत्र्यांनीं त्यांच्यावर मात केली आणि त्यांचा डाव फसवून मराठ्यांनीं शहाअलमला दिल्लीचा नांवाचा बादशहा म्हणून मान्य करावें आणि तेवढ्यासाठीं समग्र हिंदुस्थानचें साम्राज्य चालवावयाचा आणि संरक्षावयाचा सर्व अधिकार व भार त्याने मराठ्यांवर सोंपवावा असें अधिकारपत्र द्यावयाला शहाअलमला भाग पाडलें. ही त्याच्या पदवीची शाब्दिक मान्यतासुद्धां, बादशहानें जेव्हां पानिपतच्या युद्धानंतरच्या सर्व वर्षांची थकलेली चौथाई मराठ्यांना द्यावयाचा आणि ह्यापुढें नवीन मिळणारा प्रांत अर्धा अर्धा वांटून घ्यावयाचा करार केला तेव्हांच त्याला मिळाली. इ. सन

१७६१ मध्यें जी गोष्ट घडवून आणण्याच्या बेतांत आणली होती ती इ. सन १७७१ मध्यें प्रत्यक्ष घडवून आणली ! रोहिल्यांचा आणि पठाणांचा पूर्ण पराभव झाल्यावर हिंदुस्थानांत हिंदूंच्या साम्राज्याला प्रतिबंध करणारा कोणीही मुसलमान सबंध हिंदुस्थानांत राहिला नव्हता. त्या वर्षी मुसलमानी स्वातंत्र्याचा, सत्तेचा आणि महत्त्वाकांक्षेचा प्रत्यक्ष देहान्त झाला. मोगल, तुर्क, अफगाण, पठाण, रोहिले आणि इराणी– उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील सर्व पंथांचे आणि सर्व मतांचे मुसलमान—ह्यांनीं हिंदुस्थानच्या सार्वभौमसत्तेसाठीं झगडून ती हस्तगत करावयाचा आणि प्रतिशोधार्थ सिद्ध झालेल्या हिंदूंच्या हातांत आपली बादशाही पडूं न देतां तिला वांचवावयाचा आटोकाट प्रयत्न केला, पण मराठ्यांनीं तो सर्व निष्फळ करून टाकला आणि पुढें ५० वर्षें हिंदु-साम्राज्याचे संरक्षक ह्या नात्यानें त्यांची ही पदवी जो जो अमान्य करील किंवा घ्यावयाला पुढें येईल त्याच्याशीं झगडून हिंदुस्थानांतील सार्वभौम सत्ता आपल्या हातांत ठेवली. शके १६९३ ( इ. सन १७७१ ) नंतर हिंदुस्थानच्या राजकारणाच्या क्षेत्रांतील एक सत्ता म्हणून मुसलमानांची गणती करावयाचें कारण राहिलें नाहीं ! हिंदूंनीं तिची समाप्ति केली आणि अशा रीतीनें अटकेपासून दक्षिण समुद्रापर्यंत हिंदुस्थान आणि हिंदुजातीचें स्वातंत्र्य परत मिळविलें. ह्यानंतर ज्यांच्याविरुद्ध प्रयत्न करून त्यांना दोन हात करावे लागले ते लोक मुसलमान नव्हते; ते लोक स्वभावानें, वर्तनानें आणि योग्यतेनें मुसलमानांहून अगदीं भिन्न होते; त्यांचे नांव इंग्रज !

मराठ्यांचीं हीं दोन मोठीं सैन्यें उत्तरेकडे पाठविलीं गेलीं असतां ती संधि साधून दक्षिणेकडे महत्त्वाकांक्षी हैदरानें आपल्या दैवाची पुनः एकदां परीक्षा पहावयाचा प्रयत्न केला नसता आणि मराठ्यांचे अधिराज्य अमान्य करून तो उठला नसता तरच आश्चर्याची गोष्ट झाली असती. बरोबर प्रबळ सैन्य घेऊन **माधवराव** लागलींच तुंगभद्रा उतरले आणि शत्रुसैन्याशीं युद्धावर युद्ध देत आणि त्याचे दुर्गामागून दुर्ग जिंकीत पुढें जाऊं लागले. हैदर अनवडीच्या रानांत आश्रयार्थ शिरतांच मराठ्यांची एक तुकडी तेथें राहून त्याला जर्जर करूं लागली. एके दिवशीं रात्रीं मराठ्यांचें सैन्य मतोडला तळ देऊन स्वस्थ पडलें असतां हैदर बरोबर वीस सहस्र निवडक लोक घेऊन बाहेर निघाला आणि अकस्मात् मराठी सैन्यावर तुटून पडला. पण हैदरच्या बंदुकीच्या पहिल्या ध्वनीबरोबर मराठ्यांचे

सेनापति गोपाळराव पटवर्धन जागे झाले. आपल्या सैन्यावर भयंकर प्रसंग आला आहे हें त्यांनीं लागलीच ताडलें. ह्या वेळीं यत्किंचित् ढिलेपणा किंवा अनिश्चितपणा झाल्यास मराठी सैन्य जागें व्हावयाच्या पूर्वींच जागच्या जागीं कापलें जाईल हें त्यांच्या लक्षांत आलें. त्यांनीं तशीच घोडयावर उडी मारली, भगवा झेंडा उभारला आणि युद्धाच्या सिद्धतेनें उभे राहून सैन्याला सूचना देण्यासाठीं नगारे वाजविण्याची आज्ञा केली. नगाऱ्याचा ध्वनि ऐकतांच आपलें निद्रास्थान सोडून एकामागून एक सर्व सैनिक भराभर रण-भूमीवर एकत्र झाले. शत्रूच्या लोकांचा तोफांचा भयानक मारा अधिकच होऊं लागला आणि सैनिकामागून सैनिक विद्ध होऊन पडूं लागले. पण मराठे यत्किंचित् कचरले नाहीं. हैदराच्या तोफांच्या मेघगर्जनेनें आणि त्यांच्या माऱ्याच्या आवेशानें मराठे आतां चोहोंकडून घेरले जातात कीं काय अशी भीति उत्पन्न झाली; पण गोपाळराव निधड्या छातीनें आपल्या स्थानावर अचळ राहिले—आणि मराठ्यांची राष्ट्रध्वजा फडफडत तशीच शत्रूला हिणवूं लागली ! सूचनेचे नगारे अद्यापि वाजतच होते. गोपाळरावांचा एक शरीर-रक्षक जवळच उभा होता. तोफेचा एक गोळा येऊन फुटला आणि त्याच्या मस्तकाच्या चिंधड्या उडाल्या. त्याच्या देहांतून इतक्या वेगानें रक्ताची चिळकांडी उडाली, कीं तिनें मराठ्यांच्या सेनापतींना रक्ताचें स्नान घातलें ! पण पटवर्धन घोड्यावर आपल्या जागीं तसेच उभे राहिले ! त्यांच्या घोड्याला एक गोळी लागली. ते दुसऱ्या घोड्यावर स्वार झाले. ते त्याच्यावर बसतात न बसतात इतक्यांत त्यालाही तोफेचा गोळा फुटून लागला आणि पुनः पटवर्धनांना पायउतार व्हावें लागलें. पण ते पुनः तिसऱ्या घोड्यावर स्वार झाले आणि अगदीं मृत्यूच्या दाढेंतही आपलें स्थान धरून राहिले ! त्यांच्या हृदयाला भयाचा स्पर्श झाला नाहीं ! त्यांचा निश्चय यत्किंचित् ढिला झाला नाहीं ! क्षणमात्र धैर्यच्युतीनें, लवमात्र स्थानत्यागानें सैन्याचा धर सुटला असता आणि विजयोन्मत्त शत्रूच्या हातांत सर्व सैन्यच्या सैन्य पडलें असतें. पण मराठ्यांच्या सेनापतीचें अतुल धैर्य स्पर्शजन्य सांथी-प्रमाणें पसरलें आणि मराठ्यांचें सर्व सैन्य—पाईक आणि नाईक—एकाद्या लोखंडी भिंतीप्रमाणें ती आग सहन करीत तसें उभें राहिलें ! हैदरनें जवळ येऊन हें अदम्य धैर्याचें दृश्य पाहतांच तो थक्क झाला आणि विस्मयानें आला तसा द्रुतगतीनें परत फिरला. युद्ध तसेंच चालू राहिलें. पेठे, पटवर्धन, पानशे

आणि इतर मराठे सेनापतींनीं त्याची एकसारखी मृगया चालविली आणि जागोजाग त्याचा पाठलाग करून शेवटीं मोतीतलाव येथें त्याला पूर्ण कोंडींत धरला व त्याच्या सर्व सैन्याचा संहार होऊन युद्धसामुग्रीसकट सर्व दारूगोळा आणि शस्त्रास्त्रें विजयी मराठ्यांच्या हातांत पडलीं. आतां हैदरला राजकीय क्षेत्रांतून समूळ नाहींसें करावयाचा मराठ्यांनीं विचार केला. पण इतक्यांत पुण्याहून महत्त्वाचें पत्र येऊन पोंचलें. त्यांत पंतप्रधान अत्यवस्थ आहेत तेव्हां सर्वांनीं पुण्यास निघून यावें अशी आज्ञा आली होती. मोठ्या कष्टानें मराठी सेनानायक संधीला मान्य झाले आणि त्यावर हैदरची स्वाक्षरी त्यांनीं करून घेतली. ह्या संधीनें हैदरानें मराठ्यांच्या स्वराज्यापैकीं बळकावलेला सर्व प्रदेश सोडून दिला आणि युद्धाचा सर्व व्यय सोसून वर पंतप्रधानांना पन्नास लक्ष रुपये खंडणीप्रीत्यर्थ दिले.

मराठे सर्वत्र असे उज्ज्वल विजय संपादीत असतां, ज्या राष्ट्रपुरुषाच्या समर्थ नियंत्रणाखालीं त्यांनीं पानिपतला झालेल्या अत्याचाराचा आणि अपमानाचा प्रतिशोध घेतला आणि आपल्या राष्ट्राला पुनः पूर्वीप्रमाणें वैभवाच्या शिखरावर स्थानापन्न केलें, त्यांच्या आजाराची वार्ता दिल्लीपासून म्हैसूरपर्यंत पसरलेल्या मराठ्यांच्या सैन्यांत आणि राजधान्यांत जाऊन थडकली. सर्वराष्ट्रीय आपत्ति कोसळली, तसें सर्व राष्ट्र चिंतामग्न होऊन गेलें! माधवरावांनीं जें सेनानायकाचें कौशल्य दाखविलें आणि युद्धांत जे विलक्षण विजय मिळविले त्यांच्या योगानेंच केवळ ते इतके लोकप्रिय झाले नव्हते. त्यांचा राज्यकारभार तितकाच न्याय्य आणि दयापूर्ण होता; रावापासून रंकापर्यंत सर्व प्रजाजनांविषयीं त्यांना वाटत असलेली आस्था तितकीच खोल आणि कळकळीची होती; थोरापासून लहानापर्यंत सर्वांना सारखा न्याय मिळावा म्हणून चाललेले त्यांचे प्रयत्न तितकेच जागरूकपणाचे आणि नेटाचे होते; आणि त्यामुळें त्यांच्या प्रजेपैकीं अगदीं हलक्यांतल्या हलक्या मनुष्यालाही त्यांच्याविषयीं अत्यंत भक्ति आणि प्रेम वाटे. बलिष्ठांना त्यांच्या कडकपणाची आणि सत्यनिष्ठेची भीति वाटे, आणि गरीब शेतकरी आपलीं दुःखें त्यांच्याजवळ सांगत आणि हे आपले प्रेमाचे पाठिराखे आहेत असें त्यांना वाटे. त्यांच्या मूर्ख चुलत्याच्या महत्त्वाकांक्षेमुळें घरगुती भांडणें आणि नाशकारक अंतर्युद्धें उपस्थित झालीं असतांही त्यांनीं पानिपतच्या युद्धापासून दहा वर्षांच्या आंत त्या आपत्तीचा आपल्या राष्ट्राला विसर पाडला; नव्हे, अधिक

बरोबर बोलावयाचें म्हणजे त्या पराजयापेक्षांही 'राष्ट्रप्रतिष्ठा वाढविणारा पराभव' अशी त्याची स्मृति राष्ट्रांत जागृत ठेवली. इतकेंच नव्हे तर ज्यांनीं ज्यांनीं हिंदुपदपादशाहीच्या आणि हिंदुस्वातंत्र्याच्या कार्याविरुद्ध आपलीं डोकीं वर उचललीं त्यांचीं त्यांचीं डोकीं आपल्या समर्थ हातांनीं सडकून काढलीं! अद्यापि ते तारुण्याच्या भर उत्साहांत होते आणि इतक्यांतच भाग्याच्या आणि लोकप्रियतेच्या कळसाला ते पोहोंचले होते. तेव्हां साहजिकच सर्व राष्ट्र त्यांच्या हातून त्यांच्या थोर पित्याच्या हातून घडलेल्या उज्ज्वल पराक्रमापेक्षांही वरचढ पराक्रम होईल म्हणून आशा करीत होतें. माधवराव दुष्ट राजयक्ष्म्याला बळी पडले! तेव्हां त्यांचें वय पुरतें २७ वर्षांचेंही नव्हतें! राजवाड्यांत ते अत्यवस्थ स्थितींत पडले असतांही सुधारण्याच्या मर्यादेच्या पलीकडे गेलेल्या–कारण ह्या वेळींही राघोबाची निजामाशीं कारस्थानें चालूच होतीं!–चुलत्याची समजूत घालून त्याला वळविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला; सर्व राष्ट्रीय ऋण वारून टाकलें; आणि आपल्या राजवैद्याला जिच्या योगानें आपली वाणी शेवटच्या क्षणापर्यंत चालू राहील आणि आपल्याला परमेश्वराचें नांव तोंडांत असतांना प्राणत्याग करतां येईल अशी औषधयोजना करण्याविषयीं आज्ञा केली! माधवराव अत्यवस्थ आहेत ही वार्ता बाहेर पडून सर्व राज्यभर पसरतांच त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या सर्व प्रजाजनांचा आपल्या जिवलग राष्ट्रपित्याच्या–आपल्या राष्ट्रवीराच्या–शेवटच्या दर्शनासाठीं चारी दिशांनीं पुण्यांत नुसता पूर लोटला. तें कळतांच राजवाड्याचीं दारें सर्वांना सर्व काळ मोकळीं राहावीं आणि लहानांतल्या लहान मनुष्यालाही आपल्या भेटीचा प्रतिबंध होऊं नये असा त्यांनीं निर्बंध केला. शके १६९४ कार्तिक व० ८ला ( नोव्हेंबर १७७२ ) ह्या उदार राजपुत्रानें राज्यांतील विद्वान् आणि धार्मिक पुरुषांना जवळ बोलावलें, त्या सर्वांना नमस्कार केला आणि देवळांत ज्याप्रमाणें दाटी होते त्याप्रमाणें राजवाड्यांत जमलेल्या असंख्य लोकांचा निरोप घेतला आणि 'आम्ही महायात्रेस जातों, स्वारीची तयारी करा' म्हणून सांगितलें. नंतर परमेश्वराचें नामस्मरण करीत ह्या श्रेष्ठ राष्ट्रपुरुषानें सर्वजानपद उसासे टाकीत आणि हुंदके देत असतां मुखानें 'गजानन, गजानन' म्हणत मोठ्या योग्याप्रमाणें नेत्रद्वारें प्राण सोडला! त्यांची तरुण निपुत्रिक आणि महासाध्वी पत्नी रमाबाई हिनें आपले सर्व अलंकार आणि वस्त्रभूषणें दीनांना आणि ब्राह्मणांना वांटून टाकलीं. आणि

सर्व आप्तसंबंधी आग्रह आणि विनवण्या करीत असतां त्या दूर सारून आपल्या प्रिय पतीच्या चितेवर आरोहण करून सहगमन केलें! पसरलेल्या ज्वालांत आपल्याला जाळून घेऊन तिनें मनुष्याला अद्यापिही प्राप्त करून घेतां येणें शक्य आहे अशा मृत्युरहित प्रेमाच्या आणि स्वर्गीय सौंदर्याच्या रहस्यावर प्रकाश पाडण्यासाठीं आपल्या आत्म्याची दिवटी करून पेटविली! आजही ह्यांच्या—आपल्या आवडत्या राजाच्या आणि राणीच्या—माधवरावांच्या आणि रमाबाईच्या नांवाचा उल्लेख झाल्याबरोबर महाराष्ट्र राजनिष्ठेच्या आणि प्रेमाच्या अश्रूंचा त्यांच्या स्मृतीला अभिषेक करतो! अजूनही महाराष्ट्राचे राष्ट्रभाट आणि गोंधळी 'दक्षिणचा दिवा मालवला हिरा हरपला' असें करुणगीत गातात!

---

## प्रकरण १८ वें

# आपसांतील यादवी आणि लोकमताची राज्यक्रांति

"इंग्रजांना खडे चारले नाहि लागु दिला थारा
भले बुद्धिचे सागर नाना, ऐसा नाहीं होणारा।"

ज्यांच्या ठायीं सर्व राष्ट्राच्या आशा केंद्रित झाल्या होत्या त्या **माधवरावांना** अल्पवयांत मृत्यु यावा आणि ज्याला सर्व राष्ट्र शिव्याशाप देत होते त्या राघोबाला आपल्या पुतण्यानंतर एका पिढीचें आयुष्य लाभावें ही घटनाच अशी आहे कीं तिजमुळें म्हणतात त्याप्रमाणें परमेश्वर सर्वशक्तिमान् नाहीं अशी शंका मनुष्याच्या मनांत केव्हां केव्हां स्वाभाविकपणें उत्पन्न व्हावी.

**माधवरावांचें** अकाली निधन ही गोष्ट मोठी राष्ट्रीय आपत्ति होती; पण त्यांच्यानंतर राघोबाचें जगणें ही त्याहूनही मोठी राष्ट्रीय आपत्ति होती. **माधवरावांच्या** अंतकाळच्या इच्छेप्रमाणें आणि सर्व राष्ट्राच्या मनाप्रमाणें **माधवरावांच्या** मागें त्यांचे कनिष्ठ बंधु नारायणराव ह्यांना प्रधानकीचीं वस्त्रें मिळतांच त्या अल्पवयस्क पंतप्रधानाच्या आणि त्याच्या साहाय्यकर्त्यांच्या विरुद्ध ज्याचें पर्यवसान रक्तपातांत झालें पाहिजे अशा राघोबादादांच्या

कारस्थानांना पुनः प्रारंभ झाला. त्यानें वाड्याच्या संरक्षणार्थ ठेवलेल्या गारद्यांना आपल्या कटांत घेतलें आणि त्यांनीं नारायणरावांना लगट करून 'धरावें' अशी आज्ञा दिली. पण त्यांची राक्षसी पत्नी आनंदीबाई हिनें धरण्याच्या जागीं मुळांतच पार 'मा'रून टाकण्याचा डाव रचला. भाद्रपद शुद्ध १३ शके १६९५ (ता. ३०-८-१७७३) ह्या दिवशीं गारदी बंड करून उठले आणि अरेरावीनें थकलेल्या वेतनाची मागणी करीत त्यांनीं नारायणरावांना वेढलें. जवळ पंतप्रधानांचा विश्वासू सेवक होता. त्यान त्यांच्या ह्या कृत्यासाठीं त्यांची जरा कानउघाडणी करतांच गारद्यांनीं तरवारी काढून त्याला जागच्याजागीं ठार मारलें. तें पाहून नारायणराव भ ीनें शनवार वाड्यांतील खोल्या खोल्यांतून पळून जाऊं लागले पण गारद्यांना ते चकवू शकले नाहींत. शेवटीं नारायणराव नाटकशाळेंत राघोबा बसले होते. तेथें गेले आणि त्यांच्या कंबरेला विळखा घालून 'काका माझा जीव वांचवा!' म्हणून केविलवाण्या स्वरानें याचना करूं लागले. 'काका मी तुमचें मूल आहें मला वांचवा. तुम्ही सर्व राज्य करा. मला घालाल ते तुकडे खाऊन मी दिवस काढीन!' पण मारेकरी पाठीमागेंच होते. दादानें आपल्या भोंवतालची पुतण्याची मिठी सोडवली आणि गारद्यांनीं तरवारी उपसल्या! स्वामिनिष्ठ चापाजी टिळेकर मारेकऱ्यांच्या तरवारीच्या आड आला आणि आपल्या धन्यावर स्वतःच्या देहाचें आच्छादन करून त्यांना वांचविण्यासाठीं काकुळत करूं लागले पण त्यांना हत्येचा मद चढला होता. गारद्यांनीं आपल्या रक्तांकित तरवारींनीं कचाकच वार करून अल्पवयी पंतप्रधानांची आणि जीव जाईपर्यंत त्यांच्यावर आपल्या शरीराचें छत्र धरणाऱ्या त्यांच्या विश्वासू सेवकाची हत्या केली! इतके झाल्यावर बंडवाल्यांनीं राघोबा पंतप्रधान झाले म्हणून त्याच्या नांवानें द्वाही फिरवली आणि ते शनिवारवाडा हस्तगत करून बसले.

नगरांत ही भयंकर वार्ता पसरतांच लोक संतप्त होऊन गेले आणि जागोजाग घोळके जमून हत्याकारी राघोबाला आपला पंतप्रधान म्हणून आम्ही मान्यता देणार नाहीं अशा निश्चयाची घोषणा होऊं लागली! अद्यापि महाराष्ट्रांत पुरेशी राष्ट्रीय वृत्ति शेष राहिली होती. आणि नापसंत असलेल्या पुरुषाला आपला पुढारी मान्य करावयाला मराठ्यांना बलात्कारानें भाग पाडणें अशक्य होतें. राजवटींतल्या निरनिराळ्या अधिकारावर असलेल्या

पुरुषांच्या आणि लोकनायकांच्या ह्या 'बारभाई' म्हणून प्रसिद्धीस आलेल्या गुप्त क्रांतिमंडळाची स्थापना झाली आणि राज्यांतले मुख्य न्यायाधीश प्रसिद्ध रामशास्त्री ह्यांची घडलेल्या प्रकाराची पूर्ण चौकशी करणाच्या कामीं योजना झाली. थोड्या अवधींतच ह्या प्रकारांत राघोबादादाचें आणि त्याची पापदेवता आनंदीबाई हिचें अंग आहे अशी निश्चिती झाली. लागलीच तो निर्भिड ब्राह्मण तसाच राजवाड्यांत गेला आणि तेथें आपल्या पक्षाच्या संरक्षकांनीं परिवेष्टिलेला राघोबा भरसभेंत असतांना त्यांनीं त्याच्या तोंडावर जनतेच्या पंतप्रधानांची आणि स्वतःच्या पुतण्याची हत्त्या करण्याचा आरोप केला ! ह्या अपराधाचें प्रायश्चित्त काय म्हणून प्रश्न निघाला असतां त्यांनीं उद्गार काढले, " ह्या भयंकर अपराधाला प्रायश्चित्त कोणचें असणार ! ह्याला जर शास्त्रांनीं एखादें प्रायश्चित्त सांगितलें असेल तर तें देहान्त प्रायश्चित्त होय ! " त्यांचे हे धाष्टर्याचे स्पष्टोद्गार ऐकून त्यांना कोणी सावधगिरीची सूचना करतांच रामशास्त्री म्हणाले, " मला राघोबाचें भय नाहीं. राज्यांतील मुख्य न्यायाधीश ह्या नात्यानें माझें कर्तव्य मीं केलें आहे. त्याला तसें वाटलें तर माझीही हत्त्या करून त्याने आपल्या अपराधांची संख्या ' सुखेनैव वाढवावी. ज्या राज्यावर असला हत्त्याकारी राज्य करतो त्या राज्यांत मी राहणार नाहीं, कीं अन्नग्रहण करणार नाहीं !" इतकें बोलून राघोबाच्या आश्चर्यमुग्ध पक्षपात्यांना हें काय चाललें आहे ह्याची पुरती कल्पना येण्याच्या अगोदरच आपल्या सात्त्विक क्रोधाच्या आगीनें एखाद्या अग्निज्वालेप्रमाणें भासमान होणारा तो निर्भय ब्राह्मण निघून गेला. वाड्याच्या बाहेर पडला, नगराचा त्याग करता झाला आणि पवित्र कृष्णा नदीच्या तीराला जाईपर्यंत अन्नाला किंवा उदकाला त्यानें स्पर्शही केला नाहीं !

इतक्यांत नारायणरावांची पत्नी गंगाबाई ही गर्भवती आहे असें आढळून आलें आणि पंतप्रधानांना खरा वारस आणि गादीला योग्य स्वामी उत्पन्न होईल अशी सर्वांना आशा वाटूं लागली. ह्या वार्तेमुळें दुसऱ्या कशानेंही आली नसती इतकी बारभाईच्या कारस्थानाला बळकटी आली. मोरोबादादा, कृष्णराव काळे, हरिपंत फडके, त्र्यंबकराव मामा, तोफखान्याचे प्रमुख रास्ते, पटवर्धन, घायगुडे, नारो आप्पाजी आदिकरून राज्यांतल्या प्रमुख नागरिकांनीं आणि अधिकाऱ्यांनीं नाना फडणवीस आणि सखारामबापू ह्या दोघां महाराष्ट्रीय राजकारणी पुरुषांच्या अग्रगण्याच्या आधि-

पत्याखालीं, राघोबादादांना पहिल्यानें स्वारीच्या निमित्तानें पुण्याच्या बाहेर काढावें आणि मग त्यांच्याविरुद्ध युद्धाची घोषणा करावी असा बेत केला. लवकरच राघोबाला दक्षिणेच्या स्वारीवर जावयास त्यांनीं आपल्या कारस्थानानें भाग पाडलें. राघोबा महाराष्ट्राच्या बाहेर गेले हें पाहतांच त्यांनीं पुण्यांत बंड केलें, नगर आपल्या स्वाधीन करून घेतलें आणि सर्व राजमंडळाची अध्यक्षिका व जन्माला येणाऱ्या पंतप्रधानांची माता अशा गंगाबाईच्या नांवानें द्वाही फिरविली ! राजधानींत झालेली ही लोकमतानुवर्ती क्रांति राष्ट्रभर त्वरेनें पसरली. नगरांमागून नगरें आणि गडामागून गड नवीन राज्यसत्तेला मान्यता देऊं लागले. ही नवीन राज्यव्यवस्था म्हणजे वास्तविक लोकसत्ताक राज्यपद्धतीच होती आणि तिचें नांवही 'बारभाईचा कारभार'-लोकांचें राज्य-असेंच पडलें. लोकप्रक्षोभानें घडवून आणलेल्या ह्या क्रांतीची वार्ता राघोबाच्या कानावर एकाएकीं जाऊन थडकतांच आपलें सर्व सैन्य घेऊन पुण्यावर चालून जावें अशी कल्पना पहिल्यानें त्याच्या मनांत आली. पण बारभाईचें सैन्यच उलटें आपल्यावर चाल करून येत आहे हें पाहिल्याबरोबर अद्यापिही जे थोडे अनुयायी त्याला चिकटून राहिले होते ते आणि हाताखालचें जेवढें भाडोत्री सैन्य होतें तेवढें घेऊन तो उत्तरेच्या दिशेकडे पळ काढीत निघाला. जातांना जणुं काय आपण युद्धाला उभ्या राहिलेल्या शत्रूच्या प्रदेशांतून जातों आहों अशा रीतीनें वाटेवरील सर्व जनतेची आणि प्रांतांची त्यानें धुळधाणी आणि लूटमार केली ! गंगाबाईना पुत्र झाला नाहीं तर लोकमताचा कल पुनः त्याच्या बाजूला वळेल अशी त्याला अद्यापिही आशा होती ! कोरेगांवला त्याची आणि बारभाईच्या सेनेची गांठ पडली आणि त्यांत बारभाईच्या सैन्याचा पराभव होऊन त्यांचे पुढारी त्र्यंबकरावमामा पेठे मारले गेले. त्र्यंबकरावमामांचा मृत्यु म्हणजे बारभाईवर आलेला मोठ्या हानीचा प्रसंग होता., कारण ते त्या पक्षाचे एक प्रमुख आणि पक्के पुढारी होते. पण नाना आणि सखारामबापूंनीं धीर सोडला नाहीं. आणि महाराष्ट्रांतील बहुतेक लोकांच्या पाठिंब्यानें भांडण मुळींही माघार न घेतां तसेंच पुढें चालविलें.

आतां महाराष्ट्राचें किंबहुना अखिल भारतवर्षाचे डोळे पुरंदराकडे लागून राहिले होते. कारण तेथें नारायणरावांची पत्नी मातुश्री गंगाबाई

ह्यांना ठेवलें असून डोळ्यांत तेल घालून त्यांची जपणूक चालली होती. त्यांचे दिवस अगदीं भरत आले होते. एकामागून एक दिवस जाऊं लागले आणि तरीही पुरंदराहून इष्ट वार्ता येईना. हें पाहून लोकांना विशेषच काळजी वाटूं लागली. देवळांतून आणि तीर्थक्षेत्रांतून लोक जमून परमेश्वराच्या कळकळीच्या प्रार्थना होऊं लागल्या कीं, पुरंदराला ईश्वराच्या कृपेनें मातुश्री गंगाबाईंना पुत्ररत्न होऊन गादीला वारस उत्पन्न व्हावा आणि पापी राघोबाच्या दुष्ट महत्त्वाकांक्षा मुळांतच नष्ट व्हाव्यात! राजवाड्यांतल्या प्रशस्त प्राकारापासून सार्वजनिक चौरस्त्यापर्यंत सर्वत्र अखिल हिंदुस्थानचें चित्त तीव्र उत्कंठेनें भरून गेलें होतें! आणि दिल्ली, इंदूर, ग्वाल्हेर, बडोदें, हैदराबाद, म्हैसूर, कलकत्ता इत्यादि हिंदी राजकारणाच्या केंद्रस्थानांत राजकारणी पुरुष अत्यंत कुतूहलानें पुरंदराकडून येणाऱ्या वार्तेची वाट पहात बसले होते. शेवटीं शके १६९६ अधिक वैशाख शुद्ध ७ (ता० १८ एप्रिल सन १७७४) ह्या दिवशीं इतक्या उत्सुकतेनें ज्या वार्तेची प्रतीक्षा चालली होती ती वार्ता आली! मराठ्यांची स्वामिनी मातुश्री गंगाबाई ह्या पुरंदरला प्रसूत होऊन पुत्ररत्न झालें!! सर्व महाराष्ट्र जन्माच्या आनंदोत्सवानें गजबजून गेलें आणि नूतन अर्भकाचें, जन्मतःच राज्याचे पंतप्रधान आणि राष्ट्राचे सर्वाधिकारी म्हणून स्वागत झालें!!! लोकमताच्या त्या प्रचंड उत्साहाच्या ओघांत परकी राजसत्ताही वाहून गेल्या आणि बाळ पंतप्रधानांवर अभिनंदनांचा सर्व बाजूंनीं वर्षाव झाला. त्या वेळचा पत्रव्यवहार आणि कागदपत्रें पाहिलीं म्हणजे ह्या पुत्रजन्माच्या वार्तेनें सबंध महाराष्ट्रभर लोकमताच्या क्रांतींत बहुमत असलेल्या सर्व जनतेला किती निश्चितता वाटली आणि राष्ट्रीय आशा आणि आकांक्षा कशा उचंबळून गेल्या हें उत्तम रीतीनें निदर्शनास येतें. साबाजी भोंसले आपल्या सेनानिवासावरून लिहितात, "येथें वार्ता पोंचतांच सर्वांना अत्यानंद झाला. ईश्वरानें आमच्या प्रार्थना ऐकल्या. सैन्यांत जिकडे तिकडे उत्सव चालू आहेत. रणवाद्यें वाजत आहेत. तोफांची सलामी झडत आहे. देवानें आमच्या आवडत्या पेशव्यांना दीर्घायुष्य द्यावें, असाच आनंदोत्सव जेथें जेथें बारभाईंच्या पक्षाचें सैन्य होतें तेथें तेथें झाला. फौजेंत वर्तमान पावतांच हरिपंत व सर्व आबालवृद्ध ह्यांस अवर्णनीय संतोष झाला. सरबत्ती व नौबतखाना सुरू करून शर्करा पृथक् पृथक् वांटल्या.

देवानें कुलदीपक लाविला! आम्हांस आधार बळकट झाला. ईश्वरें अमृत-वृष्टि करून वंशावळी प्रफुल्लित केली. देव त्यांस आयुष्य यथेष्ट करील, भगवंतास प्रजेचें पालन आणि धर्मसंस्थापना कर्तव्य आहेच, हा निःसंदेह झाला! जगदात्मा कृपावंत होऊन कुलदीप उदय केला. त्यास आयुष्यवृद्धि करो. जगन्निवास पुढें उत्तमोत्तम करील. जगन्निवासें प्रजा-पालन करणार उभे केले!"

मुलाचें नांव माधवराव ठेवण्यांत आलें. पण बाल पंतप्रधानांच्या ठायीं एकंदर परिस्थितीमुळें जनतेची इतकी भक्ति बसली होती कीं, लवकरच माधव-रावांचें सर्वतोमुखीं 'सवाई माधवराव' असें रूप झालें. त्यांच्या जन्मानें अखिल हिंदुस्थानच्या राजकीय भवितव्यांत एकदम परिवर्तन झालें. कारण, ह्या पुत्रजन्मानें पुण्यांतल्या क्रांतिकारक बारभाईच्या कारस्थानाला बळकटी आली; त्यांनीं आतां राघोबाची बंडखोर म्हणून बेधडक घोषणा केली आणि मराठमंडळांतील सर्व भागीदारांना त्याचा नेटानें पाठलाग करून सांपडेल तेथें त्याला बंद करण्याची आज्ञा केली. ज्याला आपली बायकोसुद्धां दाबांत ठेवतां आली नाहीं अशा ह्या पुरुषाच्या हातांत जर मराठी राज्याचीं अधि-कारसूत्रें गेलीं असतीं तर महाराष्ट्राच्या अंगीकृत महत्कार्याची इतिश्री केव्हांच लागली असती. पण ह्या पुत्रजन्मामुळें नानासाहेब आणि सदाशिवराव भाऊ ह्यांच्या हाताखालीं हिंदुपदपादशाहीच्या कल्पनेच्या परपरंत जे वाढले होते आणि हिंदुस्थानांतील सार्वभौम थोर हिंदुसत्ता म्हणून महाराष्ट्रानें संपादन केलेलें उच्चस्थान राखण्याचें सामर्थ्य आणि दूरदृष्टि ज्यांच्या ठायीं होती अशा देशभक्तांच्या आणि राजकारणी पुरुषांच्या पक्षांना राजसत्तेचीं सूत्रें आपल्या हातांत ठेवावयाची आणि आपलें राष्ट्र आपल्या राष्ट्रीय ध्येयावर अधिक दीर्घ काळपर्यंत स्थिर राखावयाची शक्यता प्राप्त झाली; पण नारायणरावांना पुत्र झाला ही नुसती वार्ता ऐकून आणि संपूर्ण महाराष्ट्रानें हा पुत्रजन्म किती दांडग्या उत्साहानें आणि प्रचंड राष्ट्रीय उत्सवांनीं साजरा केला व नवजात बालकाचें किती प्रेमानें सर्व मराठी साम्राज्याचे लोकनियुक्त पंतप्रधान म्हणून स्वागत केलें हें दृश्य पाहूनही "राघोबाची त्याच्या मानगुटीवर बसलेल्या राक्षसी महत्त्वाकांक्षेच्या पिशाच्चा-पासून मुक्तता झाली नाहीं! एखाद्या बुजलेल्या गोन्ह्याप्रमाणें राघोबानें अधिकच पिसाळल्याप्रमाणें आपलें मत्त वर्तन चालू ठेवलें आणि त्याबरोबर

दुर्दैव आणि बारभाईचें विजयी सैन्य तितक्याच अधिक निश्चयानें त्याचा पाठलाग करूं लागलें. स्वतःच्या राष्ट्रांतल्या लोकांपैकीं कांहींनीं जेव्हां त्याला पराभूत केलें आणि इतरांनीं त्याचा त्याग केला तेव्हां शेवटीं आपल्या राष्ट्राच्या अत्यंत कट्टर शत्रूंचा आश्रय घ्यावयालाही त्यानें मागेंपुढें पाहिलें नाहीं."

ज्या काळाचा विचार चालला आहे त्या काळीं हिंदुस्थानची सार्वभौम सत्ता आपल्या हातांत ठेवावयाची महत्त्वाकांक्षा अजूनही ज्यांच्या हृदयांत वास करीत होती अशा निरनिराळ्या राजसत्तांमध्यें महाराष्ट्रांत पक्षभेद नसतांना जी महाराष्ट्राच्या हिंदु साम्राज्याचें चक्रवर्तिपद अमान्य करील अशी एकही सत्ता नव्हती. ज्यांनीं ज्यांनीं तसें करावयाचा प्रयत्न केला त्यांचा त्यांचा एक तर समूळ नाश झाला किंवा त्यांना पराभूत होऊन आणि मराठ्यांच्या पूर्णपणें अंकित बनून हात चोळीत तोंड लपवून बसावें लागलें. मुसलमान—मग ते दुराणी असोत कीं इराणी असोत, मोगल असोत कीं तुर्क असोत, सिंधूच्या अलीकडचे असोत कीं पलीकडचे असोत-राजसत्ता ह्या दृष्टीनें इतक्या पूर्णपणें चेचले गेले कीं, त्यांनीं पुन्हा ह्या हिंदु साम्राज्याच्या विरुद्ध डोकें वर उचललें नाहीं ! हिंदुस्थानच्या राजकीय पटावरील एक खेळगडी ह्या नात्यानें त्यांचें अस्तित्व समूळ नाहींसें झालें ! दुसऱ्या प्रतिस्पर्ध्यांपैकीं एके काळीं अर्ध्या आशियाखंडावर प्रभाव चालवणारे असे जे पुर्तुगीज त्यांच्यावर त्यांच्याशीं कोंकणप्रांत स्वतंत्र करण्याकरितां जीं युद्धें करण्यांत आलीं त्या युद्धांत समुद्रावर आणि भूमीवर मराठ्यांनीं असे प्रचंड प्रहार केले कीं, ते जे चक्कर येऊन खालीं पडले ते पुनः कधींही उठले नाहींत ! फ्रेंचांचें मराठ्यांशीं उघड विरोध करून समोरासमोर सामना द्यावयाचें धैर्य कधींच झालें नव्हतें. तरीही हैदराबादच्या आणि अर्कोटच्या द्वारानें पुण्यावर नियंत्रण चालवावयाचा ते नेहमीं प्रयत्न करीत; पण प्रत्येक वेळीं त्यांचा डाव निष्फळ झाला. अंशतः त्यामुळें आणि अंशतः युरोपांत चाललेल्या त्यांच्या युद्धामुळें त्यांच्यापासून मराठ्यांच्या हिंदु साम्राज्याला भीतीचें कोणचेंही कारण राहिलें नव्हतें. इतकेंच नाहीं, तर उलट त्यांचे महत्त्वाकांक्षी प्रतिस्पर्धी जे इंग्रज त्यांच्या उर्मटपणाला प्रतिबंध करण्यासाठीं पुढें टाकावयाला हें साधन फार उपयोगी पडत असल्यामुळें कांहीं काळपर्यंत त्यांचें अस्तित्व सापेक्षतेनें इष्टच झालें होतें. इंग्रजांनाही अगदीं शिवाजीमहाराजांच्या वेळेपासून ठाऊक झालें होतें कीं, पश्चिम तटावर आपणाला जें अद्यापि रहावयाला मिळत आहे त्याचें कारण, आपली कोणाला

आवश्यकता वाटत होती किंवा मराठी राजकारणी पुरुषांच्या तीक्ष्ण दृष्टींतून आपल्या राजकीय महत्त्वाकांक्षा वा हेतु सुटून गेले होते हें नसून, केवळ ह्या वेळीं मराठ्यांना इतरत्र अधिक बलाढ्य आणि निकडीच्या शत्रूंशीं युद्ध करावें लागत होतें, हें होतें. इंग्रजांच्यापासूनची भीति त्या मानानें अल्प असून तिचें निराकरण पुढें केव्हां तरी सोईप्रमाणें करतां येण्यासारखें होतें किंवा तशीच निकड आली तर त्यांना तेव्हांच सहज निर्मूल करून टाकतां आलें असतें म्हणूनच केवळ त्यांना तेथें जगूं दिलें होतें. इंग्रजांनाही राजकारणाचें अचुक निदान करण्याच्या शक्तीची देणगी असल्यामुळें पूर्णपणें कळून चुकलें होतें कीं, पश्चिम तटावर मुंबई जी अद्यापि त्यांच्या हातांत आहे ती मराठ्यांच्या विरोधाचा प्रतिकार आपण करूं शकतों म्हणून नसून मराठे सध्यां इतरत्र गुंतले आहेत आणि त्यामुळें आपल्याकडे तसें लक्ष द्यावयाला त्यांना वेळ नाहीं म्हणून आहे. आणि म्हणून तेसुद्धां दुसऱ्यावर घाव घालावयाला इतके तत्पर असूनही मराठ्यांवर हात टाकावयाला नेहमीं भीत असत. समुद्रावरचें आंग्र्यांचें प्राबल्य मोडून टाकण्यासाठीं नानासाहेबांनीं त्यांचा उपयोग करून घेतला होता. पण त्यांनीं तो अशा करारावर करून घेतला होता कीं, त्यांच्या सकारण अपेक्षेप्रमाणें जर सर्व घडून आलें असतें तर साकल्यानें पाहतां मराठी राज्याच्या सैनिक वा सामुद्रिक सत्तेला त्यामुळें यत्किंचितही अपाय पोंचणें अशक्य होतें परिस्थितीनें अशी एकाएकीं उलट खाल्ली कीं, त्यांच्या पिढींतल्या कोणालाही तसें होईल अशी कल्पना करणेंसुद्धां शक्य नव्हतें. तसें होणें अशक्य आहे असेंच कोणालाही वाटलें असतें. असें अशक्य वाटणारें परिवर्तन एकाएकीं झालें नसतें तर आंग्र्यांच्या ह्या मूळ सत्तेपासून फुटून स्वतंत्र व्हावयाच्या प्रवृत्तीला आळा बसल्यामुळें दुभागलेलें आणि म्हणून क्षीण झालेलें नाविक बलाचें नियंत्रण मूळसत्तेच्या हातांत एकमुखी झालें असतें. आणि त्यामुळें राष्ट्र ह्या नात्यानें मराठ्यांच्या नाविकबलाचें सामर्थ्य प्रत्यक्ष वाढलें असतें. हा व्यवहार होऊनही इंग्रजांच्या हातांतील पश्चिम तटावरील प्रदेश बघतां त्यांत कोणचीही महत्त्वाची भर पडली नव्हती ! शिवाजीमहाराजांच्या वेळेला त्यांचा जेवढा प्रदेश होता, अगदीं त्याच मर्यादेंत तो आजही होता पण तेंच बंगालमध्यें इंग्रजांना मोकळें रान मिळालें आणि क्लाइव्हला तो जागा होऊन पाहतो तों जें युद्ध चालू असतां आपण झोंप घेत होतों त्या युद्धाचे आपण विजयवीर

झालों आहों आणि तेवढे मराठे मध्यें नसते तर थेट दिल्लीला जाऊन हात घालण्याचीं साधनें आपल्या हातांत आलीं आहेत असें अक्षरशः आढळून आलें ! ह्या लिहिण्यांत आमचा असें म्हणण्याचा हेतु नाहीं, कीं बंगालमध्यें इंग्रजांना मिळालेल्या विजयाचें त्यांना कांहींच श्रेय नाहीं. मिळालेलें यश केवळ योगायोगानें मिळालेलें असो किंवा स्वतःच्या सामर्थ्यापेक्षां परपक्षाच्या भ्याडपणामुळें अथवा अयोग्यतेमुळें त्यांच्या गळ्यांत पडलेलें असो ज्या लोकांना त्याचा उपयोग करून घेतां येतो ते त्या भाग्याला पात्र आहेत हें उघड आहे. इंग्रजांनीं मद्रासकडे फ्रेंचांवर जे विजय मिळविले ते खरोखरच त्यांनीं आपल्या धाडसीपणामुळें मिळविले होते. अशा रीतीनें त्यांचें धाडस आणि त्यांचें दैव ह्या दोन्ही गोष्टींमुळें त्यांना मराठ्यांनीं एकदम त्यांच्या विरुद्ध शस्त्र घेऊन उठावें इतक्या प्रत्यक्षपणें किंवा निश्चयानें मराठ्यांच्या वर्चस्वावर आघात न करतांच, मद्रासमध्यें आणि बंगालमध्यें एक प्रबळ राजसत्ता म्हणून आपली वाढ करून घेतां आली. पण इतकें असूनही मराठी पुढाऱ्यांच्या तीक्ष्ण दृष्टींतून इंग्रजी राजसत्तेची मद्रासमधील आणि बंगालमधील ही चोरटी वाढ मुळींच लपून राहूं शकली नाहीं. नानासाहेब आणि सदाशिवरावभाऊ हे इतके मुरलेले, जागरूक आणि दूरदृष्टीचे राजकारणधुरंधर होते कीं, हिंदु साम्राज्याच्या कोणाही विरोधकाला, मग त्याचें प्रत्यक्ष बळ कितीही असो, त्यांच्यावर यत्किंचित् कुरघोडी करावयाला अवसर मिळणें शक्य नव्हतें. भाऊंनीं शके १६८२ (इ. सन १७६०–६१) ह्या वर्षासाठीं स्वाऱ्यांचा जो सर्वव्यापी कार्यक्रम आंखला होता त्यांत एक विशेष कार्यक्षेत्र म्हणून बंगालचा जो त्यांच्याकडून बुध्द्या अंतर्भाव करण्यांत आला होता आणि गौडबंगालचा शेवटचा हिंदु राजा लक्ष्मणसिंग ह्याच्या काळापासून ज्या अहिंदु राजसत्तेच्या पीडेनें बंगाल गांजून गेला होता तिच्या जोखडाखालून त्या संपूर्ण प्रांताची मुक्तता करण्यासाठीं दोन बलिष्ठ मराठी सैन्यें जीं तेव्हां तिकडे पाठविण्यांत आलीं होतीं त्याचें इंग्रजांचें बंगालमध्यें एकाएकीं वाढलेलें सामर्थ्य, हें एक कारण होतें. मराठी सैन्याचा उत्तरेकडील विभाग दत्ताजी शिंद्याच्या आधिपत्याखालीं ह्या स्वारीसाठीं शके १६८२ मध्यें प्रत्यक्ष चालूदेखील लागला होता. पण पूर्वीं वर्णन केल्याप्रमाणें अहमदशहाच्या आक्रमणामुळें मराठ्यांना बंगालचा प्रश्न पुढें ढकलून पहिल्यानें त्या प्रबल शत्रूशीं तोंड देणें भाग पडलें. नंतर पानिपतचा प्रसंग

घडला आणि त्याच्या मागोमागच नानासाहेबांचा अंत झाला. मराठयांवर एका मागून एक त्वरेनें कोसळलेल्या ह्या आपत्तींमुळें इंग्रजांना तितकाच नवीन जीवनाचा पट्टा मिळाला आणि त्याचा त्यांनीं अत्यंत कौशल्यानें व निग्रहानें बंगाल आणि मद्रासमधील आपलें ठाणें अधिक पक्कें करण्यांत आणि तशी संधि प्राप्त होतांच हिंदुस्थानच्या सार्वभौमसत्तेचीं नियामक सूत्रें मराठ्यांच्या हातांतून बलपूर्वक काढून घेऊन त्यायोगें दिल्लीच्या बादशाही कारभारांत वर्चस्व मिळवावयाच्या दृढ निश्चयानें स्वतःची सिद्धता करण्यांत उपयोग केला. पण ती संधि त्यांना अद्यापि मिळूं शकली नाहीं. पानिपत झालें असो किंवा नसो अद्यापिही मराठ्यांच्या संयुक्त सत्तेला उघडपणें विरोध करण्याची त्यांची छाती नव्हती आणि अद्यापिही मराठ्यांची सत्ता हीच हिंदुस्थानची सार्वभौम राजसत्ता होती. हिंदुस्थानच्या रेखाचित्रांत कलकत्त्याच्याखालीं जी लहान रक्तरेषा होती, ती वाढून तिनें आतां अर्धा बंगाल आरक्त करून टाकला होता! हिंदुस्थानच्या रेखाचित्रांत केवळ मद्रास नगराला रंगवणारा जो रक्तरंगाचा बिंदु होता तो एकाएकीं पसरला आणि त्यानें आतां तो अर्धा प्रांत बुडवून टाकला होता! पण जी लहान तांबडी रेघ शिवाजीमहाराजांच्या वेळेला मुंबई द्वीप इंग्रजांचें आहे म्हणून दाखवीत होती ती नानाफडणविसांच्या वेळेपर्यंतही पूर्वीप्रमाणें लहान तांबडी रेघच राहिली होती. हिंदुस्थानच्या रेखाचित्रांत इतरत्र सबंध प्रांतच्या प्रांत तांबड्या रंगानें रंगवले जात होते; त्या वेळींही त्याला पश्चिम तटावर एक अंगुळभरही अधिक भूमि आपल्या क्षेत्रांत आणतां आली नाहीं! कारण येथें सह्याद्रीच्या शिखरावर मराठी द्वाररक्षक जो कोणी परकीय वीर पहिल्यानें पाऊल पुढें टाकील त्याला भोंसकून मारण्यासाठीं सज्ज केलेला तीक्ष्ण टोंकाचा भाला तोलीत जागृततेनें उभा होता; आणि म्हणून युरोपांतील किंवा आशियांतील, ख्रिस्ती किंवा महंमदी कोणाही अहिंदु लोकांत महाराष्ट्र अविभक्त आणि संघटित उभा असतां हिंदुस्थानांतील एकमेव सार्वभौम राजसत्ता म्हणून मराठ्यांच्या हिंदु साम्राज्याचें आधिपत्य नाकारण्याचें किंवा त्यावर अधिकार सांगावयाचें साहस करण्याचें सामर्थ्य नव्हतें.

राष्ट्र ह्या दृष्टीनें एकाशीं दुसऱ्याची तुलना करावयाची तर, ज्या राष्ट्रीय सद्‌गुणांच्या योगानें लोक राष्ट्रीय हितसंबंधाच्या आणि आकांक्षांच्या संरक्षणासाठीं आणि पूर्तीसाठीं आपले वैयक्तिक लाभ आणि महत्त्वा-

-कांक्षा ह्यांना गौणत्व देऊन त्यांचा बळी देतात, आणि अन्नाच्या एका गोळ्यासाठीं आपल्या राष्ट्राचें स्वातंत्र्य विकावयाच्या किंवा आपल्या जातीय च राजकीय हिताचा घात करून राष्ट्रद्रोह करावयाच्या नुसत्या कल्पनेचाही त्यांना स्वाभाविकपणेंच धार्मिक तिट्कारा वाटत असतो, त्या राष्ट्रीय सद्‌गुणांनीं इंग्रज हे त्या काळींही मराठ्यांच्यापेक्षां अधिक युक्त होते हें खरें आहे. पण हें असें असलें तरीही आजच्या स्थितीच्या उसन्या प्रकाशांतूनच मुख्यतः गतकालाची कल्पना करावयाची जी चुकीची प्रवृत्ति असते ती होऊं न देण्याची आपण सावधता ठेवली पाहिजे. गोष्ट घडून गेल्यावर त्या वेळीं काय करावयाला पाहिजे होतें, ह्याविषयीं प्रत्येक शहाणपणाचे विचार सांगत असतो; पण त्या वेळीं ज्या गोष्टींविषयीं आणि बाजूंविषयीं माहिती मिळणें किंवा कल्पना बांधणें तर्कतः शक्य होतें तेवढ्याच गोष्टी आणि बाजू जर आपण विचारांत घेतल्या—म्हणजेच दोन्ही पक्षांमध्यें असलेलें सैनिक, राजकीय किंवा शासनिक बल तेवढें आपण विचारांत घेतलें तर ह्या दोन प्रतिस्पर्धी राजसत्तांपैकीं अंतीं यशाची माला कोणाच्या गळ्यांत पडणार आहे हें निश्चित सांगावयाला एखाद्या अंतर्ज्ञानी पुरुषाचीच आवश्यकता लागली असती ! कोणाही राजकारणी पुरुषाला त्याचें अचुक अनुमान करणें अशक्य होतें. शास्त्रीय किंवा राज्यघटनात्मक विषयांत इंग्रजांनीं त्या वेळीं जी प्रगति करून घेतली होती ती कांहीं मराठ्यांच्या त्या संबंधांतील कर्तृत्वाच्याइतकी निराश होण्यासारखी पुढें गेली नव्हती; कीं, तिजमुळें हिंदुस्थानच्या चक्रवर्तित्वाच्या किरिटासाठीं ही जी राजकीय चढाओढ चालली होती तिच्यांत मराठ्यांनीं नित्याचें अपंग होऊन बसावें. तशांत इंग्रजांना आपल्या मायदेशापासून, म्हणजे जेथून सर्व सूत्रें हालावयाचीं त्या मुख्य केंद्रस्थानापासून, सहस्त्रावधि कोसांच्या अंतरावर अनोळखी स्थळीं लढावें लागत असल्यामुळें त्यांच्या बाजूला स्वाभाविक आणि महत्त्वाच्या अशा अतिशय अडचणी होत्या. मराठ्यांच्या नंतर पुढें एक शतक लोटल्यावर जपाननें ह्या दिशेनें प्रगति करण्यासाठीं कंबर बांधावयाला प्रारंभ केला; तरीही त्याच्यांत आणि त्याच्या यूरोपीय प्रतिस्पर्ध्यांत शास्त्रीय शोध आणि राज्यघटनांचा अनुभव ह्या गोष्टीत जें महदंतर होतें तें त्यानें अर्ध्या शतकाच्या अवधींतच तोडून टाकलें! दुसऱ्या गोष्टी तशाच राहिल्या असत्या तर मराठ्यांनाही तसेंच करून दाखवितां आलें असतें.

मराठ्यांनीं मोगल, अफगाण आणि इराणी, त्याचप्रमाणें फ्रेंच व पोर्तुगीज आणि स्वतः इंग्रज इतक्यांच्या सशस्त्र व एकसमय-विरोधाची नांगी ठेचून हिंदुस्थानांत प्रत्यक्ष नियंत्रण चालवणारी सार्वभौम राजसत्ता म्हणून सर्वश्रेष्ठ स्थान प्राप्त करून घेतलें होतें. आणि आपण ज्या काळाचें परीक्षण करतों आहों त्या काळांत तरी इंग्रज शास्त्रीय ज्ञान आणि राज्यघटनांचा अनुभव ह्या क्षेत्रांतदेखील इतके पुढें गेलेले नव्हते कीं, त्यामुळें मराठ्यांना त्यांच्या त्या उच्चस्थानापासून भ्रष्ट करावयाला इंग्रजच सर्वांत अधिक योग्य आहेत असें ठळकपणें दिसून यावें.

इंग्रजांनाही हें पुरें माहित होतें आणि म्हणून ते जोंपर्यंत मराठ्यांच्या आपसांतील कलहांना उग्र स्वरूप आलें नव्हतें आणि ते संयुक्त उभे होते तोंपर्यंत मराठी राज्याच्या प्रत्यक्ष वाटेला कधींही गेले नाहींत! आणि मराठ-मंडळाचे तुकडे अलग झाल्यावरही आणि त्यांनीं आपसांत युद्धाला प्रारंभ केल्यावरही यशाच्या अल्पसंभवाची आशा ठेवून त्यांच्याशीं विरोध करण्याचें आणि त्यांचा राग आपल्यावर ओढून घ्यावयाचें धैर्यसुद्धां इंग्रजांवांचून दुसऱ्या कोणांतही नव्हतें! मद्रासमधल्या आणि बंगालमधल्या लुटीचा गोळा गट्ट केल्यावर आतां इंग्रजांच्या अंगांत, मराठे आपसांतील कलहांत पूर्णपणें बेढले गेले आहेत हें आढळून येतांच, त्यांना मुंबईकडे ढोसणी द्यावयाचें धैर्य करण्याइतकी पुष्टता आली होती! राघोबाच्या मठ्ठ डोक्यांतही ही गोष्ट आली आणि म्हणून स्वतःच्या देशबांधवांकडून प्रचोदित, परित्यक्त आणि पराभूत झाल्यावर त्यानें लोकांच्या इच्छेच्या विरुद्ध महाराष्ट्रावर राज्याधिकार चालवावयाच्या महत्त्वाकांक्षेनें वेडावून गेलेल्या आपल्या डोक्यांत इंग्रजांचा आश्रय घ्यावयाची कल्पना घेतली. आपल्या देशाच्या सर्वांत वाईट शत्रूला आपल्या राष्ट्राचें स्वातंत्र्य विकावयाचें त्यानें वचन दिलें आणि मराठी साम्राज्याच्या अभेद्य कोटांत आपल्या गोत्रजघातकी हातांनीं पाडलेल्या खिंडारांतून त्यांना आंत घेतलें! इंग्रजांनीं हा स्वजनहत्यारी हात मोठ्या उत्सुकतेनें हातांत धरला आणि साष्टी, वसई आणि भडोचचा वार्षिक वीस पंचवीस लक्ष रुपये उत्पन्नाचा प्रदेश आपल्या स्वाधीन करावयाच्या करारावर राघोबाची मराठी राज्याच्या पंतप्रधानांच्या गादीवर प्रस्थापना करावयाचें कार्य अंगावर घेतलें! लागलीच राघोबाला बरोबर घेऊन इंग्रजी सैन्यानें मराठ्यांचा विरोध करावयाला प्रारंभ केला आणि त्यांच्या प्रदेशावर चाल केली. इंग्रजांच्या

आणि मराठयांच्या मध्यें युद्धाला प्रारंभ झाला ही वार्ता पसरतांच सर्व हिंदुस्थानभर असंतुष्ट राजांना आणि संस्थानांना मराठयांच्या विरुद्ध बंड करून उठावयाला प्रोत्साहन मिळालें ! पण इतक्या वेळांत बारभाईच्या राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें नाना फडणविसांनीं स्वतःच्या हातांत पूर्णपणें घेतलीं होतीं; सर्व दिशांनीं वाहणाऱ्या प्रतिकूल वादळांत ते स्थिर उभे राहिले ! पुण्याची ही राजसत्ता नवीनच जन्माला आलेली. त्यामुळें राष्ट्रांत जिकडे तिकडे विसंघटितपणा होता. तरीही शक्य तेवढें सैन्य नानांनीं एकत्र केलें आणि तें हरिपंत फडक्यांच्या हाताखालीं पुढें चाल करून येणाऱ्या कर्नल कीटिंगच्या इंग्रजी सेनेला आडवून धरण्यासाठीं आणि सतावून सोडण्यासाठीं पाठवून दिलें. हरिपंतांनीं व त्यांच्या लोकांनीं ही कामगिरी उत्कृष्ट रीतीनें पार पाडली. नापारला आणि इतर स्थळींही त्यांनीं शत्रूला चांगलीच हानि पोंचविली. पण इतकी हानि होऊनही त्यानें धीर सोडला नव्हता. इतक्यांत इ. सन १७७७ मध्यें हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्यघटनेंत महत्त्वाचें परिवर्तन झालें आणि त्या योगानें कलकत्त्याच्या गव्हर्नरला इंग्रजांच्या हिंदुस्थानांतील सर्व प्रदेशावर नियंत्रण चालवावयाचा अंतिम अधिकार मिळाला. ह्या अधिकारान्वयें त्यानें मुंबईच्या गव्हर्नरानें मराठयांच्या विरुद्ध चालविलेलें युद्ध बंद केलें आणि मराठी राज्याशीं संधि करण्यासाठीं आपला प्रतिनिधि पुण्याला पाठविला. नानाही ह्या युद्धाची संधि साधून सर्व हिंदुस्थानभर मराठयांच्या विरुद्ध जीं बंडें आणि विरोध चालू झाले होते ते शमविण्यासाठीं अवधि मिळावा म्हणून ह्या गोष्टीला उत्सुकच होते. त्यांनीं संधिपत्रावर स्वाक्षर केलें. ह्या संधीनें इंग्रजांनीं राघोबाला मराठयांच्या स्वाधीन करावें आणि मराठयांनीं त्यांना साष्टी आणि भडोच द्यावें असें ठरलें.

इंग्रजांशीं चाललेल्या युद्धाची परिसमाप्ति होतांच नानांनीं आंतील सारीं बंडें मोडण्यासाठीं महादजी शिंद्यांची योजना केली आणि हैदरनें मराठी प्रदेशांत शिरून मांडलेल्या पुंडाईसाठीं त्याचें पारिपत्य करण्याकरितां पटवर्धन आणि फडके ह्यांना पाठविण्यांत आलें.

पण ते मराठी सेनापति आपआपल्या कामासाठीं दूर गेलेले पाहून इंग्रजांनीं ठरल्याप्रमाणें राघोबाला मराठ्यांच्या स्वाधीन करावयाचें नाकारलें आणि मराठयांचीं सैन्यें पुण्याला परत येऊन नानाचें बळ वाढावयाच्या आधींच नानांचा पुरा मोड करण्याच्या हेतूनें पुनः एकदां

युद्धाला प्रारंभ केला. शके १७०१ (इ. सन १७७९) मध्यें मराठ्यांना धाक बसविण्यासाठीं त्यांनीं कर्नल इगर्टन ह्याच्या आधिपत्याखालीं सैन्य पाठवून प्रत्यक्ष पुण्यावर चाल करून जावयाचा धाडसी बेत केला. मराठ्यांनाही पुरंदरचा संधि केव्हांच आवडला नव्हता. आणि आतां महादजींनीं मोठ्या पराक्रमानें अंतर्गत शत्रूचाही समाचार घेतल्यामुळें तो विक्षेप तितका कमी झाला होता. तेव्हां मराठेही, काय तुमच्याच्यानें होईल तें करून घ्या अशा वृत्तीनें इंग्रजांच्या समोर उभे ठाकले आणि आपल्या परंपरागत गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीचें (वृकयुद्धाचें) अवलंबन करून इंग्रजांना हुलकावण्या देत देत आणि मुंबईपासून त्यांचा संबंध अगदीं तुटेल अशी काळजी घेत त्यांना त्यांनीं बरेंच पुढें यावयाला लावलें. चाल करून येणाऱ्या इंग्रजी सेनेच्या जवळपास भिवराव पानसे आपल्या पथकासह असत. अशा रीतीनें इंग्रजांच्या सामन्याला प्रत्यक्ष न सांपडतां, पण त्यांनाही क्षणभर विसांवा घेऊं न देतां मराठ्यांनीं अशी परिस्थिति उत्पन्न केली कीं, स्वतःला इच्छा असेल तेव्हां त्यांच्याशीं युद्ध करणें किंवा टाळणें हें इंग्रजी सेनापतीच्या इच्छेवर राहिलें नाहीं. अडचणीच्या जागेंत इंग्रजी सैन्य सांपडलें आहे असें पाहून मराठ्यांनीं त्याच्याशीं युद्ध करावयाचें मनांत आणलें, तर तें टाळणें त्यांना शक्य नव्हतें, कीं त्यांना इष्ट असेल तेव्हां मराठ्यांना युद्ध करावयाला लावणें हेंही त्यांना शक्य राहिलें नाहीं. त्यांच्या सैन्याच्या निरनिराळ्या तुकड्यांचा संबंध तोडला जाई. त्यांची साधनसामग्री मध्येंच अडविली जाई. असें होतां होतां शेवटीं जेव्हां तो घाट चढून माथ्याला येऊन पोंचला तेव्हां त्याला आढळून आलें कीं, आपला मुंबईशीं असलेला संबंध पूर्णपणें तोडून टाकण्यांत आला आहे. तरीही न भितां तो तसाच पुढें चाल करून जाऊं लागला. तिकडे शत्रु जसजसा राजधानीच्या जवळ येऊं लागला तसतसा मराठ्यांचा निश्चयही तीव्रतर आणि त्वेषपूर्ण होऊं लागला. तळेगांवापासून पुण्यापर्यंतचा सर्व प्रदेश सोडून देऊन ओस पाडावयाचा आणि प्रसंगच आला तर आपली प्राणप्रिय राजधानी पुण्यनगरी हिला आग लावून द्यावयाची; पण ती देशाच्या शत्रूंच्या स्वाधीन करावयाची नाहीं असा त्यांनीं निश्चय केला. सर्व राष्ट्राचा हा दृढ निश्चय पाहून इंग्रजी सैन्यावरही त्याचा परिणाम झाल्यावांचून राहिला नाहीं. खंडाळ्याला कर्नल के हा मराठ्यांच्या सैन्याकडून मारला गेला. खडकीला दुसरा तितकाच महत्त्वाचा सैन्याधिकारी



महादजी सिंदे.

Lakshmi Art, Bombay, 8.

कॅप्टन् स्टुअर्ट ह्याला गमावून इंग्रजांना त्याच्यासाठीं शोक करीत बसावें लागलें. प्रत्येक पावलाला इंग्रजांचा नाश अधिकाधिक होऊं लागला. पण, त्यांच्यांतील कौतुकास्पद नियमबद्धतेमुळें त्यांनीं आपलें आक्रमण तसेंच चालू ठेवलें आणि तळेगांवांत प्रवेश केला. पण तेथें पाहतात तों प्रत्यक्ष महादजी शिंदे आणि हरिपंत फडके ह्यांच्या हाताखालीं प्रबळ मराठी सैन्य त्यांच्या विरोधासाठीं सन्मुख उभें! इंग्रज त्यांच्यावर चालून गेले पण त्याबरोबर एकाएकीं मराठी सैन्य थोडें मागें सरून त्याचे विभाग करण्यांत आले आणि ते निरनिराळ्या दिशांना पसरून त्यांनीं सर्व बाजूंनीं आपण सुरक्षित असूं इतक्या अंतरावरून इंग्रजांवर मारा चालू केला, त्यामुळें इंग्रज गोंधळून गेले. सभोंवतालीं अनेक कोसपर्यंत अन्नाचा कण किंवा चाऱ्याची काडी मिळेना; आणि आपण जसजसे पुढें जाऊं तसतसे त्यापेक्षांही वैराण प्रदेशांतून आपल्याला जावें लागेल अशी इंग्रजांना विश्वसनीय माहिती मिळाली! मुरलेले शूर आणि निग्रही इंग्रज तरीही पुढेंच चाल करून जाऊं लागले; पण आतां शत्रूला चकविण्यांत कुशल असलेल्या मराठ्यांनीं त्यांना जवळ जवळ पूर्ण वेढून टाकलें होतें. आपली राजधानी शत्रूच्या स्वाधीन होऊं न देतां प्रसंग आल्यास ती जाळून टाकावयाची असा सर्व राष्ट्राचा दृढ निश्चय झाला आहे ही वार्ताही त्यांनीं बुद्ध्या इंग्रजांच्या कानांवर घातली. इंग्रजी सैन्याच्या सेनापतीला हा वेळपर्यंत मराठ्यांचा पुरा अनुभव आला होता. त्यामुळें मराठ्यांना जिंकावयाचें त्याचें वेड मावळून गेलें होतें. आणि पुण्यावर चालून जाणें म्हणजे फ्रासीचें युद्ध जिंकणें नाहीं ही त्याला प्रतीति आली होती. ह्या प्रसंगांतून निभावयाला एकच मार्ग होता आणि तो म्हणजे मुंबईला परत जावयाचा! त्यांत अत्यंत मानहानि होती हें खरें; पण दुसरें गत्यंतरच राहिलें नव्हतें! हें परत जाणेंसुद्धां उघडपणें घडवून आणणें अशक्य होतें. तेव्हां इंग्रजी सेनापतीनें मराठ्यांना कळूं न देतां हें साधावयाचा विचार केला आणि शत्रूला चाहूल लागूं न देतां परत चलण्याची सैन्याला आज्ञा केली. पण मराठ्यांच्या हातावर तुरी द्यावयाच्या म्हणजे आजीबाईंना गायला शिकविण्यासारखें होतें. त्यांनीं हें केव्हांच ओळखलें होतें. इंग्रज बाहेर पडतांच त्यांनीं आपलीं पसरलेलीं सर्व पथकें एकत्र केलीं आणि खूण होतांच सर्व एकदम शत्रूवर तुटून पडले. इंग्रज आपल्या नेहमींच्या चिकाटीनें लढले, पण मराठ्यांच्यापासून सुटून जाणें अशक्य होतें. सरते शेवटीं उध्वस्त आणि

पराभूत होऊन इंग्रजांचें सर्व सैन्य—जवळ जवळ नऊ सहस्र माणसें—मराठे सांगतील त्या करारावर मराठयांच्या स्वाधीन झालीं ! नाना, सखाराम-बापू आणि महादजी शिंदे ह्यांनीं राघोबाला एकदम आमच्या स्वाधीन करावें आणि पुरंदरच्या संधीनें इंग्रजांनीं जो मराठयांचा प्रदेश मिळवला होता तो त्वरित परत मराठयांच्या हातांत द्यावा अशी मागणी केली. ह्या-व्यतिरिक्त ठरलेले करार पार पाडण्यासाठीं बंधक म्हणून दोन इंग्रजी अधि-कारी ठेवून घेण्यांत आले होते. विजयी मराठयांच्या प्रतिबंधांत पुरा एक महिना काढल्यावर आपलें सैन्य परत मुंबईला घेऊन जाण्याच्या अनुमतीचें मूल्य म्हणून हे सर्व करार इंग्रज सेनापतींना मान्य करावे लागले ! ह्या उज्ज्वल विजयाच्या वार्तेनें सबंध महाराष्ट्रांत आनंदाचें भरतें आलें. इतकें ताठ यूनि-अन जॅक (इंग्रजांचा ध्वज) पण त्याला महाराष्ट्राच्या भगव्या झेंड्यापुढें आणि जरिपटक्यापुढें मस्तक लववावें लागलें ! आपसांत कलह चालू असतां आणि त्यामुळें देश व लोक विभक्त आणि विस्कळित होऊन गेले असतां राष्ट्र प्रसंगाला तोंड द्यावयाला सिद्ध झालें आणि बारभाईंच्या सैन्यानें असल्या धाडसी आणि चिकाटीच्या शत्रूवर इतका निरुत्तर विजय मिळविला ! मराठी राज्याचें हिंदुस्थानांतील सर्वश्रेष्ठत्व मराठयांच्या सर्व शत्रूंपैकीं ज्या एका शत्रूनेंच अद्यापि प्रत्यक्ष नाकारलें नव्हतें किंवा त्यांच्याशीं त्याप्रीत्यर्थ दोन हात केले नव्हते, त्या एकमेव शत्रूलाही त्यानें तसें करावयाचें धाडस करतांच त्यांच्यापुढें शरण आल्याची मान्यता द्यावी लागली. त्या वेळच्या पत्रव्यवहारांतील शब्दांत सांगावयाचें म्हणजे आपल्या लोकांनीं इंग्रजांना अशी शिक्षा लावली कीं, आजपर्यंत तशी कोणीही लावली नव्हती. इंग्रजांना कोणाकडून आजपर्यंत इतका मानभंग सहन करावा लागला नाहीं ! ह्या जानपदाच्या राज्यक्रांतीचें केंद्र जे बाल पंतप्रधान त्यांच्यावर सर्व राष्ट्र अत्यंत अनुरक्त होतें. त्यामुळें लोकांनीं प्रेमादरानें ह्या बालप्रधानांच्या भाग्यरेषेला ह्या अतुलनीय विजयाचें सर्व श्रेय दिलें. आपल्या प्रिय बाल पंतप्रधानांचें सर्व कांहीं जन्मल्यापासून गोकुळींच्या परमेश्वरी अवतारासारखें चमत्कारमय आहे त्यांच्या पुण्यप्रतापानें आमच्या शत्रूंचा पराभव झाला आणि ह्या धर्मयुद्धांत परमेश्वरानें आपल्या राष्ट्राला आणि हिंदुधर्माच्या कार्याला यश आणि आशीर्वाद दिला !

---

## प्रकरण १९ वें

# इंग्रजांना नमवलें !

" प्रतापमहिमा थोर जळामधिं परि जळचर बुडविला
नवी मोहिम दरसाल देउनी शाह टिपू तुडविला "

इंग्रजांच्या मोठ्या सैन्याच्या शरणागतीची वार्ता कलकत्त्याला जाऊन पोंचतांच तेथले अधिकारी रागानें इतके अनावर झाले कीं, त्यांची सत्यासत्याची चाड समूळ नष्ट झाली ! मराठ्यांनीं संधीप्रमाणें हातांत सांपडलेल्या इंग्रजी सैन्याला मुंबईला परत जाऊं दिल्याबरोबर स्वतःच्या सेनापतीनें तशा प्रसंगांत स्वाक्षर करून दिलेल्या संधीला संमति द्यावयाचें त्यांनीं नाकारलें. आणि अधिक निकरानें भांडावयाला प्रारंभ केला ! इतक्यांत राघोबाही पुनः इंग्रजी सैन्यांत येऊन उपस्थित झाला ! त्यानें केलेला राष्ट्रद्रोह आणि विश्वासघात इतका मोठा होता कीं, दुसऱ्या कोणच्याही देशांत तो हातांत सांपडतांच त्याचा गोळी घालून वध करण्यांत आला असता. पण मराठ्यांनीं उदारपणानें त्याला प्रतिबंधांत असतां एकाद्या राजपुत्राप्रमाणें वागविलें ! पण ह्या राजश्रीनें पुनः आपला नीचपणा प्रकट केला; आपल्याला मिळालेल्या मोकळिकीचा दुरुपयोग करून तो प्रतिबंधांतून निसटला आणि इंग्रजांना जाऊन मिळाला ! पुनः युद्ध रंगांत आलें ! गॉडर्ड गुजराथेंतून खालीं उतरला आणि वसईवर चाल करून गेला. त्याच्यावर रामचंद्र गणेशांची योजना झाली. त्यांनीं जेव्हां जेव्हां आणि जेथें जेथें शक्य झालें तेव्हां तेव्हां आणि तेथें तेथें एकामागून एक शत्रूवर मारे केले आणि कौतुकास्पद चिकाटीनें इंग्रजांची पुढची चाल पदोपदीं अडवून धरली ! त्यांनीं चढविलेल्या शेवटच्या माऱ्यांत तर त्यांनीं इतकें उज्ज्वल धैर्य दाखविलें आणि पराक्रम गाजविला कीं, प्रत्यक्ष शत्रूनेंही त्यांचें कौतुक केलें ! पण दुर्दैवानें ह्याच माऱ्यांत मराठ्यांच्या ह्या शूर आणि कुशल सेनानायकाला गोळी लागून तो युद्ध पूर्ण भरांत आलें असतां पडला आणि मग गॉडर्डनें शके १७०२ ( इ. सन १७८० ) मध्यें वसई घेतली. ह्या जयानें प्रोत्साहन मिळून वडगांवला इंग्रजी सैन्य मराठ्यांना शरण गेल्यामुळें त्यांच्या वीरपणाला जो डाग लागला होता तो धुऊन टाकावयाचा त्यानें विचार

केला. आणि जें कार्य साधण्यांत त्यांची पूर्वी इतकी छीः थूः होऊन अपेश आलें तचें मराठयांची प्रत्यक्ष राजधानी हस्तगत करून घ्यावयाचें कार्य साधावयाचें त्यांनीं ठरविलें ! ह्या निश्चयानें नानांना आणि त्यांच्या साहाय्य-कर्त्यांना भिववून सोडून शरण यावयाला भाग पाडण्यासाठीं इंग्रजी सैन्य पुण्यावर चाल करून निघालें. पण त्या महाराष्ट्रीय राजकारणधुरंधराच्या अद्वितीय बुद्धिमत्तेनें ह्या प्रसंगासाठीं आधींच अगदीं सूक्ष्म पण प्राणनाशक जाळें विणून ठेविलें होतें. त्यांत हिंदुस्थानांतील सर्व भागांची इंग्रजी सत्ता गुंतवून टाकावयाचा त्यांनीं डाव रचला ! हैदरला मिळवून घेऊन त्याच्या-कडून मद्रासवर स्वारी करावयाचें त्यांनीं वचन घेतलें होतें; भोंसल्यांनीं बंगालवर चालून जावें असें ठरलें होतें आणि स्वतः नानांनीं मुंबईची इंग्रजी सत्ता समूळ उपटून टाकावयाचें कार्य अंगावर घेतलें ! त्याप्रमाणें हैदर मद्रास-वर गेला आणि फ्रेंचांच्या साहाय्यानें त्यानें तेथें इंग्रजांवर बिनतोड जय मिळ-विला. परशुरामभाऊ बरोबर बारा सहस्र सैनिक घेऊन पुण्यावर चाल करून येणाऱ्या सैन्याच्या जवळपास राहू लागले आणि त्यांच्या पिछाडीवर व बाजूं-वर वारंवार मारे करून त्यांनीं त्यांना अगदीं सतावून सोडलें ! सुमारें तीस सहस्र लोक घेऊन नाना, तुकोजी होळकर व हरिपंत फडके स्वतः युद्धाला उभे राहिले. जसजसा गॉडर्ड पुढें जाऊं लागला तसतसें त्याला आपणही कर्नल ईगर्टनवर जें संकट ओढवलें होतें त्याच संकटांत जाऊन पडतों आहों असें आढळून आलें ! आतां पुढें एक पाऊल टाकावयाचें म्हणजे—कर्नल ईगर्टनचा प्रसंग आपण होऊन अंगावर ओढून घ्यावयाचा अशी परिस्थिति येऊन ठेपली ! पण तो इतका पुढें निघून आला होता कीं, आतां परत जाणें हें जितकें अपमानाचें तितकेंच अनर्थकारक झालें होतें ! तेव्हां त्याच स्थळीं स्थिर राहून त्यानें सैन्याची बळकटी करावयाला प्रारंभ केला. पण अशी स्थिति अधिक दिवस चालणें शक्य नव्हतें. गॉडर्डला अन्न आणि इतर साधनसामुग्री नेऊन पोंचविण्याचा प्रयत्न करीत असतां कॅप्टन मॅके आणि कर्नल ब्राऊन ह्यांच्या तुकड्यांवर मराठ्यांनीं इतक्या निकराचे मारे करून त्यांना खिळखिळें करून सोडलें कीं. ह्यापुढें मुंबईशीं कोणचाही संबंध ठेवण्याचा प्रयत्न करणें अत्यंत कठिण आणि घातकारक होऊन गेलें. सरतेशेवटीं जनरल गॉडर्डलाही चरफडत पुण्यावर चाल करून जावयाचा विचार सोडून देऊन परत जावयाचा बेत

करणें भाग पडलें ! अशा रीतीनें इंग्रजी सैन्यानें निमुटपणें खालीं मान घालून बरोबर उलट दिशेला तोंड करून प्रत्यागमनाला प्रारंभ करतांच तुकोजी होळकर आणि परशुरामभाऊ ह्यांच्या हाताखालील मराठी सैन्यांनीं हातांत सांपडलेली ही पारध चारी बाजूंनीं आडवून धरली आणि शौर्यासाठीं आणि अभेद्य सेनाशासनासाठीं नांवाजलेल्या इंग्रजांना त्यांनीं असा मार दिला कीं, त्यांच्या बढाईखोर सेनापतीला शिर वांचवून मुंबईला कसेबसे आपण पोंचलों यासाठीं आपल्या बलिष्ठ ग्रहांचेच आभार मानावे लागले. ह्या राजश्रींनीं विजयवीर म्हणून मराठ्यांच्या राजधानींत सन्मानानें नगरप्रवेश करावयाची उर्मटपणाची महत्त्वाकांक्षा धरली होती ! पण त्याला आपले शेंकडों सैनिक मृत किंवा आहत अशा स्थितींत मागें ठेवून त्यांच्या प्रेतांच्या खुणांनीं आपल्या पलायनाचा मार्ग स्पष्ट करीत आणि आपला सर्व दारूगोळा, शस्त्रसामुग्री, पटमंडप आणि निवासागार, तोफांचे गोळे, इत्यादि सर्व सामान व सहस्रावधि वाहतुकीचे बैल टाकून देऊन किंवा विजयी मराठ्यांच्या स्वाधीन करून पळ काढावा लागला ! अशा रीतीनें पुण्यावर चालून जावयाची प्रतिज्ञा करून इंग्रजांनीं दोन वेळां पुढें यावयाची धृष्टता दाखविली आणि दोनही वेळां मार खाऊन आणि मान खालीं घालून सगळा अपमान गिळीत त्यांना मुंबईला परत जावें लागलें ! इतक्या बढाईनें केलेल्या आक्रमणाचें इतक्या लज्जास्पद प्रत्यागमनांत पर्यवसान क्वचितच झालें असेल !

उत्तरेकडेही इंग्रजी सैन्याला अधिक चांगल्या रीतीनें सुटतां आलें नाहीं. मराठ्यांच्या विरुद्ध गोहदचा राणा त्यांच्या पक्षाला येऊन मिळाला होता. त्याच्या साहाय्यानें पहिल्या पहिल्यानें त्यांना कांहीं लहानसहान जय मिळाले व ग्वाल्हेर त्यांच्या हातांत आलें; ह्याच्यापलीकडे कर्नल कॅमॅकच्या हाताखालील इंग्रजी सेनेला असा कोणचाही भरीव लाभ साधतां आला नाहीं, कीं ज्याच्यामुळें महादजी शिंद्यांच्या त्रासवून सोडणाऱ्या माऱ्यापुढें त्यानें ज्यास्त दिवस टिकाव धरावा. त्याला साहाय्य करून ह्या अडचणींतून त्याची सुटका करण्यासाठीं कर्नल मूर धावत गेला; पण त्यालाही त्याची स्थिति विशेष सबळ करतां आली नाहीं. अशा रीतीनें दक्षिणेला हैदर, मुंबईच्या बाजूला तुकोजी होळकर व पटवर्धन आणि उत्तरेला महादजी शिंदे ह्यांनीं इंग्रजांचे बेत हाणून पाडल्यावर नाना फडणविसांनीं त्यांच्याभोंवतीं

ज़ी ही शत्रूंची सांखळी बांधली होती ती तोडावयाचा प्रयत्न त्यांनीं चालविला. महादजी शिंद्यांनीं मराठी राज्यसूत्रचालकांचें मन इंग्रजांशीं स्वतंत्र संधि करण्यासाठीं वळवावें अशा विनंतीचीं त्यांच्याशीं बोलणीं करण्यांत आलीं ! पण नानांनीं स्वतंत्र संधीची गोष्टच बोलूं दिली नाहीं आणि हैदरचा विचार घेतल्यावांचून संधीची वाटाघाट करण्याचें स्पष्ट नाकारलें ! मराठी समुद्रसेनेनेंही आपला कार्यभार तितक्याच चांगल्या रीतीनें पार पाडला. त्यांचे दर्यासारंग आनंदराव धुळप ह्यांनीं एक धाडसाचा मारा करून अपूर्व विजय मिळविला आणि इंग्रजांची रेंजर नांवाची प्रचंड रणनौका धरून युद्धांत जिंकिलेलें पारितोषक म्हणून घेऊन गेले ! पण इतक्यांत, इंग्रजांनीं संधीची वाटाघाट चालू केली असतांनाच, हैदर मरण पावला. तेव्हां शके १७०४ ( इ. सन १७८३ ) मध्यें नानांनीं संधि करावयाला मान्यता दिली. ह्या संधीच्या अन्वयें इंग्रजांना ह्या सर्व भांडणाचें मूळ जो राघोबा त्याला मराठ्यांच्या स्वाधीन करावें लागलें. युद्धामध्यें त्यांनीं जिंकून घेतलेला किंवा पुरंदरच्या संधीनें त्यांना मिळालेला सर्व प्रदेश, एक साष्टी सोडून, परत द्यावा लागला आणि मराठ्यांशीं त्यांचें वैमनस्य आहे किंवा प्रत्यक्ष युद्ध चाललें आहे अशा कोणाही आशिया खंडांतील राष्ट्राला किंवा सत्तेला आपण साहाय्य किंवा प्रोत्साहन देणार नाहीं असा करार करावा लागला. मराठ्यांनींही इंग्रजी हितसंबंधाच्या विरुद्ध कोणाही यूरोपीय सत्तेशीं राजकीय संबंध आपण ठेवणार नाहीं असें मान्य केलें. सर्वांत विशेष गोष्ट म्हणजे ह्या संधीमुळें इंग्रजांना ह्यापुढें आपण दिल्लीच्या सार्वभौम राजकारणांत ढवळाढवळ करणार नाहीं असें बांधून घ्यावें लागलें आणि आपल्या मनाला वाटेल त्याप्रमाणें त्याला वळण द्यावयाचा किंवा त्याचें नियंत्रण करावयाचा मराठ्यांचा अधिकार मान्य करावा लागला !

अशा रीतीनें इंग्रजांचें आणि मराठ्यांचें पहिलें युद्ध समाप्त झालें. अशा रीतीनें ज्या एकट्या पाश्चात्य राजसत्तेनें आतांपर्यंत मराठ्यांना उघड सामन्याला प्रत्यक्ष आव्हान द्यावयाचें टाळलें होतें त्या इंग्रजांचें तेजोहरण करून आणि त्यांना जिंकून मराठ्यांनीं धारण केलेली हिंदुस्थानची सर्वश्रेष्ठ व चक्रवर्ती राजसत्ता ही पदवी रणांगणावर प्रस्थापित केली ! अर्काटच्या आणि बंगालच्या दुर्बल बनलेल्या नबाबांच्या विरुद्ध आणि त्यांना धाक दाखविण्याच्या कामीं इंग्रजांच्या उच्छृंखल धृष्टतेनें त्यांना चांगलाच हात दिला होता

आणि तिच्या बळावर बंगाल आणि मद्रासमध्यें त्यांचें सामर्थ्य आणि राज्यविस्तार बराच वाढला होता. तरीही त्या नबाबांप्रमाणें समजून जर सह्याद्रीच्या कडेकोटांचाही अपमान करावयाला पुढें आले तर त्यांचीं डोकीं फुटल्यावांचून राहणार नाहींत; हा कटु अनुभव मराठ्यांनीं इंग्रजांना शिकविला!

सालबाईच्या ह्या संधीवर उभयपक्षांचीं स्वाक्षरें होतांच राघोबालाही स्वतःच्या राज्याविरुद्ध उलाढाली करावयाचा आणि आपल्या देशाच्या हितसंबंधांचा नाश करून आपल्या जातीच्या अधमतम शत्रूला त्यांची विक्री करावयाचा लज्जास्पद आयुष्यक्रम संपवावा लागला. स्वतःच्या नीच महत्त्वाकांक्षेच्या पायीं महत्कार्यासाठीं महाराष्ट्रांतल्या पिढ्यांमागून पिढ्यांनीं परिश्रम केले आणि मरण पत्करिलें तें महत्कार्य संपादण्याच्या स्फूर्तिदायक उद्योगापासून मराठमंडळाच्या सर्व उत्साहशक्तीचा ओघ वळवून तो अंतर्युद्धाच्या विषारी आणि प्राणनाशक डबक्यांत किंवा निरुपयोगी प्रवाहांत सोडून देण्यास तो कारणीभूत झाला होता ! पानिपतचें युद्ध ही जितकी मोठी राष्ट्रीय आपत्ति होती, निदान तितकी तरी मोठी राष्ट्रीय आपत्ति त्याची पत्नी आनंदीबाई ही होती ! सुदैवानें राघोबाचें पापी जीवन सालबाईच्या संधीनंतर फार दिवस राहिलें नाहीं. पण तरीही त्याचा अंत त्याच्यापेक्षांही अधिक भयंकर साडेसाती म्हणून मराठ्यांना जें जीवन पुढें भोंवणार होतें अशा जीवनाला जन्म द्यायच्या आधीं कांहीं झाला नाहीं ! इंग्रजांशीं केलेल्या नीच कारस्थानांची पूर्णपणें वाताहात होत असतांना इकडे त्याला एक मुलगा झाला ! दैवाचा खेळ असा कीं, त्याला त्याचे जगप्रसिद्ध आजे पहिले बाजीराव ह्यांचेंच नांव ठेवण्यांत आलें ! आपल्या बापाला अपेश घेऊन जें राक्षसी कार्य सोडून द्यावें लागलें तें कार्य तडीला न्यावयाचें आणि महाराष्ट्राचें स्वातंत्र्य गोळाभर अन्नासाठीं विकून व अशा रीतीनें शेवटच्या थोर हिंदु साम्राज्याचा नाश घडवून आणून आपल्या आईबापांना जें साधतां आलें नाहीं तें साधावयाचें त्याच्या दैवीं लिहिलें होतें.

पण तें इतक्यांत–निदान नाना आणि महादजी ही जोडी जिवंत असेपर्यंत तरी–घडून यावयाचें नव्हतें !

---

## प्रकरण २० वें

# सवाई माधवराव–जनतेच्या आवडीचे पंतप्रधान !

दैन्य दिवस आजि सरले । सवाइ माधवराव प्रतापी कलियुगिं अवतरले॥
सुंदर रूप रामाचें कुणावर नाहिं रागें भरणें ।
कलगितुरा शिरपेंच पाचुचीं पडत होतिं किरणें ।
महोत्सव घरोघर लागले लोक करायाला ।
परशराम प्रत्यक्ष आले जणुं छत्र धरायाला ॥

कारण, नाना आणि महादजी हिंदुराज्याचें राजकारग व दरबार– ह्यांनीं आपल्या विशाल स्कंधांवर ह्या सर्वश्रेष्ठ साम्राज्याचा भार वहन करावयाचें ठरविलें होतें. इंग्लंडनें किंवा फ्रान्सनें किंवा हॉलंडनें किंवा पुर्तुगालनें साम्राज्य जिंकण्याच्या इच्छेनें हिंदुस्थानांत ज्या राजकारणपटु आणि युद्धकलाविशारद पुरुषांना पाठविलें होतें त्यांपैकीं–हेस्टिंग्ज, वेलस्ली आणि कॉर्नवालीस ह्यांच्यापैकीं एकालाही ह्या जोडीशीं विरोध करण्यांत किंवा तिच्यावर मात करण्यांत विशेष यश आलें नाहीं. ह्या दोघांनींही हिंदु साम्राज्या-चे भरभराटीचे दिवस पाहिले होते. दोघेही प्रौढप्रतापी नानासाहेब आणि सदाशिवरावभाऊ ह्यांच्या साम्राज्यविषयक धोरणाच्या शाळेंत आपल्या राष्ट्राचे आणि त्यांनीं शिरावर घेतलेल्या महत्कार्याचे उद्देश, धोरण आणि परंपरा ह्या संबंधांतील शिक्षण मिळवून पटाईत झाले होते. दोघांनींही पानिपत प्रत्यक्ष पाहिलें होतें आणि त्यांतून दोघेही वांचले होते. त्या रक्त-लाञ्छित रणभूमीवर मृत होऊन पडलेल्या वीरांच्या पिढीचें कार्य पुढें चालवा-वयाचा दोघांनींहि निश्चय केला होता. त्यांना अंतःकलहांनीं विभक्त झालेलें, विनाशाच्या कडेला जाऊन पोंचलेलें, ज्याच्या सिंहासनावर नामधारी बाहुलें बसलें आहे, ज्याच्या प्रधानकीचा भार एका अर्भकावर पडलेला आहे आणि ज्याचा घात करण्यासाठीं बद्धपरिकर होऊन एक बलिष्ठ युरोपीय राष्ट्र शत्रुस्थानीं बसलेलें आहे असें मराठी राज्य त्यांच्यासमोर दिसलें आणि तरीही ह्या विषम परिस्थितीशीं निधड्या धैर्यानें आणि संस्पष्ट दूरदृष्टीनें त्यांनीं तोंड दिलें; राज्यांतलीं भांडणें आणि बंडें मोडून काढलीं; आणि आपल्या समर्थ बाहुबलानें आणि अचुक दृष्टीनें आपल्या आशियांतील



सवाई माधवराव

Lakshmi Art, Bombay, 8.

असो किंवा युरोपांतील असो, सर्व शत्रूंना खालीं पाडून अपमानाचा पेला प्राशन करावयाला लावला !

जनतेच्या राज्यक्रांतीच्या अनिश्चित आणि लहरी वृत्ति जागृत करावयाचा आणि आपल्या स्वाधीन ठेवावयाचा अत्यंत कठीण भार त्यांनीं आपल्या शिरावर घेतला होता. आतां आपल्या सर्व शत्रूंचा निःपात करून क्रांति यशस्वी झाली होती आणि राष्ट्रीय अभिमताच्या पक्क्या पायावर उभारलेल्या नवीन राजसत्तेनें रणांगणावर आपलें अजिंक्यत्व सिद्ध केलें होतें. तेव्हां अशा वेळीं ह्या महत्कृत्यांचा निदर्शक असा सर्वांचे डोळे दिपवून सोडणारा उत्सव करणें स्वाभाविक आणि राजकीय दृष्ट्या आवश्यक होतें. बाल पंतप्रधान सवाई माधवरावांच्या योजलेल्या विवाहानें असल्या राष्ट्रीय उत्सवासाठीं योग्य संधि मिळाली. ते लोकांच्या निवडीचे पंतप्रधान होते. त्यांच्यासाठीं राष्ट्रानें युद्धें केलीं होतीं. ह्या उघड युद्धांतूनच नाहीं तर त्यांचा नाश करण्यासाठीं शत्रूंकडून विषप्रयोग, मारेकरी इत्यादि गुप्त, भ्याडपणाचे आणि नृशंस प्रयोग करण्यांत आले. त्या सर्व प्रयोगांतूनही आतां ते सुरक्षित पार पडले होते. तेव्हां साहजिकच ह्या अघटित घटनांनीं पूर्ण, असें त्यांचें चरित्र पाहून लोकांना त्या गोकुळच्या दिव्य बालकाच्या बालचरित्राची तुलनेनें आठवण झाल्यावांचून राहात नसे आपल्या जिवलग बालराजांनीं सुखमय किशोरावस्थेंत पदक्षेप केलेला पाहण्यासाठीं अखिल जनतेचे डोळे लागून राहिले होते. जवळची आणि लांबलांबची सर्व महाराष्ट्रजनता राष्ट्रीय आनंदोत्सवांत भाग घेण्यासाठीं पुण्यांत गोळा झाली. राजपुत्र, संस्थानिक, प्रतिभाशाली कवि, प्रसिद्ध लेखक, थोर सेनानायक, उद्गीर आणि अटकच्या रणभूमि पाहिलेले व झुंजलेले प्रवीण रणझुंझार, राजकारणधुरंधर आणि कारस्थानपटु सर्वजण हा विवाहसमारंभ साजरा करण्यासाठीं व आपल्या आवडत्या आणि अगाधप्रतापी पंतप्रधानांचें दर्शन घेण्यासाठीं पुण्यांत जमले. आपल्या बलशाली हिंदु साम्राज्याच्या संघटित घटकांचें ऐक्य जगाच्या मनावर बिंबविण्यासाठीं आणि आतां मराठमंडळाचे तुकडे तुकडे होऊन तें अलग झाल्यावांचून रहात नाहीं, ह्या अंतर्युद्धांतून तें बचावणें शक्य नाहीं असे मनांत मांडे खाणाऱ्या शत्रूंचा आणि परदेशस्थांचा भ्रम फोडण्यासाठीं नानांनीं आपल्या पंतप्रधानांच्या विवाहाचा मंगलप्रसंग शोभिवंत करण्यासाठीं प्रत्यक्ष महाराष्ट्राच्या छत्रपतींना निमंत्रण दिलें होतें आणि ते त्याप्रमाणें

पुण्याला येऊन पोंचतांच त्यांचें अत्यंत थाटानें व सन्मानानें स्वागत करण्यांत आलें !

तेथें प्रशस्त राजसभेच्या मध्यभागीं छत्रपति आपल्या सिंहासनावर विराजमान झाले. त्यांच्याभोंवतीं त्यांचे अष्टप्रधान, सेनापति आणि प्रांताधिपति, समुद्रसारंग आणि राजसभापुंगव, राजपुत्र आणि संस्थानिक ज्यांच्या शासनाखालीं इतर खंडांतील देशांहूनही मोठमोठाले प्रांत होते असे राजशासक आपापल्या स्थानीं अधिष्ठित झाले. तेथें पटवर्धन, रास्ते व फडके होते. तेथें होळकर, शिंदे, पवार, गायकवाड व भोसले होते. हरिद्वारपासून रामेश्वरापर्यंत अखिल भारतवर्षांतील विद्वत्ता तेथें एकत्रित झाली होती. जयपुर, जोधपुर व उदेपुर येथील हिंदुराजांना मोठ्या अगत्यानें निमंत्रण देण्यांत आलें होतें आणि आपल्या राजप्रतिनिधींच्या द्वारा ते तेथें उपस्थित होते. निजामानें मोगलानें व युरोपीय राष्ट्रांनीं आपापल्या राजपुत्रांबरोबर आणि राजप्रतिनिधींबरोबर अभिनंदनाच्या देणग्या, आहेर आणि राजोपायनें पाठविलीं होतीं. राजधानीच्या भोंवतीं अनेक कोसपर्यंत निवासालयें रचून घोडदळ, पायदळ व तोफा ह्यांच्या रूपांत महाराष्ट्राची तरवार आणि ढाल सेवा करीत होती ! महाराष्ट्राच्या समुद्रसेनेच्या वतीनें आंग्रे व धुळप आले होते आणि पंतप्रधानांच्या वतीनें सर्व पाहुण्यांचा आदरसत्कार व व्यवस्था करण्याचें काम आंग्र्यांकडे सोंपविण्यांत आलें होतें, हें योग्यच होतें. आपल्या विस्तीर्ण छायेखालीं ह्या जगड्व्याळ जनसमूहाला आश्रय देत मराठ्यांच्या दोन्ही ध्वजा भगवाझेंडा आणि जरिपटका, सर्व राष्ट्राला त्यानें अंगीकारलेल्या स्वधर्मराज्याच्या—हिंदुपदपादशाहीच्या महत्कार्याची आठवण देत फडकत होता !

सूचनेची खूण होतांच घोडदळ, पायदळ आणि तोफदळ सर्व सैन्याच्या कंठांतून एकच आनंदगर्जना उठली व लोकांच्या आवडत्या पंतप्रधानांच्या नांवानें साभिवादन जयजयकार करण्यांत आला. सर्वांना दिपवून टाकणाऱ्या थाटमाटानें आणि समारंभानें आपला परिवार आणि चारण व भाटगण बरोबर घेऊन अत्यंत सुंदर आणि तितक्याच अभिनव पंतप्रधानांची स्वारी मंद मंद पावलें टाकीत आली आणि राजसभेंत प्रवेश करती झाली. सभागृह एकदम उभें झालें आणि सर्वांनीं मस्तकें नम्र करून आजपर्यंत लौकिककथांचा आणि काव्यांचा वर्ण्यविषय आणि नायक झालेल्या

पंतप्रधानांना प्रत्यक्ष राष्ट्राच्या हृदयाच्या निवेदनाचा मुजरा केला ! आणि ज्या वेळीं अखिल भारताचीं राज्यसूत्रें प्रत्यक्ष ज्यांच्या हातांत होतीं ते किशोर पंतप्रधान त्या उज्ज्वल सभागृहांत मध्यभागीं सिंहासनावर विराजित झालेल्या साताऱ्याच्या प्रभूंच्या—मराठ्यांच्या छत्रपतींच्या—सन्निध गेले. हात जोडून आणि भोंवतीं गुंडाळलेल्या फुलांच्या मालांनीं त्रिवार बद्ध करून संन्निध गेले—त्या वेळीं सर्व सभासदांना वाटलेल्या कौतुकाचें वर्णन काय करावें ? महाराष्ट्राच्या छत्रपतींसमोर मराठ्यांच्या पंतप्रधानांनींसुद्धां सेवकभाव दाखविण्यासाठीं हात जोडून आणि बांधून घेऊन जाणें राजसभेच्या अनुल्लंघनीय विधीप्रमाणें अवश्य होतें ! त्या दृश्यानें जनतेचीं अंतःकरणें आनंदानें उचंबळून आलीं, सद्गदित झालेल्या राष्ट्रीय ऊर्मी—कित्येक कठोर रणझुंझारांच्याही नेत्रांतून वाहूं लागल्या ! पंतप्रधानांच्या भावनागूढ आणि गंभीर मुद्रेलासुद्धां आंतील उमाळा लपवतां आला नाहीं आणि आनंदाचे टपोर अश्रु त्यांच्या गालांवरून ओघळतांना दिसूं लागले. मधून मधून कलहाची वृत्ति दिसून आली तरी अद्यापिही मराठमंडळाच्या घटकांना नियमित, जागृत आणि उत्तेजित करणाऱ्या संयुक्ततेच्या, अविभक्ततेच्या आणि हेतूंच्या एकवाक्यतेच्या ह्या भव्य प्रदर्शनानें आणि उत्सवानें इतर हिंदी व युरोपीय राजांच्या आणि राष्ट्रांच्या मनांवर जो राजकीय परिणाम व्हावा अशी नानांची आणि महाराष्ट्राच्या इतर नेत्यांची अपेक्षा होती तो परिणाम तंतोतंत घडून आला. तसेंच मराठ्यांच्या घटकांतही आपण एका उज्ज्वल आणि तुल्याधिकारी संयुक्ततेचे घटक आहोंत आणि एकत्र असल्यामुळेंच प्रत्येकाला अधिक सामर्थ्य, अधिक महत्त्व आणि अधिक ऐश्वर्य मिळतें आहे, एकटे राहून तें मिळणें शक्य नाहीं; अशी जाणीव प्रबळ व वर्धित करून मराठमंडळाला एकत्र निगडित करणाऱ्या बंधनाचे धागे दृढ करण्यांतही ह्या समारंभाचा थोडाथोडका उपयोग झाला नाहीं.

अंतर्युद्धानें झालेलीं क्षतें जशीं हळुहळू बुजूं लागलीं तशीं महाराष्ट्राला पुनः पूर्वींच्या इतिहासांतल्या कोणच्याही वेळेइतकींच भरभराटीचीं, वैभवाचीं आणि सुखाचीं वर्षें मिळालीं. नाना फडणविसांनीं आणि त्यांच्या समर्थ सहायकर्त्यांनीं राष्ट्राची शासनपद्धति, सांपत्तिक स्थिति आणि न्यायव्यवस्था ह्या इतक्या सुरक्षित पायावर आणून ठेवल्या कीं, हिंदुस्थानांतील कोणच्याही राज्यापेक्षां किंवा लोकांपेक्षां मूळ महाराष्ट्र आणि त्याच्या प्रत्यक्ष शासनाखालीं

असलेला विस्तीर्ण प्रदेश ह्यांचाच राज्यकारभार सर्वोत्कृष्ट समजला जाऊं लागला. त्या वेळची प्रजाहिततत्पर धाराबंदीची आणि उकळिकीची पद्धति, दक्ष आणि लोकनियंत्रित न्यायव्यवस्था, शेतकऱ्यांपासून तों राजपुत्रांपर्यंत सर्वांना कोणच्याही मानाच्या, कीर्तीच्या व वैभवाच्या आयुष्यक्रमासाठीं असलेलें इतरांच्या तुलनेनें सुगम असें मुक्तद्वार; आणि सर्वांहून विशेष म्हणजे सर्व जनतेची ज्या दिव्य महत्कार्यासाठीं आपले पूर्वज पडले व जें आपल्या संतांनीं आणि देवतांनीं भाग घेऊन अधिक पुनीत केलें तें महत्कार्य संपादण्यासाठीं आपण जन्माला आलों आहों अशी जाणीव व हिंदुस्थानांतील ज्या जातीनें हिंदुधर्माच्या आणि हिंदुस्वातंत्र्याच्या कार्याच्या वाढीला आणि संगोपनाला वाहून घेतलेल्या साम्राज्याचा भार आपल्या बलिष्ठ स्कंधप्रांतीं धारण केला आहे त्याच जातींपैकीं—मराठ्यांपैकींच—आपण एक आहोंत असा सदभिमान; ह्या सर्व गोष्टींमुळें त्या वेळच्या लोकांना आपण असलीं थोर कृत्यें पाहिलीं आणि तीं घडवून आणण्यांत भाग घेतला व अशाच काळांत आपला जन्म झाला—तेव्हां आपण धन्य आहोंत असें अक्षरशः वाटूं लागलें. राष्ट्राचें वातावरण उदात्ततेच्या भावनांनीं भरून गेलें होतें आणि स्वाभाविकच प्रत्येकाच्या श्वासोच्छ्वासाबरोबर तें प्रत्येकाच्या शरीरांत प्रवेश करीत होतें ! आज ह्या युद्धांत जय मिळाला, उद्यां तें राष्ट्रकार्य साधण्यांत यश प्राप्त झालें, अशा वार्तांचा सारखा वर्षाव होत होता. अगदीं मूढ माणसाला सुद्धां तो काल विशेष भाग्याचा आहे असें वाटे आणि जो तो त्याचा संबंध राष्ट्राचे भाग्यशाली आणि प्राणप्रिय पंतप्रधान सवाई माधवराव ह्यांच्या जन्मकाळच्या अत्यंत शुभ ग्रहांशीं जोडी. त्यांचा जन्म होण्यापूर्वीच सर्व राष्ट्रानें आपले राज्यकर्ते म्हणून नतजानु होऊन त्यांना अभिवादन केलें होतें ! जनप्रवाद असा प्रसृत झाला होता कीं, प्रत्यक्ष थोरले माधवरावच मुसलमानी राज्याचा नाश करावयाची, हिंदुजातीच्या धर्मपाखंड आणि परकीय छलकांचा प्रतिशोध घ्यावयाची व पूर्वसमुद्रापासून पश्चिमसमुद्रापर्यंत समर्थ आणि देवभीरु हिंदु साम्राज्य प्रस्थापित करावयाची त्यांची पवित्र इच्छा अतृप्त राहिल्यामुळें ह्या आपल्या आवडत्या दुसऱ्या माधवरावांच्या रूपानें पुनः जन्माला आले आहेत ! आणि म्हणून ह्या बाळराजांचा जन्म झाल्यापासून आपल्या राष्ट्रीय ध्वजेवर सुदैवाची नेहमीं कृपादृष्टि होते आणि देवाचा आशीर्वाद लाभतो. असले विचित्र लौकिकी समज म्हणजे



टिपुसुलतान.

Lakshmi Art, Bombay, 8.

कधीं कधीं राष्ट्राच्या आत्म्याच्या निगूढ आकांक्षांचें स्वप्नांतलें बरळणें असतें आणि त्यावरून अखेरच्या थरापर्यंत सर्व जनता राष्ट्रीय पराक्रमाकडे आणि अंगीकृत कार्याकडे कोणच्या दृष्टीनें पाहते हें स्पष्टपणें दृग्गोचर होतें.

सालबाईचा संधि झाल्यानंतर लवकरच नानांनीं परशुरामभाऊ पटवर्धनांना टिपूचें पारिपत्य करावयाची आज्ञा दिली. हैदरच्या मरणानंतर हा गादीवर आला आणि मराठी राज्याचा कट्टरांतला कट्टर शत्रु बनला. नरगुंदच्या हिंदु राजांचा टिपूनें अतिशय छळ मांडल्यामुळें त्यांनीं साह्यार्थ मराठ्यांकडे धाव घेतली आणि शके १७०६ (इ. सन १७८४) मध्यें युद्धाला प्रारंभ झाला. शेवटीं पटवर्धन आणि होळकर ह्यांच्या हाताखालील मराठे आणि निजाम ह्यांच्या संयुक्त सेनेनें टिपूला संधि करावयाला भाग पाडलें. त्यानें मराठ्यांना द्यावयाची सर्व खंडणी चुकती करावयाचें मान्य केलें आणि नरगुंदाला पुन्हा त्रास न द्यावयाचें वचन दिलें. पण टिपूच्या मनामध्यें कपट होतें. मराठ्यांची पाठ वळतांच त्यानें संधि धाब्यावर बसविला, नरगुंदचा गड हस्तगत केला, तेथल्या हिंदु संस्थानिकाला आणि त्याच्या कुटुंबांतील मंडळींना विश्वासघात करून बंदिवान् केलें व महंमदधर्मानुयायांच्या सर्वजनपरंपरेप्रमाणें संस्थानिकाची मुलगी आपल्या अंतःपुरांत घालून इतरांना रानटी क्रौर्यानें छळ करून मारून टाकलें. नंतर स्वतःकरितां स्वर्गीय पुण्याचा संचय करण्यासाठीं आणि मुसलमानी फकीरमौलवींचे आणि तवारिखकारांचे आशीर्वाद व प्रशस्तिपत्रें मिळविण्यासाठीं टिपूनें तुंगभद्रा व कृष्णा ह्यांच्यामधील सर्व हिंदु लोकांवर मुसलमानी धर्मप्रसाराबरोबर नेहमीं आदळून येणारे सर्व प्रकारचे भयंकर अत्याचार करून व त्यांना बलात्कारानें बाटवून त्यांचा राक्षसी प्रतिशोध घ्यावयाला प्रारंभ केला. लागलीच ह्या स्तुतिपाठकांकडून त्याला धर्मसंरक्षक, गाझी, औरंगझेब किंवा तैमूर अशा उच्च पदवीला नेऊन बसविण्यांत येऊं लागलें. हिंदुधर्माचे रक्षक म्हणून चाललेली मराठ्यांची प्रौढी नाहींशी करण्यासाठीं त्यानें हिंदूंच्या बलात्कारानें सुंता करविल्या आणि इतरही अनेक अनिर्वाच्य अत्याचार केले. ह्या छळाला बळी पडलेल्या लोकांच्या वतीनें हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे कीं, त्यांनीं त्याबरोबर सर्व मिळून संघटित समुत्थान करावयाचें पुरुषाचें प्रथम आणि श्रेष्ठ कर्तव्य पाळलें नाहीं–श्रीरामदासांनीं हिंदूंना उपदेशिल्याप्रमाणें आणि मराठ्यांना शिकविल्याप्रमाणें आपल्या

धर्माच्या छलकांना मारतां मारतां आणि अत्याचाराचा नाश अत्याचारानेंच करतां करतां त्यांनीं मरण पत्करलें नाहीं, तरी त्याच्या खालोखालचें दुसरें कर्तव्य त्यांनीं केलें, त्यांनीं मानभंगापेक्षां–कलंकापेक्षां मरण पत्करलें. एकाद-दुसऱ्या गांवची एकाद दुसरी व्यक्ति नाहीं तर टिपूच्या नरहत्यारी क्रोधाचा विशेष विषय झालेल्या दोन सहस्र ब्राह्मणांनीं बलात्कारानें धर्मांतरित होऊन बाटगें आयुष्य काढण्यापेक्षां आपल्या जिवाचा नाश करून घेतला! आपल्या धर्मासाठीं त्यांनीं स्वेच्छेनें आत्माहुति दिली! मराठी सत्तेच्या उदयापूर्वी ह्या गोष्टी नित्यक्रमाच्या झाल्या होत्या तोंपर्यंत धर्म न सोडतां मरण स्वीकारणें हीच सर्वांत श्रेष्ठ गोष्ट हिंदुमात्राला करतां येत होती. श्रीरामदास उभे राहिले आणि सह्याद्रीच्या शिखरावरून गर्जले "नाहीं, असें उपयोगी नाहीं. 'धर्म सोडण्यापेक्षां प्राण सोडणें बरें' हें प्रशस्तच आहे; पण मारलेंही जायचें नाहीं आणि बलात्कारानें धर्मांतरितही व्हावयाचें नाहीं उलट अत्याचाराच्या शक्तीचाच नाश करावयाचा असा प्रयत्न करणें हें त्याहून प्रशस्ततर–श्रेष्ठतर–आहे. धर्मासाठीं अशक्यच असेल तर मरा; पण मरतांना स्वराज्य घेण्यासाठीं, धर्मसंरक्षणासाठीं, मारतां मारतां मरत आपल्या शतावधि शिष्यांकडून धर्मासाठीं मरावें। मरोनि अवघ्यांस मारावें॥ मारतां मारतां घ्यावें। राज्य आपुलें॥" ह्या युद्धमंत्राचा उपदेश गुप्तमंडळांतून, मठामठां-तून आणि घराघरांतून देऊन त्यांनीं हिंदुमात्राला नुसता कांट्यांचा किरीटच नाहीं तर, तसाच आणि त्याबरोबरच विजयाचा मोत्याचा तुराही प्राप्त करून घ्यावयाला शिकविलें! आणि हें असें झाल्यावरसुद्धां टिपूनें शिवाजी-चे वंशज पुण्याला अद्यापि राज्य करीत असतांना हिंदू त्यांचा छळ करून बाटवावयाचें आणि औरंगजेबाची भूमिका करावयाचें धाष्ट्य केलें! टिपूच्या धर्मवेडाला बळी पडलेल्या सहस्रावधि ब्राह्मणांच्या आणि कर्नाटक, आंध्र आणि तामिळ प्रांतांतील हिंदूंच्या कंठांतून निघालेली 'ह्या मुसलमानी छळापासून आमची मुक्तता करा' अशी आर्त हांक पुण्याला येऊन पोंचली. हिंदवी सत्तेला हें सहन करणें कसें शक्य होतें. कृष्णेपलीकडच्या आपल्या धर्मबंधूंवर पडलेल्या ह्या भयंकर दुर्दैवाच्या घाल्याचा वृत्तान्त ऐकून स्वस्थ बसणें महाराष्ट्राच्या हिंदु साम्राज्याला अशक्य होतें. मराठ्यांच्या हिंदु सत्तेला हें उघड आव्हान होतें आणि त्यांनीं तें स्वीकारलें. ह्या वेळीं त्यांचें सैन्य मोठमोठालीं युद्धें भांडण्यांत उत्तरेला गुंतलें होतें; तो वृत्तान्त आपण

लवकरच पाहूं. पण तरीही नानांनीं आपल्या कर्नाटकांतील देशबांधवांच्या आणि धर्मबांधवांच्या सुटकेसाठीं एकदम धांवावयाचें ठरविलें ! ह्या युद्धांत जो प्रदेश टिपूपासून जिंकला जाईल त्याचा तिसरा भाग द्यावयाच्या आमिषाच्या वचनानें निजामाला वळवून घेऊन त्यांनीं मराठी सेनांना ह्या मुसलमानी धर्मवेड्याविरुद्ध प्रबल स्वारीवर निघावयाची आज्ञा केली. पटवर्धन, बेहेरे आणि इतर मराठे सरदार अभिमंत्रणासाठीं एकत्र होऊन पुन: आपापलीं पथकें घेऊन पृथक् झाले आणि त्यांनीं शत्रूचीं बदामी आणि तशींच इतर बलिष्ठ स्थळें घेतलीं आणि त्याला इतक्या वेळां व इतक्या आवेशानें चोप देऊन सतावून सोडला कीं, शेवटीं तो आश्रयार्थ राज्यांतील डोंगराळ प्रदेशांत जाऊन लपून बसला. पण तेथेंही बायकांना आणि पोरांना पीडा देऊन, निरुपद्रवी हिंदु पुजाऱ्यांना आणि उपाध्यांना छळून व हिंदु कुमारिकांना भ्रष्ट करून प्रसिद्धीला आलेले हे इस्लामी वीर हिंदु सेनेपुढें अधिक वेळ टिकाव धरूं शकले नाहींत. त्याचें डोकें फोडावयाचें सामर्थ्य आमच्या मनगटांत आहे असें हिंदूंनीं दाखवितांच त्यानें शेवटीं त्याच हिंदूंच्या जवळ क्षमेची आणि संधीची याचना केली ! ह्याच्या आधीं सहस्रावधि हिंदूंनीं आणि हिंदु कुमारिकांनीं प्रतिकार न करतां आणि वर मान न उचलतां आत्मयज्ञ केला होता, पण त्याच्या योगानें ह्या धर्मवेड्या नरपशूच्या अत्याचाराची धार बोथट न होतां उलटी अधिक तिखट झाली होती ! पण प्रतिकारशून्य हौतात्म्याला जें साधतां आलें नाहीं तें धर्म्य आणि प्रतिकारप्रवण शक्तीनें करून दाखविलें आणि अधिक पीडा करण्याचें अत्याचाराचें बळच नाहींसें केलें. टिपूला हिंदुसत्तेला जुन्या खंडणीप्रीत्यर्थ तीस लाख रुपये जागच्या जागीं मोजून द्यावे लागले. आणखी पंधरा लाख रुपये एका वर्षाच्या आंत देण्यासाठीं बांधून घ्यावें लागलें आणि वर नरगुंदचें संस्थान, कित्तुर आणि बदामी हीं स्थळें मराठ्यांच्या स्वाधीन करावीं लागलीं ! आतां मुसलमानांप्रमाणेंच नीचपणाला तसल्याच प्रकारचें प्रतिशोधसामर्थ्य दाखवावयाचें मराठ्यांनीं मनांत आणलें असतें तर टिपूच्या मुसलमानी प्रजेला, टिपू सुलतानाच्या आज्ञेनें थोड्याच दिवसांपूर्वीं हिंदूंचा छळ करण्यांत ज्यांनीं इतकी पाशवी तत्परता दाखविली होती त्याच मौलवींना आणि मौलानांना, मुसलमानी सुंतेपेक्षां किती तरी निरुपद्रवी असा शेंडी ठेवावयाचा विधि करावयाला बलपूर्वक भाग पाडून त्यांना हिंदु बनवितां आलें असतें; पण मराठ्यांनीं प्रतिशोधासाठीं देखील मशिदी

पाडल्या नाहींत, बलात्कारानें मुसलमानी स्त्रियांना आपल्या अंतःपुरांत घातलें नाहीं आणि खड्गाच्या धारेवर धरून इच्छेविरुद्ध हिंदुधर्म स्वीकारावयाला लावून कोणच्याही लोकांच्या धर्माचा अपमान केला नाहीं! हीं पौरुषाचीं (!) कृत्यें साहजिकच त्यांच्या स्वभावाला अस्वाभाविक होतीं! कारण तैमूरनें आणि टिपूनें, अल्लाउद्दिनानें आणि औरंगझेबानें पठण केलेल्या कुराणावर त्यांची निष्ठा बसलेली नव्हती! असलीं अत्याचाराचीं आणि लूटमारीचीं कृत्यें केवळ 'सद्धर्मभक्तां'नाच करावयाचा अधिकार आहे, 'काफरां'ना नाहीं!!

दक्षिणेकडे टिपूच्या धर्मांध क्रौर्यापासून हिंदूंची मुक्तता केल्यावर आतां मराठी सैन्यांना उत्तरेकडे त्यांच्या शत्रूंनीं जो एक मोठा संघ निर्माण केला होता तो फोडण्याकडे आपले सर्व प्रयत्न एकवटणें शक्य झालें. इतके दिवस ह्याला महादजी शिंद्यांनीं एकट्यानें दाबांत ठेविलें होतें. सालबाईचा संधि झाल्यावर महादजी उत्तरेकडे गेले. यूरोपीय सेनाचालकांच्या हाताखालील नियमबद्ध सैन्याच्या कर्तृत्वाचा त्यांच्या मनावर अतिशय परिणाम झाला होता. तेव्हां सदाशिवरावभाऊंची योजना पूर्ण करण्याकडे त्यांनीं पहिल्यानें लक्ष दिलें. हा पानिपतचा वीर मराठ्यांचे भाऊसाहेब—म्हणजे ज्यांनीं यूरोपीय पद्धतीनें भरती केलेल्या, नियम लावलेल्या आणि शिक्षण दिलेल्या वेतनी सैन्याचें महत्त्व नुसतें ओळखलेंच नव्हतें, तर त्याचा उपयोग करावयाचा मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केला होता असे पहिले थोर हिंदी सेनापति महादजी शिंदे यांनीं फ्रेंच सेनानायक डीबॉईन ह्याच्या शिक्षणाखालीं एक बलिष्ठ सैन्य सिद्ध केलें आणि तें इतकें उत्तम रीतीनें सज्ज केलें कीं, त्याला कोणच्याही पाश्चात्यांच्या सैन्याशीं टक्कर घेतां यावी. ह्या सैन्याच्या बळावर उत्तरेकडील त्यांच्या कारस्थानाच्या आड यावयाचें धैर्य व त्याला आपण म्हणूं तें करावयाला लावण्याचें सामर्थ्य त्यांच्यामध्यें आलें. यद्यपि इंग्रजांना दिल्लीच्या सार्वभौम राजकारणांतून आपला हात पूर्णपणें काढून घ्यावयाचें आणि अशा रीतीनें मराठ्यांना वाटेल तसें मोकळें रान सोडावयाचें वचन द्यावें लागलें होतें; तरी शहाजहान बादशहाला मराठ्यांकडे जाऊं न देतां त्याला आपल्या हातांत ठेवण्याचा प्रयत्न करून मराठ्यांच्या विरुद्ध असंतोष पसरविण्याचा आणि महादजींच्या मार्गांत शक्य तितक्या अडचणी उपस्थित करावयाचा क्रम त्यांनीं बंद केला नाहीं; पण त्या सर्वांचा समाचार घेऊन महादजींनीं दिल्लीच्या सार्वभौम राजकारणाचीं सूत्रें

आपल्या हातांत पक्षेपणीं घेतलीं; बादशहाला दिल्लीला परत आणलें; आणि वजिराच्या जागेसाठीं धडपडणाऱ्या मुसलमान धूर्तांचे सर्व बेत ढांसळून पाडले. अगतिक बादशहाला महादजी शिंद्यांना आपले वजीर करावें लागलें; बादशाही सेनेचीं सूत्रें त्यांच्या हातांत द्यावीं लागलीं; आणि दिल्ली व आग्रा ह्या दोन प्रांतांचा राज्यकारभार त्यांच्या स्वाधीन करावा लागला. अशा रीतीनें मुसलमान आणि युरोपीय ह्या दोन्ही प्रतिस्पर्ध्यांना जळफळत ठेवून मराठ्यांनीं मोगली साम्राज्याला शेवटची मूठमाती दिली. ह्याप्रमाणें दिल्लीचीं सूत्रें तर महादजींच्या हातांत आलीं; इतकेंच नाहीं तर मोगल बादशहानें पंतप्रधानांना वजीर मुतालीक ही पदवी दिली. म्हणजे आपल्या स्वतःच्या व्ययासाठीं ६५००० रुपयांचें वेतन बांधून घेऊन आणि नांवाचा बादशहा ह्या पदवीचें वैभव संपादन करून त्याच्या विनिमयांत बादशहानें पंत-प्रधानांना राजांचा राजा–महाराजाधिराज–करून टाकलें आणि आपल्या नांवानें सर्व कारभार करावयाचा अधिकार दिला. राज्यघटनेंतील ह्या नवीन परिवर्तनानें जी परिस्थिति उत्पन्न झाली तिचें वर्णन त्या वेळच्या एका मराठी लेखकाच्या शब्दांतच केलेलें बरें. " आतां बादशाही आमची झाली आहे. म्हातारा मोगल बादशहा केवळ आमचें वेतन उपभोगणारा सेवक, आपण होऊन झालेला आमच्या हातांतला बंदिवान आहे. त्याला अद्यापि बादशहा म्हणून संबोधतात. तेवढीच त्याची इच्छा आहे आणि थोडा वेळ-पर्यंत हा देखावा आम्हांला चालविला पाहिजे." इंग्रजांनाही पुढें, त्यांना तशी परिस्थिति प्राप्त झाल्यावर, हा वरचा देखावा शके १७७९ (इ. सन १८५७ ) पर्यंत सुद्धां ठेवतां आला नाहीं.

महादजींनीं सर्व हिंदु जनतेच्या धार्मिक वृत्ति हालून जातील अशी गोष्ट करून ही महत्त्वाची घटना चिरस्मरणीय करून ठेवण्याचें ठरविलें. आतां सर्व सत्ता हिंदूंच्या हातांत आली हें दाखविण्यासाठीं 'अखिल भारतवर्षांत कोणींही गोवध करितां कामा नये' अशी राजाज्ञा प्रसृत झाली ! तसेंच ही राजकीय अधिकारक्रांति केवळ शाब्दिक नाहीं, ह्याचाही प्रत्यय महादजींनीं आणून दिला. लाकडाच्या ओंड्याप्रमाणें नामधारी राजे राहाणें मराठ्यांना शक्य नव्हतें. त्यांनीं लागलीच सर्व विरोधकांना सरळ करून त्यांचें महाराष्ट्र-मंडळाच्या नेतृत्वाखालीं एक बलिष्ठ आणि श्रेष्ठ हिंदु साम्राज्य बनवावयाला प्रारंभ केला. इंग्रजांकडे बादशाही खंडणी व मराठ्यांची चौथाई आणि

सरदेशमुखी बरीच थकली होती, ती गोळा करण्याचें पहिलें काम महादजींनीं केलें. तसेच निरनिराळ्या प्रांतांवरील संस्थानिक आणि प्रांताधिकारी मूळ सत्तेला न मानतां स्वतंत्र सत्ताधीशासारखें वर्तन कित्येक वर्षांपासून करीत असत. त्यांच्यावर साऱ्याची आकारणी करण्याचें आणि त्यांना दाबांत आणण्याचें काम त्यानंतर शिंद्यांनीं हातांत घेतलें. लागलीच सर्व हिंदुस्थानभर बंडाची वावटळ पसरली. सर्व सरदार, अमीर आणि खान मराठ्यांच्या विरुद्ध शस्त्र घेऊन उठले. इतक्यानेंच थांबलें नाहीं. तेथील राजे आणि रावसुद्धां ज्या एकमेव हिंदुसत्तेनें हिंदुस्थानांत हिंदु राज्याची प्रस्थापना केली असती त्या सत्तेच्या विरुद्ध इंग्रजांना आणि मुसलमानांना मिळाले! वैयक्तिक स्वार्थाच्या दृष्टीनें तें वर्तन अत्यंत स्वाभाविक होतें, पण राष्ट्रीय दृष्ट्या तितकेंच दुर्दैवाचें होतें. जयपुर आणि जोधपुर ह्या दोन रजपूत संस्थानांनीं एक होऊन इंग्रजांच्या किंवा मुसलमानांच्या विरुद्ध केव्हांही केलें नसेल इतकें मोठें सैन्य मराठ्यांच्या विरुद्ध उभें केलें; आणि उत्तर हिंदुस्थानांतील विद्रोही मुसलमानी सेनेशीं सहकार्य करून शिंद्यांच्या सैन्याशीं लालसोडला प्रचंड युद्ध केलें. समर अगदीं भरांत आलें असतां महादजींच्या हाताखालील बादशाही सैन्यांतील मुसलमान सैनिक पूर्वी ठरल्याप्रमाणें खूण होतांच सर्वच्या सर्व रजपुतांना जाऊन मिळाले आणि अशा रीतीनें एकाएकीं विश्वासघात झाल्यानें मराठ्यांचा पराभव झाला. पण ह्या अकस्मात् झालेल्या पराभवानें ह्या शूर मराठी सेनापतीचें तेज जितकें कसाला लागलें तितकें दुसऱ्या कशानेंही लागलें नसेल. मुळींच न कचरतां त्यानें लौकरच मराठ्यांचें सैन्य पुनः एकत्र केलें. आग्र्याचा दुर्ग मुसलमानांनीं चोहों बाजूनें वेढून टाकला असतां तेथील मराठी दुर्गाधिकारी लखोबादादा ह्यांनीं त्यांचा शौर्यानें व चिकाटीनें प्रतिरोध केला आणि शिंद्यांच्या शत्रूंचा लोंढा थोपवून धरला. इतक्यांत ज्या नजीबखानाला त्याच्या दुष्कृत्यांचें न विसरतां मराठ्यांनीं पुरें प्रायश्चित्त दिलें होतें त्याचा नातु गुलाम कादर आपले रोहिले आणि पठाण बरोबर घेऊन मराठ्यांच्या हातांतून दिल्लीची मुक्तता करण्याच्या हेतूनें रणक्षेत्रावर उतरला. मूर्ख बादशहानें त्याला प्रोत्साहन दिलें व महादजी त्यांच्याविरुद्ध सर्व बाजूंनीं शस्त्रें घेऊन उठलेल्या रजपूत आणि मुसलमान सैन्यांशीं आग्र्याजवळ युद्ध करण्यांत गुंतले असतां त्यानें दिल्लींत प्रवेश केला. महादजींनीं उत्तरेकडे परिस्थितीनें कशी उलट घेतली आहे ह्याची माहिती

आधींच नानांना कळवली होती आणि ह्या सर्व त्रासाच्या मुळाशीं आपल्या महत्त्वाकांक्षेच्या संबंधांत निराश झालेले इंग्रजच आहेत ही गोष्टही त्यांच्या लक्ष्यांत आणून दिली होती. मराठ्यांना समोरासमोर विरोध करण्याची त्यांची छाती नव्हती. त्यांनीं तो प्रयत्न करून पाहिला होता आणि त्यांत अपेश घेऊन बसले होते. तरी पण मराठ्यांना आणखी कांहीं दिवस बादशहाच्या नांवाचा आणि अधिकाराचा उपयोग करूं दिला तर ते निश्चयानें ज्या पांघरुणाखालीं ह्या सोंगाचें प्रदर्शन चाललें आहे तो पातळ पडदाही फाडून टाकतील आणि उघड उघड स्वतःच चक्रवर्तीपणाचीं चिन्हें धारण करतील—किंबहुना त्यांनीं जवळ जवळ तसें केलेंच आहे—ही गोष्ट ते जाणून होते. तेव्हां जीर्ण मोगल सत्तेच्या बादशाही बाहुल्याचीं सूत्रें आपल्या हातांत आणून ठेवण्याची त्यांना अत्यंत उत्कंठा लागली होती. मराठ्यांच्या ह्या श्रेष्ठ सेनापतींनीं—पाटिलबुवांनीं—नानांना पाठविलेल्या पत्रांत महाराष्ट्रांतील लोकांना पुढीलप्रमाणें ओजस्वी भाषेंत प्रोत्साहन दिलें. "आपल्या थोर साम्राज्याच्या हिताकरितांच केवळ आपण जगतों आहों, कष्ट करतों आहों आणि मरणारही आहों. मराठमंडळाचे अधिपति हेच आपले सर्वांचे एकमेव स्वामी आहेत, हें आपण विसरतां कामा नये. मत्सराचें किंवा वैयक्तिक स्वार्थाचें सर्व किल्मिष आपण मनांतून काढून टाकूं या. जर तुमच्यांपैकीं कोणाच्या मनांत माझ्या हेतूंविषयीं शंका असेल तर माझी प्रार्थना आहे कीं, ती त्यानें अगदीं काढून टाकावी. माझ्याविषयीं जे मत्सर पसरवितात तेच आपले खरे शत्रु आहेत; ते आपल्यांत दुही पाडून आपलीं घरें भरीत आहेत. मराठी राज्याची मीं आजवर केलेली सेवा त्यांचें तोंड बंद करावयाला पुरी आहे. तेव्हां ह्या प्रसंगासाठीं आपण सर्व सिद्ध होऊन राष्ट्रीय ध्वजेखालीं—भगव्या झेंड्याखालीं—एकत्र होऊं या. आपल्या राष्ट्रानें शिरावर घेतलेलें कार्य व आपल्या वाडवडिलांनीं आपल्यावर सोंपविलेलें श्रेष्ठ धर्मकृत्य हिंदुस्थानांत सर्वमान्य झालें पाहिजे. आपण हें आपलें थोर साम्राज्य विभक्त आणि उध्वस्त होऊं देतां कामा नये." राष्ट्रीय हितसंबंधांवर अशा रीतीनें संकट आलें असतां ह्या उदात्त पत्राकडे दुर्लक्ष करणारा मनुष्य नाना नव्हते. ह्या वेळीं टिपूशीं त्यांनीं युद्ध चालविलें होतें हें आपण पाहिलेंच आहे. त्याला अवश्य तितका नम्र केल्याबरोबर नानांनीं होळकरांना अलिजाबहाद्दर शिंद्यांच्या साहाय्यासाठीं पाठविलें. आपल्या

पूर्वजांचें भव्य स्वप्न अगदीं खरें होण्याच्या बेतांत आलें असतां आणि त्याच्या आश्रयाखालीं अखिल हिंदुस्थान एकत्र होईल अशी आशा उत्पन्न झाली होती असें मोठें हिंदु साम्राज्य संस्थापित होत असतां नेमक्या त्याच वेळीं रजपूत आणि मराठे यांचें आपसांत युद्ध जुंपावें आणि हिंदूंच्या शत्रूंना त्यामुळें आपलीं डोकीं वर काढावयाला अनायासें संधि मिळावी ह्या गोष्टीचा नानांना अतिशय खेद वाटला.

तेव्हां नानांनीं रजपूत राजांबरोबर आणि त्यांतही मुख्यतः जयपुरकरांबरोबर पंतप्रधानांच्या वतीनें बोलणें चालू केलें. त्यांनीं हिंदुराज्याच्या शत्रूंशीं संगनमत करूं नये व कसेंही करून मराठयांनीं जवळ जवळ स्थापित आणलेल्या हिंदु साम्राज्याशीं पटवून घ्यावयाचा मार्ग त्यांनीं शोधून काढावा, इकडे त्यांचें मन वळवण्याचा प्रयत्न करण्यांत आला. पुण्याहून पाठविलेल्या सैन्याचें साहाय्य मिळाल्यावर महादजींनीं तेव्हांच आपल्या शत्रूंना वठणीवर आणलें. त्यांनीं बाणाखान, अप्पा खंडेराव आणि इतर मराठी सेनानायक ह्यांना त्यांच्या साह्यार्थ डीबॉयनच्या हाताखालीं सिद्ध झालेल्या दोन गाखलेल्या सैन्याच्या तुकडया देऊन, पानिपतचें कारस्थान रचणाऱ्या नजीबखानाच्या नातवाविरुद्ध—गुलाम कादरविरुद्ध—पाठविलें. मुसलमानांनीं युद्ध द्यावयाचा निश्चय केला. दोन निकराचीं युद्धें झालीं आणि त्यांत आजपर्यंत कधींही मिळाला नव्हता असा मार खाऊन मुसलमान मोडले गेले. ते सर्व दिशांनीं पळूं लागले. इस्माईल बेग आणि गुलाम कादर ह्यांनीं दिल्लीची वाट धरली; त्यांना विसाव्याला वेळ न देतां मराठे मागून पाठलाग करीत आले. बादशहा भीतीनें कांपूं लागला. गुलाम कादरनें पैशाची मागणी केली; बादशहाला ती भागवतां आली नाहीं. रागानें बेभान होऊन त्या क्रूर आणि रानटी रोहिल्यानें अत्याचारांच्या आणि बलात्कारांच्या पद्धतशीर सत्रालाच प्रारंभ केला. त्यानें बादशहाला सिंहासनाच्या खालीं ओढलें; त्याला जमिनीवर पाडलें आणि त्याच्या छातीवर गुडघा रोंवून त्या अकबर आणि औरंगझेबाच्या वृद्ध आणि असहाय वंशधराच्या डोळ्यांत आपली सुरी खुपसली आणि त्यांतलीं बुबुळें फोडून टाकलीं ! ह्या अमानुष कृत्यानेंही त्याची तृप्ति न होतां त्यानें बादशहाच्या राण्या आणि मुली अंतर्गृहांतून ओढून बाहेर काढल्या, दांडगाईनें त्यांचीं वस्त्रें फाडलीं आणि आपल्या डोळ्यांसमोर आपल्या चाकरांकडून त्यांच्यावर बलात्कार करविला ! ह्या राक्षसी क्रौर्याचें एक



नानाफडणवीस.

Lakshmi Art, Bombay, 8.

कारण असें होतें कीं, शहाअलम बादशहानें ह्या गुलाम कादरवर शस्त्रप्रयोग करून मुसलमानी रीतीप्रमाणें त्याचें पुरुषत्व नष्ट केलें होतें ! राजधानींत सर्वत्र लुटालूट चालू झाली. महंमदी धर्माच्या नांवाखालीं मुसलमानांना इतरांच्यावर नेहमीं जे अत्याचार करावयाची संवय लागली होती ते सर्व अत्याचार मुसलमानांनीं मुसलमानांवरच केले ! बाहेरचा अरेराव घरींसुद्धां केव्हांना केव्हां अरेराव झाल्यावांचून रहात नाहीं ह्याचें हें प्रत्यंतर आहे ! अशा रीतीनें अत्याचारप्रवृत्ति आपणच आपला बळी घेते ! पण आतां इस्लामच्या अनुयायांनीं केलेल्या ह्या पाशवी अत्याचारांपासून आणि चालविलेल्या रानटी छळापासून मुसलमानी बादशहाचें, दिल्लीच्या नागरिकांचें आणि महंमदी अबलांचें संरक्षण कोण करणार ? दुसरे कोण–काफरांव्यतिरिक्त–मराठ्यांवांचून दुसरे कोण करणार ! दिल्लीच्या ह्याच मोगलांच्या आणि त्यांच्या आधींच्या इतर मुसलमानांच्या सिंहासनावर अधिष्ठित होणाऱ्यांनींच पृथ्वीवर धर्मसंरक्षक आणि 'गाझी' अशी पदवी प्राप्त व्हावी आणि परलोकांत अप्सरा आणि मदिरा मिळण्यासाठीं पुण्यसंचय व्हावा या हेतूनें हिंदूंचीं देवळें पाडून धुळींत मिळविलीं होतीं, त्यांच्या देवमूर्ति भरडून टाकल्या होत्या, त्यांच्या अंतःपुरांतील राजकन्या आणि राजमहिषी बलपूर्वक पळवून नेल्या होत्या, त्यांच्या कुमारींचें शील आणि तरुणांचा धर्म भ्रष्ट केला होता, आईपासून मुलाची व भावापासून भावाची ताटातूट केली होती, आणि आपले हात आणि हृदयें हिंदुरक्तानें रंगवून घेतलीं होतीं !–आणि आतां तेच हे हिंदु दिल्लीवर येत होते–पण ते मशिदी पाडण्यासाठीं नव्हते, अर्धचंद्र फोडण्यासाठीं नव्हते, थडगीं तुडविण्यासाठीं नव्हते, राजकन्यांवर किंवा भिकाऱ्यांतल्या भिकार मुसलमानी झोंपडींतील शेतकऱ्याच्या गरीब पोरीवरसुद्धां बलात्कार–बलात्कार दूरच, पण नुसता स्पर्शही–करण्यासाठीं नव्हते, मुलापासून आईला किंवा बापापासून मुलाला दूर करून बलपूर्वक धर्मभ्रष्ट करण्यासाठीं नव्हते, आपण केलेल्या विनाशाच्या मदिरेनें झिंगण्याकरितां किंवा रक्तपातानें उन्मत्त होण्याकरितां नव्हते आणि तसेच हत्या केलेल्या आपल्या शत्रूंच्या धडापासून कापलेल्या शिरांच्या उभ्या केलेल्या विकट स्तंभांच्या उंचीनें अथवा शत्रूंच्या जाळपोळ केलेल्या राजधानींतून निघणाऱ्या ज्वालांनीं आपल्या यशाचें महत्त्व मापण्यासाठींही आले नव्हते. त्यांना हें सर्व करतां आलें असतें; आणि त्यांनीं तसें केलें असतें तर

सरते पदीं मुसलमानांना तरी त्यांना दोष देणें शक्य नव्हतें! पण हिंदु केवळ त्याच सिंहासनावर बसणाऱ्या मुसलमानांची आणि त्याच राजधानीची मुसलमानांच्याच हातून होणाऱ्या बीभत्स आणि राक्षसी अत्याचारापासून आणि छळापासून मुक्तता करण्यासाठीं धावून येत होते! मराठ्यांनीं यावें म्हणून राजधानींत प्रार्थना होत होत्या आणि हिंदुसाम्राज्याच्या सैन्यानें नगरवेशींतून प्रवेश करतांच सर्व नागरिकांनीं—मुसलमानांनीं आणि हिंदूंनीं—अत्यंत अंतःकरणपूर्वक त्यांचें प्रचंड स्वागत केलें. अलिजाबहादर, आप्पाखंडेराव, राणाखान आणि डी बॉयन ह्यांनीं राजधानी हातांत घेतली; पण त्यांना अपराध्यांचा नायक जो गुलाम कादर तो केव्हांच तेथून निघून गेल्याचें आढळून आलें. गुलाम कादर म्हणजे नजीबाचा नातू, मराठ्यांचा वंशपरंपरेचा शत्रु. त्याच्या अनेक अपराधांना योग्य असें शासन भोगल्याविना आतां त्याची सुटका होणें अशक्य होतें. दिल्लीच्या बादशहानें थोड्या दिवसांपूर्वींच मराठ्यांच्याविरुद्ध कारस्थान रचलें होतें आणि ह्याच गुलाम कादरशीं त्याचा आजा जो नजीबखान त्यानें मराठ्यांच्याविरुद्ध पानिपतला जसें मुसलमानांचें कूट उभारलें होतें तसेंच कूट उभारण्यासाठीं संगनमत केलें होतें. तरीही मराठ्यांनीं माणुसकीला स्मरून औरंगझेबाच्या वंशजाचीही त्याच्या मुसलमानांच्याच अत्याचारी हातांतून सोडवणूक करण्यासाठीं शक्य तें तें केलें! त्यांनीं गुलाम कादरवर सैन्याची एक मोठी तुकडी पाठवून दिली. गुलाम कादरनें आतां मीरतच्या दुर्गाचा आश्रय केला होता. त्यानें चिकाटीनें दुर्ग झुंझवायला प्रारंभ केला; पण मराठ्यांच्या पुढें अधिक दिवस तग धरणें शक्य नव्हतें. तेव्हां तो घोड्यावर स्वार झाला आणि पळूं लागला. पण मराठ्यांनीं पाठलाग करतांच त्या गडबडींत घोड्यावरून खालीं घसरला आणि बेशुद्ध स्थितींत रणक्षेत्रावर पडला. तेथें जाणाऱ्या येणाऱ्या शेतकऱ्यांनीं त्याला ओळखून मराठ्यांच्या सेनानिवासांत पोंचतें केलें. ह्या मानवी राक्षसाला सगळ्यांना धाक बसेल अशी अत्यंत कडक शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी करण्यांत मुसलमान जनताच सर्वांच्या पुढें होती! गुलामच्या घराण्याचें तीन पिढ्यांचें ज्याच्याशीं उभें वैर होतें त्या महादजी शिंद्यांच्या समोर त्या नराधमाला आणण्यांत आलें. गुलामाला आतां आपल्या सर्व दुष्कृत्यांचें प्रायश्चित्त भोगावें लागलें. दुसऱ्यांना दिलेल्या पीडेची कल्पना येण्यासाठीं त्याचे अवयव छिन्नविच्छिन्न करण्यांत आले आणि

तरीही त्याच्या तोंडांतील अभद्र गालिप्रदानाला खळ पडत नाहीं हें पाहून त्याची जीभ आणि डोळे ओढून काढून भोंसकण्यांत आलें. इतकें झाल्यावर भयंकर विद्रूप झालेल्या त्या नजीबाच्या नातवाला–गुलाम कादरला, बादशहाकडे पोंचविण्यांत आलें. कारण ज्या मानवी राक्षसानें आपला इतका भयंकर रीतीनें छळ केला त्याला तितकेंच भयंकर शासन मिळून त्याचा अंत झालेला पहावयाला बादशहा अत्यंत उत्सुक झाला होता. अशा रीतीनें ज्या नजीबखानानें पानिपतावर मराठ्यांचा निःपात करण्याची प्रतिज्ञा केली होती त्याच्याच वंशाचा मराठ्यांकडून पूर्ण निःपात झाला. त्याचें किंवा त्याच्या राज्याचें चिन्हसुद्धां मागें राहिलें नाहीं.

शके १७११ (इ.सन १७८९) पर्यंत महादजींनीं इतर मराठी सेनानायकांच्या साहाय्यानें आपले सर्व प्रतिस्पर्धी वठणीवर आणले. मुसलमानी व्यूह ढासळून पाडला. त्याच्या रजपूत साहाय्यकांचें पारिपत्य केलें आणि चूप बसणें हेंच शौर्याचें मुख्य अंग आहे असें वाटावयास लागावें इतकी इंग्रजांना आपल्या शक्तीची चुणूक दाखवून खालीं मान घालावयास लावलें. वृध्द बादशहा पुन्हा पूर्ण स्वाधीन झाला आणि त्यानें बादशाहींतील वकील-इ-मुतालीक ही सर्वांत वरच्या अधिकाराच्या स्थानाची पदवी आणि महाराजाधिराजपदाचा मान महादजींना द्यावयाची पुन्हा इच्छा दाखवितांच महादजींनीं ती आपले धनी जे बालपंतप्रधान त्यांचा मान राखण्यासाठीं स्वतःकरितां नाकारली ! व त्याचे स्वामी–पंतप्रधान यांचे नांवानें ती पदवी स्वीकृत केली.

पण अशा रीतीनें मराठ्यांची सेना उत्तरेकडे पूर्णपणें गुंतली असतां टिपूनें पुन्हा एकदां हात चालवून बघावयाचा विचार केला. शके १७०९ (इ. सन १७८८) मध्यें त्यानें आपलें स्वरूप प्रकट केलें. पण ह्या वेळीं मराठ्यांच्या स्वतःच्या प्रदेशावर चालून जाऊन त्यांचा राग ओढून घेण्यापेक्षां त्यानें अन्य मार्ग पत्करला. मराठ्यांच्या वावरीमुळें कृष्णेच्या बाजूला आपलें राज्य वाढविणें त्याला कठिण झालें होतें. तेव्हां आपल्या दुर्बळ शेजाऱ्यावर–त्रावणकोरच्या हिंदु राजावर–स्वारी करून त्यानें आपला राज्यविस्तार करावयाचा विचार केला. तेव्हां नानांनीं इंग्रज आणि निजाम ह्यांच्यांशीं मैत्री जोडून टिपूविरुद्ध युद्धाची घोषणा केली आणि पटवर्धन त्याच्या राज्यावर चढाई करून गेले. मराठे जसजसे पुढें जाऊं लागले तसतसे वाटेवरील प्रदेशांतील लोक म्हैसूरच्या ह्या धर्मांध प्रजापीडकाच्या विरुद्ध त्यांना येऊन

मिळाले. टिपूच्या अधिकाऱ्यांना आणि लोकांना घालवून देण्यांत मराठ्यांशीं सहकार्य केलें आणि थकलेला सारा गोळा करावयाला साहाय्य केलें. ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. हुबळी, घोडवड, मिसरीकोट जिंकून मराठे अजिंक्य बलानें पुढें चालूं लागले. टिपूच्या हातांत थोड्या दिवसांपूर्वी पडलेल्या धारवाडला वेढा पडला. तेथल्या मुसलमान दुर्गपालानें नेटानें प्रतिरोध केला. मराठी सेनापतीनें नको म्हणून सांगितलें असतांही इंग्रजांनीं मोठ्या तोऱ्यानें मारा करून दुर्ग घ्यावयाचा प्रयत्न केला, पण त्यांत त्यांची पूर्ण विटंबना झाली. दोन्ही बाजू इरेला पेटल्या आणि झगडा तसाच चालू राहिला. सरते शेवटीं मराठ्यांनीं शौर्याची आणि कौशल्याची पराकाष्ठा करून माऱ्यावर मारे चढविले आणि गड हस्तगत केला. पानसे, रास्ते आणि दुसरे मराठी सेनानायक तुंगभद्रेच्या पार झाले आणि त्यांनीं सांती, बदनूर, माइकोंडा, हपेनूर, मेनगिरी इत्यादि शत्रूंचीं ठाणीं जिंकून घेतलीं. मराठ्यांचें नाविक दलही स्वस्थ बसलें नव्हतें. तें समुद्रकांठाचें संरक्षण करीत होतें. कांठानेंच चाल करून त्यानें कारवार आणि हंसरमधल्या निरनिराळ्या स्थानांहून मुसलमान अधिकाऱ्यांना काढून लाविलें. नरसिंगराव देवजी, गणपतराव मेहेंदळे इत्यादि मराठी सेनानायकांनीं चंदावर, होनावर, गिरिसप्पा, धरेश्वर व उदगिनी हीं नगरें घेतलीं आणि मग मराठ्यांची सेना प्रत्यक्ष श्रीरंगपट्टणवर चाल करून निघाली. कॉर्नवालीसच्या हाताखालीं इंग्रजी सैन्यही दुसऱ्या दिशेनें तेथेंच येत होतें. पण ह्या वेळीं टिपूच्या हालचालींच्या योगानें तें उपासमारीनें इतकें त्रासून गेलें होतें कीं, त्यांना प्रतिदिनीं एकदांही पुरेसें अन्न मिळेना. त्यांच्या घोड्यांना दाणाचारा न मिळाल्यानें त्यांनीं भराभर प्राण सोडले आणि त्यामुळें त्यांच्या घोडदळाचें आपोआपच पायदळ सैन्य झालें होतें! अशा असहाय आणि बुभुक्षित स्थितींत इंग्रजी सैन्य असतांना जेव्हां त्यानें मराठी सैन्याचीं पथकेंच्या पथकें जीवनाला आवश्यक असलेल्या सर्व गोष्टींनींच नाहीं तर विलासाच्याही वस्तूंनीं भरलेले हाटच समवेत घेऊन आपल्याकडे येतांना पाहिलीं तेव्हां त्यांना झालेल्या आनंदाचें वर्णन कोठवर करावें! हरिपंत फडक्यांनीं अत्यंत काळजीपूर्वक विचारपूस करून आपल्या मित्रांच्या सर्व उणीवा दूर केल्या. मित्रांचीं सैन्यें दहा दिवस एकत्र राहिलीं. त्या वेळीं मराठ्यांनीं तसें मनांत आणलें असतें तर त्यांनीं टिपूचें राज्य इतकें निर्मूल करून टाकलें असतें, कीं जगांत त्याचें चिन्हही राहिलें नसतें. पण नानांचें धोरण टिपूला पूर्णपणें नाहींसें करा-

-जयाच्या विरुद्ध होतें. मद्रासकडील इंग्रजांच्या महत्त्वाकांक्षी कारस्थानांना आळा बसविण्यासाठीं त्यांना तो आणखी थोडे दिवस राहावयाला पाहिजे होता. म्हणून आणखी कांहीं चकमकी उडाल्यावर आणि इंग्रजांकडून व मराठ्यांकडून टिपूला खरपूस मार मिळाल्यावर जेव्हां टिपू दातीं तृण धरून शरण आला तेव्हां परशुरामभाऊ आणि हरिपंत फडके ह्यांनीं मध्यें पडून त्याच्याशीं संधि करण्यासाठीं इंग्रजांचें मन वळविलें. ह्या संधीच्या योगानें टिपूला आपलें अर्धें राज्य मराठ्यांच्या स्वाधीन करावें लागलें. तीन कोट रुपयांची भरपाई करावी लागली आणि त्रावणकोरच्या हिंदु राज्याला अतःपर त्रास न देण्याचा करार करावा लागला. मित्रराष्ट्रांनीं संधीच्या पालनार्थ टिपूचे दोन मुलगे बंधक म्हणून घेतले. मिळालेला भाग तिन्ही मित्रांनीं सारखा वांटून घेतला. त्यांत मराठ्यांना ९० लक्ष वार्षिक उत्पन्नाचा विस्तीर्ण प्रदेश मिळाला आणि हानिभरपाईच्या त्यांच्या वांट्याचे म्हणून एक कोट रुपये मिळाले ! येणेप्रमाणें टिपूबरोबरचें तिसरें युद्ध समाप्त झालें आणि मराठी सैन्य सन्मान आणि युद्धनैपुण्यासाठीं प्रख्याति संपादून परत शके १७१४ मध्यें राजधानीला येऊन पोंचलें.

पण तितकाच उज्ज्वल सन्मान संपादून आणि अधिक दिपवून टाकणारे समरविजय मिळवून मराठी साम्राज्याचे उत्तरेकडील सेनापतिही ह्याच वेळेला महाराष्ट्राच्या राजधानीकडे आपला मार्ग क्रमीत होते. ह्या दोन प्रचंड सैन्यांच्या मीलनाच्या दृश्यानें एकीकडून ज्यांनीं दक्षिणेचा विजय केला आणि तेथल्या हिंदु जनतेची टिपूच्या धर्मांध क्रौर्यापासून मुक्तता केली ते फडके व रास्ते; दुसरीकडून ज्यांनीं उत्तर दिशा पादाक्रांत केली, दिल्लीच्या बादशहाला हिंदु साम्राज्याचा केवळ वेतनग्राही आश्रित बनविला आणि इंग्रज, फ्रेंच, पठाण व रोहिले ह्यांच्या डोळ्यांसमोर एक नांव सोडून सर्व प्रकारें चक्रवर्तिपद धारण केलें ते महादजी शिंदे; ह्यांच्या दोन प्रचंड सैन्यांच्या पुण्याला होणाऱ्या मीलनाच्या दृश्यानें—हिंदुस्थानांतील आणि बाहेरील सर्व परकीय सत्ता गोंधळून गेल्या आणि आपला पुढें निभाव कसा लागणार ह्या विवंचनेंत पडल्या ! हीं दोन्ही सैन्यें कोणच्या उद्देशानें एक होत आहेत ! समर्थ महाराष्ट्र-मंडळ ह्यापुढें कोणचें कार्य हातांत घेणार, कोणाविरुद्ध आतां त्याची दृष्टि वळणार आणि कोणाला त्याच्या भक्ष्यस्थानीं पडावें लागणार ? हिंदुस्थानांतले सर्व डोळे पुण्याकडे लागून राहिले; कारण

आतां दिल्ली गणतींतच राहिली नव्हती ! दिल्ली म्हणजे पुण्याची उपनगरी झाली होती !—पण महाराष्ट्र स्वतः अगदीं विरुद्ध प्रकारच्या आशंकांनीं अस्वस्थ झालें होतें ! दोन महापुरुष—नाना आणि महादजी—समोरासमोर आले होते ! ह्या दोन देशभक्त पुरुषांतील दाबून ठेवलेल्या स्पर्धेच्या वृत्तीचें हळुहळू पण निश्चयानें एकमेकांविषयींच्या भीतींत पर्यवसान होत होतें हें सर्वांना माहीत झालें होतें. महाराष्ट्राच्या अनेक पिढ्यांनीं जें हिंदुसाम्राज्य स्थापीत आणलें होतें; आणि ज्याच्या संरक्षणासाठीं व ज्याच्या शक्तीची व वैभवाची वाढ करण्यासाठीं ह्या दोघां पुरुषांइतके दुसऱ्या कोणच्याही जोडीनें पूर्ण चित्तानें परिश्रम केले नव्हते, त्या मराठ-मंडळाच्या हिंदुपदपादशाहीविषयीं ह्या दोघांच्या मनांत जी सारखीच उदात्त भक्ति आणि प्रीति होती त्यामुळेंच ही भावना आतांपर्यंत दबून राहिली होती. त्या निग्रहित स्पर्धेच्या वृत्तीचा एकदम स्फोट होऊन तिचें आतां उघड वैरांत रूपांतर होईल काय ? तसें झालें तर हिंदुसाम्राज्याचें दुर्दैवच ओढवलें ! सर्व महाराष्ट्र ह्या आशंकेनें कंपित झालें होतें; आणि महाराष्ट्राच्या योद्धयांचा अग्रगण्य आणि महाराष्ट्राच्या राजकारणधुरंधरांचा अग्रगण्य ह्या दोघांमधील त्या भारती सामन्याकडे साशंक चित्तानें, पण सर्व लक्ष्य लावून पहात बसलें होतें !

ज्याला मराठ्यांनीं अद्यापि बादशहा हें अभिधान धारण करण्याची मोकळीक ठेवली होती त्या वृद्ध मोगलानें त्याच्या हातांतील सर्वश्रेष्ठ अशी वकील-इ-मुतालीक आणि महाराजाधिराज ह्या पदव्या आणि सन्मान महादजींना अर्पण करावयाची इच्छा कशी प्रदर्शित केली आणि महादजींनीं तो मान आपल्यासाठीं स्वीकारण्याचें नाकारून आपले स्वामी जे पुण्याचे पंतप्रधान त्यांच्यासाठीं त्या पदव्या कशा संपादन केल्या हा वृत्तान्त पूर्वी सांगितलाच आहे. हें पदवीदान म्हणजे कांहीं पोकळ प्रदर्शन नव्हतें. असमर्थ आणि अयोग्य अशा राजसभासदांच्या हातांत ह्या पदव्यांचें जरी ज्या चर्मपत्रांवर त्या लिहिल्या गेल्या होत्या तितकेंही मूल्य नव्हतें, तरी मराठ्यांच्या हातांत केवळ पोकळ ध्वनींच्या शब्दांप्रमाणें त्या राहणें शक्य नव्हतें. त्या धारण करणाराला त्यांच्यामुळें बादशहाच्या नांवानें प्रत्यक्ष साम्राज्यकारभार चालविण्याचा पूर्ण अधिकार मिळाला होता; वस्तुतः त्या पदव्या म्हणजे बादशहाच्या वतीनें दिलेलें चक्रवर्तिपदाचें त्यागपत्र होत्या ! हिंदुस्थानच्या सार्व-

भौम मुकुटाच्या प्राप्तीसाठीं इंग्रज, इतर हिंदु राज्यें आणि मराठे ह्यांच्यामध्यें जी स्पर्धा चालली होती तिजमुळें तो सार्वभौम मुकुट आणि तदंगभूत बिरुदावली नांवापुरत्याच कां होईना; पण वृद्ध मोगलाकडे ठेवणें अवश्य झालें होतें. त्याच्यापासून त्या काढून घेण्यासाठीं तसें मनांत आणण्याचा अवकाश होता. पण एकदां का ह्या पदव्या आपण मराठ्यांच्या हातांत जाऊं दिल्या कीं ते आपल्या आटोक्याच्या पार पलीकडे गेलेच! ही गोष्ट इंग्रजांना आणि मुसलमानांना पक्की माहीत होती आणि म्हणून जीर्ण मोगलाईच्या सोंगापुढें ऊद जाळण्याचे प्रयत्न त्यांनीं ईर्षापूर्वक चालू ठेविले होते व केवळ मराठ्यांच्या असूयेनें त्याला बादशहा मानण्याचें नाटक होत होतें. हिंदुस्थानच्या बाह्य व्यवहारांत ही प्रवृत्ति कशी प्रबळ होती हें पहावयाचें असेल तर स्वतःच्या मनगटाच्या बळाच्या अधिकारावर इंग्रजांनीं कधींच गट्ट केलेला 'नार्दर्न' सरकारप्रांत आपल्या स्वाधीन ठेवण्याचें अनुमतिपत्र शहाआलम बादशहाकडून मिळविण्यासाठीं त्यांनीं जी धडपड केली ती पाहिली म्हणजे स्पष्ट दिसतें. तेव्हां मराठेही प्रत्यक्ष मूळ गड्डा पूर्णपणें हस्तगत करून बसल्यानंतरही दीर्घ कालपर्यंत त्या वृद्ध मोगलाच्या नांवाला जी बादशाही वैभवाची केवळ छाया चिकटून राहिली होती, तिच्यापासून शक्य तितका लाभ करून घेण्यांत आपल्या प्रतिस्पर्ध्यांच्या यत्किंचितही मागें नसत, आणि म्हणूनच महादजींनीं बादशहाला मराठ-मंडळाचे प्रमुख जे पंतप्रधान त्यांना महाराजाधिराज आणि वकील–इ–मुतालीक ह्या पदव्या आणि अधिकार द्यावयाला लाविलें होतें. आणि आतां उत्तरेकडील इतक्या दिवसांच्या उज्ज्वल आयुष्यक्रमानंतर घराच्या ओढीनें आणि आपल्या बालस्वामींची तारुण्यांत पदार्पण केलेली देवमूर्ति पाहाण्याच्या उत्कंठेनें सर्व अंतर चालून पुण्याला आल्यावर पहिल्या प्रथम त्यांना ह्या पदव्या आणि बादशाही अधिकार मोठ्या समारंभानें आणि उत्सव करून अर्पण कराव्या असा महादजींनीं विचार केला.

पण ह्याप्रमाणें मराठ्यांचे सेनापति पंतप्रधानांना 'महाराजाधिराज'–राजांचा राजा–जी पदवी त्यांनीं नांवानें नसली तरी प्रत्यक्ष कृतीनें मिळवलीच होती–ती पदवी आणि तिचीं वस्त्रें समारंभानें अर्पण करावयाला आतुर झाले असतां तिकडे त्यांचेच ब्राह्मण कारभारी नाना फडणीस ह्यांनीं तसें करणें हें साताऱ्याच्या छत्रपतींना कमीपणाचें आहे, असें म्हणणाऱ्या विरोधक पक्षाचें पुढारीपण

स्वीकारलें होतें. एका स्वतंत्र राज्यांतील नागरिकांनींच नव्हे तर प्रत्यक्ष अधिकाऱ्यांनीं दुसऱ्या राजसत्तेकडून आणि त्या राजसत्तेच्या हाताखालींही केवळ मानाच्या जागाच नाहीं तर चाकऱ्यासुद्धां मिळवल्याची, केल्याची आणि त्या आपल्या राज्याशीं अराजनिष्ठ किंवा विश्वासघातकी न होतां इतकेंच नाहीं तर कधीं कधीं त्यांचें हित साधण्याच्या स्पष्ट हेतूनें आणि उद्देशानें केल्याचीं कित्येक उदाहरणें देतां येतील. तरीही राष्ट्रीय भावना यत्किंचितही दुखवल्या जाऊं नयेत म्हणून महादजींनीं मराठ्यांचे छत्रपति, साताराचे महाराज ह्यांच्याकडून ह्या समारंभासाठीं अनुज्ञा मागितली आणि ती तेव्हांच मिळालीही. अशा रीतीनें राजघटनाविषयक अडचण दूर होतांच तो भव्य समारंभ अत्यंत थाटानें साजरा करण्यांत आला आणि वकील-इ-मुतालीकचीं वस्त्रें आणि पदवी वंशपरंपरेनें आणि अविभाज्य व सदैव अशा रीतीनें त्यांच्याच कुटुंबांत नित्य चालण्यासाठीं विधिपूर्वक अर्पण करण्यांत आलीं. आतां ह्यापुढें पंतप्रधानांना बादशहाच्या नांवानें वाटेल तें करण्याचा अधिकार आला, इतकेंच नाहीं तर त्यांचे सेनापति महादजी ह्यांना बादशहांच्या अनेक मुलांपैकीं बादशहा म्हणून कोणाला गादीवर बसवावयाचें ही निवड करण्याचासुद्धां अधिकार मिळाला! नंतर अखिल हिंदुस्थानांत कोठेंही गोवध किंवा वृषवध करावयाला प्रतिबंध करणारें महत्त्वाचें आज्ञापत्र वाचून दाखविण्यांत आलें. शिंद्यांनीं, नानाफडणविसांनीं आणि पंतप्रधानांच्या इतर अधिकाऱ्यांनीं त्यांना अभिनंदनाचीं राजोपायनें अर्पण केलीं. आतांपर्यंत आशियांतील आणि युरोपांतील मराठ्यांच्या प्रतिस्पर्ध्यांनीं केवळ मराठ्यांना तुच्छ करण्यासाठीं हिंदुस्थानांतील सर्व नैर्बंधिक आणि घटनात्मक सत्तेचें एकमेव अधिष्ठान आणि उगमस्थान म्हणजे दिल्लीचा बादशहा आहे असें दाखविण्याचें ढोंग चालविलें होतें. आतां त्या प्रतिस्पर्ध्यांच्या असूयेच्या उरांत भोंसकण्यासाठीं निर्वाणीचें शस्त्र मराठ्यांनीं नित्याचें आपल्या हातांत घेतलें. आजपर्यंत आचरणांत मराठे असे करीतच आले होते पण आतां राज्यघटनेप्रमाणेंही हिंदुस्थानच्या बादशहाच्या जागीं नव्हे, प्रत्यक्ष बादशहा म्हणूनच, आपल्याला मानलें पाहिजे असा अधिकार ते सांगूं लागले आणि त्याप्रमाणें वागावयाचेंही त्यांनीं ठरविलें. सार्वभौम सैन्याचे ते सेनापति होते, साम्राज्याचे ते मुख्य वजीर होते. गादीचा अधिकारी निवडण्याचा अधिकार त्यांचा होता; आणि सर्वांहून विशेष म्हणजे कधींही काढून घेतां

येणार नाहींत अशा रीतीनें ते वंशपरंपरेनें 'महाराजाधिराज' आणि 'वकील–इ–मुतालीक' झाले होते.

पण एकदां तो समारंभ आटोपल्यावर लोकांचा विस्तीर्ण समुदाय शनिवारवाड्याकडे परत निघालेली जनयात्रा पाहण्यासाठीं एकत्र झाला. लोकांच्या जयगर्जनांनीं, तोफांच्या गडगडाटांनीं, बंदुकांच्या निनादांनीं हा राजकीय समारंभ करणारांच्या मनांत असलेल्या इच्छेप्रमाणें इष्ट तो परिणाम घडवून आणिला. जनयात्रा शनिवारवाड्याशीं आल्यावर आणि पंतप्रधानांनीं महादजींचा—हिंदु साम्राज्याच्या मुख्य सेनापतीचा—उलट विशेष सन्मान केल्यावर महादजींनीं सर्व राजचिन्हें आणि मानाचीं वस्त्रेंभूषणें काढून ठेवलीं. ते एकटेच पुढें झाले आणि पेशव्यांचे जोडे हातांत उचलून हळूच म्हणाले, "स्वामी—महाराज, राजपुत्र आणि संस्थानिक, राजे आणि राणे, मोगल आणि तुर्क, रोहिले, मुसलमान आणि फिरंगी सर्व पराभूत होऊन आपले हिंदु साम्राज्याच्या एकमेव स्वामींचे—आशंकित सेवक बनले आहेत. स्वामींच्या ह्या दासानें स्वामींच्या जन्मापासून आपल्या आयुष्याचा बहुतेक भाग मराठमंडळाचें कार्य करण्यांत परक्या भूमींत घालविला. पण जिंकलेल्या राज्यांपासून मिळणारा सर्व मान आणि लाभ, सर्व वैभव आणि सत्ता हीं स्वामींच्या चरणाजवळ असून वाडवडिलांच्याप्रमाणें स्वामींचीं पादत्राणें राखण्याचा मान मिळवण्याची तृषा कमी करूं शकलीं नाहींत! मला, मोगल साम्राज्याचा मुख्य वजीर म्हणण्यापेक्षां लोकांनीं पूर्वीप्रमाणें केवळ 'पाटीलबुवा' ह्या साध्या शब्दानेंच नेहमीं महाराष्ट्रांत संबोधावें अशी मनांत अतिशय उत्कंठा वाटते! तरी स्वामींनीं आतां ह्या दासावरच्या दूर देशांतल्या ह्या मोठ्या घडामोडींचा भार दूर करावा आणि त्याला आपल्या चरणाजवळ राहूं द्यावें! माझ्या वाडवडिलांनीं केली त्याप्रमाणें आपल्या प्रीतींतला चरणांचा दास म्हणून स्वामींची सेवा करण्याची अनुज्ञा असावी."

लाघवी भाषणांत महादजींचा हातखंडा असे. आणि उदारमनस्क पंतप्रधान सवाई माधवराव तरुण, सुस्वभावी व मोकळ्या मनाचे असून राजकारणाच्या गुंतागुंतींतील त्यांची स्वाभाविक मति शिक्षणानें वर्धित झालेली होती. महादजींचें त्यांच्यावर प्रेम आणि निष्ठा होती ह्यांत शंका नाहीं आणि त्यामुळें त्यांनीं लवकरच आपल्या स्वामींचें चित्त आपल्याकडे ओढून घेतलें. एवढें झाल्यावर साहजिकच प्रोत्साहन मिळून सर्व राज्याचे आपणच मुख्य

कारभारी व्हावें, प्रत्यक्ष नानाफडणविसाचाच अधिकार आपल्या हातांत यावा अशी आकांक्षा त्यांच्या मनांत आली. हळुहळू नानांच्या निर्णयाविरुद्ध कांहीं प्रकरणांत त्यांनीं उघडपणें मध्यें हात घातला. आणि पंतप्रधानांना महादजींबरोबर विहारासाठीं नित्य बाहेर जावयाचा नाद लागला होता. तेव्हां अशा एके प्रसंगीं इष्ट संधि साधून त्यांनीं त्यांच्याजवळ बोलण्यांत तशी उघड गोष्ट काढली. पण सुस्वभावी पंतप्रधानांनीं गंभीरपणानें दिलेलें उत्तर ऐकून महादजीही चकित झाले. माधवराव म्हणाले, " हें पहा पाटीलबुवा, नाना आणि महादजी हे माझ्या राज्याचे दोन हात आहेत; त्यांत नाना उजवा हात असून तुम्ही डावा हात आहां आणि आपापलीं कामें करावयाला दोघेही पूर्ण योग्य आहां. दोघांच्या एकत्र साह्यानें सबंध साम्राज्याची भरभराट होत आहे. मी लुला होऊन माझा सर्व नाश झाल्याविना त्यांची उलटापालट करणें किंवा त्यांपैकीं एकाद्याला तोडून टाकणें शक्य नाहीं ! "

महादजींनीं सर्व काळजी घेतली होती; पण नानांच्या गुप्तचराच्या जागरूक आणि सर्वगामी दृष्टींतून इतकें एकांतांतलें हें भाषणही लपून राहूं शकलें नाहीं. वृत्तांत ऐकून नाना, हरिपंत फडके व इतर पुण्यांतील कारभाऱ्यांच्या पक्षांतील अग्रगणींना काळजी वाटूं लागली. ज्याच्या मूर्धस्थानीं पंतप्रधान आहेत अशा महाराष्ट्र-मंडळाच्या हिंदुसाम्राज्याच्या ध्वजेखालीं सर्व हिंदुस्थान एक करण्याचा आणि मंडळाच्या एक एक घटकांनीं स्वतंत्र फुटून निघावयाचा केलेला प्रयत्न हाणून पाडावयाचा त्यांचा सर्व आयुष्यांतील थोर उद्देश ढांसळून पडतो आहे असें दिसूं लागलें. जोंपर्यंत त्यांच्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत तसें झालेलें स्वस्थ पाहत बसणें त्यांना शक्य नव्हतें ! पण ह्यांत ज्या थोर स्थानावर ते आहेत त्या स्थानापासून त्यांना दूर करणें एवढाच प्रश्न असला तर, जरी त्यांच्या मतानें तसें करणें हें राष्ट्रहिताच्या दृष्टीनें अत्यंत अपायकारक होतें तरी आपसांतील युद्ध टाळण्यासाठीं स्थानत्याग करणें हें त्यांचें कर्तव्य होतें ! तेव्हां नानांनीं शक्य तितक्या लवकर पंतप्रधानांशीं ह्या गोष्टीचें स्पष्टीकरण करण्याची संधि साधली. माधवरावांच्या जन्मापासून त्यांनीं राज्याची आणि स्वतः पंतप्रधानांची केलेली विविध सेवा त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आणून शिंद्यांच्या महत्त्वाकांक्षी कारस्थानांनीं पंतप्रधानांनीं जर आपली दिशाभूल होऊं दिली तर तिचे कसे दुष्परिणाम होतील ह्याचें विवरण करणारें भयाण चित्र काढलें. महादजींच्या प्रयत्नांना यश आलें तर त्याचा

परिणाम दिल्लीच्या मोगल बादशहाप्रमाणें पंतप्रधानही त्यांच्या हातांतलें एक बाहुलें बनण्यांत कसा होईल हें त्यांनीं स्पष्ट करून दाखविलें. मराठमंडळाच्या घटनेंत एवढें मोठें परिवर्तन जर एकदम घडवून आणलें तर त्याच्या योगानें आजपर्यंत सर्वांनीं जें थोर साम्राज्य स्थापलें, तें जिच्यांत बुडून नष्ट होईल अशी भयंकर यादवी माजेल; आणि हिंदुसत्ता नष्ट करण्यासाठीं हैदराबादला ज्यांची ह्याचवेळीं प्रचंड सिद्धता चालली आहे त्या मुसलमानांना व मराठ्यां-च्या सर्व प्रतिस्पर्ध्यांत महाराष्ट्राचें हिंदुसाम्राज्य उलथून पाडावयाची महत्त्वा-कांक्षा सिद्धीस नेण्याचें ज्यांच्यांत अधिक सामर्थ्य त्या इंग्रजांना, अनायासें संधि मिळेल. पण त्यांना स्वतःला अधिकारावरून दूर करण्यापुरताच हा प्रश्न असला—जर पंतप्रधानांना नाना कामावर नको इतकेंच वाटत असेल—तर ते वृद्ध आणि श्रेष्ठ कारभारी सद्गदित कंठानें म्हणाले, " **हीं माझीं वस्त्रें परत घ्या. जर त्याच्या योगानें राष्ट्राचें रक्षण होत असेल, अंतर्युद्ध टळत असेल, आणि आपलें मन प्रसन्न होत असेल तर स्वामींनीं यांचा स्वीकार करावा आणि सेवकाला काशीयात्रेला जावयास निरोप द्यावा म्हणजे मी सर्वसंगपरित्याग करून तेथें काळ घालवीन.**" तें भाषण ऐकून तरुण पंतप्रधान गहिंवरून गेले. ज्यानें मराठी साम्राज्य स्थापण्यासाठीं अविश्रांत प्रयत्न करून यश मिळवीत आणलें त्या आपल्या अत्यंत पूज्य कारभाऱ्याची ती करुण विनवणी माधवरावांच्या हृदयांत जाऊन भिनली आणि ते म्हणाले, " तुम्हांला असें कशानें वाटू लागलें ? आजपर्यंत तुम्हीं मला मोठें केलेंत आणि प्रत्यक्ष पितासुद्धां करणार नाहीं इतकें माझ्यावर प्रेम केलेंत. तुम्ही माझे नुसते कारभारीच नसून मार्गदर्शक, मित्र आणि गुरु आहांत. सर्व राज्याचा भार आपल्या खांद्यावर आहे. आपण निघून गेलांत तर तें खालीं पडून उध्वस्त झाल्यावांचून राहणार नाहीं ! " नानाचा स्वर कंपित झाला; " महाराज! आपल्या जन्मापासून—नव्हे आपण गर्भस्थ असल्यापासून—आपल्या राज्याची कर्तव्याला स्मरून सेवा चालविल्यामुळें आणि आपल्या पायाशीं निष्ठा राखल्यामुळें मीं कित्येक शत्रूंचें वैमनस्य संपादन केलेलें आहे. पण आतां ती सेवा स्मरणांतून गेली आहे आणि शत्रु मात्र तसेच राहिले आहेत ! " हे उद्गार ऐकून उदारहृदय श्रीमंतांना अत्यंत दुःख वाटलें; नानांचें सर्व कार्य आठवून त्यांच्याविषयींचें प्रेम बलवत्तर झालें आणि नानांच्या गळ्याभोंवतीं हात टाकून ते स्फुंदून म्हणाले, " मला सोडूं नका आणि

-वाईटही वाटून घेऊं नका. तुम्ही माझे केवळ कारभारीच नाहीं, तर बाल्यापासून तुम्हीं पित्याप्रमाणें मला वाढविलें आहे. माझ्या हातून चूक झाली असेल तर क्षमा करा. मी तुमची अधिकारत्याग करावयाची किंवा सर्वसंगपरित्याग करावयाची कोणचीच गोष्ट ऐकून घेणार नाहीं. मी तुम्हांला कधींही सोडणार नाहीं ! ”

पंतप्रधानांकडून अशा रीतीनें हृदयस्पर्शी आश्वासन मिळतांच हरिपंत फडके आणि कारभाऱ्यांच्या पक्षाचे इतर पुढारी ह्यांनीं महादजींची अशीच अकस्मात् गांठ घेतली. महादजी कितीही महत्त्वाकांक्षी असोत, महाराष्ट्रानें स्थापलेल्या उज्ज्वल हिंदुसाम्राज्याठायीं इतर सहकार्यकर्त्यांच्याइतकीच त्यांची दृढनिष्ठा होती आणि कोणाही अहिंदु शत्रूनें त्यांचा अपमान किंवा नाश करण्याच्या हेतूनें केलेला प्रयत्न मोडून टाकण्यासाठीं आपल्या देहाचा बळी द्यावयाला ते सर्वांच्या पुढें झाले असते. महादजी कांहीं राघोबादादा नव्हते. मराठी साम्राज्याचीं सर्व सूत्रें आपल्या हातांत ठेवण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा असली तरी आपसांत यादवी माजलेली पहावयाला ते सिद्ध नव्हते. त्यांनीं कारभारीपक्षाशीं जुळवून घ्यावयाचें आणि पंतप्रधानांच्या इच्छेप्रमाणें चालावयाचें एकदम मान्य केलें. आपल्या परस्परांतील स्पर्धेमुळें आपल्या शत्रूंचें सामर्थ्य वाढून ज्या हिंदुसाम्राज्यावर आपलें सर्वांचें इतकें प्रेम आहे त्याला अत्यंत हानि पोहोंचल्याविना राहणार नाहीं, हें निश्चित असतां तुम्ही इकडे सर्व कारभार आपल्या हातांत घेण्याचा प्रयत्न चालविला आहे आणि तिकडे नानांनीं हें पाहून आपलें प्रिय राष्ट्र अंतर्युद्धाच्या आपत्तींत लोटण्यापेक्षां जिच्या नुसत्या हालण्यानें नसलेलीं नवीं राज्यें उत्पन्न होतात आणि असलेलीं धुळीस मिळतात अशी आपली समर्थ लेखणी खालीं ठेवावयाचें आणि आपण होऊन अधिकारन्यास करावयाचें ठरविलें आहे. ह्या दोन वर्तनांतील विरोध बोलण्याच्या ओघांत सहजपणें हरिपंत फडक्यांनीं व इतर पुढाऱ्यांनीं महादजींपुढें मांडला. त्याबरोबर त्यांच्या मनावर अतिशय परिणाम झाला आणि अतःपर नाना आणि त्यांच्या पक्षाची मंडळी ह्यांच्याशीं आपण विरोध करणार नाहीं असें त्यांनीं वचन दिलें. इतर पुष्कळ प्रसंगीं अनुभव आल्याप्रमाणें ह्या वेळींही मराठ्यांच्या राष्ट्रीय आणि उदात्त भावनांनीं आपल्या स्वार्थपर प्रवृत्तींवर विजय मिळविला आणि त्या दोघां समर्थ पुरुषांनीं मित्र म्हणून एकमेकांची

प्रेमानें भेट घेतली. पंतप्रधानांच्या पायापाशीं बसून दोघांनींही झालेला प्रसग विसरण्याच्या शपथा घेतल्या आणि दोघांनींही हिंदुधर्माच्या आणि हिंदुपदपादशाहीच्या प्रचाराच्या आणि रक्षणाच्या कार्यार्थ झगड-णाऱ्या थोर राष्ट्रीय महाराष्ट्र-मंडळींची आणि आपल्या धन्यांची आपापल्यां कार्यक्षेत्रांत अखंड सेवा चालू ठेवण्याच्या प्रतिज्ञा केल्या.

ह्या दोघां समर्थ पुरुषांनीं प्रेमानें हस्तांदोलन केल्याची, आपल्या साम्राज्याच्या दोघां अत्यंत प्रमुख पुढाऱ्यांचें एकमेकांविषयींचें मनोमालिन्य नाहींसें झाल्याच्या शुभ प्रसंगाची वार्ता कानांवर पडतांच ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत समग्र महाराष्ट्र आनंदून गेलें. त्यामुळें हिंदुकार्याच्या प्रत्येक हितचिंतकाला किती समाधान वाटलें ह्याची कल्पना ही आनंदकारक वार्ता कळतांच महाराष्ट्राचे अत्यंत बुद्धिवान् आणि देशभक्त राजकारस्थानी पुरुष गोविंदराव काळे ह्यांनीं जें स्फूर्तिदायक पत्र पाठविलें आहे त्यावरून उत्कृष्ट-प्रकारें होते.

"पत्र पाहतांच रोमांच उभे राहिले. अति संतोष झाला. विस्तार पत्रीं किती लिहूं ? ग्रंथच्या ग्रंथ मनांत आले. अटक नदी-च्या अलीकडे दक्षिण समुद्रापावेतों हिंदूंचें स्थान—तुरुकस्थान नव्हे. हे आपली सीमा पांडवांपासून विक्रमाजितपावेतों त्यांनीं राखून उपभोग घेतला. त्यामागें राज्यकर्ते नादान निघाले. यवनांचें प्राबल्य झालें. चकत्यांनीं (बाबरच्या वंशजांनीं) हस्तिनापुरचें राज्य घेतलें. शेवटीं अलमगिराचे करकीर्दीत यज्ञोपवीतास ३॥ रुपये जेजया बसून ओलें अन्न विकत घ्यावें अशी नौबत गुजरली !

त्या दिवसांत कैलासवासी शिवाजीमहाराज शककर्ते व धर्मराखते निघाले. त्यांनीं किंचित् कोन्यांत धर्मरक्षण केलें. पुढें कैलासवासी नानासाहेब व भाऊसाहेब प्रतापसूर्य असे झाले कीं, असे कधीं झाले नाहींत. हल्लीं श्रीमंतांच्या पुण्यप्रतापेंकरून व राजश्री पाटीलबुवांच्या बुद्धि व तरवारीच्या पराक्रमें करून सर्व घरांस आलें. परंतु झालें कसें ? प्राप्त झालें तेणेंकरून सुलभता वाटली. अगर मुसलमान कोणी असते तरी मोठे मोठे तवारिखनामे झाले असते. यवनांच्या जातींत इतकी गोष्ट चांगली झाल्यास गगनाबरोबर करून शोभवावी. आमचे हिंदूंत गगनाइतकी झाली असतां उच्चार न करावा हे चाल आहे.

झाल्या गोष्टी घडल्या. यवनांच्या मनांत कीं 'काफरशाही झाली' असें बोलतात.

"लेकिन ज्यांनीं ज्यांनीं हिंदुस्थानांत शिरें उचललीं त्यांचीं पाटील-बावांनीं फोडलीं. न लाभल्या त्या गोष्टी लाभल्या. त्यांचा बंदोबस्त शककर्त्याप्रमाणें होऊन उपभोग घ्यावे पुढेंच आहे. कोठें पुण्याईत उणें पडेल आणि काय दृष्ट लागेल नकळे. झाल्या गोष्टी ह्यांत केवळ मुलूख, राज्य प्राप्त इतकेंच नाहीं तरी वेदशास्त्ररक्षण, गोब्राह्मण-प्रतिपालन, सार्वभौमत्व हातीं लागणें, कीर्ति यश यांचे नगारे वाजणें, इतक्या गोष्टी आहेत! हे किमया संभाळणें हक्क आपला व पाटीलबुवांचा. त्यांत वेत्यास पडला कीं, दोस्त दुष्मन् मजबूत. संशय दूर झाला. अति चांगलें. अति चांगलें. दुष्मन् उशापायथ्याशीं लागून आहेत. चैन नव्हतें. आपण लिहिल्यावरून मन स्वस्थ झालें."

त्या वेळच्या एका कार्यकर्त्यानें इतक्या सुलभतेनें आणि हृदयंगमपणानें लिहिलेलें हें एकटें पत्र आपल्या इतिहासाच्या आत्म्याचें स्वरूप जितक्या यथातथ्यतेनें दाखवितें तितकेंच पाठीमागून लिहिल्या गेलेल्या शेंकडों कंटाळवाण्या ग्रंथांनींही दाखविलें गेलें नाहीं!

पण ह्याप्रमाणें, आशा, आशंकांचें लोकांच्या मनांत तुमुल युद्ध चाललें असतां महादजी नवज्वरानें आजारी पडले आणि पुण्याजवळ वानवडी येथें आपल्या सेनानिवासांत शके १७१५ माघ शुद्ध १३ ला (ता. १२ फेब्रुवारी १७९४) मरण पावले; त्यांच्या मृत्यूनें सर्व महाराष्ट्र शोकसागरांत बुडालें! ह्याप्रमाणें मराठ्यांच्या सर्वांत बलिष्ठ सेनापतीचा आणि नेत्याचा मृत्यु होतांच त्याच्या शत्रूंच्या त्यांच्या राज्याविरुद्ध कारस्थानांना पुनः स्वाभाविकपणें प्रारंभ झाला. ह्या भयंकर आघातानें मराठ्यांची कंबरच मोडली असावी अशी त्यांची वेडी समजूत झाली आणि त्यांतून मराठे सांवरण्यापूर्वींच त्यांच्यावर मारा करावयाला ते उत्सुक झाले; ह्या शत्रूंपैकीं अलीकडे हैदराबादच्या निजामानें ज्या हिंदुसत्तेनें त्याला पिढ्यान् पिढ्या आपल्या दाबांत ठेवलें होतें आणि आपला केवळ एक मांडलिक बनविला होता; त्या मराठ्यांच्या राज्यावर भयंकर प्रतिशोध उगविण्यासाठीं मोठी सिद्धता चालविली होती! त्याच्या जवळ पूर्वी राखीव अशा दोन शिकलेल्या सैन्याच्या तुकड्या होत्या. तेथें त्यानें आतां कर्तृत्ववान् फ्रेंचअधिकाऱ्यांच्या हाताखालीं तेवीस पायदळाच्या तुकड्या

ठेवल्या ! त्याचा प्रधान मशीर उल्मुल्क महत्त्वाकांक्षी होता; महादजीच्या नेतृत्वाखालीं मराठयांनीं धारण केलेला चक्रवर्तिपणाचा अधिकार आणि सत्ता त्याला अगदीं सहन झालीं नाहींत. राजशासकांच्या प्रोत्साहनानें तेथील मुसलमानी प्रजेच्या अंगांत युद्धाचा ज्वर चढला, आणि ते हाटांहाटांतून आणि सर्व जनसंमर्दांतून आतां लवकरच पुण्यावर सद्धर्मनिष्ठांची अर्धचंद्रांकित ध्वजा फडकणार आणि काफरशाहीचा—हिंदूंच्या राज्याचा—पूर्णपणें अंत होणार अशा बढाईच्या गोष्टींची उघडपणें चर्चा करूं लागले. शेवटीं निजामाच्या प्रधानाचें उर्मटपणाचें वर्तन ह्या थराला गेलें कीं, मराठयांचे तेथील प्रतिनिधींनीं चौथाईच्या पैशांची मागणी करतांच ही मागणी समजवून देण्यासाठीं प्रत्यक्ष नानानें हैदराबादला आलें पाहिजे असें त्यानें सांगितलें ! इतकेंच नाहीं तर पुढें जाऊन 'नाना स्वतः आला नाहीं तर मी लवकरच त्याला धरून आणीन ' असे बाष्कळपणाचे उद्गार त्यानें काढले ! गोष्टी युद्धापर्यंत यावयाला ह्या उद्धट वल्गना पुऱ्या पडणार नाहींत असें वाटूनच कीं काय, निजामानें राजसभेपुढें एक प्रहसन करविलें आणि त्यासाठीं परराज्यांच्या सर्व प्रतिनिधींना बुद्ध्या होऊन आमंत्रण दिलें. तेथें सर्व लोकांसमक्ष आपल्या मानकऱ्यांकडून व हस्तकांकडून नानाचीं आणि सवाई माधवरावांचीं प्रत्यक्ष पंतप्रधानाचीं सोंगें दाखविण्यांत आलीं आणि तीं पाहून मोगली राजसभा हंसूं लागली ! लागलीच निजामाच्या राजसभेंतील मराठयांचे प्रतिनिधि गोविंदराव पिंगळे आणि गोविंदराव काळे उठून उभे झाले आणि त्यांनीं त्यांच्याशीं केलेल्या ह्या उद्धट वर्तनाचा सणसणीत निषेध केला ! तेजस्वी गोविंदराव काळे शेवटीं म्हणाले, " मशीर उल्मुल्क, लक्षांत ठेवा ! महाराष्ट्राचे कारभारी नाना फडणवीस ह्यांना आपल्या राजसभेंत ओढून आणण्याच्या बढाया तूं अनेकदां मारल्या आहेस. आज तूं आमच्या प्रत्यक्ष स्वामींचें सोंग आपल्या हस्तकांकडून आणलें आहेस ! आतां माझीही प्रतिज्ञा ऐक. जर मराठ्यांनीं तुला जिवंत धरून तुझी धिंड हिंदुसाम्राज्याच्या राजधानीच्या - पुण्याच्या - रस्त्यारस्त्यांतून काढली नाहीं तर हा गोविंदराव काळेच नाहीं ! " असें भाविष्यगर्भ उद्गार काढून मराठ्यांच्या राजप्रतिनिधींनीं निजामाची सभा सोडली; ते पुण्याला आले आणि युद्धाची सिद्धता करावयाला विनंति केली. मध्यस्थीचा आव आणून दोन्ही पक्षांत समजूत करून देतों अशी इंग्रजांनीं लुडबूड करावयाचा प्रयत्न केला. पण त्यांना अशी थप्पड मिळाली कीं, मराठयांच्या

कारभारांत हात घालावयाची कल्पनाही त्यांना सोडून द्यावी लागली. निजामानें पुष्कळ विनवण्या केल्या पण मराठयांच्याविरुद्ध बोट वर करावयाचें त्यांचें धैर्य झालें नाहीं! तेव्हां निजामानें आपल्याकडून युद्धाची मोठी सिद्धता चालविली. राज्यांतील मुसलमानी प्रजेच्या धर्मभावना उद्दीपित करून त्यांचीं मनें बिघडविण्यांत आलीं. जो तो मुसलमान धर्मयुद्धाच्या–जिहाद करण्याच्या–गोष्टी बोलूं लागला आणि ह्या कार्यांत जवळ दूरच्या सर्व मुसलमानांची सहानुभूति मिळविण्यांत आली! 'सद्धर्मानुयांया'च्या सेनेकडून पुणें लुटून जाळून टाकण्याचा निश्चय झाला! पण सामान्य जनतेच्या ह्या बढाया त्यांचा दिवाण मशीर उल्मुल्क जो प्रसिद्धपणें दर्पोद्गार काढीत होता त्याच्यापुढें कांहींच नव्हत. तो आवेशानें म्हणाला, " ह्या दुष्ट मराठयांच्या हातांतून मोगलांची एकदांची आणि नित्याची सुटका करण्याची मीं प्रतिज्ञा केली आहे. त्यांच्या मुख्याला–तरुण ब्राह्मण पंतप्रधानाला–लंगोटी नेसवून हातीं भोपळा देऊन काशीच्या गंगेच्या कांठावर दारोदार भीक मागण्यासाठीं धाडल्यावांचून मी स्वस्थ बसणार नाहीं! "

ह्याप्रमाणें हैदराबादच्या प्रधानानें मन मानेल तशा वल्गना व बढाया चालविल्या होत्या त्याच वेळीं पुण्याचा कारभारी शांत डोक्यानें आपल्या सैन्याची जुळणी करित होता आणि पुढच्या युद्धाचे बेत रचीत होता. मराठयांचे सर्वांत बलिष्ठ सेनापति आणि सरदार महादजी शिंदे निवर्तले होते. तरीही मराठयांनीं प्रसंगाला तोंड देण्याची सिद्धता केली. ह्या प्रसंगीं नानांची अद्वितीय बुद्धिमत्ता आजपर्यंत कधींही नसेल इतक्या उज्वलतेनें चमकली. त्यांचें आपल्या लोकांवरील वर्चस्व आजपर्यंत केव्हांही नसेल, इतक्या पूर्णपणें निदर्शनास आलें. चौखूर पसरलेल्या विस्तीर्ण मराठी साम्राज्याच्या दूरदूरच्या राजधानींतील सैन्यें त्यांच्या शब्दानें हालूं लागलीं. एकमेकांशीं नेहमीं तेढीनें वागणारे मराठ-मंडळाचे घटक त्यांच्या चातुर्यानें एकरूप बनले. मराठयांच्या राष्ट्रीय जगप्रसिद्ध युद्धध्वजा–जरीपटका आणि भगवाझेंडा–पुण्याला उभारण्यांत आल्या आणि हिंदुपदपादशाहीच्या त्या मूर्तिमंत आशेच्या भोंवतीं महाराष्ट्राचें सैन्य जवळून आणि दुरून चारी दिशांनीं एकत्र जुळूं लागलें. महादजी शिंद्यांचे उत्तराधिकारी दौलतराव शिंदे ह्यांना आग्र्याचे विजयवीर जीवबादादा बक्षी आणि ज्यांनीं सर्व उत्तर–पठाण, रोहिले, तुर्क–पादाक्रांत केली ते, त्यांचें सैन्य व सेनानायक ह्यांच्यासह तेथें पाचारण

करण्यांत आलें. तुकोजी होळकर आपल्या सर्व शिलेदार–बारगिरांसह तेथें आधींच आले होते. आपलें बलिष्ठ घोडदळ घेऊन रघूजी भोंसले नागपुराहून निघाले. ह्या राष्ट्रीय प्रसंगांत लढण्यासाठीं आपलीं चपल पथकें घेऊन गायकवाड बडोद्याहून येऊन मिळाले. नानांचें बोलावणें येतांच पटवर्धन आणि रास्ते, राजेबहाद्दर आणि विंचूरकर, घाटगे आणि चव्हाण, डफळे आणि पवार, थोरात आणि पाटणकर, मराठ्यांचे सर्व लहानमोठे मानकरी, अधिकारी व सेनानायक तेथें सादर झाले. ह्या प्रचंड सेनासमूहासमवेत आपल्या थोर कारभाऱ्यांना बरोबर घेऊन प्रत्यक्ष पंतप्रधान बाहेर पडले. सैन्याचें नेतृत्व स्वतः स्वीकारून युद्धावर निघावयाचा तरुण पंतप्रधानांचा हा पहिलाच प्रसंग. ह्या वेळीं आपला आवडता राजा आपल्याबरोबर आहे ह्या कल्पनेनें मराठी सैनिकांना विलक्षण स्फूर्ति चढली ! त्या स्वारींत सर्वांच्या कौतुकाची आणि अभिमानाची ती गोष्ट होऊन बसली. निजाम पहिल्यानें रणक्षेत्रांत उतरला. त्याचें सैन्यही घोडदळ आणि पायदळ धरून एक लक्ष दहा हजारांपेक्षां कमी नव्हतें आणि अगदीं नवीन सुधारणांनीं युक्त आणि भव्य असा दांडगा तोफखाना त्याच्या साहाय्याला होता. त्याचें सैन्य पाहतांच सैनिकसामर्थ्य आणि धर्मांध आवेश ह्यांचें इतकें प्रभावी दृश्य मनावर उमटे कीं, जणूंकाय तें पाहून मोगल आपण जय मिळविणार ह्याविषयीं अगदीं निःशंक झाले होते. मराठ्यांच्या सैन्यापैकीं मोठमोठाल्या तुकड्या हिंदुस्थानच्या सर्व भागांत पसरलेल्या त्यांच्या साम्राज्याच्या सीमाप्रांतांचें संरक्षण करण्यासाठीं स्वाभाविकच राखून ठेवाव्या लागल्या होत्या; तरीही एकत्र झालेलें मराठ्यांचें सैन्य एक लक्ष तीस हजार होतें. ह्या दोन प्रचंड दळांची मराठी प्रदेशाच्या सीमेसन्निध परांड्याजवळ गांठ पडली. नानांनीं आपल्या प्रमुख सेनापतींकडून युद्धाची योजना कशी असावी ह्याविषयीं लेखी मतें मागितलीं होतीं तीं पाहून त्यांना जी सर्वोत्कृष्ट योजना दिसली ती त्यांनीं निश्चित केली. संयुक्त मराठी सैन्याच्या मुख्य सेनापतीच्या स्थानीं त्यांनीं परशुरामभाऊ पटवर्धनांची योजना केली. दोन्ही विरोधी सैन्यांच्या अघाडीच्या टोळ्या परस्परांच्या बंदुकींच्या माऱ्यांत येतांच युद्धाला प्रारंभ झाला.

आरंभींच्या एक दोन झटापटींत पठाणांनीं मराठ्यांच्या एकटदुकट तुकड्यांना माघार घ्यावयाला लावलें. सैन्याच्या निरीक्षणासाठीं फिरत असतां परशुरामभाऊ ह्यांपैकीं एका तुकडींत ह्या वेळीं आलेले होते. ह्या

क्षुल्लक प्रकाराला मोगलांच्या सैन्यांत लागलीच ज्याच्या अभिनंदनार्थ सार्वजनिक राजसमारंभ करणें अवश्य आहे अशा प्रचंड विजयाचें महत्त्व देण्यांत आलें; पण मराठ्यांच्या मुख्य सैन्याशीं गांठ पडतांच आपल्या समजाची चुकी निजामाच्या प्रत्ययाला आली. अहंमद अल्लीखानानें पन्नास हजार निवडक सैनिक घेऊन मराठ्यांशीं गांठ घेतली आणि त्यांच्यावर प्रचंड आवेशानें मारा केला. भोंसल्याच्या हाताखालील मराठी सैन्यानें गोळ्यांचा भयंकर वर्षाव करून त्यांचें स्वागत केलें. इतक्यांत शिंद्यांचा तोफखाना बाजूनें प्रलयकाळची आग ओकूं लागला. दोन्ही पक्ष त्वेषानें लढले; पण मराठ्यांच्या दोहोंकडच्या आगीच्या माऱ्यांत सांपडलेल्या मुसलमानांना 'अल्लाहो अकबर'च्या आरोळ्यांनीं प्रोत्साहन आणावयाचा कितीही प्रयत्न केला तरी आपली जागा धरून ठेवणें अशक्य झालें. त्यांची वाताहत झाली आणि त्यांचें घोडदळ पूर्णपणें चिरडलें गेलें. मराठे पुढें सरसावले आणि त्यांनीं वेढा दिल्याबरोबर मुसलमानी सैन्यांत पुरताच गोंधळ उडाला. निजाम भ्याला; त्याला कांहीं सुचेनासें झालें; रणांगण सोडून तो पळूं लागला ! त्याच्या दैवानें तितक्यांत रात्र पडल्यामुळें तिच्या काळोखामागें त्याला लपतां आलें ! सर्व रात्रभर चकमकी झडतच होत्या; त्यामुळें मोगलसैन्यांत इतका हाहाःकार आणि गोंधळ माजला कीं, बड्या बड्या मौलवींचें हें धर्मयुद्ध आहे अशा प्रकारचें स्फूर्तिदायक आश्वासन मिळाल्यावरही 'सद्धर्मनिष्ठां'च्या सैन्याला, आपलाच सेनानिवास लुटावयाचा आणि शक्य तितक्या त्वरेनें जीव बचाविण्यासाठीं पळून जावयाचा मोह आंवरून धरवला नाहीं ! पण मराठयांचे बुणगे त्यांच्या मागावर होतेच. त्यांनीं अल्प काळांतच त्यांचें लुटीचें सर्व ओझें हलकें केलें ! सकाळचा प्रकाश पडतांच खड्यांच्या गांवकोटाच्या भिंतीच्या मागें निजामानें आश्रय घेतला आहे आणि राहिलेल्या जवळ जवळ दहा हजार सैनिकांचें सैन्य युद्धाच्या सिद्धतेनें भोंवतालीं उभें आहे असें दृश्य दिसलें ! तेव्हां मराठयांनीं आपला तोफखाना पुढें आणला आणि आसमंतांतल्या प्रत्येक टेकडीवरून आणि टेकाडावरून अग्निगोलकांचा प्रचंड वर्षाव होऊं लागला. दोन दिवस मोगलांनीं हें कसेंबसें सहन केलें. महाराष्ट्राच्या तोफखान्याच्या आगीनें निजामाची दाढीच नाहीं तर त्याचें मनोधैर्यही अक्षरशः होरपळून काढलें ! सरतेशेवटीं तिसऱ्या दिवशीं तृषाक्रांत झालेल्या, भाजून निघालेल्या आणि गुदमरून गेलेल्या शत्रूनें युद्ध बंद करावें

अशी याचना केली ! मराठ्यांचें उत्तर मिळालें, "पहिल्यानें मशीर-उल्मुल्क स्वाधीन झाला पाहिजे; मग अवांतर गोष्टींची चर्चा. त्यानें इतक्या स्वैर-पणानें मराठ्यांच्या प्रतिनिधीचा—नव्हे प्रत्यक्ष महाराष्ट्रसाम्राज्याच्या कारभाऱ्यां-चा—जो भ्याडपणाचा आणि ग्राम्य अपमान केला आहे त्याची त्यानें नाक घासून भरपाई केली पाहिजे !" खालीं मान घालून निजामानें आपला सद्धर्मनिष्ठ मंत्री मशीर-उलमुल्क ह्याला मराठ्यांच्या स्वाधीन केलें आणि मराठे सांगतील त्या करारावरी स्वाक्षर करून द्यावयाला आपली सिद्धता असल्याचें कळविलें. त्याला परांड्यापासून उत्तरेस तापीपर्यंत सर्व प्रदेश मराठ्यांच्या स्वाधीन करावा लागला आणि वर भोंसल्याना अलग द्यावया-च्या एकुणतीस लाखांच्या भरीला युद्धाच्या हानीची भरपाई व चौथाईचें येणें म्हणून तीन कोटि रुपये दक्षिणा द्यावी लागली ! पुणें लुटून जाळाव-याला आणि पंतप्रधानांना काशीला दारोदार भिक्षा मागावयाला लावावयाला निघालेल्या शूराला मराठ्यांनीं संधीच्या ह्या करारावर जिवंत आपल्या राज-धानीला परत जाऊं दिलें.

विजयी 'काफिरां'च्या रांगांमधून मशीर-उल्मुल्काला मराठी सेनानिवासाकडे नेण्यांत आलें ! बंदीच्या अवस्थेंत सेनानिवासामधून तो जाऊं लागतांच मराठी सैन्यांतील लहानथोर सर्व सैनिकांच्या मुखांतून निघालेल्या हरहर महादेवाच्या विजयाच्या अदम्य गर्जनांनीं आकाश दणाणून गेलें. त्यांच्या नानांना शृंखलाबद्ध करावयाच्या वल्गना करणाऱ्या माणसाला त्यांनीं बंदि-वान केलें होतें. आपल्या प्रतिनिधींची प्रतिज्ञा त्यांनीं पूर्ण केली होती. पण इतकें सर्व केल्यावर महाराष्ट्राच्या सुस्वभावी पंतप्रधानांनीं आणि त्यांच्या उदारमनस्क कारभाऱ्यांनीं आपल्या जिंकलेल्या शत्रूला सन्मानानें वागविलें ! त्यांनीं मनात आणलें तर ते त्याची पुण्याला दारोदार हिंडवून धिंड काढूं शकतात एवढें सिद्ध करून दिल्यावर त्यांनीं आणखी त्याचा अपमान केला नाहीं. नानांनीं त्याला क्षमा केली !! आपल्या मनगटांत अपराध्यांना शासन करावयाचें सामर्थ्य आहे याची जाणीव आणून दिल्यावर मराठे बहुधा असेंच वागत.

मग पंतप्रधानांनीं आपल्या सर्व अधिकाऱ्यांसह मोठ्या विजयसमारंभानें महाराष्ट्राच्या राजधानींत प्रवेश केला. आपल्या रणवीरांचें आणि आवडत्या तरुण पंतप्रधानांचें राष्ट्रीय स्वागत करण्याकरितां दूरदूरच्या प्रदेशांतून लोकांचे

थवेच्या थवे पुण्याला लोटले होते. सर्व नगर थाटानें शृंगारण्यांत आलें होतें. सैन्य नगरांत येतांच पुण्यपुरीनें आपल्या विजयी पुत्रांचें अत्यंत मनःपूर्वक आणि उज्ज्वल स्वागत केलें. हिंदुस्थानच्या सर्वांत श्रीमंत राजधानींतील मोठमोठाल्या वाड्यांच्या आणि राजमंदिरांच्या सौधावरून, सज्जांतून आणि वातायनांमधून रमणीसमुदायानें आपल्या समोरून जनयात्रा जात असतां पंतप्रधानांच्या, राजकारणधुरंधरांच्या, सेनानायकांच्या आणि वीरांच्या मस्तकांवर मंगल लाह्यांचा वर्षाव केला. तरुण कुमारिका आणि रमणी आपापल्या दारांत उभ्या राहिल्या आणि त्यांनीं तरुण पंतप्रधानांची स्वारी येतांच त्यांच्या सुंदर मूर्तीवरून पंचारती ओवाळल्या. अशा रीतीनें आपल्या राजनिष्ठ प्रजेचीं अभिवादनें आणि अभिनंदनें घेत घेत पंतप्रधानांची स्वारी शनिवारवाड्याकडे गेली. साम्राज्यांतील अत्यंत प्रसिद्ध आणि पराक्रमी मानकऱ्यांपैकीं, संस्थानिकांपैकीं आणि सेनानायकांपैकीं बहुतेक प्रमुख मंडळींनीं साम्राज्याच्या त्या राजधानीच्या भोंवतीं अनेक कोसपर्यंत आपल्या विस्तीर्ण आणि विजयी पथकांसह शिबिरें उभारून तळ दिला होता, त्या असंख्य पसरलेल्या पराक्रमी, संघटित आणि विजयशाली सेनासमूहाचें जगाच्या दृष्टीला पडलेलें दृश्य पाहून सर्वांना जेव्हां प्रौढप्रताप नानासाहेब पंतप्रधान कारभार चालवीत होते, आणि विक्रमशाली भाऊसाहेब दलसंभार हालवीत होते त्या वेळच्या हिंदुसाम्राज्याच्या अत्यंत भाग्याच्या दिवसांची आठवण झाली.

त्यांना कांहीं काळ तसेंच तेथें राहूं द्या. तरुण भाग्यशाली आणि सुखी श्रीमंतांना आपल्या स्वामिनिष्ठ प्रजेची लोकप्रियता उपभोगूं द्या ! थोर, समर्थ, यशवंत नाना फडणविसांना शत्रूंपासून जिंकून घेतलेल्या अफाट प्रदेशाची आणि वस्तूंची मराठ-मंडळाच्या निरनिराळ्या घटकांमध्यें वांटणी करीत, कोणाची तडजोड लावीत, कोणाचा वाद ऐकत, कोणाच्या मागणीचा निर्णय करीत, राजकीय धोरणाचे नाना प्रश्न सोडवीत आणि सर्वांनीं अस्तित्वांत आणलेल्या वैभवशाली हिंदु-साम्राज्याच्या वाढीसाठीं आणि संरक्षण साठीं मराठ-मंडळाच्या मांडलिकांनीं कोणचा कार्यभार उचलावा, कोणचा मार्ग आक्रमावा ह्यांविषयीं प्रतिनिधींशीं, प्रांताधिकाऱ्यांशीं आणि सेनानायकांशीं विचार करीत व्यग्र असूं द्या ! महाराष्ट्रांतील लोकांना इतक्या निश्चयानें संपादलेल्या राष्ट्रीय विजयाचा आनंद मानूं द्या ! भाटांना आणि गोंधळ्यांना त्यांच्या वाडवडिलांच्या पराक्रमांची आणि त्यांच्या पुत्रांच्या

तितक्याच उज्ज्वल आणि भव्य कृत्यांचीं हृदय हालवून सोडणाऱ्या शब्दमालिकांनीं भरलेलीं गीतें रचीत आणि रोमहर्षणस्वरांत तीं गात बसूं द्या ! अद्यापिही हे पोवाडे आणि हीं पराक्रमगीतें महाराष्ट्रीयानें केव्हांही ऐकलीं कीं त्याच्या नेत्रांतून आनंदाश्रु गळूं लागतात; त्याच्या नसानसांतून वीरभावना सळसळूं लागतात. श्रवणोत्सुक जनसमूहापुढें चव्हाट्यावर खर्ड्याच्या युद्धाची कथा वर्णन करणारा नवा पोवाडा म्हटला जात असतां त्याच्यांतील तो प्रसंग पाहिलेला एकादा वृद्ध मराठा आपलें नांव निघालें किंवा आपल्या पथकाच्या पराक्रमाचा प्रसंग गाइला गेला, कीं त्या खेडवळांच्या व नागरिकांच्या आश्चर्यचकित जनसमूहांतून ताड्कन् ताठ उभा राहतो आणि हळूच आपल्या मिशांना पीळ भरूं लागतो–आपल्या शेताच्या तुकड्याच्या धन्याला–महाराष्ट्राच्या शेतकऱ्याला संतुष्ट चित्तानें स्वैर लकेऱ्या घेत जोंपर्यंत नाना पुण्याचा कारभार चालवीत आहेत तोंपर्यंत आपल्यावर कोणचेंही संकट येणार नाहीं, आपल्या परिश्रमाचें फळ आपल्यापासून कोणी हिरावून घेऊन जाणार नाहीं अशा विश्वासानें आपला नांगर हांकीत राहूं द्या ! जेथें सहस्रावधि भक्तांचे मेळे अर्पण करावयाच्या वस्तूंचे संभार घेऊन प्राप्त झाले आहेत आणि मोकळेपणानें आणि मन मानेल त्या प्रकारानें आराध्यदेवतेवर पूजा चढवीत आहेत अशा देवमंदिरांना अभिमानानें आपले अकुतोभय कळस उभवूं द्या ! यात्रेकरूंना, संन्याशांना, साधूंना आणि वेदान्त्यांना हरिद्वारपासून रामेश्वरापर्यंत हिंदुधर्माचीं सर्वश्रेष्ठ नीतितत्त्वें घेऊन जात आणि सर्वत्र पसरवीत पवित्र भूमींतून प्रवास करतां करतां त्यांची लहर लागेल त्याप्रमाणें भजन करूं द्या किंवा समाधि लावूं द्या. जुन्या शास्त्रांना आणि विद्येला प्रोत्साहन देण्यासाठीं ज्यांनीं लक्ष्यावधि रुपये दिले आहेत अशा श्रीमंत संस्थानिकांच्या आणि धनवंतांच्या दानशूरतेमुळें ज्यांची योगक्षेमाची चिंता दूर झाली आहे अशा त्रिखंड पंडितांना आणि ज्ञानमूर्तींना भरभराटलेल्या विहारांतून आणि विद्यालयांतून आपलें अध्ययन करीत बसूं द्या ! आपल्या तरुण पत्नीस किंवा वृद्ध मातेला आपल्या जलावरील किंवा स्थलावरील पराक्रमाच्या गोष्टी सांगत आणि त्यांच्या प्रत्यंतरासाठीं शत्रूंच्या रणनौकांतून किंवा सेनानिवेशांतून जिंकून आणलेल्या लुटींतील आपल्या भागांचा–सोन्याचा कंठा किंवा मोत्यांचा हार त्यांना दाखवीत प्रत्येक नौसैनिकाला किंवा भूसैनिकाला आढ्यतेनें फुलूं द्या ! राजधानी, नगरें, गांवें–सर्वच राष्ट्राला त्यांच्या पूर्वजां-

ऱ्या पिढ्यान् पिढ्यांच्या परिश्रमानें आणि स्वतःची पात्रता सिद्ध करून देऊन संपादन केलेल्या राष्ट्रीय ऐश्वर्याचें आणि स्वातंत्र्याचें सुख उपभोगीत बसूं द्या ! ह्या वैभवाच्या परमोच्च बिंदूवर कल्पनेला—जरी तिला माहीत आहे कीं ही परिस्थिति आजकालच असणार आहे आणि म्हणून जरी ह्या भव्य हिंदुसाम्राज्याच्या दैवीं लवकर येणाऱ्या आकस्मिक पतनाचें दृश्य अवलोकन करावयाला ती सिद्धही आहे तरी—त्या परमोच्च स्थानीं रेंगाळत बसावेंसें वाटतें ! म्हणून तरी जोंपर्यंत तो काळ उलटून गेला नाहीं तोंपर्यंत तिला तेथें आनंद मानीत बसूं द्या.

तोंपर्यंत महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासाच्या येथवर आम्हीं अत्यंत संक्षेपानें काढलेल्या रूपरेखेचें, महाराष्ट्राचा इतिहास हा ज्या विस्तृत आणि उदात्त अशा अखिल हिंदुस्थानच्या इतिहासाचा एक अवयवीभूत आणि महत्त्वाचा विभाग आहे त्या भारतीय इतिहासाशीं त्याचा परस्परसंबंध काय आहे, त्याच्या कोणत्या विशिष्ट स्थानांत हा बसतो आणि त्याच्यांत ह्याची योग्यता किती मोठी आहे, ह्या दृष्टीनें आपण निरीक्षण करूं.

## प्रथम खंड संपूर्ण

# द्वितीय-खंड

## प्रकरण १ लें

# ध्येय

## महाराष्ट्राच्या नेतृत्वाखालील अखिल भारतीय हिंदु साम्राज्य.

"स्वामी हिंदुराज्यकार्यधुरंधरः राज्याभिवृद्धिकर्तेः तुम्हां लोकांचे अंगेजणीनें पावले. संपूर्ण हिंदुस्थान निरुपद्रव राहे तें संपूर्ण देशदुर्ग हस्तवश्य करून वाराणशीस जाऊन श्रीविश्वेश्वर स्थापना करितात."

—रामचंद्रपंत अमात्य.

मराठ्यांचा इतिहास स्वतंत्रपणेंसुद्धां कितीही महत्त्वाचा आणि वैभवपूर्ण असला तरी तो म्हणजे प्रत्यक्ष हिंदु राष्ट्राच्या–हिंदुस्थानच्या इतिहासाचा एक भाग आहे. ह्या सर्व भागांना आपल्यांत समाविष्ट करणारा समग्र ग्रंथ म्हणजे हिंदुस्थानचा इतिहास. तेव्हां मराठ्यांच्या इतिहासाच्या परीक्षणाचें हें काम हातीं घेण्यांत आमचा हेतु, यच्चयावत् घडामोडींच्या सामान्य गोंधळांतून ज्या महत्त्वाच्या घटना वेंचून काढून थोडक्यांत स्पष्टपणें मांडल्या असतां अखिल हिंदुजातीय हितसंबंधांच्या दृष्टीनें महाराष्ट्राच्या अर्वाचीन इतिहासाचें महत्त्व उत्तम रितीनें अजमावणें आणि समजून घेणें व अखिल हिंदुस्थानच्या इतिहासाच्या समग्र ग्रंथांतील त्याचा संबंध स्पष्ट करून त्यांत योग्य स्थानीं बसविणें शक्य तितकें सुलभ होईल तेवढ्याच घटना प्रामुख्यानें पुढें आणणें हा होता. तेवढ्यासाठीं मराठी आंदोलनांचें इतिवृत्त शक्य तितक्या संक्षिप्तपणानें कथन करणें आणि त्याच्यासारख्या सबंध राष्ट्राला ज्या प्रेरक शक्तीनें, ज्या अखंड निर्झरानें, ज्या प्रभावी उद्दाम स्थानानें त्यांच्या हातून बलिष्ठ हिंदुसाम्राज्याची उभारणी होईपर्यंत साक्षेपी व्हावयाला, झगडावयाला व आत्मयज्ञ करावयाला एकसारखें प्रोत्साहन दिलें त्याचा निश्चय करणें अवश्य होतें. ह्या इतिहासाचे दोन भाग पडतात. एक बाळाजी विश्वनाथांच्या उदयापर्यंतचा आणि दुसरा बाळाजी विश्वनाथांचा उदय होऊन मराठ मंडळाची स्थापना झाल्यानंतरचा. ह्यांपैकीं पहिल्या भागांतील प्रसंगाची माहिती महाराष्ट्राच्या बाहेरही लोकांना बरीच झालेली आहे व त्यांच्या मनांत उत्तरभागापेक्षां ह्या भागाचें महत्त्व विशेष बिंबलें आहे. तसेंच रानड्यांसारख्या विद्वान् लेखकांनीं शिवाजी

महाराजांच्या आणि राजारामाच्या वेळच्या मराठ्यांच्या कर्तृत्वाचा उठाव यथातथ्य स्वरूपांत लोकांपुढें मांडून आधींच ह्या पूर्वभागांतील कालखंडाचा परामर्ष घेतलेला आहे. तेव्हां आम्ही त्या काळांतील कांहीं थोड्या महत्त्वाच्या घटनांचा ओझरता उल्लेख करून महाराष्ट्राच्या उत्तरभागाच्या इतिहासाचा वृत्तान्त ह्या संक्षिप्त कथानकांत जरी विशदतेनें सांगितला आहे तरीही तो त्रोटकच देतां आला; आमच्याजवळील अल्प जागेंत तो समग्र देणें शक्य नव्हतें. ह्या उत्तरभागापासून मराठ्यांचा इतिहास म्हणजे केवळ महाराष्ट्राचा इतिहास रहात नाहीं. त्याचें तें संकुचित स्वरूप येथें नाहींसें होतें आणि त्याची व्याप्ति हिंदुस्थानभर वाढून प्रामुख्यानें तो प्रत्यक्ष अखिल हिंदुस्थानचाच इतिहास गणला जावा इतकें विशाल स्वरूप त्याला प्राप्त होतें.

सर्व हिंदुजातीय दृष्टीनें ह्या इतिहासाचें परीक्षण करीत असतां आणि ज्या तत्त्वांच्या योगानें पिढ्यान् पिढ्या तो प्रज्वलित राहिला तीं तत्त्वें निश्चित करण्याचा प्रयत्न करीत असतां ह्या आंदोलनाचें पुढारीपण ज्या कार्यकर्त्यांकडे आणि विचारवंतांकडे होतें त्यांच्यासंबंधीं आणि त्यांच्या हेतूसंबंधीं माहिती अवश्य तितकी त्यांच्याच शब्दांत द्यावयाचा प्रयत्न केला आहे. त्या पराक्रमशाली पुरुषांच्या पिढ्या प्रत्यक्ष भरीव कृत्यें करण्यांत इतक्या गढून गेल्या होत्या आणि प्रचंड घण घेऊन ऐरणीवर आपल्या राष्ट्राचें भवितव्य घडविण्यांत त्या इतक्या एकाग्रतेनें निमग्न झाल्या होत्या कीं, त्यांचे उद्गार अगदीं मित असत आणि त्यांचीं कृत्यें त्यांच्या अंगीकृत कार्याचें महत्त्व केवळ शब्दापेक्षां कितीतरी पटींच्या वक्तृत्वानें सांगत असत. तरी त्यांचे उद्गारसुद्धां इतके अल्प असूनही ते त्यांच्या कृत्यांसारखें जिवंत आणि प्रभावशाली आहेत. ह्या दोहोंच्या—त्यांच्या कृत्यांच्या आणि उद्गारांच्या—साहाय्यानें आम्हीं असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे कीं, ह्या महाकाव्याचा महाविषय, ह्या सामर्थ्यपूर्ण गीताचें ध्रुवपद, त्या समग्र चळवळीला ज्यानें उद्दीपित केलें, पिढ्यान् पिढ्यांना—केवळ शिवाजींच्या आणि रामदासांच्याच पिढीला नाहीं तर मुख्यतः त्यांच्या मागूनच्या पिढ्यांना—संस्मरणीय पराक्रम करावयाची ज्यानें स्फूर्ति दिली तें दिव्य ध्येय म्हणजे हिंदुजातीची परकीय अहिंदु आधिपत्याच्या राजकीय आणि धार्मिक शृंखलांपासून मुक्तता करणें आणि परकीय आक्रमणाचे व धर्मवेडानें उत्पन्न झालेल्या अभिनिवेशाचे प्रयत्न निष्फल करण्यासाठीं ज्याचा हिंदुसंस्कृतीला आणि हिंदुधर्माला सामर्थ्याचा अभेद्य गडाप्रमाणें आणि

एकाद्या प्रचंड कोटाप्रमाणें उपयोग होईल असें बलिष्ठ हिंदुसाम्राज्य स्थापन करणें हें होतें. शहाजीला ज्याचें स्वप्न दिसलें त्या स्वधर्मराज्यापासून प्रौढप्रताप शिवाजीमहाराजांनीं ह्या संक्षिप्त निरीक्षणाच्या आरंभींच आपण पाहिल्याप्रमाणें आपली सर्व निष्ठा ज्याच्या ठायीं लागली आहे असें आपलें ध्येय म्हणून ज्याचें आपल्या सवंगड्यापाशीं वर्णन केलें त्या हिंदवी स्वराज्यापासून, तों थेट बाजीरावांच्या हिंदुपदपादशाहीपर्यंत, आणि पंतप्रधानांचे बुद्धिवान् प्रतिनिधि गोविंदराव काळे ह्यांनीं शके १७१७ (इ. सन १७९५) मध्यें विजयी प्रौढीनें ज्याचें हें हिंदुस्थान आहे तुर्कस्थान नव्हे असें वर्णन केलें त्यापर्यंत हीच उदात्त कल्पना, देवाच्या आणि धर्माच्या सेवेला अर्पण केलेल्या हिंदु-साम्राज्याचें जिवंत ध्येय ह्या सर्व प्रभावपूर्ण चळवळींतून अखंडपणें स्फुरत असतांना आणि सळसळत असतांना आपल्याला दिसतें. पूर्ण स्वातंत्र्याच्या मूलतत्त्वाचा गरुड आपले स्वधर्माचे आणि स्वराज्याचे प्रचंड पंख पसरून विचार करीत आणि एक वर्षशत छववीत बसतो आणि त्यांतून त्याची इच्छा प्रत्यक्षांत आणण्यासाठीं एक प्रबल राष्ट्र एकदम उत्पन्न झालेलें जगाच्या दृष्टीला पडतें.

एक सबंध राष्ट्र -- एक किंवा दोन व्यक्ति नाहींत, एक संपूर्ण पिढीसुद्धां नाहीं तर एक सबंध राष्ट्र— आमच्या संक्षिप्त परीक्षणांतून जी दुसरी आणि महत्त्वाची गोष्ट निःसंशयपणें दृग्गोचर होते आणि जी आमच्या महाराष्ट्रीयेतर वाचकांच्या मनांवर बिंबवावयाची आमची इच्छा आहे ती ही. शिवाजीच्या आणि रामदासांच्या पिढीनें जरी हिंदुस्वातंत्र्याच्या युद्धाला प्रारंभ केला असला तरी तें कांहीं त्यांच्याबरोबर समाप्त झालें नाहीं त्यांच्यानंतर ज्या पिढ्या अस्तित्वांत आल्या त्यांनीं तें तसें पुढें चालवून त्याचा न्याय्य आणि विजयशाली शेवट केला. जसजसें आपण पुढें जातों आणि जसजशीं मोठमोठालीं पात्रें, पुरुष आणि बायका, राजकारणी आणि संग्रामचतुर वीर आणि मंत्री, राजे आणि राज्यकर्ते, लेखनीपुंगव आणि खड्गपुंगव, ह्यांचीं सहस्रें आणि अयुतें गर्दी करीत आपल्या समोरून जाऊं लागतात आणि अनेक शतकांवर पसरलेल्या संततप्रसरणशील रंगभूमीवर एका हिंदु राज्याच्या ध्वजेच्या, भगव्या झेंड्याच्या, जरीपटक्याच्या भोंवतीं सर्व जण केंद्रित होऊन नाट्यवस्तु पूर्ण रंगांत येते, तसतसा ह्या राष्ट्रीय महाकाव्याचा विषय वीरत्वपूर्ण ऐश्वर्यानें आणि विशालतेनें आविष्कृत होत जातो!

ह्या गोष्टीबरोबरच मराठी राज्याचें लवकरच जणुं काय अंतःप्रेरणेनें जें एकराष्ट्रीय मराठ-मंडळ म्हणून एका विशिष्ट राजकीय घटनेंत रूपांतर झालेलें दिसतें, त्याचा विचार केला म्हणजे निःसंशयपणें मनाला पटतें कीं, मराठ्यांची उठावणी ही एक वैयक्तिक स्वरूप नसलेली व अखिलराष्ट्रीय अशी एक घटना होती; इतकेंच नाहीं, तर तिनें हिंदुस्थानच्या जीवनक्रमांतील राजकीय आचारांच्या आणि विचारांच्या विकसनांत बरीच मोठी प्रगति घडविली होती. कारण, हिंदुस्थानच्या आधुनिक इतिहासांत निरनिराळे विभाग एकत्र संघटित होऊन त्यांच्या बनलेल्या राष्ट्रानें मराठी साम्राज्यासारखें साम्राज्य बऱ्याच दीर्घ काळपर्यंत प्रस्थापित करण्यांत, वाढविण्यांत आणि रक्षण करण्यांत यश मिळविल्याचें एवढ्या विस्तृत प्रमाणांत दुसरें एकही उदाहरण सांपडत नाहीं. मराठी साम्राज्य स्वरूपतः आणि हेतुतः पूर्णपणें खरेंखुरें जानपदराज्य होतें. मराठ-मंडळाच्या ह्या राष्ट्रीय जानपदराज्यांत व्यक्तीच्या राजत्वाचें तत्त्व व्यवहारांत अरादीं संपुष्टांत आलें होतें; राष्ट्रीय लोकसत्तेच्या तत्त्वज्ञानाचा विचार आणि आचारभागांच्या परिशीलनानें राष्ट्रीय जीवनांतील आणि हितसंबंधांतील एकत्वाच्या भावनेनें कार्यकर्ते पूर्णपणें उचंबळून गेले होते; सर्व घटकांचीं स्पष्टतेनें योजलेलीं कर्तव्यें होतीं, त्यांच्यावर ठराविक भार होता, त्यांना निश्चित अधिकार होते. निरनिराळ्या विभागांचें एक संघटित मंडळ बनून झालेल्या राजसत्तेच्या शिक्षणांत शिक्षित झालेल्या जनतेला तत्त्वतः आणि व्यवहारतः व्यक्तिगत राजसत्तेखालीं असलेल्या जनतेपेक्षां अधिक सुलभतेनें आणि निपुणतेनें लोकसत्तात्मक संयुक्त राजसत्तेंत परिवर्तित होतां येतें हें उघडच आहे. संघटित विभागात्मक राष्ट्रीय राजसत्तेचें आपल्या आधुनिक इतिहासांतलें दुसरें उदाहरण म्हणजे आपल्या शिखांचें!! पण तुलनात्मक दृष्टीनें पाहतां मराठ-मंडळाच्या मानानें तें अतिशय अल्प प्रमाणावर होतें, तितकें पद्धतशीर नव्हतें आणि इतक्या चांगल्या स्थितींत आणि दीर्घ काळपर्यंत तें राहूंही शकलें नाहीं. पण तेंही इतक्याच देशभक्तिपूर्ण आणि उदात्त तत्त्वांनीं आणि ध्येयांनीं प्रेरित झालें होतें आणि म्हणून संघटित हिंदु राजसत्तेचें दुसरें महत्त्वाचें उदाहरण म्हणून त्याचा गौरवपूर्ण उल्लेख करणें अवश्य आहे.

पण मराठ्यांच्या अभ्युत्थानाच्या ह्या राष्ट्रीय आणि हिंदुजातीय स्वरूपावर अशा रीतीनें विशेष भर देत असतांही आम्हांला ही जाणीव आहे कीं, ह्या

आपल्या संक्षिप्त कथानकांतही आविष्कृत झालेल्या वृत्तान्तावरून ह्या उठावणीचें एकंदरींत तसें स्वरूप होतें. म्हणून सर्वच कार्यकर्ते यांनीं केलेल्या सर्वच कृत्यांत सर्वच प्रसंगीं केवळ सार्वजनिक हिताच्या आणि हिंदुजातीच्या कल्याणाच्याच बुद्धीनें प्रेरित झाले होते असें धरून चालणें समर्थनीय होणार नाहीं. हिंदुजातीच्या कार्याच्या प्रसारार्थ आणि संरक्षणार्थ राष्ट्रानें केलेल्या उदात्त चळवळीबरोबर जोडीनें आपसांतील वैमनस्यें आणि अंतर्युद्धें एकसारखीं चालू होतीं! वस्तुस्थिति अशी होती कीं, मराठे हे आधीं हिंदु होते आणि मग मराठे होते. तेव्हां साहजिकपणेंच ज्या जातींपैकीं ते होते त्या जातींच्या सामान्य आणि विशिष्ट मनोरचनेंतील गुण आणि दुर्गुण, सामर्थ्य आणि दुर्बलता हीं कांहीं अंशानें त्यांच्यांतही होतीं. मुसलमानांनीं हिंदुस्थानांत पहिला चंचुप्रवेश केला त्या वेळीं त्यांच्यांत धर्मवेडानें उत्पन्न केलेली भयानक एकी, सामाजिक संघटन आणि पराक्रम करावयाला लावणारा उत्साह ह्या गुणांमुळें संघ ह्या दृष्टीनें ते अदम्य झाले होते. पण हिंदूमध्यें ह्या गुणांचा अगदींच अभाव आढळून आला. पृथ्वीराजाच्या आणि महंमद घोरीच्या वेळीं दोन्ही पक्षांचें परस्परांच्या तुलनेनें बल किंवा दुर्बलत्व काय होतें ह्याची चर्चा करावयाचें हें स्थळ नाहीं. पण तरीहि एका गोष्टीचा येथें स्पष्ट उल्लेख करणें अवश्य आहे. समाजाशीं विरोध आलेल्या दोन समाजांपैकीं धर्माचा प्रसार करण्याच्या निश्चयानें जो बाहेर पडला आहे आणि ज्याला आपल्या धर्ममताव्यतिरिक्त इतर सर्व धर्ममतें म्हणजे केवळ नरकांत जावयाच्या प्रवेशपत्रिका आहेत आणि ह्या सैतानी दुर्गांना बलानें किंवा छलानें भूमिसात् करण्याचा प्रत्येक प्रयत्न म्हणजे पुण्यसंचय करणें आहे असा विश्वास उत्पन्न करणाऱ्या राक्षसी तत्त्वांची मूळपासून शिकवण मिळाली आहे असा एक समाज आहे आणि त्याच्या समोर ज्याच्या धर्मांत धर्ममतासाठीं दुसऱ्यावर आक्रमण करावयाची कल्पनादेखील त्याज्य आहे; ज्याच्यांत दुसऱ्यावर बलात्कार करणें म्हणजे निंद्य समजलें जातें, इतकेंच नाहीं तर आणखी पुढें जाऊन आपल्या धर्मांतून ज्यांना बलात्कारानें ओढून नेलें आहे अशांना सुद्धां पुनः आपल्यांत परत घ्यावयाला जे सिद्ध नाहींत; ज्यांना सार्वजनिक प्रार्थनेपेक्षां प्रत्येकानें आपापल्या घरीं आपापल्या इष्टदेवतेची पूजा करणें महत्त्वाचें वाटतें आणि त्यामुळें ज्यांच्यांत एक विशिष्ट धर्म ह्या दृष्टीनें आपल्या धर्ममताचें सर्वसाधारण संरक्षण करणारी संस्था किंवा संघटना निर्माण होऊन वाढूं शकत नाहीं; आणि अशा रीतीनें संघटनेनें साहजिकच

प्राप्त होणाऱ्या सामाजिक सामर्थ्याचा आणि संघटितेचा त्यांत पूर्ण अभाव असूनही जो ती जागा भरून काढण्यासाठीं सजाति मातृभूमिविषयक किंवा समान मानववंशविषयक किंवा समान सौराज्यविषयक प्रेमाचें तत्त्व आपल्यापुढें ठेवीत नाहीं कीं, ज्यांत समाजांतील सर्व व्यक्ति एकजीव होऊन त्यांचा एक समाजपुरुष होईल आणि त्या आपल्या शत्रूंच्या इतक्याच भयंकर उच्छृंखल उत्साहानें स्वजातीच्यां वैभवासाठीं आणि रक्षणासाठीं आपल्याला वाहून घेतील इतकें सामर्थ्य आहे असें प्रभावी राज्य प्रस्थापित करीत नाहीं असा दुसरा समाज समोर उभा आहे. असे दोन समाज समोरासमोर आले तर धार्मिक आणि राजकीय विजयक्षेत्राच्या प्रसाराच्या दृष्टीनें कोणत्याही रीतीनें रणोद्यत धर्मपंथाच्या एकांतिक गुणावगुणांचा विचार केला तरी पहिला समाज हा बाकीची सर्व परिस्थिति समान असतां-नाच आपल्या प्रतिस्पर्ध्याशीं दोन हात करून त्याला पराभूत करावयाला आणि त्याच्यावर राज्याधिकार गाजवावयाला अधिक योग्य ठरतो. मुसलमान ज्या वेळीं हिंदुस्थानांत आले त्या वेळीं एका अल्लाचे आपण सर्व प्रजाजन असें जें एकीचें तत्त्व त्यांच्यांत दृढमूल झालें होतें, सर्व जग म्हणजे अल्लाच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालचें एक साम्राज्य आहे आणि म्हणून सर्व जगाला ह्या अल्लाप्रभूचे आज्ञांकित प्रजाजन बनविणें हें आपलें परम कर्तव्य आहे अशी जी भावना त्यांच्यामध्यें पक्केपणें निगडित झाली होती त्यामध्यें अदम्य शक्तिचा अखंड झराच त्यांना लाधला होता. हिंदूंची स्थिति ह्याच्या अगदीं उलट होती. व्यक्तिस्वातंत्र्याची भावना आणि मानवी जीवनाच्या हेतूविषयींचें व सर्व कारणांच्या मूळ कारणांविषयींचें निवृत्तिपर तत्त्वज्ञान हीं त्यांच्या आयुष्याचा भागच होऊन बसलीं होतीं. त्यामुळें त्यांच्यांत एकमेकांपासून विभक्त कर-णाऱ्या आणि दुर्बल बनविणाऱ्या संस्थांचा आणि समजुतींचा प्रसार झाला होता. उदाहरणार्थ, देशाच्या मर्यादा ओलांडून जावयाला धर्मविरुद्ध म्हणून असलेला प्रतिबंध ह्या वेड्या समजुतीमुळें त्यांना आक्रमणाचा विचारच सोडून देऊन सतत बचावाची चिंता करावयाची पाळी येई. त्यांच्यांतील राजकीय संस्थांमध्यें देशभक्तीपेक्षां व्यक्तिमाहात्म्याचें प्रस्थ अधिक असे. त्यामुळें साहजिकच राष्ट्रीय दृष्टीनें देशाची अधोगति होऊन तो लहान लहान राज्यांचें एक जाळें बनला होता. समान संस्कृतीच्या भावनेच्या सुता-च्या धाग्यानें तीं कशींबशीं बांधलीं गेलीं असतील तेवढींच. पण ज्या

समान गोष्टीमुळें त्यांचें एकराष्ट्रीयत्व निदर्शित होत होतें, ज्या कल्पना त्यांना एक जनता म्हणून एकत्रित करीत होत्या त्यांपेक्षां ज्या विरोधामुळें धर्मदृष्ट्या आणि पंथदृष्ट्या आपण निरनिराळे विभाग आहोंत असें वाटे त्या विरोधांचीच त्यांच्यात अधिक जाणीव दिसून येई. आणि म्हणून मधून मधून एका हिंदु-ध्वजेखालीं सर्व देश एकत्रित करण्याचे तात्पुरते प्रयत्न झाले असतांही रानटी धर्मवेडाच्या आणि पराक्रमी हावरेपणाच्या पहिल्या आघाताबरोबर तीं एका-मागून एक ढांसळून पडलीं. एक मुसलमान व्यक्ति आणि एक हिंदु व्यक्ति एवढ्यांचाच तुलनात्मक विचार केला तर हिंदु हा कमींत कमी तरी मुसलमाना-इतकाच शूर आणि धर्मनिष्ठ होता. पण भिन्न भिन्न लोकसंघ म्हणून निरनिराळ्या जातिदृष्टीनें विचार केला तर मुसलमानसमाज अल्ला हा ह्या जगाचा एकच सुल-तान आहे ह्या धर्मभक्तीच्या भावनेनें लांडग्यासारख्या हिंस्र पशूंच्या कळपाप्रमाणें संघटित झालेला दिसून येई. ही भावना त्यांना अल्लाच्या एका ध्वजेखालीं मरा किंवा जिंका अशा आवेशानें एकत्र पाचारण करी आणि विधर्मीयांवर आपली राजकीय सत्ता वाढविण्याच्या प्रत्येक प्रयत्नाला धर्मयुद्धाचें पावित्र्य आणून देई. पण जसजशीं वर्षांमागून वर्षें आणि शतकेंही निघून गेलीं तसतसें हिंदूनाही ह्या कटु पाठाचें शिक्षण मिळालें. आणि समान आपत्ती-करणाच्या भारामुळें आपसांतील विरोध दाखविणाऱ्या गोष्टींपेक्षां त्यांना एक जनता म्हणून निगडित करणाऱ्या आणि एकराष्ट्र म्हणून निदर्शित करणाऱ्या बंधनांची जाणीव अधिकाधिक उत्पन्न होऊं लागली. आपण सर्व पहिल्यानें हिंदु आहोंत मग दुसरे कांहीं, ही भावना त्यांच्यांतही प्रबल झाली. संघटित न होतां आपल्या पुरताच स्वतंत्र विचार आणि आचार करावयाच्या अंतर्भूत प्रवृत्तीमुळें, भावना, अभिमानस्थलें, आणि राष्ट्रीय सहानुभूति ह्यांविषयींच्या समानत्वाच्या अभावामुळें आपल्या राष्ट्रीय जीवनांत शिरलेली दुर्बलता खेदकारक रीतीनें त्यांच्या मनावर ठसली. क्रमाक्रमानें ज्या विशेष गोष्टींमुळें मुसलमान विजयी झाले त्या त्यांनीं आत्मसात् केल्या. अखिल हिंदुजातीय अभ्युत्थानाला प्रारंभ झाला आणि राजकीय स्वातंत्र्यासाठीं व एक प्रचंड हिंदुसाम्राज्य स्थापन करण्यासाठीं युद्ध चालू झालें. ह्या सर्व चळ-वळींचें निरीक्षण केल्यावर आणि त्या वेळीं प्रचलित असलेल्या हिंदुसमाजा-च्या राजकीय परिस्थितीचा अभ्यास केल्यावर हिंदुस्वातंत्र्याच्या त्या युद्धाचें नेतृत्व धारण करावयाला आणि तें यशस्वी करून दाखवावयाला

एक महाराष्ट्रच सर्वांहून योग्य होतें असा निष्कर्ष काढल्यावांचून कोणालाही गत्यंतर रहात नाहीं. अखिल हिंदुस्थानांत पर्यटन करून परत आल्यावर श्रीरामदासस्वामींनीं हेंच प्रतिपादन केलें. त्यांनीं अत्यंत खेदानें पण तितक्याच उत्साहानें उद्गार काढले, "ह्या अखिल भरतखंडांत मुसलमानांच्या राजकीय बंधनापासून ह्या भूमीची आणि ह्या राष्ट्राची मुक्तता करावी अशी ज्याला तळमळ लागली आहे आणि असें ज्याचें सामर्थ्य आहे असा कोणी हिंदु राहिला नाहीं. जर कांहीं आशा कोणाविषयीं करतां येईल तर ती एका महाराष्ट्राविषयींच." अशी निश्चिती झाल्यावर त्यांनीं आणि त्यांच्या शिष्यांनीं पहिल्यानें महाराष्ट्रच संघटित करावयाचा आणि मग समग्र हिंदु कार्याला आपल्याला वाहून घेतल्यामुळें हिंदु धर्माच्या संरक्षणाचा आणि हिंदु जातीच्या पुरस्कर्तृत्वाचा भार ज्यानें आपल्या शिरावर घेतला आहे अशा सुसंघटित आणि समर्थ मराठी साम्राज्याच्या छत्राखालीं सर्व हिंदुस्थान आणून अखिल हिंदुस्थानचें स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठीं व स्वराज्य आणि स्वधर्म, हिंदूंचें देवस्थान आणि हिंदूंचें सिंहासन परक्यांच्या नियंत्रणांपासून मुक्त करण्यासाठीं पवित्र युद्ध उभारून त्यासाठीं समर्थ महाराष्ट्राचें सैन्य घेऊन जावयाचें असा निश्चय केला. परंतु ह्या प्रयत्नामध्यें हिंदुजातींतील अधोगामी प्रवृत्तींचें सर्व हिंदुस्थानांतून तर नव्हतेंच नव्हतें; पण नुसत्या महाराष्ट्रापुरतेंही पूर्णपणें निर्मूलन करणें त्यांना शक्य नव्हतें. त्यांना जें कांहीं करतां आलें तें इतकेंच कीं, ज्या अधम वृत्तीमुळें आत्मप्रतिष्ठा वाढवावयाला आणि स्वतःच्या संकुचित वैयक्तिक हेतूंसाठीं राष्ट्रीय आणि हिंदु जातीय हितसंबंधाचा बळी द्यावयाला लोक प्रवृत्त होत त्या वृत्ति एकंदर महाराष्ट्रांतील हिंदूंच्या देशभक्तीच्या भावनांना दाबून टाकण्याचें सामर्थ्य येईल इतक्या त्या हिंदु जातींत रुजलेल्या अधोगामी प्रवृत्ति त्यांनीं कमी केल्या. ह्यामुळेंच मराठ्यांच्या इतिहासामध्यें मधून मधून आपसांतील भांडणांनीं उचल केलेली आपल्याला आढळून येते. पण एकंदरींत पुष्कळ आणीबाणीच्या प्रसंगीं व्यक्तींची कृति न पाहतां राष्ट्र ह्या दृष्टीनें पाहिलें तर त्याच्यांतील राष्ट्रीय हिंदुजातीय आणि देशभक्तीच्या भावनाबलानें आपल्या अधोगामी प्रवृत्तींवर विजय मिळविण्यांत आणि त्यांचे पूर्ण निर्मूलन करतां आलें नाहीं तरी त्यांचा निग्रह करण्यांत त्यांना यश मिळालेलें दिसतें. ही अखिल हिंदु जातीच्या कल्याणार्थ झटण्याची वृत्ति; ही हिंदूंची सबंध भूमि परक्या

आणि परधर्मीय जातींच्या दास्यांतून मुक्त करण्याची तळमळ आणि शक्ति; ही आपल्या स्वभावांतील अधम, स्वार्थी आणि वैयक्तिक प्रवृत्तींना आळा घालणारी किंवा त्यांच्याकडूनच आपल्या राष्ट्राच्या आणि आपल्या धर्माच्या हिताचें कार्य करवून घेणारी स्फूर्तिदायक देशभक्ति; ह्या ज्या वरच्या प्रतीच्या भावना मराठ्यांनीं आपल्यामध्यें वाढवून प्रकट केल्या त्यामुळें सर्व राष्ट्रीय सद्‌गुणांत मुसलमानांच्यापेक्षां त्यांना निर्विवाद श्रेष्ठत्व प्राप्त झालें आणि तें इतर सर्व प्रांतांतील हिंदूंच्यापेक्षां प्रबल हिंदुसाम्राज्य स्थापावयाला, वाढवावयाला आणि तगवून धरावयाला विशेष प्रामुख्यानें योग्य झालें. हें साम्राज्य वर सांगितलेल्या गोष्टींमुळेंच मराठी साम्राज्य होणें अपरिहार्य होतें.

कारण, ज्या हिंदुपदपादशाहीच्या ध्येयानें मराठी राष्ट्राचे सर्व प्रयत्न प्रस्फुरित झाले होते त्या हिंदुपदपादशाहीला त्या परिस्थितींत मुळांत अस्तित्वांत यावयालाच महाराष्ट्रपादशाहीही एक होणें अवश्यमेव होतें. हिंदुमात्रांना संघटित करून त्यांचें एक प्रबळ आणि टिकाऊ साम्राज्य हिंदुपदपादशाही प्रस्थापीपर्यंत हिंदूंना एक सर्वसमर्थ राजसत्ता म्हणून स्थान मिळविणें, हिंदूंच्या जातीय कार्याच्या सर्व विद्वेषकांचे होणारे नेटाचे मार परतवून लावावयाला समर्थ होणें आणि आपलें स्वातंत्र्य रक्षण करणें अशक्य होतें. आणि त्या परिस्थितींत महाराष्ट्रांतील लोकांवांचून—मराठ्यांवांचून—समग्र हिंदु जाति ज्या राजकीय दास्यांत बुडून गेली होती त्यांतून तिचा उद्धार करण्याचें अतिमानवी कार्य करण्यासाठीं साधन म्हणून ज्यांचा उपयोग करतां येईल असें एकही केंद्र, असा एकही आंस, असा एकही प्रचंड उत्तोलनदंड नव्हता. उपऱ्या मुसलमानांपेक्षां जरी ते अनंतपटीनें देशभक्त आणि सार्वजनिक हिततत्पर होते; इतकेंच नाहीं तर त्यांच्या देशबांधवांच्या आणि धर्मबांधवांच्या दुसऱ्या कोणाही विभागापेक्षां ते पुष्कळपटीनें अधिक संघटित आणि हिंदूंच्या स्वातंत्र्याचें युद्ध करावयास राजकीय दृष्टया अधिक उत्सुक व समर्थ होते: तरी ते सुद्धां सोळा आणे देशभक्तींत आणि सार्वजानिक हितकारक सद्गुणांत—उदाहरणार्थ, इंग्रजांच्याच मानानें म्हणाना—पुष्कळच कमी पडले आणि म्हणून इंग्रजांनीं सरतेशेवटीं त्यांना जिंकलेंही. असें जरी होतें तरी हिंदुस्थानांतील इतर प्रांतांच्या मानानें पाहतां मराठ्यांचा हिंदूंच्या राष्ट्रीय अभ्युत्थानाच्या चळवळीचीं सर्व सूत्रें आपल्या हातांत ठेवण्याचा आणि हिंदुपदपादशाहीचीं सर्व राजचिन्हें व सत्ता धारण

करण्याचा आग्रह अगदीं योग्य होता. त्यांनीं पहिल्यानें कार्यक्षेत्रांत उडी घ्यावयाचें धैर्य केलें; त्यांनीं इतक्या उत्तम प्रकारें यश मिळविलें; त्यांनीं इतका मोठा स्वार्थत्याग केला; तेव्हां ज्या परिस्थितींत ते होते त्या परिस्थिती-वरून विचार करतां त्यांनीं अखिल भरतखंड आपल्या भगव्या झेंड्याखालीं संघटित करावयाचा उद्देश ठेवणें, इतस्ततः विस्कळीत झालेल्या हिंदूंच्या सामर्थ्याच्या किरणशलाका एक केंद्रांत आणणें आणि लहान लहान हिंदु राज्यें आपल्या समर्थ राजदंडाच्या आधीन राखणें स्वाभाविकच न्याय्य होतें. हिंदूंच्या कार्याचा पुरस्कार करण्याचा भार त्यांनीं आपल्या शिरावर घेतला होता. अखिल हिंदु जातीय दृष्टीनें पाहतां त्यांचें हें करणें योग्य होतें असें मानणें भाग आहे. कारण आम्हीं प्रारंभीं दिलेल्या संक्षिप्त वृत्तांतावरून दिसून येतें कीं, त्यांनीं शत्रूंच्या सर्व आघातांचा प्रतिकार करून हा पुरस्कार अमोघतेनें करावयाला आपण समर्थ आहोंत असें सिद्ध करून दिलें. आपल्या हिंदु लोकांपैकीं दुसऱ्या एकाद्या प्रांतानें पहिल्यानें ह्या संग्रामांत उडी घ्यावयाचें धैर्य दाखविलें असतें आणि एवढी प्रचंड सिद्धि मिळविली असती आणि मग महाराष्ट्राला आपल्यापुढें नतशीर्ष होण्यासाठीं आव्हान दिलें असतें व आपल्या हिंदुसाम्राज्याच्या अंकित व्हावयाला भाग पाडलें असतें तर अखिल हिंदुजातीय दृष्टीनें त्याचें तें करणें निःसंशय तितकेंच समर्थनीय झालें असतें. स्थापन करावयाचें हिंदुसाम्राज्य–हिंदुपदपादशाही–रजपुतांची किंवा शिखांची किंवा तामिळांची किंवा बंगाल्यांची किंवा अगदीं कोळ्यांची पादशाही–साम्राज्य–व्हावयाचें होतें हा महत्त्वाचा प्रश्न नव्हता. जोंपर्यंत ह्यांपैकीं कोणीही आपल्या सर्व लोकांना एकत्र आणून आणि त्यांचें थोर हिंदुसाम्राज्य बनवून हिंदुमात्राच्या कार्याचा इतक्या उत्तम रीतीनें आणि इतक्या सक्षमतेनें पुरस्कार केला असतां तोंपर्यंत त्यांनीं तें साम्राज्य आपल्या विशिष्ट प्रांताच्या, जातीच्या किंवा समाजाच्या नेतृत्वा-खालीं आणि नियंत्रणाखालीं ठेवलें असतें तरीही ते आपल्या तितक्याच आदराला आणि कृतज्ञतेला पात्र झाले असते.

---

प्रकरण २ रें

# त्या परिस्थितींतील सर्वोत्कृष्ट उपाय

" उपाधीचें काम ऐसे, कांहीं साधे कांहीं नासे " —रामदास.

" कांहीं दिवस भयरहित सदोदित स्वराज्य चालविलें
दरिद्र अटकेपार जनांचें ज्यांनीं घालविलें
जलचर, हैदर, नबाब, इंग्रज रण करतां थकले
ज्यांनि पुण्याकडे विलोकिलें ते संपत्तिला मुकले ॥ "

पण ज्या जानपदराज्यांत मराठे, बंगाली, पंजाबी, ब्राह्मण आणि महार ह्यांचें स्वतंत्र वैशिष्टय–मराठेपण, बंगालीपण, पंजाबीपण, ब्राह्मणपण आणि महारपण–पूर्णपणें विलीन होऊन सर्व केवळ हिंदुमात्र राहिले आहेत अशा खऱ्या जानपदराज्यांत सर्व हिंदूंना इच्छेविरुद्ध समाविष्ट व्हावयाला लावावयाच्या जागीं जर मराठ्यांना त्यांचें मन वळवून हिंदुसाम्राज्य स्थापन करण्याचा अधिक श्रेयस्कर मार्ग शोधून काढता आला असता तर ते अधिक देशभक्तिपर झाले नसते का ? तसें करतां आलें असतें तर तें अत्यंत देशभक्तिपर झालें असतें ह्यांत शंका नाहीं. पण एका फटकाऱ्यासरसें हिंदूंचें राजकीय ऐक्य घडवून आणणें शक्य असतें तर मुसलमानांना सिंधुनद ओलांडून येणेंच मुळीं शक्य झालें नसतें. आपण वस्तुस्थिति जशी होती तशी धरून चाललें पाहिजे आणि कोणच्याही लोकांच्या वाइटचांगलेपणाचा त्यांच्या भोंवतालच्या परिस्थितीचा विचार करून निर्णय केला पाहिजे. एकाद्या व्यक्तीप्रमाणें कोणच्याही राष्ट्राला आपल्या भोंवतालच्या परिस्थितीचा स्पर्शही होऊं न देतां तिच्या पूर्णपणें वर उड्डाण मारणें किंवा आपल्या काळच्या सार्वत्रिक वातावरणांत श्वासोच्छ्वास केल्यावांचून राहणें शक्य नसतें. मराठ्यांच्या नेतृत्वाखालीं झालेल्या हिंदु अभ्युत्थानाच्या चळवळींत अगदीं ध्येयभूत परिपूर्णता आणि श्रेष्ठता होती अशी जर कोणी प्रतिष्ठा सांगूं लागलें तर तिला वरील एकांतिक प्रश्न हें अगदीं योग्य प्रत्युत्तर झालें असतें. पण अशी प्रतिष्ठा मिरविणें म्हणजे सत्याचा अपलाप करणें आहे. मराठे माणसेंच होते आणि माणसांतच राहत होते. ते कांहीं देवदूतांत संचार करणारे देवदूत नव्हते. आणि म्हणून आम्हीं सांगितलेंच आहे कीं, सर्व हिंदूंना

समान असलेले राष्ट्रीय दोष कांहीं अंशानें त्यांच्यांतही दृग्गोचर होत होते आणि त्यांना आपला हेतु पार पाडण्यासाठीं अधिक देशभक्तिपर मार्ग काढतां आला नाहीं. हिंदूंपैकीं दुसऱ्या कोणा पोटविभागालाही तसें करतां आलें नाहीं. इतकेंच नाहीं तर दुसऱ्या कोणाला मराठ्यांनीं तें कार्य जितक्या चांगल्या रीतीनें करून दाखविलें तितक्या चांगल्या रीतीनेंही करतां आलें नाहीं. दुसरें असें कीं, कोणाचें चांगल्या गोष्टीकरितां मन वळविणें हें एकट्या-वर अवलंबून नसतें. मन वळविण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीच्या चातुर्या-वर तें जितकें अवलंबून असतें तितकेंच जिचें मन वळवावयाचें आहे त्या व्यक्तीच्या हेतूंच्या प्रामाणिकपणावर आणि नैतिक भावनाशीलतेवरही अवलंबून असतें. मराठ्यांनीं इतर हिंदूंचें नुसतें मन वळवून हें कार्य साधावयाचें मनांत आणलें असतें तरी इतरांनीं आपण होऊन जिच्यांत सर्वांना समान अधिकार आणि समान कर्तव्यें आहेत अशा हिंदुपदपादशाहीच्या नांवासाठीं निर-निराळ्या संस्थानांच्या आणि राज्यांच्या स्वरूपांत असलेलें आपलें स्वतंत्र अस्तित्व नाहींसें करण्याइतकें आपलें मन वळूं दिलें असतें का ? ज्या हिंदूंचीं लहानशीं सिंहासनेंही त्यावर आरोहण करण्यापूर्वींच आपसांतील यादवीच्या रक्तांत नेहमीं चिंब भिजून गेलेलीं आढळत, जे परक्या मुसल-मानांना आणि इंग्रजांना आपलीं घरचीं भांडणें तोडण्यासाठीं वाटेल तेव्हां अनिर्बंधपणें बोलावीत आणि जे आपल्या भावाशीं हस्तांदोलन करण्यापेक्षां आपल्या वेदांना पायाखालीं तुडविणाऱ्या आणि आपल्या देवमूर्ति छिन्न-विच्छिन्न करणाऱ्या मोगलांपुढें मान वांकविणें स्वीकृत करीत त्या हिंदूंमध्यें हा देशभक्तीचा उमाळा कोठून येणार होता ? राष्ट्रीय प्रामाणिकपणाच्या आणि राजकीय प्रगतीच्या इतक्या खालच्या पायरीवर असलेल्या लोकांकडून ते एका उडीसरशीं वरीलप्रमाणें एकांतिक चांगुलपणाच्या समजुतींत अभिप्रेत अस-लेल्या राजकीय विचारांच्या, भावनांच्या आणि आचारांच्या शिखरावर जाऊन बसतील अशी अपेक्षा करणें हें मूर्खपणाचें आहे. आणि त्यांपैकीं केवळ एकालाच–त्याच्या वेळच्या पिढीपैकीं दुसऱ्या कोणाला जें करण्याच्या शक्यतेची कल्पनाही करवली नाहीं आणि जें करण्याचा भार निदान त्याच्या इतका तरी इतरांवरही पडत होता–तें केलें नाहीं म्हणून दोष देणें हें नुसतें अन्याय्यच नाहीं तर वेडगळपणाचें आहे. अशा प्रकारचें आदर्शभूत आणि यौगिकार्यानें यथायोग्य हिंदुसाम्राज्य निर्माण करण्याच्या संबंधांतील अपयशाच्या

दोषाच्या प्रश्नाची चर्चाच करावयाची असेल तर त्या दोषांत सर्व हिंदूंना सारखेंच प्रामुख्यानें वांटेकरी झालें पाहिजे. आणि त्यांतही ज्यांना हिंदुपदपादशाहीचें ध्येय साध्य करून घेण्यांत आणि परकीय व धर्मांध प्रजापीडकांनीं ज्या शृंखलांनीं आंवळून टाकलें होतें त्या शृंखला तोडण्यांत मराठ्यांनीं लावला इतकाही हातभार लावतां आला नाहीं. त्यांच्या पदरीं ह्या दोषाचा मोठा वांटा बांधला पाहिजे.

आणि अशी परिस्थिति होती तरीही एक-हिंदुसत्ता उभारण्याच्या थोर कार्याला हातभार लावण्यासाठीं इतर हिंदुबांधवांचें मन वळविण्याचे प्रयत्न मुळींच केले गेले नाहींत असें नाहीं; आणि आपल्या रजपूत, बुंदेले, जाट इत्यादि उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील सहधर्मीयांपैकीं कांहीं अत्यंत उदात्त पुरुषांनीं त्या प्रार्थनेचा तितक्याच तत्परतेनें स्वीकार केल्याचीं उदात्त उदाहरणेंही घडून आलीं नाहींत असें नाहीं. आपल्या संक्षिप्त इतिवृत्त-कथनांतही असलीं उदाहरणें जागोजाग भरलेलीं आहेत; आणि त्या भागांत आम्ही करीत असलेल्या सामान्य विधानांचें समर्थन करणाऱ्या सर्व महत्त्वाच्या गोष्टी एकदां एकत्र करून सांगून टाकल्यावर पुनःपुन्हा त्यांचा उल्लेख करून आमच्या वाचकांना कंटाळा आणण्याची आमची इच्छा नाहीं.

हिंदुजनतेमध्यें सर्वांगीण राजकीय विचार आणि शिक्षण ह्यांची पुरेशी प्रगति झाली असती आणि तिच्यासाठीं अवश्य तितका अवसर मिळाला असता तर त्यामुळें मराठ-मंडळाची असल्या एकाद्या अखिल हिंदुजातीय सत्तेंत किंवा प्रत्यक्ष हिंदुजानपदसत्तेंतसुद्धां परिणति झाली असती असें निश्चयानें वाटतें; निदान अशी साधार अटकळ तरी बांधतां येते. मराठ-मंडळामध्यें, जसजसें त्यांचें साम्राज्य वाढूं लागलें तसतसें, ह्या वाढत्या लवचिकपणाचें—परिस्थितिप्रवणतेचें—प्रत्येक लक्षण दिसूं लागलें होतें. त्यानें दक्षिणेपासून उत्तरेपर्यंत मराठी नसलेलीं कित्येक लहान आणि मोठीं हिंदु संस्थानें आपल्यामध्यें समाविष्ट करून घेतलीं होतीं आणि त्यांच्यावर आपल्या संयुक्त राजमंडळामध्यें समान अधिकार आणि समान कर्तव्यें सोंपवून त्यांना साम्राज्यसंघटनेंत निश्चित स्थान नेमून दिलें होतें. एक प्रचंड हिंदुजानपद-सत्ताक राज्यपद्धति प्रस्थापित करण्याकरितां संयुक्त राजमंडळाच्या नांवावर आपल्याशीं सहकार्य करण्यासाठीं इतर हिंदु संस्थानांनाही बोलावण्याचें मराठ-मंडळाचे प्रयत्न नेहमीं चालू असत. नाना फडणवीस शके १७२१ (इ. सन

१८००)मध्यें वारले त्याच्या आधींच वस्तुतः बहुतेक सर्व हिंदुस्थान हिंदूंनीं परत जिंकून घेतलें होतें. नेपाळापासून त्रावणकोरपर्यंत विस्तीर्ण प्रदेश हिंदुराजांच्या सत्तेखालीं आणला होता आणि हे सर्व राजेमहाराजे कमीअधिक प्रमाणांत मराठ-मंडळाच्या नियंत्रणाखालीं होते आणि त्यांचें नेतृत्व नेहमींच याच्याकडे असे. इतर हिंदु राज्यांची गोष्टच बोलावयाला नको. प्रत्यक्ष मराठ्यांच्यापेक्षांही राष्ट्रीय सद्गुणांत, देशभक्तींत, चातुर्यांत आणि सामर्थ्यांत इतकें श्रेष्ठ असलेलें इंग्लंडसारखें राष्ट्र अत्यंत अडचणीच्या वेळीं पटावर प्रविष्ट झालें नसतें तर निराळेंच दृश्य दिसलें असतें. महाराष्ट्राचें हिंदुराज्य जें आतां जवळ जवळ हिंदुस्थानचेंच हिंदुराज्य झालें होतें त्याचें मराठ्यांनीं नेहमीं दाखविलेल्या त्यांच्यांतील दुसऱ्याला आपल्यांत मिळवून घेण्याच्या आणि संवर्धनाच्या विलक्षण सामर्थ्यामुळें, प्रांतीय स्वरूप पूर्णपणे नाहींसें झालें असतें आणि त्यांतून सजीव आणि पूर्ण संघटित संयुक्त हिंदु-राज्यमंडळ म्हणजे हिंदुसाम्राज्य परिणत झालें असतें. मुसलमानांच्या हातून हिंदूंचा जो अपमानास्पद पराभव झाला त्यापासून घ्यावयाचें सर्व शिक्षण हिंदूंनीं—विशेषतः मराठ्यांनीं व शिखांनीं घेतलें. आणि मुसलमानांचीं सर्व विशेष आयुधें आपल्या ढालीवर बोथवून पराङ्मुख व्हावीत अशा रीतीनें आपल्या लोकांची सुधारणा करण्यांत आणि आपल्या राष्ट्राची पुनर्घटना करण्यांत त्यांनीं पूर्ण यश मिळविलें. त्याचप्रमाणें त्यांना वेळ मिळाला असता तर त्यांनीं आपल्या युरोपीय प्रतिस्पर्ध्यांत जें जें कांहीं उत्तम होतें तें तें लवकरच आत्मसात् करून घेतलें असतें आणि जपानप्रमाणेंच आपल्या राष्ट्राची अशा रीतीनें पुनर्घटना केली असती कीं, युरोपीयांना बळकावलेली सर्व भूमि सोडून निघून जावें लागतें. युरोपियनांना यश मिळवून देणारा त्यांच्यांतील अत्यंत महत्त्वाचा एक विशेष मराठ्यांच्या ह्यापूर्वींच लक्ष्यांत आला होता. लागलेंच त्यांनीं युरोपियनांनीं चालू केलेल्या सामरिक नियमबद्धतेच्या आणि संघशिक्षेच्या कलेंत जवळजवळ पूर्ण प्राविण्य मिळविलें आणि महादजी शिंदे, बक्षी आणि इतर तसल्याच कर्तृत्ववान् पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं हीं नवीं आयुधें आपणही तितक्याच कौशल्यानें उपयोगांत आणूं शकतों; इतकेंच नाहीं, तर तीं त्यांच्या इतक्याच सक्षमतेनें निर्माण करूं शकतों असें सिद्ध करून दाखविलें. ह्या गोष्टीवरूनच ज्या मराठ-मंडळाची इतक्यांतच एका हिंदुसाम्राज्यांत वाढ झाली होती

त्यानें युरोपियनांत जें जें कांहीं सर्वोत्कृष्ट होतें तें तें आत्मसात् करून घेणें आणि वाढविणें अतिशय संभवनीय होतें. मुसलमानांना त्यानें चोप दिला. त्याप्रमाणें युरोपियनांनाही चोप देणें आणि हिंदुस्थानांतील संयुक्त राज्यांत किंवा त्याहूनही विशेष म्हणजे लहान लहान जर्मन संस्थानांचें संयुक्त जर्मन-साम्राज्य बनलें त्याप्रमाणें संयुक्त हिंदुराज्यांच्या पायावर उभारलेल्या हिंदु-साम्राज्यांत परिणत होणें अतिशय शक्य होतें, हें स्पष्ट होतें.

पण ज्याअर्थी तसें घडलें नाहीं त्याअर्थी आपण जर-तरवर अवलंबून असलेल्या ह्या सर्व कल्पना सोडून दिल्या पाहिजेत आणि इतिहासावरून निष्पन्न होणाऱ्या निश्चित आणि प्रत्यक्ष गोष्टीच घेऊन त्या वेळच्या समाज-कल्पनेच्या मापानें आणि त्या परिस्थितींतील शक्याशक्यतेच्या दृष्टीनें त्या समजून घ्यावयाचा आणि त्यांचें महत्त्व ठरवावयाचा प्रयत्न केला पाहिजे. ह्या ऐतिहासिक मापानें मोजून पाहिलें असतां, आपल्याला त्या वेळच्या हिंदूंना एका उसळीसरशीं हिंदु-प्रजासत्ताक राज्य प्रस्थापित करण्यांत यश आलें नाहीं, एवढ्याच साठीं हिंदूंपैकीं कोणाही पोटविभागाला दोष देता येत नाहीं आणि मराठ्यांना तर नाहींच नाहीं. तसें करणें म्हणजे शिवाजीमहाराजांना ते वायुवाहना (मोटार)मध्यें बसून हिंडले नाहींत म्हणून किंवा जयसिंगाला त्यानें अखिल हिंदुजातीय प्रचारकार्य करण्यासाठीं एक मोठें राजमुद्रणालय स्थापन केलें नाहीं म्हणून दोष देण्यासारखें आहे. अशा प्रकारचा काल्पनिक दोष एक तर सर्वांना सारखा दिला गेला पाहिजे; नाहीं तर कोणालाच देतां कामा नये. तेव्हां ह्या संबंधांत नुसत्या परस्पर सापेक्ष दृष्टीनें गुणावगुणांचा विचार करतां असें दिसून येतें कीं, एकंदर हिंदूंचीच हिंदुजातीय भावना इतक्या उत्कटतेला पोंचली नव्हती कीं, तिच्यामुळें त्यांनीं आपल्या वैयक्तिक, सांप्रदायिक किंवा प्रांतिक स्वतंत्र अस्तित्वाचा हिंदु-जातीय कार्यासाठीं बळी द्यावयाला सिद्ध व्हावें. इतर प्रांतांतील हिंदूंच्या तुलनेनें सापेक्षतः मराठ्यांनीं एक जनसंघ म्हणून आपल्यामध्यें अधिक संघटित सार्वजनिक जीवनक्रमाची आणि अधिक उत्कट राष्ट्रीय भावनांची वाढ केली असली तरीही आणि परकीय धर्मांधतेच्या राजकीय पारतंत्र्यांतून हिंदुधर्माची आणि हिंदुजातीची मुक्तता करण्याच्या थोर आणि पवित्र कार्यावर त्यांची अत्यंत मनःपूर्वक निष्ठा होती आणि त्यांनीं त्याला आपल्याला वाहून घेतलें होतें तरी मराठेसुद्धां त्या राष्ट्रीय किंवा हिंदुजातीय पूर्णतेला साहजिकच

पोंचलेले नव्हते; हळुहळू पण निश्चयपूर्वक त्या ध्येयाकडे त्यांची प्रगति होत होती इतकेंच. ह्या गोष्टीकडे आम्ही दुर्लक्ष करीत नाहीं, आणि तरीही सर्व हिंदुस्थानांतील निरनिराळ्या हिंदुराज्यांची आणि लोकांच्या परस्पर सापेक्ष बलाची अत्यंत काळजीपूर्वक छाननी केल्यावरही इतस्ततः पसरलेल्या हिंदु जीवनाच्या सर्व केंद्रस्थानांपैकीं ज्याच्याभोंवतीं हिंदवी पुनरुज्जीवनाच्या शक्ति संयुक्त होतील आणि यशाचा अल्प तरी संभव वाटेल अशा रीतीनें परकीय बलिष्ठ शत्रूंचा प्रतिकार करतील असा केंद्रबिंदु केवळ महाराष्ट्रच होऊं शकलें असतें असें आढळून येतें. अशा स्थितींत अखिल हिंदुजातीय दृष्टीनेंसुद्धां श्रीरामदासांच्या आणि शिवाजीमहाराजांच्या वेळच्या मराठ्यांच्या धोरणांचें आणि प्रयत्नांचेंच समर्थन करण्यावांचून गत्यंतर रहात नाहीं. पहिल्यानें संपूर्ण महाराष्ट्र हिंदुधर्माच्या ध्वजेखालीं एकत्र करावयाचें; आधीं हिंदुजातीच्या उद्धारासाठीं उत्तोलनदंडासारखा ज्याचा उपयोग होईल, हिंदुपदपादशाहीच्या मंदिराची ज्या पायावर उभारणी करतां येईल असें स्वयंशासित आणि समर्थ मराठी राज्य स्थापावयाचें आणि मग हिंदुस्वातंत्र्याच्या युद्धाचें क्षेत्र महाराष्ट्राच्या मर्यादरेषांच्या पलीकडे वाढवावयाचें—उत्तरेकडे नर्मदेपासून थेट अटकपर्यंत तें न्यावयाचें आणि दक्षिणेकडे तुंगभद्रेपासून समुद्रापर्यंत तें पसरवावयाचें—; आणि अशा रीतीनें मराठी राज्याच्या मर्यादा वाढविण्यासाठीं आक्रमण करून जात असतां इतस्ततः विस्कळित होऊन पडलेलीं हिंदूंच्या शक्तींचीं सर्व केंद्रस्थानें संघटित करून शेवटीं विस्तारलेल्या मराठी राज्यालाच प्रत्यक्ष हिंदवी साम्राज्याचें स्वरूप आणावयाचें; हाच हिंदु जातीला मुक्त करण्याचा आणि हिंदुपदपादशाहीची प्रस्थापना करावयाचा सर्वांत व्यवहार्य आणि सर्वांत परिणामकारक मार्ग आहे असें त्या वेळच्या मराठ्यांना वाटत होतें आणि त्याप्रमाणें आपलें धोरण ठेवून त्यांनीं प्रयत्न केले.

त्या परिस्थितींत यशस्वी होण्याचा अल्प तरी संभव असलेली हीच एक विचारसरणी होती आणि पुढें घडलेल्या गोष्टींमुळें आणि साधलेल्या कार्यांमुळें तिची युक्तता आतां समर्थित झाली आहे. ह्या विचारसरणीचा अवलंब करून कार्याला प्रारंभ केल्यावर हिंदूंपैकींच कांहीं लोकांनीं आणि कांहीं संस्थानांनीं त्यांना विरोध करणें अपरिहार्य होतें. ह्यांच्यापैकीं कांहीं आपल्या पायांतल्या शृंखलांसंबंधीं —मुसलमानांनीं ज्यांच्या योगानें त्यांना दास करून सोडलें

होतें त्या शृंखलांसंबंधीं—इतके निगरगट्ट आणि निर्लज्ज बनले होते कीं, त्या अभिमानाची गोष्ट म्हणून ते मिरवूं लागले होते! मुसलमानांचे ह्या नाहीं तर त्या नबाबाचे, निजामाचे किंवा दिल्लीच्या बड्या पादशहाचे—अंकित आणि युद्ध भांडत असलेले मांडलिक प्रजाजन किंवा दाससुद्धां म्हणवून घेण्यांत त्यांना यत्किंचित् कमीपणा वाटत नसे; पण त्यांच्या डोळ्यांसमोर हिंदु जातीच्या सन्मानासाठीं आणि स्वत्वासाठीं मराठ्यांनीं हिंदुसाम्राज्या-साठीं ज्यांच्याकडून राजनिष्ठेची किंवा खंडणीची मागणी केली, कीं ती त्यांना सहन होत नसे! तेव्हां मराठ्यांच्या घोडेस्वारांकडून त्यांना जें प्राय-श्चित्त मिळत असे त्याचा दोष सर्वस्वीं त्यांच्याच माथ्यावर राहतो. त्यांच्या वागण्यामुळें मराठे त्यांना साहजिकच मुसलमानांचे पक्षपाती आणि साहाय्य-कर्ते समजत व धाकानुळें महाराष्ट्राच्या हिंदुसाम्राज्यसत्तेच्या अधिराज्याला संमति देईपर्यंत किंवा त्यांचा धनी जो मुसलमान नबाब तोच मराठ्यांचा खंडणी देणारा मांडलिक होईपर्यंत त्यांची पाठ सोडीत नसत. मराठ्यांच्या विरो-धकांपैकीं बहुतेकांची जरी अशी स्थिति होती तरी त्यांतही कांहीं असे होते कीं, मराठ्यांशीं जरी त्यांचा विरोध असला तरी अखिल हिंदुजातीय चळ-वळीविषयींच्या जिव्हाळ्याच्या भावना त्यांच्यांतून पूर्ण नष्ट झाल्या नव्हत्या इतकेंच नाहीं तर परक्यांचें येथून निर्मूलन करून हिंदूंचें गेलेलें स्वातंत्र्य परत मिळविण्याची त्यांना मराठ्यांइतकीच तळमळ होती; पण मराठ्यांनीं एकट्यांनींच हिंदुस्वातंत्र्याच्या युद्धाचें नेतृत्व आपण होऊन आपल्याकडे घेऊन बसावें आणि इतर सर्व हिंदूंनीं त्यांच्या साम्राज्यसत्तेपुढें मान नम्र करावी असा हट्ट धरावा हें त्यांना सहन होत नसे. ह्या हिंदुकार्याची तळ-मळ असलेल्या मराठ्यांव्यतिरिक्त इतर हिंदु राजांपैकीं कांहींची विचारसरणी अशी असे कीं, आम्हींच हिंदुस्थानांतील सर्वश्रेष्ठ हिंदुसत्ता कां होऊं नये? आपल्यांपैकीं कांहींच्या पूर्वजांनीं आपल्या राष्ट्राच्या अत्यंत विपन्न काळांत हिंदुकार्याचा पुरस्कार केला होता. आतां मोगलसाम्राज्याला उतरती कळा लागल्यावर प्रत्येकाच्या शक्तीप्रमाणें लहानमोठें हिंदुराज्य स्थापावयाची संधि प्रत्येकालाच अनायासें प्राप्त झाली आहे. मराठे जर आपल्यापुरतें असें राज्य स्थापावयाचा प्रयत्न करीत आहेत तर आम्हींही तसाच प्रयत्न कां करूं नये? त्यांचें हें म्हणणें बरोबर होतें. पण मग मराठ्यांचेंही म्हणणें तितकेंच न्याय्य होतें. अखिल हिंदुजातीय दृष्टीनें विचार केला असतां

त्यांच्यापैकीं प्रत्येकानें आपल्याला जितक्या उत्तम रीतीनें मुसलमानांचा निःपात करतां येईल तितका करणें आणि समर्थ अजेय असें एकच हिंदु-साम्राज्य प्रस्थापितां येत नसेल तर मोगली साम्राज्याच्या जागीं जितकीं लहान किंवा मोठीं हिंदु राज्यें उठवितां येतील तितकीं उठविणें हा त्यांचा अधिकार होता—नव्हे कर्तव्य होतें. पण जेव्हां त्या सर्वांना एका साम्राज्यांत संघटित करण्याचा प्रश्न आला तेव्हां त्या काळच्या विशिष्ट राजकीय परिस्थितींत व तत्कालीन राष्ट्रीय आणि हिंदुजातीय भावनांची वाढ विचारांत घेतां प्रत्येकाची दुसऱ्याच्या हें कार्य घडवून आणण्याच्या सामर्थ्याविषयीं निश्चिती नसल्यामुळें आणि दुसऱ्याच्या त्यासंबंधींच्या हेतूंच्या शुद्धतेविषयीं वृत्ति संशयित असल्यामुळेंही एकमेकांशीं विरोध येणें अपरिहार्य झालें. आपल्या राष्ट्रीय पराक्रमामुळें आणि त्यांच्या योगानें आपण केलेल्या उज्ज्वल कार्यामुळें आपण हिंदुसाम्राज्याचें नेतृत्व धारण करण्याची आपली योग्यता सिद्ध केली आहे असें मराठ्यांना वाटलें. मुसलमानांशीं, पोर्तुगिजांशीं, इंग्रजांशीं, फ्रेंचांशीं आणि इतर सर्व हिंदुकार्याच्या शत्रूंशीं अटीतटीचें भांडण आणि तेंही विजयशाली भांडण भांडून त्यांनीं राष्ट्र ह्या स्वरूपांत उज्ज्वल गोष्टी करून दाखविल्या होत्या. पण ह्या इतर सद्विचारी हिंदु राजांना वाटे कीं, म्हणून मराठ्यांनीं त्यांची इच्छा नसतांना जिंकल्याचें चिन्ह म्हणून आपली लाडकी चौथाई इतर हिंदुराज्यावर लादावी आणि त्यांचें वैयक्तिक स्वातंत्र्य गिळंकृत करावें हें समर्थनीय ठरत नाहीं. त्यांना तसें वाटणें स्वाभाविक होतें. तसेंच ज्यांनीं इतकें करून दाखविलें, त्या मराठ्यांनीं-ही आणखी अधिक करून दाखविण्याची आकांक्षा धरावी, आपली सत्ता संघटित करून एकमुखी साम्राज्यसत्ता प्रस्थापित केल्यानेंच केवळ राष्ट्र आणि धर्म ह्या स्वरूपांत हिंदूंचें स्वातंत्र्य राखण्याची आणि राजकीय व सामाजिक अस्तित्व ठेवण्याची आशा आहे असा मराठ्यांचा मनापासून विश्वास असावा हेंही तितकेंच स्वाभाविक आहे. आणि सत्ता संघटित करावयाची म्हणजे सर्व घटकांना त्या सार्वभौम आणि सर्वश्रेष्ठ सत्तेखालीं आणावयाचें, तिच्या नियंत्रणांत ठेवावयाचें आणि तिची आज्ञा म्हणून किंवा तिच्या हितासाठीं त्यांना इच्छेनें किंवा इच्छा नसतांनाही स्वार्थत्याग करावयाला लावावयाचें ह्या गोष्टी अवश्यमेव आल्याच. तेव्हां ज्याअर्थीं इतर सर्व हिंदुमंडळींत मराठ्यांचें साम्राज्य हें एकटें संघटित राज्य हिंदुपदपाद-

शाहीची स्थापना करून ती चालवावयाला समर्थ होतें आणि त्यांनीं त्याप्रमाणें जवळजवळ करून दाखविलेंही, त्याअर्थी हिंदुजातीच्या आत्यंतिक हिताच्या दृष्टीनेंच इतर सर्व हिंदुसत्तांनीं मराठी साम्राज्याच्या अंकित असणें भाग आहे असें मराठ्यांना वाटे. अत्यंत पराक्रमानें त्यांनीं हिंदुधर्माच्या आणि हिंदुजातीच्या कार्याचा पुरस्कार केला होता. आणि परकीय शत्रूला अत्यंत कडक शिक्षा लावली होती; तेव्हां आपण इतकें शौर्य गाजवून आणि आत्मयश करून उभारणी केलेल्या हिंदुसाम्राज्याचें नेतृत्व आपल्याकडे असणें आणि त्याचें स्वामित्व आपण सोडून न देणें हा आपला अधिकारच आहे असें त्यांचें मत होतें. मराठ्यांनीं जें करण्यासाठीं चंग बांधला आणि करून दाखविलें तें करून दाखविण्याचें किंवा धाडस करण्याचें आणि परकीय शत्रूंचें अत्यंत घातकी आक्रमण जिला परतावितां येईल इतकी मोठी मराठी सत्ता निर्माण करावयाचें सामर्थ्य आपल्यांत नाहीं अशी निश्चितीं झाली तरी आणि अशी प्रतीति आल्यावरही इतर हिंदुराज्यें त्यांचा हा अधिकार स्वाभाविकपणेंच अमान्य करीत. अशा परिस्थितींत एकमेकांची शक्ति कसाला लावूनच हिंदुसाम्राज्याचा पुढारी व्हावयाला कोण योग्य आहे ह्या प्रश्नाचा निर्णय लावणें शक्य होतें. तेव्हां जीं हिंदु संस्थानें आणि जे हिंदु लोक स्वतःच हिंदु राज्यें निर्माण करावयाचा प्रयत्न करीत होते आणि आतांपर्यंत अखिल हिंदुजातीय दृष्टीनें त्यांनीं केलेल्या प्रयत्नासाठीं ज्यांचें अभिनंदन करणें युक्त आहे अशा कांहीं इतर हिंदु राजांशीं आणि मराठ्यांशीं केव्हांना केव्हां मधूनमधून विरोध येणें अपरिहार्य होतें. राष्ट्रीय संघटनेच्या आणि राजकीय एकीकरणाच्या सर्व थोर चळवळींना, तसलें राष्ट्रीय संघटन घडवून आणण्याच्या इच्छेची तीव्रता आणि राष्ट्रीय कार्याच्या प्रगतीसाठीं केवढाही मोठा वैयक्तिक स्वार्थत्याग करावा लागला तरी तो विशेष नाहीं असें समजणाऱ्या देशभक्तीच्या स्फूर्तीची उत्कटता ह्यांच्या व्यस्त प्रमाणांत असल्या विषादजनक पण अवश्यमेव परिस्थितीशीं तोंड देणें भाग पडतें.

आपण मराठ्यांचेंच स्वतःचें उदाहरण घेऊं. महाराष्ट्रांतील मुसलमान सत्तेच्या अंकित असलेल्या आणि त्यांचे मांडलिक म्हणून राज्यकारभार चालविणारे लहानलहान हिंदु राजेरजवाडे, संस्थानिक आणि मांडलिक आपलें सापेक्ष स्वातंत्र्य राखण्याच्या संबंधांत अत्यंत दक्ष असत आणि त्यांच्यापैकीं कांहींच्या मनांत भोंसल्यांप्रमाणेंच मुसलमानी शृंखला तोडून फेंकावयाची आणि स्वतंत्र

हिंदु राजे म्हणून प्रस्थापित व्हावयाची महत्त्वाकांक्षाही होती. पारतंत्र्यांतील पाशवी सुखसोयी आणि दास्यांतील आराम सोडून खडबडून स्वतः जागें होणें किंवा दुसऱ्यांनीं आपणाला जागें करणें ज्यांना आवडत नव्हतें असे अधः-पतित क्षुद्र लोक आणि त्याप्रमाणेंच जे आपल्यापुरते ते दास्यचे बंद तोडण्या-चा प्रयत्न करीत होते ते उदारचरित महानुभाव हे दोघेही शिवाजीमहाराजांच्या आणि त्यांच्या शूर अनुयायांच्या विरुद्ध रागानें उठले आणि त्यांनीं 'मराठा तितुका मेळवा'वयाच्या आणि महाराष्ट्राचे संयुक्त आणि समर्थ हिंदु साम्राज्य स्थापावयाच्या त्यांच्या प्रयत्नांना विरोध केला. शिवाजीमहाराजांच्या कार्य-निष्ठेविषयीं त्यांना संशय वाटे; हिंदुमात्रानें एक व्हावयाच्या आणि राष्ट्रीय संघटनेच्या आवश्यकतेसाठीं शिवाजीमहाराजांनीं मराठ्यांना वारंवार केलेल्या विनंत्या म्हणजे हिंदूंना मुक्त करावयाच्या आणि महाराष्ट्राचें स्वातंत्र्य परत मिळवावयाच्या पांघरुणाखालीं स्वतःचें महत्त्व वाढविण्याचे भोंसल्यांच्या गुप्त महत्त्वाकांक्षेचे डाव आहेत, असें ते साहजिकपणें समजत. त्यांच्यापैकीं कांहींनीं असाच खोंचक प्रश्न केला कीं, त्यांनीं भोंसल्यांचें अंकित झालें पाहिजे अशी भोंसल्यांनीं अपेक्षा कां करावी, शिवाजीची इच्छा जर खरोखर हिंदूंचें साम्राज्य स्थापावयाचें एवढीच आहे तर आम्ही त्याच्यापेक्षां सामा-जिक प्रतिष्ठेनें निःसंशय श्रेष्ठ आहों तेव्हां त्यानें आम्हांलाच आपले नेते कां समजूं नये आणि आम्हांलाच छत्रपति म्हणून राज्याभिषेक कां करूं नये ? जे दासवृत्तीचे आणि नीच लोक होते त्यांना ह्या हिंदु 'उपटसुंभां'च्या उर्मट आव्हानाला तोंड देण्यासाठीं प्रत्यक्ष इतर मुसलमानांशीं मिळण्याची किंवा त्यांचें साहाय्य मागण्याचीही लाज वाटली नाहीं. जे इतक्या अधोगतीला गेले नव्हते, पण जे ह्या महदांदोलनाचें नेतृत्व चालविण्याच्या शिवाजीच्या सामर्थ्याविषयीं किंवा तें आपल्याकडे घेण्याच्या युक्ततेविषयीं साशंक होते त्यांनीं त्याच्याविरुद्ध करावयाचीं युद्धें आपलीं आपणच करावयाचा कमी निषेधार्ह मार्ग पत्करिला. ह्यामुळें आपली तरवार कधींकधीं हिंदूंच्या विरुद्ध निष्कोषित करण्याची आवश्यकता शिवाजीमहाराजांना प्राप्त झाली; तेव्हां शिवाजीमहाराजांना त्यासाठीं जो विशेष दोष लावण्यांत येतो त्यापासून त्यांना निर्मुक्त केल्यावांचून इतिहासाला गत्यंतर नाहीं. इतकेंच नाहीं, तर हिंदु मानववंशाचे, सर्वप्रमुख पुरस्कर्ते, हिंदुधर्माचे संरक्षणकर्ते आणि मराठे लोकांच्या राज्याचे आणि राष्ट्राचे, प्रस्थापनकर्ते होण्याचा त्यांचा मानही

कोणाला काढून घेणें शक्य नाहीं. लहानसान सर्व संस्थानिकांना जिंकून त्यांची एक संघटित आणि राष्ट्रीय सत्ता बनविणें राष्ट्रीय कल्याणाच्या दृष्टीनें अवश्य होतें. जर इतर हिंदु राजांची तसें करावयाची सिद्धता असती तर त्यांनाही शिवाजीमहाराजांनीं उठावणी करावयाच्यापूर्वीच सर्वांच्या साधारण शत्रूच्या विरुद्ध बंड करून उठतां आलें असतें. शिवाजीमहाराजांनीं केलें तसें धाडस करतां आलें असतें, त्यांनीं साधलेली कार्यसिद्धि साधतां आली असती, समर्थ आणि संघटित मराठी राज्याची प्रस्थापनाही करतां आली असती. मग शिवाजीमहाराजांना करावयाला कांहीं उरलें नसतें ! किंवा त्यांच्यांत तसें सामर्थ्य असतें तर शिवाजीमहाराजांशीं विरोध करूनही त्यांना हें साधतां आलें असतें आणि अशा राष्ट्रसंस्थापक ह्या दृष्टीनें त्यांच्यापेक्षां आपलें श्रेष्ठत्व सिद्ध करतां आलें असतें.- असें झालें असतें तर इतिहासानें आज ज्याप्रमाणें तो शिवाजीमहाराजांचें आणि त्यांच्या संवगड्यांचें समर्थन करतो आहे त्याप्रमाणें त्यांचेंही समर्थन केलें असतें ! पण ज्याअर्थीं दुसऱ्या कोणाही मराठी संस्थानिकाला किंवा पुरुषाला स्वतःच्या दोषामुळें किंवा कोणच्याही कारणामुळें तें करतां आलें नाहीं त्याअर्थीं त्यांनीं तें त्यांच्यासाठीं शिवाजीमहाराजांना निमूटपणें करूं द्यावयाला पाहिजे होतें आणि ज्याअर्थीं त्यांनीं असल्या राष्ट्रीय उठावणीचा भार आणि त्यांतील धक्केचपेटे शिवाजीमहाराजांवर लादले होते त्याअर्थीं त्या चळवळीचें नेतृत्व आपल्याकडे घ्यावयाचा आणि अखिल महाराष्ट्राचा छत्रपति म्हणून स्वतःला अभिषेक करून घ्यावयाचा अधिकारही त्यांनीं त्यांच्याकडेच सोंपवावयाला पाहिजे होता. राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें जो सर्वांत प्रभु—समर्थ आहे त्यावांचून दुसरा कोण राष्ट्राचा प्रभु—राजा - व्हावयाला पाहिजे ?

ज्या कारणांसाठीं आपल्या कांहीं मराठी बांधवांच्याच विरुद्ध प्रसंगोपात्त आपली तरवार निष्कोषित करावयाच्या खेदकारक पण अपरिहार्य आपत्तीला सादर झाल्याच्या विशेष अपराधांतून किंवा दोषांतून शिवाजीमहाराजांना निर्मुक्त करावें लागतें किंवा भिन्न भिन्न शिख—जथ्यांना बलपूर्वक आपल्या आधीन करून घेण्याच्या संबंधांत रणजितसिंगाचें वर्तन समर्थनीय ठरतें त्याच कारणांसाठीं मराठ-मंडळालाही गडबड करणाऱ्या हिंदु राजांना वठणीवर आणून आपल्या साम्राज्याचे मांडलिक बनविण्याच्या संबंधांतही दोषमुक्त करणें भाग आहे. त्याबरोबरच हेंही आम्ही पुनः स्पष्टपणें निदर्शनास आणून देतों कीं,

त्या हिंदु राजांपैकीं सर्वांना नाहीं, पण कांहींना तरी त्यांनीं मराठ्यांच्या सार्वभौमत्वाला विरोध केला ह्यासाठीं दोष देतां येत नाहीं. कारण देशांतील राजकीय आणि अखिल हिंदुजातीय कल्पनांच्या त्या वेळच्या सर्वसाधारण प्रगतीचा विचार करतां आणि याप्रमाणेंच आपल्यापुरतीं स्वतंत्र हिंदु राज्यें प्रस्थापित करावयाच्या त्यांच्या स्वतःच्या महत्त्वाकांक्षा लक्षांत घेतां आपल्या वैयक्तिक स्वातंत्र्याच्या संबंधांत त्यांनीं इतकें दक्ष असणें योग्य होतें आणि स्वाभाविकही होतें. पण त्या वेळीं मानववंश म्हणून, विशिष्ट संस्कृति म्हणून, धर्म म्हणून, राष्ट्र म्हणून, हिंदूंचें प्रत्यक्ष अस्तित्वच समर्थ, संघटित आणि केवळ हिंदुजातीय साम्राज्य प्रस्थापित करण्यावर अवलंबून होतें मग तें साम्राज्य एक राजसत्ताक असो कीं संयुक्तसत्ताक असो, एकतंत्री असो कीं बहुतंत्री असो, बंगाली असो कीं रजपुती असो, तामिली असो कीं तेलगु असो अखिल हिंदुजातीय, केंद्रनिष्ठ आणि सर्वसमर्थ असें असावयास पाहिजे होतें. आणि सर्व हिंदु लोकांमध्यें केवळ मराठेच हिंदुजातीच्या सर्व शत्रूंचा पराभव करून तें साम्राज्य स्थापावयाला आणि चालवावयाला समर्थ होते. तेव्हां हिंदूंच्याच विरुद्ध त्यांना कधीं कधीं आपल्या बळाचा उपयोग करावा लागला ह्याविषयीं विशेष दोष किंवा भार आपल्याला मराठ्यांच्या माथीं मारतां येत नाहीं. ह्यांत दोष असेल तर त्यामध्यें आम्हीं पूर्वीं म्हटलें त्याप्रमाणें, सर्व हिंदूंनीं सारखेंच वांटेकरी झालें पाहिजे किंवा कोणालाच दोष देतां कामा नये; निदान एकट्या मराठ्यांच्या माथीं तरी तो मारणें शक्यच नाहीं. हिंदूंच्या स्वातंत्र्याच्या युद्धांत पुढाकार घेण्याच्या आणि एक–हिंदु-साम्राज्य प्रस्थापावयाच्या त्यांच्या पात्रतेमुळें इतर सर्व हिंदु लोकांनीं आपल्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षा, क्षुद्र स्वार्थ सोडून द्यावे आणि त्यांचें सार्वभौमत्व स्वीकारावें–आणि ते होऊन स्वीकारीत नसतील तर त्यांना तसें स्वीकारावयाला भाग असावें अशी अपेक्षा करण्याचा अधिकार त्यांना प्राप्त झाला होता.

## प्रकरण ३ रें

# प्राचीन आणि अर्वाचीन इतिहासाच्या माहितीच्या अनुरोधानें निरीक्षण

" ज्या प्रकारें वानरांकरवीं लंका घेवविली त्याप्रकारें हे गोष्ट झाली. सर्व कृत्यें ईश्वरावतारासारखीं आहेत. जे सेवक हे पराक्रम करीत आहेत त्यांचे जन्म धन्य आहेत. जे कामास आले त्यांनीं तो हा लोक आणि परलोक साधिला ! हे तर्दुद, हे मर्दुमकी, या समयांत हे हिंमत ! ही गोष्ट मनींही कल्पवत नाहीं !"

—ब्रह्मेंद्रस्वामींचा पत्रव्यवहार.

ह्याच कारणासाठीं आपल्या पूर्वजांनीं चक्रवर्तित्वाच्या पद्धतीचें, इतर सर्व राजांना जिंकून दिग्विजय करणाऱ्या हिंदु विजेत्यांचा, सार्वभौमत्वाचीं सूत्रें चालविण्याचा आणि अखिल भारताचा राजकिरीट मस्तकावर धारण करण्याच्या अधिकाराचें केवळ समर्थनच केलें नाहीं तर तिला पवित्र पदवीला नेऊन बसविलें. त्या पद्धतींत दोषस्थलें पुष्कळ होतीं आणि तिच्या बरोबर संकटपरंपरेचा संभव उघडउघड होता. इतकें असूनही त्या वेळच्या परिस्थितींत जिच्यायोगानें सबंध हिंदुजातीला राजकीय एकीकरणाचें आणि सार्वजनिक जीवनाच्या एकत्वाचें शिक्षण देतां येईल अशी राष्ट्रीय संस्था हळुहळू परिवर्धित करण्यासाठीं आपल्या पूर्वजांनीं शोधून काढलेल्या अनेक साधनांपैकीं अत्यंत सर्वक्षम असें साधन म्हणून ह्या चक्रवर्तिपदाच्या कल्पनेचा उपयोग झाला. हिंदु राष्ट्राची धुरा धारण करावयाला सर्वांत योग्य असलेल्या पुरुषाला, संघटित सत्तेला किंवा लोकसमूहाला नेहमीं अग्रभागीं आणलें, सर्वसामान्य सामर्थ्याच्या व्यक्तींना, राष्ट्रीय हितसंबंधाला हानि पोंचविणाऱ्या, आपल्या योग्यतेहून पलीकडे उड्डाण मारणाऱ्या महत्त्वाकांक्षांना आळा घालावयाला भाग पाडलें आणि अखिल हिंदुस्थानच्या पुढारीपणाचा मान आणि त्यांच्या बचावाचा भार त्या काळानें उत्पन्न केलेल्या सर्वांहून अत्यंत योग्य आणि समर्थ अशा पुरुषाच्या स्वाधीन केला. तिनें राष्ट्रांतील सर्व नैतिक शक्ति एकत्र करून सर्वांत समर्थ पुरुषाला त्यांचा पाठिंबा मिळवून दिला आणि तिच्यामुळें समाजांतील त्याच्याहून 'अयोग्य आणि

राष्ट्राचें धुरीणत्व घ्यावयाची अधिकाराची ज्यांची प्रौढी वंशोत्पन्नतेवर किंवा केवळ असूयेवर प्रतिष्ठित असते अशा गर्विष्ठ, महत्त्वाकांक्षी व निरोधक व्यक्तींना राष्ट्रीय कर्तव्य म्हणून त्याच्यापुढें नम्र व्हावयाला भाग पाडलें. ह्यामुळें हिंदूंच्या राजकीय सामर्थ्याचा मध्य ह्या प्रांतांतून त्या प्रांतांत आज हस्तिनापुराला तर उद्यां पाटलीपुत्राला, पाटलीपुत्राहून उज्जयिनीला, उज्जयिनीहून प्रतिष्ठानला, प्रतिष्ठानहून कनोजला, तेथून पुनः दुसऱ्या ठिकाणीं अशा रीतीनें वेळोवेळीं हिंदु-साम्राज्याचें संरक्षण करण्याची पात्रता आणि सार्वजनिक व संघटित शक्ति जेथें वास करीत असेल तेथें तेथें पालटत असे. जेव्हां जेव्हां राष्ट्राच्या गरजेप्रमाणें सर्वसमर्थ सार्वभौम सत्ता प्रस्थापित होणें अवश्य होई तेव्हां तेव्हां हिंदुलोकांतील नैतिक शक्ति जणुं काय स्वाभाविकपणेंच हिंदु विश्वविजेत्यांच्या ध्वजेभोंवती एकत्र होत; त्या मानासाठीं विरोध करणाऱ्या इतर सर्व हिंदु प्रतिस्पर्ध्यांशीं त्याला युद्ध करावें लागे आणि त्यांचा पराभव करावा लागे. त्यासाठीं तो अपराधी समजला जात नसे; इतकेंच नाहीं तर ज्यावर आपल्या मातृभूमीच्या आणि कुटुंबांच्या संरक्षणाचा आणि बचावाचा भार निर्भरपणें टाकतां येईल असा सर्वोत्कृष्ट पुढारी शोधून काढावयाची त्या परिस्थितींत जी व्यवहार्य अशी तीच एक कसोटी आहे असें सर्वजण समजत असत. तसेंच त्या सर्वांत पराक्रमी पुरुषाचें आपल्यावरील आधिराज्य मान्य करविण्यापूर्वी त्याला जे प्रतिस्पर्धी रणांगणावर युद्धासाठीं आव्हान देत त्यांचेंही वागणें कोणी आक्षेपार्ह समजत नसे. जरी श्रीहर्ष आणि सत्याश्रय पुलकेशी ह्यांचे प्रतिस्पर्धी त्यांच्यासारखे हिंदु होते, इतकेंच नाहीं तर प्रत्यक्ष त्यांच्या जातीचे किंवा कधीं कधीं तर रक्तसंबंधाचे नातलगच होते, तरीही त्यांना जिंकून आपले कर देणारे मांडलिक करीपर्यंत हर्षाला उत्तरेकडे आणि पुलकेशीला दक्षिणेकडे आपलें साम्राज्य संघटित करतां आलें नाहीं. हर्ष पुलकेशीच्या ह्या प्रतिस्पर्ध्यांना आपण दोष देत नाहीं, कारण मनुष्यस्वभावाप्रमाणें त्यांचें वागणें स्वाभाविक होतें; किंबहुना हर्ष-पुलकेशींच्या दिग्विजयांत दुसऱ्या उच्च अशा राष्ट्रीय हेतूंचा कांहीं प्रश्न उत्पन्न होत असल्यामुळें त्यांनीं केवळ म्हटल्याबरोबर ज्यांनीं आपलें वैयक्तिक स्वातंत्र्य त्यांच्या चरणावर वाहिलें नाहीं त्यांचें वागणें वीरवृत्तीचेंच होतें. पण जरी त्यांचें वर्तन आक्षेपार्ह समजतां आलें नाहीं तरीही हर्ष आणि पुलकेशी ह्यांनीं असलीं दोन थोर आणि समर्थ हिंदुसाम्राज्यें स्थापण्यांत यश मिळवून आणि त्यांच्याद्वारें हिंदुजनतेला

जें राजकीय विचारांचें आणि जीवनाचें शिक्षण देऊन जी अतुलनीय राष्ट्रसेवा केली तिचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करावयाला आपल्याला मुळींच अनमान वाटत नाहीं. इतकेंच नाहीं, तर पुढें ज्या वेळीं हर्ष आणि पुलकेशी एकमेकांचें बळ कसाला लावण्यासाठीं एकमेकांसमोर युद्धाला उभे राहतात त्या वेळीं एकादा मल्लश्रेष्ठ किंवा रणधुरंधर आपल्याच दोन शिष्यांत किंवा तुकड्यांत चाललेलें युद्ध त्यांना त्याचें शिक्षण देण्याच्या हेतूनें, किंवा जेव्हां आणि जर तसा प्रसंगच येऊन ठेपेल तर आणि तेव्हां शत्रूंशीं दोन हात करावयाचें कार्य त्या दोहोंपैकीं कोणावर विश्वासानें सोंपवून देतां येईल हें शोधून काढण्याच्या बुद्धीनें ज्याप्रमाणें ती एक आवश्यक आपत्ति आहे असें समजून समर्थनीय समजतो, त्याप्रमाणें आपण अखिल हिंदुजातीय दृष्टीनें ह्या दोघां वीरश्रेष्ठांच्या अंतर्युद्धाचें दृश्य समर्थनीय समजतों; इतकेंच नाहीं, तर वात्सल्याच्या निःपक्षपातीपणानें त्याचें अवलोकन करतों. जर हिंदुस्थानांत आणि आपल्या हिंदुजातींत कांहीं राष्ट्रीय उपजतबुद्धि आली असेल, आपल्यांत कितीही भेद असले तरी आपण तत्त्वतः एकराष्ट्र आहों, आपल्या धमन्यांतून एकरक्त वाहत आहे, आपली पवित्र भाषा एक आहे, आपलें राजकारण एक आहे, आपलें तत्त्वज्ञान एक आहे, आपल्या समाजसंस्था एक आहेत, आपले आचारविचार एक आहेत. अशा भावना उत्पन्न झाल्या असतील तर, त्याचें मुख्य कारण म्हणजे चक्रवर्तित्वाच्या संस्थेमुळें पोसलीं गेलेलीं हीं विस्तीर्ण साम्राज्येंच होत हें निःसंशय आहे. ह्या साम्राज्यांचे मध्यबिंदु जसजसे काश्मिरांतून कनोजला आणि पाटलीपुत्राला, कांचीला, मदुरेला आणि कल्याणाला पालटत गेले, तसतसे त्यांनीं आपल्या प्रांतीय जीवनाचे भिन्न भिन्न झरे आपल्याबरोबर इकडून तिकडे घेऊन गेले आणि त्यांना एकत्रित करून त्या सर्वांचा एक प्रबळ राष्ट्रीय प्रवाह बनविला. ह्या त्यांच्या कार्यामुळें आपल्या इतिहासांतील ह्या सर्व प्राचीन साम्राज्यांचें आपल्याला महत्त्व वाटतें आणि रणांगणावर पराक्रम गाजवून जे दुर्दैवानें जिंकले गेले त्यांचें आणि पराक्रम करून जे विजयी झाले त्यांचें दोघांचेंही आपण कौतुक करतों. हर्ष आणि पुलकेशी हीं आपल्या इतिहासांतलीं अत्यंत आदराचीं नांवें आहेत. मगधांच्या किंवा आंध्रांच्या किंवा आंध्रभृत्यांच्या, किंवा राष्ट्रकूटांच्या किंवा भोजांच्या किंवा पांडवांच्या साम्राज्यांपैकीं एकालाही जरी कांहीं लहान हिंदु राज्यांना जिंकून आपलें मांडलिक केल्यावांचून आणि इतरांना पूर्णपणें

आत्मसात् केल्यावांचून एक प्रबल हिंदुसाम्राज्य म्हणून आपली वाढ करून घेतां आली नाहीं तरी ह्या सर्व साम्राज्यांनीं केलेल्या पराक्रमाचा आपण अभिमान बाळगतों. आज आपण ज्यांना प्रांतिकदृष्ट्या भिन्न भिन्न प्रदेश म्हणून समजूं लागलों आहों त्याच निरनिराळ्या प्रांतांना जिंकून घेऊन त्यांच्या जिवावर जरी ह्या साम्राज्यांनीं आपलें वैभव वाढविलें हें आपल्याला माहीत असलें तरी हें राजकीय ऐक्य साधण्यासाठीं त्यांनीं अधिक देशभक्तीचा आणि अधिक प्रशस्त मार्ग कां शोधून काढला नाहीं; म्हणून प्रश्नांचा मारा करून त्यांना भंडावून सोडीत बसत नाहीं. तेव्हां ज्या मराठ्यांच्या उठावणीनें ह्या प्राचीन साम्राज्यांपैकीं कोणापेक्षांही अधिक विस्तृत आणि अधिक बलिष्ठ हिंदुसाम्राज्य निर्माण करण्यांत यश मिळवलें आणि तेंही अंतःकलहांत आणि आपसांतील युद्धांत राष्ट्रांतील लोकांच्या सांडाव्या लागणाऱ्या रक्ताचे किती तरी अल्प प्रमाणांत मूल्य देऊन मिळविलें, तिला अगदीं त्याच कारणांसाठीं आपण सर्व हिंदूंनीं, मग आपला प्रांत कोणचाही असो, पंथ कोणचाही असो, जात कोणचीही असो तितकाच मान दिला पाहिजे, तिच्याकडे तितक्याच कौतुकानें बघितलें पाहिजे आणि तिच्याविषयीं तितकाच आदर बाळगिला पाहिजे.

नाहीं; तिचें महत्त्व त्यांच्यापेक्षाही अधिक आहे. कारण ज्याअर्थीं मराठ्यांच्या उठावणीला कारणीभूत झालेली तीव्र राष्ट्रीय परिस्थितीची निकड ही अगदीं परमावधीला गेली होती, त्याअर्थीं अखिल हिंदुजातीय दृष्टीनें विचार करतां हर्ष किंवा पुलकेशी ह्यांच्या दिग्विजयांचें समर्थन ज्या प्रकारें करतां येतें त्यापेक्षां किती तरी उदात्त तत्त्वांवर मराठ्यांच्या ह्या प्रयत्नांचें, युद्धांचें आणि विजयांचें नैतिक समर्थन करतां येतें. केवळ उत्साह किंवा दिग्विजयाची हाव म्हणून कांहीं त्यांनीं ह्या कार्यासाठीं तरवार निष्कोषित केली नाहीं. केवळ चक्रवर्तिपदाचें ऐश्वर्य स्वतःसाठीं मिळवावें म्हणून कांहीं त्यांनीं इतरांना जिंकून आपल्या सत्तेखालीं आणलें नाहीं. त्या वेळीं राष्ट्र म्हणून, एक स्वतंत्र धर्म म्हणून, हिंदूंनीं कसें जिवंत राहावयाचें असा प्रश्न उत्पन्न झाला होता! उत्तरेकडील कविभूषण भूषण कवीनें 'काशीजीकी कला जाती, मथुरा मशीद होती, शिवाजी न होते तो सुन्नत होति सबकी' म्हणून जें वर्णन केलें आहे तें कांहीं पोकळ कविप्रशंसा नाहीं! एकादी गोष्ट पुराणकालीं घडली असली तर तिच्याविषयीं तिच्या जुनाटपणामुळेंच तिच्या भोंवतीं मनुष्य एक पवित्रतेचें तेजोवलय निर्माण करतो पण तीच आपल्या देखतची किंवा अलीकडे झालेली

असली म्हणजे तिचें महत्त्व किंवा पावित्र्य तितकें माणसाला वाटत नाहीं असें कधीं कधीं होतें, नाहीं तर मराठ-मंडळानें हिंदु-हितसंबंधाची जी महत्त्वाची सेवा केली ती विक्रमादित्याच्या, शालिवाहनाच्या किंवा प्रत्यक्ष चंद्रगुप्ताच्या परम वैभवाच्या काळांत आपल्या प्राचीन हिंदु वीरांनीं केलेल्या सेवेपेक्षां तत्त्वतः यत्किंचितही कमी महत्त्वाची नाहीं आणि प्रमाणानें तर किती तरी मोठी आहे. चंद्रगुप्तानें प्रस्थापित केलेलें प्रचंड साम्राज्य पांडवांनंतरच्या हिंदुस्थानच्या इतिहासांत वर्णन केलेल्या इतर साम्राज्यांपेक्षां वैभवांत आणि सामर्थ्यांत निःसंशय अत्यंत श्रेष्ठ होतें, पण जी राष्ट्रीय आपत्ति दूर करण्यासाठीं तें अस्तित्वांत आलें ती मराठ्यांच्या वेळेपेक्षां किती तरी क्षुद्र स्वरूपाची होती आणि त्याला उपलब्ध असलेलीं साधनें मराठ्यांच्या उठावणीपेक्षां किती तरी अधिक आणि कार्यक्षम होतीं. शिकंदराच्या भारतविजयाचीं पाश्चात्य इतिहासकार मोठीं चटकदार वर्णनें करतात; पण हा भारतविजय म्हणजे नुसत्या एका कोपऱ्याचा केवळ पंजाबचा विजय आहे! हिंदुसत्तेच्या पाटलीपुत्राला असलेल्या मुख्य केंद्रास त्या आघाताला स्पर्शही करतां आला नाहीं. साम्राज्याधिपति नंदाला म्लेंच्छांना हिंदुभूमींतून हाकलून द्यावयाचें कर्तव्य पार पाडतां आलें नाहीं. लागलींच आर्य चाणक्यांच्या बुद्धिमत्तेनें आणि चंद्रगुप्ताच्या बाहुबलानें नंदांना आपलें उच्च पद सोडून देणें भाग पाडलें, साम्राज्याचा भार आपल्यावर घेतला आणि ह्या साम्राज्याचीं सर्व साधनें त्यांच्या हातांशीं आल्यावर त्यांच्या बळावर ग्रीकांना मोठ्या पराक्रमानें हिंदूंच्या भूमींतून हाकलून लावलें. पण ह्याच्याशीं तुलना करतां मराठ्यांना हातांत घ्यावें लागलेलें काम किती कठीण होतें; त्यांच्यावर ओढवलेली आपत्ति केवढी प्रचंड होती आणि तिच्याशीं तोंड द्यावयाला त्यांच्याजवळ असलेलीं साधनें किती क्षुद्र होतीं! शतकानुशतकें सबंध हिंदुस्थान परवश होऊन मुसलमान, पूर्तुगीज आदिकरून परकी आणि बलाढ्य शत्रूंच्या पायाखालीं तुडविलें जात होतें! सर्व पौरुष आणि आशा-सुद्धां त्यांच्यांतून पिळून निघून तें निपटारें बनलें होतें. नेहमीं होणाऱ्या परा-जयामुळें उत्पन्न झालेल्या हीनवृत्ति राष्ट्राच्या जीवभूत गोष्टींचा ग्रास करीत पुष्ट होऊन शेवटीं मोगल बादशहा हे आपल्यावर राज्य करावयालाच जन्माला आलेले आहेत आणि त्यांना तसें करावयाचा देवानेंच अधिकार दिला आहे अशी समजूत रूढ होऊन बसली होती. हिंदूंची तरवार अक्षरशः तुटून पडली होती. हिंदूंचा ध्वज अक्षरशः फाटून गेला होता! आणि तरीही मराठ्यांनीं

उठावणी केली, तरीही त्यांनीं रणभूमि जागवली, तरीही त्यांनीं हिंदूंना तों-पर्यंत राष्ट्र ह्या नात्यानें ज्याच्याशीं कधींही तोंड देण्याची पाळी आली नव्हती अशा अटीतटीच्या सामन्यांत जय मिळविला! ग्रीकांचा हिंदुस्थानांत जेथपर्यंत प्रवेश झाला होता त्यापेक्षां हूणांचा आणि शकांचा जरी पुष्कळच दूरवर प्रवेश झाला होता तरी त्यांना शत्रु म्हणून इतकें प्रबलत्व कधीं प्राप्त झालें नव्हतें आणि सर्व हिंदुस्थान त्यांना केव्हांही आपल्या साम्राज्याखालीं आणतां आला नव्हता. तोरमाण किंवा रुद्रदमन राज्य करीत असतां राष्ट्रीय जीवनाच्या सत्त्वावर, राष्ट्रीय संस्कृतीवर एवढा प्राणघातक आणि बलवत्तर आघात केव्हां-ही झाला नव्हता. जेवढा मुसलमानांच्या आणि पूर्तुगीजांच्या धर्मवेडानें केला! हूणांच्या आणि शकांच्या आघातापासून आपल्या भूमीचें आणि आपल्या राष्ट्राचें संरक्षण करणारा पराक्रम, देशभक्ति, उसळी आणि आत्मयज्ञ हीं खरो-खरच उज्ज्वल आहेत आणि आपल्या ज्या राष्ट्रीय वीरांनीं, योद्धयांनीं आणि राजकारणकुशल पुरुषांनीं आपली भूमीची परक्याच्या संतापोत्पादक जोखडा-पासून मुक्तता केली; इतकेंच नाहीं तर सर्व हिंदु जनता मगधांच्या किंवा मालवां-च्या सार्वभौम ध्वजेखालीं, चंद्रगुप्ताच्या किंवा विक्रमादित्याच्या किंवा शालि-वाहनाच्या प्रबल राजदंडाखालीं एकत्र करून आपल्या राष्ट्रीय ऐक्यांत आणि सामर्थ्यांत इतकी भर घातली त्याच्याविषयीं आम्हांला अत्यंत कृतज्ञता वाटते. हिंदुस्थान देशावर प्रेम असलेला प्रत्येक हिंदु मग तो कोणच्याही प्रांताचा असो किंवा कोणच्याही जातीचा असो, वरील सम्राटांनीं स्थापलेल्या साम्राज्यांना जरी आज ज्या प्रांताला तो आपला प्रांत म्हणतो त्या प्रांताला जिंकून आपल्या सत्तेखालीं ठेवावें लागलें असतें आणि त्यांच्या दिग्विजयासाठा त्यांनीं केलेल्या अंतर्युद्धांत त्यांना कदाचित् त्यांच्याच पूर्वजांचें रक्त जरी सांडावें लागलें असलें तरीही हिंदुस्थान देशावर प्रेम असलेला प्रत्येक हिंदु त्या विशिष्ट परिस्थितींत आपल्या राष्ट्राला स्वातंत्र्याच्या अभिमानास्पद शांततेचा, अजेय शक्तीचा अमूल्य ठेवा मिळविण्यासाठीं द्यावें लागणारें एकमेव मूल्य म्हणून ह्या अपरिहार्य-आपत्ति आपण स्वीकारल्या पाहिजेत हें ओळखून चंद्रगुप्ताच्या, पुष्प-मित्राच्या, समुद्रगुप्ताच्या किंवा यशोधर्म्याच्या किंवा त्या विख्यात गौतमी-पुत्राच्या नामोच्चाराबरोबर त्यांनीं ह्या पवित्र भरतभूमीची हूणांच्या आणि शकांच्या राजकीय बंधनांपासून मुक्तता केली म्हणून आदरानें आपलें मस्तक विनम्र करतों आणि त्यांच्या स्मृतीची पूजा करतों. तेव्हां ह्या चंद्रगुप्तांना किंवा

विक्रमादित्यांना ज्या संकटाला तोंड द्यावें लागलें त्यापेक्षां विशालतेच्या आणि तीव्रतेच्या दृष्टीनें किती तरी अधिक प्राणघातक संकट, ज्याच्यामुळें आतां सर्वनाश झाल्यावांचून राहत नाहीं असेंच जवळजवळ दिसूं लागलें होतें, असें संकट मराठ्यांच्या वेळेला देशावर आलेलें होतें. त्या संकटांतून ज्यांनीं अखिल हिंदुजातीला वांचविलें आणि तेंही आपल्या त्या प्राचीन वीरांच्या हातांशीं असलेल्या साधनांपेक्षां किती तरी कमी प्रतीच्या साधनांनीं वांचविलें आणि एवढें देदीप्यमान कार्य करून दाखविलें, कीं एक दोन उदाहरणें सोडून दिलीं तर त्यांच्याशीं नुसती बरोबरी करावयालाही आपल्या इतिहासांत वर्णिलेल्या प्राचीन साम्राज्यांपैकीं एकही पुढें येणार नाहीं त्या शिवाजीमहाराजांच्या आणि बाजिरावांच्या, भाऊंच्या, रामदासांच्या, जनकोजींच्या नामोच्चाराबरोबर हिंदूनें आदरानें आणि उत्कट कृतज्ञतेनें आपलें मस्तक लववावयाला नको का ? आणि अत्यंत प्रेमाच्या आणि राष्ट्रीय अभिमानाच्या भावनेनें भरलेल्या हृदयानें त्या साम्राज्याची स्मृति बाळगावयाला नको का ?

ह्या वाफेच्या आणि विजेच्या दिवसांतदेखील गॅरिबॉल्डी किंवा मॅझिनी-सारख्यांनाही केवळ नैतिक प्रचारकार्य करून सबंध इटली संघटित करणें अशक्य आहे असें आढळून आलें. सर्व प्रांतिक भेदभाव नाहींसे करून टाकावे आणि आपले सर्व लोक एकत्र करून त्यांचें सगळ्या इटलींत एक-राज्य करावें असे उच्च हेतु असूनही त्यांचें सापेक्षतः संशयित स्वरूपांच्या साधनांचा अवलंब केल्यावांचून चाललें नाहीं. नेपल्स किंवा रोम येथील लोकांना संयुक्त इटली बनवावयाच्या निरर्थक ओरडीसाठीं आपण आपल्या वैयक्तिक स्वातंत्र्याचें बलिदान कां करावें ह्याचा उमज पडेना. पीडमॉटचा राजा आणि पीडमॉटचेच असलेले ह्या चळवळीचे गॅरिबॉल्डी' क्रीस्पी, कॅव्हूर इत्यादि सर्व पुढारी जेव्हां बुद्धिपुरःसर प्रांतामागून प्रांत पीडमॉटच्या साम्राज्याला जोडूं लागले तेव्हां ह्या प्रांतिकवृत्तीच्या लोकांना स्वाभाविकपणें त्यांच्या कृतीविषयीं आणि आश्वासनाविषयीं शंका वाटूं लागली. ऑस्ट्रिया-च्या किंवा फ्रान्सच्या दास्याचें त्यांना कांहीं वाटत नव्हतें; संवयीनें त्या-विषयीं त्यांचें मन इतकें निढावून गेलें होतें. पण दासांच्या नेहमींच्या वृत्तीला अनुसरून त्यांच्या स्थितींत असलेल्या पैकींच एकाला आपल्यापेक्षां श्रेष्ठ, आपला स्वामी मानावयाची आणि त्याची आज्ञा पाळावयाची कल्पनाही त्यांना सहन होत नव्हती ! म्हणून इटलीचीच एकी करण्यासाठीं देखिल

गॅरिबॉल्डी, व्हिक्टर इमॅन्युअल इत्यादि पुढाऱ्यांना नुसत्या परकीयांबरोबरच नाहीं, तर आपल्या प्रत्यक्ष देशबांधवांबरोबर युद्ध करावें लागलें. पण इतिहास त्यांना बंधुविरोधाच्या आरोपापासून दोषमुक्त ठरवितो; आणि आज सर्व इटली देश त्यांनीं ज्यांना युद्धांत जिंकलें त्याच निओपालिटन आणि रोमन लोकांच्या वंशजासुद्धां सर्व देश इटलीच्या ह्या देशकर्त्यांच्या नामोच्चाराबरोबर अत्यंत आदरानें आपलें मस्तक नम्र करतो आणि प्रेमानें आणि कृतज्ञतेनें नतजानु होतो. पीडमॉंटचा तोच राजा पुढें ज्याप्रमाणें संपूर्ण इटलीचा राजा मानला गेला त्याचप्रमाणें अनुकूल काळ आणि परिस्थिति येतांच सबंध हिंदुस्थानांत वास्तविक ज्याची सत्ताच प्रत्यक्ष चालली होती त्या मराठ्यांच्या राजावरही अखिल हिंदुस्थानचा सम्राट म्हणून अभिषेक केला गेला असता. सर्व हिंदुस्थानचे सम्राट म्हणून विश्वासरावांच्या नांवानें भाऊंनीं अशी द्वाही देखील फिरविली होती असें शत्रु आणि मित्र दोघेही सांगतात. आधुनिक जर्मन संस्थानांचा आणि त्यांच्या स्वातंत्र्याच्या व संघटनेच्या इतिहासाचें मराठ्यांच्या काळच्या हिंदुस्थानांतील राजकीय घटनेशीं अधिक साम्य आहे. जर्मन साम्राज्याप्रमाणें येथेंही मराठ्यांचे छत्रपति हे ज्याचे मूर्धाभिषिक्त सम्राट आहेत असें हिंदु राजांचें संयुक्त साम्राज्य जवळजवळ प्रस्थापित होत आलें होतें. पीडमॉंटच्या इटालियन राज्याप्रमाणेंच, प्रशियाच्या जर्मन साम्राज्याप्रमाणेंच, अंतर्युद्धें करावीं लागलीं असलीं तरी महाराष्ट्राचें हिंदुसाम्राज्य हेंही अखिल हिंदुजातीय आणि राष्ट्रीय असें महत्कृत्य होतें आणि त्यासाठीं प्रत्येक हिंदु देशभक्तास तें साम्राज्य स्थापण्याकरितां ज्यांनीं श्रम केले आणि धारातीर्थीं देह ठेवले त्यांच्या स्मृतीविषयीं साभिमान कृतज्ञता वाटली पाहिजे.

## प्रकरण ४ थें

# साधनें: मराठ्यांची युद्धपद्धति

" आपणांस राखून गनीम घ्यावा. स्थलांस गनिमाचा वेढा पडला तो रोज झुंजून स्थळ जतन करावें. निदान येऊन पडलें तरी परिच्छिन्न-वार होऊन लोकीं मरावें. पण सल्ला देऊन, स्थळ देऊन जीव वांचविला असें सर्वथा न घडावें." —राजाज्ञा.

" ऐसें अवघेची उठतां । परदळाची काय ती चिंता
हरिणें पळति उठती चित्ता । चहुंकडे " —रामदास

आम्हीं दिलेल्या संक्षिप्त वृत्तांताच्या प्रारंभीं आम्हीं म्हटलें आहे कीं, शिवाजी-महाराजांच्या जन्मानें आपल्या हिंदुजातीच्या अर्वाचीन इतिहासानें ज्या इतक्या महत्त्वाच्या आणि यशःशाली युगाचा आरंभ केला त्याचें श्रेय शिवाजीमहाराज आणि त्यांचे धर्मगुरु श्रीरामदासस्वामी ह्यांनीं आपल्या लोकांपुढें ठेवलेल्या थोर राष्ट्रीय आणि आध्यात्मिक ध्येयाला जितकें आहे. तितकेंच मराठ्यांनीं रणांगणावर जी विशिष्ट प्रकारची डावपेंचांची युद्ध-पद्धति प्रचलित केली, तिला आहे. आम्हीं इतक्या संक्षेपानें लिहिलेल्या इति-हासांतही ज्या घटना आम्हीं दिल्या आहेत तेवढ्यांनीं देखील महाराष्ट्र-धर्म ही जशी हिंदुजातीच्या मरणोन्मुख जीवनाला चैतन्य देणारी नवीन शक्ति होती त्याप्रमाणेंच मराठ्यांची (गनिमी काव्याची) युद्धपद्धति हीही तितक्याच सत्यतेनें त्या काळीं हिंदी लोकांत प्रचलित असलेल्या युद्धशास्त्रांतील महत्त्वाची वाट होती हा सिद्धान्त असंदिग्धपणें सिद्ध होतो असें आम्हांला निश्चित वाटतें. शिवाजीमहाराजांच्या परिस्थितींत ती अत्यंत उपयुक्त होती हें निर्विवाद आहे आणि कदाचित् ह्या आवश्यकतेमुळेंच ती त्या वेळीं स्वाभा-विकपणें प्रचलित झाली; पण शिवाजीमहाराजांच्या नंतरच्या पिढ्यांनाही ती इतकी लवचिक आणि मराठ्यांच्या विशिष्ट सत्तेला आणि बुद्धीला इतकी सोइस्कर आढळून आली कीं, आपल्या उपक्रमाच्या प्रारंभींच्या दिवसांत मिळालेल्या थोड्याशा क्रांतिकारकांच्या टोळ्यांचे पुढारी असतांना शिवाजीमहाराजांना तिचा अवलंब करावा लागला, त्या स्थानीं आतां मोठ-

मोठाले दलभार बरोबर घेऊन जात असतांनाही त्यानंतरच्या मराठी वीरांनीं आपल्या शत्रूंच्या विरुद्ध ह्या पद्धतीचा तितक्याच विलक्षण कार्यक्षमतेनें उपयोग केला. पुढील मराठी सेनानायकांनींही आपल्या थोर स्वराज्यसंस्थापकांच्या सैनिक डावपेचांत तिचा अवलंब केला आणि मोठमोठ्या सैन्यभारांच्या हालचालींनाही तीच युद्धपद्धति लावली. त्यांनीं ही युद्धपद्धति इतक्या परिणामकारक रीतीनें उपयोगांत आणली कीं, त्यांच्याशीं गांठ पडल्यावर त्यांना समोरासमोर तोंड द्यावयाची किंवा त्यांना टाळून जावयाची, कोणचीही आशा शत्रूंना कशी सोडून द्यावी लागे हें वरील संक्षिप्त कथानकांत पानोपानीं दिसून आलेंच आहे. बलिष्ठ शत्रूशीं गांठ पडली कीं, मराठ्यांचे घोडेस्वार चारी दिशांनीं नाहींसे होऊन जात आणि जवळच्याच डोंगरावरून किंवा झाडींतून त्यांची टेहळणी करीत. ते परतलेले पाहतांच आपल्याशीं दोन हात करावयाचें त्यांचें धैर्य झालें नाहीं, हें आपल्याला भासलें असें बहुधा शत्रूला वाटे आणि तो विजयभरानें तसाच पुढें जाऊं लागे. अशा रीतीनें अगदीं अवघड जागीं तो ओढला जाई. कधीं कधीं तर मराठ्यांनीं तो ज्या जागीं यावयाला पाहिजे असेल अगदीं त्याच जागीं तो नेमका चालून जाई! लागलींच मराठी स्वार जितक्या चपळाईनें ते चारी दिशांना नाहींसे होत तितक्याच चतुराईनें एके जागीं येत; संघटित होऊन आपण होऊन आलेल्या त्या भक्ष्यावर वज्रपातासारखे जाऊन आदळत आणि 'हें काय होतें आहे' हें शत्रूच्या लक्ष्यांत यावयाच्या आधींच त्याचा चक्काचूर करून टाकीत. त्यांना ज्या वेळेला लढावयाचें असे त्या वेळीं ते इतक्या चिकाटीच्या शौर्यानें लढत कीं, शत्रु त्यांची नित्याची 'हाय'च घेई! हंबीररावाचें दिलेलें युद्ध, व वदाऊच्या घाटांत झालेला संग्राम, आणि इतरही अनेक रणप्रसंगांवरून मराठी वीरांची ही शौर्यपूर्ण चिकाटी उत्तम निदर्शनास येते. तिच्यामुळें मराठ्यांची ज्या वेळीं इच्छा नसेल त्यावेळीं त्यांना युद्ध करावयाला लावणें जितकें मुसलमानांना कठीण जाई तितकेंच त्यांनीं मनांत आणल्यावर त्यांच्याशीं उघड्या रणांगणावर दोन हात करणें हानिकारक होई.

मराठ्यांची युद्धपद्धति आणि आत्मयशाची उपपत्ति श्रीरामदासस्वामींच्या 'शक्तीनें मिळती राज्यें, युक्तीनें यत्न होतसे' ह्या वचनांतलि तत्त्वांवर बसविलेली होती. सत्कार्यासाठीं करावें लागणारें युद्ध ते पवित्र समजत. कारण तसें युद्ध केल्यावांचून स्वातंत्र्य किंवा साम्राज्य मिळविणें शक्य नाहीं. आत्म-

यश आणि अमर्याद पराक्रम—तानाजीनें सिंहगडावर केला तसा आत्मयज्ञ व पराक्रम ह्या दोन गुणांच्या बळांवर मराठे अखिल भारताचे स्वामी झाले; पण पराक्रमापेक्षां ते चातुर्याला अधिक महत्त्व देत; कारण चातुर्यावांचून पराक्रम म्हणजे पशूचा गुण होतो. आत्मयज्ञही तेव्हांच पूज्य असतो कीं, जेव्हां प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असला तरी बुद्धीला पटेल अशा रीतीनें तो यशाला आवश्यक असतो. जो आत्मयज्ञ अंतिम विजयाकडे घेऊन जात नाहीं, त्याला मराठी युध्दपध्दतीच्या डावपेंचांत स्थळ नसे. 'कातर्यं केवला नीति, शौर्यं श्वापदचेष्टितम्' ह्या श्लोकार्धांतील मार्मिक अनुभवाचाच उपदेश श्रीरामदासांनीं 'शक्ति युक्ति जये ठायीं तेथें श्रीमंत नांदती' । ह्या ओंवींत केला आहे. ज्यांच्या योगानें एकंदरींत शेवटपर्यंत आपल्याला जितकी हानि सोसावी लागेल त्यापेक्षां शत्रूची अधिक हानि घडणारे मार्ग शोधून ते उपयोगांत आणावयाला ते नेहमीं उत्सुक असत. ते नेहमीं अत्यंत सावध, अगदीं फुंकून पाऊल टाकणारे असत; पण तशी वेळ आली, त्या क्षणीं साहस करणें म्हणजे एकंदरींत सावधपणच आहे असें दिसलें म्हणजे ते तितकेच साहसीही असत. समरभूमीवरील समोरासमोरचीं ठाणें मांडून युध्दें मराठे बहुधा टाळीत, पण एकदां का ते तशा युद्धाला उभे झाले म्हणजे मग त्या विरोधाचा शेवट कोणाचा तरी अंत होण्यांतच होई.

शत्रूंच्या आघाडीचे लोक अलग एकटे सांपडले तर त्यांना कापून काढण्याच्या किंवा लपून बसून लहानसहान टोळ्या सांपडतांच अचानक त्यांच्यावर मारा करण्याच्या सिद्धतेनें ते पहिल्यानें शत्रुसेनेच्या आसपास टेहळणी करीत राहत, त्यांचा पाठलाग करावयाला गेलें कीं, ते पार पसार होत. कंटाळून पाठलाग करणाऱ्या शत्रूनें पाठलाग सोडून दिला, कीं एका क्षणांत चारी दिशांनीं ते त्याच्यावर येऊन पडत. पुढें जेव्हां मोठमोठाले सैन्यभार ते हाताखालीं वागवूं लागले त्या वेळींही हेच डावपेंच त्यांनीं मोठ्या प्रमाणांत उपयोगांत आणले. पूर्वीं एकट-दुकट सैनिकाला गांठून ते त्याची वाट लावीत असत; मग शत्रूंचीं सबंधच्या सबंध सैन्यें ह्याप्रमाणें गांठून कापून काढीत. इंग्रज आणि मराठ्यांमधल्या पहिल्या युद्धांत होळकर आणि पटवर्धनांनीं इंग्रजांच्या विरुद्ध उपयोगांत आणलेल्या युद्धपद्धतीवरून मराठ्यांनीं आपल्या जगद्विख्यात छत्रपतीस्वामींची युद्ध करण्याची पद्धतिच अगदीं नाना फडणीस आणि महादजी शिंदे ह्यांच्या वेळेपर्यंत किती यशस्वी-

पणानें स्वीकारली होती आणि त्या वेळच्या परिस्थितीला अनुरूप अशा प्रमाणांत वाढवली होती हें उत्कृष्टपणें निदर्शनास येतें.

त्यांच्या युद्धपद्धतींतील दुसरा महत्त्वाचा विशेष म्हणजे कोणाही शत्रूशीं युद्धाला प्रारंभ होतांच ते एकदम शत्रूला बचावाचें धोरण स्वीकारावयाला भाग पाडीत म्हणजे सामान्यतः शत्रूच्या प्रांतांत ह्यांची पहिल्यानें स्वारी होई; अशा रीतीनें आपला सर्व प्रदेश पाठीमागें सुरक्षित राहूं द्यावयाची ते काळजी घेत आणि युद्धामुळें स्वाभाविक होणारी वैराणस्थिति शत्रूच्या प्रदेशाला भोगावी लागे. युद्ध देण्याचें टाळून ते इकडून तिकडे वाऱ्याप्रमाणें स्वाऱ्या करीत, शत्रूचा दाणापाणी मारून काढीत आणि सैनिकांच्या त्रासानें शत्रूच्या प्रजाजनांना 'त्राहि भगवान्' करून सोडीत. त्यामुळें कांहीं दिवसांत शत्रूच्या सैनिकांचेंही मानसिक धैर्य अवश्य खचून जाई आणि त्यांच्यांतील चिकाटी व नियमबद्धता नाहींशी होई. असा गोंधळ माजतांच त्याचें पर्यवसान महागाई होण्यांत, अन्नपाण्याची टंचाई पडण्यांत आणि राजव्यवस्थेचें नियंत्रण शिथिल होण्यांत होई. अशा रीतीनें एकीकडे ते शत्रूला अडचणींत टाकीत आणि त्रस्त करीत असतां दुसरीकडून शत्रूच्या प्रदेशांतून युद्धव्यया-साठीं खंडण्या उकळीत आणि आपल्या नांवानें अनिर्बंधपणें धारा बसवीत. म्हणजे शत्रूला आपल्या सैन्याचा व्यय तर चालवावाच लागे आणि वर ह्यांच्या सैन्यालाही त्यालाच पोसावें लागे. शत्रूला ह्यांना टाळतां येत नसे, कीं मनांत आणील त्या वेळेला त्यांच्याशीं सामना देतां येत नसे. त्याच्या तोंडांतून निराशेनें उद्गार निघत, "ह्या मराठ्यांशीं युद्ध करावयाचें म्हणजे वाऱ्याशीं भांडण्यासारखें आहे, पाणी दुभंग करण्यासारखें आहे!" ह्या पद्धती-चें सर्वांत उत्कृष्ट उदाहरण रघूजी भोसल्याच्या बंगालच्या स्वारींत पहावयाला मिळतें. त्यांनीं वर्षानुवर्ष बंगालच्या उन्मत्त मुसलमान सुभेदाराच्या प्रांतांतील सर्व लोकांना कसें त्रस्त करून सोडलें, त्यामुळें शेवटीं त्याला कसें शरण जावें लागलें, ओढ्या प्रांत मराठ्यांच्या कसा स्वाधीन करावा लागला आणि हिंदु राजाला खंडणी देऊन त्याचें मांडलिक होणें कसें भाग पाडलें हें आम्हीं मागें दाखविलेंच आहे.

ह्या स्वारीवरून स्पष्ट दिसून येईल कीं, शत्रूची भूमि वैराण करावयाची, शत्रूचें राष्ट्र त्रस्त करून सोडावयाची मराठ्यांची युद्धपद्धति शिवाजीमहाराजां-च्या वेळेला समर्थनीय असली तरी पुढें जेव्हां त्यांच्या नियमित उत्पन्नांतून

मोठमोठालीं सैन्यें ठेवण्याचें त्यांना सामर्थ्य आलें, तेव्हां म्हणजे पेशव्यांच्या वेळीं त्यांचें तें करणें म्हणजे केवळ लूटमार करण्यासारखें होतें हें जें कांहीं लोकांचें म्हणणें आहे तें चुकीचें आहे. कारण एक तर त्या दिवसांत ह्या पद्धतीला एक विशिष्ट युद्धाचें अंग म्हणून मान होता. तेव्हांचीं सर्वच राष्ट्रें तिचा उपयोग करीत असत. मुसलमानांच्या विरुद्ध किंवा हिंदूंच्या विरुद्ध भेदाभेद न करतां मुसलमान ती सररहा उपयोगांत आणीत. पुर्तुगीज, इंग्रज इत्यादि युरोपांतलीं किंवा आशियांतील सर्व राष्ट्रें शत्रूंचीं जीं नगरें किंवा प्रदेश हस्तगत करण्यांत त्यांना यश येई त्या नगरांवर आणि प्रदेशांवर युद्धाची खंडणी बसवून वसूल करणें अवश्य समजत. दुसरें, मराठ्यांना एकाच वेळीं अनेक जागीं निरनिराळ्या शत्रूंशीं युद्ध करावें लागे आणि हे त्यांचे शत्रु बहुतेक परकी, प्रजापीडक आणि परराज्यहरक असत. तेव्हां त्यांच्याशीं पुण्याच्या मुख्य केंद्रापासून इतक्या दूरवर, एकीकडे पंजाबमध्यें तर दुसरीकडे अर्काटांत कराव्या लागणाऱ्या नेहमींच्या युद्धासाठीं ठिकठिकाणीं मोठमोठालीं सैन्यें स्वतःच्या पैशानें ठेवणें मराठ्यांना शक्य नव्हतें आणि शक्य असतें तरी त्यांनीं तसें करावयाला नको होतें. त्यांनीं ही पद्धति सोडून देणें योग्य नव्हतें. कारण, ही पद्धति म्हणजे शत्रूच्या युद्धसामर्थ्याच्या नाड्यावरच घाव घालावयाचें आणि अशा रीतीनें शत्रूला लवकर शरण आणावयाचें त्यांच्या हातांतील प्रबल शस्त्र होतें.

मराठ्यांच्या युद्ध करण्याच्या पद्धतींतील ह्या अंगाला मराठ्यांचे शत्रु नेहमीं लूट किंवा वाटमारी अशी संज्ञा देतात. एखाद्या बोअरयुद्धांत, एखाद्या जर्मनयुद्धांत, डलहौशीच्या दुसऱ्याचीं राज्यें आपल्या राज्याशीं जोडून घ्यावयाच्या फूटनीतीनें किंवा इ. सन १८५७ च्या नीलच्या स्वारींत असें करणें एक सामरिक धोरण म्हणून क्षम्य समजलें जातें, तेव्हां हिंदुस्वातंत्र्यासारख्या न्याय्य युद्धांत आणि विशेषतः औरंगझेब, टिपू, गुलाम कादर असल्या शत्रूंशीं प्रसंग असतां तें साहजिकच क्षम्यच नव्हे तर न्याय, समजलें जावें असें कोणालाही वाटेल. तसें पाहिलें तर युद्धांत कांहींही करणें न्याय्य आहे हें तत्त्व आज सर्वमान्य समजलें जातें. तें तितकें बरोबर नसलें तरी सत्कार्यप्रीत्यर्थ कराव्या लागणाऱ्या युद्धांत कांहींही करणें न्याय, कमीतकमी क्षम्य तरी असलें पाहिजे. वरील नेहमींच्या, शिळ्या आणि आपमतलबी आरोपाला हीं उत्तरें आहेतच. पण त्याव्यतिरिक्त प्रत्यक्ष श्रीशिवाजीमहाराजांनीं आपल्या शत्रूंना ह्या संबंधांत

जें एकदांच उत्तर देऊन ठेवलें आहे त्याचा येथें नुसता उल्लेख केला म्हणजे पुरे आहे. त्यांनीं लिहिलें " माझ्या देशाच्या आणि माझ्या लोकांच्या संरक्षणासाठीं हें सैन्य ठेवावयाला तुमच्या बादशहानें मला लावलें आहे; तेव्हां आतां त्यांचा व्यय त्यांची प्रजा म्हणवणाऱ्या लोकांनींच दिला पाहिजे ! " तत्कालीन इंग्रज लेखकांना देखील स्वीकार करावा लागला आहे कीं, शिवाजी स्वारीला निघाला म्हणजे वाटेवरील सर्व लोकांना आमची आज्ञा, अधिकार जे मान्य करतील त्यांना माझ्याकडून किंवा माझ्या सैनिकांपैकीं कोणाकडूनही यत्किंचित् उपसर्ग पोंचणार नाहीं असा तो कौल देतो आणि आतांपर्यंत त्यानें आपलें वचन पाळलें आहे ! ह्याच्या जोडीला आम्ही असेंही सांगतों कीं, वरीलप्रमाणेंच थेट खर्ड्याला शके १७१७मध्यें मिळालेल्या मराठ्यांच्या देदीप्यमान विजयानें ज्याचा शेवट झाला त्या निजामाबरोबरच्या अंतिम युध्दापर्यंतही मराठ्यांच्या सेनानायकांनीं दिलेलीं असलीं वचनें अशींच प्रामाणिकपणानें पाळलीं आहेत.

आतां हें खरें आहे कीं, ह्या स्वाऱ्यांत बहुधा शत्रूंच्या हिंदुप्रजाजनांना त्रास भोगावा लागे. पण एकदां युद्ध चालू झालें म्हणजे अशा परिस्थितींत सूक्ष्म भेदाभेद ठेवणें अशक्य होऊन जातें किंबहुना कधीं कधीं असा भेदाभेद करणें इष्ट नसतें; युद्धकाळांतील ह्या अपरिहार्य गोष्टींचा पुनरुच्चार करण्याची आवश्यकता दिसत नाहीं. कारण मुसलमानांना किंवा इतर विरुध्द लोकांना युद्धांतील व्ययाची भरपाई म्हणूनही खंडणी द्यावी लागे तशी ती शत्रूंच्याकडील हिंदूंनाही द्यावी लागणें योग्यच होतें. ह्या हिंदूंनीं वास्तविक मराठ्यांच्या पक्षाला मिळून प्रत्यक्ष साह्य करावयाला पाहिजे होतें. तें न करतांना जे वारा येईल तशी पाठ देण्याच्या सिध्दतेनें असत किंबहुना त्यांच्या विरुध्दच प्रयत्न करीत, त्यांची त्या राष्ट्रीय झगड्यासाठीं कांहींच स्वार्थत्याग करावयाची सिध्दता नसे. तेव्हां त्यांना निदान द्रव्यदामाचा पुष्कळसा आपला भाग उचलावयाला साहाजिकच बलपूर्वक भाग पाडलें जाई. ज्या हिंदुसेनेच्या पराक्रमामुळेंच केवळ हिंदूंचा वंश, हिंदूंची संस्कृति आणि हिंदूंचीं देवळें बचावलीं गेलीं होतीं व त्या सेनेनें आपलें सामर्थ्य दाखविलें नसतें तर बहुधा हिंदूंचे बलात्कारानें मुसलमान केले जाऊन हिंदु हिंदुच राहिले नसते त्या हिंदुसाम्राज्याच्या सेनांचा व्यय चालविण्यासाठीं हा एक अप्रत्यक्ष बसविलेला युध्द-करच सर्व हिंदूंकडून उकळला जात असे.

तो उकळीत असतां मराठी सैनिकांकडून एकादे वेळीं कोठें कोठें विशेष अत्याचार झाले आहेत; त्यांचें कांहीं आम्ही समर्थन करीत नाहीं. पण त्याच वेळीं हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, मराठ्यांचे अत्याचार मुसलमान, पूर्तुगीज इत्यादि ज्या लोकांशीं मराठ्यांना युद्ध करावें लागलें, त्यांनीं क्षम्य इतकेंच नाहीं तर अवश्य आचरणीय म्हणून ठरविलेल्या भयंकर अत्याचारांच्या कृत्यांपुढें कांहींच नसत. हिंदूंना बलात्कारानें बाटवून मुसलमान बनविणाऱ्या धर्मवेड्या मौलवींना देखील मराठ्यांनीं तसें त्यांच्या अंगांत सामर्थ्य आल्यावरसुद्धां कधींही हिंदुधर्म स्वीकारावयाला लावला नाहीं. अल्लाचे किंवा आकाशांतल्या प्रभूचें सामर्थ्य सिद्ध करून दाखविण्यासाठीं आपली सहस्रावधि देवळें राक्षसीपणानें भूमिसात् करून टाकण्याची माहिती असतांनाही आणि श्रीरामाचें, श्रीकृष्णाचें सामर्थ्य सिद्ध करून देण्यासाठीं त्यांनासुद्धां तसें सहज करतां येत असतांनाही त्यांनीं एकही मशीद पाडली नाहीं कीं एकही पुतळीघर भूमिसात् केलें नाहीं. आणि नैतिक अत्याचाराच्या किंवा गुंडगिरीच्या कृत्यांच्या दृष्टीनें पाहिलं तर मराठ्यांच्या अत्यंत कट्टर शत्रूंनासुद्धां सरसहा हत्याकांड चालू केल्याचा किंवा स्त्रीजातीच्या शीलाविरुद्ध अत्याचार केल्याचा किंवा विरुद्ध धर्मामताचीं पुस्तकें जाळणें इत्यादि अविचारीपणाचा आणि धर्मवेडाचा उपद्रव केल्याचा दोष त्यांना लावतां आला नाहीं. ज्यांना युद्धतृषेत लूट अशी संज्ञा दिली जाते तेवढ्याच गोष्टी म्हणजे युद्धाची खंडणी उकळणें आणि सर्व अन्न आणि दाणापाणी मारून प्रांत उध्वस्त करणें एवढीच त्यांचीं कृत्यें त्यांच्याविरुद्ध म्हणून त्यांच्या शत्रूंना सांगतां येतात. पण जेव्हां एकादा परकी शत्रु मराठ्यांच्या प्रदेशांत चालून येई, त्या वेळीं मराठे आपल्या प्रांतांतसुद्धां ह्याच साधनांचा अवलंब करीत. ह्या गोष्टीवरून त्या परिस्थितींत युद्धाच्या दृष्टीनें तें साधन किती परिणामकर आणि आवश्यक होतें हें उत्तम रीतीनें निदर्शनास येतें. राजाराममहाराजांच्या वेळेला औरंगझेबानें चालविलेली स्वारी आणि पुण्यावर चालून जावयाचे इंग्रजांनीं केलेले दोन्ही प्रयत्न इतक्या अपमानास्पद रीतीनें अयशस्वी व्हावयाचें मुख्य कारण म्हणजे—मराठ्यांनीं त्या वेळीं आपल्या प्रदेशांतीलसुद्धां धान्य आणि चारापाणी नाहींसें करून टाकून तो उध्वस्त आणि निर्जन करून सोडावयाला अनमान केलें नाहीं. इंग्रजांच्या वेळेला तर त्यांना पुण्याला जवळ येऊन पोंचण्यांत यश आल्यास आपली राजधानी-

सुद्धां अग्निनारायणाला समर्पण करण्याचा त्यांनीं धाक घातला हें आहे. ह्यावरून हें स्पष्टपणें सिद्ध होतें कीं, प्रसंगीं मराठयांना आपलें सैन्य शत्रूच्याच प्रदेशावर चरावयाला सोडून द्यावयाचें, तेथील शांतता, सुव्यवस्था, आणि राज्यकारभार पार मोडून टाकावयाचा आणि अशी शत्रूची सर्व साधन-सामुग्री, द्रव्यसंग्रह आणि शत्रूच्या प्रजेवरील त्याचा नैतिक दाब आणि त्याचें नैतिक धैर्यदेखील अगदीं पोखरून टाकावयाचें. ह्या युक्तीचा जो उपयोग करावा लागे त्याच्या मुळाशीं हिंदुस्थानच्या इतर भागांतील आपल्या हिंदु-बांधवांविषयीं निष्कारण द्वेष किंवा त्यांच्या हितसंबंधांविषयीं अविचारी अनास्था हीं मुळींच नव्हतीं. ह्या गोष्टीही ते युद्ध संपेपर्यंत किंवा मराठयांच्या मागण्या मान्य होईपर्यंत करीत. तो प्रांत मराठयांच्या साम्राज्याला प्रत्यक्ष-पणें जोडला गेला किंवा त्यानें मराठयांचें आधिराज्य मान्य करून खंडणी देण्याचें वचन दिलें कीं त्या एकदम थांबत. जेव्हां युद्धप्रदेशांतील लोकच मुसलमानी किंवा युरोपिअन दास्यापासून आपली मुक्तता करण्यासाठीं त्यांना पाचारण करीत किंवा जेव्हां मराठे स्वतः तो प्रांत परक्यांच्या हातांतून परत घेण्यासाठीं स्वतःच गेले असतां निदान त्यांच्याविषयीं सहानु-भूति दाखवीत तेव्हां मराठे त्या प्रदेशांतील लोकांना शक्य तितक्या उदार-पणानें आणि प्रेमानें वागवीत हें सांगावयाला नकोच.

प्रसंगोपात्त घडलेले अत्याचारही दोषार्हच आहेत हें बरोबर आहे. पण तसले अत्याचार रोमहून जेव्हां गॅरिबॉल्डी परत आला; त्या वेळींही घडले आहेत हें आपण विसरतां कामा नये. प्रत्येक मोठया राज्यक्रांतीच्या चळवळी-च्या वेळेला फ्रेंच राज्यक्रांतीपासून अलीकडील आयर्लंडांतील सीनफेनांच्या क्रांतीपर्यंत, अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धापासून जर्मनीच्या सार्वभौम एकीकर-णाच्या आणि स्वातंत्र्याच्या युद्धापर्यंत सर्वदा असले अत्याचार घडले आहेत. जसें ह्या अत्याचारामुळें त्या तेजस्वी राष्ट्रीय चळवळींच्या मूळ उज्ज्वलतेवर कृष्णछटा पसरत नाहीं आणि त्यांनीं प्रकट केलेल्या उदात्त आणि देशभक्ती-च्या संदेशाचें पावित्र्य संशयित होत नाहीं, तर कोठेंकोठें घडलेल्या थोडयाशा अत्याचारांमुळें त्यांच्या शत्रूंनीं त्यांच्यावर केलेल्या अत्याचारांच्या पर्वतापुढें राईसारख्या भासणाऱ्या अत्यंत क्षुद्र अत्याचारामुळें किंवा अपरिहार्य अंतः-कलहामुळें ज्या अभ्युत्थानानें हिंदूंची ध्वजा शतकांच्या दुर्बलतेच्या आणि दास्या-च्या धुळींतून बाहेर काढली, तिला राजांच्या आणि सार्वभौमांच्या; शहांच्या

आणि बादशहांच्या प्रबल विरोधाशीं झुंजून उभी केली आणि थेट अटकेवर रोवून त्याच शहांना आणि बादशहांना गुढघे टेंकून तिच्यापुढें अभिवादन करावयाला लावलें त्या मराठ्यांच्या अभ्युत्थानाचा आणि त्यानें निर्माण केलेल्या त्या हिंदुसाम्राज्याचाही प्रत्येक देशभक्ताचा हिंदु-हृदयांतील प्रेमाचा आणि कृतज्ञतेचा उपहार घेण्याचा अधिकार नाहींसा होत नाहीं.

---

प्रकरण ९ वें

# साम्राज्याकडून सर्वांगीण हिंदु-पुनरुज्जीवनाचें संवर्धनः

" शास्त्रेण रक्षिते राष्ट्रे शास्त्रचिंता प्रवर्तते !"

मराठ्यांच्या उदयानें सूचित झालेल्या हिंदु-पुनरुज्जीवनाला जरी प्रथम राजकीय आणि सैनिक कार्यक्षेत्रांत आपलें अस्तित्व प्रस्थापित करून एक समर्थ आणि राष्ट्रीय राजसत्ता निर्माण करणें आवश्यक झालें—कारण असें राष्ट्र केव्हांही जीवनाच्या इतर सर्व शाखांना जीवनभूतच असणार—तरी मग मराठी राजसत्तेच्या छत्राखालीं राष्ट्राच्या राजकीय स्वातंत्र्याचें सर्वसंमत अत्यावश्यक कार्य साधतांच इतर सर्व गोष्टींतही तें दिसून आल्यावांचून राहिलें नाहीं. महाराष्ट्रांतील हिंदु सार्वभौमसत्तेनें हिंदु जनतेमध्यें पुनरुज्जीवनाच्या आंदोलनामुळें स्फूर्ति मिळालेल्या अनेक चळवळी आणि सुधारणा, प्रविष्ट केल्या, त्यांना आश्रय दिला, त्यांचा व्ययभार चालविला आणि त्या वाढीला लावल्या. आपल्या शत्रूंमध्यें ज्या कांहीं चांगल्या गोष्टी होत्या त्या बहुतेक त्यांनीं आत्मसात् करून घेऊन हिंदुजीवनाची परकीय वर्चस्वाच्या प्राणघातक अतिरेकाच्या मगरमिठींतून सुटका करावयाचा आणि तें स्वतंत्र बनवावयाचा प्रयत्न केला. त्या वेळीं हिंदुस्थानांतील सर्व देशभाषांवर पारशी आणि आरबी भाषांनीं आक्रमण करून अगदीं गुदमरून जाईपर्यंत पगडा बसविला होता. सर्व राजसत्तेचें लिखाण सामान्यपणें पारशी भाषेंत ठेवलें जाई. पण मराठ्यांनीं हिंदु राज्याची प्रस्थापना केल्याबरोबर कोणतेंही राज्यकारभाराचें लिखाण पारशीमध्यें लिहितां कामा नये अशी आज्ञा काढली. मग त्यांनीं आपली भाषा शुद्ध करण्याचा प्रयत्न केला. मराठ्यांनीं जर अगदीं वेळेवर भाषाशुद्धीकरणाचा प्रयत्न केला नसता तर मराठी भाषा ही

सिंधमधील आणि पंजाबांतील प्रचलित शिष्ट भाषेची आणि लिपीची जशी अवस्था झाली आहे तितक्या अधोगतिपूर्वक आरबी किंवा उर्दू भाषां च्या आहारीं गेली असती; पण राष्ट्रीय सत्ता प्रस्थापित होतांच राष्ट्रभाषेचें पुनरुज्जीवन झालें. राजव्यवहार-कोश नांवाचा एक अधिकृत शब्दकोश रचण्याच्या कामावर एका विद्वान् पंडिताची योजना झाली आणि त्यांत ज्या परक्या मुसलमानी शब्दांनीं राजकीय लिखाण आणि विचार अगदीं आत्मपरतंत्र करून टाकले होते त्या सर्व शब्दांच्या योग्य प्रतिशब्दांचा संग्रह करून ते क्रमवार देण्यांत आले. परकीय अशुद्ध शब्द उपयोगांत आण-ण्याविरुद्ध लोकमतही बनविण्यांत आलें. परकीय शब्दांविरुद्ध केलेल्या ह्या चळवळीचा मराठी भाषेवर विलक्षण परिणाम झाला. नंतरच्या राज्यकार-भारांतील पत्रव्यवहारांत आणि राजकारणी पुरुषांच्या लिहिण्यांत अतिशय सुधारणा दिसून येते आणि कधीं कधीं तर एकही परकी शब्द आपल्या लिहिण्यांत येऊं न देण्याचा बुद्धिपुरःस्सर प्रयत्न केलेला आढळतो. अशा रीतीनें ऐतिहासिक किंवा राजकीय, काव्य किंवा गद्य वाङ्मय हळुहळू अधि-काधिक शुद्ध होऊं लागून त्याचा कळस मोरोपंतांच्या प्रचंड महाभारत ग्रंथांत झाला. ह्या एवढ्या संस्मरणीय काव्यांत दहावीस परकी शब्द शोधून काढणें कठीण जाईल. बखरीच्या स्वरूपाची ग्रंथ निष्पत्तीही कांहीं कमी महत्त्वाची नाहीं. किंबहुना त्यांच्यापैकीं कांहींतील मराठी भाषा इतकी सजीव आणि चैतन्यानें प्रस्फुटित आहे कीं, तींतील आवेश आणि उठावदार साधेपणा ह्यांचें अनुकरण अशक्य वाटतें. तत्कालीन राजकीय जीवन-क्रमानें इतिहास सजीव केला होता, आणि ज्या पिढींतील लोकांचा बहुतेक काळ पूर्णांशानें थोर आणि शौर्याचीं कृत्यें करण्यांत व्यतीत होत होता आणि म्हणून ज्यांना बोलावयाला वेळ क्वचित् मिळत होता त्यांची मोहक वाणी स्वाभाविकपणेंच वक्तृत्वपूर्ण झाली होती. आजच्या काळांत ती ओजस्विता व महत्त्व आपल्या भाषेंत आणण्याचा प्रयत्न निराश होऊन सोडून द्यावा लागतो. कारण, आजच्या युगांत इतिहास, घडविल्यावांचून लिहावा लागतो आणि तशीं कृत्यें आयुष्यांत प्रत्यक्ष करून दाखविण्याला लागणाऱ्या धाडसी कार्यक्षमते-वांचून आणि संधीवांचून पराक्रमी कृत्यांचीं काव्यें गावीं लागतात !

मराठी राज्यांत केवळ मराठी भाषेलाच नाहीं तर अखिल हिंदूंची पवित्र भाषा जी संस्कृत तिलाही स्वाभाविकपणें अतिशय उत्तेजन मिळालें. पुरातन

विद्येच्या सर्व शाखांचें, वेदांचें, वेदांगांचें, शास्त्रांचें, पुराणांचें, काव्यांचें, ज्योतिषाचें, आयुर्वेदाचें आणि हिंदुसाहित्याचें सर्व प्रकारांचें–पुनरुज्जीवन झालें. मराठ्यांच्या हिंदु साम्राज्यांतील सर्व हिंदुस्थानभर विखुरलेलीं लहानमोठीं जीं दहाबारा राजधान्यांचीं नगरें होतीं तीं हिंदु विद्वत्तेचीं केंद्रस्थानें बनलीं आणि त्यांनीं हिंदुस्थानभर शिक्षणाच्या शाळा आणि विद्यालयें चालविलीं. लोकांच्या नैतिक शिक्षणाकडेही दुर्लक्ष केलें गेलें नाहीं. मराठ्यांच्या बाहुबलाच्या छत्राखालीं साधुसंतांच्या मंडळांना रामेश्वरापासून हरिद्वारपर्यंत आणि द्वारकेपासून जगन्नाथपर्यंत हिंदु स्त्रीपुरुषांना हिंदु नीतिशास्त्र, हिंदु तत्त्वज्ञान आणि हिंदु परंपरा ह्यांचा उपदेश करीत आणि धडे देत सर्वभर स्वैरसंचार करतां येऊं लागला. त्यांचा परामर्ष घ्यावयाचा, त्यांना साह्य करावयाचें आणि त्यांच्या इच्छेस येईल त्याप्रमाणें त्यांना वागतां येईल अशी सोय करून द्यावयाची, ह्यासाठीं साम्राज्यांतील राजांची आणि राजप्रतिनिधींची, प्रांताधिकाऱ्यांची आणि सेनाधिकाऱ्यांची एकमेकांशीं चढाओढ चाले. श्रीरामदासस्वामींनीं प्रस्थापित केलेल्या संस्थांसारख्या विस्तृत आणि संघटित संस्थांनीं सर्वभर मराठ्यांचें एक जाळेंच निर्माण केलें होतें. हिंदुस्थानभर पसरलेल्या ह्या मठांचा योगक्षेम साम्राज्याकडून चाले आणि केवळ धार्मिकच नाहीं तर राजकीय प्रचारकार्याचीं हीं केंद्रें म्हणून त्यांचा उपयोग होई. ह्या व्यतिरिक्त प्रत्यक्ष पंतप्रधानांच्या आश्रयाखालीं पुण्याला प्रत्येक श्रावणमासांत अखिल भरतखंडांतील शास्त्रीपंडितांचा वार्षिक रमणा भरे. हिंदु विद्येच्या सर्व शाखांमध्यें तेथें नियमित परीक्षा घेतल्या जात आणि त्यांत उत्तीर्ण होणाऱ्या मानार्ह विद्वानांना पारितोषकें वांटण्यांत येत, पदव्या दिल्या जात आणि वर्षासनें मिळत. ह्या एकाच प्रसंगीं हिंदु विद्येला उत्तेजन आणि पारितोषक देण्यांत एक लाखावर रुपये उडून जात. हिंदूंच्या विचारांचे आणि नैतिकबलाचे इतस्ततः विस्कळित झालेले सर्व प्रवाह एका दिशेला वळवून एकत्रित करण्यांत ह्या रमण्यांचा फार उपयोग होई. हे रमणे ह्या सर्व आचारविचारांना त्या सर्वांना जोडून ज्याचे अवयव परस्परांशीं संबद्ध आहेत असा त्यांचा एक देह करण्यांत साह्य करीत आणि आपल्यांत जातींचे आणि पंथांचे इतके भेद असले तरी आपण सर्व हिंदु राष्ट्राच्या शत्रूंना परास्त केलें आहे आणि हिंदूंच्या धर्माच्या, हिंदूंच्या देशाच्या आणि हिंदूंच्या संस्कृतीच्या कार्यांचा पुरस्कार आणि संरक्षण करीत हिंदु राज्यावर विजय-

भरानें डुलते आहे अशा एका राष्ट्रीय ध्वजेखालीं संयुक्त झालेले हिंदु आहोंत अशी भावना सर्वांच्या अंतःकरणांत जागृत करीत.

सार्वजनिक उपयोगांच्या कार्याकडेही पंतप्रधानांचें आणि त्यांच्या अधिकाऱ्यांचें विशेष लक्ष्य असे. उत्तरेस अटक आणि दक्षिणेस रामेश्वरापासून करभाराच्या रूपानें सुवर्णनद्या वाहून त्यांचा संगम पुण्यांत होत होता खरा; पण कृपणपणानें तो संचय कांहीं तेथें गाडून ठेवण्यांत येत नसे कीं भ्रष्टविलासांत स्वैरपणें उडवला जात नसे, तर अंतीं तो अत्यंत उपयुक्त पात्रांतून हिंदुस्थानच्या सर्व भूमीवर तीर्थांकडे आणि क्षेत्रस्थानांकडे तो परत वाहत जाई. जिच्या कांठीं सुंदर आणि लोकोपयोगी घाट बांधलेले नाहींत अशी एकही पवित्र नदी हिंदुस्थानांत नाहीं; ज्याला एकाद्या प्रशस्त धर्मशालेनें किंवा गगनचुंबी कळसाच्या मनोहर देवालयानें शोभा आणली नाहीं असा महत्त्वाचा घाट नाहीं; ज्याला एकादी थोर देणगी, अग्रहार किंवा वर्षासन मिळालेलें नाहीं, जें महाराष्ट्राच्या हिंदु साम्राज्याच्या उदार दातृत्वाची साक्ष देत उभें राहिलेलें नाहीं असें प्रसिद्ध देवालय नाहीं. जरी इतक्या प्रचंड आणि निकडीच्या सैनिक उलाढाली, युद्धें आणि युद्धवार्ता सतत चाललेल्या असत तरीही जिंजी आणि तंजावरपासून ग्वाल्हेर आणि द्वारकेपर्यंत पसरलेल्या विस्तृत प्रदेशांत वास्तव्य करणाऱ्या त्या साम्राज्याच्या प्रत्यक्ष राजशासनाखालीं असलेल्या लोकांना हिंदुस्थानांतील इतर कोणाही राज्यांतील प्रजाजनांपेक्षां पुष्कळच कमी कर द्यावा लागे. न्याय्यतर शासनपद्धति लाभे आणि अधिक शांतता व समृद्धता उपभोगावयाला मिळे. मराठी साम्राज्यांतील रस्ते, पत्रांची ने-आण करण्याची योजना, कारागृहांची व्यवस्था, रुग्णालयांची सोय आणि इतर सार्वजनिक उपयुक्ततेचे राज्यविभाग इतर समकालीन राज्यांतील ह्या गोष्टींपेक्षां अधिक सुस्थितींत होत आणि अधिक नियमितपणें चालत असत हें दाखवावयाला पुष्कळ पुरावा उपलब्ध आहे. त्या काळच्या लोकांना एकंदरींत स्वातंत्र्यांतील सुखांची गोडी वाटत होती, त्यांचें आपल्या राज्यावर प्रेम होतें, इतकेंच नाहीं तर त्यांना आपल्या राष्ट्राविषयीं अत्यंत अभिमान वाटे आणि आपल्याला असल्या वैभवाच्या दिवसांत जन्माला घातलें म्हणून ते त्या दयाघन परमेश्वराचे अत्यंत कृतज्ञतापूर्वक उपकार मानीत असत, हें त्या वेळचीं उपलब्ध पत्रें, कविता, पोवाडे,

बखरी व इतर तत्कालीन वाङ्मय इत्यादि पहिल्या प्रतीच्या पुराव्याच्या वाचनानें उत्कृष्टपणें निदर्शनास येतें.

विचारांत प्रगति करणाऱ्या आणि ज्यांचे परिणाम दूरवर पोहोंचतील अशा चळवळींचीही कांहीं उणीव नव्हती. लोकांच्या राजकीय किंवा सामाजिक प्रगतीच्या आड येणाऱ्या किती तरी चालीरीति आणि भोळ्या समजुतींतील तीव्रता जाऊन त्या शिथिल झाल्या आणि कांहींचें तर समूळ उच्चाटण झालें. देवपूजेचे सुधारलेले मार्ग प्रचलित करणें, निरनिराळ्या पोट जातींत लग्नव्यवहार घडवून आणणें, समुद्रावरील प्रवासाला उत्तेजन देणें, नाविक धाडसाचा आणि शक्तीच्या कृत्यांचा पुनरुद्धार करणें, समुद्र ओलांडून जाऊन युरोप खंडांत प्रवेश केलेल्या किंवा अटकेच्या पलीकडे गेलेल्या व्यक्तींना पुनः समाजांत परत घेणें, ख्रिस्त्यांनीं किंवा मुसलमानांनीं बलानें किंवा छलानें ज्यांना बाटवून परधर्मी बनविलें अशांची शुद्धि करून त्यांना पुनः हिंदुधर्मांत घेणें इत्यादि गोष्टींत लक्ष्यांत भरण्यासारखे प्रयत्न करण्यांत आले. पूर्तुगीजांच्या लेखावरून दिसून येतें कीं, प्रमुख ब्राह्मण मधूनमधून शुद्धिसमारंभाचा बेत घडवून आणीत आणि तेथें पूर्तुगीजांनीं ज्यांना बलात्कारानें बाटवलें असेल त्यांच्याकडून गुप्तपणानें स्नानादि प्रायश्चित्तें करवून घेऊन त्यांना हिंदुधर्मांत पुनः परत घेण्यांत येत असे. अशाच एका प्रसंगीं पूर्तुगीजांना त्याची वार्ता लागून त्यांनीं त्या शुद्धिसमारंभासाठीं गुप्तपणें जमलेल्या मंडळीवर एकाएकीं वेढा घातला आणि त्या निःशस्त्र लोकांवर शस्त्रें चालवून सभा उधळून दिली. त्या वेळीं एक गोसावी 'माझे तुकडे करून फेंकून दिल्याशिवाय मी येथून रेसभरही हालणार नाहीं' म्हणून एकटा तेथें उभा राहिला. त्याचें तें धैर्य पाहून त्या धर्मांध शत्रूंना देखील त्याचें कौतुक वाटल्यावांचून राहिलें नाहीं. निंबाळकरांचें उदाहरण तर आतां सर्वप्रसिद्धच आहे. ह्या थोर मराठी मानकऱ्याला विजापुरच्या बादशहानें छलबलानें बाटवून मुसलमान केलें आणि मग त्याला आपली प्रत्यक्ष मुलगी दिली; पण तरीही तें सर्व सोडून तो पळून गेला, आणि मराठ्यांच्या सैन्यांत येऊन मिळाला. तेथें शिवाजीमहाराजांची प्रसिद्ध माता जिजाबाई हिनें पुढाकार घेऊन शास्त्रीपंडितांची संमति मिळविली आणि त्याला शुद्ध करून परत हिंदुधर्मांत घेतलें. पण कदाचित् एवढ्यानें जुन्या कर्ममार्गी लोकांच्या सर्व शंका दूर होणार नाहींत असें दिसून येतांच त्यांचें पूर्णपणें समाधान करण्यासाठीं त्याच्या वडील

मुलाला शिवाजीमहाराजांनीं आपली मुलगी दिली. दुसरें असेंच प्रसिध्द उदाहरण म्हणजे नेताजी पालकराचें. मराठी घोडेस्वारांचा हा सेनापति म्हणजे शूरपणांत प्रत्यक्ष दुसरा शिवाजी समजला जाई. तो मोगलांच्या हातांत सांपडतां-च त्याला हिंदुस्थानच्या उत्तर सीमेवरील प्रांतांत पाठविण्यांत आलें. बला-त्कारानें त्याला बाटविण्यांत आलें होतें, आणि औरंगझेबाच्या आज्ञेनें सीमा-प्रांतांतल्या क्रूर आणि रानटी लोकांमध्यें त्याची नेमणूक केली गेली; पण तेथूनही संधि साधून कसा तरी निसटून तो महाराष्ट्रांत परत आला आणि आपल्याला परत हिंदु धर्मांत घ्यावें म्हणून त्यानें लोकांची विनंति केली. शास्त्री-पंडितांनीं त्याला संमति देऊन त्याचा प्रश्न शिवाजीमहाराजांपुढें मांडला आणि त्याचीही शुद्धि करून त्याला पुनः हिंदुधर्मांत घेण्यांत आलें. पंतप्रधानांनीं अगदीं नाना फडणविसाच्या वेळेपर्यंत आणि त्यानंतरही हा उपक्रम असाच चालविला. पेशव्यांच्या रोजनिशींत प्रसिद्ध झालेल्या मूळ आज्ञापत्रांवरून आणि लेखावरून दिसून येतें कीं, मुसलमानांनीं किंवा ख्रिस्त्यांनीं बलात्कारानें बाटविलेल्या हिंदूला मग पश्चात्ताप झाल्यामुळें हिंदूंनीं पुनः आपल्यांत परत घेतलें आणि त्यांच्याशीं अन्न-विवाहादि सर्व सामाजिक व्यवहार जातीनें पूर्ववत् करावे असें आज्ञापत्र काढण्यांत आलें; अशीं पुष्कळ उदाहरणें घडत असत. सुरत प्रांतांत ठेवलेल्या मराठी सैन्यांत पुताजी नांवाचा एक सैनिक चाकरींत होता. तो मुसलमानांच्या हातांत सांपडला आणि त्याला त्यांनीं बलात्कारानें मुसलमान बनविला; पण जेव्हां बाळाजी बाजीराव दिल्लीहून परत येतांना त्या वाटेनें आले तेव्हां पुताजी मुसलमानांच्या हातां-तून निसटला ! आणि पंतप्रधानांच्या सैन्यांत येऊन मिळाला. नंतर त्याच्या सर्व जातीची पंचायत भरली आणि तेथें त्यांनीं त्याला परत आपल्या जातींत घ्यावयाला जात सिध्द असल्याचा ठराव केला. पंतप्रधानांना ही जातीची सिध्दता कळविण्यांत आली आणि मग त्यांच्या विशेष अनुज्ञेनें त्याची शुध्दि करून घेतली (पा. २१५–२१६). तुळाजीभट जोशांचें उदाहरण बला-त्कारानें बाटविल्याचें नाहीं. मोहाला गुंतून ते मुसलमान झाले, पण मग त्यांना आपल्या कृत्याचा पूर्ण पश्चात्ताप झाला. ते पैठणला गेले; तेथल्या ब्रह्मवृंदा-समोर हात बांधून उभे राहिले, आपला अपराध मान्य केला आणि त्या-साठीं त्यांची क्षमायाचना करून त्यांनीं 'पुनः आपल्याला हिंदु करून घ्यावें' म्हणून त्यांची अनुज्ञा मागितली. पैठणचा ब्राह्मण-समाज म्हणजे जुन्या कर्मठ-

पणाचा कडेकोट समजला जात असे; पण तेथल्या ब्रह्मवृंदानेंही सभा भरवून त्याला आतां मनापासून आपल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला आहे एवढें एक कारणच पुरेंसें धरून 'त्याची शुध्दि करतां येते' असा निर्णय दिला आणि त्याच्यासह सर्वांनीं भोजन केलें ! नंतर ब्रह्मवृंदाचा हा निर्णय बरोबर मानला जाण्यासाठीं राजसभेच्या योग्याधिकाऱ्याकडून तसें आज्ञापत्र काढण्यांत आलें आणि आपल्या जातीचे सर्व अधिकार जोशांना पूर्वीप्रमाणेंच उपभोगतां येऊं लागले. संभाजीमहाराजांचा काळ इतका धामधुमीचा; पण त्या वेळींही ह्या उपक्रमांत खंड पडला नव्हता. महाराष्ट्राचे राजे आणि छत्रपति संभाजी-महाराज ह्यांच्या निर्देशान्वयें योग्याधिकाऱ्यांनीं काढलेलें एक महत्त्वाचें आज्ञा-पत्र उपलब्ध आहे, त्यांत मुसलमानांनीं बलात्कारानें बाटवून मुसलमान केले-ल्या गंगाधर कुळकर्णी नांवाच्या गृहस्थाला पुन्हा हिंदुसमाजांत शुध्द करून प्रविष्ट करून घेतल्याचा वृत्तान्त असून त्याबरोबर त्याला शुध्द करून घेण्या-साठीं केलेल्या विधीची व सामुग्रीची समग्र माहिती दिली आहे; व अंतीं मनुस्मृतींतील एका वचनाशीं पूर्णपणें सदृश असा जो कोणी ज्ञातिब्राह्मण ह्याच्या-शीं ह्यापुढें अन्नोदकाचा किंवा अन्य कोणताही सामाजिक व्यवहार कर-णार नाहींत त्यांनीं देवब्राह्मणांच्या कार्यांत विघ्न केलें असें होईल आणि त्यांना त्यामुळें महापातक लागेल असें सर्व लोकांना निषेधवाक्य लिहून त्या आज्ञा-पत्राचा शेवट केला आहे. जातांजातां ह्या संबंधांत जोधपूरच्या इंद्रकुमारीच्या वृतान्ताचाही आम्हीं येथें उल्लेख करून ठेवणें योग्य होईल. मोगल बादशहाशीं तिचें लग्न करून देण्यांत आल्यावर पुष्कळ वर्षांनंतर जेव्हां ती दिल्लीहून परत आली तेव्हां रजपुतांनीं तिला परत हिंदुज्ञातींत घेतलें.

आणि हें साहजिकही होतें. आपल्या मातृभूमीला झालेल्या भयंकर आघाता-चें राजकीय व्रण बुजवावयाचें कार्य ज्यांनीं आपल्या शिरावर घेतलें होतें तेच तिला झालेले धार्मिक आणि सामाजिक व्रणही बुजविण्यासाठीं आपली परा-काष्ठा करावयाला पुढें येणार. हे सामाजिक व धार्मिक व्रण एका दृष्टीनें राजकीय व्रणापेक्षांही फार प्राणघातक. ज्या हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या आणि हिंदु संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाच्या चळवळीच्या स्फूर्तीनें राजकीय आणि सामाजिक क्षेत्रांत एवढालीं महत्कृत्यें घडवून आणलीं तिच्याकडून आपल्या-ला मध्यंतरीं शतकानुशतकें कराव्या लागलेल्या प्रचंड झगड्यांत आपल्या संस्कृतीला, नीतीला आणि धर्माला जी खेदकारक हानि पोंचली होती ती

भरून काढण्याच्या उत्कटतेंत आणि प्रयत्नांत तसली मारक अनास्था दाखविली जाणें शक्य नव्हतें; पण एका शतकापेक्षां देखील कमी वर्षांत मुसलमानी राजसत्तेनें सर्व दक्षिण-हिंदुस्थानांत आपल्या धर्माचा इतका प्रसार केला कीं, त्यांच्या धर्मांतर करावयाला लावणाऱ्या तरवारीला शेंकडों हजार हिंदु बाटविण्याची प्रौढी मिरवितां येऊं लागली होती. तेथेंच जिनें मुसलमानी सिंहासनें आणि राजकिरीट जिंकून चूर्ण करून टाकले त्या हिंदुसत्तेचे शासनाखालींही हिंदूंना कांहीं शेकड्यांपेक्षां अधिक मुसलमानांना हिंदु करतां येऊं नये, निदान आपल्याच परधर्मांत गेलेल्या हिंदूंना परत स्वधर्मांत घेतां येऊं नये ही किती खेदाची गोष्ट आहे! त्यांनीं आपल्या पराक्रमानें आतां ती धर्मांतर करविणारी मुसलमानी तरवार मोडून विच्छिन्न केली होती आणि त्यांनीं मनांत आणलें असतें तर त्यांना वाटेल तें करतां आलें असतें.—पण त्यांना त्या परंपरेचें शिक्षणच मिळालेलें नव्हतें कारण हेंच दिसतें कीं, राजकीय पारतंत्र्याच्या शृंखला कधीं काळीं झटकून टाकतां येतात किंवा फोडून काढतां येतात; पण सांस्कृतिक अंधश्रद्धेच्या शृंखला काढून टाकणें नेहमींच फार कठीण जातें. तशांत महाराष्ट्रीय लोकांची बहुतेक कर्तृत्वशक्ति आपल्या राष्ट्राचें आणि त्यांनीं स्थापिलेल्या अखिल भारतीय हिंदु-साम्राज्याचें राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याच्या व रक्षण करण्याच्या सर्व प्रथम आणि अत्यावश्यक कार्यांतच त्यांना स्वाभाविकपणें व्यय करावा लागला. हिंदूंचें राजकीय वर्चस्व नष्टप्राय करून टाकण्याची प्रतिज्ञा करून, पुढें सरसावलेल्या अनेक शत्रूंच्या मरणांतक विरोधाला बाजूस सारून त्यांना तें साम्राज्य निर्माण करावें लागलें. ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे सामाजिक सुधारणेच्या आणि शुद्धीच्या स्वतःपुरत्या अत्यंत महत्त्वाच्या पण एकंदरींत दुसऱ्या प्रतीच्या चळवळीकडे त्यांना त्यांनीं दिला त्यापेक्षां अधिक वेळ कां दिला नाहीं याविषयीं आपल्याला आश्चर्य वाटेनासें होतें. त्यांनीं शुद्धीसारखी आमूलाग्र क्रांतिकारक चळवळ मुळींच चालू केली नाहीं आणि हिंदु मनोवृत्तींत आणि लोकमतांत धर्मबाह्य झालेल्यांना हिंदु-समाजांत परत प्रविष्ट करावयाला आणि त्याहूनही अत्यंत कठीण म्हणजे शुद्ध केलेल्यांना आपल्या जुन्याच जातींत आणि पंथांत स्थान मिळवून द्यावयाला अनुकूल असें प्रत्यक्ष परिवर्तन घडवून आणण्याइतका जुन्या अंधश्रद्धेच्या केंद्रावर आघात करण्यांत यश मिळविलें ह्याचेंच आश्चर्य आहे.

## प्रकरण ६ वें

# प्रेमाचें आणि कृतज्ञतेचें ऋण

**सौख्य स्मरुनि राज्याचें मीनापरि अखंड तळमळती।**

—प्रभाकर.

आणि आतां, ह्या आपल्या शेवटच्या व आपल्या वंशाच्या प्राचीन इतिहासापुरतेंच पाहिलें तर आपल्या हिंदु साम्राज्यापैकीं सर्वांत श्रेष्ठ अशा हिंदु साम्राज्यावर पडदा पडूं द्या! अत्यंत दुःख वाटतें कीं, तो इतक्या अकस्मात् पाडावा लागतो आहे!

ज्या कृष्ण दिवशीं आपला सिंध प्रांताचा शूर हिंदु राजा दाहीर हा सिंधूच्या कांठीं युद्धांत पतन पावला, त्याच वेळीं त्याच्याबरोबर आपली सौभाग्यलक्ष्मीही अस्तंगत झाली! काबूलचा हिंदु राजा त्रिलोचन पाल, पंजाबचे जय पाल आणि अनंग पाल, दिल्लीचा पृथ्वीराज, कनोजचा जयचंद, चितूरचा संग, बंगाळचा लक्ष्मण सेन, देवगिरीचे रामदेवराव आणि हरपाल, विजयानगरचे सम्राट् आणि महिषी, किरीट आणि राजचिन्हें एकामागून एक सिंधु नदापासून दक्षिण समुद्रापर्यंत सर्वभर धुळींत लोळलीं; आणि धाडसी अहंमन्य आणि दुर्दांत शत्रु आपला गुडघा आपल्या जातीच्या धापा टाकणाऱ्या वक्षःस्थलावर पक्का रोंवून ताठ उभा राहिला! केवळ चितोडच नाहीं तर त्याहून अधिक मोठ्या प्रमाणांत आणि त्याहून कमी अभिमानास्पद रीतीनें सर्व हिंदुस्थान पार जळून जाऊन त्याच्या राखेचा प्रचंड ढीग बनला; त्यांत मधूनमधून क्षणिक प्रकाश देत असणाऱ्या हुतात्म्याची एकाददुसरी ज्योत चमकेल तेवढीच. आणि आपल्या हिंदु जातीच्या आशेच्या राखेचा तो प्रचंड ढीग आपल्या पायाखालीं घालून औरंगझेब यानें क्रोधभरानें किंचित् पदाघात करतांच निष्कोषित होऊन दुसऱ्याला कंठस्नान घालण्याची वाट पहात लाखो तरवारींनीं परिवेष्टित अशा आपल्या मयूराकृति सार्वभौम सिंहासनावर सुरक्षितपणें आरूढ झाला होता!

ह्याप्रमाणें 'या सकल भूमंडळाचे ठायीं, हिंदु ऐसा उरला नाहीं' अशी स्थिति झाली असतांना 'एका लहानशा कोनांत हिंदु तरुणांचें एक मंडळ गुप्त रीतीनें एकत्र झालें आणि आपल्या मृत राजांच्या व राण्यांच्या

पडलेल्या सिंहासनांच्या आणि गळालेल्या किरीटांच्या आपल्या जातीच्या आशांच्या बनलेल्या त्या पर्वतप्राय ढिगाच्या नांवानें आपल्या राष्ट्रावर आणि धर्मावर केलेल्या अन्यायांचा वचपा काढण्यासाठीं आणि हिंदु ध्वजेच्या आणि हिंदु राज्यदेवतेच्या मानांची पुन्हा प्रतिष्ठा करण्यासाठीं, आपल्या भयंकर शत्रू-विरुद्ध बंड करून उठावयाच्या त्यांनीं शपथा घेतल्या. थोडयाशा मोडक्या-तोडक्या गंजलेल्या तरवारींना आपल्या प्रतिज्ञेकरितां साक्ष ठेवून हें तरुण-मंडळ बाहेर पडलें. 'निवळ वेडेपण!' स्वाभाविकपणें सर्व लोकांनीं उद्गार काढले. 'उंः' म्हणून औरंगझेबानें तुच्छता दर्शविली. 'आत्महत्या' स्वतःला शहाणे समजणाऱ्या लोकांनीं सूचना दिली. आणि त्यांचें म्हणणें मोठेंसें चुकीचें नव्हतें. कारण, शिवाजी कांहीं पहिला बंड करून उठणारा नव्हता. त्याच्यापूर्वी पुष्कळ तेजस्वी तरुणांनीं बंडाची उठावणी केली होती आणि अपयश येऊन अ-यशस्वी बंडाचें भयंकर प्रायश्चित्त भोगलें होतें. तरी पण न खचतां अत्यंत सावधगिरी ठेवून ह्या तरुण मंडळींनीं चिकाटी धरली. कारण त्यांची निष्ठा होती कीं, ह्या उठावणींत आपल्यालाही जरी अपयश आलें आणि अपेशी बंड करणाऱ्यांचें घोर शासन भोगावें लागलें तरी आयुष्यभराच्या पारतंत्र्यापेक्षां वरपांगी दिसणाऱ्या विस्मृतीमध्यें अंकुरित होणाऱ्या बीजाप्रमाणें ज्याची स्मृति मागें राहील अशी स्वातंत्र्याची उठावणी अनंत पटीनें अधिक वर्णनीय आहे.

त्या गोष्टीला जवळपास वीस वर्षें झालीं. औरंगझेबाच्या कपाळावर औदास्य स्पष्ट दिसत होतें आणि त्याचा शब्द मंद झाला होता; कारण, आज तें मराठी तरुणांचें लहान मंडळ एका हिंदु राज्याचें केंद्र झालें होतें. त्या सामर्थ्यशाली मोगल बादशहानें उद्गार काढले, 'क्षिति नाहीं! हे काफर त्या क्षुद्र लहान कोनांत आहेत तोंच मी त्यांना ह्या जगांतून पार नाहींसे करून टाकतों'. लागलींच आपल्या त्या शंभर हजार लवणाऱ्या तरवारी घेऊन रागावलेला बादशहा त्या लहानशा एकनिष्ठ हिंदु राजसत्तेवर जाऊन पडला आणि आपल्या अनावर क्रोधाच्या भरांत त्या भुरटया बंडखोरांना जन्म देणाऱ्या भूमीवर इतक्या बलानें आघात केला कीं, ती भूमि त्याच्या दोन्ही पायांखालीं दुभंग होऊन गेली! बलशाली मोगल सम्राट् हालूं लागला. त्याला स्वतःला स्थिर करतां येईना, कीं त्या 'आ' पसरलेल्या आणि एकसारख्या रुंदावत चाललेल्या खोल भेगेच्या बाहेर निघून जातां येईना. त्यानें जितक्या अधिक त्वेषानें आदळ-आपट आणि धडपड केली तितका तो अधिक खोल रुतला. त्यांतून त्याला

पुन्हा बाहेर निघणें शक्य झालें नाहीं. त्यांच्या आणि त्यांच्या त्या लपलपणाऱ्या शंभर हजार तरवारींच्या थडग्यावर त्यांना आपल्या पोटांत सांठवून पुन्हा त्या लहान कोनांतली भूमि सांधली गेली आणि त्या बादशाही थडग्यांच्या पायऱ्या करून त्यावरून ती लहान हिंदु-राजसत्ता हिंदु-साम्राज्याच्या उच्च शिखरावर चढून गेली.

कारण, लवकरच महाराष्ट्राची ती शूर मंडळी बाहेर पडली आणि आपला भगवा झेंडा—हिंदुत्वाची ती पवित्र प्रतिमा—पुढें करून त्यांनीं हिंदुस्वातंत्र्याचें युद्ध सर्व देशभर पसरविलें. त्यांनीं गुजराथेंत प्रवेश केला; त्यांनीं खानदेशांत प्रवेश केला; त्यांनीं बुंदेलखंडांत प्रवेश केला; त्यांनीं माळव्यांत प्रवेश केला. त्यांनीं गोदावरी ओलांडली; ते चंबळा पार झाले; ते कृष्णा उतरून गेले; त्यांनीं तुंगभद्रेचें परतीर गांठलें. त्यांनीं आपल्या सेनेचा तंजावरला तळ दिला; त्यांनीं जिंजी भांडविली; त्यांनीं नागपूर जिंकलें; त्यांनीं ओरिसा पादाक्रांत केला; त्यांनीं पायरीवर पायरी उभी करून, दगडावर दगड रचून, बांधणी केली; अशा क्रमाक्रमानें शेवटीं यमुनेपासून तुंगभद्रेपर्यंत आणि द्वारकेपासून जगन्नाथापर्यंत सर्व प्रदेश पद्धतशीर रीतीनें आणि पूर्णपणानें मुसलमानी परसत्तेपासून स्वतंत्र करण्यांत आला आणि त्यांत समर्थ व सलग अशा हिंदु-साम्राज्याची स्थापना झाली. एवढें केल्यावर ते यमुना उतरले, गंगापार झाले आणि गंडकी ओलांडून गेले. त्यांनीं चक्रवर्ती गुप्तांची राजधानी पाटणा नगरी हस्तगत केली, कलकत्त्याला कालीवर पूजा चढवली, आणि काशीला विश्वेश्वराला आरती ओंवाळली. आतां ते— ज्या मंडळानें १०।१२ च्या टोळ्या करून गुप्त सभा भरवल्या आणि गंजलेल्या तरवारींना साक्ष ठेवून शपथा घेतल्या त्यांचेच वंशज—ते दहा दहांच्या टोळ्यांनीं हिंडत नव्हते तर त्यांची संख्या हजारांच्या शतकांनीं मोजावी लागत होती; ते गुप्त षड्यंत्र करीत नव्हते तर ध्वजा फडफडवीत आणि रणवाद्यें वाजवीत होते—मुसलमानी साम्राज्याच्या प्रत्यक्ष राजधानीवरच चालून गेले, आणि त्यांनीं तिच्या वेशीच्या दारावर मोठ्यांनीं ठोठावलें. तेथें मौलवी आणि मौलाना अद्यापपर्यंत पुराणांच्या अनुयायांच्या सैन्यावर कुराणाच्या अनुयायांच्या शस्त्रांनीं मिळविलेल्या काल्पनिक राजकीय विजयांच्या कथा वर्णन करून, कुराणाच्या सत्यत्वाविषयीं स्वतःची समजूत करून घेण्यांत आणि इतरांना तशी समजूत करून घ्यावयाला भाग पाडण्यांत गर्क होऊन गेले होते. तोंच, इतक्या जाति असूनही अनेक धर्म-

पंथ असूनही, मूर्तिपूजा करीत असूनही आणि हनुवटीवर दाढीचा केंस नसूनही हिंदूंनीं दिल्लीच्या दारावर प्रहार केला आणि अप्रतिहत बलानें पुढें घुसून अगदीं इस्लामाच्या अंतर्गडावर भगवा-झेंडा उभारला, हें प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहून त्यांना लाजेनें खालीं माना घालाव्या लागल्या. मुसलमानांच्या समजुतीप्रमाणें पूर्वींच्या दिवसांत इस्लामावरच्या संकटसमयीं जिब्राअल जसा धांवून येत असे तसा ह्या वेळीं पुराणांनीं कुराणावर मिळविलेला हा विजय हरण करून घेण्यासाठीं कोणी जिब्राअल आला नाहीं. आतां ह्यापुढें मुसलमानांच्या अर्धचंद्राबरोबर अक्षय राहणारा विजय हाच मुसलमानी धर्माच्या सत्यतेचा अत्यंत निर्णायक असा पुरावा आहे आणि पददलित हिंदु-देवस्थानांची झालेली धूळ ही हिंदु धर्माच्या शिकवणीच्या असत्यपणाची तितकीच निरुत्तर करणारी साक्षीदार आहे असें म्हणणें अशक्य झालें. ही विचारसरणी उघडउघड भ्रमपूर्ण असली तरी राष्ट्रीय पराजयाच्या आणि जातीय विप्लवाच्या व तदङ्गभूत धैर्यभ्रष्टतेच्या काळांत इतकी प्रभावी होते, कीं आजपर्यंत इतर सर्व विद्वानांच्या वादविवादांनीं आणि ईश्वरविषयक अनुयायांनीं व दृष्टान्तांनीं हिंदुधर्मांतील लोक मुसलमानी कळपांत ओढून नेले असतील त्यापेक्षां अधिक तिच्यामुळें गेले आहेत. दिल्लीच्या दारावर दिलेल्या धडकांबरोबर मराठ्यांनीं ह्या विचारसरणीच्या डोक्यावर इतका भयंकर टोला दिला कीं, त्याबरोबर तिच्याकडून अगदीं उलट गोष्ट सहज वदवून घेतां आली असती. आतां मशीद ठेंगणी होऊन देवालयांना तिच्यावर आपले कळस उंच करितां आले; चांद अधिक क्षीण होऊन धापा टाकूं लागला आणि हिंदुत्वाच्या उन्नत आणि दिव्य शिखरांना रसरशीत सुवर्णरसानें उजळा देत सूर्य वर आला. पुनः एकदा पृथ्वीराजाच्या धर्मवंशजांनीं दिल्ली जिंकून तिच्यावर राज्य केलें आणि भाऊंनीं म्हटल्याप्रमाणें हस्तिनापुराचें राज्य हिंदूंनीं परत मिळविलें. औरंगजेब मराठ्यांना तुच्छतेनें उंदीर म्हणाला होता. 'उंदरा'नें सिंहाची त्याच्या गुहेंत जाऊन आयाळ ओढली आणि त्याचीं नखें व दांत एकएक धरून उपटून काढले. 'गाई'नीं खाटिकाला मारलें ! गुरुगोविंदसिंहांनीं भविष्य वर्तविल्याप्रमाणें 'चिमण्यां'नीं ससाण्याचे तुकडेतुकडे करून टाकले !

त्यानंतर त्यांच्या सैन्यानें योद्ध्यांच्या परिपाठीप्रमाणें—हुतात्मतेच्या परिपाठीप्रमाणें—कुरुक्षेत्रांत स्नान केलें आणि ते आपल्या विजयी हिंदु तरवारी लाहोरच्या भिंतीपर्यंत घेऊन गेले. अफगाण मध्यें आले; त्यांना अटकेच्या सीमेच्या

पलीकडे हांकलून देण्यांत आलें. आतां त्या सीमारेषेवर मराठी घोडेस्वारानें आपल्या घोड्याच्या रश्शी ओढून धरल्या. तो घोड्यावरून खालीं उतरला आणि तिकडे त्याचे सेनानायक आणि नेते सिंधुनद पार होऊन आपलें हिंदु सैन्य हिंदु-कुशाला आणि काबूलला घेऊन जावयाच्या स्वारींच्या योजना ठरविण्यांत गुंतले आहेत तोंपर्यंत थोडासा विसावा घेतला. पारसिकांच्या देशांतून, इंग्लंडहून, पूर्तुगीजांकडून, फ्रेंचांकडून, हालंडमधून आणि ऑस्ट्रियांतून राजप्रतिनिधि पुण्याला आले आणि आपल्याला आपापल्या राज्याच्या वतीनें महाराष्ट्राच्या सार्वभौम राजसभेंत सुमंत म्हणून तेथें राहूं द्यावें अशी विनवणी करूं लागले. बंगालच्या मुसलमान सुभेदारानें, लखनौच्या मुसलमान नबाबानें, हैदराबादच्या मुसलमान निजामानें, म्हैसूरच्या मुसलमान सुलतानानें—मग अर्काटपासून रोहिलखंडपर्यंतच्या त्या छोट्यामोठ्या मुसलमानी अधिकाऱ्यांची आणि संस्थानिकांची गोष्टच सांगावयाला नको—आपल्याला मराठ्यांनीं केवळ जिवंत राहूं द्यावें ह्याचें मूल्य म्हणून त्यांना खंडणी दिली, चौथाई भरली, सरदेशमुखी चुकती केली! निजाम म्हणजे आतां त्यांच्या स्वाधीन असलेल्या प्रदेशाचा मराठ्यांचा थोडासा आडदांड आणि त्रासदायक पण केवळ कर गोळा करणारा चाकर झाला होता. वेळोवेळीं जें जें उत्पन्न तो गोळा करी तें सर्व त्याला कसेंही करून केव्हां तरी मराठ्यांच्या सार्वभौम कोशागारांत नेऊन रिचवावें लागे! ह्या मुसलमानांशींच केवळ त्यांना भांडावें लागत होतें असें नाहीं. आपण पाहिल्याप्रमाणें इराणचा शहा आणि काबूलचा अमीर, तुर्क आणि मोगल, रोहिले आणि पठाण, पूर्तुगीज आणि फ्रेंच, इंग्रज आणि हबशी ह्यांपैकीं प्रत्येकानें आणि ह्या सर्वांनीं त्यांच्या प्रमुखपणाला विरोध केला आणि भूमार्गानें व जलमार्गानें सामना देऊन प्रत्येक रणक्षेत्र झुंजविलें. पण हिंदूंच्या सेनेनें देवाच्या आणि देशाच्या नांवानें तरवार निष्कोषित केली आणि हिंदु-हितसंबंधाच्या, हिंदु स्वातंत्र्याच्या सर्व द्वेष्ट्यांना ते जेथें भेटतील तेथें, भूमीवर किंवा समुद्रांत कापून काढलें. रांगणा, विशाळगड आणि चाकण; राजापुर, वेंगुर्लें आणि बालसिनोर; पुरंदर, सिंहगड, साल्हेर, उमराणी, सावनूर, संगमनेर, फोंडा, वाई, फलटण, जिंजी, सातारा आणि दिंडोरी; पालखेड आणि पेटलाद; चिपळूण, विजयगड, श्रीगांव, ठाणें, तारापुर आणि वसई; सारंगपुर, तिरळ आणि जैतपुर; दिल्ली आणि दुरई; सितई आणि भोपाळ; अर्काट आणि त्रिचनापल्ली; कादरगंज, फरुकाबाद,

उद्गीर, कुंजपुरा आणि पानिपत; राक्षसभुवन, डनवडी, मोतितलाव आणि धारवाड, शुक्रताल आणि नजीबगड; वडगांव आणि बोरघाट; बदामी, आग्रा आणि खरडें.—कोठें खंदक उडून गेले, कोठें वेढे थोपवून धरले; कोठें विजयचिन्हें जिंकून घेतलीं; कोठें समुद्रदलें परास्त केलीं व कोठें भूमियुद्धें जिंकिलीं. त्यांच्या भूमिसैन्यानें आणि समुद्र-सैन्यानें पराक्रमाची सीमा करून नांव गाजविलेल्या रणभूमींपैकीं हीं थोडींशींच नांवें आहेत. ह्यांपैकीं प्रत्येक प्रसंगाच्या स्मरणार्थ कोणच्याही इतर देशाच्या इतिहासांत आणि आपल्याही प्राचीन इतिहासाच्या काळीं जयस्तंभ उभारण्यांत आले असते. शिवाजी-महाराजांच्या जन्मापासून नाना फडणविसांच्या मरणापर्यंत हरिभक्तांना अक्षरशः पराभव कसा तो माहिती नव्हता. जसजसे ते पुढें चालून गेले तसतशा त्यांनीं आपल्या अ-प्रधान राजधान्या—ह्यासुध्दां जगांतील अनेक स्वतंत्र राष्ट्रांच्या प्रधान राजधान्यांच्या एवढया मोठया होत्या—द्रव्यानें भरून सांडणाऱ्या खिशांतून आपण तांब्याचीं नाणीं जितक्या सहजगतीनें आणि प्राचुर्यानें काढून टाकतों, तितक्या सहजपणानें सोडून दिल्या. सातारा, नागपुर, कोल्हापुर, तंजावर, सांगली, मिरज, गुंती, बडोदा, धार, इंदुर, झांशी, ग्वाल्हेर, हीं नगरें म्हणजे युरोपांतल्या स्वतंत्र देशांच्या एवढाल्या प्रांतांचीं किंवा जिल्ह्यांचीं मुख्य ठिकाणें होतीं. ह्याहून लहान अशा ठिकठिकाणच्या असंख्य प्रमुख नगरांची आम्ही गणतीच करीत नाहीं. हरिभक्तांनीं हरिद्वार आणि कुरुक्षेत्र, मथुरा आणि डाकूरजी, अबू आणि अवंती, परशराम आणि प्रयाग, नाशिक आणि त्र्यंबक, द्वारका आणि जगन्नाथ, मल्लिकार्जुन आणि मदुरा, गोकुळ आणि गोकर्ण हीं पवित्र क्षेत्रें हिंदुधर्माच्या द्वेष्टयांच्या मूर्तिभंजक अत्याचारापासून मुक्त केलीं. काशीनें, प्रयागानें, आणि रामेश्वरानें पुन्हा एकदां निर्भयपणानें आपले कळस आणि सौध उभवले आणि आपल्या दळाचा प्रतिशोध घेण्यासाठीं अजूनही हिंदु सार्वभौमसत्ता जिच्यामध्यें चौखटींच्या, चालुक्यांच्या, पल्लवांच्या, पांड्यांच्या, चोलांच्या, केरळांच्या, राष्ट्रकूटांच्या, आंध्रांच्या, केसरींच्या, भोजांच्या, मालवांच्या, हर्ष आणि पुलकेशींच्या, राठोड आणि चव्हाणांच्या, प्राचीन इतिहासांतील नांवाजलेल्या सर्व सार्वभौम राजवंशांच्या पुरातन साम्राज्यांतील जवळजवळ सर्व प्रदेश समाविष्ट झाला आहे आणि हिंदुसाम्राज्यसत्ता—जिवंत आहे म्हणून परमेश्वराचे आभार मानले! त्यांच्या प्रांताधिपांचा आणि सेनापतींचा कधीं कधीं महादजी शिंद्यांच्या

उदाहरणाप्रमाणें एवढ्या विस्तीर्ण प्रदेशावर अधिकार चाले कीं, प्राचीन काळांत तेवढ्या प्रदेशाच्या राजाला अश्वमेध यज्ञाचा अधिकार मिळाला असता. पहिल्या चंद्रगुप्ताचें वैभवशाली साम्राज्य आणि कदाचित् दुसऱ्या गुप्ताचें वैभवाच्या शिखरावरील दिवसांतील साम्राज्य वगळलें तरी त्याच्याशीं विस्तारांत, श्रेष्ठत्वांत किंवा पराक्रमांत तुलना करतां येईल असें दुसरें हिंदु-साम्राज्य सर्व लिखित इतिहासांत आणि पुराणांत आढळणार नाहीं. राष्ट्रीय स्वार्थत्याग आणि कामगिरी एवढ्यापुरताच विचार केला तर बहुधा दुसऱ्या कोणालाच अशा भयंकर अडचणींना, संकटांना आणि अपयशांना तोंड द्यावयाचा प्रसंगही आला नाहीं. इतक्या उज्ज्वलपणानें त्याच्याशीं तोंड देऊन त्यांना दूर सारण्यांत यशही आलें नाहीं.

आपल्या प्राचीन इतिहासांत चक्रवर्ति विक्रम किंवा विक्रमादित्य ह्या शब्दांना विशिष्टार्थानें महत्त्व प्राप्त झालें आहे असें दिसतें. ज्या राजानें इतर सर्व हिंदु राजांना पादाक्रांत केलें आणि मंडलेश्वर सम्राट् ही पदवी धारण करावयाची आपली योग्यता सिद्ध केली त्याला चक्रवर्ति म्हणत; पण ज्यानें चक्रवर्तिपद धारण करण्याइतके विजय संपादले आहेतच; पण त्यांतही ज्यानें केवळ देशी राजांनाच जिंकून श्रेष्ठत्व मिळविलेलें नाहीं तर ज्यानें एकादी प्रबळ परकी सत्ता पादाक्रांत केली आणि आपल्या राष्ट्राची किंवा संस्कृतीची दुसऱ्या परकी वर्चस्वापासून मुक्तता केली अशा नृपश्रेष्ठालाच विक्रमादित्य ह्या पदवीचा मान मिळत असे. पहिल्या विक्रमानें सिथिअन लोकांना भारतवर्षांतून हांकलून लावलें अशी प्रसिद्धि आहे; दुसऱ्या विक्रमानेंही पाश्चिमात्य शकांच्या पारतंत्र्यशृंखलांतून आपल्या मातृभूमीची आणि आपल्या जातीची मुक्तता केली. यशोधर्मा हा तिसरा विक्रमादित्य; ह्यानेंही हूणांना पळवून लावलें आणि महासंग्राम करून त्यांत त्यांच्या राजाला ठार मारलें. तेव्हां हा आमचा तर्क बरोबर असला आणि विक्रमादित्य ह्या नाम-विशेषानें आणि अतिश्रेष्ठ पदवीनें ज्यानें धर्म्य आणि पवित्र अशा युद्धांत आपल्या देशाच्या आणि राष्ट्राच्या परकीय शत्रूंच्याविरुद्ध युद्ध केलें अशा योद्ध्याचा, जो आपली युद्धांतील श्रेष्ठता सिद्ध करण्याकरतांच केवळ नाहीं तर आपलें नैतिक आणि देशासंबंधीं कर्तव्यपालन करण्याकरितां—आपली राष्ट्रीय आपत्ति दूर करण्याकरितां—दिग्विजयाला निघतो आणि द्रव्यतृष्णा आणि धर्मवेड ह्यांनीं अंध झालेल्या अत्याचारी सैन्याला जिंकून आपल्या

समाजाचें आणि जातीचें अगदीं प्राणांशीं गांठ घालणाऱ्या भयंकर संकटापासून संरक्षण करतो अशा विश्वविजेत्याचा निर्देश होत असला तर ज्यांनीं आपल्या हिंदु साम्राज्यापैकीं शेवटचें हिंदु-साम्राज्य निर्माण केलें—आपल्या प्राचीन इतिहासापुरताच विचार करून ज्याला येथें शेवटचे म्हटलें आहे—ज्यांनीं पूर्वींच्या कोणाही चक्रवर्तीपेक्षां किंवा विक्रमादित्यापेक्षां हेतूंच्या दृष्टीनें पाहिलें तर उदात्ततेंत आणि पराक्रमांत जीं यत्किंचितूही कमी भरणार नाहींत आणि महत्त्वाच्या दृष्टीनें अनंत पटीनें उज्ज्वल भरतील अशीं अचाट कृत्यें केलीं त्यांनाही आम्हां हिंदूंना आपल्या प्राचीन इतिहासांतील त्या प्रसिद्ध आणि पूज्य नांवाविषयीं जो आदर, प्रेम आणि कृतज्ञता बाळगतों आणि ठेवतों तोच आदर आणि प्रेम आणि कृतज्ञता आपल्याकडून प्राप्त व्हावी हें अवश्य आहे. कारण, त्यांनीं आपल्या जातीच्या ध्वजा रजपूत राजवृंदाच्या शिथिल झालेल्या हातांतून आपल्या हातांत घेतली, हिंदूंच्या हितसंबंधांशीं ज्यांचें हाडवैर अशा सर्वांच्या विरुद्ध धर्मयुद्धाची घोषणा केली आणि दाहीर आणि अनंगपाल, जयपाल आणि पृथ्वीराज, हरपाल आणि प्रताप, प्रतापादित्य आणि चितोड, माधवाचार्यांच्या आणि सायणाचार्यांच्या बुद्धिबलानें, हरिहरांच्या आणि हक्का बुक्कांच्या भुजबलानें, जणुं काय आपल्या देवांसाठीं बांधलेलें देऊळच असें विजयानगर ह्या सर्वांच्या हौतात्म्याचा प्रतिशोध घेतला.

इतक्या निकरानें आणि आवेशानें उभीं सहा शतकें सतत चाललेलें महायुद्ध त्यांनीं जिंकलें आणि अर्धवट संघटित असतांना आणि केवळ अर्धवट जागी झाली असतांनाही हिंदुजाती केवढे विजय संपादूं शकते हें प्रत्यंतराला आणून जर कधीं काळीं तिला पूर्ण जागृति आली आणि सामाजिक जीवन व प्रयत्न यांच्या पूर्णतेला ती पोंचली तर तिच्यांत किती उज्ज्वल सामर्थ्यगर्भता आहे हें दाखवून दिलें.

तेव्हां त्यांचें आम्हां सर्व हिंदूंवर झालेलें प्रेमाचें आणि कृतज्ञतेचें ऋण आपण मान्य करू या आणि त्यांच्या चरणीं ते पूर्व भागांत दाखविल्याप्रमाणें सामर्थ्याच्या आणि वैभवाच्या शिखरावर आरूढ झालेले आहेत तोंच कृतज्ञ जानपदाची राजनिष्ठा आणि समादर वाहूं या आणि त्यांचें त्यांनीं इतक्या पराक्रमानें प्रस्थापिलेल्या थोर हिंदु साम्राज्याचें शक्य तितकें रेंगाळत अंतिम दर्शन घेऊं या—कारण लवकरच पडदा पडणार आहे;

इतक्या अकस्मात् आणि झटकन् पडणार आहे कीं, त्याबरोबर विजेची गुंडी दाबल्याप्रमाणें तो उज्ज्वल भूतकाल वर्तमानाच्या पाण्यानें भरलेल्या नेत्रासमोरून अदृश्य होऊन जाईल.

---

प्रकरण ७ वें

## पडदा पडतो

"...in his eyes
Was mingled with surprise
The stern joy which warriors feel
In foemen worthy of their steel."

" हिंमत सोडूं नये सर्व पुनः येइल उदयाला " —प्रभाकर.

खर्ड्यांच्या युद्धापर्यंत–शके १७१७ ( इ. सन १७९५ ) पर्यंत–आम्हीं आपलें संक्षिप्त इतिहाससमालोचन आणलें आहे. मागल्या कांहीं प्रकरणांत आम्हीं केलेलीं विधानें समालोचन केलेल्या ह्याच कालखंडाला अवश्यतः उद्देशून आहेत. मराठ्यांच्या ह्या उठावणीच्या सर्व बारिकसारिक प्रसंगांचें वर्णन करावयाचें किंवा परीक्षण करावयाचें हा आमचा हेतु केव्हांच नव्हता. ज्या प्रमुख उद्देशानें आणि ज्या मूलभूत तत्त्वानें त्या उठावणीची स्फूर्ति झाली होती आणि तिला स्वरूप आलें होतें तो उद्देश आणि तें तत्त्व निश्चित करावयाला आणि त्या निर्णयाप्रमाणें तिचें आपल्या हिंदु लोकांच्या इतिहासांतील खरें स्थान ठरवावयाला ज्या उपयोगी पडतील तेवढ्याच घटना पुढें मांडावयाचा आमचा प्रयत्न होता. तें कार्य आतां झालें आहे. तरी पण शके १७१७ पासून मराठी-साम्राज्य अस्ताला गेलें त्या शके १७३९ पर्यंतचा काल इतका दुःखसमाकुल करणारा आहे कीं, त्यावर एक अश्रुबिंदु ढाळल्यावांचून, एक उसासा टाकल्यावांचून पुढें जाणें अशक्य आहे.

आपण पाहिलेंच कीं, मराठ्यांनीं ह्या वेळीं ज्यायोगें शतकानुशतकें चाललेलें हिंदु स्वातंत्र्याचें चिरंजीवी युद्ध जिंकलें गेलें असा कार्यसमाप्तीचा अंतिम घाव मारला होता आणि आपला वंशपरंपरेचा मुसलमान शत्रु पुरा निजवला होता. अवसन्नगामत्र स्थितींत त्यांनीं 'सुटलों आतां' म्हणून निश्चिंततेचा उच्छ्वास

सोडला आणि आपल्या तरवारी उशाशीं घेऊनच एक क्षणभर ते विसांवा घेत पडले. अगदीं बरोबर ह्या क्षणीं एक नवीन आणि पूर्वींपेक्षां किती तरी अधिक बलाढ्य शत्रु, दोनदां त्यांनीं त्याची रग जिरवली असतांही पुन्हा रणक्षेत्रांत उतरला आणि त्यानें त्यांच्यावर सर्व बळ एकवटून निकराचा मारा केला.

अशा स्थितींतही त्यांनीं जिंकलें असतें, निदान त्याला तिसऱ्यांदा पळून जावयाला लावलें असतें; पण इतक्यांतच दुर्भाग्यानें डाव साधला. नाना मरण पावले आणि दुसरे बाजीराव आपल्या लोकांचे अप्रतिबद्ध स्वामी आणि त्यांच्या शत्रूंचे प्रतिकारशून्य दास झाले. हे दोन पुरुष—नाना आणि दुसरे बाजीराव—म्हणजे मराठ्यांच्या ह्या उठावणीच्या समग्र काळांत ज्या दोन विरोधी प्रवृत्ति एकमेकींशीं झगडतांना आपल्याला आढळतात—राष्ट्रविघातक आत्मप्रतिष्ठेकडे आणि अधम स्वार्थाकडे कलणारी एक आणि ज्यांच्या योगानें मनुष्याला स्वतःच्या राष्ट्राच्या मानाचें आणि स्वातंत्र्याचें मूल्य देऊन संपादलेल्या राजकीरिटापेक्षां, राजचिन्हापेक्षां त्याच्या स्वातंत्र्यांत आणि सन्मानांत अधिक भूषण वाटूं लागतें. अशा सार्वजनिक गोष्टींतील स्वार्थरहितत्वाकडे आणि देशासाठीं करावयाच्या आत्मत्यागाकडे कलणारी दुसरी—त्यांचे मूर्तिमंत पुतळे होते. मराठ्यांना अधम मनःप्रवृत्ति आपल्यांतून निर्मूल करून टाकतां आली नसली तरी नाना आणि त्यांची पिढी होती तोंपर्यंत त्यांनीं तिला पूर्ण दाबांत ठेवण्यांत यश मिळविलें होतें—त्याचें फळ म्हणजे त्यांनीं प्रस्थापिलेली थोर हिंदुपदपादशाही. पण आतां दुसऱ्या बाजीरावांनीं—आणि त्यांच्या नामनिर्देशांत जिच्यामध्यें अधमप्रवृत्ति प्रतिनिविष्ट झाली होती त्या त्यांच्या समग्र पिढीचा आम्ही समावेश करतों—वर्चस्व प्राप्त करून घेतलें होतें. तेव्हां त्याला एकत्र बद्ध करणारें सांघिकतेचें तत्त्व सुटल्यामुळें साम्राज्याला निश्चितपणें कोलमडून पडण्यावांचून गति राहिली नव्हती. कारण अगदीं ह्याच वेळीं आपण पाहिल्याप्रमाणें त्याच्यावर एकाद्या हिंदी किंवा आशियांतील राजसत्तेनें नाहीं—तसें असतें तर अद्यापिही मराठे एकंदरींत त्या कोणापेक्षांही अधिक संघटित आणि जास्त देशनिष्ठ असल्यामुळें त्यांनीं आपलें ठाणें सोडलें नसतें-तर इंग्लंडनें आघात केला होता. तेव्हां सामन्याचा निर्णय ठरलेलाच होता.

कारण ह्या वेळीं इंग्लंड तुलनेनें महद्विजय मिळवून देण्याला अवश्यभूत



रणजितसिंग

Lakshmi Art, Bombay, 8.

असणाऱ्या सर्व गोष्टींनीं कितीतरी पटीनें अधिक सज्ज होतें; त्यांचें राष्ट्र आपसांतील वैमनस्यें, गुलाबांच्या (roses) लढाया, धार्मिक छल आणि न्यायालयांतील प्रपीडन ह्यांच्यांतून, अंडकोशांतून बाहेर पडण्याऱ्या काळांतून निघून जाऊन कितीतरी दिवस लोटले होते. आज्ञा करावी कशी आणि पाळावी कशी, अधिकार चालवावा कसा आणि मानावा कसा याविषयींच्या, स्वतंत्रराजसत्तेचें राष्ट्रीय प्रमाणचिन्ह असा आपला राजा आणि आपला देश ह्यांच्याविषयीं देशभक्तीची एकनिष्ठा आणि सर्वांहून अधिक म्हणजे जातीय संश्लिष्टता, उद्देशांची आणि आकांक्षाची एकवाक्यता आणि प्रेमपूर्वक राजनिष्ठा इत्यादि बलिष्ठ संघटनेवर उभारलेल्या राष्ट्रराज्यांमुळें उत्पन्न झालेल्या सार्वजनिक कार्यांतील सर्व सद्गुणांत ते बऱ्याच दिवसांपासून पारंगत झाले होते. मराठ्यांची स्थिति तशी नव्हती. हिंदुस्थानांतील सर्व राजसत्तेपेक्षां ह्या दृष्टीनेंही ते योग्यतम असले तरी त्यांच्यांतही इंग्रजांच्या तुलनेनें ह्या गुणांचा खेदजनक अभाव होता.

तरीही ते एकाकी सामन्याला उभे राहिले. शेवटींशेवटीं हें प्राणरक्षणासाठीं भांडण आहे हें पुरतेपणीं उमगल्यावर त्यांनीं अगदीं भान विसरूनही युद्ध केलें. ते थोर देशनिष्ठ मराठे—बापू गोखले; त्यांच्यासारखा कांहींनीं निराशा आणि मरण हीं त्यांच्याकडे डोळे वटारून पहात असतांनाही शरण न जाण्याचा शेवटचा निश्चय केला. ते एका इंग्रजी अधिकाऱ्याला म्हणाले असतील, "आम्ही आमची तिरडी आमच्याबरोबर घेऊन जात आहोंत असेंही असेल; पण आमच्या तरवारी आमच्या हातांत ठेवून मरण्याचा आम्हीं निश्चय केला आहे." पण आतां त्यांचे सर्व कर्ते राजकारणधुरंधर आणि सेनानायक महादजी आणि नाना, तुकोजी, रघोजी आणि फडके एकदमच मृत्यूनें हरण केल्यामुळें, सैन्य इतक्या परिश्रमानें थकून गेल्यामुळें आणि अयोग्य माणसें नेतृत्वस्थानीं शिरल्यामुळें आणि त्या सर्वांच्या मूर्ध—स्थळीं दुसरे बाजीराव विराजमान झाल्यामुळें, आणि इंग्लंडसारखा भयंकर प्रतिपक्षी मिळाल्यामुळें ह्या साम्राज्याचा निर्णय ठरलेलाच होता. मराठे हरले आणि त्यांच्या बरोबर शेवटचें थोर हिंदु-साम्राज्य—शेवटचें थोर हिंदुस्थानी-साम्राज्य—विलयाला गेलें. आतां केवळ पंजाबांत अजून शिखांनीं हिंदुस्वातंत्र्याची लहानशी तरळ ज्योत जिवंत ठेवली होती; पण तिचाही आणि तसतशा कारणांमुळें लवकरच अंत होणार हीही निश्चित ठरलेली होती.

ह्या आपल्या थोर राष्ट्रीय साम्राज्याच्या समाधीवर हा मृत्युलेख लिहितांना आम्हाला तीव्र वेदना होत आहेत ही गोष्ट आम्ही लपवीत नाहीं; पण इंग्लंड्ला मिळालेल्या विजयाचा आम्ही मत्सर करीत नाहीं. एकाद्या उत्तम खेळाडूप्रमाणें त्यानें समुद्राच्या आणि महासागराच्यापलीकडे, देशांच्या आणि खंडाच्या पलीकडे आपले हात लांबवून आमच्या झगडणाऱ्या हातांतून हिंदुस्तानाला ओढून घेतलें आणि त्या पायावर ज्याच्या तोडीचें साम्राज्य इतिहासांत क्वचितच झालें असेल अशा प्रचंड जगत्साम्राज्याची उभारणी केली ह्याविषयींच्या त्याच्या सामर्थ्याचें आणि कौशल्याचें आम्ही कौतुक करतों.

शकाच्या ह्या १७३९ व्या वर्षांत (इ. सन १८१८) मध्यें आपल्या हिंदुसाम्राज्यांपैकीं अत्यंत वैभवशाली साम्राज्य समाधिस्त झालें आहे. त्याच्यावर दृष्टि ठेवा; आणि येशूची माता मेरी हिनें केलें त्याप्रमाणें भक्तिमय औत्सुक्यानें आपला धूप आणि पूजासाहित्य घेऊन हृदयांतील आशा जागृत ठेवीत काळ काढा !

3544

संपूर्ण

REFBK-0003558